सत्यमेव जयते

# निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह

## ऑगस्ट, २०२३

भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

" एकही मतदार मतदान करण्यापासून वंचित राहू नये "

वाय २६९८–१

**अनुक्रमणिका**


| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| **अ.** | **निवडणूक खर्च संनियंत्रण प्रस्तावना आणि संबंधित कायदेशीर तरतुदी** | | १ |
| | कायदेशीर तरतुदी (भारतीय दंड संहिता, १८६०, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१, निवडणूक चिन्ह (आरक्षण व नियतवाटप) आदेश, १९६८ आणि निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ यांमधील संबंधित उतारे. | एक | ५-१७ |
| **ब.** | **निवडणूक खर्च संनियंत्रणाचे स्वरूप आणि त्यासंबंधात विविध गटांची कार्ये** | | १९ |
| | खर्च निरीक्षकाच्या येण्या-जाण्याचा अहवाल | बी-१ | ३५ |
| | खर्च निरीक्षकाचा अहवाल-एक | बी-२ | ३६ |
| | खर्च निरीक्षकाचा अहवाल-दोन | बी-३ | ३८ |
| | खर्च निरीक्षकाचा अहवाल-तीन | बी-४ | ४० |
| | खर्च निरीक्षकाचा अंतिम अहवाल (अहवाल-चार) | बी-५ | ४६ |
| | खर्च निरीक्षकाचा प्रतिवृतांत/स्थितीदर्शक अहवाल | बी-६ | ४७ |
| | मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने केलेल्या दैनंदिन जप्तीचा नमुना आणि आंतर-राज्य सीमांवरील तपासणी नाके/क्षेत्रांमध्ये केलेल्या दैनंदिन जप्तीसाठी नमुना | बी-७ | ४९ |
| | भरारी पथकाकडून रोकड/ इतर बाबींची जप्ती व संबंधित तक्रारींबाबत दैनिक कारवाईचा अहवाल | बी-८ | ५३ |
| | भरारी पथकाकडून आदर्श आचारसंहितेशी संबंधित तक्रारींबाबतचा दैनिक कारवाईचा अहवाल | बी-९ | ५५ |
| | स्थिर संनिरीक्षण चमूकडून दैनिक कारवाईचा अहवाल | बी-१० | ५६ |
| | अन्वेषण संचालनालयाकडील कार्यक्रम अहवालाचा नमुना | बी-११ | ५७ |
| | भारतीय बनावटीची विदेशी दारू/बियर/देशी दारू यांबाबत राज्य/जिल्हा स्तरावरील मध्यस्थ (मध्यस्थ) अधिकाऱ्याने दिवसाआड द्यावयाच्या अहवालाचा नमुना | बी-१२ | ५८ |
| | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा दैनंदिन हिशोब ठेवण्यासाठी अभिरूप निरीक्षण नोंदवही | बी-१३ | ५९ |
| | सहायक खर्च निरीक्षकाचा दैनिक अहवाल | बी-१४ | ६० |
| | व्हिडिओ संनिरीक्षण गटांकरिता निर्धारक प्रपत्र (क्यू शीट) | बी-१५ | ६१ |
| | मुद्रित/इलेक्ट्रॉनिक माध्यमांकडे आलेल्या जाहिराती/पैसे देऊन प्रसारित केलेल्या बातम्या यांचा तपशील | बी-१६ | ६२ |
| | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा सूचना केंद्राच्या माहितीनुसार केलेल्या दैनंदिन कार्यवाहीचा अहवाल | बी-१७ | ६४ |
| | निवडणुकांमध्ये खर्च संनियंत्रण पथके तैनात करण्याच्या नियतअवधीच्या संबंधात स्पष्टीकरण करण्याबाबतचे आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१४/ईईपीएस/खंड एक, दिनांक ७ एप्रिल, २०१४ | बी-१८ | ६५ |
| | खर्च निरीक्षक आणि निवडणूक खर्च संनियंत्रणाची सर्व अंमलबजावणी अभिकरणे यांच्यातील माहितीची देवाण-घेवाण व समन्वय यासंबंधातील आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ ईईपीएस/२०१६/खंड दोन, दिनांक २२ मार्च २०१६ | बी-१९ | ६६ |

| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | भरारी पथक/स्थिर संनियंत्रण चमू/ व्हिडिओ संनियंत्रण चमू/ व्हिडिओ पाहणारा चमू, लेखांकन चमू, माध्यम प्रमाणन व संनिरीक्षण समिती, मद्य संनियंत्रण आणि हवाई गुप्तवार्ता युनिट यांच्या कर्तव्य प्रारंभाच्या संबंधातील आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ ईईपीएस/ खंड पंधरा, दिनांक २२ मार्च २०१९. | बी-२० | ६७ |
| | टप्प्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये भरारी पथक आणि स्थिर संनियंत्रण चमू तैनात करण्याच्या संबंधातील आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ भानिआ/ अनुदेश/ कार्य/ ईईएम/ ईईपीएस/२०१९/ खंड पाच, दिनांक २२ एप्रिल, २०२९. | बी-२१ | ६८ |
| | विदेशी चलनाच्या जप्तीबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ६१/तक्रारी/सर्वसाधारण निवडणुका/ लोकसभा/२०१९/ईईपीएस/खंड पंधरा, दिनांक १७ मे २०१९. | बी-२२ | ६९ |
| **क.** | **निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांची खर्च संनियंत्रणातली भूमिका** | | ७१ |
| | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी निरीक्षण केल्याप्रमाण (निवडणुकांची घोषणा झाल्यापासून ते निवडणुका संपेपर्यंत) राजकीय पक्षांनी सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी केलेल्या प्रचार खर्चाच्या तपशीलासाठी नमुना. | सी-१ | ८३ |
| | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी द्यावयाचा मासिक अहवाल (भाग अ आणि ब) | सी-२ | ८४-८५ |
| | मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदान संपल्यानंतर सादर करावयाचा तपशीलवार जप्ती अहवाल | सी-३ | ८६ |
| | मतदानाच्या दिवसापर्यंत पोलीस विभागाने केलेल्या जप्ती अहवालासाठी नमुना | सी-४ | ८८ |
| | मतदानाच्या दिवसापर्यंत आयकर विभागाने केलेल्या जप्ती अहवालासाठी नमुना | सी-५ | ९० |
| | मतदानाच्या दिवसापर्यंत उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या जप्ती आणि छापे/मत्ता इ. च्या अहवालासाठी नमुना | सी-६ | ९१ |
| | निवडणूक खर्चाचा हिशेब दाखल करणे-दरपत्रक तयार करणे याबाबतचे आयोगाचे पत्र क्रमांक ७६/२०१४/जे.एस.दोन, दिनांक १७ मार्च २००४. | सी-७ | ९२ |
| | जिल्हा निवडणूक अधिकारी/मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर उमेदवाराच्या दैनंदिन हिशेबाची नोंदवही अपलोड करण्याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/सूचना/२०१३/ईईपीएस/खंड आठ, दिनांक २५ ऑक्टोबर २०१३. | सी-८ | ९५ |
| | मतदान/मतमोजणी प्रतिनिधींचा अल्पोपहार आणि माहिती केंद्र (कीऑस्क) :– उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामधील काल्पनिक खर्चाचे लेखांकन यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/सूचना/ईईपीएस/खंड-एकोणीस, दिनांक ३० डिसेंबर २०१४. | सी-९ | ९६ |
| | जिल्हा खर्च संनियंत्रण समितीसह उमेदवारांचे/निवडणूक प्रतिनिधीबरोबर लेखा पुनर्मेळ बैठकीबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ईसीएस/२०१५/खंड दोन, दिनांक २९ मे, २०१५. | सी-१० | ९७ |
| | शेवटच्या क्षणी उमेदवार/राजकीय पक्षांनी हेलिकॉप्टर बदलण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून प्राधान्य तत्त्वावर परवानगी घेणे यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड दोन, दिनांक ११ ऑक्टोबर २०१५. | सी-११ | १०० |
| | उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांच्या संदर्भात छाननी अहवाल आणि संक्षिप्त अहवाल करण्याची पद्धती कार्य-संबंधी निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड चौदा, दिनांक २ जून २०१६. | सी-१२ | १०१ |

| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या छाननी अहवालाचा फेरबदल केलेला नमुना (आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड चौदा, दिनांक २ जून २०१६). | सी-१३ | १०४-१०८ |
| | दर पत्रकामधून टी-शर्ट, साडी इत्यादी सारख्या बाबी वगळण्याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/इसीआय/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/ईईपीएस/२०१७/खंड एकोणीस, दिनांक १३ डिसेंबर २०१७. | सी-१४ | १०९ |
| | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूक कालावधी दरम्यान ३ वेळा उमेदवाराच्या लेख्यांच्या तपासणी करण्यासाठी तारखा निश्चित करण्याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/भानिआ/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/ईईपीएस/२०१९/खंड सहा, दिनांक १८ फेब्रुवारी २०१९. | सी-१५ | ११० |
| | नमुना २६ मध्ये सुधारणा (उमेदवाराने भरावयाच्या शपथपत्राचा नमुना) आयोगाचे पत्र क्रमांक ३/४/२०१९/एसडीआर/खंड एक, दिनांक २८ फेब्रुवारी २०१९. | सी-१६ | १११-१२२ |
| | निवडणूक खर्च संनियंत्रण प्रणाली सॉफ्टवेअरमध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल भरणे, याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/भानिआ/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/ईईपीएस/२०१९/खंड तीन, दिनांक १९ जून २०१९. | सी-१७ | १२३-१२५ |
| | निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्याच्या बाबतीत कसूर केलेल्या उमेदवारांच्या यादीबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/भानिआ/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/ईईपीएस/२०१९/खंड तीन, दिनांक ९ जुलै २०१९. | सी-१८ | १२६-१२९ |
| | निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ याच्या नियम ८९ अन्वये विहित केलेल्या कालमर्यादेचे पालन न करणे आणि आयोगाच्या सूचना यांबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/भानिआ/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/ईईपीएस/२०२०/खंड सहा, दिनांक २४ जुलै २०२०. | सी-१९ | १३०-१३१ |
| | उमेदवाराने नामनिर्देशन अर्ज आणि शपथपत्र (निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ मध्ये जोडलेल्या नमुना २६ मधील) वैयक्तिक तपशीलाची ऑनलाईन डाटा एन्ट्रीची पर्यायी सुविधा–मार्गदर्शक तत्त्वांबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ३/इ आर/२०२०/एसडीआर/खंड तीन, दिनांक १ ऑक्टोबर २०२०. | सी-२० | १३२-१३४ |
| **ड.** | **निवडणूक प्रचारावरील खर्चाचे संनियंत्रण** | | १३५ |
| | जाहीर सभा/मेळावे इत्यादींवरील खर्चाचा तपशील | डी-१ | १५२-१५३ |
| | पत्रके/भित्तीपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंधांबाबत आयोगाच पत्र क्रमांक ३/९ (इ एस ००८)/९४-जे.एस.दोन, दिनांक २ सप्टेंबर १९९४ | डी-२ | १५४-१५८ |
| | अवरोधक आणि व्यासपीठ इत्यादींवरील खर्चाबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/२००४/जे.एस. दोन, दिनांक १० एप्रिल २००४. | डी-३ | १५९ |
| | राजकीय पक्ष व उमेदवार यांच्याकडून होणाऱ्या निवडणूक प्रचार–उमेदवाराच्या निवडणूक खर्चासंबंधी आयोगाचे पत्र क्रमांक ५७६/३/२००५/जेएस दोन, दिनांक २९ डिसेंबर २००५. | डी-४ | १६०-१६१ |
| | मुख्य प्रचारकांच्या प्रवासावरील निवडणूक खर्च–निवडणूक प्रचारासाठी हेलिकॉप्टरचा वापर, इत्यादीबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/१/२००८-सीसी व बीई, दिनांक २४ ऑक्टोबर २००८ | डी-५ | १६२ |
| | मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांसाठीच्या वाहन परवान्याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ४६४/अनुदेश/२०११/इपीएस, दिनांक २८ मार्च २०११ | डी-६ | १६३ |

| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | निवडणूक खर्च संनियंत्रणाबाबत सूचना–उमेदवाराच्या संबंधातील खर्च-रोख रक्कम प्रदान-यासंबंधातील निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०११/इइएम, दिनांक ७ एप्रिल २०११ | डी-७ | १६४-१६५ |
| | निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या प्रचारकांकडून होत असलेला निवासविषयक खर्च यासंबंधातील स्पष्टीकरणे-निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४६४/एपी-एचपी व एपी-एलए/बीई/२०११/ईईएम, दिनांक ३ जून २०११. | डी-८ | १६६ |
| | सामाजिक अन्नछत्रावर (लंगर, भोजनावळी, इत्यादी) झालेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात अंतर्भूत करणे याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०११/इइएम, दिनांक ५ डिसेंबर २०११. | डी-९ | १६७ |
| | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ११ (१) च्या स्पष्टीकरण (२) अन्वये समाविष्ट असलेल्या, पक्ष नेत्यांच्या (वलयांकित प्रचारकर्त्यांच्या) निवडणूक खर्चाच्या संबंधातील स्पष्टीकरणाबाबत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/इइपीएस, दिनांक २० जानेवारी २०१२ | डी-१० | १६८ |
| | निवडणूक लढविणारा उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या निवडणुकीदरम्यान व्हिडिओ व्हॅनचा वापर करण्यावरील स्पष्टीकरण यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/ईईपीएस, खंड एक, दिनांक ९ फेब्रुवारी २०१२. | डी-११ | १६९ |
| | भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद-३२४ अन्वये निवडणूक कार्यातील संशयास्पद व्यवहारांच्या संबंधात बँकाकडून माहिती एकत्रित करण्याबाबत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ६१/तक्रारी/एपी-एलएस/२०१२/ईईपीएस, दिनांक १९ जुलै २०१२ | डी-१२ | १७० |
| | निवडणुकांच्या कालावधीत दारू साठवणुकीस व बेकायदेशीर वितरणास प्रतिबंध करणे दारूच्या विक्रीबाबतच्या दैनिक अहवालासंबंधात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना अनुदेश याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश ईईपीएस/२०१३/खंड आठ, दिनांक १४ नोव्हेंबर २०१३. | डी-१३ | १७१-१७५ |
| | निवडणूक मोहिमेमध्ये सामाजिक प्रसारमाध्याचा वापर करण्यासंबंधातील आयोगाचे अनुदेश-आयोगाचे पत्र क्रमांक ४९१/साप्रमा/२०१३/संसूचन, दिनांक २५ ऑक्टोबर २०१३. | डी-१४ | १७६-१७८ |
| | राजकीय पक्षाच्या नेत्यांनी (वलयांकित प्रचारक) केलेल्या खर्चाशी संबंधित स्पष्टीकरणांच्या संबंधात-लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) च्या स्पष्टीकरण–१ अन्वये–याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/इइपीएस/खंड एक, दिनांक २२ जानेवारी २०१४. | डी-१५ | १७९-१८० |
| | मंत्री/उमेदवार यांच्या सुरक्षेसाठी खर्च-अनुदेशबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१४/इइपीएस/खंड सात, दिनांक ९ एप्रिल २०१४ | डी-१६ | १८१ |
| | मतदानानंतर आणि निकाल घोषित करण्यापूर्वी उमेदवार/वलयांकित प्रचारक यांच्याकडून केलेल्या प्रवासाच्या संबंधात अनुदेश-आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१४/इइपीएस/खंड एक, दिनांक ९ मे २०१४. | डी-१७ | १८२ |
| | विमान/हेलिकॉप्टर यांच्या वाहनतळ खर्चाबाबत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ६१/तक्रारी/२०१४/इइपीएस/खंड सहा,दिनांक ९ जून २०१४. | डी-१८ | १८३ |
| | निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या वाहनांना परवानगी देणे आणि निवडणूक खर्च खात्यातून खर्च करण्याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस/२०१५/खंड-दोन/दिनांक २९ मे २०१५. | डी-१९ | १८४ |

| | **बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण** | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | उमेदवारांचा व राजकीय पक्षांचा निवडणूक खर्च-प्रचार करण्याच्या प्रयोजनार्थ विदेशांना भेटी देण्याच्या खर्चाबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/२०१६/एसडीआर, दिनांक ३० एप्रिल २०१६. | डी-२० | १८५-१८६ |
| | जाहिराती/पारदर्शकता अहवाल यावरील खर्चाचा मागोवा घेण्यासाठी समाजमाध्यम मंच याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/इइपीएस/२०१९ खंड-वीस, दिनांक १८ एप्रिल २०१९. | डी-२१ | १८७ |
| | हेलिपॅड बांधकाम आणि वाहनतळ ( पार्किंग ) शुल्कावर झालेल्या खर्चाचे लेखांकन– स्पष्टीकरण-याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/इइपीएस/२०१९, खंड अठरा, दिनांक १९ मे २०१९. | डी-२२ | १८८ |
| **ई.** | **उमेदवारांकडून निवडणूक खर्चाच्या लेख्यांचे परिरक्षण** | | १८९ |
| | निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या दैनंदिन हिशेबांच्या नोंदी ठेवण्याकरिता नोंदवही. | ई-१ | १९९-२०४ |
| | निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण | ई-२ | २०५-२१६ |
| | खर्चाच्या बाबींसाठी अतिरिक्त प्रतिनिधी नियुक्त करण्याकरिता प्रपत्र | ई-३ | २१७ |
| | निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराकडून निवडणूक खर्चाचे लेखे ज्या भाषेत नोंदवले जातात त्या भाषेबाबत निवडणूक आयोगाचा आदेश क्रमांक ७६/९५/जे.एस. दोन, दिनांक १० एप्रिल १९९५. | ई-४ | २१८ |
| | लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७( १ ) च्या प्रयोजनार्थ राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या नावांबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ३/१/२००४/जेएस-दोन, दिनांक ३ एप्रिल २००४. | ई-५ | २१९ |
| | लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ ( १ ) अन्वये देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड ( क ) चा लाभ घेऊन पक्षाच्या प्रचारकांद्वारे मार्ग परिवहनाचा वापर याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/अनुदेश/२००८-सीसी व बीई, दिनांक ३१ ऑक्टोबर २००८. | ई-६ | २२० |
| | उमेदवारांच्या निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१३/इइपीएस/खंड-चार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१३. | ई-७ | २२१-२२२ |
| | प्रचाराच्या प्रयोजनासाठी निवडणुकीदरम्यान कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा राजकीय पक्ष यांच्याकडून उमेदवारांना मिळालेल्या देणग्या, इत्यादींबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ ईईपीएस/२०१५/खंड-दोन, दिनांक ९ जून २०१५. | ई-८ | २२३ |
| | उमेदवाराच्या मृत्यूमुळे मतदान स्थगितीमुळे निवडणूक खर्च मर्यादेबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/इइपीएस/२०१८/खंड एक, दिनांक १९ फेब्रुवारी २०१८. | ई-९ | २२४ |
| | मृत्यू प्रकरणात, उमेदवाराने स्वतः प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करणेबाबत स्पष्टीकरण-बाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/भानिआ/अनुदेश/एफयूएनसी/इइएम/इइपीएस/२०१८/खंड सात, दिनांक २३ मार्च २०१८. | ई-१० | २२५ |
| | उमेदवार/राजकीय पक्षाद्वारे धनादेश, धनाकर्ष ( डीडी ), आरटीजीएस ( RTGS )/एनईएफटी ( NEFT ) किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यम, इत्यादीद्वारे एका दिवसात रुपये १०,००० ( दहा हजार ) पेक्षा अधिक रकमेच्या व्यवहारामार्फत केलेल्या निवडणूक खर्च/देणगीच्या पुनरीक्षणा-बाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१८/ईईपीएस, दिनांक १२ नोव्हेंबर २०१८. | ई-११ | २२६-२२७ |

| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | उमेदवार/राजकीय पक्षाद्वारे धनादेश, धनाकर्ष (डीडी), आरटीजीएस (RTGS)/एनईएफटी (NEFT) किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यम, इत्यादीद्वारे एका दिवसात रुपये १०,००० (दहा हजार) पेक्षा अधिक रकमेच्या व्यवहारामार्फत केलेल्या निवडणूक खर्च/देणगीच्या मर्यादेचे पुनरीक्षण-स्पष्टीकरण-याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१८/ईईपीएस, दिनांक १२ नोव्हेंबर २०१८. | ई-१२ | २२८ |
| **एफ.** | **राजकीय पक्षाद्वारे निवडणूक खर्चाचे लेखे ठेवणे** | | २२९ |
| | निवडणूक कालावधीत पैशाच्या वापरावर पायबंद घालण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत केलेल्या उपाययोजनांबाबत,आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ अनुदेश/२०१०, दि. २० ऑक्टोबर,२०१० | एफ-१ | २३५ |
| | मतदानाच्या दिनांकानंतर निवडणूक लढवणारे उमेदवार आणि वलयांकित प्रचारक यांच्याकडुन विमानाने/ हेलिकॉप्टरने झालेल्या प्रवासावरील अतिरिक्त खर्च-यासंबंधात अनुदेश आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ अनुदेश/ २०१२/ ईईपीएस, दिनांक ९ फेब्रुवारी, २०१२ | एफ-२ | २३६ |
| | विधानसभा निवडणुकांनंतर ७५ दिवसांनी/लोकसभा निवडणुकांनंतर ९० दिवसांनी राजकाय पक्षांनी सादर करावयाचे “निवडणूक खर्च विवरण” सादर करण्यासाठीच्या नमुन्यात फेरबदल करण्यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/इइ/२०१२-पीपीईएमएस, दिनांक २१ जानेवारी,२०१३ | एफ-३ | २३७-२५६ |
| | पक्षाचे निधी आणि निवडणूक खर्च या बाबींमधील पारदर्शकता व उत्तरदायित्वविषयक मार्गदर्शक तत्वे याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ पीपीईएमएस/ पारदर्शकता/२०१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१४ | एफ-४ | २५७-२५८ |
| | मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांनी पक्षानिधी आणि निवडणूक खर्च यांचा अहवाल सादर करताना त्यातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व याबाबतच्या मार्गदर्शनपर सूचना यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ पीपीईएमएस/ पारदर्शकता/२०१४, दिनांक १४ ऑक्टोबर,२०१४ | एफ-५ | २५९-२६३ |
| | दिनांक २९ऑगस्ट, २०१४ रोजी राजकीय पक्षांकरिता भारताच्या निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांकरिता जारी केलेल्या पारदर्शक मार्गदर्शक सूचनांबाबतचे स्पष्टीकरण-याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ पीपीएमएस/ पारदर्शकता/२०१३, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ | एफ-६ | २६४-२६५ |
| | निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत राजकीय पक्षांनी, उमेदवारांबाबतच्या निवडणूक खर्चाचे विवरणपत्र भागशः सादर करण्याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ २०१५/ ईईपीएस/खंड-दोन, दिनांक ८ सप्टेंबर,२०१५ | एफ-७ | २६६-२६८ |
| | उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणपत्राचा आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाच्या विवरणपत्राचा सुधारित नमुन्यांबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ भानिआ/अनुदेश / एफयूएनसी/ईईएम/ईईपीएस/२०१९-खंड सतरा, दिनांक ८ मे, २०१९ | एफ-८ | २६९-२७० |
| | उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणाचा आणि राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाचे विवरण सुधारित नमुना–याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ आभासी प्रचार ईईपीएस/२०२२, दिनांक १५ जानेवारी, २०२२ | एफ-९ | २७१-२७२ |
| | राजकीय पक्षांनी,वार्षिक लेखापरीक्षित लेखे सादर करण्यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ५६/ एए/ २०२०-२१/ पीपीईएमएस, दिनांक २१ जानेवारी, २०२२ | एफ-१० | २७३ |

| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| **जी.** | **भरारी पथक, स्थिर संनिरिक्षण चमू, एटीएम व्हॅन, हेलिकॉप्टरची तपासणी, इत्यादींसाठी आणि आयकर विभाग इत्यादीद्वारे संनियंत्रणासाठी प्रमाण कार्यचालन कार्यपध्दती** | | २७५ |
| | निवडणूक खर्च संनियत्रणावरील आयोगाच्या अनुदेशांमध्ये फेरबदल यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ अनुदेश/ ईईपीएस/२०१३/खंड-दोन, दिनांक १६ जानेवारी, २०१३ | जी-१ | २८१-२८२ |
| | निवडणुकांदरम्यान अधिकृत व स्वच्छ चलनातील रोख रकमेची ने-आण संबंधित भारत सरकार, वित्त मंत्रालय यांचे पत्र क्रमांक एफ क्रमांक ६०(२)/ २००८-बीओ, दोन, दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ | जी-२ | २८३-२८४ |
| | जेवण देणे, सामूहिक विवाह, जप्त केलेली रोकड आणि इतर विषयासंबंधीच्या निवडणूक खर्चावरील स्पष्टीकरणासंबंधात आयोगाचे पत्र ७६/ अनुदेश/ २०१३/ ईईपीएस/ खंड पाच, दिनांक १८ एप्रिल, २०१३ | जी-३ | २८५-२८६ |
| | निवडणूक प्रक्रियेच्या वेळी विमानतळावरून अनधिकृत शस्त्रास्त्रे,निषिध्द वस्तू आणि संशयास्पद पैसा/सोने-चांदी यांच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी सुधारित प्रमाणित कार्यचालन पद्धती-याबाबत नागरी विमानचालन सुरक्षा मंडळ, नागरी विमानचालन मंत्रालय, यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक सीएस ७(१५)/ २०१२/ विभाग-एक (निवडणूक) दिनांक ३ जुलै, २०१३ | जी-४ | २८७-२८८ |
| | निवडणूक प्रक्रियेच्या वेळी विमानतळावरून अनधिकृत शस्त्रास्त्रे,निषिध्द वस्तू आणि संशयास्पद पैसा/सोने-चांदी यांच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी सुधारित प्रमाणित कार्यचालन पद्धतीच्या अंमलबजावणीबाबत नागरी विमानचालन सुरक्षा मंडळ, नागरी विमानचालन मंत्रालय, यांचे कार्यालयीन ज्ञापनाचे क्रमांक सीएएस ७(१५)/ २०१२/ डीआय विभाग-एक (निवडणूक)दिनांक, ११ ऑक्टोबर, २०१३ | जी-५ | २८९-२९० |
| | निवडणूक प्रक्रियेच्या वेळी विमानतळावरून संशयास्पद पैसा/सोने-चांदी यांच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती अंमलबजावणी करण्याबाबत महानिरीक्षक, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, नवी दिल्ली यांना नागरी विमानचालन सुरक्षा मंडळ, नागरी विमानचालन मंत्रालय, यांनी निर्गमित केलेले पत्र क्रमांक सीएएस ७(१५)/ २०१२/ विभाग-एक (निवडणूक)दिनांक, १२ नोव्हेंबर, २०१३ | जी-६ | २९१ |
| | रोख रक्कम आणि इतर बाबी जप्त करणे व सोडून देणे याबद्दलची प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती यासंबंधात आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ ईईपीएस/ २०१५/ खंड दोन, दिनांक २९ मे, २०१५ | जी-७ | २९२-२९८ |
| | अनुसूचितर चालक परवानाधारकांची यादी यासंबंधी आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ अनुदेश/ ईईपीएस/ २०१५/ खंड पाच, दिनांक २० जानेवारी, २०१६ | जी-८ | २९९ |
| | कोणत्याही जागेत रोख रक्कम किंवा मौल्यावान वस्तू,इत्यादींचा साठा असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यावर भरारी पथकाने कार्यवाही करण्यासाठी प्रमाणित कार्यचालन पद्धती-आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ अनुदेश/ईईपीएस/ २०१६/ खंड दोन, दिनांक ४ एप्रिल, २०१६ | जी-९ | ३००-३०१ |

| | बाब व जोडपत्राचे संक्षिप्त विवरण | जोडपत्र क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | अधिकारिता असलेल्या सी बी आय सी क्षेत्रीय आस्थापनाद्वारे प्रतिबंधात्मक दक्षात कार्यतंत्र प्रस्थापित करणे आणि निवडणुकीच्या कालावधीत संशयास्पद रोकड, अवैध मद्य, अंमली पदार्थ/ मादक द्रव्ये, भेटवस्तू व तस्करीचा माल यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करणे यांबद्दलच्या प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धतीबाबत भारत सरकार, वित्त मंत्रालय, महसूल विभाग,केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळ (सीबीआयसी) अन्वेषण-सीमाशुल्क यांचा अनुदेश क्रमांक-२२/२०२३ व सीमाशुल्क एफ क्रमांक सीबीआयसी-२१/१२५/ २०२१-आयएनव्ही-सीमाशुल्क सीबीईसी, दिनांक ०६/ ०७ / २०२३. | जी-१० | ३०२-३०७ |
| | निवडणुकांच्या काळात किरकोळ विक्री केंद्रांवर इंधन खरेदीसाठी होणाऱ्या कुपन विक्रीच्या गैरवापराला आळा घालण्याबाबत पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाचे पत्र एम-११०४५/७/२०२३/वितरण/पीएनजी, दिनंक २ ऑगस्ट २०२३ | जी-११ | ३०८ |
| | खर्च संवेदनशील मतदारसंघ(इएससी) आणि खर्च संवेदनशील लोकवस्त्या निश्चित करण्याच्या प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती याबाबत आयोगाचे पत्र क्रमांक ७६/एसओपी-इएसपी/इसीआय/ईपीएस, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ | जी-१२ | ३०९-३११ |
| **एच.** | **निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी, उमेदवार आणि राजकीय पक्ष यांच्यासाठी तपासणी सूची.** | | ३१३-३२९ |
| **आय.** | **वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफ ए क्यू)** | | ३३१-३४० |

# अ.

# निवडणूक खर्च संनियंत्रण

## प्रस्तावना
## आणि
## संबंधित कायदेशीर तरतुदी

## प्रस्तावना

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३२४ च्या आधारे संसदीय निवडणुका तसेच राज्यांच्या/संघ राज्यक्षेत्रांच्या विधानसभा निवडणूकांचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण भारत निवडणूक आयोगाच्या ठायी निहित आहे, म्हणून, प्रत्येक निवडणूक, मुक्त, निष्पक्ष, पारदर्शक व शांततापूर्ण रीतीने पार पाडण्यात येत असल्याची खातरजमा करणे भारत निवडणूक आयोगास बंधनकारक असेल आणि ते त्याचे आवश्यक कर्तव्य असेल. भारत निवडणूक आयोगाचे असे प्रयत्न असतील की, सर्व उमेदवार व राजकीय पक्ष, यांसह सर्व संबंधितांसाठी असलेली समान संधी हिरावून घेतली जाणार नाही आणि पैशांच्या बळाच्या गैरवापरासह कोणत्याही साधनांद्वारे निवडणूक प्रक्रिया दूषित करण्याची मुभा असणार नाही.

कोणत्याही थराला जाऊन मतदारांचा जनादेश विकृत करून वळविण्याचा प्रयत्न करीत असलेल्यांच्या वाढत्या धमकीचा सामना करणाऱ्या एकूणच निवडणूक व्यवस्थापनेमधील येऊ घातलेल्या आव्हानांना प्रतिसाद देण्याचा निवडणूक आयोगाने विडा उचलला आहे आणि म्हणून आयोगाने, २०१० मध्ये बिहार येथे घेण्यात आलेल्या विधानसभा निवडणुकांपासून सुरू होणारा निवडणूक खर्च सुकर करण्यासाठी आणि त्याचे सनियंत्रण करण्यासाठी संरचित यंत्रणेचा अवलंब केला आहे. पैशाच्या आणि शक्तीच्या बळाचा वापर करून धमकी देणाऱ्यांवर लगाम घालताना, भारत निवडणूक आयोग यामध्ये सर्वसाधारण जनतेला कोणत्याही गैरसोयीला तोंड द्यावे लागणार नाही याची खातरजमा करील. किंबहूना, निवडणूक यंत्रणा दूषित करणाऱ्या मतदारांना लाच देण्याच्या आणि इतर भ्रष्ट प्रथांच्या संकटांचा सामना करण्यासाठी, भारत निवडणूक आयोग, यंत्रणेद्वारे तळागाळातील सामान्य माणसाला जीवनावश्यक वस्तू पुरवून व साहाय्य देऊन, सहभागीदार बनवून त्याला संवेदनशील बनविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे याची सुनिश्चिती करील.

## निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणाचे उद्दिष्ट

निवडणूक खर्च स्थूलमानाने दोन प्रवर्गामध्ये विभागता येईल. निवडणूक खर्चाचा पहिला प्रवर्ग हा कायदेशीर खर्चाचा असेल, ज्याला निवडणूक कार्य कायद्यान्वये अनुज्ञेय मर्यादेच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये प्रचाराशी निगडीत जाहीर सभा, जाहीर मेळावे, भित्तिपत्रके घोषणाफलक, वाहने, मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील जाहिराती इत्यादींवर केलेल्या खर्चाचा यामध्ये समावेश असेल. निवडणूक खर्चाचा दुसरा प्रवर्ग हा कायद्यान्वये मान्यता नसलेल्या बाबीवर होणाऱ्या खर्चाचा असेल. उदाहरणार्थ मतदारांवर प्रभाव पाडण्याच्या हेतूने त्यांना पैशांचे, दारूचे वाटप करणे किंवा त्यांना वितरित केलेल्या आणि दिलेल्या इतर कोणत्याही वस्तू हा खर्च लाचलुचपत या व्याख्ये अंतर्गत येत असून असा खर्च करणे भारतीय दंड संहिते अन्वये आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांअन्वये अपराध असेल. अशा बाबीवरील खर्च हा अनधिकृत असेल. अलीकडील काळात सरोगेट जाहिराती, प्रदत्त बातम्या, सामाजिक माध्यमे इत्यादींवर होणाऱ्या खर्चाचे हे दुसरे स्वरूप पुढे येत आहे. म्हणून निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणाचा हेतू दुहेरी आहे. खर्चाच्या पहिल्या प्रवर्गासाठी उमेदवारांनी सादर केलेल्या खर्चाच्या हिशेबाची छाननी करताना, परवानगी दिलेल्या बाबींवरील सर्व निवडणूक खर्चाचा खराखुरा अहवाल सादर केला आहे आणि विचारात घेतला आहे, याची खातरजमा करावी. सरोगेट जाहिराती, प्रदत्त बातम्या, इत्यादीसह खर्चाच्या दुसऱ्या प्रवर्गाचा जेथवर संबंध येत असेल तेथवर, राजकीय पक्ष उमेदवार यांच्याकडून केव्हाही सादर करण्यात येणार नाही हे उघड आहे. विशेषतः उमेदवारांकडून समाज माध्यमामार्फत करण्यात आलेल्या प्रचारावरील खर्च हा सर्वतोपरी सादर न करण्यात येण्याची काळजी घेण्यात येते. असा खर्च पकडण्यासाठी यंत्रणा पुरेशी भक्कम असायला हवी आणि त्याचा केवळ निवडणूक खर्चाच्या हिशेबामध्येच समावेश असणार नाही तर, आवश्यक असेल तर, पोलीस/सक्षम दंडाधिकारी यांच्यासमोर तक्रारी दाखल करण्यासह, कायद्याच्या संबंधित तरतुदी अन्वये, बेकायदा कृत्य करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात कारवाईदेखील करण्यात यावी.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम ७७ (१) हे, लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या प्रत्येक उमेदावारास ज्या तारखेस तो नामनिर्देशित झाला होता ती तारीख व निवडणुकीचा निकाल घोषित झाल्याची तारीख या दोन्ही तारखांसह या दरम्यान त्याने केलेल्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा (हिशेब) ठेवण्यास अनिवार्य करीत आहे. उक्त खर्चाची एकूण रक्कम लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम ७७ (३) अन्वये विहित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक असणार नाही. कलम ७२ (२) अन्वये विहित करण्यात येईल असा तपशील लेख्यामध्ये (हिशेबात) अंतर्भूत असेल. निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ (नियम) याच्या नियम ९० मध्ये

प्रत्येक राज्यामधील व संघराज्य क्षेत्रामधील संसदीय व विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक खर्चाबाबतच्या विविध मर्यादा विहित केल्या आहेत. लेख्यामध्ये (हिशेबामध्ये) दर्शविण्यात यावयाचा तपशील या नियमांच्या नियम ८६ मध्ये विहित केलेला आहे. विहित केल्याप्रमाणे खर्चावरील कमाल मर्यादा जोडपत्र क १ मध्ये दिलेली आहे. लेखे ठेवण्यात कसूर करणे हा भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ झ अन्वये निवडणूकविषयक अपराध आहे (मूळ कायदेशीर तरतुदी जोडपत्र - क १ मध्ये दिलेल्या आहेत).

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (३) अन्वये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात खर्च करणे किंवा प्राधिकृत करणे हे लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ (६) च्या संदर्भात भ्रष्ट आचरण आहे. विहित मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात निवडणूक खर्च करून किंवा प्राधिकृत करून, लाभप्रद उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न करणे हे भ्रष्ट आचरण असल्याचे, सर्वोच्च न्यायालयाने, कंवरलाल गुप्ता विरुद्ध अमरनाथ चावला (ए आय आर १९७५, एससी ३०८) या प्रकरणी खालीलप्रमाणे विशद केले होते :-

> " खर्चास मर्यादा घालणाऱ्या तरतुदीचा उद्देश दुहेरी आहे. पहिला उद्देश म्हणजे, कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही राजकीय पक्षास तो कितीही लहान असला तरीही, अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर किंवा राजकीय पक्षाबरोबर तो कितीही श्रीमंत व आर्थिक सुस्थितीत असला तरीही, समानतेच्या आधारे, निवडणूक लढविण्यास सक्षम असण्यासाठी मुभा (मोकळीक) असली पाहिजे आणि कोणतीही व्यक्ती किंवा राजकीय पक्ष त्यांच्या सर्वोच्च आर्थिक स्थितीच्या आधारे, इतरांपेक्षा अधिक लाभ मिळविण्यासाठी पात्र असता कामा नये....
>
> खर्चास मर्यादा घालणाऱ्या तरतुदीचा दुसरा उद्देश म्हणजे, शक्यतोवर निवडणूक प्रक्रियेतील मोठ्या प्रमाणातील पैशाचा प्रभाव कमी करणे, हा आहे. जर खर्चावर मर्यादा नसतील तर, राजकीय पक्ष, देणग्या गोळा करण्यासाठीच सर्व काही करतील. त्यानंतर मोठ्या प्रमाणातील पैशाचा घातक प्रभाव, देशातील लोकशाही प्रक्रिया नियंत्रणात ठेवण्यात निर्णायक भूमिका बजावेल........"

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७८ नुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत, त्याच्या निवडणूक खर्चाच्या लेख्याची (हिशेबाची) एक सत्य प्रत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे. योग्य कारणाशिवाय किंवा समर्थनाशिवाय, कायद्याद्वारे आवश्यक असलेल्या वेळेच्या आत व रीतीने निवडणूक खर्चाचे लेखे (हिशेब) सादर करण्यात कसूर केल्याच्या परिणामी, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १० क अन्वये, भारताच्या निवडणूक आयोगाकडून संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येऊ शकते.

**सर्वोच्च न्यायालयाने, एल. आर. शिवारामा गोडे विरुद्ध पी. एस. चंद्रशेखर ए आय आर १९९९, एससी २५२ या प्रकरणी असा निर्णय दिला आहे की, आयोग उमेदवाराने दाखल केलेल्या निवडणूक खर्चाच्या लेख्याची (हिशेबाची) चौकशी करू शकतो आणि लेखे (हिशेब) चुकीचे व असत्य असल्याचे आढळून आल्यास, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १० क अन्वये उमेदवारास अपात्र ठरवू शकतो.**

अशाप्रकारे, एखाद्या उमेदवाराने, कायद्याद्वारे विहित केलेल्या कमाल मर्यादेमध्ये त्याचा निवडणूक खर्च ठेवणे एवढेच आवश्यक नाही तर त्याने/तिने, विहित केलेल्या रीतीने त्याच्या/तिच्या निवडणूक खर्चाचा दैनंदिन व सत्य लेखा देखील ठेवावयाचा आहे. निरीक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी किंवा प्राधिकृत व्यक्ती यांना तपासणीसाठी लेखा सादर करावयाचा आहे आणि निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत, तो संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यासदेखील सादर करावयाचा आहे. खर्चाच्या विहित कमाल मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात केलेला खर्च हा विजयी उमेदवाराविरुद्ध निवडणूक याचिका दाखल करण्यासाठीचे कारण ठरू शकते. निवडणूक खर्चासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींचा थोडक्यात सारांश, सारसंग्रहाच्या या प्रकरणात दिला आहे. प्रत्येक प्रकरणासह, विनिर्दिष्ट पैलू अद्ययावत करताना आयोगाने वेळोवेळी दिलेले अनुदेश, हे, निवडणूक खर्चाचे काटेकोर नियंत्रण करण्यासाठी केलेल्या सर्व व असंदिग्ध उपाययोजना समजून देण्यासाठी सोबत जोडले आहेत. निवडणूक खर्चाचे प्रभावी नियंत्रण व त्याची छाननी करण्याच्या संबंधात वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. निवडणूक खर्चाचे परिणामकारक संनियंत्रण व छाननी करण्यासाठी निवडणूक अधिकारी, निरीक्षक, उमेदवार व राजकीय पक्ष यांनी काटेकोरपणे पालन करावयाच्या कायद्याच्या संबंधित तरतुदी व सूचना सारसंग्रहामध्ये एका ठिकाणी एकत्र केलेल्या आहेत.

**जोडपत्र -एक**

## कायदेशीर तरतुदी

१. **भारतीय दंडसंहिता १८६०.**

**१७१ ख. लाचलुचपत :**

(१) जो कोणी-

(एक) कोणत्याही व्यक्तीला कोणताही निवडणूक विषयक हक्क वापरण्यासाठी तिला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करण्याच्या अथवा असा कोणताही हक्क वापरण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला बक्षिशी देण्याच्या हेतूने परितोषण देतो, अथवा,

(दोन) असा कोणताही हक्क वापरल्याबद्दल अथवा असा कोणताही हक्क वापरण्यासाठी अन्य कोणत्याही व्यक्तोला प्रवृत्त करण्याबद्दल बक्षिशी म्हणून कोणतेही परितोषण स्वतः करिता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरिता स्वीकारतो, त्याने लाचलुचपतीचा अपराध केला असे होते :

परंतु, लोकधोरण जाहीर करणे किंवा लोकोपयोगी कारवाईचे वचन देणे हा या कलमाखाली अपराध होणार नाही.

(२) जी व्यक्ती एखादे परितोषण देऊ करील, किंवा देण्याचे कबूल करील, अथवा तो मिळवून देण्याची तयारी दर्शवील किंवा तसा प्रयत्न करील ती परितोषण देते असे मानले जाईल.

(३) जी व्यक्ती एखादे परितोषण मिळविल किंवा स्वीकारण्याचे कबूल करील किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील ती परितोषण स्वीकारते असे मानले जाईल, आणि जी व्यक्ती आपणास जे करणे उद्देशित नाही त्यासाठी प्रलोभन म्हणून किंवा आपण जे केलेले नाही त्याबद्दल बक्षिशी म्हणून एखादे परितोषण स्वीकरते तिने बक्षिशी म्हणून ते परितोषण स्वीकारले आहे असे मानले जाईल.

१७१ ङ **लाचलुचपतीबद्दल शिक्षा.**—जो कोणी लाचलुचपतीच् अपराध करील त्याला, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील : परंतु, सरबराईद्वारे लाचलुचपतीचा अपराध करण्याबद्दल फक्त द्रव्यदंडच ठोठावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—" सरबराई " याचा अर्थ, ज्या बाबतीत खाद्य, पेये, करमणूक किंवा सामग्रीपुरवठा या रूपात परितोषण दिले जाते त्या प्रकारची लाचलुचपत असा आहे.

१७१ च. **निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याबद्दल किंवा तोतयागिरी करण्याबद्दल शिक्षा :**—जो कोणी निवडणुकीत गैरवाजवी प्रभाव पाडण्याचा किंवा तोतयागिरी करण्याचा अपराध करील त्याला एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

१७१ ज. **निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे.**—उमेदवाराकडून सर्वसाधारण किंवा विशेष लेखी प्राधिकार नसताना जो कोणी, अशा उमेदवाराच्या निवडणुकीला चालना देण्याकरिता किंवा त्यास निवडून आणण्याकरिता कोणताही सार्वजनिक सभा भरवण्याखातर अथवा कोणतीही जाहिरात, परिपत्रक किंवा प्रकाशन यावर अथवा अन्य कोणत्याही प्रकारे खर्च करील किंवा त्यास प्राधिकृती देईल त्याल, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईलः

परंतु, जर कोणत्याही व्यक्तीने प्राधिकार नसताना जास्तीत जास्त दहा रुपयांपर्यंत काही रक्कम अशा रीतीने खर्च केल्यानंतर, असा खर्च केल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत त्या खर्चास उमेदवाराची लेखी, मान्यता मिळवली तर, तिने उमेदवाराच्या प्राधिकारानिशी असा खर्च केला असल्याचे समजण्यात येईल.

१७१ झ. **निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे.—** निवडणुकीमध्ये किंवा तिच्या संबंधात होणाऱ्या खर्चाचे आपण हिशेब ठेवणे त्या त्या निवडणुकीचे हिशेब त्याकाळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार किंवा कायद्याप्रमाणे प्रभावी असलेल्या कोणत्याही नियमानुसार आवश्यक असताना जो कोणी असे हिशेब ठेवण्यात चुकेल त्याला, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

२. **लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१.**

७७. **निवडणूक खर्चाचा हिशेब आणि त्याची कमाल मर्यादा.—**(१) निवडणुकीतील प्रत्येक उमेदवाराला (तो नामनिर्देशित झाल्याचा दिनांक) व त्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याचा दिनांक हे दोन्ही दिवस धरून होणाऱ्या कालावधीच्या दरम्यान निवडणुकीच्या संबंधात त्याला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आलेल्या अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीकरवी स्वतंत्र व **यथातथ्य हिशेब** ठेवावा लागेल.

[ **स्पष्टीकरण :** १ शंकानिरसनार्थ याद्वारे घोषित करण्यात येते की—

(क) एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याला राजकीय पक्षाच्या प्रचार कार्यक्रमासाठी केलेल्या विमान प्रवासामुळे किंवा अन्य कोणत्याही वाहतुकीच्या साधनाने केलेल्या प्रवासामुळे आलेला खर्च हा त्या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, निवडणुकीच्या संबंधात, त्या राजकीय पक्षाच्या उमेदवाराला किंवा त्याच्या प्रतिनिधीला आलेला किंवा त्याने प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानले जाणार नाही.

(ख) सरकारी नोकरीतील आणि कलम १२३ च्या खंड (७) मध्ये उल्लेखिलेल्या वर्गापैकी कोणाही व्यक्तीने त्या खंडाच्या परंतुकात उल्लेख केल्याप्रमाणे आपले पदीय कर्तव्य पार पाडताना किंवा ते पार पाडण्याचे अभिप्रेत असताना केलेली कोणतीही व्यवस्था, उपलब्ध करून दिलेल्या सुविधा अथवा तिने केलेली अन्य कोणतीही कृती किंवा गोष्ट यासंबंधात आलेला कोणताही खर्च हा या पोट कलमाच्या प्रयोजनार्थ, निवडणुकीच्या संबंधात उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला आलेला किंवा त्याने प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण २.—**स्पष्टीकरण १ च्या खंड (क) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही निवडणुकीच्या संबंधात " राजकीय पक्षाचे नेते " या शब्दप्रयोगाचा अर्थ -

या अधिनियमान्वये भारताच्या **राजपत्रात** किंवा यथास्थिती, राज्याच्या **शासकीय राजपत्रात** अशा निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, राजकीय पक्ष ज्यांची नावे अशा निवडणुकीचे नेते म्हणून निवडणूक आयोगास व राज्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांना कळवील अशा व्यक्ती, असा आहे.

(एक) असा राजकीय पक्ष हा मान्यताप्राप्त राजकीय पक्ष असेल तर अशा व्यक्तींची संख्या चाळीस पेक्षा अधिक असणार नाही आणि

(दोन) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांखेरीज अन्य पक्ष असेल तर अशा व्यक्तींची संख्या वीस पेक्षा अधिक असणार नाही :-

परंतु, खंड (एक) किवा यथास्थिति खंड (दोन) मध्ये निर्देशित केलेल्या व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती मृत पावल्यास किंवा राजकीय पक्षाचा सदस्य असणे बंद झाल्यास, असा राजकीय पक्ष, अशा निवडणुकीसाठीचे अंतिम मतदान समाप्त होण्यासाठी निश्चित केलेल्या तासांसह अठ्ठेचाळीस तास संपण्याच्या लगतपूर्वीच्या कालावधीत अशा मृत व्यक्तीच्या नावांऐवजी किंवा सदस्य असण्याचे बंद झाल्यामुळे त्याच्या जागी नवीन नेता नियुक्त करण्यासाठी त्याच्या ऐवजीचे नवीन नाव निवडणूक आयोगास व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास कळवील.]

(२) विहित केला जाईल असा सर्व तपशील या हिशेबामध्ये समाविष्ट असेल.

(३) उक्त खर्चाची एकूण रक्कम ही विहित केली जाईल अशा रकमेपेक्षा जास्त असणार नाही.

(लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५९ याच्या कलम ७७, पोट-कलम (१) खालील स्पष्टीकरण १ (क) व स्पष्टीकरण २ अनुसार, एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्याला पक्षाच्या प्रचार कर्यक्रमासाठी केलेल्या प्रवासामुळे आलेला खर्च हा निवडणुकीच्या संबंधात उमेदवाराला किंवा त्याच्या प्रतिनिधीला आलेला किंवा त्याने प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानले जाणार नाही).

७८. **जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे हिशेब दाखल करणे.**—(१) निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, निर्वाचित उमेदवाराच्या निवडणुकीच्या दिनांकापासून किंवा त्या निवडणुकीमध्ये एकापेक्षा अधिक निर्वाचित उमेदवार असतील आणि त्यांच्या निवडणुकांचे दिनांक भिन्न भिन्न असतील तर त्या दोहोंपैकी नंतरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, कलम ७७ खाली त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या निवडणूक खर्चाचा हिशेब (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यापुढे) दाखल करावा लागेल व कलम ७७ खाली त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या हिशेबाची ती खरी प्रत असेल,

**१० क निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केल्याबद्दल निरर्हता—** एखाद्या व्यक्तीने

(क) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली आवश्यक असलेल्या मुदतीत आणि तशा पद्धतीने निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ख) अशा कसुरीबद्दल सबळ कारण किंवा समर्थन नाही, अशी जर निवडणुक आयोगाची खात्री झाली तर, निवडणूक आयोग, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे ती व्यक्ती निरर्ह असल्याचे जाहीर करील आणि अशी कोणतीही व्यक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीपर्यंत निरर्ह ठरेल.

१२३. **भ्रष्टाचारी प्रथा.—** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी या भ्रष्टाचारी प्रथा या समजण्यात येतील :-

३ [(१) " लाचलुचपत " म्हणजेच-

**(क)** उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला-

(क) निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे राहण्यास किंवा न राहण्यास किंवा उमेदवार म्हणून नाव (मागे घेण्यास किंवा न घेण्यास), अथवा

(ख) निवडणुकीच्या वेळी एखाद्या मतदाराला मत देण्यास किंवा मतदान न करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे प्रवृत्त करण्याच्या हेतूने, अथवा-

(एक) याप्रमाणे उमेदवार म्हणून उभे राहिल्याबद्दल किंवा न राहिल्याबद्दल किंवा (आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल, किंवा मागे न घेतल्याबद्दल) एखाद्या व्यक्तीला, किंवा

(दोन) मतदान केल्याबद्दल किंवा मतदान न केल्याबद्दल मतदाराला, बक्षीस म्हणून एखादे परितोषण देणे, देऊ करणे किंवा तसे वचन देणे.

**(ख)** (क) उमेदवार म्हणून उभे राहिल्याबद्दल किंवा उभे न राहिल्याबद्दल किंवा (आपनी उमेदवारी मागे घेण्याबद्दल किंवा न घेण्याबद्दल एखाद्या व्यक्तीने, किंवा

(ख) एखाद्या व्यक्तीने स्वतः किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने मतदान करण्याबद्दल किंवा न करण्याबद्दल किंवा एखाद्या मतदाराला मत देण्यास किंवा देण्याचे वर्जिण्यास किंवा

उमेदवाराला (त्याची उमेदवारी मागे घेण्यास किंवा न घेण्यास प्रवृत्त करण्याबद्दल किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल प्रलोभन किंवा बक्षीस म्हणून एखादे परितोषण घेणे किंवा घेण्याचा करार करणे.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ "परितोषण" या संज्ञेचा अर्थ, आर्थिक परितोषणे किंवा पैशामध्ये किंमत करता येण्यासारखी परितोषणे यांच्यापुरता मर्यादित नाही व त्यामध्ये सर्व स्वरुपाच्या करमणुकीच्या आणि सर्व स्वरुपाच्या मोलमजुरीचा समावेश होतो, पण कोणत्याही निवडणुकीच्या वेळी किंवा निवडणुकीच्या प्रयोजनासाठी प्रामाणिकपणे केलेला आणि कलम ७८ मध्ये निर्देशिलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात रीतसर नोंद केलेला कोणताही खर्च देण्याचा त्यात समावेश होत नाही ].

(२) गैरवाजवी दडपण म्हणजेच एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही निवडणूक विषयक अधिकाराच्या मुक्त वापरामध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करणे किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करणे : परंतु -

(क) या खंडातील उपबंधाच्या व्यापकतेला बाध न येता, यामध्ये निर्देशिल्याप्रमाणे अशी ती कोणतीही व्यक्ती—

(एक) कोणत्याही उमेदवाराला किंवा कोणत्याही मतदाराला किंवा ज्या व्यक्तीमध्ये उमेदवाराच्या किंवा मतदाराचा हितसंबंध आहे त्या व्यक्तीला, सामाजिक बहिष्कार तसेच जाती बहिष्कार किंवा कोणत्याही जातीतून किंवा समाजातून वाळीत टाकणे यासुद्धा अशा कोणत्याही प्रकारची क्षती पोहोचवण्याची धमकी येईल, किंवा

(दोन) उमेदवाराला किंवा कोणत्याही मतदाराला, तो स्वतः किंवा ज्यामध्ये त्याचा हितसंबंध आहे असी अन्य व्यक्ती, दैवी अवकृपेचा किंवा धार्मिक रोषाचा बळी होईल किंवा केला जाईल असे समजण्यास प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील, ती व्यक्ती, या खंडाच्या अर्थानुसार अशा उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या निवडणूक विषयक अधिकाराच्या वापरामध्ये हस्तक्षेप करीत असल्याचे समजण्यात येईल.

(ख) सार्वजनिक धोरणाची घोषणा किंवा सार्वजनिक कार्य करण्याचे वचन किंवा निवडणूक विषयक अधिकारामध्ये हस्तक्षेप करण्याचा उद्देश नसताना केवळ वैध अधिकाराचा वापर हा खंडाच्या अर्थानुसार हस्तक्षेप असल्याचे मानले जाणार नाही.

१[(३) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्ती, त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला तिचा धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा किंवा धार्मिक प्रतीकांचा वापर किंवा त्यांना आवाहन अगर राष्ट्रध्वज किंवा राष्ट्रचिन्ह यांसारख्या कारणावरून मतदान करण्यास किंवा मतदान करण्याचे वर्जिण्यास आवाहन करणे :

२ [परंतु या अधिनियमाखाली उमेदावाराला नेमून दिलेली कोणतीही निशाणी हे या खंडाच्या प्रयोजनार्थ धार्मिक प्रतीक किंवा राष्ट्रीय प्रतीक मानले जाणार नाही.]

(३क) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा उमेदवारांच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम

करण्यासाठी, धर्म, वंश, जात जमात किंवा भाषा या कारणावरून भारतीय नागरीकांच्या निरनिराळ्या वर्गामध्ये आपापसात शत्रुत्वाची किंवा विद्वेषाची भावना वाढीस लावणे किंवा वाढीस लावण्याचा प्रयत्न करणे. ।

(४) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही उमेदवाराचे व्यक्तीगत चारित्र्य किंवा वर्तणूक या संबंधातील अथवा त्याच्या उमेदवारीच्या किंवा उमेदवारी मागे घेण्याच्या *** संबंधातील जे कोणतेही तथ्यविषयक कथन खोटे आहे किंवा ने एकतर खोटे आहे असे त्याला वाटते किंवा जे खरे नाही असे त्याला वाटते असे व ज्यामुळे त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम होण्यासारखा आहे असे वाटण्यास पुरेसा वाव असेल असे तथ्यविषयक कथन प्रकाशित करणे,

(५) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [ उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने देऊन किंवा अन्यथा वाहन किंवा जलयान भाड्याने घेणे किंवा मिळवणे अथवा कोणत्याही मतदाराला, (उमेदवार, त्याचे कुटुंबीय किंवा त्याचा प्रतिनिधी यांव्यतिरिक्त) मतदानासाठी कलम २५ खाली व्यवस्था केलेल्या मतदान केंद्रावर किंवा कलम २९ च्या पोट-कलम (१) खाली मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी [ विनाशुल्क नेण्यासाठी किंवा तेथून परत आणण्यासाठी अशा वाहनाचा किंवा जलयानाचा वापर करणे:]

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी संयुक्तपणे, अशा मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी जाण्यासाठी परत येण्यासाठी वाहन किंवा जलयान स्वखर्चाने भाड्याने आणणे हे जर अशा तऱ्हेने भाड्याने आणलेले वाहन किंवा जलयान यांत्रिक शक्तीवर चालणारे नसेल तर या खंडानुसार भ्रष्टाचार समजला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, एखाद्या मतदाराने मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी जाण्यासाठी किंवा तेथून परत येण्यासाठी स्वखर्चाने एखादे सार्वजनिक वाहन किंवा ट्रामगाडी किंवा आगगाडी यांचा केलेला वापर या खंडानुसार भ्रष्टाचार समजला जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या खंडामध्ये " वाहन " या संज्ञेचा अर्थ परिवहनाच्या प्रयोजनासाठी सडकेवर वापरले जाणारे किंवा वापरता येण्याजोगे कोणतेही वाहन असा आहे - मग ते यांत्रिक शक्तीवर चालणारे असो वा अन्यथा असो, तसेच ते इतर वाहने ओढण्यासाठी वापरलेले असो वा अन्यथा वापरलेले असो.

(६) कलम ७७ चे व्यतिक्रमण करून खर्च करणे किंवा प्रधिकृत करणे.

(७) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा [ उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने] अन्य कोणत्याही व्यक्तीने त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी शासनाच्या सेवेतील आणि पुढील वर्गापैकी कोणाही व्यक्तीकडून (मतदानाव्यतिरिक्त) कोणतेही सहाय्य घेणे किंवा मिळवणे अथवा घेण्याच्या किंवा मिळविण्याच्या कामी अपप्रेरणा देणे किंवा तसा प्रयत्न करणे हे वर्ग असे :-

(क) राजपत्रित अधिकारी.

(ख) वैतनिक न्यायाधीश व दंडाधिकारी,

(ग) संघराज्याच्या सशस्त्र सेनेचे सदस्य,

(घ) पोलीस दलाचे सदस्य,

(ङ) उत्पादन शुल्क अधिकारी,

२ [(च) जमीन महसुलाची उगराणी करणे हे ज्यांचे काम असते आणि ते त्यांनी उगराणी केलेल्या जमीन महसुलाच्या रकमेचा भाग किंवा अडत या स्वरूपात पारिश्रमिक घेतात आणि ज्यांना कोणतीही सुव्यवस्थारक्षणाची कामे करावी लागत नाहीत असे लंबरदार, मालगुजार, पटेल, देशमुख किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या ग्रामीण महसूल अधिकाऱ्यांहून अन्य महसूल अधिकारी ; आणि]

(छ) विहित केलेला असेल असा शासकीय सेवेतील अन्य व्यक्तिवर्गः

३ [ परंतु, शासनाच्या सेवेत असलेल्या व पूर्वोक्तांपैकी कोणत्याही वर्गातील कोणाही व्यक्तीने आपले पदीय कर्तव्य पार पाडताना किंवा ते पार पाडण्याचे अभिप्रेत असताना जर कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी अथवा त्या उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने काम करणारी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यासाठी कोणतीही व्यवस्था केली किंवा कोणत्याही सुविधा पुरवल्या किंवा त्याच्या संबंधात अन्य कोणतीही कृती किंवा गोष्ट केली (मग ते त्या उमेदवाराने धारण केलेल्या पदामुळे असो वा अन्य कोणत्याही कारणास्तव असो) तर, अशी व्यवस्था, सुविधा किंवा कृती किंवा गोष्ट म्हणजे त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी दिलेले सहाय्य होय असे मानले जाणार नाही.]

४ [(८) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा इतर व्यक्तीने बूथ ताब्यात घेणे.]

**स्पष्टीकरण.**—(१) या कलमामधील " प्रतिनिधी " या संज्ञेमध्ये, निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी आणि उमेदवाराच्या संमतीने निवडणुकीच्या संबंधात जिने प्रतिनिधीप्रमाणे कार्य केले आहे असे न्यायनिर्णित केले गेले असेल अशी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश होतो.

(२) खंड (७) च्या प्रयोजनार्थ, एखादी व्यक्ती एखाद्या उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधी १ *** म्हणून कार्य करीत असल्यास, ती व्यक्ती त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी सहाय्य करीत असल्याचे मानण्यात येईल.

२[(३) खंड (७) च्या प्रयोजनार्थ, अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारच्या सेवेत असलेल्या (एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासनाच्या संबंधात सेवा करणारी, व्यक्ती धरून) किंवा एखाद्या राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या व्यक्तीची नियुक्ती, राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा तिला सेवेतून दूर करणे यासंबंधीचे **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झालेले वृत्त म्हणजे

(एक) अशा व्यक्तीची नियुक्ती, राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा प्रकरणपरत्वे, तिला सेवेतून दूर करण्यात येणे याचा, आणि

(दोन) अशी नियुक्ती, राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा प्रकरणपरत्वे, तिला याप्रमाणे सेवेतून दूर केले जाणे ही घटना अंमलात येण्याचा दिनांक अशा प्रकाशनात नमूद केलेला असेल तर, अशी व्यक्ती उक्त दिनांकी व तेव्हांपासून नियुक्त करण्यात आली होती, या गोष्टीचाही अथवा राजीनामा, सेवासमाप्ती, बडतर्फी किंवा सेवेतून दूर करणे यांच्या बाबतीत, अशी व्यक्ती उक्त दिनांकी व तेव्हापासून अशा सेवेत असण्याचे बंद झाले होते या गोष्टीचाही

निर्णायक पुरावा असेल.]

३ [(४) खंड (८) च्या प्रयोजनार्थ " बूथ ताब्यात घेणे " याचा कलम १३५ क मधील अर्थासारखाच असेल. ]

१२५ क. **खोटे प्रतिज्ञापत्र, इत्यादी सादर केल्याबद्दल शिक्षा**—जो उमेदवार निवडणुकीत निवडून येण्याच्या हेतूने स्वतः किंवा आपल्या प्रस्तावकामार्फत,-

(एक) कलम ३३ अ च्या पोट-कलम (१) शी संबंधित माहिती देण्यास अपयशी ठरेल; किंवा

(दोन) जी खोटी असल्याचे त्याला माहित आहे किंवा खोटी मानण्यास कारण आहे अशी खोटी माहिती देईल; किंवा

(तीन) कलम ३३ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेल्या उमेदवारी अर्जात किंवा कलम ३३ क च्या पोट-कलम (२) अन्वये सादर करणे आवश्यक असलेल्या प्रतिज्ञापत्रात कोणतीही माहिती लपवील, तो, इतर कोणत्याही कायद्यात काहीही नमूद असले तरी, सहा महिन्यांपर्यंत वाढवता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

१२७ क. **पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध.**—(१) कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणतेही निवडणूक पत्रक किंवा भित्तिपत्रक मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही अथवा मुद्रित किंवा प्रकाशित करवता येणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीला निवडणूकपत्रक किंवा भित्तिपत्रक-

(क) ती स्वतःच त्याचा प्रकाशक आहे याबद्दलचे स्वतः स्वाक्षरित केलेले आणि ज्या व्यक्ती तिला व्यक्तीशः ओळखतात अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन त्याने मुद्रकाला दोन प्रतीमध्ये दिल्याशिवाय; आणि

(ख) तो दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रकाने त्या कागदाच्या एका प्रतीसह अधिकथनाची एक प्रत-

(एक) तो राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मुद्रित झाला असेल तर, मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याला आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत तो ज्या जिल्ह्यामध्ये मुद्रित झाला असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला, पाठविल्याशिवाय मुद्रित करता येणार नाही किंवा मुद्रित करवता येणार नाही.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) कागदपत्र हाताने नकलून काढण्याच्या प्रक्रियेतून अन्य कोणतीही अनेक प्रती काढण्याची प्रक्रिया म्हणजे मुद्रण असल्याचे समजण्यात येईल आणि " मुद्रक " या संज्ञेचा अर्थ तद्नुसार लावला जाईल आणि

(ख) " निवडणूकपत्रक किंवा भित्तीपत्रक " याचा अर्थ, उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या एखाद्या गटाच्या निवडणुकीचे प्रचालन करण्यासाठी किंवा निवडणुकीला बाध आणण्यासाठी वाटण्यात आलेले कोणतेही मुद्रतपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किंवा निवडणुकीशी संबंधित असा घोषणाफलक किंवा भित्तिफलक असा होतो. पण निवडणूक सभेचा दिनांक, वेळ, ठिकाण आणि इतर तपशील किंवा निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांच्यासाठी नेहमीच्या सूचना जाहीर करणारी हस्तपत्रके, घोषणाफलक किंवा भित्तिपत्रक यांचा समावेश होत नाही.

(४) जी व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मधील कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

२९ ख. **राजकीय पक्षांना अभिदान स्वीकारण्याचा अधिकार असणे.—**कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या तरतुदींच्या अधीन राहून, प्रत्येक राजकीय पक्ष सरकारी कंपनी व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती किंवा कंपनीने स्वेच्छेने देऊ केलेले कोणतेही अभिदान स्वीकारू शकेल :

परंतु कोणताही राजकीय पक्ष विदेशी अभिदान (विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ४९) च्या कलम २ च्या खंड (ङ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही विदेशी उगमस्थानाकडून कोणतेही अभिदान स्वीकारण्यास पात्र असणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या आणि कलम २९ ग च्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " म्हणजे कलम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कंपनी ;

(ख) " सरकारी कंपनी" याचा अर्थ कलम ६१७ मध्ये कंपनी चा जो अर्थ दिला आहे तो असेल ; आणि

(ग) " अभिदान " याचा अर्थ कंपनी कायदा, १९५६ (१९५६ चा १) कलम २९३ क अन्वये त्याला जो अर्थ नेमून दिलेला आहे तो असेल आणि त्यात कोणत्याही व्यक्तीने राजकीय पक्षाला दिलेली कोणतीही देणगी किंवा वर्गणी समाविष्ट असेल ; आणि

(घ) " व्यक्ती " याचा अर्थ, आयकर कायदा, १९६१ (१९६१ चा ४३) च्या कलम २ च्या खंड (३१) अन्वये त्याला जो अर्थ नेमून दिला आहे तो असेल, परंतु त्यात शासनाकडून पूर्णतः किंवा अंशतः निधी दिला जातो अशा सरकारी कंपनी, स्थानिक प्राधिकरण आणि प्रत्येक विधिनिर्मित विधिमान्य व्यक्तीचा समावेश असणार नाही.]

२९ग. **राजकीय पक्षांनी त्यांना मिळालेल्या देणगीची घोषणा करणे.—**(१) राजकीय पक्षाचा खजिनदार किंवा याबाबतीत राजकीय पक्षाने प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती, प्रत्येक आर्थिक वर्षात, खालील बाबींचा अहवाल तयार करेल, त्या अशा :—

(क) राजकीय पक्षाला त्या आर्थिक वर्षात कोणत्याही व्यक्तीकडून मिळालेले वीस हजार रुपयांपेक्षा जास्त असेल असे अभिदान ;

(ख) राजकीय पक्षाला त्या आर्थिक वर्षात सरकारी कंपन्या व्यतिरिक्त इतर कंपन्यांकडून मिळालेले वीस हजार रुपयांपेक्षा जास्त असेल असे अभिदान.

[परंतु, या पोट-कलमामध्ये नमूद असलेली कोणतीही बाब निवडणूक बंधपत्राच्या माध्यमातून स्वीकारलेल्या अभिदानांना लागू असणार नाही.]

**स्पष्टीकरण—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " निवडणूक बंधपत्र " याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम ३१ च्या पोट-कलम (३) च्या स्पष्टीकरणात जो अर्थ संदर्भित केला आहे तो असेल.]

(२) पोट-कलम (१) अन्वयेचा अहवाल विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वयेचा आर्थिक वर्षाचा अहवाल राजकीय पक्षाच्या खजिनदाराने किंवा राजकीय पक्षाने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) च्या कलम १३९ अन्वये त्या आर्थिक वर्षातील त्याच्या उत्पन्नाचा परतावा सादर करण्याच्या देय दिनांकापूर्वी निवडणूक आयोगाला सादर केला पाहिजे.

(४) जेव्हा, कोणत्याही राजकीय पक्षाचा खजिनदार किंवा राजकीय पक्षाने याबाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती पोट-कलम (३) अन्वये अहवाल सादर करण्यात अपयशी ठरेल, तेव्हा, आयकर कायदा, १९६१ (१९६१ चा ४३) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, असा राजकीय पक्ष, त्या कायद्यांतर्गत कोणतीही कर सवलत मिळण्यास हक्कदार असणार नाही.

**३. निवडणूक चिन्ह (आरक्षण व नियतवाटप) आदेश, १९६८ :**

**[१६ अ ] आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यात अपयशी ठरल्याबद्दल किंवा आयोगाचे कायदेशीर निर्देश व सूचनांचे पालन करण्यात अपयशी ठरल्याबद्दल मान्यताप्राप्त राजकीय पक्षाची मान्यता निलंबित करण्याचा किंवा काढून घेण्याचा आयोगाचा अधिकार.**—या आदेशात काहीही नमूद असले तरी, जर आयोगाचे त्याच्याकडे असलेल्या माहितीप्रमाणे, असे समाधान झाले की, या आदेशातील तरतुदींनुसार राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष म्हणून मान्यता प्राप्त असलेला एखादा राजकीय पक्ष, (क) आयोगाने राजकीय पक्ष व " उमेदवार " यांच्या मार्गदर्शनासाठी जानेवारी, १९९१ मध्ये जारी केलेल्या किंवा वेळोवेळी सुधारित केलेल्या आदर्श आचारसंहितेतील तरतुदींचे पालन करणे किंवा (ख) आयोगाने स्वतंत्र, निष्पक्ष आणि शांततेत निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने किंवा सर्वसामान्य जनता आणि विशेषतः मतदारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी दिलेले कायदेशीर निर्देश व सूचनांचे पालन करणे किंवा त्यांची अंमलबजावणी करणे यांमध्ये अपयशी ठरला आहे किंवा त्यांना नाकारले आहे किंवा अवगणना दर्शविली आहे किंवा त्याच्या वर्तनाद्वारे किंवा अन्यथा अवगणना दर्शवत आहे, तर आयोग, प्रकरणातील सर्व उपलब्ध वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेऊन आणि पक्षाला त्याच्याविरुद्ध प्रस्तावित कारवाई करण्याच्या संदर्भात कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयोगाला योग्य वाटेल अशा अटींच्या अधीन राहून, एकतर अशा पक्षाची यथास्थिती राष्ट्रीय पक्ष किंवा राज्य पक्ष म्हणून असलेली मान्यता निलंबित करू शकेल किंवा काढून घेऊ शकेल.]

**४. निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१**

८५ब. **अभिदान अहवालाचा नमूना.**—कलम २९ ग च्या पोट-कलम (१) अन्वयेचा आर्थिक वर्षाचा अहवाल राजकीय पक्षाच्या खजिनदाराने किंवा राजकीय पक्षाने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) च्या कलम १३९ अन्वये त्या आर्थिक वर्षातील त्याच्या उत्पन्नाचा परतावा सादर करण्याच्या देय दिनांकापूर्वी, नमूना २४ अ मध्ये, निवडणूक आयोगाला सादर केला पाहिजे.

८६. **निवडणूक खर्चाच्या हिशेबाचा तपशील :**—(१) कलम ७७ अन्वये उमेदवाराकडून अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून ठेवण्यात यावयाच्या निवडणूक विषयक खर्चाच्या हिशेबात, दिवसागणिक होणाऱ्या खर्चाच्या प्रत्येक बाबीसंबंधात पुढील तपशील अंतर्भूत असेल :—

(क) ज्या तारखेला खर्च करण्यात अथवा तो प्राधिकृत करण्यात आला ती तारीख ;

(ख) खर्चाचे स्वरूप (उदाहरणार्थ प्रवासखर्च, टपाल खर्च किंवा मुद्रण खर्च व तत्सम खर्च)

(ग) खर्चाची रक्कम–

(एक) प्रदाने केलेली रक्कम ;

(दोन) अदत्त रक्कम :

(घ) प्रदानाची तारीख :

(ङ) पैसे घेणाऱ्याचे नाव व पत्ता :

(च) रक्कम दिली असेल तर प्रमाणकांचा अनुक्रमांकः

(छ) कोणतीही रक्कम अदत्त असेल तर बिलांचे अनुक्रमांक :

(ज) अदत्त रक्कम जिला देय असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता :

(२) टपाल खर्च, रेल्वेचा प्रवास व तत्सम खर्च, ज्याचे प्रमाणक घेणे शक्य नाही या स्वरुपाच्या बाबींखेरीज, इतर बाबींच्या खर्चाचे प्रमाणक घेण्यात येईल.

(३) निवडणूक खर्चाच्या हिशेबासह सर्व प्रमाणके दाखल करण्यात येतील व ती प्रदानाच्या तारखेनुसार लावण्यात येतील व उमेदवार अथवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांच्याकडून त्यांवर अनुक्रमांक घालण्यात येईल आणि असे अनुक्रमांक पोट-नियम (१) च्या बाब (च) खाली हिशेबात नोंदविण्यात येतील.

(४) पोट-नियम (२) खाली ज्याकरिता प्रमाणके मिळविण्यात आली नसतील अशा पोट-नियम (१) च्या बाब (ड) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या खर्चाच्या बाबीसंबंधात त्यांचा तपशील देणे आवश्यक असणार नाही.

८७. **हिशेबाच्या निरीक्षणासाठी (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने) नोटीस देणे.—**(जिल्हा निवडणूक अधिकारी) कलम ७८ अन्वये उमेदवाराकडून निवडणुकविषयक खर्चाचा हिशेब सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन दिवसांत, त्याच्या सूचना फलकावर पुढील बाबी विनिर्दिष्ट करणारी नोटीस लावण्याची व्यवस्था करील :—

(क) ज्या तारखेला हिशेब सादर करण्यात आला ती तारीख :

(ख) उमेदवाराचे नाव; आणि

(ग) ज्या ठिकाणी अशा हिशेबाचे निरीक्षण करता येईल ते ठिकाण व वेळ.

८८. **हिशेबाचे निरीक्षण व त्यांच्या प्रती मिळविणे.—**कोणत्या व्यक्तीस एक रुपया फी दिल्यानंतर अशा कोणत्याही हिशेबाचे निरीक्षण करण्याचा अधिकार असेल आणि त्याबाबतीत निवडणूक आयोगाकडून निश्चित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर अशा हिशेबाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या अनुप्रमाणित प्रती मिळण्याचा तिला अधिकार असेल.

८९. **निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्यात आल्याबद्दलचे (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे) प्रतिवृत्त आणि त्यावरील निवडणूक आयोगाचा निर्णय –**

(१) कोणत्याही निवडणुकीत निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्यासाठी कलम ७८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या समाप्तीनंतर शक्य तितक्या लवकर (जिल्हा निवडणूक अधिकारी) निवडणूक आयोगाला पुढील गोष्टी कळवील-

   (क) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारचे नावः

   (ख) अशा उमेदवाराने आपल्या निवडणूक खर्चाचा हिशेब सादर केला आहे किंवा कसे व सादर केला असेल तर, ज्या तारखेला तो सादर करण्यात आला ती तारीख : आणि

   (ग) त्याच्या मते, अधिनियम व या नियमांनुसार आवश्यक असेल अशा मुदतीत व अशा रितीने असा हिशेब सादर करण्यात आला आहे किंवा कसे;

(२) कोणत्याही उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब, अधिनियम व ह्या नियमांनुसार आवश्यक त्या रितीने दाखल करण्यात आलेला नाही असे निवडणूक अधिकाऱ्याचे मत असल्यास, त्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब व त्यासोबत जोडलेली प्रमाणके यासह असे प्रत्येक प्रतिवृत्त तो निवडणूक आयोगाला कळवील.

(३) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले प्रतिवृत्त सादर करण्यात आल्यानंतर लगेच (जिल्हा निवडणूक अधिकारी) त्याची एक प्रत आपल्या सूचना फलकावर लावून ती प्रसिद्ध करील.

(४) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रतिवृत्ताची प्रत मिळाल्यांनतर शक्य तितक्या लवकर निवडणूक आयोग त्यावर विचार करील व निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवाराने अधिनियम वा नियमाअन्वये आवश्यक असेल अशा मुदतीत व अशा रीतीने, निवडणूक हिशेब दाखल करण्यास कसूर केली आहे किंवा कसे यासंबंधी निर्णय घेईल.

(५) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अधिनियम व ह्या नियमाअन्वये निवडणूक खर्चाचा हिशेब दाखल करण्यास कसूर केली आहे असा निवडणूक आयोगाने निर्णय दिल्यास, केलेल्या कसुरीबद्दल कलम १० क अन्वये त्याला अनर्ह का ठरविले जाऊ नये याबाबतचे कारण दाखविण्यासाठी उमेदवाराला नोटीशीद्वारे लेखी आदेश देण्यात येईल.

(६) पोट-नियम (५) अन्वये कारण दाखविण्याचे आदेश दिले आहेत असा निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार अशी नोटीस मिळाल्यापासून २० दिवसांच्या आत निवडणूक आयोगाला त्या प्रकरणाच्या बाबतीतील लेखी प्रतिरूपण सादर करेल व त्याचवेळी त्याने हिशेब यापूर्वी सादर केलेला त्याच्या निवडणूक खर्चाच्या संपूर्ण हिशेबासह त्याच्या प्रतिरूपणाची एक प्रत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठवील.

(७) जिल्हा निवडणूक अधिकारी तो मिळाल्यानंतर ५ दिवसांच्या आत, त्या प्रतिरूपणाची प्रत व (असल्यास) हिशेब व त्यावर त्याने दिलेला शेरा यासह निवडणूक आयोगाकडे पाठवून देईल.

(८) उमेदवाराकडून सादर करण्यात आलेल्या प्रतिरुपणाचा व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून दिलेल्या शेऱ्याचा विचार करून व योग्य ती चौकशी केल्यानंतर, जर त्याचा हिशेब सादर करण्यात आलेल्या कसुरीकरिता उमेदवाराकडे कोणतेही उचित किंवा समर्थनीय कारण नाही, अशी निवडणूक आयोगाची खात्री झाल्यास, कलम १० क अन्वये त्याला तीन वर्षांच्या कालावधीकरिता अनर्ह जाहीर करून **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करावयाचा आदेश काढण्याची व्यवस्था करील.

९०. **निवडणुकीचा कमाल खर्च.**—लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये ठेवण्यात आलेल्या व राज्य किंवा संघराज्य क्षेत्रामधील निवडणुकांच्या संबंधात केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या हिशेबाच्या खर्चाची बेरीज खालील तक्त्याच्या स्तंभ १ मध्ये नमूद केली आहे, ती :—

(क) राज्य किंवा संघराज्य क्षेत्रांच्या कोणत्याही एका संसदीय मतदारसंघातील सदर तक्त्यांच्या तद्नुरूप स्तंभ २ मधील विनिर्दिष्ट रकमेपेक्षा, आणि

(ख) राज्य किंवा संघराज्य क्षेत्रांच्या, असल्यास, कोणत्याही एका विधानसभा मतदारसंघातील सदर तक्त्यांच्या तद्नुरूप स्तंभ ३ मधील विनिर्दिष्ट रकमेपेक्षा-

अधिक असता कामा नये.

## तक्ता

| अ. क्र. | राज्याचे किंवा संघराज्य क्षेत्रांचे नाव | कोणत्याही निवडणुकीच्या खर्चाची कमाल मर्यादा (रुपयांमध्ये) | |
|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) |
| **एक. राज्य** | | | |
| १ | आंध्र प्रदेश | ९५,००,००० | ४०,००,००० |
| २ | अरुणाचल प्रदेश | ७५,००,००० | २८,००,००० |
| ३ | आसाम | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ४ | बिहार | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ५ | छत्तिसगड | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ६ | गोवा | ७५,००,००० | २८,००,००० |
| ७ | गुजरात | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ८ | हरयाणा | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ९ | हिमाचल प्रदेश | ९५,००,००० | ४०,००,००० |
| १० | झारखंड | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ११ | कर्नाटक | ९५,००,००० | ४०,००,००० |
| १२ | केरळ | ९५,००,००० | ४०,००,००० |
| १३ | मध्यप्रदेश | ९५,००,००० | ४०,००,००० |
| १४ | महाराष्ट्र | ९५,००,००० | ४०,००,००० |
| १५ | मणीपूर | ९५,००,००० | २८,००,००० |
| १६ | मेघालय | ९५,००,००० | २८,००,००० |
| १७ | मिझोरम | ९५,००,००० | २८,००,००० |
| १८ | नागालँड | ९५,००,००० | २८,००,००० |
| १९ | ओदीशा | ९५,००,००० | ४०,००,००० |
| २० | पंजाब | ९५,००,००० | ४०,००,००० |
| २१ | राजस्थान | ९५,००,००० | ४०,००,००० |
| २२ | सिक्कीम | ७५,००,००० | २८,००,००० |
| २३ | तामिळनाडू | ९५,००,००० | ४०,००,००० \ |
| २४ | तेलंगणा | ९५,००,००० | ४०,००,००० |
| २५ | त्रिपुरा | ९५,००,००० | २८,००,००० |
| २६ | उत्तर प्रदेश | ९५,००,००० | ४०,००,००० |

| अ. क्र. | राज्याचे किंवा संघराज्य क्षेत्रांचे नाव | कोणत्याही निवडणुकीच्या खर्चाची कमाल मर्यादा (रुपयांमध्ये) | |
|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) |
| २७ | उत्तराखंड | ९५,००,००० | ४०,००,००० |
| २८ | पश्चिम बंगाल | ९५,००,००० | ४०,००,००० |
| | **दोन. संघ राज्यक्षेत्रे** | | |
| १ | अंदमान व निकोबार बेटे | ७५,००,००० | ... |
| २ | चंदिगड | ७५,००,००० | ... |
| ३ | दादरा व नगर हवेली आणि दमण व दिव | ७५,००,००० | ... |
| ४ | दिल्ली | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ५ | लक्षद्वीप | ७५,००,००० | ... |
| ६ | पुदुचेरी | ७५,००,००० | २८,००,००० |
| ७ | जम्मू आणि काश्मीर | ९५,००,००० | ४०,००,००० |
| ८ | लद्दाख | ७५,००,००० | ... |

**(निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ याच्या नियम ९० मध्ये सुधारणा करणारी एम/ओ विधि व न्याय, विधिविधान विभागाची अधिसूचना क्रमांक एस. ओ. ७२ (ई) दिनांक ६ जानेवारी, २०२२)**

# ब

# निवडणूक खर्च संनियंत्रणाचे स्वरूप आणि त्यासंबंधात विविध गटांची कार्ये

## भाग 'क' अनुक्रमणिका



| अ. क्र. | अनुक्रमणिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | खर्च निरीक्षक | २३ |
| २ | सहायक खर्च निरीक्षक | २५ |
| ३ | व्हिडिओ संनिरीक्षण चमू | २७ |
| ४ | व्हिडीओ पाहणारा चमू | २७ |
| ५ | लेखांकन चमू | २८ |
| ६ | तक्रार संनियंत्रण कक्ष आणि संपर्क केंद्र (कॉल सेंटर) | २८ |
| ७ | माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समिती आणि प्रदत्त बातम्या | २९ |
| ८ | भरारी पथक आणि स्थिर संनियंत्रण चमू | ३० |
| ९ | खर्च संनियंत्रण चमू | ३० |
| १० | खर्चाच्या दृष्टीने संवेदनक्षम मतदारसंघ आणि खर्चाच्या दृष्टीने संवेदनक्षम भाग | ३१ |
| ११ | मुख्य निवडणूक कार्यालय, पोलीस, आयकर आणि राज्य उत्पादन शुल्क आणि खर्च संनियंत्रण कक्ष यामधील मध्यस्थ अधिकारी | ३१-३३ |

उमेदवाराने केलेल्या दैनंदिन निवडणूक खर्चाचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक मतदारसंघात निवडणूक खर्चाचे नियंत्रण करणारी यंत्रणा उभारण्यात येईल. उमेदवाराने निवडणूक खर्चाचे दैनंदिन लेखे ( हिशेब ठेवणे अनिवार्य आहे. जरी निवडणूक खर्चाचे लेखे (हिशेब) निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक असेल तरी, तो कोणत्याही वापरासाठी असो, प्रचाराच्या कालावधीमध्ये उमेदवारांनी आणि राजकीय पक्षांनी केलेल्या प्रत्येक निवडणूक खर्चाच्या हिशेबाचे रितसरपणे आणि अचुकपणे नियमितपणे संनियंत्रण करावयाचे आहे. प्रचार संपल्यानंतर, उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी आयोजित केलेल्या विविध मिरवणुका / प्रचारसभा यावर झालेल्या निवडणूक खर्चाशी संबंधित कोणताही पुरावा मिळणे कठीण आहे. कायद्यान्वये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने छाननी करणे व निवडणुकीनंतर आयोगाकडे अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने निवडणूक प्रचाराच्या कालावधीतील योग्य पुरावा गोळा करणे, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे प्राथमिक कर्तव्य असून त्या आधारे उमेदवारांनी सादर केलेल्या लेख्यांच्या विववरणपत्रांत कोणताही खर्च वगळण्यात आलेला आहे किंवा कसे हे ठरविता येईल. खर्चाचे संनियंत्रण करणाऱ्या यंत्रणेची रचना पुढीलप्रमाणे असेल :

१. **खर्च निरीक्षक (ईओ) :—**

उमेदवारांनी केलेल्या निवडणूक खर्चाचे निरीक्षण करण्यासाठी खर्च निरीक्षकांची आयोगाकडून विनिर्दिष्ट मतदारसंघाकरिता नेमणूक करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान एक खर्च निरीक्षक असेल. परंतु, सर्वसाधारणपणे प्रत्येक खर्च निरीक्षकाकडे त्याच्या निरीक्षणासाठी पाचपेक्षा अधिक विधानसभा मतदारसंघ असणार नाहीत, याची खातरजमा करण्यात येईल.

**खर्च निरीक्षकाद्वारे भेटी :**

खर्च निरीक्षक निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिवशी, ३ पूर्ण दिवसांच्या कालावधीसाठी मतदारसंघात पोहोचेल. या भेटीत तो निवडणूक खर्चाचे संनियंत्रण करण्याचे काम करणाऱ्या सर्व चमूंना भेटेल. जर खर्च निरीक्षकाचे सहायक खर्च निरीक्षकाच्या कार्यपालनाबाबत समाधान झाले नाही तर, तो त्यास बदलण्याबद्दल विचारणा करील आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, अतिरिक्त अधिकाऱ्यांची सूची देईल. सहायक खर्च निरीक्षकाच्या योग्यतेनुसार बदलील, तो सर्व कर्मचाऱ्यांना खर्च संनियंत्रण प्रक्रियेविषयी प्रशिक्षणदेखील देईल आणि सर्व चमू योग्यरीत्या सुसज्ज आहेत, याची खात्रीही करील. तो, जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक (एस.पी.) पोलीस खात्याच्या मध्यस्थ अधिकारी, आयकर व राज्य उत्पादनशुल्क व इतर अंमलबजावणी अभिकरणे यांच्याशी समन्वय साधील मतदानाच्या सज्जतेचा अहवाल सादर केल्यानंतरच तो मतदारसंघ सोडील.

तो, उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेनंतरच्या लगतच्या तारखेस तो पुन्हा दुसऱ्यांदा मतदारसंघास भेट देईल आणि संपूर्ण प्रचाराच्या कालावधीत मतदारसंघात राहील आणि मतदान पूर्ण झाल्यानंतरच मतदारसंघ सोडील. जर तो सर्वसाधारण निरीक्षकाचे कार्य पार पाडीत असेल तर, तो नमूना १७ - क ची छाननी झाल्यानंतर आणि मतदान केंद्राध्यक्षाची रोजनिशी परिपूर्ण आहे व सुरक्षित कक्ष मोहोरबंद आहे याची खात्री केल्यानंतरच मतदारसंघ सोडील. मतमोजणी पूर्ण होईपर्यंत थांबण्यासाठी देखील त्याला भाग पाडण्यात येऊ शकेल.

खर्च निरीक्षक निकाल जाहीर झाल्यापासून २५ दिवसांनंतर पुन्हा एकदा जिल्ह्यास भेट देईल आणि निकाल जाहीर झाल्यानंतर उमेदवारांनी तयार केलेल्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांच्या (हिशेबांच्या विवरणपत्रांची छाननी करण्यामध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास साहाय्य करील. पूर्ण ८ दिवस तो जिल्ह्यात राहिल तो, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने, निकाल जाहीर झाल्यानंतर २६ व्या दिवशी बोलावलेल्या हिशेबाचा पुनर्मेळ घालणाऱ्या बैठकीला उपस्थित राहिल. जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व उमेदवार प्रतिनिधी यांना निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत, लेखे दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करून देतील.

**खर्च निरीक्षकाची भूमिका**

खर्च निरीक्षक है, निवडणूक खर्चाचे संनियंत्रण करण्याच्या बाबतीत आयोगाचे डोळे व कान आहेत. खर्च निरीक्षक, मतदारसंघामधील संपूर्ण निवडणूक खर्चाचे संनियंत्रण करण्याच्या कामावर असलेल्या कर्मचारी वर्गावर देखरेख ठेवील व त्यांना मार्गदर्शन करील. तो संपूर्ण निवडणूक खर्चाचे संनियंत्रण करणाऱ्या सर्व कर्मचारी वर्गाला अंतिम प्रशिक्षण देण्यात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला मार्गदर्शन करील.

तो सहायक खर्च निरीक्षकांच्या कामाचे पर्यवेक्षण करील, तो, सहायक खर्च निरीक्षकांना अंतिम प्रशिक्षण देईल आणि या भूमिकेमध्ये नेमणूक करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिले आहे. याची खात्री करील. आवश्यकतेनुसार एका मतदारसंघासाठी एकापेक्षा अधिक सहायक खर्च निरीक्षक असू शकतील. तो, ठराविक कालावधीच्या अंतराने निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणाचे काम करणाऱ्या सर्व चमूंच्या कामाची तपासणी करील आणि जेव्हा केव्हा कोणत्याही चमूच्या कामामध्ये हलगर्जीपणा किंवा अनियमितता असेल तेव्हा, तो, ही बाब जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल, जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च निरीक्षकांच्या शिफारशीवरून तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करील.

तो, प्रचाराच्या कालावधीत किमान तीन वेळा, प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करील आणि त्यातील उणिवांबाबत त्याचा अभिप्राय देईल तपासणीसाठीच्या तारखा अशाप्रकारे निश्चित केल्या पाहिजेत की, दोन तपासण्यांच्यामध्ये ३ दिवसांपेक्षा कमी अंतर नसावे आणि शेवटची तपासणी, मतदानाच्या दिवसापासून ३ दिवस अगोदर निश्चित करण्यात येऊ नये. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रचाराच्या खर्चाच्या तपासणीत समावेश होईल. उमेदवाराच्या नोंदवहीमध्ये कोणताही खर्च कमी दाखवला असेल तर, खर्च निरीक्षक, तपासणी दरम्यान उमेदवाराच्या नोंदवहीमध्ये त्याचे शेरे लिहिल आणि तेथे सही करील. तेच अभिरूप निरीक्षण नोंदवहीमध्ये नमूद करण्यात येईल आणि त्यावर उमेदवार निवडणूक प्रतिनिधीची सही घेण्यात येईल. अशी विसंगती, त्याच दिवशी जो आयोगाच्या दिनांक २९ मे, २०१५ रोजीच्या आदेशानुसार (**जोडपत्र – क – १०**) त्याच दिवशी उमेदवाराला नोटीस काढील अशा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठविल. कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, खर्च निरीक्षक, आयोगाला माहिती पाठवील आणि त्यांचे मार्गदर्शन मागविल.

तो, निवडणूक अधिकारी, आयकर विभागाचे अन्वेषण संचालनालय, पोलीस विभागाचा मध्यस्थ अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचा मध्यस्थ अधिकारी यांच्याशी समन्वय साधील आणि सर्व अभिकरणांमध्ये माहितीचा मुक्त ओघ व माहितीची देवाणघेवाण होत असल्याची खात्री करील. कोणत्याही अभिकरणाकडून माहिती मिळाल्यावर संबंधित कायदा अंमलबजावणी एजन्सीने तत्परतेने कारवाई करावयाची आहे. जर कोणत्याही अभिकरणाने वेळीच कारवाई केली नाही तर तो, ही बाब मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास प्रत देऊन, तात्काळ आयोगाच्या निदर्शनास आणून देईल.

यापूर्वी काही घटना आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत ज्यात खर्च निरीक्षकाच्या कार्यवाहीने ठसा उमटविला आहे की, त्याने अंमलबजावणीच्या कार्यवाहीमध्ये सक्रियपणे भाग घेऊन आपल्या संक्षिप्त टिप्पणीमध्ये वाढ केली होती. म्हणून, आयोग पुनरुच्चार करीत आहे की, सारसंग्रहाच्या उपरोक्त परिच्छेदामध्ये अंतर्भूत असलेली मार्गदर्शक तत्त्वांना सर्व खर्च निरीक्षकांनी काटेकोरपणे चिकटून राहायला हवे आणि अंमलबजावणी अभिकरणांद्वारे त्यांच्या कायद्यानुसार केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये गुंतून जाऊ नये. **(जोडपत्र – बी – १९)**

जर संनिरीक्षण चमूंनी, भरारी पथकांनी आयकर विभागाच्या अन्वेषण संचालनालयाने किंवा पोलिसांनी किंवा राज्य उत्पादन शुल्क विभागाने कोणतीही जप्ती केली असेल तर, तो मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास प्रत देऊन त्याच दिवशी आयोगास त्याबाबतचा अहवाल कळविल.

तो, अभिरूप निरीक्षण नोंदवही जर कोणतीही असल्यास, जनतेसमोर ठेवून, उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाच्या निरीक्षणादरम्यान निदर्शनास आलेला निवडणूक प्रचार खर्च दाबून टाकल्याची बाब नमूद करील. यासंदर्भात, खर्चाचे संनियंत्रण करणाऱ्या जिल्हा खर्च संनियंत्रण समितीची स्थापना करण्यासाठी आणि उमेदवारांच्या उत्तरावरील निर्णयासाठी दिनांक २९ मे २०१५ रोजी **(जोडपत्र – सी – १०)** अन्वये जारी केलेल्या आयोगाच्या आदेशांचे अनुपालन करण्यात येईल. त्याच्या अंतिम भेटीच्यावेळी तो सर्व उमेदवारांना या आदेशाची प्रत मिळाली आहे, याबद्दल खात्री करील. छाननी अहवाल अचूकपणे सादर करण्यामध्ये तो जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास साहाय्य करील, जर तो, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याशी सहमत नसेल तर तो, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालावर त्याच्या अभिप्रायासाठी राखून ठेवलेल्या जागेमध्ये पुराव्यांचा उल्लेख करून सर्व कारणे नमूद करील.

**खर्च निरीक्षकांचे अहवाल :-**

खर्च निरीक्षकाने पुढीलप्रमाणे अहवाल सादर करणे :

**(एक)** आगमन व निर्गमन अहवाल २४ तासांच्या आत **(जोडपत्र-बी-१)**

**(दोन)** त्याच्या पहिल्या भेटीच्या म्हणजे अधिसूचनेच्या तारखेनंतरच्या तिसऱ्या दिवसाचा पहिला अहवाल **(जोडपत्र-बी-२)**

**(तीन)** उमेदवारी मागे घेतल्यानंतर दुसऱ्या भेटीच्या कालावधीत २४ तासांच्या आत, दुसरा अहवाल **(जोडपत्र-बी-३)**

**(चार)** मतदानानंतर तिसरा अहवाल **(जोडपत्र-बी-४)** आणि

**(पाच)** त्याच्या तिसऱ्या भेटीनंतरचा चौथा व अंतिम अहवाल **(जोडपत्र- बी -५)**

खर्च निरीक्षकाने, आयोगासोबतच्या व्हिडिओ परिषदेसाठी, त्याच्या / तिच्या मतदारसंघातील विविध निवडणूक खर्च संनियंत्रण चमू, जप्त केलेल्या बाबी, लढणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांचे निरीक्षण, मतदानापुर्वीच्या ७२ तासांची व्यूहरचना, इत्यादींबाबतचा प्रतिभरण / स्थितीदर्शक अहवाल, विहित नमुन्यामध्ये **(जोडपत्र – बी ६)** सादर करणे आवश्यक आहे. व्हिडिओ परिषदेचे वेळापत्रक खर्च निरीक्षकांना निवडणूक कालावधी दरम्यान कळवण्यात येईल. तो कोणत्याही साधनाद्वारे स्वतंत्रपणे त्याच्या निदर्शनास आणून दिलेल्या संशयित प्रदत्त बातम्यांच्या सर्व घटना त्याच दिवशी आवश्यक अशा कारवाईसाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीस देखील कळवील. याशिवाय तो, त्याचा खर्च तिसऱ्या अहवालामध्ये माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीने निश्चित केल्याप्रमाणे प्रदत्त बातम्यांच्या सर्व घटना आयोगास कळवील. आणि जाहिरात ( प्रदत्त बातमीची ) छायाचित्रांकित प्रत किंवा सी.डी./ डी. व्ही. डी. याची एक प्रत आयोगास पाठविल तसेच त्यांची प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडेही पाठविल.

२. **सहायक खर्च निरीक्षक (ए.ई.ओ.) :**

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे निवडणुकांची अधिसूचना काढल्याच्या दिनांकास, प्रत्येक मतदारसंघासाठी सहायक खर्च निरीक्षकाची नेमणूक करण्यात येईल आणि खर्च निरीक्षकाने कोणताही बदल सुचविला तर, तो करण्यात येईल. सहायक खर्च निरीक्षक हा अन्य केंद्र सरकारच्या सेवेतील गट-ब अधिकाऱ्याच्या दर्जाचा किंवा समकक्ष दर्जाचा असेल. आयकर विभागातील अधिकारी अन्वेषण संचालनालयाद्वारे केलेल्या रोख व वस्तुंच्या जप्तीमध्ये गुंतले असतील तर, त्यांच्या नावांची सहायक खर्च निरीक्षकाच्या कामासाठी मागणी करण्यात येऊ नये. जिल्ह्यामध्ये अशा अधिकाऱ्यांचा अभाव असेल तर, राज्य कोषागार किंवा वित्त विभाग यांच्या अधिकाऱ्यांना नामनिर्देशित करता येईल. तो प्राधान्याने स्थानिक अधिकारी असावा, त्याची त्याच जिल्ह्यामध्ये किंवा जवळच्या जिल्ह्यामध्ये नियुक्ती करावी. मात्र त्याचे कामाचे ठिकाण आणि घर हे त्याच्या मतदारसंघात असता कामा नये. सहायक खर्च निरोक्षकाला, एक वाहन, एक वैयक्तिक सुरक्षा अधिकारी आणि स्थानिक सीमकार्ड तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयीन जागेत कार्यालयासाठी जागा पुरविण्यात यावी. जेणेकरून, तो सर्व चमूंशी, मध्यस्थ अधिकाऱ्याशी आणि खर्च निरीक्षकाशी समन्वय साधील. जर सहायक खर्च निरीक्षकाचे मुख्यालय मतदारसंघापासून वेगळे असेल तर, मतदारसंघामध्ये त्यास भोजन व निवासाची व्यवस्था पुरविण्यात यावी.

अधिसूचनेच्या दिनांकापासून मतदानाच्या/ पुनर्मतदानाच्या, जर असल्यास, दिनांकापर्यंत मतदारसंघामध्ये सहायक खर्च निरीक्षकास तैनात केले पाहिजे आणि त्याने खर्च निरीक्षकाच्या परवानगीशिवाय मतदारसंघ सोडून जाता कामा नये. तथापि, सहायक निरीक्षकाने मतमोजणीच्या दिवसाच्या एक दिवस अगोदर आणि निवडणुकीचा निकाल घोषित झाल्यानंतरच्या २५ व्या आणि ३७ व्या दिवशी पुन्हा उमेदवारांना प्रशिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ किंवा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना छाननी अहवाल आणि खर्च निरीक्षकांचा अहवाल तयार करण्यामध्ये सहाय्य करण्यासाठी पुन्हा कर्तव्यावर हजर व्हावे. निकाल घोषित झाल्यानंतरच्या ३७ व्या दिवशी त्याला अंतिमतः कार्यमुक्त करण्यात येईल. **(जोडपत्र- बी १८)**

प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी/ खंडासाठी किमान एक सहायक खर्च निरीक्षक असला पाहिजे. परंतु, खर्चाच्या दृष्टीने संवेदनक्षम मतदारसंघामध्ये दोन किंवा अधिक सहायक खर्च निरीक्षक असू शकतात. त्यापैकी एक घटनांच्या बाह्य चित्रिकरणासाठी व दुसरा चमूंशी समन्वय साधण्यासाठी असेल.

सहायक खर्च निरीक्षक, व्हिडीओ सी.डी. चे अहवाल पाहील. प्रत्येक उमेदवारांसंबंधी असलेल्या सर्व तक्रारींचे व अहवालांचे वाचन करील आणि संनिरीक्षण नोंदवहीचा आणि उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीचा अभ्यास करील. तो, अभिरूप निरीक्षण

नोंदवही व पुराव्याची संचिका खर्च निरीक्षक पोहोचण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे ठेवण्यात येत असल्याचे पर्यवेक्षण करील. सहायक खर्च निरीक्षकांना प्रशिक्षण देण्यात येईल आणि तो खर्च निरीक्षकाच्या पर्यवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली काम करील. प्रत्येक उमेदवाराच्या बाबतीतील अहवालांशी आदेशांशी संबंधित असलेले सर्व खर्च, खर्चाचे सनियंत्रण करण्याचे काम करण्यासाठी नेमलेल्या सर्व चमूंकडून प्राप्त झालेले आहेत आणि उमेदवाराच्या दैनंदिन निवडणूक खर्चाच्या नोंदवहीत तो योग्य प्रकारे दाखवण्यात आलेला आहे याची तो खात्री करील, भ्रष्ट प्रथांच्या तक्रारीच्या बाबतीत तो तात्काळ कारवाई करण्यासाठी ती भरारी पथकाकडे पाठवील आणि तात्काळ खर्च निरीक्षकास कळवील. प्रत्येक तक्रारीवर करण्यात आलेल्या कारवाई विषयी भरारी पथके त्यास माहिती देतील. जर भरारी पथकाने कारवाई केलेली नसेल किंवा कारवाई करण्यात विलंब झालेला असेल, तर त्याने ही बाब खर्च निरीक्षकाच्या निदर्शनास आणली पाहिजे. त्यानंतर तो ( खर्च निरीक्षक), जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास प्रत देऊन आयोगास कळवील. जर त्याला असे वाटले की, स्थिर सनियंत्रण चमू योग्य त्या मार्गाने काम करीत नाहीत किंवा योग्य प्रकारे नेमणूक केली गेली नाही तर तो स्थिर संनियंत्रण चमूंद्वारे मुख्य मार्गाचा समावेश करण्याची खात्री करण्यासाठी बदलण्याबावत सूचवू शकतो.

तो, **जोडपत्र- बी-१४** प्रमाणे, त्याच्या सर्व कामकाजाबाबत खर्च निरीक्षकास दैनंदिन अहवाल सादर करील. खर्च निरीक्षक मतदार संघात पोहचेपर्यंत सहायक खर्च निरीक्षक त्याचा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करील. तो अहवाल त्यानंतर खर्च निरीक्षकाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. पुराव्याच्या संचिकेत प्रचारादरम्यान गोळा केलेल्या पुराव्यांचे सर्व अभिलेख असतील. निवडणूक खर्चाच्या संबंधी उमेदवाराच्या नोंदवहीची तपासणी करण्याच्या वेळी तो ते अभिलेख खर्च निरीक्षकास उपलब्ध करून देईल. खर्च दडवून ठेवल्याच्या किंवा उमेदवाराच्या नोंदवहीत कमी खर्च सांगितल्याच्या उमेदवाराच्या नोंदवहीत आढळलेल्या कोणत्याही पुराव्याच्या बाबतीत, सहायक खर्च निरीक्षक ती बाब खर्च निरीक्षकाच्या आणि तपासणीच्यावेळी रितसरपणे उमेदवाराच्या निदर्शनास आणून देईल.

उमेदवाराच्या नोंदवहीच्या तपासणीकरिता निश्चित केलेल्या दिवशी त्या मतदारसंघातील खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी नेमून दिलेल्या सहायक खर्च निरीक्षकाने, अभिरूप निरीक्षण नोंदवही आणि पुराव्याच्या संचिकेसह उपस्थित राहीले पाहिजे.

सहायक खर्च निरीक्षक, निवडणूक अधिकाऱ्यास तसेच जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास त्याचा छाननी अहवाल आयोगाकडे सादर करण्यामध्ये सहाय्य करील. खर्च निरीक्षकाच्या जिल्ह्याच्या तिसऱ्या भेटीच्या वेळी, तो हजर राहील व त्याच्या कामात त्यास मदत करील.

सहायक खर्च निरीक्षक, जिल्हा पातळीवर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या (एम.सी.एम.सी.) कामाचे पर्यवेक्षण करील आणि तिच्या परिणामकारक कामाविषयी खर्च निरीक्षकास कळवील. जर सर्व केबल्स / वाहिन्या / वर्तमानपत्रे यांच्यावर या समितीस लक्ष देता येत नसेल तर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास प्रत देऊन ही बाब तात्काळ खर्च निरीक्षकाच्या/आयोगाच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

जर व्हिडीओग्राफर उपलब्ध न झाल्यामुळे कोणत्याही जाहीर मेळाव्याच्या/ मिरवणुकीचे / प्रसंगाचे व्हिडीओचित्रण करणे शक्य न झाल्यास, सहायक खर्च निरीक्षक, ही घटना छायांकित निरीक्षण नोंदवहीत नमूद करील, जर मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातील कोणतीही जाहिरात, माध्यम समितीने कळविलेली नसेल. तर, सहायक खर्च निरीक्षक, प्रत मिळविल व ती अभिरूप निरीक्षण नोंदवहीत नमूद करील.

विधानसभा निवडणुकांच्या प्रकरणी प्रत्येक मतदारसंघात एक लेखांकन चमू कार्यरत असेल आणि तो प्रत्येक उमेदवाराची अभिरूप निरीक्षण नोंदवही व पुराव्यांची संचिका ठेवील. लोकसभा निवडणुकीच्या प्रकरणी, प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी सहायक खर्च निरीक्षक व चमू प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र अभिरूप निरीक्षण नोंदवही व पुराव्यांची संचिका ठेवील आणि आपला अहवाल जेथे निवडणूक निर्णय अधिकारी स्थित आहेत अशा विधानसभा क्षेत्राच्या सहायक खर्च निरीक्षकास (मुख्यालय स्थित सहायक खर्च निरीक्षक) सादर करील. मुख्यालय स्थित सहायक खर्च निरीक्षक व त्याचा चमू इतर विधानसभा क्षेत्रांतील सर्व अन्य सहायक खर्च निरीक्षकांशी समन्वय साधील आणि हे लेखे निरीक्षणाच्या वेळी संकलित केले जातील याची सुनिश्चिती करील. सहायक खर्च निरीक्षक अधिसूचनेच्या दिनांकापासून कार्यरत होतील. **(जोडपत्र- बी २०)**

### ३. व्हिडीओ संनिरीक्षण चमू :

किमान एक पदाधिकारी आणि एक व्हिडीओग्राफर यांचा समावेश असलेली एक किंवा अधिक व्हिडीओ संनिरीक्षण चमूंची प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी/क्षेत्रासाठी नेमणूक करण्यात येईल. खर्च निरीक्षकाच्या शिफारशीवर अधिक चमूंची नेमणूक करता येईल. सहायक खर्च निरीक्षक, मतदारसंघातील संवेदनक्षम प्रसंगांच्या आणि मोठ्या सार्वजनिक मेळाव्यांच्या चित्रिकरणाचे व्यक्तिशः पर्यवेक्षण करील. एका दिवशी एकापेक्षा अधिक सार्वजनिक मेळावे आयोजित केले असतील तर, एकापेक्षा अधिक व्हिडीओ चमूंची जाहीर सभा आणि सार्वजनिक मेळाव्यांचे चित्रिकरण करण्यासाठी नेमणूक करण्यात येईल.

व्हिडीओ संनिरीक्षण चमू योग्यरीत्या प्रशिक्षित करण्यात येईल. खर्चाशी संबंधीत असलेल्या सर्व घटना व पुरावे हस्तगत करण्यासाठी तरबेज असेल. व्हिडीओ संनिरीक्षण चमू, चित्रिकरणाच्या सुरुवातील कार्यक्रमाचे शीर्षक व प्रकार, तारीख, स्थळ व कार्यक्रम आयोजित करणाऱ्या पक्षाचे व उमेदवाराचे नाव यांचे ध्वनीमुद्रीत प्रकारात चित्रिकरण करील. तो (चमू), वाहने / कार्यक्रम / भित्तिचित्रे/ कटआऊट इत्यादींचे अशाप्रकारे चित्रिकरण करील की, प्रत्येक वाहनाचा पुरावा, त्याची बनावट व नोंदणी क्रमांक, फर्निचरची संख्या, व्यासपीठ, बॅनर्स व कट-आऊट इत्यादींचा आकार स्पष्टपणे दिसू शकेल व त्यावरील खर्चाचा हिशेब करता येऊ शकेल. जर अशी वाहने मेळाव्याच्या जागेच्या बाहेरील जागेवर लावण्यात आलेली असतील तर, वाहन निवडणुकीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आले होते हे सिद्ध करण्यासाठी, जेथे शक्य असेल तेथे वाहन चालक व प्रवासी यांचे निवेदन देखील नोंदविले पाहिजे.

कार्यक्रमाचे चित्रिकरण करताना, व्हिडिओ चमू, कार्यक्रमात वापरलेली वाहने/फर्निचर / दिवे/ध्वनिक्षेपके, इत्यादींची अंदाजित संख्या व प्रकार व्यासपीठ / बॅनर / भित्तिचित्रे / कट-आऊट इत्यादीचा अंदाजे आकार यांचे वर्णन करून त्यांची देखील ध्वनिमुद्रित नोंद करील. यामुळे व्हिडिओ पाहणाऱ्या चमूस दृश्य व कार्यक्रमाच्या खर्चाचा अंदाज या संदर्भात, उलट तपासणी करणे सोपे होईल. आदर्श आचार संहितेचे, कोणतेही उल्लंघन झाले किंवा कसे यांचे संनियंत्रण करण्यासाठी ते (चमू), भाषण व इतर प्रसंगाचे देखील चित्रिकरण करतील.

व्हिडीओ संनियंत्रण चमू, ध्वनिमुद्रणाच्यावेळी **जोडपत्र-बी-१५** मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये निर्धारक प्रपत्र (क्यू शीट) तयार करील. हे निर्धारक प्रपत्र (क्यू शीट) ध्वनीमुद्रित सी. डी. सह पहाणी करणाऱ्या चमूला देण्यात यावी. व्हिडीओ सी. डी. वर युनिक ओळख क्रमांक, तारीख व कर्मचाऱ्याचे / अधिकाऱ्याचे नाव असले पाहिजे. आणि तो नेहमी निर्धारक पत्रक (क्यू शीट) सह ठेवली पाहिजे. निर्धारक पत्रक (क्यू शीट) ठेवण्याचे प्रयोजन म्हणजे - सी. डी. मध्ये उपलब्ध असलेला पुरावा एका दृष्टीक्षेपात पाहणे आणि अल्पकालावधीत पुराव्याचा संबंधित भाग पाहणे हे देखील आहे. एकाच दिवशी एकपेक्षा अधिक कार्यक्रम किंवा जाहीर मेळावा किंवा मिरवणूक असल्यास योग्य त्या संख्येने व्हिडीओ चमू तैनात केले पाहिजे आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, सहायक खर्च निरीक्षकास आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा पुरवठा करील.

व्हिडीओ संनिरीक्षण चमू निवडणुकीची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून कार्यरत होतील आणि मतदानाच्या / पुनर्मतदानाच्या, जर असल्यास, दिनांकापर्यंत त्यांचे कर्तव्य बजावणे सुरू ठेवतील. **(जोडपत्र- बी १८ आणि बी २०)**

### ४. व्हिडीओ पाहणारा चमू :

एक अधिकारी आणि दोन लिपीक यांसह, प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी/ क्षेत्रासाठी एक व्हिडीओ पाहणारा चमू असेल. व्हिडीओ पाहणारा चमु, व्हिडीओ संनिरीक्षण चमूने मिळवलेल्या व्हिडीओ चित्रीकरणामधून संकलन करण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी बाहेरील कोणत्याही एजन्सीला देण्यात येऊ नये. व्हिडीओ संनिरीक्षण चमूने मिळविलेल्या व्हिडीओ सीडी, खर्चाशी संबंधीत मुद्दे व आदर्श आचार संहितेशी संबंधित मुद्दे निश्चित करण्यासाठी व्हिडीओ पाहणाऱ्या चमूकडून दररोज पाहण्यात येतील. खर्चाशी संबंधित असलेले त्यांचे अहवाल लेखांकन चमूना / सहायक खर्च निरीक्षकाला ते त्याच दिवशी व कोणत्याही स्थितीत, पुढील दिवसाच्या अगोदर सादर करतील. खर्चाशी संबंधित अहवालांमध्ये, चमू सर्व वाहनांचे नोंदणी क्रमांक व त्याची निर्मिती, व्यासपीठाचा आकार, खुर्च्यांची संख्या बॅनर / भित्तिपत्राकामधील मजकुराचा आकार, कट आऊट्सचा आकार व संख्या व व्हिडीओमध्ये चित्रीत केलेल्या खर्चाच्या अन्य सर्व बाबी, अहवालामध्ये मांडील. आदर्श आचारसंहितेशी संबंधित असलेले अहवाल / निरीक्षणे या चमूकडून सर्वसाधारण निरीक्षकास / निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करण्यात येईल.

लेखांकन चमू व सहायक खर्च निरीक्षक, वापरण्यात आलेला वस्तूंच्या अधिसूचित दरांनुसार एकूण खर्चाची गणना करील. व्हिडीओच्या पुराव्याच्या आधारे एकूण खर्चाचा हिशेब करील व संबंधित उमेदवाराच्या अभिरूप निरीक्षण नोंदवहीत नोंद करील, जेव्हा ते पडताळणीसाठी खर्च निरीक्षकासमोर दाखल करण्यात येईल. तेव्हा ते उमेदवाराच्या नोंदवहीत ताडून पाहण्यात येईल. या आधी स्पष्ट केल्याप्रमाणे कोणतीही दडवणूक किंवा वगळणूक सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून तात्काळ २४ तासांच्या आत, लेखी स्वरूपात निदर्शनास आणण्यात येईल.

व्हिडीओ पाहणारा चमू निवडणुकीची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून कार्यरत होईल आणि मतदानाच्या / पुनर्मतदानाच्या, जर असल्यास, दिनांकापर्यंत त्यांचे कर्तव्य बजावणे सुरू ठेवतील. **(जोडपत्र- बी १८ आणि बी २०)**

## ५. लेखांकन चमू :

एक पदाधिकारी आणि एक सहायक / लिपीक यांचा समावेश असलेला प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी / क्षेत्रासाठी किमान एक लेखांकन चमू असेल. लेखांकन चमूचा कर्मचारीवर्ग विविध शासकीय विभागांच्या किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांच्या लेखा विभागांमधून घेण्यात येईल.

लेखांकन चमू, विधानसभा मतदार संघाच्या / खंडाच्या प्रत्येक उमेदवारासाठी “अभिरूप निरीक्षण नोंदवही व “पुराव्याची संचिका” ठेवताना सहायक खर्च निरीक्षकाच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. ते, त्यांना कळविल्याप्रमाणे खर्चाच्या प्रत्येक बाबीची नोंद करतील आणि प्रत्येक बाबीसमोर अधिसूचित दर नमूद करतील व प्रत्येक उमेदवारांसाठी बाबींवर झालेल्या एकूण खर्चाचा हिशेब करतील. “अभिरूप निरीक्षण नोंदवही ” चा **नमुना जोडपत्र - बी - १३** मध्ये दिलेला आहे.

नामनिर्देशन दाखल केल्यानंतर, निवडणूक प्रचार साहित्याचा वापर करण्यात येत असला तरी नामनिर्देशन दाखल करण्यापूर्वीच त्याची रक्कम दान करण्यात आलेली असू शकते, अशीही प्रकरणे असतात, चमूने अशी खात्री केली पाहिजे, की नामनिर्देशन दाखल केल्यानंतर वापरण्यात आलेल्या सर्व निवडणूक प्रचार साहित्यावरील खर्चाचा जरी, त्या संबंधीचे प्रदान, नामनिर्देशन दाखल करण्यापूर्वी करण्यात आलेले असले तरी, समावेश केला आहे, त्याचप्रमाणे नामनिर्देशन दाखल करताना घेतलेल्या मेळाव्यावरील किंवा मिरवणुकीवरील खर्च देखील निवडणूक खर्चाचा भाग म्हणून दर्शविला पाहिजे.

लेखांकन चमू घोषणा झाल्याच्या दिनांकापासून ते मतदानाच्या / पुनर्मतदानाच्या, जर असल्यास, दिनांकापर्यंत राजकीय पक्षांच्या खर्चाचे लेखांकन करण्याच्या प्रयोजनार्थ कार्यरत असतील आणि नामांकने दाखल झाल्यानंतर, या चमूंकडून सूचनांप्रमाणे उमेदवारांचे लेखे ठेवण्यात येतील. तथापि, लेखांकन चमूने मतमोजणीच्या दिवसाच्या एक दिवस अगोदर आणि निवडणुकीचा निकाल घोषित झाल्यानंतरच्या २५ व्या आणि ३७ व्या दिवशी पुन्हा उमेदवारांना किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना निवडणूक खर्चाचा लेखा सादर करण्याबाबत प्रशिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना छाननी अहवाल आणि खर्च निरीक्षकांचा अहवाल तयार करण्यामध्ये सहाय्य करण्यासाठी पुन्हा कर्तव्यावर हजर व्हावे. लेखांकन चमूला निकाल घोषित झाल्यानंतरच्या ३७ व्या दिवशी अंतिमतः कार्यमुक्त करण्यात येईल. **(जोडपत्र - बी १८ आणि बी २०)**

विधानसभा निवडणुकांच्या प्रकरणी प्रत्येक मतदारसंघात एक लेखांकन चमू कार्यरत असेल आणि तो प्रत्येक उमेदवाराची अभिरूप निरीक्षण नोंदवही व पुराव्यांची संचिका ठेवील. लोकसभा निवडणुकीच्या प्रकरणी, प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी सहायक खर्च निरीक्षक व चमू प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र अभिरूप निरीक्षण नोंदवही व पुराव्यांची संचिका ठेवील आणि आपला अहवाल जेथे निवडणूक निर्णय अधिकारी स्थित आहेत अशा विधानसभा क्षेत्राच्या सहायक खर्च निरीक्षकास (मुख्यालय स्थित सहायक खर्च निरीक्षक) सादर करील. मुख्यालय स्थित सहायक खर्च निरीक्षक व त्याचा चमू इतर विधानसभा क्षेत्रांतील सर्व अन्य सहायक खर्च निरीक्षकांशी समन्वय साधील आणि हे लेखे निरीक्षणाच्या वेळी संकलित केले जातील याची सुनिश्चिती करील. सहायक खर्च निरीक्षक अधिसूचनेच्या दिनांकापासून कार्यरत होतील. **(जोडपत्र- बी २० )**

## ६. तक्रार संनियंत्रण कक्ष व संपर्क केंद्र :

निवडणूक जाहीर झाल्याच्या दिनांकापासून जिल्हा स्तरावरील नियंत्रण कक्षामध्ये संपूर्ण आठवडा चोवीस तास सुरू असणारे (२४ X ७ ) संपर्क केंद्र स्थापन करण्यात येईल. संपर्क केंद्राला ३ किंवा ४ शोध लाईन्ससह टोल फ्री दूरध्वनी क्रमांक देण्यात येतील. ज्याला निवडणुकीशी संबंधित भ्रष्टाचार प्रथांसंबंधीच्या निवडणूक संनियंत्रण यंत्रणेची माहिती जनतेला होण्यासाठी विस्तृतपणे प्रसिद्धी देण्यात येईल. वरिष्ठ अधिकाऱ्याकडे नियंत्रण कक्ष आणि संपर्क केंद्र याचा प्रभार असेल जी, तक्रारी प्राप्त

करण्यास आणि त्यांची नोंद घेण्यास व संबंधित अधिकाऱ्याकडे, कोणत्याही विलंबाशिवाय, कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्याकडे किंवा भरारी पथकाकडे पाठवील. संपर्क केंद्राला अखंडपणे दूरध्वनी सेवा चालविण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग पुरविण्यात येईल.

जनतेतील कोणत्याही सदस्याने / जागल्याने (जागरूक व्यक्तीने) केलेल्या सर्व तोंडी तक्रारींची प्रत्येक तक्रारीसमोर त्याच्या वेळेसह, तक्रार नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात येईल आणि ती **जोडपत्र – बी–१७** मध्ये दिलेल्या नमुन्यात ठेवण्यात आलेला नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात यावी. खर्चाच्या संबंधित तक्रारी निवडणूक अधिकाऱ्याच्या प्रतिसह तात्काळ खर्च निरीक्षकास सूचना देऊन, भरारी पथकाच्या संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवावयाच्या आहेत आणि आणि आदर्श आचार संहितेशी संबंधित तक्रारीच्या बाबतीत एक प्रत, महानिरीक्षकाकडे पाठवावयाची आहे. नियंत्रण कक्ष सुरळीतपणे कार्यरत आहे व तक्रारी पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ पाठविण्यात आलेल्या आहेत याची खात्री करण्यासाठी सर्व निरीक्षक व महानिरीक्षक वेळोवेळी या नोंदवहीची तपासणी करतील.

**७. माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समिती (एमसीएसी) व प्रदत्त बातम्या :**

प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती असेल. तपशीलवार अनुदेश आणि मार्गदर्शक तत्वांकरिता अद्ययावत **“माध्यम संबंधी बाबींवरील अनुदेशाचा सारसंग्रह”** याचा संदर्भ पाहता येईल. मुद्रण माध्यमामध्ये कोणतीही जाहीरात किंवा जाहिरात करणारा लेख (ॲडव्हरटोरियल) प्रसिद्ध झालेला आहे असे माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीस आढळून आले असेल तर, ती बाब खर्च निरीक्षकाच्या निदर्शनास आणून देईल. आणि त्याची एक प्रत पुराव्याच्या संचिकेत ठेवण्यात येईल. या जाहिरातीवरील खर्च, अभिरूप नोंदवहीत नमूद करण्यात येईल, आणि त्याच्या नोंदवहीची तपासणी करताना उमेदवारास कळविण्यात येईल. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ क नुसार कोणतीही व्यक्ती मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता नमूद केल्याशिवाय आणि दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेल्या प्रकाशकाकडून प्रतिज्ञापत्र घेतल्याशिवाय कोणतेही निवडणूक पत्रक किंवा भितीपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य कागदपत्रांचे मुद्रण करणार नाही किंवा प्रकाशित करणार नाही किंवा मुद्रित करण्याची किंवा प्रकाशित करण्याची व्यवस्था करणार नाही. कागदपत्राच्या मुद्रणानंतर वाजवी वेळेत, कागदपत्रांच्या प्रतीसह प्रतिज्ञापत्राची प्रत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास / मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास देण्याची जबाबदारी अशा मुद्रणालयाची आहे.

**प्रदत्त बातम्या**

प्रेस कॉन्सिल ऑफ इंडियाने, मोबदला म्हणून रोख स्वरूपात किंवा वस्तूरूपात किंमत देऊन कोणत्याही माध्यमामध्ये (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक) प्रसिद्ध होणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण अशी “प्रदत्त बातमी” ची व्याख्या केली आहे. आयोगाने ही व्याख्या विचारात घेण्याचे ठरविले आहे. माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, सर्व वर्तमानपत्र, मुद्रण माध्यम, इलेक्ट्रॉनिक माध्यम, केबल नेटवर्क, मोबाईल नेटवर्क व एकगठ्ठा लघुसंदेश (बल्क एसएमएस) इत्यादी सारखे संपर्काचे अन्य मार्ग पाहील. आणि उमेदवार व पक्ष यांच्याशी संबंधित असणाऱ्या जाहिराती, जाहिरात करणारे लेख (ॲडव्हस्टेरिअल्स), संदेश, चर्चा व मुलाखती यांचे अभिलेख ठेवील. ही समिती प्रदत्त बातम्यांच्या निर्धारित प्रकरणांसह निवडणुकांच्या जाहिरातींवर उमेदवाराने केलेल्या खर्चासंबंधी देण्यात आलेल्या विहित नमुन्यामध्ये प्रत्येक उमेदवारासंबंधीचा दैनंदिन अहवाल, आधारभूत वर्तमानपत्रातील कात्रणे / कात्रणे (क्लिपिंग) संबंधित दूरचित्रवाणी व रेडिओवरील जाहिरातींची ध्वनीमुद्रणे यांसोबत प्रदत्त बातम्याच्या निर्धारित प्रकरणासह निवडणुकीच्या जाहिरातीवर उमेदवाराने केलेल्या खर्चासंबंधी लेखांकन चमूस सादर करील. तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास व खर्च निरीक्षकास त्याची प्रत देईल. निवडणूक निर्णय अधिकारी, प्रदत्त बातम्याच्या घटनेसंबंधी अशा प्रकाशनावरील खर्च न दाखविल्याबद्दल खर्च निरीक्षकाशी विचारविनिमय करून उमेदवारास नोटीस देईल. खर्च निरीक्षक प्रदत्त बातमीचा अहवाल त्याच्या प्रतीसह २४ तासांच्या आत निवडणूक आयोगास पाठवील.

मुख्य निवडणूक अधिकारी, लोकसभेची/राज्य/केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभेची मुदत संपल्याच्या तारखेपूर्वी सहा महिने अगोदर, राज्यामध्ये/केंद्रशासित प्रदेशामध्ये प्रसारित/खप असलेल्या, दुरचित्रवाणी/आकाशवाणी (टिव्ही/रेडिओ) वाहिन्या/ वर्तमानपत्रे यांच्याकडून प्रमाणे व दरपत्रके प्राप्त करील. अशी दरपत्रके, जाहिरातीच्या दरांचा हिशेब करण्यासाठी लेखांकन चमूस देण्यात येतील. लेखांकन चमू जाहिरात व दृक प्रसिद्धी संचालनालय (डीएव्हीपी)/माहिती व जनसंपर्क संचालनालय (डीपीआयआर) मध्ये समाविष्ट असलेल्या, जो कमी असेल, त्या दराने खर्चाचा हिशेब करील आणि तो अभिरूप निरीक्षण

नोंदवहीत नमूद करील. खर्च निरीक्षक, तपासणीच्या वेळी, अशी विसंगती उमेदवाराच्या त्याचा निवडणूक प्रतिनिधी निदर्शनास आणून देईल आणि उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या नोंदवहीच्या शेऱ्याच्या रकान्यात, प्रदत्त बातमी बाबतच्या खर्चात झालेली विसंगती नमूद करील.

प्रदत्त बातमी अशा, सर्व नोटिशींच्या प्रती, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या सूचना फलकावर व जिल्हा निवडणूक संकेतस्थळावर, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केल्या पाहिजे. त्याच्या प्रती, प्रतिपृष्ठास १ रुपयाने प्रदान केल्यावर जनतेतील कोणत्याही व्यक्तीस देता येऊ शकतील.

## ८. भरारी पथके आणि स्थिर संनिरीक्षण चमू :

अनधिकृत रोख व्यवहार किंवा दारूचे कोणतेही वितरण किंवा मतदारांना लाच देण्याकरिता वापरलेली अन्य कोणतीही संभाव्य वस्तू यांचा माग घेण्याकरिता प्रत्येक विधानसभा मतदारसंघात / क्षेत्रात तीन किंवा त्यापेक्षा अधिक भरारी पथके असतील. भरारी पथकांमध्ये चमूचा प्रमुख म्हणून एक वरिष्ठ कार्यकारी दंडाधिकारी, एक वरिष्ठ पोलीस अधिकारी, एक व्हिडिओग्राफर आणि ३ ते ४ सशस्त्र पोलीस कर्मचारी यांचा समावेश असेल. त्यांना वाहन, भ्रमणध्वनी, एक व्हिडिओ कॅमेरा आणि रोख किंवा वस्तूंची जप्ती करण्यासाठी आवश्यक असलेली पंचनाम्याची कागदपत्रे पुरविण्यात येतील.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात तीन किंवा त्यापेक्षा अधिक स्थिर संनियंत्रण चमू असतील. प्रत्येक चमू मध्ये एक दंडाधिकारी आणि तीन किंवा चार पोलीस कर्मचारी असतील. हे चमू, त्यांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणातील रोख, अनधिकृत दारू, कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा वाहून नेण्यात आलेली शस्त्रे यांच्या होणाऱ्या वाहतुकीवर लक्ष ठेवील आणि ते तपासणी नाक्यावर उभे राहतील. तपासणीच्या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओचित्रण करण्यात येईल. अनपेक्षित धाडींचे सत्र चालू ठेवण्यासाठी, स्थिर संनिरीक्षण चमूंचे स्थान ठरावीक कालांतराने बदलण्यात येईल.

भरारी पथके निवडणुकांची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून कार्यरत होतील आणि स्थिर संनिरीक्षण चमू, दिनांक २९ मे, २०१५ च्या मानक प्रचालन प्रक्रिये नुसार **(जोडपत्र- जी ७, जोडपत्र - बी २०)** अधिसूचनेच्या दिनांकापासून मतदानाच्या/ पुनर्मतदानाच्या, काही असल्यास, दिनांकापर्यंत कार्यरत राहतील **(जोडपत्र - बी १८)**

तथापि, मतदान होऊन गेलेल्या राज्ये/संघ राज्यक्षेत्रांमध्ये आणि जेथे मतदानाचे वेळापत्रक हे टप्प्यांमध्ये आहे त्या राज्ये/ संघ राज्यक्षेत्रांमध्ये तैनात केलेली भरारी पथके आणि स्थिर संनियंत्रण चमू पुढीलप्रमाणे तशीच तैनात ठेवली पाहिजेतः-

प्रकरण- एक : जेथे मतदान संपलेले आहे अशा राज्ये/संघ राज्यक्षेत्रांच्या प्रकरणी व्युहरचनात्मक ठिकाणांवर आणि शेजारील राज्ये / संघ राज्यक्षेत्रांशी सामायिक सीमा असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये भरारी पथके आणि स्थिर संनियंत्रण चमू कार्यरत ठेवली पाहिजेत.

प्रकरण- दोन : जेथे निवडणुकीचे वेळापत्रक टप्प्यांमध्ये आहे अशा राज्यांच्या प्रकरणी, भरारी पथके पुढीलप्रमाणे कार्यरत ठेवली पाहिजेत :-

(एक) जेथे मतदान संपले आहे त्या लोकसभा मतदारसंघाच्या प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये, संपूर्ण राज्यातील निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत एक भरारी पथक तैनात असणे सुरू ठेवावे; आणि

(दोन) दिनांक २९ मे, २०१५ च्या मानक प्रचालन प्रक्रिये नुसार, जेथे मतदान अनेक टप्प्यांमध्ये होणार आहे अशा संपूर्ण जिल्ह्यामध्ये, संपूर्ण जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया संपेपर्यंत भरारी पथके/ स्थिर संनियंत्रण चमू पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवावीत. (जोडपत्र- बी २१)

## ९ खर्चाचे संनियंत्रण करणारा कक्ष :

जिल्हा निवडणूक अधिकारी, लेखांकनाचे ज्ञान असलेल्या उप विभागीय दंडाधिकाऱ्याच्या / सहायक जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची खर्चाचे संनियंत्रण करणाऱ्या कक्षाचा मध्यस्थ अधिकारी म्हणून नेमणूक करील. वर नमूद केलेले सर्व चमू व मध्यस्थ अधिकारी मिळून खर्चाचे संनियंत्रण करणारा कक्ष बनेल.

**१०. खर्चाच्या दृष्टीने संवेदनक्षम मतदारसंघ ( ई एस सी ) आणि खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील भाग ( ई एस पी ) निश्चित करणे :**

१०.१ राज्य/ संघ राज्यक्षेत्राचा मुख्य निवडणूक अधिकारी, राज्य / संघ राज्यक्षेत्राच्या विधानसभेची आणि / किंवा लोकसभेची मुदत संपण्याच्या किमान ६ महिने अगोदर, पुढील दोन मुख्य आधारावर संवेदनशीलतेचा नकाशा तयार करणे आणि खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील मतदारसंघ निश्चित करणे यासाठी विविध अंमलबजावणी प्राधिकरणांच्या राज्य स्तरावरील मध्यस्थ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करील :

क. रोकड, मद्य, मादक पदार्थ, मौल्यवान धातू आणि भेटवस्तू यांचा मूख्य उगम यासारख्या क्रियात्मक बाबी.

ख. क्षेत्र निहाय संवेदनशीलता ( जिल्हा निहाय, जिल्ह्यांच्या गट निहाय, मतदारसंघ निहाय )

१०. २ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या पहिल्या भेटीदरम्यान, जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी मतदारसंघात तैनात केलेल्या खर्च निरीक्षकाशी विचारविनिमय करून मतदारसंघातील खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील भाग निश्चित करावेत.

१०. ३ खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील मतदारसंघ आणि खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील भाग निश्चित करण्यासाठी मानक संचालन प्रक्रिया **जोडपत्र-जी १२** मध्ये उपलब्ध आहे.

**११. मध्यस्थ अधिकारी :**

( अ ) मुख्य निवडणूक कार्यालयामधील मध्यस्थ अधिकारी : आयोगाशी खर्च सनियंत्रणावर समन्वय साधण्याकरिता, निवडणूक खर्च संनियंत्रणाशी संबंधित मनुष्यबळ आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांना प्रशिक्षण देण्यासाठी, सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, राज्यातील इतर मध्यस्थ अधिकारी, खर्च निरीक्षक, खर्च संनियंत्रणाच्या कामात गुंतलेली सर्व प्राधिकरणे आणि आयोग यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी, मुख्य निवडणूक अधिकारी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पदाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करील. तो, निवडणूक कालावधीमध्ये करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या जप्तींच्या संबंधातील माहितीचे संकलन करील आणि ती दररोज दुपारी ३.०० वाजेपर्यंत जोडपत्र-बी-७ मध्ये आयोगाकडे ई-मेल द्वारे पाठविल आणि त्याच माहितीचे संकलन करून मतदानाच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत जोडपत्र- सी-३ मध्ये आयोगाकडे देखील पाठविल. ह्याखेरीज, तो, मतदान होणार असलेल्या राज्य/संघ राज्यक्षेत्राच्या शेजारील राज्य/ संघ राज्यक्षेत्रांशी असलेल्या आंतरराज्य सीमा वरील तपासणी नाके /क्षेत्रांमध्ये झालेल्या जप्तीचा दैनंदीन अहवाल, जोडपत्र-बी-७ मध्ये संलग्न नमुन्यात आयोगाला सादर करील.

**(ब) पोलीस मुख्यालयातील मध्यस्थ अधिकारी** : आयोगाकडून निवड करण्यात आल्याप्रमाणे, राज्याच्या पोलीस मुख्यालयातील महानिरीक्षक दर्जाच्या एका अधिकाऱ्यास, सर्व भरारी पथके, स्थिर संनिरीक्षण चमू, कायद्याची अंमलबजावणी करणारी सर्व अभिकरणे यांच्याशी व आयोगाशी समन्वय साधण्यासाठी “मध्यस्थ अधिकारी” अधिसूचित करण्यात येईल. मुख्य निवडणूक अधिकारी हा ज्यास भारताच्या निवडणूक आयोगाकडून अगोदर ताकीद देण्यात आलेली नसेल अशा महानिरीक्षकाच्या दर्जाच्या तीन नावांची एक नामिका पाठविल. त्याचा कार्यालयाचा दूरध्वनी/फॅक्स क्रमांक व मोबाईल क्रमांक, निवडणूक आयोगाच्या खर्च निरीक्षकास, अन्वेषण संचालनालयास, उत्पादन शुल्क विभागास व निवडणुकीच्या कालावधीत कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अन्य अभिकरणांना कळविण्यात येईल. तो जिल्ह्यांच्या सर्व मुख्य प्रशिक्षकांना प्रशिक्षण देईल आणि ते भरारीपथक किंवा स्थिर संनिरीक्षण चमू यांमधील सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतील. तो निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या कामात गुंतलेल्या अन्य कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांशी समन्वय साधण्यासाठी जबाबदार असेल.

तो जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांनी पाठविलेल्या **भरारी पथकांनी** व **स्थिर संनियंत्रण चमूंनी** केलेल्या जप्तीचे संकलन करील आणि **जोडपत्र- बी ८, बी ९ व बी १०** नुसार प्रत्येक दिवशी आयोगाच्या खर्च संनियंत्रण कक्षाकडे फॅक्सद्वारे एकत्रित दैनिक कार्य अहवाल पाठविल. त्याची एक प्रत, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठविल तसेच मतदानाच्या दिवशी दुपारी १.०० वाजेपर्यंत **जोडपत्र सी १०** मध्ये संकलित करून आयोगाला सादर करील.

**(क)** **आयकर मध्यस्थ अधिकारी** : आयोग, सार्वत्रिक निवडणूक जाहीर होण्यापूर्वी, निवडणूक इत्यादीमध्ये वापरण्यात यावयाच्या संभाव्य बेहिशेबी रकमेच्या जप्तीच्या मार्गाने निवडणूक खर्च संनियंत्रणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आयोगाला आणि राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला माहिती देण्यासाठी आणि विहित नमुन्यात **(जोडपत्र - ब-१५)** पर्यायी दिवशी अहवाल सादर करण्यासाठी, तसेच मतदानाच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत **जोडपत्र - सी ५** मध्ये आयोगाकडे माहिती संकलित करून सादर करण्यासाठी अपर /सह आयकर संचालक (अन्वेषण शाखा) या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या एका मध्यस्थ अधिकाऱ्याची आयकर महासंचालक (अन्वेषण) कार्यालयात नियुक्ती करील. आयकर विभागातील हवाई अन्वेषण युनिट्स आणि स्वतंत्र तक्रार संनियत्रण शाखा घोषणेच्या दिनांकापासून कार्यरत होतील. **(जोडपत्र- बी- २०)**

**(ड)** **उत्पादन शुल्क मध्यस्थ अधिकारी** : आयोग, सार्वत्रिक निवडणूक जाहीर होण्यापूर्वी, निवडणूक कार्यादरम्यान त्यांच्याकडून करण्यात आलेल्या बेकायदेशीर दारूच्या जप्तींची माहिती आयोगाला व राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला देऊन निवडणूक खर्च संनियंत्रणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता तसेच विहित नमुन्यात **(जोडपत्र बी- १२)** सांख्यिकीशी संबंधित माहिती देण्याकरिता तसेच निवडणुकीच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत **जोडपत्र - सी ६** मध्ये माहिती संकलित करून आयोगाला सादर करण्याकरिता, माहिती इत्यादीच्या प्रवाहासाठी आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या एका मध्यस्थ अधिकाऱ्याची नियुक्ती करील. मद्य संनियंत्रण उपाययोजना अनुदेशांनुसार निवडणुका घोषित झाल्याच्या दिनांकापासून हाती घेण्यात येतील आणि त्याचा अहवाल घोषणेच्या दिनांकापासून तयार करण्यात येईल. **(जोडपत्र- बी २०)**

**(ई)** **खर्च संनियंत्रण कक्ष मध्यस्थ अधिकारी :**

(एक) जिल्हा मुख्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षाचा मध्यस्थ अधिकारी, पुरेसे मनुष्यबळ आणि कार्यालयीन जागा व साहित्य सुविधा पुरविण्याकरिता, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याशी समन्वय साधील. मध्यस्थ अधिकारी, खर्च संनियंत्रण कार्यामध्ये गुंतलेल्या विविध चमूंमधील मनुष्यबळाला निवडणुकीची अधिसूचना येण्यापूर्वी आगाऊ प्रशिक्षण देईल. जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च संनियंत्रणासाठी ज्यांच्या सेवा आवश्यक असतील अशा अन्य अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील.

(दोन) खर्च संनियंत्रण कक्ष, भारत निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर करण्याच्या आणि निवडणुकीच्या अधिसूचनेच्या कालावधीदरम्यान राजकीय पक्षांच्या / संभाव्य उमेदवारांच्या सर्व सार्वजनिक सभा / मेळावे यांचे व्हिडिओचित्रण करण्यास जबाबदार असेल. व्हिडिओ सीडी / डीव्हीडी नुसार राजकीय पक्षांकडून करण्यात आलेला अशा सर्व खर्चाची या कक्षाकडून गणना करण्यात येईल आणि अशा कालावधीत राजकीय पक्षांकडून केलेल्या खर्चाच्या अंदाजाकरिता जिल्हा निवडणूक आयोगाकडे सुपूर्द करील. हा खर्च उमेदवारांच्या नोंदवहीत अंतर्भूत केला गेला नसला तरी, पक्षाला विधानसभा निवडणुकीच्या ७५ दिवसांमध्ये किंवा लोकसभा निवडणुकीच्या ९० दिवसांमध्ये हा खर्च दाखवावा लागेल. मुख्य निवडणूक अधिकारी या कालावधीत तसेच निकाल जाहीर होण्याच्या कालावधीत पक्षाकडून केलेल्या एकूण खर्चाचा जिल्हानिहाय अहवाल गोळा करील. आणि निकाल जाहीर झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत आयोगाला सादर करील. तक्रारी दाखल करण्यासाठी जनतेला प्रोत्साहन देण्यासाठी, तक्रार संनियंत्रण कक्षामधील टोल फ्री क्रमांकाला विस्तृत प्रसिद्धी देण्यात येईल.

सहायक खर्च निरीक्षक, भरारी पथके, स्थिर संनियंत्रण चमू, व्हिडिओ संनिरीक्षण चमू व्हिडिओ पाहणारा चमू आणि लेखांकन चमू हे मतदानाच्या / पुनर्मतदानाच्या, असल्यास, दिनांकापर्यंत आपले कार्य चालू ठेवतील, तथापि, सहायक खर्च निरीक्षक आणि लेखांकन चमू मतमोजणीच्या दिवसापूर्वी एक दिवस आणि निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकानंतर येणाऱ्या २५ व्या दिवशी कर्तव्यार्थ रुजू होतील आणि निवडणूक खर्चाच्या लेख्यांचे सादरीकरण करण्यासाठी उमेदवारांना, निवडणूक प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्याच्या प्रयोजनांसाठी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या छाननी अहवाल आणि खर्च निरीक्षक अहवाल चार तयार करण्यामध्ये साहाय्य करण्यासाठी आठ दिवसांच्या कालावधीसाठी राहतील आणि त्यानंतर लेखांकन चमूला कार्यमुक्त करण्यात येईल.

१२. आयोगाची मानक कार्यचालन प्रक्रिया क्रमांक ७६ / अनुदेश / ईईपीएस / २०१५ / खंड दोन, दिनांक २९ मे, २०१५ (जोडपत्र जी - ७) च्या अनुरोधाने नियुक्त / स्थापित करण्यात आलेले भरारी पथक / स्थिर संनियंत्रण चमू / पोलीस प्राधिकारी/ वितरण समिती यांना, जर, अडवल्या गेलेल्या/ जप्त केलेल्या विदेशी चलनाचा कोणत्याही उमेदवाराशी किंवा त्याच्या/तिच्या प्रतिनिधीशी किंवा पक्ष कार्यकर्त्याशी किंवा राजकीय पक्षाशी नसल्याचे आढळून आले, तर ही माहिती, संबंधित अधिनियमांखालील आवश्यक त्या कारवाईसाठी, महसूल दक्षता संचालनालयातील आणि अंमलबजावणी संचालनालयातील संबंधित मध्यस्थ अधिकाऱ्यांकडे, पाठवण्यात येईल (जोडपत्र-बी २२).

## निवडणूक संनियंत्रणामध्ये समावेश असलेल्या पथकांचा कार्य- प्रवाह तक्ता



**जोडपत्र-बी १**

## खर्च निरीक्षकाच्या येण्याजाण्याचा अहवाल

**(येण्याजाण्यानंतर तातडीने निरीक्षक पोर्टलवर अपलोड करणे आणि आयोगाला टपालाने स्वाक्षरित प्रत पाठवणे)**

| | |
|---|---|
| अहवाल दिल्याचा दिनांक | |
| निरीक्षकाचे नाव | |
| निरीक्षकाचा संकेतांक | |
| मतदारसंघ / मतदारसंघांचा क्रमांक व नाव | |
| मतदारसंघाचा फॅक्स क्रमांक | कार्यालयीन फॅक्स क्रमांक |
| मतदारसंघाचा दूरध्वनी क्रमांक | दूरध्वनी क्रमांक |
| मतदारसंघाचा भ्रमणध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| ईमेल पत्ता- | |

| | | |
|---|---|---|
| १ | निरीक्षकाच्या येण्या/जाण्याचा दिनांक<br>(कृपया लागू नसलेला भाग खोडावा) | |
| २ | निरीक्षकाने कामातून काही काळ विश्रांती घेतली आहे का ? | |
| ३ | होय असल्यास, तपशील द्यावा ? | |
| ४ | कामावर उशीरा हजर होता का ? | |
| ५ | होय असल्यास, किती वेळा ? | |

ठिकाण : निरीक्षकाची स्वाक्षरी.

दिनांक :

**जोडपत्र बी - २**

## खर्च निरीक्षकाचा अहवाल-एक

## खर्च नियंत्रणाकरिता सज्जता अहवाल

**(अधिसूचनेच्या दिनांकानंतर ३ दिवसांच्या आत विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत प्रत्येक विधानसभा क्षेत्राकरिता स्वतंत्रपणे आणि लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत एका संसदीय मतदारसंघासाठी केवळ एकच अहवाल निरीक्षकाच्या पोर्टलवर अपलोड करणे व आयोगाला त्याची टपालाने स्वाक्षरित प्रत पाठवणे.)**

| | |
|---|---|
| अहवाल दिल्याचा दिनांक | |
| निरीक्षकाचे नाव | |
| निरीक्षकाचा संकेतांक | |
| मतदारसंघाचा क्रमांक व नाव | |
| राज्याचे नाव | |
| मतदारसंघाचा फॅक्स क्रमांक | कार्यालयीन फॅक्स क्रमांक |
| मतदारसंघाचा दूरध्वनी क्रमांक | दूरध्वनी क्रमांक |
| मतदारसंघाचा भ्रमणध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| ईमेल पत्ता- | |

| अ. क्र. | वर्णन | होय | नाही |
|---|---|---|---|
| (अ) | उमेदवाराकडून ठेवण्यात आलेल्या दैनंदिन खर्चाचा हिशेब तपासण्यासाठी खर्च निरीक्षकाने पदनिर्देशित अधिकारी म्हणून सहायक खर्च निरीक्षक नियुक्त केला आहे किंवा नाही. | | |
| (ब) | निवडणूक खर्च नियंत्रणामध्ये गुंतलेले सर्व गट. लेखांकन चमू स्थिर, संनिरिक्षण चमू, भरारी पथके, व्हिडीओ संनिरीक्षण चमू इत्यादी चमू तयार केले आहेत व ते योग्यरीतीने काम करीत आहेत किंवा नाहीत. | | |
| (क) | अधिकतम खर्चाच्या कमाल मर्यादिसंबंधातील निवडणूक नियमांचे प्रचालनाच्या नियम ९० ची जाणीव निवडणूक यंत्रणेला आहे किंवा नाही. | | |
| (ड) | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दैनंदिन हिशेब अंतर्भूत असणारी निवडणूक खर्च नोंदवही (भाग अ), रोकड नोंदवही (भाग ब) बँक नोंदवही (भाग क) अनुसूची १ ते ९ अंतर्भूत असणारे संक्षिप्त विवरण (भाग एक ते भाग चार) आणि उमेदवाराला उद्देशून लिहलेल्या योग्य उपरिपत्राचा पोच नमुना या गोष्टी उपलब्ध करून दिल्या आहेत किंवा नाहीत. | | |
| (ई) | अशा नोंदवह्यांवर यथोचित पृष्ठ क्रमांक टाकलेले आहेत व ते देतेवेळी जिल्हा निवडणूक/अधिकारी अधिकाऱ्याने अधिप्रमाणित केले आहे किंवा नाही. | | |
| (फ) | निरीक्षकाने सर्व खर्च नियंत्रण चमूंना व सहायक खर्च निरीक्षकांना खर्चाच्या विविध घटकासंबंधी व अहवाल देण्याच्या यंत्रणेविषयी थोडक्यात माहिती दिली आहे किंवा नाही. | | |
| (ग) | खर्च निरीक्षकाने पोलीस अधीक्षक व जिल्हा निवडणूक व आयकर संचालनालय, पोलीस व राज्य उत्पादन शुल्काच्या, अन्वेषण अधिकाऱ्यांना रोख रक्कम, मद्य व इतर वस्तुंच्या वाटपावर संनिरीक्षण ठेवण्याकरिता सांगितले आहे किंवा नाही. | | |

| अ. क्र. | वर्णन | होय | नाही |
|---|---|---|---|
| (ह) | (एक) भित्ति पत्रकाची छपाई, ध्वनिक्षेपके, वाहने भाड्याने घेणे, मंडप उभारणीचा खर्च व फर्निचर व कायमच्या वस्तू भाड्याने घेण्याकरिता जिल्ह्यात असलेले चालू दर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात आले आहेत का? | | |
| | (दोन) मतदारसंघात चालविण्यात येणाऱ्या सर्व प्रसारमाध्यमांची दरपत्रके मिळविण्यात आली आहेत किंवा नाहीत. | | |
| (आय) | निवडणूक लढविणारे उमेदवार व सहायक खर्च निरीक्षक व खर्च नियंत्रण चमूंचे सदस्य यांना ते कळविले आहेत का ? | | |
| (जे) | प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी लेखांकन चमू, व्हिडीओ पाहणारा चमू, व्हिडीओ संनिरीक्षण चमू, माध्यम नियंत्रण चमू व संनिरीक्षण चमू तयार केले आहेत व छायांकित नोंदवह्या, व्हिडीओ निर्धारक पत्र (क्यू शीट), प्रस्तुत नोंदवह्या नमुने/उदा. माध्यमांवरील खर्च, संनियंत्रण अहवाल इत्यादी पुरविले आहेत किंवा नाहीत. | | |
| (के) | दर्शवा<br>(एक) भरारी पथकांची संख्या<br>(दोन) स्थायी संनियंत्रण चमूंची संख्या<br>(तीन) सहायक खर्च निरीक्षकांची संख्या<br>(चार) व्हीडीओ संनिरीक्षण चमूंची संख्या<br>(पाच) व्हीडीओअवलोकन चमूंची संख्या<br>(सहा) लेखांकन चमूंची संख्या. | | |
| (ल) | सहायक खर्च निरीक्षक व लेखांकन चमू, व्हिडीओ अवलोकन चमू, माध्यमांचा अहवाल व नियंत्रण व्हिडीओ संनिरीक्षण चमूच्या सदस्यांना पुढील अधिकाऱ्यांकडून प्रशिक्षित केले आहे किंवा नाही. | | |
| | (क) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून | | |
| | (ख) खर्च निरीक्षकाकडून | | |
| | (ग) चमूंकडून एखाद्या कामाची समस्या दाखवून देण्यात आली आहे काय ? (उत्तर होय असल्यास, त्याची भारत निवडणूक आयोगाला सूचना देऊन, ती तात्काळ, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी) | | |
| (म) | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने सर्व राजकीय पक्षांची बैठक आयोजित केली आहे का व स्थानिक भाषेमध्ये खर्चाच्या सूचनांच्या प्रती दिल्या आहेत किंवा नाहीत. | | |

(वरील एखादे उत्तर नकारार्थी असल्यास ते जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक अधिकारी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या सूचनेनुसार भारताच्या निवडणूक आयोगाने यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.)

ठिकाण :

दिनांक : खर्च निरीक्षकाची स्वाक्षरी.

**जोडपत्र बी-३**

## खर्च निरीक्षकाचा अहवाल—दोन

## खर्च नियंत्रणाकरिता सज्जता अहवाल

**(उमेदवारी परत घेतल्यानंतर २४ तासांच्या आत विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत प्रत्येक विधानसभा क्षेत्राकरिता स्वतंत्रपणे आणि लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत एका संसदीय मतदारसंघासाठी केवळ एकच अहवाल निरीक्षकाच्या पोर्टलवर अपलोड करणे व आयोगाला त्याची टपालाने स्वाक्षरित प्रत पाठवणे.)**

| | |
|---|---|
| अहवाल दिल्याचा दिनांक | |
| निरीक्षकाचे नाव | |
| निरीक्षकाचा संकेतांक | |
| मतदारसंघाचा क्रमांक व नाव | |
| राज्याचे नाव | |
| मतदारसंघाचा फॅक्स क्रमांक | कार्यालयीन फॅक्स क्रमांक |
| मतदारसंघाचा दूरध्वनी क्रमांक | दूरध्वनी क्रमांक |
| मतदारसंघाचा भ्रमणध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| ईमेल पत्ता-- | |

| अ.क्र. | वर्णन | होय | नाही |
|---|---|---|---|
| (अ) | खर्च नोंदवही/प्रमाणकांच्या निरीक्षणाचे वेळापत्रक निश्चित आहे किंवा नाही. | | |
| (ब) | होय असल्यास, निरीक्षणाकरिता निश्चित केलेला दिनांक दर्शवावा. | | |
| (क) | खर्चाच्या विविध बाबी व अहवाल देण्याच्या यंत्रणेसंबंधी निरीक्षकाकडून सर्व खर्च नियंत्रण चमू व सहायक खर्च निरीक्षकांना थोडक्यात माहिती देण्यात आली आहे किंवा नाही. | | |
| (ड) | पोलीस अधीक्षक, जिल्हा दंडाधिकारी, आयकर संचालनालयाच्या अन्वेषण अधिकाऱ्यांकडून रोख रक्कम, मद्य व इतर वस्तूंच्या वाटपावर संनिरीक्षण ठेवण्यासाठीचा रोजच्या कामाचा अहवाल/प्रतिवृत्तांत खर्च निरीक्षकाला मिळतो किंवा नाही. | | |
| (ई) | भित्ती पत्रकाची छपाई, वाहने भाड्याने घेणे, ध्वनिक्षेपके, मंडप उभारणीचा खर्च व फर्निचर व कायमच्या वस्तू भाड्याने घेण्याकरिता जिल्ह्यात असलेले चालू दर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात आले आहेत का ? | | |
| (फ) | निवडणूक अधिकारी व खर्च निरीक्षकांकडून उमेदवाराला खर्च नियंत्रणाची नवीन कार्यपद्धती कळविण्यात आली आहे किंवा नाही व खर्चाच्या सूचनांविषयीच्या प्रती देण्यात आल्या आहेत का ? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (ग) | नेत्यांची नावे (मान्यता प्राप्त नसलेल्या राजकीय पक्षाच्या बाबतीत जास्तीत जास्त २० व मान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी ४०) (विधानसभा/संसदीय मतदारसंघाच्या मर्यादेत विमानाने अथवा वाहतुकीच्या इतर साधनांनी प्रवास करू शकतात अशाच) मुख्य निवडणूक अधिकारी/निवडणूक आयोग भारत यांना कळविली आहेत का ? | | |
| (ह) | नसल्यास, पक्षाच्या सर्व नेत्यांच्या भेटीच्या संबंधात केलेला सर्व खर्च त्यांच्या प्रवासखर्चासहीत ज्याच्या निवडणुकीकरिता भेट दिली होती त्यासंबंधातील उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणूक खर्चाच्या हिशेबामध्ये दाखविणे आवश्यक आहे असे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना कळविण्यात आले आहे किंवा नाही (ती भेट उमेदवारांच्या सर्व गटांकरिता निवडणुकीच्या संबंधाने समाईक असल्यास, अशा सर्व उमेदवारांमध्ये खर्च समानतेने विभाजित करण्यात येईल.) | | |
| (आय) | संशयास्पद रोख रक्कम काढल्याचा अहवाल बँकेने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला दिला आहे किंवा नाही. | | |
| (जे) | असा अहवाल हा रु. १० लाखापेक्षा अधिक असल्यास केंद्रीय अधिकारी, आयकर याच्याकडे तो अग्रेषित करण्यात आला आहे किंवा नाही. | | |
| (के) | सर्व उमेदवारांकडून नामनिर्देशने भरण्यासंबंधातील छायांकित नोंदवहीमध्ये खर्चाच्या नोंदी सहायक खर्च निरीक्षकाने करून घेतल्या आहेत किंवा नाहीत. | | |
| (ल) | निवडणूक कार्याकरिता, सार्वजनिक बैठका, मेळावे व मिरवणुकांकरिता वाहने फिरविण्याची प्राधिकाराने परवानगी दिली आहे किंवा नाही, परवानगी दिल्याच्या या प्रती, व्हिडीओ संनिरीक्षण चमू, लेखांकन चमू व प्रसारमाध्यमांवरील नियंत्रण चमूला अग्रेषित करण्यात आल्या आहेत किंवा नाहीत. | | |
| (म) | मतदारसंघ "खर्च संवेदनशील" म्हणून जाहीर केला आहे किंवा नाही ? | | |
| (न) | होय असल्यास पोलीस निरीक्षकाला नियुक्त केले आहे का ? | | |
| (ओ) | खर्च नियंत्रण चमूच्या तयारीवरील एकूण निरीक्षण व एखाद्या सुधारणेसाठी सूचना (प्राथम्याच्या क्रमाने संबंधित क्षेत्रे दाखवावीत.) | | |

(वरीलपैकी एखादे उत्तर नकारार्थी असल्यास ते जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक अधिकारी व मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या सूचनेनुसार निवडणूक आयोग भारत यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.)

ठिकाण :

दिनांक : खर्च निरीक्षकाची स्वाक्षरी.

**जोडपत्र बी-४**

## खर्च निरीक्षकाचा अहवाल--तीन

## मतदान पूर्ण झाल्यानंतरचा खर्च अहवाल

**(मतदान नव्याने मतदान घेण्यात आल्यास ते पूर्ण झाल्यावर २४ तासांच्या आत, विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत, प्रत्येक विधानसभा क्षेत्राकरिता स्वतंत्रपणे आणि लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत एका संसदीय मतदारसंघासाठी केवळ एकच अहवाल निरीक्षकाच्या पोर्टलवर अपलोड करणे आणि आयोगाला टपालाने स्वाक्षरित प्रत पाठविणे.)**

| | |
|---|---|
| अहवाल दिल्याचा दिनांक | |
| निरीक्षकाचे नाव | |
| निरीक्षकाचा संकेतांक | |
| मतदारसंघाचा क्रमांक व नाव | |
| राज्याचे नाव | |
| मतदारसंघाचा फॅक्स क्रमांक | कार्यालयीन फॅक्स क्रमांक |
| मतदारसंघाचा दूरध्वनी क्रमांक | दूरध्वनी क्रमांक |
| मतदारसंघाचा भ्रमणध्वनी क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक |
| ईमेल पत्ता-- | |

| अ.क्र. | वर्णन | |
|---|---|---|
| (अ) | खर्चाशी संबंधित आलेल्या तक्रारींची संख्या | |
| (ब) | चौकशी करून त्यावर कार्यवाही केलेल्या तक्रारींची संख्या | |
| (क) | चौकशी व सुधारात्मक कार्यवाहीसाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या | |
| (ड) | प्रलंबित असल्याची कारणे | |
| (ई) | (एक) निरीक्षणाकरिता नोंदवही उपलब्ध करून न दिलेल्या उमेदवारांची संख्या | |
| | (दोन) निरीक्षणाकरिता नोंदवहीच्या अनुपलब्धतेकरिता नोटीस दिलेल्या उमेदवारांची संख्या | |
| | (तीन) नोटीस दिलेली असूनसुद्धा नोंदवही उपलब्ध करून न दिलेल्या उमेदवारांची संख्या | |
| | (चार) नोटीस दिली असतानासुद्धा ज्यांनी नोंदवही उपलब्ध करून दिली नाही त्यांची नावे. | (१)<br>(२)<br>(३) |

| | | | |
|---|---|---|---|
| (फ) | निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून नोटीस मिळालेले उमेदवार | संख्या | नावे |
| | (एक) दैनंदिन हिशेब/रोख रक्कम नोंदवही/बँक नोंदवहीच्या नमुन्यातील विसंगतीकरिता | | |
| | (दोन) अभिरुप नोंदवहीत दाखविलेल्या खर्चाप्रमाणे खर्चाचा खरा हिशेब न दाखविणारे | | |
| | (तीन) स्वतंत्रपणे बँक खाते न उघडल्याकरिता | | |
| (ग) | सहायक खर्च निरीक्षकाने अभिरुप निरीक्षण नोंदवही, पुराव्याच्या संचिका व अहवाल/निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व जिल्हा मुख्यालयातील उमेदवार यांच्यामधील पत्रव्यवहार अद्ययावत ठेवला आहे किंवा नाही. | | |
| (ह) | नामनिर्देशन दाखल केल्यानंतरच्या कालावधी दरम्यान रोख रक्कम, मद्य व इतर वस्तुंची केलेली जप्ती. | | |
| (आय) | असल्यास, त्याचा तपशील द्यावा. ठिकाण व जप्ती घडवून आणलेल्या प्राधिकाऱ्याचे नाव स्वतंत्रपणे नमूद करावे. | | |
| (जे) | जप्त केलेली रोख रक्कम/माल एखाद्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाशी जोडलेली आहे किंवा नाही. | | |
| (के) | तसे असल्यास, तपशील द्यावा. | | |
| (ल) | पैसे देऊन छापून आणलेली एखादी संशयास्पद बातमी निदर्शनास आली आहे किंवा नाही आणि जिल्ह्यात स्थापन केलेल्या समितीकडे ती पाठवली आहे किंवा नाही. | | |
| (म) | तसे असल्यास, उमेदवाराचे नाव, प्रसार माध्यमाचे नावासहीतचा तपशील व इतर तपशील द्यावा आणि प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने त्यावर विचार केला आहे किंवा नाही व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नोटीस दिली आहे किंवा नाही (अशा प्रकारच्या सर्व प्रकरणांचे तपशील जोडावेत). | | |
| (न) | सर्व मोठ्या सार्वजनिक सभा/मेळावे/मिरवणुकांवरील खर्च उमेदवाराच्या अभिरुप निरीक्षण नोंदवहीमध्ये नोंदविला होता किंवा नाही. | | |
| (ओ) | उमेदवाराने सादर केलेल्या दैनंदिन हिशेबाच्या नोंदवहीमध्ये असा सर्व खर्च दाखविला होता किंवा नाही. | | |
| (प) | नसल्यास, तसा तपशील नमूद करावा. | | |
| (क्यू) | या कालावधी दरम्यानच्या मद्याचे उत्पादन/वितरण अहवाल याचे संनियंत्रण करण्यात आले आहे किंवा नाही. | | |
| (र) | मुंडण समारंभ, वाढदिवस समारंभ इत्यादीवरील सर्व भपकेबाज खर्च, लग्न, सामुदायिक लग्नसमारंभविषयी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला, आयकर अन्वेषण संचालनालय यांना कळविण्यात आले आहे किंवा नाही. | | |

| | | |
|---|---|---|
| (स) | तसे असल्यास, त्यावर संचालनालयकडून/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील. | |
| (ट) | अशा खर्चाच्या रकमेचा उल्लेख करावा व तो एखाद्या उमेदवाराशी संबंधित आहे किंवा कसे (उमेदवाराच्या नावाचा उल्लेख करावा.) | |
| (यू) | मतदारसंघातील प्रत्येक राजकीय पक्षाकडून त्यांच्या उमेदवाराच्या वतीने रोख रक्कम किंवा एखाद्या स्वरूपात केलेला खर्च, (पक्षाचे नाव व रक्कम नमूद करावी). | |
| (व्ही) | निवडणुकीचा खर्च लपविण्याची निदर्शनास आलेली एखादी अन्य पद्धत (कृपया तपशील द्यावा). | |
| (डब्ल्यू) | इतर कोणताही शेरा/सूचना (कृपया प्राथम्यक्रमानुसार नमूद करा). | |

ठिकाण :

दिनांक : खर्च निरीक्षकाची स्वाक्षरी.

**जोडपत्र बी-५**

## खर्च निरीक्षकाचा अंतिम अहवाल (अहवाल-चार)

**(निकाल घोषित झाल्याच्या ३० दिवसानंतर विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत प्रत्येक विधानसभा क्षेत्राकरिता स्वतंत्रपणे आणि लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत एका संसदीय मतदारसंघासाठी केवळ एकच अहवाल निरीक्षकाच्या पोर्टलवर अपलोड करणे आणि आयोगाला टपालाने स्वाक्षरित प्रत पाठवणे).**

सादर करण्याचा दिनांक :

निरीक्षकाचे नाव :

दूरध्वनी क्रमांक (कार्या) :

निरीक्षकाचा सकेतांक :

ई-मेल पत्ता :

मतदारसंघ :

भ्रमणध्वनी क्रमांक :

जिल्हा :

राज्य :

निकाल जाहीर करण्याचा दिनांक :

निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्याचा शेवटचा दिनांक :

हिशेबाचा मेळ घातलेल्या बैठकीचा दिनांक :

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या :

निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव/संलग्न पक्ष, कोणताही असल्यास :

## निरीक्षणाचा सारांश

| अनु-क्रमांक | उमेदवारांचे नांव व संलग्न पक्ष | तपासणी दरम्यान किंवा उमेदवाराचे अंतिम लेखे १ यामध्ये आढळून आलेल्या सर्व विसंगतीवर उमेदवारांना नोटिशी देण्यात आल्या आहेत किंवा नाहीत वउमेदवारांचे उत्तर विचारात घेण्यात आले किंवा नाही. (टीप ८ पहा) | उमेदवारा कडून सादर करण्यात आलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबाचा दिनांक (कृपया खालील टीप १ पहा) | हिशेब वेळेत सादर केला आहे किंवा नाही. (होय/ नाही) | उमेदवाराच्या हिशेबामध्ये नमूद केलेली खर्चाची रक्कम | लेखे नमुन्यांमध्ये आणि सर्व आवश्यक कागदपत्रां-सह दाखल केले आहेत किंवा नाही | गोळा केलेला पुरावा लक्षात घेऊन उमेदवाराने सादर केलेल्या हिशेबाशी निरीक्षक सहमत आहे किंवा नाही. (होय/ नाही) नाही असल्यास कृपया खालील टीप २ नुसार जोडावे. | उमेदवाराने सादर केलेल्या माहितसह प्रचारा दरम्यान गोळा केलेली सर्व माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने उलट तपासणी केली आहे किंवा नाही. (होय/नाही) नाही असल्यास कृपया खालील टीप ३ नुसार जोडावा. | उमेदवारा कडून करण्यात आलेला अंदाजित खर्च विहीत मर्यादेच्या पलीकडे झाला आहे किंवा नाही. होय असल्यास कृपया खालील टीप ४ नुसार तपशील जोडावा. | राजकीय पक्षा कडून उमेदवाराच्या वतीने करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम काही/ असल्यास कृपया खालील टीप ५ नुसार पक्षाचे नाव नमूद करावे. | उमेदवाराच्या वतीने इतर वस्तू/ व्यक्तीकडून केलेल्या खर्चाची रक्कम | लेख्यांची संक्षिप्त विवरणे (भाग-१ ते भाग ४ आणि अनुसूची १ ते ११) मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली आहे किंवा नाही (अशी लेखे दाखल झाल्याच्या ३ दिवसांच्या आंत) | निवडणूक प्रक्रियेदरम्यान जप्त केलेली रोकड व इतर वस्तू ह्या, (एक) जेथे प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात आला असेल (दोन) जेथे रोकड आयकर विभागाकडे सुपूर्द केली असेल अशी प्रकरणे खेरीज करून, ७ दिवसांच्या आत सोडून दिल्या आहेत किंवा नाहीत. दिल्या नसतील तर, ही बाब तात्काळ कार्यवाहीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या निदर्शनास आणून दिली आहे किंवा नाही. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |

| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | |

**ठिकाण :**

**दिनांक :**

**स्वाक्षरी**
**खर्चनिरीक्षक**

**टिपा :**

१. उमेदवाराने जर त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशेब सादर केलेला नसेल तर – स्तंभ ४ मध्ये "सादर केलेला नाही" असे नमूद करावे.

२. स्तंभ ८ मध्ये, नाही असल्यास, पुरावा/संदर्भ क्रमांकासह तो का सहमत नाही हे नमूद करणारा प्रत्येक उमेदवाराचा स्वतंत्र अहवाल निरीक्षकाकडून देण्यात येईल.

३. निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याशी सहमत नसल्यास स्तंभ ९ मध्ये, त्याने असहमतीची कारणे स्वतंत्रपणे नमूद करावीत.

४. निरीक्षण केलेला खर्च मर्यादेपेक्षा अधिक आहे अशा उमेदवाराच्या प्रकरणात त्या विषयीचे संक्षिप्त विवरण खर्च निरीक्षकाकडून देण्यात येईल, व एकूण खर्चाची अंदाजित रक्कम स्तंभ १० मध्ये नमूद करण्यात येईल.

५. उमेदवाराकरिता खर्च करणारे एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष असल्यास, प्रत्येक पक्षाचे नाव व रक्कम स्तंभ ११ मध्ये स्वतंत्रपणे देण्यात यावी. दर्शविण्यात आलेल्या आकडेवारीशी निरीक्षक सहमत नसल्यास, तो गोळा केलेल्या पुराव्यासह अंदाजित आकडेवारी स्वतंत्रपणे जोडेल.

६. स्तंभ १२ मध्ये, उमेदवाराच्या वतीने इतर उपसंस्था/व्यक्तीकडून खर्च केलेली एकूण रक्कम या स्तंभामध्ये नमूद करण्यात येईल व दर्शविण्यात आलेल्या आकडेवारीशी निरीक्षक सहमत नसल्यास, तो उपसंस्था/व्यक्तींच्या नावासोबत गोळा केलेल्या पुरव्यासह अंदाजित आकडेवारी स्वतंत्रपणे जोडेल.

७. कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी जर निवडणूक निरीक्षकाला काही सूचना करावयाच्या असतील तर तो त्याच्या सूचना या अहवालासोबत जोडपत्र-ए म्हणून स्वतंत्रपणे जोडील.

८. जेथे अभिरुप निरीक्षक नोंदवहीत अधिक खर्च दर्शवित असेल व असा खर्च उमेदवाराकडून दाखवण्यात आला नसेल तर, अशा बाबीमध्ये भारताचा निवडणूक आयोग सूचना ७६/सूचना/ईईपीएस/२०१५/खंड दोन, दिनांक २९ मे, २०१५ (जोडपत्र-सी १०) या अनुसार हिशेबाची तपासणी केल्यानंतर ४८ तासाचे आत उत्तर देण्याचे उमेदवारास सांगणारी नोटीस देणे आवश्यक आहे. तसेच अंतिम तपासणी केल्यानंतर उमेदवारांनी सादर केलेल्या संक्षिप्त विवरणपत्रांमध्ये कोणतीही विसंगती आढळून आल्यास ४८ तासांच्या आत अशा नोटीशी देऊन ३ दिवसांच्या आत उत्तर देण्यास उमेदवारास सांगण्यात यावे.

वरील कार्यपद्धतीचे पालन करण्यात आले आहे किंवा नाही आणि उमेदवारांची उत्तरे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या छाननी अहवालामध्ये विचारात घेण्यात आली आहेत किंवा नाही याबाबत निवडणूक निरीक्षकानी निर्देश करणे आवश्यक आहे.

**जोडपत्र बी-६**

## खर्च निरीक्षकाचा प्रतिवृत्तांत/स्थितीदर्शक अहवाल

खर्च निरीक्षकाचा संकेतांक व नाव :

लोकसभा/विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव :

जिल्ह्याचे नाव :

राज्याचे नाव :

| अ. क्र. | बाब | शेरे |
|---|---|---|
| १ | (अ) सहायक खर्च निरीक्षक, भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमू, व्हिडिओ संनिरीक्षण चमू, व्हिडीओ पाहणारा चमी आणि लेखांकन चमू जागेवर आहेत किंवा कसे व योग्यप्रकारे काम करत आहेत किंवा कसे? | |
| | (ब) अभिरूप निरीक्षण नोंदवही आणि पुराव्यांची संचिका योग्यप्रकारे ठेवली जात आहे किंवा कसे? | |
| २ | प्रति मतदारसंघ नियुक्त केलेल्या सहायक खर्च निरीक्षक, भरारी पथक, स्थिर संनियंत्रण चमू, व्हिडिओ संनियंत्रण चमू, व्हिडिओ पाहणारा चमू, लेखांकन चमू यांची संख्या. या चमूंची कार्यक्षमता वाढवण्यासाठी सल्ला. | |
| २अ | अहवालातील विधानसभा मतदारसंघ हा/हे संवेदनशील मतदारसंघ आहे/आहेत काय? | |
| ३ | तक्रार संनियंत्रण कक्ष- रोख रक्कम/ दारू / अंमली पदार्थ / मादक द्रव्ये / मौल्यवान धातू (जसे की, सोने, चांदी, दागिने, इत्यादी)/ भेटवस्तू/ इतर बाबी यांच्या वाटपासंबंधात प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या. | |
| ४ | भरारी पथक, स्थिर संनियंत्रण चमू, पोलीस, उत्पादन शुल्क, आयकर विभाग आणि इतर कायदा अंमलबजावणी अभिकरणांनी, आदर्श आचारसंहिता लागू झाल्याच्या दिनांकापासून अहवालाच्या दिनांकापर्यंत केलेल्या जप्ती. ( आकार व रुपयांमधील किंमत दोन्ही) | |
| | (अ) रोख रक्कम | |
| | (ब) दारू | |
| | (क) अंमली पदार्थ / मादक द्रव्ये | |
| | (ड) मौल्यवान धातू (जसे की, सोने, चांदी, दागिने इत्यादी) | |
| | (ई) इतर बाबी/ भेटवस्तू | |

| | | |
|---|---|---|
| ५ | (अ) वेळापत्रकाप्रमाणे निर्धारित केलेला उमेदवाराच्या लेख्यांची तपासणी करण्याचा दिनांक | |
| | (ब) सर्व उमेदवारांनी त्यांच्या लेख्यांची तपासणी करून घेतली आहे किंवा कसे? | |
| | (क) उमेदवाराने (उमेदवारांनी केलेला कमाल खर्च नोंदवावा. (राजकीय पक्षाचे नाव लिहावे) | |
| ६ | किती उमेदवारांनी स्वतंत्र बँक खाते उघडले नाही ? | |
| ७ | (अ) गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या उमेदवारांची संख्या | |
| | (ब) उमेदवारांनी त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी मुद्रित माध्यमांमध्ये आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध केली आहे किंवा कसे? | |
| | (क) गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रकाशित करण्यासाठी संबंधित उमेदवारांनी केलेला खर्च | |
| ८ | माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कडे प्राप्त संशयित प्रदत्त बातम्यांच्या तक्रारी व केलेल्या कारवाईचा अहवाल | |
| ९ | मद्य उत्पादन कारखाने, गोदामे व विक्री केंद्रांचे संनियंत्रण | |
| १० | खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील भागांची निश्चिती व संनियंत्रण. भरारी पथक आणि स्थिर संनियंत्रण चमू मध्ये केंद्रिय पोलीस बलाचे मनुष्यबळ मिसळले आहे किंवा कसे? | |
| ११ | भरारी पथकांची वाहने जीपीएस अनुकूल आहेत किंवा कसे? | |
| १२ | नागरिक दक्षतेच्या माध्यमातून रोख रक्कम, दारू, प्रलोभने इत्यादींशी संबंधित प्राप्त तक्रारींची संख्या आणि खऱ्या आढळलेल्या प्रकरणांची संख्या | |
| १३ | मतदानाच्या ७२ तास अगोदर तुमची व्युहरचना काय आहे? | |
| १४ | अन्य एखादा मुद्दा | |

**दिनांकासह स्वाक्षरी.................................**

**खर्च निरीक्षकाचे नाव.................................**

**जोडपत्र बी-७**

**दि. ........../......../२०........ रोजी जप्त केलेल्या वस्तूंचा दैनंदिन अहवाल**
**(मागील दिवसाच्या सकाळी ९ वाजेपासून अहवाल दिवसाच्या सकाळी ९ वाजेपर्यंत) भारताच्या निवडणूक आयोगास दुपारी ३ वाजेपर्यंत पाठवण्याचा.**
**(राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव..........................) विधानसभेची सर्वसाधारण निवडणूक/पोट-निवडणूक**
**.................... (लोकसभा/विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव), ..................................(राज्य)**
**:**

१. जप्त केलेली एकूण रोख रक्कम (कोटी रुपयांमध्ये) :

| भरारी पथक/स्थिर संनिरीक्षण चमू/पोलीस | | आयकर विभाग | | एकूण |
|---|---|---|---|---|
| मागील दिवसाची जप्ती<br>१ | जप्तीची चढती बेरीज<br>२ | मागील दिवसाची जप्ती<br>३ | जप्तीची चढती बेरीज<br>४ | जप्तीची चढती बेरीज<br>५ (२+४) |
| | | | | |

२. जप्त केलेली एकूण दारू (लिटरमधील प्रमाण कोटी रुपयांमध्ये किंमत) :

| भरारी पथक/स्थिर संनिरीक्षण चमू/पोलीस | | | | राज्य दारूबंदी व उत्पादन शुल्क विभाग | | | | जप्तीची चढती बेरीज | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील दिवसाची तप्ती | | जप्तीची चढती बेरीज | | मागील दिवसाची जप्ती | | जप्तीची चढती बेरीज | | राज्यातील जप्त केलेली एकूण दारू<br>५ (२+४) | |
| प्रमाण | किंमत | प्रमाण | किंमत | प्रमाण | किंमत | प्रमाण | किंमत | प्रमाण | किंमत |

३. भरारी पथक/स्थिर संनिरीक्षण चमू/इतर पोलीस प्राधिकारी यांच्याद्वारे जप्त केलेले एकूण अंमली पदार्थ/मादक द्रव्ये (किलो मधील प्रमाण व त्याची कोटी रुपयांमध्ये किंमत)

| मागील दिवसाची जप्ती | | जप्तीची चढती बेरीज | |
|---|---|---|---|
| वर्णन आणि प्रमाण | किंमत | वर्णन आणि प्रमाण | किंमत |
| | | | |

४. जप्त केलेले एकूण मौल्यवान धातू ( जप्त केलेले सोने, चांदी, दागिने इत्यादी आणि त्यांची रुपयांमध्ये किंमत ) :

| मागील दिवसाची जप्ती | | जप्तीची चढती बेरीज | |
|---|---|---|---|
| वर्णन आणि प्रमाण | किंमत | वर्णन आणि प्रमाण | किंमत |
| | | | |

५. जप्त केलेले एकूण इतर बाबी/भेटवस्तू ( मतदारांना प्रलोभन देण्याचा हेतू असलेले लॅपटॉप, कुकर्स, साड्या इत्यादी ) आणि त्यांची कोटी रुपयांमध्ये किंमत )

| मागील दिवसाची जप्ती | | जप्तीची चढती बेरीज | |
|---|---|---|---|
| वर्णन आणि प्रमाण | किंमत | वर्णन आणि प्रमाण | किंमत |
| | | | |

६. जप्त केलेल्या एकूण वस्तूंची रुपयांमध्ये किंमत

| रुपयांमध्ये मागील दिवसाची एकूण संचयित जप्ती | रुपयांमध्ये एकूण संचयित जप्ती |
|---|---|
| | |

**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील मध्यस्थ अधिकारी (खर्च), यांची स्वाक्षरी.**

**(राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव.........................) विधानसभेची सर्वसाधारण निवडणुक, २०......../**

**(राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव.........................) लोकसभा सर्वसाधारण निवडणुक, २०......../**

**आंतरराज्य तपासणी नाके/क्षेत्रांमधील जप्तीचा दैनंदिन अहवाल**

| मतदान होणार असलेल्या राज्य/संघ राज्यक्षेत्राशी सामायिक सीमा असलेल्या राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव | आंतरराज्य सीमेवरील राज्य पोलीस तपासणी नाक्यांची संख्या | आंतरराज्य सीमेवरील राज्य उत्पादनशुल्क तपासणी नाक्यांची संख्या | आंतरराज्य सीमेवरील इतर, जसे की, वाणिज्य कर, वन विभागांच्या तपासणी नाक्यांची संख्या | रोख रक्कम (कोटी रुपयांमध्ये) | दारू | | अंमली पदार्थ/मादक द्रव्ये | | मौल्यवान धातू | | भेटवस्तू/इतर बाबी | एकूण (कोटी रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमाण (लिटर) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | प्रमाण (लिटर) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | प्रमाण (लिटर) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | |

| मतदान होणार असलेल्या राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव | आंतरराज्य सीमेवरील राज्य पोलीस तपासणी नाक्यांची संख्या | आंतरराज्य सीमेवरील राज्य उत्पादनशुल्क तपासणी नाक्यांची संख्या | आंतरराज्य सीमेवरील इतर, जसे की, वाणिज्य कर, वन विभागांच्या तपासणी नाक्यांची संख्या | रोख रक्कम (कोटी रुपयांमध्ये) | दारू | | अंमली पदार्थ/मादक द्रव्ये | | मौल्यवान धातू | | भेटवस्तू/इतर बाबी | एकूण (कोटी रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमाण (लिटर) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | प्रमाण (लिटर) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | प्रमाण (लिटर) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | पैशांमधील किंमत (कोटी रुपयांमध्ये) | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | |

**जोडपत्र बी -८**

दिनांक ................................ रोजी तक्रारीशी संबंधित रोख रक्कम/इतर वस्तू जप्त केल्यानंतर भरारी पथकाकडून केलेल्या दैनिक कारवाईचा अहवाल

संदर्भ क्रमांक.........................................................................................

दंडाधिकाऱ्याचे नाव व पदनाम ..........................................................................

उपविभागाचे नाव ..................................................................................

पोलीस अधिकाऱ्याचे नाव ..........................................................................

राज्य ........................................................................................................

| अनु-क्रमांक | मतदार संघ व जिल्ह्याचे नाव | तक्रारीचे/ माहितीचे/ स्वरुप | ज्याच्या विरुद्ध तक्रार मिळाली आहे त्या व्यक्तीचे नाव | भरारी पथका- कडून जप्त केलेली रोख रक्कम/इतर वस्तू | इतर पोलीस प्राधिकाऱ्याकडून जप्त केलेली रोख रक्कम/ इतर वस्तू | दाखल केलेला प्राथमिक चौकशी अहवाल | ज्यांच्याशी अशाप्रकारचा संबंध आढळून आले त्या उमेदवाराची वा पक्षाचे नाव | ज्याच्याकडे रोख रक्कम/ वस्तू सुपूर्द करण्यात आली आहेत त्या प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम | शेरे (............. कोणतेही असल्यास) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |

| | वर्णन | अहवालाच्या दिनांकाची आकडेवारी | अहवालाच्या दिनांकासह चढती बेरीज |
|---|---|---|---|
| १ | भरारी पथकाने जप्त केलेली एकूण रोख रक्कम/इतर वस्तू | | |
| २ | इतर पोलीस प्राधिकरणाने जप्त केलेली एकूण रोख रक्कम/ | | |
| ३ | प्राप्त झालेल्या रोख रकमेच्या तक्रारींची एकूण संख्या | | |
| | (अ) तक्रार प्राप्त झाल्यापासून अर्ध्या तासाच्या आत | | |
| | (ब) तक्रार प्राप्त झाल्यापासून अर्ध्या तासाच्या पुढे | | |
| ४ | पडताळणी केलेल्या तक्रारींची एकूण संख्या | | |
| ५ | प्रलंबित तक्रारींची एकूण संख्या | | |
| ६ | त्या दिवसाच्या शेवटपर्यंत दाखल झालेल्या प्राथमिक अहवालाची एक्कूण संख्या माहिती | | |

स्वाक्षरी/-

भरारी पथकाचा प्रभारी अधिकारी/
राज्य पोलीस मुख्यालयाच्या
प्रमुख अधिकाऱ्याचे
नाव व पदनाम.

**टीप :–**

१. भरारी पथकाचा प्रभारी अधिकारी प्रत्येक भरारी पथकाचा अहवाल वरील नमुन्यात पोलीस अधीक्षकाला व त्याची प्रत निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्वसाधारण निरीक्षक व सहायक खर्च निरीक्षकाला सादर करेल.

२. सर्व जिल्ह्याची माहिती एकत्रित केल्यानंतर पोलीस अधीक्षक राज्य मुख्यालयाच्या प्रमुख अधिकाऱ्याला त्याचा अहवाल पाठवेल.

३. राज्य पोलीस मुख्यालयाचा प्रमुख अधिकारी सर्व राज्याची माहिती गोळा करील व त्याचा अहवाल आयोगाला व त्याची प्रत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवेल.

**जोडपत्र बी-९**

**दिनांक ........................ रोजी तक्रारींशी संबंधित एमसीसी वरील भरारी पथकाकडून दैनिक कारवाईचा अहवाल**

संदर्भ क्रमांक ................................................ दंडाधिकाऱ्याचे नाव व पदनाम ..............................................

उपविभागाचे नाव ........................................... पोलीस अधिकाऱ्याचे नाव ...................................................

राज्य .............................................................

| अनु-क्रमांक | मतदार संघाचे/ जिल्ह्याचे नाव | तक्रारदाराचे नाव | संलग्न पक्ष, कोणताही असल्यास | ज्याच्या विरुद्ध तक्रार आहे (नाव) | संलग्न पक्ष कोणताही असल्यास | एमसीसी उल्लंघन मुद्याचे संक्षिप्त वर्णन | केलेल्या कारवाईचा अहवाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | | (४) | (५) | (६) |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्वाक्षरी/-

भरारी पथकाच्या प्रभारी अधिकाऱ्यांचे/
राज्य पोलीस मुख्यालयाच्या
प्रमुख अधिकाऱ्याचे
नाव व पदनाम.

**टीप :–**

१. भरारी पथकाचा प्रभारी अधिकारी प्रत्येक भरारी पथकाचा अहवाल वरील नमुन्यात पोलीस अधीक्षकाला व त्याची प्रत निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्वसाधारण निरीक्षक व सहायक खर्च निरीक्षकाला सादर करेल.

२. सर्व जिल्ह्यांची माहिती एकत्रित केल्यानंतर पोलीस अधीक्षक राज्य मुख्यालयाच्या प्रमुख अधिकाऱ्याला त्याचा अहवाल पाठविल.

३. राज्य पोलीस मुख्यालयाचा प्रमुख अधिकारी सर्व राज्याची माहिती गोळा करील व त्याचा अहवाल आयोगाला व त्याची प्रत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठविल.

**जोडपत्र बी-१०**

**दिनांक ........................ रोजी तक्रारींशी संबंधित रोख रक्कम/इतर वस्तू जप्त करण्यावरील स्थिर संनियंत्रण चमूकडून दैनिक कारवाईचा अहवाल**

तपासणी नाक्याचे ठिकाण .............................. दंडाधिकाऱ्याचे नाव व पदनाम ..................................................

जिल्हा ................ राज्य ........................... पोलीस अधिकाऱ्याचे नाव व पदनाम .............................................

| अनु-क्रमांक | मतदारसंघाचा/ जिल्ह्याचा क्रमांक व नाव | तपासणी चौकीत झडती घेतलेल्या व्यक्तींचे नाव व पत्ता | रोख रक्कम/ इतर वस्तू | दाखल केलेला प्राथमिक चौकशी अहवाल | संबंध असलेल्या उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव | जप्तीनंतर ज्यांच्याकडे रोख रक्कम जप्त केलेल्या वस्तू सुपूर्द केल्या आहेत, त्या प्राधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शेरे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| वर्णन | | | | | | अहवालाच्या दिनांकाचे आकडे | दिनांकासह चढती बेरीज |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | | स्थिर संनिरीक्षण चमूने जप्त केलेली एकूण रोख रक्कम | | |
| ब | | स्थिर संनिरीक्षण चमूने जप्त केलेली एकूण इतर वस्तू | | |
| क | | दाखल केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालांची संख्या | | |

स्वाक्षरी,

स्थिर संनियंत्रण चमूच्या प्रभारी अधिकाऱ्याचे
राज्य पोलीस मुख्यालयाच्या प्रमुख
अधिकाऱ्याचे नाव व पदनाम.

**टीप :–**

१. भरारी पथकाचा प्रभारी अधिकारी प्रत्येक स्थैतिक संनिरीक्षण गटाचा वरील नमुन्यातील अहवाल पोलीस निरीक्षक व त्याची प्रत जिल्हा निवडणूक अधिकारी व सहायक खर्च निरीक्षकाला सादर करेल.

२. सर्व जिल्ह्यांची माहिती एकत्रित केल्यानंतर पोलीस अधीक्षक राज्य मुख्यालयाच्या प्रमुख अधिकाऱ्याला त्याचा अहवाल पाठवेल.

३. राज्य पोलीस मुख्यालयाचा प्रमुख अधिकारी सर्व राज्याची माहिती गोळा करील व त्याचा अहवाल आयोगाला व त्याची प्रत राज्याच्या/संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवेल.

**जोडपत्र बी-११**

**........................ दिनांकासाठी अन्वेषण संचालनालयाकडील कार्यक्रम अहवालाचा नमूना**

(अन्वेषण संचालनालयाकडून एक दिवसाआड सादर करावयाचे) संदर्भ क्रमांक ..................................

मतदारसंघाचे नाव : ........................................................ जिल्हा :.............................................. राज्य/संघ

राज्यक्षेत्र :........................

| अनु-क्रमांक | मतदारसंघाचे व जिल्ह्याचे नाव | माहिती व तंत्रज्ञान विभागाला ज्या एजन्सीकडून माहिती/तक्रारी मिळाल्या त्या एजन्सीचे नाव | ज्याच्या विरुद्ध कारवाई केली आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता | तक्रारीमध्ये नमूद केलेली रोख रक्कम भेटवस्तू इत्यादी | ज्या व्यक्तींविरुद्ध कार्यवाही केलेली आहे त्या व्यक्तीने चलनाद्वारे भरलेली रोख रक्कम | आयकर विभागाने जप्त केलेली रोख रक्कम | जप्त केलेल्या इतर वस्तू (कोणत्याही असल्यास) | व्यक्तीला (जमा केलेली असल्यास) परत केलेली रोख रक्कम | शेरे (उमेदवाराचे/त्याच्या नातेसंबंधाचे मतदारसंघाचे नाव आणि राजकीय पक्षाचे नाव कोणतेही असल्यास कृपया नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | |

**निवडणुकीच्या दिनांकापासून ते अहवाल कळविण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंतची एकूण रकमेची चढती बेरीज**

| अनु-क्रमांक | | अहवालाच्या दिनांकाची एकूण रकमेची चढती बेरीज | अहवालाच्या दिनांकासह रकमेची चढती बेरीज |
|---|---|---|---|
| १ | आयकर विभागाने जप्त केलेली एकूण रकमेची चढती बेरीज | | |
| २ | जप्त केलेल्या इतर बाबींची एकूण रकमेची चढती बेरीज (काल्पमिक मुल्य) | | |
| ३ | चलनाद्वारे भरलेल्या कराची एकूण रकमेची चढती बेरीज | | |

नोडल अधिकाऱ्याची स्वाक्षरी,
डीजीआयटी (अन्वे.) यांचे कार्यालय/जिल्ह्याचा
प्रभारी उप संचालक, दिनांक

टीपा.—

१. जिल्ह्याचा प्रभारी अधिकारी, या नमुन्यात प्रत्येक जिल्ह्याचा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकारी व खर्च निरीक्षक यांच्या प्रतिसह डीजीआयटी (अन्वये) यांना सादर करील.

२. राज्य आयकर विभागाचा नोडल अधिकारी संपूर्ण राज्याच्या माहितीचे संकलन करेल आणि राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या प्रतीसह आयोगाला (खर्च संनियंत्रण विभागाला) पाठवेल.

**जोडपत्र-बी १२**

## राज्य/जिल्हास्तर मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्यांकडील भारतीय बनावटीची विदेशी दारू/बीअर/देशी दारू याचा दिवसाआड अहवाल

( भारतीय बनावटीची विदेशी दारू/बीअर/देशी दारू याकरिता स्वतंत्र अहवाल सादर करावा. )

| जिल्ह्याचे नाव/राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव | | | अहवाल दिनांक | |
|---|---|---|---|---|
| अनु-क्रमांक | वर्णन | दिवसभरात (यावर्षी) | दिवसभरात (मागील वर्षी) | खर्चावरील शेरा कोणताही असल्यास |
| १ | निर्मिती करणाऱ्याचा सुरूवातीचा एकत्रित लिटरमधील कोटा | | | |
| २ | एकत्रित लिटरमधील उत्पादन/बाटल्या | | | |
| ३ | निर्मिती करणाऱ्याच्या गोदामातून पाठवलेला एकत्रित लिटरमध्ये कोटा पाठवणे. | | | |
| ४ | निर्मिती करणाऱ्याकडील एकत्रित लिटरमधीलअखेरचा कोटा (१+२-३) | | | |
| ५ | घाऊक/साठवणूकदार यांना निर्मिती करणाऱ्याच्या गोदामातून एकत्रित लिटरमधील कोटा पाठवणे. | | | |
| ६ | किरकोळ विक्रेत्यांकडील सुरूवातीचा एकत्रित लिटरमध्ये कोटा | | | |
| ७ | किरकोळ विक्रेत्यांकडील एकत्रित लिटरमध्ये खरेदी | | | |
| ८ | किरकोळ विक्रेत्यांकडील एकत्रित लिटरमध्ये विक्री | | | |
| ९ | किरकोळ विक्रेत्यांकडील अखेरचा एकत्रित लिटरमध्ये कोटा (७+८-९) | | | |
| १० | इतरांकडील एकत्रित लिटरमधील विक्री | | | |
| ११ | तपासणी नाक्यांची संख्या | | | |
| १२ | तपासणी नाक्याद्वारे जप्त केलेल्या अनधिकृत दारूचे एकत्रित लिटरमध्ये परिमाण | | | |
| १३ | घातलेल्या छाप्यांची संख्या | | | |
| १४ | छाप्यादरम्यान पकडलेल्या अनधिकृत दारूचे एकत्रित लिटरमध्ये परिमाण | | | |
| १५ | दारुबंदी खटल्यांची संख्या | | | |
| १६ | अटक केलेल्या व्यक्तींची संख्या | | | |
| १७ | लादलेल्या दंडाची रक्कम | | | |

स्वाक्षरी,
मध्यस्थ नोडल अधिकारी
नाव :
पदनाम :

टीप :–

१. भारतीय बनावटीची विदेशी दारू, बीअर किंवा देशी दारू यासाठी स्वतंत्र अहवाल, उत्पादन शुल्क विभागाच्या जिल्हास्तर मध्यस्थ (नोडल अधिकाऱ्याकडून वरील नमुन्यात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या प्रतीसह, राज्यस्तर मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्याला द्यावयाचा आहे.

२. उत्पादन शुल्क विभागाचा राज्यस्तर मध्यस्थ (नोडल) अधिकारी संनियंत्रण व संकलन करेल आणि राज्याचा संयुक्त अहवाल त्याच नमुन्यात भारत निवडणूक आयोगाच्या प्रतीसह मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला सादर करेल.

**जोडपत्र बी- १३**



## लेखांकन गटांकडून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा दैनंदिन हिशेब ठेवण्याकरिता अभिरुप निरीक्षण नोंदवही

उमेदवाराचे नाव :

राजकीय पक्षाचे नाव, कोणतेही असल्यास :

उमेदवार निवडणूक लढवत असलेल्या मतदारसंघाचे नाव :

निकाल जाहीर झाल्याचा दिनांक :

निवडणूक प्रतिनिधीचे कोणताही असल्यास, नाव व पत्ता :

(नामनिर्देशनाच्या दिनांकापासून निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापर्यंत, दोन्हीही दिनांक समाविष्ट आहेत.)

| (१) | (२)* | (३) | | | | (४) | | | | (५) | | (६) | (७) | (८) | (९)** | (१०) | (११) शेरे कोणतेही असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु-क्रमांक (घटना निहाय) | व्हिडीओ संनिरीक्षण गट, व्हिडीओ अवलोकन गट,/लेखांकन गट/माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती यांनी निरीक्षण केल्याप्रमाणे खर्चाचा दिनांक व स्वरूप (मेळावे, सभा, प्रचार वाहने, अन्न, प्रचार साहित्य, जाहिराती/पेड न्यूज इत्यादि) | अधिसूचित दराप्रमाणे गणना केलेला खर्च (रुपयांमध्ये) | | | | स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या बाबींवर उमेदवाराने ठेवलेल्या दैनंदिन हिशेबाच्या नोंदवहीत त्याने घोषित केलेला खर्च (खर्च दर्शविला नसेल तर निरंक लिहावे) (रुपयामध्ये) | | | | न्यून विवरण (रुपयामध्ये) | | खर्च निरीक्षकाने उमेदवाराच्या खर्च नोंदवहीची तपासणी केल्याचा दिनांक | स्तंभ (५) मध्ये दर्शविलेल्या न्यून विवरणासंबंधात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नोटीस दिल्याचा दिनांक | उमेदवाराकडून उत्तर प्राप्त झाल्याचा दिनांक | उमेदवाराने, स्तंभ (५) मध्ये दर्शविलेले न्यून विवरण स्वीकारले आहे/अंशतः स्वीकारले आहे/नाकारले आहे किंवा नाही | जर उमेदवाराने न्यून विवरण स्वीकारले असेल/अंशतः स्वीकारले असेल तर दैनंदिन हिशेबाच्या नोंदवहीचा पृष्ठ क्रमांक व अनुक्रमांक नमूद करावा. | खर्चाच्या न्यून विवरणाचा मेळ घातला आहे किंवा नाही-होय किंवा नाही ? या उमेदवाराच्या उत्तरासंबंधात निवडणूक अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | | (अ) वर्णन | (ब) प्रशन | (क) दर/युनिट | (ड) एकूण | (ई) पृष्ठ क्रमांक व दिनांक | (फ) प्रमाण | (ग) दर/युनिट | (ह) एकूण | (ड) | ह) | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

दिनांक

लेखांकन गटाच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी :

अधिकाऱ्याचे नाव :

पदनाम :

उमेदवार/निवडणूक प्रतिनिधीची स्वाक्षरी

टीप :

* १. सीडीचा क्रमांक व व्हिडीओ न्यूशीटचा अनुक्रमांक यांसह तपशील द्यावेत.

**२. जर नाकारले असेल किंवा अंशतः स्वीकारले असेल तर अशा बाबतीतील जिल्हा खर्च संनियंत्रण समितीचा निर्णय जोडला पाहिजे.

**जोडपत्र बी-१४**

**सहायक खर्च निरीक्षकाचा दैनिक अहवाल—**

| | |
|---|---|
| मतदार संघाचा क्रमांक व नाव :—<br>दिनांक :— | |
| (अ) व्हिडीओ गट<br>(एक) व्हिडीओ गट जेथे पसरविलेले आहेत अशा जागांची व उमेदवारांच्या नावांची यादी | |
| (दोन) व्हिडीओ संनिरीक्षण गटाने क्युशीटसह सीडी सादर केली आहे का? | |
| (तीन) वाहनांची संख्या/व्याख्यानपीठाचा आकार/कट आऊटस इत्यादी सारख्या खर्चाच्या बाबींचा व्हिडीओ अवलोकन गटाने नोंद केली आहे किंवा नाही? | |
| (ब) लेखांकन गट :—<br>(एक) प्रत्येक उमेदवाराच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीमध्ये सर्व खर्चाची नोंद करण्यात आली आहे किंवा नाहीत गट | |
| (दोन) प्रत्येक उमेदवाराविषयीच्या पुराव्याची संचयिका अद्यावत ठेवली आहे का? | |
| (क) प्रसारमाध्यम नियंत्रण गट<br>(एक) वृत्तपत्रात छापलेल्या अथवा इलेक्ट्रानिक माध्यमावरी सर्व जाहिरातीवर गट लक्ष ठेऊन आहे किंवा नाही. | |
| (दोन) गट त्याचा अहवाल लेखांकन गटाला पाठवीत आहे किंवा कसे | |
| (तीन) एखादी पेड न्यूज निदर्शनास आली आहे किंवा कसे | |
| (ड) नियंत्रण कक्ष व कॉल सेंटर<br>(एक) प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या :—<br>(दोन) तक्रार तत्परतेने संबंधित अधिकाऱ्याकडे अग्रेषित करण्यात आली आहे किंवा नाही?<br>(तीन) त्यावर कारवाई करण्यात आली आहे का? तसे असल्यास कारवाईचा प्रकार व त्यावरील निर्णय नमूद करावा. | |
| (ई) भरारी पथक व संनिरीक्षण गट<br>(एक) भरारी पथकाकडे सादर केलेली प्रकरणे :—<br>(दोन) पथकाने केलेली कारवाई :—<br>(तीन) मांडलेल्या तपासणी चौक्यांची संख्या :—<br>(चार) जप्ती, असेल तर :— | |

स्वाक्षरी,

दिनांक :

सहायक खर्च निरीक्षकाचे नाव.

**जोडपत्र बी १५**

## व्हिडिओ संनिरीक्षण गटांकरिता निर्धारक प्रपत्र (क्युशीट)

## (व्हिडिओ ध्वनिचित्रमुद्रणाच्या वेळी भरावयाचे)

जिल्ह्याचे नाव :–

व्हिडिओ संनियंत्रण गटाच्या प्रभारी अधिकाऱ्याचे नाव :–

व्हिडिओग्राफरचे नाव :–

दिनांक :–

सीडी क्रमांक :–

| अनु-क्रमांक | मतदारसंघाचे नाव व क्रमांक | उमेदवाराचे नाव | ठिकाण | प्रसंग | ध्वनिचित्र मुद्रण सुरू झालेल्या दिवसाची वेळ | ध्वनिचित्र मुद्रण सुरू झालेल्या सीडीवरील वेळ | सीडीवरील ध्वनिमुद्रण संपलेली वेळ | ध्वनिचित्र मुद्रणाचा कालावधी | ध्वनिचित्रमुद्रीत केलेल्या पुराव्याचे संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

व्हिडिओ संनिरीक्षण गटाच्या प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

**जोडपत्र-बी १६**

**मुद्रित/इलेक्ट्रॉनिक माध्यमांकडे आलेल्या जाहिराती/पैसे देऊन प्रसारित केलेल्या बातम्यांचा तपशील**

राज्याचे नाव :

जिल्ह्याचे नाव :

मतदारसंघाचा क्रमांक व नाव :

उमेदवाराचे नाव :

राजकीय पक्ष :

**१. मुद्रण माध्यमामध्ये प्रकाशित केलेल्या जाहिरातींचा तपशील**

| अनु-क्रमांक | वृत्तपत्र/मासपत्रिका याचे नाव | जाहिरातीचा आकार (स्तंभ १० मध्ये दिल्याप्रमाणे) | अंदाजे खप (माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून मिळालेली माहिती) | जाहिरातींचा खर्च |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**२. मुद्रण माध्यमामधील पैसे देऊन छापून आणलेल्या बातम्यांचा तपशील**

| अनु-क्रमांक | वृत्तपत्र/मासपत्रिका याचे नाव | पैसे देऊन छापून आणलेल्या बातम्यांचा आकार (स्तंभ १० मध्ये सेंटीमीटर मध्ये दिल्याप्रमाणे) | अंदाजे खप (माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून मिळालेली माहिती) | जाहिरातींचा खर्च |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**३. केबल टिव्ही सहीत दूरचित्रवाणीवरील जाहिरातींचा तपशील**

| अनु-क्रमांक | वाहिनीचे नाव | दिनांक व वेळ | जाहिरातींचा कालावधी (मिनिटांमध्ये) | प्रेक्षकांची अंदाजे संख्या, (माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून मिळालेली माहिती) | जाहिरातींचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**४. केबल टिव्ही सहीत दूरचित्रवाणीवरील संशयास्पद बातम्यांचा तपशील**

| अनु-क्रमांक | वाहिनीचे नाव | दिनांक व वेळ | पैसे देऊन प्रसारित केलेल्या बातम्यांचा (पेड न्यूज) कालावधी (मिनिटांमध्ये) | प्रेक्षकांची अंदाजे संख्या, (माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून मिळालेली माहिती) | बातम्यांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**५. रेडिओवरील जाहिरातींचा तपशील–**

| अनु-क्रमांक | वाहिनीचे नाव | दिनांक व वेळ | जाहिरातीचा कालावधी (मिनिटांमध्ये) | श्रोत्यांची अंदाजे संख्या, माहिती व जनसंपर्क संचालनालया कडून मिळालेली माहिती | जाहिरातींचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**६. रेडिओवरील पैसे देऊन प्रक्षेपित केलेल्या (पेड न्यूज) बातम्यांचा तपशील–**

| अनु-क्रमांक | वाहिनीचे नाव | दिनांक व वेळ | बातम्यांचा (पेड न्यूज) कालावधी (मिनिटांमध्ये) | श्रोत्यांची अंदाजे संख्या, माहिती व जनसंपर्क संचालनालया कडून मिळालेली माहिती | बातम्यांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

माध्यम प्रमाणन व नियंत्रण समितीच्या
प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

दिनांक : ........................................

अधिकाऱ्याचे नाव : ................................

पदनाम : ..............................................

**जोडपत्र-बी १७**

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा सूचना केंद्राच्या माहितीनुसार केलेल्या दैनंदिन कार्यवाही अहवाल

दिनांक :

मतदारसंघ :

| अ.क्र. | तक्रारीचे स्वरुप | कोणत्याही मार्गाने म्हणजेच फोन/फॅक्स/वि-पत्र (ई-मेल)/ लघुसंदेश (एसएमएस)/ विशेष संदेशवाहकाकडून प्राप्त झालेल्या तक्रारी/ माहितीची वेळ | त्यावर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर वृत्तांत | लेखांकन गटाकडे अग्रेषीत केला आहे किंवा कसे |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वाक्षरी, नाव व पदनाम दिनांकासह)

**जोडपत्र –बी १८**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/अनुदेश/२०१४/ईईपीएस/ खंड एक, दिनांक ७ एप्रिल २०१४.

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय.–** निवडणुकीमध्ये नियुक्त केलेल्या खर्च संनियंत्रण चमूंच्या कार्यकालासंबंधात स्पष्टीकरण करणेबाबत.

महोदय,

मुख्य निवडणूक अधिकारी, दिल्ली यांनी निवडणूक खर्च संनियंत्रणामध्ये कार्यरत असणाऱ्या विविध नियुक्त चमूंच्या कार्यकालाबाबत स्पष्टीकरण मागितले होते आणि पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्याचे मला निर्देश आहेत :

(एक) सहायक खर्च निरीक्षक भरारी पथक, स्थिर संनियंत्रण चमू, व्हिडिओ पाहणारा चमू, व्हिडिओ संनियंत्रण चमू आणि लेखांकन चमू केवळ मतदानाच्या/ पुनर्मतदानाच्या दिनांकापर्यंत त्यांचे कर्तव्य बजावणे सुरू ठेवतील.

(दोन) तथापि, सहायक खर्च निरीक्षक आणि लेखांकन चमू मतमोजणीच्या दिवसाच्या एक दिवस अगोदर आणि निवडणुकीचा निकाल घोषित झाल्यानंतरच्या २५ व्या आणि ३७ व्या दिवशी पुन्हा उमेदवारांना किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना निवडणूक खर्चाचा लेखा सादर करण्याबाबत प्रशिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना छाननी अहवाल आणि खर्च निरीक्षकांचा अहवाल तयार करण्यामध्ये सहाय्य करण्यासाठी पुन्हा कर्तव्यावर हजर होतील. लेखांकन चमूला निकाल घोषित झाल्यानंतरच्या ३७ व्या दिवशी अंतिमतः कार्यमुक्त करण्यात येईल.

(तीन) ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी
(एस. के. रुडोला)
प्रधान सचिव.

**जोडपत्र –बी १९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/अनुदेश/२०१६/ईईपीएस/ दोन खंड, दिनांक २२ मार्च २०१६.

प्रति,

सर्व खर्च निरीक्षक,

**विषय.–** आसाम, केरळ, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालच्या सर्वसाधारण विधानसभा निवडणुका -२०१६ - खर्च निरीक्षक आणि माहितीची देवाणघेवाण व समन्वय साधणे आणि सर्व संबंधित निवडणूक खर्च संनियंत्रण अंमलबजावणी करणारी अभिकरणे यासंबंधी.

महोदय,

मी असे निदेश देत आहे की, निवडणूक प्रक्रियेदरम्यान व्यय निरीक्षक आणि सर्व अंमलबजावणी अभिकरणे यांच्यामध्ये संबंधित माहितीची देवाण घेवाण व समन्वय यासंबंधीच्या निवडणूक खर्च संनियंत्रण (जुलै, २०१५) मधील अनुदेश सारसंग्रहातील " व्यय निरीक्षकाची भूमिका " शीर्षाखाली परिच्छेद क्रमांक ४.२.८ कडे मी आपले लक्ष वेधित करतो.

२. अशा काही घटना आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत की, व्यय निरीक्षकाने अंमलबजावणीच्या कार्यवाहीत प्रत्यक्ष सहभागी होऊन त्याने त्याच्या संक्षिप्त टाचणाहून ते अधिक असल्याचे भासविले आहे.

म्हणून, आयोगाने सारसंग्रहाच्या उपरोक्त परिच्छेदात अंतर्भूत मार्गदर्शन सूचनांचे सर्व व्यय निरीक्षकांनी कडकपणे पालन केलेच पाहिजे आणि त्यांच्या विद्यमान कायद्यांनुसार इतर अंमलबजावणी अभिकरणाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीत स्वतःहून प्रतिकार केला पाहिजे. याचा पुनरुच्चार केला आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी

(एस. के. रुडोला)

प्रधान सचिव.

प्रत रवाना.– मुख्य निवडणूक अधिकारी, आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि पुदुच्चेरी यांनी व राज्यातील सर्व निवडणूक व्यय संनियंत्रणाचे नोडल अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात (कॅम्प बॅग/ई-मेल द्वारे).

स्वाक्षरी

(एस. के. रुडोला)

प्रधान सचिव.

**जोडपत्र -बी २०**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११०००१

क्रमांक ७६/ अनुदेश /२०१९/ ईईपीएस/खंड पंधरा                    दिनांक : २२ मार्च, २०१९

प्रति,

सर्व राज्ये / संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय :** निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या संबंधातील पुर्वसज्जतेबाबत

महोदया/महोदय,

"निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह (फेब्रुवारी २०१९)" याकडे आपले लक्ष वेधण्याचे आणि पुढील गोष्टींचा पुनरूच्चार करण्याचे मला निर्देश आहेत :-

१. भरारी पथके निवडणुका घोषित झाल्याच्या दिनांकापासून कार्यरत होतील आणि आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या, राजकीय पक्ष व उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या सर्व तक्रारी, धाकदपटशा, समाज-विरोधी तत्त्वांची हालचाल, दारू, शस्त्रास्त्रे आणि मोठ्या प्रमाणातील रोख रक्कम इत्यादींच्या तक्रारींमध्ये लक्ष घालतील आणि दिनांक २९ मे, २०१५ च्या मानक संचालन कार्यपद्धतीनुसार (प्रत जोडली आहे) सर्व मोठ्या मिरवणुका, सार्वजनिक सभा आणि इतर खर्चाचा आलेख पाहिल.

२. स्थिर संनियंत्रण चमू अधिसूचनेच्या दिनांकापासून कार्यरत होतील आणि दिनांक २९ मे, २०१५ च्या मानक संचालन कार्यपद्धतीनुसार तपासणी नाके सुरू करतील.

३. व्हिडिओ संनियंत्रण चमू आणि व्हिडिओ पाहणारे चमू निवडणुकीच्या घोषणेच्या दिनांकापासून कार्यरत होतील आणि अनुदेशांनुसार पक्षाच्या तसेच उमेदवारांच्या सर्व मोठ्या राजकीय मिरवणुकांचे व्हिडिओ चित्रिकरण करतील.

४. (एक) लेखांकन चमू घोषणेच्या दिनांकापासून राजकीय पक्षांच्या खर्चाचे लेखांकन करण्याच्या प्रयोजनार्थ कार्यरत होतील आणि नामनिर्देशने दाखल झाल्यानंतर चमूंद्वारे अनुदेशानुसार उमेदवारांचे लेखे ठेवण्यात येतील.

(दोन) विधानसभा निवडणुकांच्या प्रकरणी प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये एक लेखांकन चमू कार्यरत असेल आणि प्रत्येक उमेदवारासाठी अभिरूप निरीक्षण नोंदवही आणि पुराव्यांची संचिका ठेवील.

(तीन) लोकसभा निवडणुकांच्या प्रकरणी, प्रत्येक विधानसभा गटासाठी सहायक खर्च निरीक्षक आणि चमू प्रत्येक उमेदवारासाठी स्वतंत्र अभिरूप निरीक्षण नोंदवही आणि पुराव्यांची संचिका ठेवील आणि त्यांचे अहवाल जेथे निवडणूक निर्णय अधिकारी स्थित आहेत त्या विधानसभा गटाच्या सहायक खर्च निरीक्षकास (मुख्यालय स्थित सहायक खर्च निरीक्षकास) सादर करील. मुख्यालय स्थित सहायक खर्च निरीक्षक आणि त्याचा चमू विधानसभा गटाच्या अन्य सर्व सहायक खर्च निरीक्षकांशी समन्वय साधील आणि निरीक्षणाच्या वेळी हे लेखे संकलित केल्याची खातरजमा करील. सहायक खर्च निरीक्षक अधिसूचनेच्या दिनांकापासून कार्यरत होईल.

५. माध्यम प्रमाणन संनियंत्रण समिती, अनुदेशानुसार घोषणेच्या दिनांकापासून तात्काळ कार्यरत होईल.

६. दारू संनियंत्रण उपाययोजना निवडणुकांच्या घोषणेच्या दिनांकापासून अनुदेशानुसार हाती घेण्यात येतील आणि घोषणेच्या दिनांकापासून त्याचा अहवाल सादर करण्यात येईल.

७. हवाई गुप्तवार्ता युनिट्स आणि आयकर विभागाचा स्वतंत्र तक्रार संनियंत्रण कक्ष घोषणेच्या दिनांकापासून कार्य करणे सुरू करील.

२. मला यापुढे देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी अशी आपणास विनंती आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरित /-

**अविनाश कुमार,**
सचिव.

सहपत्र- वरिलप्रमाणे

**जोडपत्र -बी २१**

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११०००१

क्रमांक ७६/भानिआ/अनुदेश/कार्य/ईईएम ईईपीएस/२०१९/खंड पाच                दिनांक : २२ एप्रिल, २०१९

प्रति,

सर्व राज्ये / संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय :** लोकसभा आणि आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओदीशा व सिक्कीम विधानसभांच्या सर्वसाधारण निवडणुका- २०१९- भरारी पथक आणि स्थिर संनियंत्रण चमू तैनात करण्याबाबत.

महोदया/महोदय,

आयोगाची मानक संचालन कार्यपद्धती क्रमांक ७६ / अनुदेश/ ईईपीएस/२०१५/ खंड दोन, दिनांक, २९ मे, २०१५ [ "निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह ( फेब्रुवारी २०१९ ) " यामधील जोडपत्र जी ७] याचा संदर्भ देण्याचे आणि पुढीलप्रमाणे निवेदन करण्याचे मला निर्देश आहेत. मतदान होऊन गेलेल्या राज्ये/संघ राज्यक्षेत्रांमध्ये आणि जेथे मतदानाचे वेळापत्रक हे टप्प्यांमध्ये आहे त्या राज्ये/संघ राज्यक्षेत्रांमध्ये तैनात केलेली भरारी पथके आणि स्थिर संनियंत्रण चमू पुढीलप्रमाणे तशीच तैनात ठेवली पाहिजेत :–

**प्रकरण – एक** : जेथे मतदान संपलेले आहे अशा राज्ये/संघ राज्यक्षेत्रांच्या प्रकरणी व्युहरचनात्मक ठिकाणांवर आणि शेजारील राज्ये/संघ राज्यक्षेत्रांशी सामायिक सीमा असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये भरारी पथके आणि स्थिर संनियंत्रण चमू कार्यरत ठेवली पाहिजेत.

**प्रकरण – दोन** : जेथे निवडणूकीचे वेळापत्रक टप्प्यांमध्ये आहे अशा राज्यांच्या प्रकरणी, भरारी पथके पुढीलप्रमाणे कार्यरत ठेवली पाहिजेत :-

(एक) जेथे मतदान संपले आहे त्या लोकसभा मतदारसंघाच्या प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये, संपूर्ण राज्यातील निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत एक भरारी पथक तैनात असणे सुरू ठेवावे; आणि

(दोन) दिनांक २९ मे, २०१५ च्या मानक प्रचालन प्रक्रियेनुसार, जेथे मतदान अनेक टप्प्यांमध्ये होणार आहे अशा संपूर्ण जिल्ह्यामध्ये, संपूर्ण जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया संपेपर्यंत भरारी पथके/स्थिर संनियंत्रण चमू पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवावीत.

२. वरील सूचना सर्व संबंधित जिल्हा प्राधिकारी, राजकीय पक्ष, उमेदवार व सामान्य जनतेच्या निदर्शनास आणून द्यावी अशी आपणास विनंती आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरित /-
**राजन जैन,**
अवर सचिव.

**जोडपत्र -बी २२**

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११०००१

क्र. ६१/तक्रारी/सनि-लोस/२०१९/ ईईपीएस/खंड पंधरा    दिनांक : १७ मे २०१९

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय :** लोकसभा आणि आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओदीशा व सिक्कीम विधानसभांच्या सर्वसाधारण निवडणुका-२०१९- विदेशी चलनाच्या जप्तीबाबत.

महोदया/महोदय,

मला असे निवेदन करण्याचे निर्देश आहेत की, लोकसभा आणि आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओदीशा व सिक्कीम विधानसभांच्या सर्वसाधारण निवडणुका - २०१९ मध्ये विविध स्त्रोतांमधून विदेशी चलनांच्या जप्ती बाबत आयोगास माहिती प्राप्त झाली आहे. या संबंधात मला असे निवेदन करण्याचे निर्देश आहेत की, आयोगाची मानक संचालन कार्यपद्धती क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस/२०१५/खंड दोन, दिनांक, २९ मे २०१५ [ "निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह (फेब्रुवारी २०१९ ) " यामधील जोडपत्र ग ७] च्या अनुपालनास्तव तैनात/स्थापित करण्यात आलेल्या भरारी पथक/स्थिर संनियंत्रण चमू/पोलीस प्राधिकारी/मुक्तता समितीस अडवून धरलेल्या/जप्त केलेल्या विदेशी चलनाचा कोणत्याही उमेदवाराशी किंवा त्याच्या/तिच्या प्रतिनिधीशी किंवा पक्ष कार्यकर्त्याशी किंवा राजकीय पक्षाशी संबंध नसल्याचे आढळून आल्यास अशी माहिती, संबंधित अधिनियमांन्वये आवश्यक त्या कार्यवाहीस्तव, महसूल गुप्तवार्ता संचालनालयातील संबंधित मध्यस्थ अधिकाऱ्यास व अंमलबजावणी संचालनालयास द्यावी. मध्यस्थ अधिकाऱ्यांची नावे समाविष्ट असलेले महसूल गुप्तवार्ता संचालनालयाचे दिनांक १३ मार्च २०१६ चे पत्र आणि अंमबजावणी संचालनालयाचे दिनांक १८ मार्च २०१९ चे पत्र यांच्या प्रती तात्काळ संदर्भासाठी सोबत जोडल्या आहेत.

आपला विश्वासू,

स्वाक्षरित /-
**राजन जैन,**
अवर सचिव.

**प्रत :-**

१. प्रधान महासंचालक, महसूल गुप्तवार्ता संचालनालय, ७ वा मजला, ‘डी’ ब्लॉक, ड्रम आकाराची ईमारत, आय. पी. इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२, महसूल गुप्तवार्ता संचालनालयाच्या मध्यस्थ अधिकाऱ्यांना यानुसार माहिती देण्यात यावी या विनंतीसह. (विशेष संदेशवाहकाद्वारे)

२. संचालक, अंमलबजावणी संचालनालय, ६ वा मजला, लोक नायक भवन, खान मार्केट, नवी दिल्ली ११० ००३, अंमलबजावणी संचालनालयाच्या मध्यस्थ अधिकाऱ्यांना यानुसार माहिती देण्यात यावी या विनंतीसह. (विशेष संदेशवाहकाद्वारे)

स्वाक्षरित /-
**राजन जैन,**
अवर सचिव.

# क

# निवडणूक निर्णय अधिकारी
# जिल्हा निवडणूक अधिकारी
# आणि
# मुख्य निवडणूक अधिकारी
# यांची खर्च संनियंत्रणातील भूमिका

# भाग ‘क’ अनुक्रमणिका



| अनुक्रमांक | अनुक्रमणिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची भूमिका | ७५ |
| २ | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची भूमिका | ७७ |
| ३ | मुख्य निवडणूक अधिकाऱ्याची भूमिका | ८१ |

निवडणूका घेणे, विशेषतः लोकसभेच्या निवडणुका आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका घेणे / हे एक प्रचंड मोठे कार्य असून यासाठी सांघिक कार्याची आवश्यकता आहे. भारत निवडणूक आयोगाचे सर्वांगीण अधीक्षण, निर्देशन आणि नियंत्रण यांच्या अधीन राहून, राज्य पातळीवर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे आणि जिल्हा पातळीवर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे निवडणूक घेण्याबाबतचे पर्यवेक्षण केले जाते. संसदीय /विधानसभा मतदारसंघ पातळीवर निवडणूक निर्णय अधिकारी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचा एकूणच प्रभारी असेल. निवडणूक खर्च सनियंत्रणाशी संबंधित या अधिकाऱ्यांची मुख्य कार्ये पुढीलप्रमाणे आहेत :–

**१. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची भूमिका (आर ओ ) :**

निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक चिन्हांचे वाटपाच्या लगतनंतर खर्च संनियंत्रण प्रक्रिया, निवडणूक खर्चाशी संबंधित कायदेशीर तरतुदी आणि या तरतुदींचे अनुपालन न करण्याचे परिणाम यांचे स्पष्टीकरण देण्यासाठी सर्व उमेदवारांची एक बैठक आयोजित करील. तो, नियम किंवा कायद्यांन्वये आवश्यक असलेले जाहीर सभा / वाहने इत्यादींसाठीचे अनुमती पत्रे देखील उमेदवारांना तत्परतेने देईल. उमेदवारांकडून फौजदारी अभिलेख आणि मत्ता व दायित्व विवरणपत्र भरून घेण्यासाठी सर्व संभाव्य उमेदवारांना, प्रतिज्ञापत्राचा सुधारित एकत्रित नमूना ( नमूना २६ ) उपलब्ध करून देण्यात आला आहे याची खातरजमा निवडणूक निर्णय अधिकारी करील. तो उमेदवारांना नामनिर्देशन दाखल करतेवेळी रितसर स्वाक्षरी केलेली आणि पृष्ठ क्रमांक घातलेली खर्च नोंदवही देखील देईल.

तो, प्रचार कालावधी दरम्यान खर्च निरीक्षकाद्वारे लेख्यांचे निरीक्षण करण्याचे दिनांक सूचित करील आणि उमेदवारांच्या खर्च नोंदवहीमध्ये आणि अभिरूप निरीक्षण नोंदवहीमधील कोणत्याही विसंगतीबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी, खर्च निरीक्षकाच्या सल्ल्याप्रमाणे उमेदवारांना नोटीसा बजावील. तो तक्रार संनियंत्रण यंत्रणेचे पर्यवेक्षण देखील करील आणि प्रत्येक तक्रारीची ती प्राप्त झाल्यापासून २४ तासांच्या आत चौकशी होईल याबाबत खातरजमा करील.

या किंवा अन्य कोणत्याही अनुदेश, नियम किंवा कायद्याअन्वये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या सूचना फलकावर लावणे आवश्यक असलेले सर्व दस्तऐवज सूचना फलकावर लावण्यात आले आहेत याची खातरजमा करील. जनतेकडून मागणी करण्यात आल्यावर या दस्तऐवजांच्या प्रती विहित शुल्क भरल्यावर तात्काळ उपलब्ध करून देण्यात येत असल्याची तो खातरजमा करील.

मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांची मत्ता व दायित्वांची घोषणा करणारी प्रतिज्ञापत्रे त्याच दिवशी संकेतस्थळावर टाकण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. इतर उमेदवारांच्या संबंधातील प्रतिज्ञापत्रे नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यावर दुसऱ्या दिवशी संकेतस्थळावर टाकावी **(जोडपत्र – सी १६).** डिजीटल भारताच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्याच्या दृष्टीने आणि नामनिर्देशन पत्र व प्रतिज्ञापत्र (नमूना २६) यातील चुकांची व्याप्ती कमी करण्याच्या दृष्टीने, नामनिर्देशन नमून्यात वैयक्तिक तपशीलाच्या आधारसामग्रीची ऑनलाईन नोंद करण्यासाठी उमेदवारांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. उमेदवारांसाठी ही सुविधा आयोगाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून सुविधा पोर्टल वर *https://suvidha.eci.gov.in* उपलब्ध करून देण्यात येईल. उमेदवारास भ्रमणध्वनी क्रमांक व एक वेळचा संकेतांक (मोबाईल नंबर आणि ओटीपी) याच्या साहाय्याने नोंदणी करावी लागेल. ही सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना **जोडपत्र – २०** सह सोबत जोडल्या आहेत. सद्यस्थितीत ऑनलाईन आधारसामग्री नोंद करण्याची सुविधा इंग्रजी व हिंदी या भाषांमध्ये उपलब्ध आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षकाने सुचविल्याप्रमाणे कसूरदार उमेदवाराला नोटीसा देईल. भरारी पथके व स्थिर संनियंत्रण चमू तत्परतेने जप्ती केल्यानंतर प्राथमिक माहिती अहवाल / तक्रार दाखल करण्यात येते याची खात्री देखील त्याने केली पाहिजे.

निवडणूक निर्णय अधिकारी, चिन्हांचे नियतवाटप केल्यानंतर तात्काळ सर्व उमेदवारांची बैठक घेईल. या बैठकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीचा खर्च, त्याचे सनियंत्रण व त्याचे अनुपाल करण्यात कसूर केल्याचे परिणाम यासंबंधातील सर्व कायदेशीर तरतुदी व आयोगाचे अनुदेश याबद्दल स्पष्टीकरण करतील. निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक उमेदवाराला निवडणुकीच्या बाबींच्या खर्चाच्या दरांचे सारसंग्रह व अधिसूचना याची एक एक प्रत देतील. स्थानिक / राष्ट्रीय वृत्तपत्रे / मासिके (इंग्रजी / प्रादेशिक) यांमधील जाहिरातींसाठी जाहिरात व दृक प्रसिद्धी संचालनालय / माहिती व जनसंपर्क विभागांचे दर देखील उमेदवारांना कळविण्यात येतील. सहायक खर्च निरीक्षक किंवा खर्च निरीक्षक हे सुद्धा, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह बैठकीमध्ये उपस्थित असतील.

निवडणूक निर्णय अधिकारी, चिन्हांचे नियतवाटप झाल्यानंतर तात्काळ सर्व उमेदवारांची बैठक आयोजित करतील आणि निवडणूक खर्चाशी संबंधित असणाऱ्या कायदेशीर तरतुदी आणि कायद्याच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दलचे परिणाम यासंबंधात त्यांना योग्य स्पष्टीकरण देतील. सहायक खर्च निरीक्षक / खर्चाचे निरीक्षक हे, या बैठकीमध्ये उपस्थित असतील. निवडणूक निर्णय अधिकारी, इंग्रजी व मातृभाषा या दोन्ही भाषांमधील खर्चाचे संनियंत्रण या संबंधातील या अनुदेशांची प्रत देखील प्रत्येक उमेदवाराला देतील.

**लेख्याची तपासणी :-**

निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक किंवा या प्रयोजनासाठी खर्चाचे निरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पदनिर्देशित केलेला वरिष्ठ अधिकारी यांच्याद्वारे प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करण्यासाठी वेळापत्रक तयार करतील. उमेदवाराने प्रचार मोहिमेच्या कालावधीमध्ये किमान तीन वेळा तपासणी करण्यासाठी खर्चाचे निरीक्षक / पदनिर्देशित अधिकारी यांना सादर करण्यासाठी एकतर व्यक्तीशः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत किंवा त्याने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत नोंदवही सादर करणे आवश्यक आहे. दोन तपासण्यांमधील अंतर कमीत कमी तीन दिवस इतके असावे. या वेळापत्रकास, वृत्त माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल. सोईकरिता प्रत्येक उमेदवाराकरिता वेळेच्या सकाळी १० ते संध्याकाळी ५ या दरम्यान तपासणीची वेळ विनिर्दिष्ट करण्यात यावी. वेळ अशा पद्धतीने निश्चित करण्यात यावी की, ७.०० वाजण्यापूर्वी काम पूर्ण करण्यात यावे. तपासणी, एकतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात किंवा इतर कोणत्याही परिषद कक्षांत/कार्यालयाच्या कक्षात करण्यात यावी. अखेरची तपासणी, मतदानाच्या दिवसापासून ३ दिवस अगोदर निश्चित करण्यात येऊ नये (**जोडपत्र- सी १५**). निवडणूक प्रक्रियेमधील प्रत्येक तपासणीनंतर, उमेदवाराच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीच्या तारखेपर्यंत स्कॅन करण्यात येईल आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळाला (वेबसाईटला जोडलेल्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या पोर्टलवर माहिती अपलोड करावी, सी याशिवाय छायाप्रत सूचना फलकावर देखील प्रदर्शित करावी (**जोडपत्र -सी ८**).

जर उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने, या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या दिवशी तपासणीसाठी निवडणुकीच्या खर्चाची नोंदवही सादर केली नाही तर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे उमेदवाराला लेखी नोटीस देण्यात येईल आणि त्याला असे कळवील की, जर नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिवशी तपासणीसाठी नोंदवही सादर करण्यास त्याने कसूर केल्यास, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे निवडणुकीच्या खर्चाचा दैनंदिन हिशेब (लेखा) ठेवण्यात त्याने कसूर केली आहे असे गृहीत धरण्यात येईल. या नोटीशीला शक्य तितकी व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचना फलकावर तिची प्रत लावण्यात येईल. जर, नोटीस देऊन देखील, जर उमेदवाराने, तपासणीकरिता निवडणुकीच्या खर्चाची नोंदवही सादर करण्यात कसूर केली तर, भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ झ अन्वये सक्षम न्यायालयामध्ये तक्रार दाखल करण्यात येईल. याशिवाय, जर उमेदवाराने नोटीस बजाविल्याच्या दिवसापासून तीन दिवसानंतर नोंदवही सादर केली नाहीतर निवडणुकीमध्ये वाहनांचा वापर करण्यासाठी उमेदवाराला दिलेली परवानगी काढून घेण्यात यावी. वाहनांच्या वापर करण्यासाठी दिलेली परवानगी काढून घेण्यात आल्याबद्दलची सूचना सर्व संनिरीक्षण पथकांना व भरारी पथकांना कळविण्यात येईल आणि सूचना फलकावर लावण्यात येईल.

अशीही प्रसिद्धीला देण्यात यावी की, निवडणूक खर्चाची नोंदवही / लेखे यांची तपासणी करताना लोक उपस्थित राहू शकतील, आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रत्येक पृष्ठाला १ रुपये याप्रमाणे रक्कम प्रदान केल्यावर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची प्रत मिळविता येऊ शकेल. शक्यतोवर नोंदवहीची तपासणी केवळ खर्च निरीक्षक यांच्याकडूनच करण्यात यावी. काही अपरिहार्य कारणामुळे खर्च निरीक्षकाव्यतिरिक्त अन्य पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येत असेल तेव्हा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून अशा प्रत्येक तपासणीची फलनिष्पत्ती आणि अशा तपासणीची कारणे खर्च निरीक्षक यांना कळविण्यात येईल.

**प्रशिक्षण :**

(अ) जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक खर्चाचे लेखे सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी एक आठवड्याच्या आत, सर्व उमेदवार / निवडणूक प्रतिनिधी आणि लेखे प्राप्त करून घेण्यासाठी कामावर लावलेले मनुष्यबळ यांच्यासाठी एक दिवसाच्या सुलभीकरण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करील.

(ब) लेखे सादर करण्याची, भरावयाचे नमूने व प्रतिज्ञापत्रे भरण्याची कार्यपद्धती आणि वारंवार निदर्शनास आलेल्या त्रुटींचे स्पष्टीकरण करण्यासाठी, खर्च संनियंत्रण कक्षाचा मध्यस्थ अधिकारी आणि सहायक खर्च निरीक्षक यांना प्रशिक्षण कार्यक्रमांशी जोडून घ्यावे. नमूने न भरणे किंवा अपूर्ण नमूने भरणे किंवा विहित केलेल्या पद्धतीने न भरणे किंवा अचूक लेखे न दर्शवणे याच्या उत्तरवर्ती परिणामांचे स्पष्टीकरण सुद्धा उमेदवार/ प्रतिनिधींसमोर करावे.

(क) या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये त्यांना लेख्याचा पुनर्मेळ घालण्याच्या बैठकीबद्दल देखील कळविण्यात यावे, या बैठकीत ते सर्व अंतिम लेखे व नोंदवह्या तयारीनिशी घेऊन येतील.

(ड) जिल्हा निवडणूक अधिकारी, निकाल घोषित झाल्याच्या दिवशी किंवा त्या तारखेनुसार, अंतिम लेखे दाखल करण्याच्या कार्यपद्धतीवर घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा दिनांक आणि स्थळ याबाबत आणि लेख्यांचा पुनर्मेळ घालण्याच्या बैठकीच्या दिनांकाबाबत देखील सकारात्मकपणे सूचना देईल.

## २. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची भूमिका :

जिल्हा निवडणूक अधिकारी, आयोगाने निवडणुकांची घोषणा केल्यानंतर ३ दिवसांच्या आत सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य स्तरावरील राजकीय पक्षांची एक बैठक आयोजित करील. या बैठकीमध्ये, जिल्हा निवडणूक अधिकारी निवडणूक खर्चाशी व त्याच्या संनियंत्रणाशी संबंधित सर्व कायदेशीर तरतुदी आणि आयोगाचे अनुदेश याबाबत आणि त्यांचे अनुपालन करण्यात अपयश आल्यास होणारे परिणाम याबाबत स्पष्टीकरण करील. जिल्हा निवडणूक अधिकारी अनुदेशांच्या या सारसंग्रहाची, मत्ता व दायित्वे घोषित करण्यासाठीच्या प्रतिज्ञापत्राच्या सुधारित नमुन्याची (नमूना २६ ) आणि निवडणूक खर्चातील बाबींच्या दरांची एक प्रत देखील प्रत्येक राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील पक्षाच्या प्रतिनिधीला देईल.

निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ या मधील नियम ८९ अन्वये, जिल्हा निवडणूक अधिकारी, उमेदवाराने निवडणूक खर्चाचा लेखा अहवाल सादर केला आहे किंवा कसे याबाबत त्यांच्या मते असे लेखे अधिनियम व नियमाद्वारे आवश्यक केलेल्या वेळेत व योग्य रितीने सादर केले आहेत किंवा कसे याबाबत याचा अहवाल आयोगाला देईल. आणि जिल्हा निवडणूक अधिकारी निकाल घोषित होण्याच्या दिनांकापासून ३७ व्या दिवशी विहित नमुन्यामधील **(जोडपत्र – सी १३)** उमेदवार संक्षिप्त व छाननी अहवालास अंतिम रूप देईल आणि ३८ व्या दिवशी **(जोडपत्र– सी १२)** मध्ये ते मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात पाठवील. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना छाननी अहवाल पाठविण्यापूर्वी तो उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यासंबंधी छाननी अहवाल आणि संक्षिप्त अहवालाची तयारी करण्यासाठी घालून देण्यात आलेल्या कार्यपद्धतीसंबंधातील आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश ईईपीएस/२०१५/खंड दोन, दिनांक २९ मे २०१५ **(जोडपत्र – सी १०)** आणि पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस/२०१५/खंड चौदा, दिनांक २ जुलै २०१६ **(जोडपत्र – सी १२)** याच्या आदेशाचे पालन करील. निवडणूक प्रक्रियेदरम्यान सांगितल्यापेक्षा बाबी कमी केल्याच्या संबंधात उमेदवाराला कोणतीही सूचना देण्यात आलेली नसेल तर, निकालाच्या घोषणेच्या १५ दिवसात जिल्हा निवडणूक अधिकारी उमेदवाराचे उत्तर मिळविण्यासाठी पत्र निर्गमित करील. पहिल्या लेखा मेळ बैठकीत पत्र/उत्तर हे दोन्हीही विचारात घेतले जातील आणि नंतर जिल्हा खर्च संनियंत्रण समिती (डीईएमसी) ने नोंदविलेल्या मतांसह भारत निवडणूक आयोगाला कळविण्यात येईल.

उमेदवाराकडून अंतिम लेखे प्राप्त झाल्यानंतर, त्याची जिल्हा खर्च संनियंत्रण समिती कडून (डीईएमसी) छाननी करण्यात येईल. उमेदवाराकडून लेखे सादर करताना त्यात प्रक्रियात्मक उणिवा, जसे की (एक) प्रमाणकावर स्वाक्षरी नसणे, (दोन) यथोचितरित्या शपथेवर वचनबद्ध केलेले शपथपत्र दाखल केलेले नसणे, (तीन) दैनंदिन लेख्यांची नोंदवही बँक नोंदवही आणि रोख नोंदवहीसह, यांवर यथोचितरित्या स्वाक्षरी केलेली नसणे, (चार) संक्षिप्त विवरण (भाग एक ते भाग चार आणि अनुसूची १ ते ११) भरलेले नसणे/त्यावर यथोचित स्वाक्षरी नसणे, (पाच) रुपये १०,००० हून अधिक खर्च धनादेशामार्फत केलेला नसेल, **(जोडपत्र ई ११ ते ई १२)**, (सहा) बँकेच्या खातेबाह्य खर्च करणे, (सात) बँक लेख्याच्या विवरणाच्या स्वप्रमाणित प्रती सादर न करणे आणि (आठ) बँकेत खातेच मुळी सुरु केलेले नसणे, आढळल्यास जिल्हा निवडणूक अधिकारी लेखे मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत उणिवांची दुरुस्ती करण्यासाठी उमेदवाराला ३ दिवसाची नोटीस देईल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून उमेदवाराच्या उत्तराची तपासणी करण्यात येईल आणि तो उमेदवाराला पाठविलेली नोटीस व त्याचे उत्तर याची प्रत, कोणतीही असल्यास, त्यावर त्याच्या/तिच्या भाष्यासह, आयोगाकडे पाठवील.

लेखे भरण्यात नियत दिनांकापासून १५ दिवसांहून अधिक नसेल इतका विलंब झाल्यास, जिल्हा निवडणूक अधिकारी, स्वाधिकारे उमेदवारांस विलंबाचे स्पष्टीकरण मागविण्यासाठी नोटीस जारी करेल. उमेदवाराच्या उत्तराची जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून तपासणी केली जाईल व तो उमेदवाराला पाठविलेली नोटीस व त्याचे उत्तर कोणतेही असल्यास, ते त्याच्या भाष्यासह, आयोगाला पाठवील.

लेखा मेळ बैठकीनंतर देखील मतभेद चालू राहिले असतील आणि उमेदवाराने खर्च अचूकपणे सादर केलेला आहे हे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला मान्य नसेल, अशा प्रकरणामध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी, छाननी अहवालाला जिल्हा खर्च संनियंत्रण समितीची (डीईएमसी) / लेखा मेळ बैठकींची कार्यवृत्ते काढण्यात आलेल्या नोटिसा उमेदवाराकडून आलेले उत्तर, दरपत्रक, अभिरूप निरीक्षण नोंदवही, यथोचित अनुक्रमांक असलेल्या कागदपत्रांसह उमेदवाराच्या या संबंधित दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती जोडील.

खर्च निरीक्षक, त्यांच्या तिसऱ्या भेटी दरम्यान त्यांचा ४ था अंतिम अहवाल **(जोडपत्र - बी-५)** आणि एकसमयावेच्छेदेकरून "अभिरूप निरीक्षण नोंदवही" आणि "पुराव्यांची संचिका" यामध्ये नमूद केल्या वस्तुस्थितीवर आधारित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालामध्ये नमूद केलेल्या विहित जागेत तो त्याचे भाष्य करील आणि ते आयोगाकडे पाठवील, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालात **(जोडपत्र - सी-३)** तेच समाविष्ट असल्याची खात्री करील. जर जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अहवालात खर्च केलेल्या कोणत्याही बाबी विचारात घेतलेल्या नसल्या तर तो आयोगाच्या त्याच्या अहवालात ते समाविष्ट करण्यासंबंधी त्याला सांगण्याचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देईल आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या अहवालावर योग्य ते भाष्य करील.

निकालाची घोषणा झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उमेदरांकडून भरून घेतलेले लेख्यांचे संक्षिप्त विवरणपत्र स्कॅन करील आणि ते मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत संकेतस्थळावर टाकील. निवडणूक याचिका दाखल करण्यासाठी वेळेची मर्यादा ४५ दिवस असल्याने त्याचे कठोरपणे पालन करावे लागेल. जिल्हा निवडणूक अधिकारी, छाननी आणि संक्षिप्त अहवाल **(जोडपत्र- सी १७)** तयार केल्यापासून ३ दिवसांच्या आत, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल एन्कोर ( Encore) प्रणालीमध्ये समाविष्ट केल्याची सुनिश्चिती करील. जिल्हा निवडणूक अधिकारी, निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून ३७ दिवसांत / त्यापूर्वी त्यांचा छाननी व संक्षिप्त अहवाल अंतिम करील आणि प्राधान्याने ३८ व्या दिवशी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे पुढे पाठवील.

मागील काळात, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी हे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल तुकड्या-तुकड्यात पाठवत असल्याचे निदर्शनास आले आहे, त्यापरिणामी सदर अहवाल अंतिमतः निकाली काढण्यात विलंब होतो. आयोगाकडून लेख्यांची प्रकरणे वेळेत निकाली निघावीत यासाठी, आता जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे उमेदवारांच्या लेख्यांवरील छाननी अहवाल, मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावर वर्गीकृत करण्यात यावेत आणि पुढीलप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या नमून्यात आयोगास सादर करण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला आहे :–

अ. छाननी अहवाल सादर करणाऱ्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची एकूण संख्या.

ब. प्रतिस्पर्धी उमेदवारांची एकूण संख्या.

प्रवर्ग- १ : ज्यांच्या प्रकरणात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या छाननी अहवालात कोणतीही त्रुटी दर्शवलेली नाही असे उमेदवार.

प्रवर्ग - २ : ज्यांनी आपल्या निवडणूक खर्चाचे लेखे दाखल केलेले नाहीत असे उमेदवार.

प्रवर्ग - ३ : विहित वेळेच्या आत (म्हणजेच, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७८ अन्वये निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत) आपल्या निवडणूक खर्चाचे लेखे दाखल करण्यात अपयशी ठरलेले उमेदवार.

प्रवर्ग - ४ : कायद्यानुसार विहित करण्यात आलेल्या पद्धतीने म्हणजेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ व ७८ आणि निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ यामधील नियम ८६ - ९० अन्वये आपल्या निवडणूक खर्चाचे लेखे दाखल करण्यात अपयशी ठरलेले उमेदवार (प्रवर्ग २ व ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त).

प्रवर्ग - ५ : विहित वेळेच्या आत + कायद्यानुसार विहित करण्यात आलेल्या पद्धतीने म्हणजेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ व ७८ आणि निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ यामधील नियम ८६ - ९० अन्वये आपल्या निवडणूक खर्चाचे लेखे दाखल करण्यात अपयशी ठरलेले उमेदवार (प्रवर्ग २, ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त). **(जोडपत्र- सी १८).**

जिल्ह्यातील समग्र खर्च नियंत्रण यंत्रणा प्रभावीपणे राबविण्याची जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी खर्च संनियंत्रण कक्षाच्या विभिन्न चमूंद्वारे सहाय्य घेईल. जिल्हा निवडणूक अधिकारी त्यांची क्रिया पार पाडताना खर्च निरीक्षक आणि सहायक खर्च निरीक्षक यांचा धोरणात्मकरित्या समावेश करून त्यांची मदत घेईल. तसेच निवडणूक प्रक्रियेत पैशाचा वापर करून आणि हिंसाचार आणि इतर निवडणूक प्रक्रियेतील गुन्हे व गैरवर्तन यांच्यामुळे बाधा येऊ शकते. त्याने अशा क्षेत्रांकडे दुर्लक्ष करू नये. खरे तर, निवडणूक खर्चावरील प्रभावी नियंत्रणाची निष्पत्ती निवडणूक सुरळितपणे पार पाडण्यामध्ये होते. जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्व खर्च संनियंत्रण चमूंना धोरणात्मकरित्या पाठबळाची तरतूद करील.

जिल्हा निवडणूक अधिकारी राजकीय पक्षांसोबत बैठकीत अधिसूचनेपूर्वी निवडणुकीसंबंधित खर्चाच्या विभिन्न बाबींच्या दरांची चर्चा करील आणि त्यांची मते जाणून घेईल. शहरी आणि नागरी क्षेत्रासाठी विभिन्न दर असतील, सार्वत्रिक दरांचा विचार केला जाईल. त्याचप्रमाणे, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवाराद्वारे नियुक्त कार्यकर्ते किंवा मतदान प्रतिनिधी/मोजणी प्रतिनिधी यांच्या अल्पोपाहाराचा दर निश्चित करील. मुख्य निवडणूक अधिकारी उमेदवार/प्रमुख प्रचारक / इतर प्रतिष्ठित यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या मेळाव्यासाठी हेलिकॉप्टर/विमान जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे अधिसूचित केले जाईल अशा तासिका दराने प्राप्त करील.

पक्ष/उमेदवाराकडून मुख्य परिधानवस्त्रे जसे की, साडी, सदरा, टी-शर्ट, धोती, इत्यादींचा पुरवठा व वाटप करणे ही मतदारांना दिलेली लाच असल्याने तसे करण्यास परवानगी नाही **(जोडपत्र – डी ७).** म्हणून, अशा प्रकारच्या मुख्य वस्त्रप्रावरणांचा दर पत्रकांमध्ये समावेश करता कामा नये. **(जोडपत्र – सी १४)**

जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक खर्चाच्या बाबींचे दर, वर्तमानपत्रे, दूरचित्रपाणी आणि इतर प्रसारमाध्यमांची मानक दरपत्रके अधिसूचित करील. दर उपलब्ध नसतील तर जाहिरात व दृक प्रसिद्धी संचालनालय/माहिती व जनसंपर्क विभाग यांचे, स्थानिक/राष्ट्रीय दैनिकांमधील/नियतकालिकांमधील (इंग्रजी/प्रादेशिक) जाहिरातीचे दर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणुकीची घोषणा झाल्यापासून ३ दिवसांच्या आत करावी, त्या आधारावर निवडणूक खर्चाचे निर्धारण करण्यात येईल. या संबंधात आणखी संदर्भासाठी, आयोगाने आपले पत्र क्रमांक ७६/२००४/ जेएस दोन, दिनांक १३ मार्च २००४ यामध्ये (**जोडपत्र – सी ७**) दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे.

उमेदवार/राजकीय पक्ष निवडणूक प्रक्रिये दरम्यान मतदारसंघात किऑस्क, प्रचार कार्यालय इत्यादी उघडणे आणि अशा प्रकारचा खर्च जसे की, भाडे, वीज किंवा शामियाना उभारणे इत्यादी नामनिर्देशन दाखल केल्याच्या दिनांकानंतर उमेदवाराचा खात्यात समाविष्ट केला जातो. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने राजकीय पक्षांशी सल्लामसलत केल्यानंतर प्रचलित दरावर आधारित मतदारसंघात अशा प्रकारचे खोपटे, प्रचार कार्यालय इत्यादींची उभारणी/बांधकामाच्या काल्पनिक दराचा समावेश करणे देखील आवश्यक आहे (आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस/२०१५/खंड एकोणतीस दिनांक ३० डिसेंबर २०१४ **जोडपत्र – सी ९**).

तो, जिल्ह्यातील तक्रार संनियंत्रण करणाऱ्या नियंत्रण कक्षाच्या व कॉलसेंटरच्या योग्य कार्यासाठी जबाबदार असेल. तो आयकर विभागाच्या अंमलबजावणी संचालनालयाचे अधिकारी व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अन्य एजन्सीना, साहित्य व सेवा पुरविल. तो, खर्च संनियंत्रण कक्षामध्ये कामास असलेल्या सर्व अधिकाऱ्यांसाठी राहण्याची व भोजनाची, वाहनांची व सुरक्षेची व्यवस्था करील.

तो निकाल जाहीर झाल्यानंतर प्रत्येक उमेदवाराने सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या लेख्याच्या विवरणपत्राचीं खर्च संनियंत्रण कक्षाच्या मदतीने व खर्च निरीक्षकाच्या सहाय्याने व पाठिंब्याने छाननी करील आणि निवडणुकीचे निकाल जाहिर झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत **जोडपत्र – सी १३** प्रमाणे, विहित केलेल्या नमुन्यात मुख्य निवडणुक अधिकाऱ्यामार्फत आयोगाला अहवाल सादर करील.

जिल्हा निवडणूक अधिकारी जेव्हा लेखे सादर करण्यात आलेले नसतील किंवा ते सदोष असतील तेव्हा अशा प्रलंबित प्रकरणांचा मासिक अहवाल निवडणूक खर्चाच्या प्रकरणांचे सैनियंत्रण करण्यासाठी (**जोडपत्र – सी २**) मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात प्रत्येक महिन्याच्या २ तारखेला मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास पाठवील. मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या अहवालांचे संकलन करील आणि प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला आयोगास एकत्रित अहवाल पाठवील.

निवडणुकीची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून ते निकाल जाहोर होण्याच्या दिनांकापर्यंत सर्वसाधारण पक्षाच्या प्रचारातील राजकीय पक्षाच्या खर्चावर, भरारी पथकामार्फत (पथकांमार्फत) जिल्हा प्राधिकाऱ्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. पुराव्यासह अभिप्रायांची नोंद केली जाईपर्यंत सर्वसाधारण पक्षाच्या प्रचारावरील खर्च हा उमेदवाराच्या खर्चात मिळविला नसला तरी, हा खर्च, निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला विहित केलेल्या प्रपत्र (**जोडपत्र – सी १**) मध्ये कळविला पाहिजे, ही गोष्ट खर्च निरीक्षकाच्या सल्ल्याने करावी.

जर शेवटच्या क्षणी उमेदवार/राजकीय पक्षांकडून हेलिकॉप्टर बदलण्याची विनंती प्राप्त झाली, या प्रकरणात उमेदवारांना / राजकीय पक्षांना अगोदरच परवानगी दिली असेल तर, जिल्हा निवडणूक अधिकारी प्राथम्य क्रमाने कार्यवाही करेल, आणि संबंधित उमेदवार किंवा राजकीय पक्षांना अर्ज प्राप्त झाल्याच्या ३ तासांच्या आत निर्णय देईल **(जोडपत्र – सी ११).**

**खर्च संनियंत्रण समिती (डीईएमसी) (पहा जोडपत्र – सी –१०)**

(एक) जर जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूक निर्णय अधिकारी किंवा कोणताही प्राधिकृत अधिकारी, कोणत्याही उमेदवाराने, दिलेल्या माहितीच्या प्रतीमध्ये निवडणूक प्रक्रिये दरम्यान खर्च केला असेल किंवा विवक्षित खर्च प्राधिकृत केला असेल आणि, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१) अन्वये त्याच्याकडून ठेवल्या गेलेल्या निवडणूक खर्चाच्या दैनंदिन लेख्यामध्ये, त्याचा काही किंवा संपूर्ण भाग दाखवला नसेल, तर, किंवा प्राधिकृत अधिकारी किंवा निरीक्षक यांच्या समोर ठरविलेल्या वेळापत्रकाच्या दिनांकाला तपासणीसाठी उपरोक्त खाते दाखल केले नसेल तर, नंतर निवडणूक निर्णय अधिकारी माहितीच्या, प्रकरणपरत्वे, माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून किंवा दैनंदिन लेख्यात अचुकपणे किंवा सत्यपणाने न दर्शवलेल्या खर्चाचा तपशील नमूद असलेल्या लेख्याच्या तपासणीच्या दिनांकापासून किंवा तो उमेदवार त्याचे लेखे सादर करण्यात अपयशी ठरला आहे हे त्याला कळवल्याच्या दिनांकापासून २४ तासांच्या आत, प्राधान्याने अशा उमेदवाराला सोबत पुरावे जोडून नोटीस देईल. तथापि, “प्रदत्त बातमी (पेड न्यूज) " बाबतच्या संशयित प्रकरणात बाबत जेव्हा किंवा प्रसार माध्यम सनियंत्रण समिती (एमसीएमसी) च्या शिफारशी नुसार निवडणूक निर्णय अधिकारी नोटीस देईल तेव्हा त्या नोटीशीत अशा बाबींचा समावेश असणार नाही.

(दोन) अकृतिक किंवा दोषी म्हणून त्याच्या निदर्शनास आणून देण्यासाठी असा उमेदवार कारणांचे स्पष्टीकरण ४८ तासांच्या आत नोटीशीला उत्तर देईल. ज्या प्रकरणात उमेदवाराने नोटीशीत नमूद केलेल्या संशयित खर्चाची स्थिती स्वीकारली, तर त्या खर्चाची भर त्याच्या निवडणूक खर्चात घालण्यात येईल.

(तीन) जो उमेदवार त्याचे दैनंदिन लेखा तपासणीसाठी दाखल करण्यास कसूर करील आणि अशी नोटीस देऊनही कसूर चालू ठेवील, तेव्हा अशी नोटीस दिल्याच्या ४८ तासांनंतर भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ (एक) अन्वये प्राथमिक तपासणी अहवाल (एफआयआर) दाखल करावा आणि उमेदवाराद्वारे निवडणूक प्रचारासाठी वाहने, इत्यादी वापर करण्याची परवानगी काढून घेण्यात येईल.

(चार) उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने, नोटीस प्राप्त झाल्यापासून ४८ तासांच्या आत कोणतेही उत्तर दिले नसेल तर, उमेदवाराने नोटीशीत नमूद केलेली रक्कम दडविली आहे हे मान्य केले असल्याचे मानण्यात येईल आणि दडविलेल्या रकमेची, अशा उमेदवाराच्या निवडणूक खर्चात भर घालण्यात येईल.

(पाच) जर नोटिशीत नमूद केलेला, दडविलेला खर्च उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने अमान्य केला असेल तर तो, अशा अमान्यतेची कारणे नमूद करणारे उत्तर सादर करील आणि ते उत्तर पुढील बाबींचा समावेश करून जिल्हा खर्च संनियंत्रण समितीकडे पाठवण्यात येईल :–

१. मतदारसंघाचा प्रभारी खर्च निरीक्षक

२. जिल्हा निवडणूक अधिकारी

३. उप जिल्हा निवडणूक अधिकारी/जिल्ह्याच्या खर्च संनियंत्रणाचा प्रभारी अधिकारी,

(सहा) जिल्हा खर्च संनियंत्रण समिती ही, नोटिशीत नमूद केलेल्या पुराव्याची व उमेदवाराने नोटिशीला दिलेल्या उत्तराची तपासणी केल्यानंतर, शक्यतोवर उमेदवाराकडून उत्तर प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ७२ तासांच्या आत प्रकरणावर निर्णय घेईल. मग अशा दडविलेल्या खर्चाची, उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये भर घालण्यात आलेली असो किंवा नसो.

**जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल व त्यावरील भारत निवडणूक आयोगाच्या स्तरावरील कारवाई :**

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर आयोग, प्रत्येक अहवालाची तपास करील आणि प्रत्येक प्रकरणात काय कारवाई करणे गरजेचे आहे हे ठरवील. ही कारवाई खालीलपैकी कोणतीही एक कारवाई असू शकते :–

(अ) जर उमेदवाराने अधिनियम आणि नियमांमध्ये आवश्यक असलेल्या वेळेत व योग्य रीतीने लेखे सादर केलेले आहे असे आयोगास वाटले तर आयोग त्याचा स्वीकार करील.

(ब) जर उमेदवाराने त्याचे लेखे, अधिनियम व नियमांद्वारे आवश्यक असलेल्या वेळेत किंवा रीतीने लेखे सादर करण्यात कसूर केलेली आहे असे आयोगास वाटले तर, आयोग लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १० क अन्वये त्याला अपात्र का ठरवू नये अशी कारणे दाखवा नोटीस उमेदवारास देईल.

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून उमेदवारावर नोटीस बजावण्यात येईल, आणि नोटीस बजावण्यात आली आहे याचा पुरावा, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून आयोगास पाठविण्यात येईल, आयोग, उमेदवाराकडून कोणतेही असल्यास, प्राप्त झालेले उत्तर विचारात घेतल्यानंतर कायद्यानुसार योग्य आदेश संमत करील.

## ३. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याची भूमिका

मुख्य निवडणूक अधिकारी, निवडणुका घोषित झाल्यापासून तीन दिवसांच्या आत सर्व राजकीय पक्षांसोबत बैठक घेईल, आणि नवीन खर्च संनियंत्रण योजना स्पष्ट करील. तो निवडणूक खर्च संनियंत्रण यांवरील अनुदेशांचा सारसंग्रह याची इंग्रजी व स्थानिक भाषेतील प्रत देखील देईल.

मुख्य निवडणूक अधिकारी लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२७अ च्या तरतुदींचे स्पष्टीकरण करण्यासाठी आणि भारतीय निवडणूक आयोगाचे जाहिराती व " प्रदत्त बातमी (पेड न्यूज)" बाबतच्या अनुदेशांच्या स्पष्टीकरणासाठी सर्व राज्यस्तरीय माध्यम गृहांचे प्रतिनिधी व पत्रकार यांची बैठक घेतील. याच बैठकीत मुख्य निवडणूक अधिकारी निवडणूक खर्च अनुदेशांच्या सारसंग्रह प्रतींचे सर्वांना वितरण करतील.

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या छाननी व संक्षिप्त अहवालांचे मुख्य निवडणूक अधिकारी काळजीपूर्वक पाहणी करतील आणि जर त्यास/तिस वाटल्यास, काही अधिकच्या अभिप्रायांसहित तोच अहवाल निवडणूक निकाल घोषित झाल्यानंतर ४५ दिवसांच्या आत निवडणूक आयोगाला सादर करतील. **(जोडपत्र - सी १२)** असे निदर्शनास आले आहे की, निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ याच्या नियम ८९ मध्ये विहित केलेल्या वेळेच्या आराखड्याचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून पालन करण्यात येत नाही, त्याची निष्पत्ति लेखाविषयक प्रकरणे काढताना होणाऱ्या गैरवाजवी विलंबामध्ये होते. कर्नाटक उच्च न्यायालयाचे निरीक्षण लक्षात ठेऊन (१९९९ ची विनंती याचिका क्र. ४३५७ - गिनेज हितेपक्ष रंगास्वामी विरूद्ध मुख्य निवडणूक अधिकारी व इतर यातील कर्नाटक उच्च न्यायालयाचा दिनांक २६ जुलै १९९९ चा न्यायनिर्णय) ज्यात इतर गोष्टींबरोबरच असे म्हटले आहे की, कलम १० क अन्वये आदेश जारी करण्यात गैरवाजवी विलंब करता येणार नाही आणि तो वाजवी वेळेत जारी केला पाहिजे, आयोगाने निवडणूक खर्चाच्या लेख्यांशी संबंधित सर्व प्रकरणे निकाली काढण्याची एक वर्षाची कालमर्यादा निश्चित केली आहे **(जोडपत्र - सी १९).**

**मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर उमेदवाराचे निवडणूक खर्च विवरणपत्र टाकणे व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालाची एन्कोर (Encore) प्रणालीमध्ये नोंद करणे :**

सर्व उमेदवारांच्या संक्षिप्त विवरणपत्रांच्या ( भाग एक ते भाग चार आणि अनुसूची १ ते ११ ) स्कॅन प्रतीबरोबरच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून निर्गमित झालेल्या सर्व नोटीशींच्या प्रती, कोणत्याही असल्यास, आणि निवडणूक कालावधीत त्यांना मिळालेले प्रतिसाद, या माहितीचा जनतेमध्ये वेगाने प्रसार व्हावा यासाठी उमेदवाराकडून आलेल्या निवडणूक खर्च खात्याचा तपशील प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांच्या आत, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर सकारात्मकपणे टाकणे अत्यावश्यक आहे. या संबंधात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना, उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा तपशील प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांच्या आत " **(राज्याचे नाव) विधानसभेच्या सर्वसाधारण निवडणुका, २०.... – उमेदवारांचा निवडणूक खर्च**" या नावाच्या एकाच शीर्षकाखाली निवडणूक खर्चाच्या लेख्यांचा सारांश ( संक्षिप्त विवरण ) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर टाकावा, अशी सूचना जारी करावी. या बाबतीत कोणताही विलंब होणार नाही याची काटेकोर दक्षता घ्यावी. मतदार संघातील मतदानाच्या नियत दिनांकाच्या पुरेशा अगोदर याबाबतीतील पुर्वतयारी, जसे की, सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळाशी संलग्नता उपलब्ध करून देणे, पूर्ण करण्यात यावी.

प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या बाबतचा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल ऑनलाईन भरण्यासाठी आयोगाने एन्कोर ( Encore ) या नावाचे एक नवीन आधारसामग्री नोंद संकेतस्थळ ( डाटा एन्ट्री पोर्टल ) विकसित केले आहे. ऑनलाईन नमुन्यात समाविष्ट स्तंभ ( कॉलम ) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालाच्या कागदोपत्री नमुन्याप्रमाणेच असतील. https:// encore.eci.gov.in या दुव्यावर भेट देऊन आधारसामग्री नोंद संकेतस्थळावर जाता येईल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल अंतिम झाल्यानंतर ३ दिवसांच्या आत ऑनलाईन आधारसामग्री भरण्यात येईल याची खातरजमा करावी. **(जोडपत्र -सी १७)**

**जप्ती अहवालांचे संकलन**

निवडणुकीच्या काळात झालेल्या जप्तींशी संबंधित अहवाल योग्य आणि अचूक बनविले आहेत याची खातरजमा करून घेण्यासाठी, मुख्य निवडणूक अधिकारी आवश्यकतेनुसार पोलीस दलातील मध्यस्थ अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व आयकर विभागाचे महासंचालक ( अन्वेषण ) इत्यादींची मते जाणून घेतील आणि त्यानंतर, जप्तीचे तपशील विहित नमुन्यात **(जोडपत्र- सी ३)** संकलीत करतील **आणि ते मतदानाच्या दिवशी आयोगाकडे सादर करतील.** त्याचवेळी, पोलीस दलातील मध्यस्थ अधिकारी, उत्पादन शुल्क विभागातील मध्यस्थ अधिकारी आणि आयकर विभागातील मध्यस्थ अधिकारी या सर्वांनी निवडणूक प्रक्रिया सुरू असतांना स्वतंत्रपणे बनविलेला जप्तीचा एकत्रित अहवाल मतदानाच्या दिवशी विहित नमुन्यात **(जोडपत्र-सी-४, सी-५ व सी-६)** पाठवतील.

जिल्ह्याच्या प्रत्येक वर्गवारीनुसार जप्तीची दिनांक निहाय बेरीज, जिच्याकडून जप्ती केली ती व्यक्ती, आणि ज्या प्राधिकरणाकडे ती जप्ती हस्तांतरीत केली तो प्राधिकारी ( प्रत्येक जप्ती स्वतंत्रपणे दर्शवावी ) ही माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने ठेवावी आणि केवळ एकत्रित बेरजेची आकडेवारी सोबत जोडलेल्या प्रपत्रात भारत निवडणूक आयोगाला पाठवावी.

मुख्य निवडणूक अधिकारी जप्तीच्या रक्कम/लेख आणि निवडणूक मोहिमेदरम्यान आयोगाकडून दाखल झालेल्या प्राथमिक तपासणी अहवालांच्या ( एफआयआर ) स्थितीचा मासिक प्रगती अहवाल महिना पूर्ण झाल्याच्या ७ व्या दिवशी आयोगास पाठवील.

राजकीय पक्षांनी निवडणूक खर्च विवरण दाखल केल्यानंतर, मुख्य निवडणूक अधिकारी ते विवरण व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचा अहवाल यांची तुलनात्मक पडताळणी करून राजकीय पक्षांचा खर्च आणि निवडणूक खर्च यांचे विवरण तपासतील आणि ते विवरण भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर टाकतील. जर विवरणपत्रात कोणत्याही स्वरुपाची विसंगती आढळली तर त्याचा अहवाल मुख्य निवडणूक अधिकारी तो आयोगाला पाठवील.

**(जोडपत्र – सी १)**

**राजकीय पक्षांनी सर्वसाधारण पक्षप्रचारासाठी केलेल्या खर्चाच्या तपशीलासाठीचा नमुना जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने निरीक्षण केल्याप्रमाणे निवडणुकीच्या घोषणेच्या दिनांकापासून निवडणूक समाप्तीपर्यंत (मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला सादर करावयाचे)**

| अ. क्र. (१) | राजकीय पक्षांचे नाव (२) | रॅली, मिरवणूक, सार्वजनिक सभा इत्यादीमधील नोंद केलेल्या खर्चाचे स्वरुप (उदाहरणार्थ प्रसारमाध्यम, जाहिरात, कटआऊटस्, फलक (बॅनर्स), हेलिकॉप्टर्स, विमाने, इत्यादी.) (३) | परिमाण (४) | दर (५) | एकूण खर्च (६) | दिनांकासह निशाणी क्र./ कॅसेट क्र. मध्ये गोळा केलेला साक्षी पुरावा (७) | शेरा (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

दिनांक :

जिल्हा निवडणूक अधिकारी / मुख्य निवडणूक अधिकारी.

(जोडपत्र - सी-२)

## जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा मासिक अहवाल (भाग- अ)

राज्याचे/संघ राज्यक्षेत्राचे नाव :–

जिल्ह्याचे नाव :–

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुक्रमांक – | | | | | | | | | |
| मतदारसंघाचे नाव व क्र.- | | | | | | | | | |
| उमेदवारांची संख्या.- | | | | | | | | | |
| हिशेब दाखल केला आहे अशा उमेदवांची संख्या- | | | | | | | | | |
| हिशेब दाखल केले नाही अशा उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| विहित रीतीने हिशेब दाखल केले नाही अशा अमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून ज्यांच्या हिशोबाची छाननी पूर्ण झाली आहे, त्या उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| ज्या उमेदवाराच्या नोंदवही व प्रति-निरीक्षण नोंदवही यामध्ये उणीव आढळला आहे, त्या उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| ज्या उमेदवारांचा अहवाल मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवाला आहे, त्या उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| ज्यांच्यासाठी भारत निवडणूक आयोगाने नोटिशी दिल्या आहेत त्या उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| ज्यांचे हिशेब आयोगाकडून स्वीकारण्यात आले आहेत शा उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |
| अपात्र ठरवलेल्या उमेदवारांची संख्या- | | | | | | | | | |

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

## जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा मासिक अहवाल ( भाग- ब)

संघाचे/संघ राज्यक्षेत्राचे नाव :–

जिल्ह्याचे नाव :–

| अनुक्रमांक | मतदारसंघाचे नाव व क्रमांक | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्षाचे/ अपक्ष उमेदवाराचे नाव | लेखा विवरणाची स्थिती |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**टीप :–**

स्थितीदर्शक रकान्यात उमेदवाराने त्याचा हिशेब सादर केला आहे किंवा कसे, सादर केला असल्यास, सादरीकरणाचा दिनांक नमूद करून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून छाननी पूर्ण केली आहे किंवा कसे, उमेदवाराचा हिशेब व प्रति-निरीक्षण नोंदवही यामध्ये कोणतीही उणीव आढळली आहे किंवा कसे, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला अहवाल पाठवला आहे किंवा कसे उमेदवारास नोटीस दिली आहे किंवा कसे, आयोगाद्वारे हिशेब स्वीकारला आहे किंवा कसे, आयोगाने हिशेब स्वीकारला नसल्यास, नोटीस देण्यात आली आहे किंवा कसे एकतर प्रकरण प्रलंबित आहे किंवा उमेदवार अपात्र तरी आहे तर, अपात्र ठरवला असल्यास, अपात्र ठरवल्याच्या आदेशाचा दिनांक इ. नमूद करावे.

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

**जोडपत्र - सी-३**

## मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचा मतदानाच्या दिवसाचा निवडणूक खर्च संनियंत्रणावरील जप्तीचा अहवाल (१२ वाजेपर्यंत)

## ( मतदानाच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत भारत निवडणूक आयोगास पाठवण्याचा अहवाल)

| अनुक्रमांक | तपशील | शेरे | | |
|---|---|---|---|---|
| १. | राज्य/ संघ राज्यक्षेत्रात नियुक्त केलेल्या खर्च निरीक्षकांची एकूण संख्या | | | |
| २. | राज्य/ संघ राज्यक्षेत्रात नियुक्त केलेल्या भरारी पथकांची एकूण संख्या | | | |
| ३. | राज्य/ संघ राज्यक्षेत्रात नियुक्त केलेल्या स्थिर संनियंत्रण चमूंची एकूण संख्या | | | |
| ४. | राज्य / संघ राज्यक्षेत्रात नियुक्त केलेल्या उत्पादन शुल्क विभागाच्या चमूंची एकूण संख्या | | | |
| ५. (अ). | निवडणूक प्रक्रियेदरम्यान जप्त केलेली एकूण रोख रक्कम (रुपयांमध्ये) | भरारी पथक | स्थिर संनियंत्रण चमू | पोलीस ठाणे कार्यालय / पोलीस प्राधिकारी |
| ५. (ब). | ५(अ) नुसार भरारी पथक, स्थिर संनियंत्रण चमू आणि पोलीसांनी पडताळणीनंतर मुक्त केलेली एकूण रक्कम | | | |
| ५. (क). | ५(अ) नुसार भरारी पथक, स्थिर संनियंत्रण चमू आणि पोलीसांनी, आयकर विभागाकडे हस्तांतरित केलेली एकूण रक्कम | | | |
| ५. (ड). | भरारी पथक/ स्थिर संनियंत्रण चमू / पोलीस प्राधिकारी यांनी दाखल केलेल्या प्राथमिक तपासणी अहवालाच्या व्याप्तीअंतर्गत येणारी आणि निवडणूक प्राधिकाऱ्यांकडे पडून असलेली/ कोषागारात ठेवलेली/ सक्षम न्यायालयाच्या निर्देशानुसार ठेवलेली उर्वरित रक्कम [ ५अ-(५ब+५क ) ] (रुपयांमध्ये) | | | |
| ६. | निवडणूक प्रक्रियेदरम्यान राज्य / संघ राज्यक्षेत्रामध्ये जप्त करण्यात आलेली एकूण दारू (अदमासे किंमतीसह लिटरमध्ये), मादक) द्रव्ये ( अदमासे किंमतीसह किलोमध्ये) आणि इतर वस्तू. | दारू (लिटर मध्ये) | जप्त करण्यात आलेले एकूण मादक द्रव्ये/ अंमली पदार्थ/ मनःप्रेरक पदार्थ (किलो मध्ये) | निवडणुकी दरम्यान जप्त करण्यात आलेल्या एकूण इतर वस्तू, जसे की, प्रचार साहित्य, धोती, साड्या इत्यादी. |
| | | पैशांमधील अदमासे मूल्य (रुपयांमध्ये) | पैशांमधील अदमासे मूल्य (रुपयांमध्ये) | पैशांमधील अदमासे मूल्य (रुपयांमध्ये) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ अ. | भरारी पथकाद्वारे | | | |
| ७ ब. | स्थिर संनियंत्रण चमूद्वारे | | | |
| ७ क. | उत्पादन शुल्क विभागाद्वारे | | | |
| ७ ड. | पोलिसांद्वारे | | | |
| ७ ई. | इतर | | | |
| ७ फ. | एकूण | ...... लिटर | ...... कि.ग्रॅ. | रु. ...... |
| | | रु. | रु. | |
| ८. | (अ) राज्य / संघ राज्यक्षेत्राती, ज्यांच्या बाबतीत नोटीस देण्यात आलेली आहे अशा 'प्रदत्त बातम्या (पेड न्यूज)' च्या तक्रारप्राप्त संशयास्पद प्रकरणांची संख्या | | | |
| | (ब) वरील (अ) पैकी ज्यांच्याबाबतीत निर्णय घेण्यात आला आहे अशा 'प्रदत्त बातम्या (पेड न्यूज)' ची एकूण संख्या<br>(एक) जिल्हा माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती<br>(दोन) राज्य माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती | | | |
| ९. | | भरारी पथकाद्वारे | स्थिर संनियंत्रण चमूद्वारे | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे |
| ९ अ. | राज्य / संघ राज्यक्षेत्रात खर्चाशी संबंधित नोंदवण्यात आलेल्या एकूण प्राथमिक तपासणी अहवाल (एफआयआर)/ पोलीस प्रकरणांची संख्या | | | |
| ९ ब. | लाच / प्रलोभन, इत्यादींशी संबंधित अटकेची प्रकरणे, काही असल्यास | | | |
| ९ क. | उत्पादन शुल्क कायद्याच्या उल्लंघनाशी संबंधित नोंदवण्यात आलेल्या एकूण प्राथमिक तपासणी अहवाल (एफआयआर)/ पोलीस प्रकरणांची संख्या | | | |

मुख्य निवडणूक अधिकारी/ निवडणूक खर्च संनियंत्रण प्रभारी मध्यस्थ अधिकाऱ्याची स्वाक्षरी

दिनांक

प्रति,

सचिव (खर्च), भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली ११० ००१

**जोडपत्र- सी-४**

**पोलीस विभागाने मतदानाच्या दिवशी १२ वाजेपर्यंत केलेल्या जप्तीचा अहवाल**

**(मतदानाच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत भारत निवडणूक आयोगास पाठवण्याचा अहवाल)**

| अनुक्रमांक | तपशील | भरारी पथकाद्वारे | स्थिर संनियंत्रण चमूद्वारे | इतर पोलीस ठाणे/ पोलीसांद्वारे |
|---|---|---|---|---|
| १. | निवडणूक प्रक्रियेदरम्यान जप्त केलेली एकूण रोख रक्कम | | | |
| २. | वरील १ पैकी, भरारी पथक, स्थिर संनियंत्रण चमू आणि पोलिसांनी पडताळणी केल्यानंतर मुक्त केलेली एकूण रक्कम | | | |
| ३. | वरील १ पैकी, प्राथमिक तपासणी अहवाल (एफ आय आर )/ न्यायालयातील तक्रार याद्वारे व्याप्त झालेली एकूण रक्कम | | | |
| ४. | वरील १ पैकी, आयकर प्राधिकरणास हस्तांतरीत केलेली एकूण रक्कम | | | |
| ५. | भरारी पथक / स्थिर संनियंत्रण चमू / पोलीस प्राधिकारी यांनी प्राथमिक तपासणी अहवाल दाखल केलेली आणि निवडणूक प्राधिकाऱ्यांकडे पडून असलेली/ कोषागारात ठेवलेली/ सक्षम न्यायालयाच्या निर्देशानुसार ठेवलेली उर्वरित रक्कम [१-(२+४)] (रुपयांमध्ये) | | | |
| ६. | निवडणूक प्रक्रियेदरम्यान राज्य / संघ राज्यक्षेत्रामध्ये जप्त करण्यात आलेली एकूण दारू (अदमासे किंमतीसह लिटरमध्ये), मादक द्रव्ये ( अदमासे किंमतीसह किलोमध्ये) आणि इतर वस्तू. | दारू (लिटर मध्ये) | जप्त करण्यात आलेले एकूण मादक द्रव्ये/ अंमली पदार्थ/ मनःप्रेरक पदार्थ (किलो मध्ये) | निवडणुकी दरम्यान जप्त करण्यात आलेल्या एकूण इतर वस्तू, जसे की, प्रचार साहित्य, धोती, साड्या इत्यादी. |
| | | पैशांमधील अदमासे मूल्य (रुपयांमध्ये) | पैशांमधील अदमासे मूल्य (रुपयांमध्ये) | पैशांमधील अदमासे मूल्य (रुपयांमध्ये) |
| ६ अ. | भरारी पथकाद्वारे | | | |
| | | रु. | रु. | रु. |
| ६ ब. | स्थिर संनियंत्रण चमूद्वारे | | | |
| | | | | |
| ६ क. | पोलिसांद्वारे | | | |
| | | | | |
| ६ ड. | उत्पादन शुल्क विभागाद्वारे | | | |
| | | | | |
| ६ ई. | एकूण (६ अ + ६ ब + ६ क + ६ ड) | ...... लिटर | ...... कि.ग्रॅ. | |
| | | रु. | रु. | रु. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | राज्य / संघ राज्यक्षेत्रात खर्चाशी संबंधित नोंदवण्यात आलेल्या एकूण प्राथमिक तपासणी अहवाल (एफआयआर)/ पोलीस प्रकरणांची संख्या | | | |
| ८. | लाच / प्रलोभन, इत्यादींशी संबंधित अटकेची प्रकरणे, काही असल्यास | | | |

स्वाक्षरी

पदनाम

दिनांक :

प्रति

१. सचिव (खर्च)
भारत निवडणूक आयोग
नवी दिल्ली ११० ००१

२. मुख्य निवडणूक अधिकारी
राज्याचे नाव :–

**जोडपत्र- सी-५**

**आयकर विभागाने मतदानाच्या दिवशी १२ वाजेपर्यंत केलेल्या जप्तीचा अहवाल**

**( मतदानाच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत भारत निवडणूक आयोगास पाठवण्याचा अहवाल)**

| अनुक्रमांक | तपशील | रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| १ | निवडणूक प्रक्रियेदरम्यान भरारी पथक किंवा स्थिर संनियंत्रण चमू किंवा पोलीसांनी आयकर विभागास हस्तांतरित केलेली एकूण रोख रक्कम | |
| २ | वरील (१) पैकी आयकर विभागाने निवडणूक प्रक्रियेदरम्यान आयकर कायद्याअन्वये जप्त केलेली एकूण रक्कम | |
| ३ | वरील (१) पैकी आयकर विभागाने निवडणूक प्रक्रियेदरम्यान त्यांच्याकडे भरारी पथक किंवा स्थिर संनियंत्रण चमू किंवा पोलिसांद्वारे हस्तांतरित केलेल्या रकमेपैकी **मुक्त केलेली** एकूण रक्कम | |
| ४ | वरील (१) पैकी, ज्या बाबतीत आयकर कायद्याअन्वये अधिक तपास करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे, अशी आयकर विभागाने ताब्यात घेतलेली उर्वरित रक्कम [१-(२+३} (रुपयांमध्ये) | |
| ५ | निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे स्वाधिकाराने जप्त केलेली एखादी रक्कम | |
| ६ | एकूण (४+५) (रुपयांमध्ये) | |

स्वाक्षरी

पदनाम

दिनांक :

प्रती

१. सचिव (खर्च)
भारत निवडणूक आयोग
नवी दिल्ली ११० ००१

२. मुख्य निवडणूक अधिकारी
राज्याचे नाव :–

**जोडपत्र- सी-६**

**उत्पादन शुल्क विभागाद्वारे मतदानाच्या दिवशी १२ वाजेपर्यंत जप्तींचा व छाप्यांचा अहवाल**

**( मतदानाच्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत भारत निवडणूक आयोगास पाठवण्याचा अहवाल)**

| जप्त केलेल्या सर्व प्रकारच्या दारूचा एकत्रित अहवाल (लिटर) | रुपयांमधील किंमत (अदमासे) | जप्त केलेले एकूण मादक द्रव्ये / अंमली पदार्थ/ मनः प्रेरक पदार्थ | रुपयांमध्ये मूल्य (अदमासे) | निवडणूक प्रक्रियेदरम्यान टाकलेले एकूण छापे (संख्या) | उत्पादनशुल्क कायद्यांचे उल्लंघन केल्याबद्द नोंदवण्यात आलेल्या प्राथमिक तपासणी अहवालांची (एफ आय आर)/ पोलीस प्रकरणांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

स्वाक्षरी

पदनाम

दिनांक :

प्रती

१. सचिव (खर्च)
भारत निवडणूक आयोग
नवी दिल्ली ११० ००१

२. मुख्य निवडणूक अधिकारी
राज्याचे नाव :–

**जोडपत्र- सी-७**

**सर्व राज्यांच्या / संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना संबोधून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- ७६/२००४ / जे. एस. दोन, दिनांक १७ मार्च २००४ .**

**विषय :– निवडणूक खर्चाचा हिशेब दाखल करणे-दरपत्रक तयार करणे.**

मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, मिझोराम, दिल्लीचे राष्ट्रीय राजधानी क्षेत्र यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना या राज्यांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या संबंधात उद्भृत करण्यात आलेल्या विषयावर संबोधून लिहिलेले आयोगाचे पत्र क्रमांक- ७६/२००३/ जे. एस. दोन, दिनांक ३० ऑक्टोबर २००३ यांची प्रत यासोबत जोडण्याचा आदेश मला आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या पत्रात असा आदेश देण्यात आला होता की, संबंधित जिल्ह्यात चालू असलेल्या दरांच्या आधारे उक्त पत्रासोबत जोडण्यात आलेल्या सूचीत दर्शविण्यात आलेल्या बाबींच्या दर तक्त्यांचे जिल्हा निवडणूक अधिकारी संकलन करील आणि सदर दर सूची सर्व निरीक्षकांना आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या पदनिर्देशित अधिकाऱ्यांना सादर केली जाईल.

उपरोल्लेखित दिनांक ३० ऑक्टोबर २००३ च्या पत्रात अंतर्भूत असलेल्या सूचनांचे, लोकसभा आणि विधानसभा यांच्या चालू सार्वत्रिक निवडणुकांत आणि सर्व भविष्यकालीन निवडणुकांत, काटेकोरपणे अनुपालन करण्यात येईल.

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

आयोगाचे पत्र क्रमांक- ७६/२००३/ जे. एस. दोन　　　　　　　　　　　　दिनांक ३० ऑक्टोबर २००३

प्रति,

(एक) मध्य प्रदेश, भोपाळ
(दोन) छत्तीसगड, रायपूर
(तीन) राजस्थान, जयपूर
(चार) मिझोराम, ऐजवाल
(पाच) दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र,
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय :– निवडणूक खर्चाचा हिशेब दाखल करणे-दरपत्रक तयार करणे.**

महोदय/ महोदया,

मला असे नमूद करण्याचा आदेश आहे की, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ (१) ची अलिकडची दुरुस्ती विचारात घेता, आयोगाने त्याचे पत्र क्रमांक- ७६/२००३/ जे.एस. दोन, दिनांक १४ ऑक्टोबर २००३ द्वारे उमेदवारांनी निवडणूक विषयक खर्चाचा हिशेब ठेवण्याच्या प्रपत्रात अगदी अलिकडेच सुधारणा केली आहे.

उमेदवारांनी विहित प्रपत्रात दररोज ठेवावयाचा असतो अशी खर्चाची छाननी करणे सुकर व्हावे म्हणून आयोगाने असा आदेश दिला आहे की सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी हे, संबंधित जिल्ह्यात चालू असलेल्या दरांच्या आधारे, सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील बाबींच्या दरांच्या तक्त्यांचे संकलन करतील. सदर दर सूच्या संबंधित जिल्ह्यांमध्ये ते उपस्थित होताच सर्व निरीक्षकांना त्वरित सादर करण्यात याव्यात तसेच निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेख्यांची छाननी करण्याकरिता, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या सर्व पदनिर्देशित अधिकाऱ्यांना त्वरित द्याव्यात, या सूचनेची एक प्रत ही, निरीक्षक जेव्हा उपस्थित होतील तेव्हा त्यांना, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे सुपूर्द करण्यात यावी.

**दरतक्ता**

१ ध्वनिवर्धक आणि ध्वनिग्राहक यांसह ध्वनिक्षेपक भाड्याने घेण्याचा खर्च

२ मंच/मंडप यांची उभारणी (४-५ व्यक्ती बसण्यासाठी प्रमाण आकाराचे)

३ कापडी निशाण

४ कापडी झेंडे

५ प्लास्टीकचे झेंडे

६ हस्तपत्रके (याचा खर्च परिगणित करावयाचा आहे आणि मुद्रित आदेशाचे मुद्रकाकडून खात्री करून घ्यावयाची आहे- पहा लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२७ क )

७ भित्तिपत्रके

८ जाहिरात फलक

९ कट आऊटस (लाकडी)

१० कट आऊटस (कापडी / प्लास्टिक)

११ व्हिडीओ कॅसेट

१२ ऑडीओ कॅसेट

१३ प्रवेशाद्वारे उभारणे

१४ कमानी बांधणे

१५ पुढील वाहनांचा दैनिक भाडे खर्च :

(एक) जीप / टेंपो / ट्रॅक्टर इत्यादी

(दोन) सुमो / क्वालिस

(तीन) गाड्या

(चार) तिनचाकी वाहने

(पाच) सायकल, रिक्षा

१६. हॉटेलमधील खोल्या / अतिथिभवन भाड्याने घेण्याचा खर्च

१७. वाहन चालकांचा खर्च, वेतन

१८. फर्निचर (खुर्च्या, सोफा इत्यादी) व खिळण्या भाड्याने घेण्याचा खर्च

१९. नगरपालिका प्राधिकाऱ्यांकडून जाहिरात फलक लावण्यासाठी जागा भाड्याने घेण्याचा खर्च

२०. एखाद्या जिल्ह्यात ज्या बाबीचा सामान्यतः वापर केला जातो, त्या इतर बाबी (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने अशा बाबींची दर सूची तयार करावी.)

**जोडपत्र-सी ८**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्र. ७६ / सूचना / २०१३ / इपीएस / खंड आठ                                                        दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३

प्रति,

(१) गुजरात
(२) तामिळनाडू
मुख्य निवडणूक अधिकारी यांचे

**विषय :–** गुजरात व तामिळनाडू विधानसभा मतदारसंघाच्या पोट निवडणूका - जिल्हा निवडणूक अधिकारी / मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या दैनंदिन हिशेबाची नोंदवही अपलोड करणे (टाकणे) याविषयी.

महोदय/ महोदया,

आयोगाचे पत्र क्र. ४६४ / इएक्सपी, ओबीएस/बीई/२०१३ / इपीएस / खंड एक, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३ कडे निर्देश करण्याच्या आणि उमेदवाराच्या दैनंदिन निवडणुकविषयक खर्चाच्या हिशेबाच्या नोंदवहीचे निवडणूक प्रक्रियेदरम्यान केलेल्या प्रत्येक तपासणीनंतर तपासणीच्या दिनांकापर्यंत क्रमवीक्षण (स्कॅन) करण्यात येईल आणि ते जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या पोर्टलवर अपलोड करण्यात (टाकण्यात येईल आणि सूचनाफलकावर त्याची छायांकित प्रत लावण्याव्यतिरिक्त हे पोर्टल मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळाशी जोडण्यात येईल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना क्रमवीक्षण (स्कॅन) संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याची विनंती करण्यात आली आहे.

२. हे खर्च निरीक्षकांसह सर्व निवडणूक प्राधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे आणि त्याला प्रसिद्धी देण्यात यावी.

३. कृपया याची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-
**(अविनाश कुमार,)**
सचिव.

**जोडपत्र- सी-९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६ / सूचना / ईईपीएस / खंड- एकोणीस दिनांक ३० डिसेंबर २०१४

प्रति,

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्र यांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :–** मतदान / मतमोजणी प्रतिनिधी यांचा अल्पोपहार आणि माहिती केंद्र (की ऑस्क) उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामधील काल्पनीक खर्चाचे लेखांकन- यासंबंधात.

महोदय/ महोदया,

उपरोल्लिखित विषयावर आपले लक्ष वेधण्याचे आणि होणाऱ्या निवडणुकांच्या संबंधात, उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या विवरणपत्र काळजीपूर्वक तपासण्याबाबत असे सांगण्याचे मला निर्देश आहेत असे निदर्शनास आले आहे की, उमेदवार त्यांचे मतदान / मतमोजणी प्रतिनिधी, प्रचार मोहिमेतील कार्यकर्ते, इत्यादींच्यावरील कोणताही खर्च दाखवत नाही. उमेदवार, निवडणूक प्रक्रियेदरम्यान त्यांचे मतदान / मतमोजणी प्रतिनिधी आणि प्रचार मोहिमेतील कार्यकर्ते यांचा आहार व अल्पोपहार, इत्यादींचा खर्च करीत असल्याने आणि त्यांचे दैनिक भत्ते इत्यादींचे प्रदान देखील करीत असल्याने परिणामी, अशा खर्चाचा देखील त्यांच्या खात्यात समावेश करण्याची गरज आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी, निवडणूक प्रचार मोहिमेसाठी वापरलेल्या खर्चविषयक बाबींच्या यादीमधील, निवडणूक खर्च संनियंत्रण यांवरील अनुदेश सारसंग्रहाच्या परिच्छेद १४.२ व १४.३ मध्ये घालून दिल्याप्रमाणे, राजकीय पक्षांशी यथोचित विचारविनिमय केल्यानंतर, त्यांच्या संबंधित जिल्ह्यांमधील प्रचलित असलेल्या दरांच्या आधारे मतदान/मतमोजणी प्रतिनिधी आणि प्रचार मोहिमेतील कार्यकर्ते यांचे दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण व अल्पोपहार, दैनिक भत्ते, इत्यादींचे काल्पनिक दर अधिसूचित करण्यासाठी विचारणा करावी.

२. मला यापुढे असेही कळविण्याचा निदेश आहे की, उमेदवार / राजकीय पक्ष निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदारसंघात खुली माहितीकेंद्रे, प्रचाराची कार्यालये इत्यादी उघडतात आणि भाडे किंवा विजेची देयके किंवा शामियाना इत्यादी उभारणे यांसारखा खर्च, नामनिर्देशन भरण्याच्या दिनांकानंतर उमेदवाराच्या खात्यातच समाविष्ट करावयाचा आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणूक प्रचार मोहिमेदरम्यान वापरलेल्या खर्चाच्या बाबींच्या यादीमधील निवडणूक खर्च नियंत्रण यांवरील अनुदेश सारसंग्रहाच्या परिच्छेद १४.२ व १४.३ यात घालून दिल्याप्रमाणे, राजकीय पक्षांबरोबर यथोचित विचार विनिमय केल्यानंतर, प्रचलित दरांच्या आधारे, मतदारसंघातील अशी माहितीकेंद्रे, प्रचार कार्यालये, इत्यादी उभारण्याचे / बांधण्याचे कालानिक दर समाविष्ट करणे आवश्यक केले आहे.

कृपया या पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

**(सत्येंद्रकुमार रूडोला,)**
सचिव.

**जोडपत्र - सी-१०**

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११०००१

क्रमांक. ७६/अनुदेश/इसीएस/२०१५/खंड-दोन                                        दिनांक २९ मे २०१५

प्रति,

सर्व राज्यांचे आणि संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय.**— जिल्हा खर्च संनियंत्रण समिती ( डीइएमसी ) सहउमेदवारांचे/निवडणूक प्रतिनिधींबरोबर लेखा पुनर्मेळ बैठकी-संबंधी.

महोदय/ महोदया,

निवडणूक खर्चाची कमी दाखवलेली रक्कम आणि जिल्हा खर्च संनियंत्रण समिती ( डी.इ.एम.सी ) चा निर्णयाबाबत आयोगाचा, आदेश क्रमांक ७६ /अनुदेश/इइपीएस/२०१३/खंड-१, दिनांक १४ मार्च २०१३ याचे अधिक्रमण करून, उमेदवारांच्या लेख्यांत निवडणूक खर्चाचा कमी दाखवलेला विवरणाची प्रकरणे निकालात काढताना जिल्हा खर्च संनियत्रक समिती ( डीइएमसी ) ने यापुढे अनुसरावयाचे आयोगाचे सुधारित आदेश अग्रेषित करण्याचा बदल ( इटालीकमध्ये ) दाखवलेले आहेत. मला याद्वारे निदेश दिले आहे.

२. मला आपणास अशी विनंती करण्याचे आणखी निर्देश दिले आहेत की, हे आदेश सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च निरीक्षक, संबंधित कर्मचारी, उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या निदर्शनास आणावेत.

३. कृपया या पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-
**(एस. के. रुडेला),**
सचिव.

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

फाईल क्र. ७६/अनुदेश/इपीएस/२०१५/खंड-दोन, दिनांक २९ मे २०१५

### आदेश

ज्या अर्थी, संसदेच्या प्रत्येक राज्याच्या विधानमंळाच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, निदेशण व नियंत्रण हे संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये निवडणूक आयोगाच्या ठायी निहित आहे ; आणि

ज्याअर्थी, उमेदवारांनी लोकसभा व राज्य विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांच्या निवडणूक प्रचारासाठी अत्याधिक रक्कम खर्च केली असून, जो खर्च समान नाही आणि पुष्कळदा त्याच्या निवडणुकीच्या खर्चाच्या दैनंदिन लेख्यामध्ये अचूक खर्च दाखवित नसल्याचा अहवाल मिळाला आहे ;

म्हणून, आता, भारत निवडणूक आयोग याद्वारे निवडणूक प्रक्रिया शुद्ध राखण्यासाठी/ठेवण्यासाठी खालील आदेश देत आहे :-

(एक) जर निवडणूक निर्णय अधिकारी किंवा जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी द्वारे कोणताही प्राधिकृत अधिकारी, यांना निवडणूक प्रक्रियेची माहिती मिळाल्यावर, कोणत्याही उमेदवाराने प्राधिकृत विवक्षित खर्च केला आहे व लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ (१) अन्वये त्याने ठेवलेल्या त्याच्या निवडणुकीच्या खर्चाच्या रोजच्या रोज/दिवसेंदिवसाच्या लेख्यामध्ये एकतर त्या खर्चाचा भाग किंवा संपूर्ण खर्च दाखविला नाही किंवा प्राधिकृत अधिकारी किंवा खर्चाचे निरीक्षक यांना अनुसूचित तारखेला तपासणीसाठी उक्त लेखा दाखविला नाहीतर, निवडणूक निर्णय अधिकारी माहिती मिळाल्याच्या तारखेच्या २४ तासांमध्ये प्राधान्याने उमेदवाराला त्या पुराव्यासह नोटीस देईल, किंवा यथास्थिती, खर्चाचा तपशील नमूद करून लेखा तपासणी ही ज्या दैनंदिन लेख्यामध्ये सत्य व अचूक खर्च दाखविलेला नाही किंवा तो दैनंदिन लेख्यामध्ये दाखविण्यासाठी कसूर केली आहे. किंवा त्याने लेखात अशी माहिती देण्यात कसूर केली आहे, असे त्याला कळवील. तथापि, त्याने त्याचा संशयित बाबतीत, दिलेल्या माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने शिफारस केल्यानुसार, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्याला नोटीस दिली आहे किंवा नोटीस दिली आहे किंवा नोटीस दिली जात (एमसीएमसी) असेल तर अशा बाबी या नोटीशीमध्ये समाविष्ट केल्या जाणार नाहीत.

(दोन) अशा उमेदवाराने ४८ तासांमध्ये नोटीशीचे उत्तर हे, त्याच्या नोटिशीमध्ये निदर्शनास आणलेली वगळलेली किंवा कसूर केलेली याच्याहि कारणांचे स्पष्टीकरण करून द्यावे, जेथे उमेदवाराने, नोटिशीमध्ये नमूद केलेल्या दडपून टाकलेल्या खर्चाची वस्तुस्थिती स्वीकारली असता तो खर्च त्याच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

(तीन) जेथे उमेदवार, तपासणीसाठी त्याची दैनंदिन लेखा दाखविण्यासाठी कसूर करत आहे, नोटीस दिलेली असतानासुद्धा, त्याने सतत चुका केल्या आहेत, तेथे अशी नोटीस बजाविल्याच्या ४८ तासांनंतर, भारतीय दंडसंहितेच्या कलम १७९(१) अन्वये प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात येईल आणि निवडणूक प्रचारासाठी उमेदवाराला वाहनांचा वापर करण्यासंबंधिची परवानगी काढून घेण्यात येईल.

(चार) जेथे नोटीस मिळाल्याच्या ४८ तासांमध्ये उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी यांनी उत्तर सादर केले नाहीतर, उमेदवार नोटिशीमध्ये नमूद केलेली दाबून टाकलेली रक्कम स्वीकारल्याचे मानण्यात येईल, आणि ती रक्कम अशा उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल,

(पाच) जर उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी, नोटीशीमध्ये नमूद केलेल्या दाबून टाकलेल्या खर्चाबद्दल बद्दल विवाद करत असेल तर, मतभेदाबद्दलची कारणे नमूद करून उत्तर देईल आणि ती कारणे जिल्हा खर्च संनियंत्रण समितीकडे पाठविण्यात येतील, ज्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(१) मतदारसंघाचे प्रभारी खर्च निरीक्षक

(२) जिल्हा निवडणूक अधिकारी

(३) उप जिल्हा निवडणूक अधिकारी/जिल्हाचे प्रभारी खर्च संनियंत्रक अधिकारी.

(सहा) जिल्हा खर्च संनियंत्रण समितो, नोटिशीमध्ये नमूद केलेल्या पुराव्याची तपासणी केल्यानंतर, उमेदवाराने त्याचे उत्तर दिल्यानंतर उमेदवाराकडून उत्तर मिळाल्याच्या तारखेपासून प्राधान्याने ७२ तासांमध्ये, असा दाबून टाकलेला खर्च उमेदवाराच्या निवडणुकीच्या खर्चाच्या लेख्यामध्ये समाविष्ट करण्यात येईल किंवा नाही हे ठरवील.

(सात) **प्रशिक्षण :**

(क) जिल्हा निवडणूक अधिकारी हे सर्व उमेदवार / निवडणूक प्रतिनिधी यांच्याकरिता आणि निवडणुकीच्या खर्चाचा लेखा अंतिम तारखेपूर्वी सादर करण्यासाठी एका आठवड्याच्या आत लेखा कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसाचा सुलभ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करतील.

(ख) खर्चाच्या संनियंत्रण विभागाचे मध्यस्थ अधिकारी व सहायक खर्च निरीक्षक हे लेख्या इ-फायलींग करावयाची शपथपत्र दाखवलेले दोष स्पष्ट करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहयोग करतील परिणामी दाखल करणारे नमुने अपूर्ण असणे किंवा विहित रितीने दाखल न करणे, अचूक लेखा न दाखविणे देखील परिणामी उमेद्वार/प्रतिनिधी यांना समजावून सांगण्यात येईल.

(ग) या प्रशिक्षण कार्यक्रमात, ते लेख्याचा मेळ बसविण्यासंबंधात बैठकीबद्दल कळवतील आणि ज्यामध्ये ते सर्व अंतिम लेखे व नोंदवही तयार करतील.

(घ) जिल्हा निवडणूक अधिकारी हे, अंतिम लेखा दाखल करण्याच्या कार्यपद्धतीवरील प्रशिक्षणाचा दिनांक व ठिकाण आणि लेख्याचा मेळ बसविण्यासाठीची बैठकीबद्दल, निकाल घोषित करण्याची नक्की तारीख याविषयी अधिसूचित करतील.

(आठ) **लेख्याचा मेळ बसविण्यासाठीची बैठक :**

(क) उमेदवारांना, निवडणूक खर्चाची रक्कम नमूद करण्याअंतर्गत मेळ बसविण्यासाठी आणखी एक संधी देण्यात येईल, जरी कोणताही, निकाल घोषित होण्याच्या २६ व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी, लेख्याचा मेळ बसविण्यासाठीच्या बैठकीबद्दल कळवावयाचे आहे, जिल्हा निवडणूक अधिकारी है, प्रत्येक उमेदवाराला या बैठकीबद्दल निकाल घोषित करण्याच्या दिवसाचे लेखी कळविल्याची खात्री करतील, त्यामुळे, ते /त्यांचे प्रतिनिधी यांना निवडणूक प्रक्रियेमध्ये एकत्रित केलेल्या पुराव्यासह, आणि निवडणूक निर्णय स्वरूपात निवडणूक खर्चाच्या त्यांच्या लेख्यांमध्ये निवडणूक खर्चाच्या विवादाच्या बाबीसंबंधात मेळ बसविणे शक्य होईल.

(ख) जिल्हा खर्च संनियंत्रण समिती ही लेख्यांची छाननी केल्यानंतर या प्रकरणातील सविस्तर कारणे लेखी स्वरूपात देण्याचा आदेश देतील, जेथे, फरकाचा मेळ बसविणे शक्य नाही ते त्याच दिवशी उमेदवार व प्रतिनिधी यांना आदेश बजावतील, जर उमेदवार जिल्हा खर्च संनियंत्रण समितीच्या आदेशाशी सहमत नसेल तर, त्याने/तिने जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पत्राद्वारे असहमतीच्या कारणासह त्याचे अंतिम लेखे जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे दाखल करावेत.

(ग) जर उमेदवार लेख्याचा मेळ बसविण्यासाठीच्या बैठकीपूर्वी त्याचे लेखे अगोदरच दाखल केले असतील तर, त्याने/तिने जिल्हा खर्च संनियत्रंण समितीच्या निष्कर्षामध्ये समावेश करण्यासाठी निवडणूक पूर्ण होण्याच्या ३० दिवसांच्या सांविधिक कालावधीत लेख्यामध्ये सुधारणा करावी.

(नऊ) जर उमेदवार, निकाल घोषित होण्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या निविष्ट केलेल्या कालावधीमधील कोणत्याही विधिग्राह्य कारणाशिवाय निवडणूक खर्चाचे त्याचे निवेदन दाखल करत नाही तर, जिल्हा निवडणूक अधिकारी हे स्वधिकारे उमेदवाराचे स्पष्टीकरण मागवतील आणि ते उमेदवाराचे उत्तर व त्याच्या शिफारशींसह आयोगाला अहवाल पाठवतील.

(दहा) लेख्याचा मेळ बसविण्यासंबंधातील बैठक असतानासुद्धा, उमेदवाराने दाखल केलेल्या लेख्यासंबंधात असहमती असेल तर जिल्हा निवडणूक अधिकारी हे, त्यांच्या शिफारशीसह आयोगाला छाननी अहवाल जिल्हा खर्च संनियंत्रण समिती आदेश नोंदवहीच्या प्रमाणित देयके व प्रमाणके व इतर पुरावे पाठवतील.

(अकरा) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा छाननी अहवालाला, अंतिम स्वरूप देण्याच्या सात दिवसांमध्ये निवडणूक खर्च संनियंत्रण समितीच्या इइएमएस सॉफ्टवेअरमध्ये समाविष्ट करावयाचे आहे.

(बारा) वरील कार्यपद्धती तात्काळ अनुसरण्यात येईल.—

२. आयोगाने आणखी अशे निदेश दिले आहे की, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी ही कार्यपद्धती सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, जिल्हा खर्च संनियंत्रण समितीचे सदस्य व राज्यामधील सर्व संबंधित यांच्या निदर्शनास आणावी.

आदेशा नुसार,

स्वाक्षरी/-
**(एस के रूडोला),**
सचिव.

* कृपया जोडपत्र सी १७ पहावे.

**जोडपत्र सी ११**

**भारत निवडणूक आयोग**
निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/ अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड-दोन                                                    दिनांक ११ ऑक्टोबर २०१५

प्रति,

सर्व राज्ये/संघराज्य क्षेत्राचे
मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय** : शेवटच्या क्षणी उमेदवारांनी/राजकीय पक्षांनी हेलीकॉप्टर बदलण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून प्राधान्यतत्त्वावर परवानगी घेणे यासंबंधात.

महोदय/महोदया,

नागरी विमानचालन सुरक्षा केंद्र (बीसीएएस) नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार यांनी कार्यालयीन ज्ञापन क्रमांक सीएएस-७(१५)/ २०१२/विभाग १ (निवडणूक), दिनांक ३ जुलै २०१३ यान्वये निर्गमित केलेल्या प्रमाणित कार्यचालन पद्धती (प्रत जोडलेली आहे) निर्देश घेण्याचे आणि वर नमूद केलेल्या कार्यालयीन ज्ञापनाचा परिच्छेद (नऊ) मध्ये अंतर्भूत केलेल्या विद्यमान तरतुदींन्वये, एकतर उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने, विमान/हेलीकॉप्टर उतरविण्यापूर्वी किमान २४ तास आधी प्रवास योजना, जिल्ह्यातील उतरविण्याचे स्थळ व विमानातील /हेलीकॉप्टर्समधील प्रवाशांची नावे यांचा तपशील नमूद करून दूरच्या/बिगर-नियंत्रित विमानतळांवर/ धावपट्ट्यांवर विमान उतरविण्याचा अर्ज जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे करावयाचा आहे, जेणे करून जिल्हा निवडणूक अधिकारी सुरक्षेची व कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांची पुरेशी व्यवस्था करू शकेल आणि हेलिपॅडचे समन्वयक देखील उपलब्ध करून देऊ शकेल, असा अर्ज मिळाल्यावर, जिल्हा निवडणूक अधिकारी, प्राधान्य तत्त्वावर त्याच दिवशी परवानगी देईल.

२. आयोगाने, उक्त तरतूद विचारात घेतली असून, निवडणुकीदरम्यान उमेदवारांना/राजकीय पक्षांना होणारे कष्ट विचारात घेता, असा निर्णय घेण्यात आला आहे की, ज्या प्रकरणांमध्ये, उमेदवारांना/राजकीय पक्षांना यापूर्वीच परवानगी देण्यात आलेली आहे, अशा प्रकरणी, उमेदवाराकडून /राजकीय पक्षाकडून शेवटच्या क्षणी हेलिकॉप्टर बदलण्याची विनंती प्राप्त झाली असेल तर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून प्राधान्य तत्त्वावर त्यावर कार्यवाही करण्यात येईल आणि अर्ज प्राप्त मिळाल्यापासून ०३ तासांमध्ये त्याचा निर्णय संबंधित उमेदवाराला किंवा राजकीय पक्षाला कळविण्यात येईल.

३. कृपया हे सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-
**(एस. के. रूदोला),**
सचिव.

सहपत्र. - वरीलप्रमाणे.

**प्रत अग्रेषितः—**

१. सुरक्षा आयुक्त (सीए), नागरी विमानचालन सुरक्षा केंद्र, नागरी विमानचालन मंत्रालय, 'ए' विंग, जनपथ भवन, जनपथ नवी दिल्ली ११० ००१. (विशेष दूताद्वारे)

२. इपीएस विभाग/आदर्श आचारसंहिता विभाग/पूर्व-१ विभाग,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,
**(एस. के. रूदोला),**
सचिव.

**जोडपत्र सी १२**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/ अनुदेश/२०१५/इपीएस/खंड १४ दिनांक २ जून २०१६.

प्रति,

सर्व राज्ये/संघराज्यक्षेत्रे यांचे
मुख्य निर्वाचन अधिकारी,

**विषय** : उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांच्या संबंधात छाननी अहवाल व संक्षिप्त अहवाल करण्याची कार्यपद्धती संबंधी.

महोदय/महोदया,

आयोगाचे पत्र क्र.७६/अनुदेश/२०१३/इपीएस/खंड चार, दिनांक २४ डिसेंबर, २०१३ याच्या अंशतः फेरबदल करताना उमेदवाराद्वारे दाखल केलेला निवडणूक खर्च लेख्यांवर, निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ याच्या नियम ८९ अन्वये, छाननी अहवाल तयार करण्यामध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे अवलंब करावयाची प्रक्रिया याद्वारे सादर करण्याचे निदेश मला आहेत.

वर उल्लेखिलेल्या कार्यपद्धती, आवश्यक कार्यवाहीसाठी आणि अनुपालनासाठी सर्व संबंधितांच्या कृपया निदर्शनास आणून द्यावी. नवीन कार्यपद्धती, संभाव्यपणे लागू करण्यात येईल आणि हे पत्र जारी केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-
**(अविनाश कुमार),**
सचिव.

प्रत :-

१. वरिष्ठ पीपीएस/पीएसओ यांच्याकडून मा. सीईसी/ईसी (जे)/ईसी (आर).
२. पीपीएस यांच्याकडून डीईसी/डीजी.
३. पीए यांच्याकडून सर्व वरिष्ठ प्रधान सचिव, प्रधान सचिव व सचिव.
४. सर्व अवर सचिव.
५. सर्व क्षेत्रीय विभाग/दळणवळण विभाग/सीईएमएस-एक व दोन / संगणक विभाग/पीपीइएमएस/एसडीआर विभाग.

**जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा छाननी व संक्षिप्त अहवाल तयार करण्याकरिता प्रक्रिया**

**१.** प्रत्येक निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास, निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या वैधानिक कालमर्यादेत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे, त्याचा/तिचा निवडणूक खर्चाचा लेखा सादर करणे आवश्यक असेल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून लेखे प्राप्त झाल्याबरोबर, प्रत्येक लेख्याच्या संक्षिप्त विवरणपत्राची छाननी करावी आणि लोकांमध्ये त्याचे विस्तृत प्रसारण होण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून प्राप्त झाल्याच्या ३ दिवसांच्या कालावधीत, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

**२. लेखा पुनर्मेळ बैठक :-**

२.१ निकाल जाहीर झाल्या पासून २६ व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून लेखा पुनर्मेळ बैठक बोलविण्यात येईल, ज्यामध्ये उमेदवाराला, त्याच्या/ तिच्या निवडणूक खर्चाच्या कोणताही असल्यास, कमी सांगितलेल्या खर्चाचा पुनर्मेळ करण्याची दुसरी संधी देण्यात येईल. जिल्हा निवडणूक अधिकारी खातरजमा करील की, प्रत्येक उमेदवाराला निकाल घोषित झाल्याच्या दिवशी किंवा तोपर्यंत या बैठकीबाबत लेखी माहिती दिलेली आहे, जेणेकरून, उमेदवार/त्यांचे निवडणूक प्रतिनिधी बैठकीला उपस्थित राहू शकतील आणि निवडणूक प्रक्रियेदरम्यान गोळा केलेल्या पुराव्यांसह निवडणूक खर्चाच्या त्यांच्या लेखांमध्ये निवडणूक खर्चाच्या विवादास्पद बाबींचा पुनर्मेळ करू शकेल आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून नोटीस (नोटिशी) काढण्यात येईल/येतील.

२.२ निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवाराला कमी सांगितलेल्या रकमेच्या बाबतची कोणतीही नोटीस काढण्यात, आलेली नसेल तर, जिल्हा निवडणूक अधिकारी, उमेदवाराचे उत्तर मिळविण्यासाठी निकाल घोषित झाल्याच्या १५ दिवसांच्या आत पत्र निर्गमित करील. दोन्ही पत्र/ उत्तर यावर लेखा पुनर्मेळ बैठकीमध्ये प्रथम विचार करण्यात येईल आणि त्यानंतर, जिल्हा खर्च संनियंत्रण समितीच्या नोंदविलेल्या मतांसह भारत निवडणूक आयोगाला कळविण्यात येईल.

२.३ लेखा पुनर्मेळ समितीच्या बैठकीत, जिल्हा खर्च संनियंत्रण समिती, लेख्यांची छाननी करील आणि जेथे तफावतींचा पुनर्मेळ होऊ शकलेला नाही अशा प्रकरणांमध्ये तपशीलवार कारणे देऊन लेखी आदेश संमत करील, आणि तो उमेदवाराला / प्रतिनिधीला त्याच दिवशी बजावील. जिल्हा खर्च संनियंत्रण समितीच्या आदेशाशी उमेदवार सहमत असेल तर त्यास/तिला, त्याच्या/तिच्या अंतिम लेख्यांमध्ये समावेश करता येईल. जिल्हा खर्च संनियंत्रण समितीच्या आदेशाशी उमेदवार सहमत नसेल तर, त्यास/तिला, जिल्हा खर्च अधिकाऱ्याकडे त्याचा /तिचा अंतिम लेखा, जिल्हा खर्च अधिकाऱ्याच्या पत्राद्वारे असहमतीच्या कारणांसह दाखल करता येईल.

२.४ उमेदवाराने लेखा पुनर्मेळ समितीच्या बैठकीपूर्वी, त्याच्या/तिचा लेखा आधीच दाखल केला असेल तर, त्यास/तिला, जिल्हा खर्च संनियंत्रण समितीचा निष्कर्षाचा समावेश करण्याच्या दृष्टीने, निवडणुकाचा निकाल जाहीर झाल्याच्या ३० दिवसांच्या वैधानिक कालावधीत, लेखा सुधारित करता येईल.

**३. लेखांची छाननी :—**

३.१ उमेदवारांकडून अंतिम लेखे प्राप्त झाल्यानंतर, त्याची जिल्हा खर्च संनियंत्रण समितीकडून छाननी करण्यात येईल.

३.२ ज्यामध्ये (एक) प्रमाणकांवर सही केलेली नाही (दोन) यथोचितरीत्या शपथ घेऊन शपथपत्र दाखल केलेले नाही (तीन) बँक नोंदवही व रोख नोंदवहीसह दैनंदिन लेख्यांची नोंदवही यावर यथोचितरीत्या सही केलेली नाही. (चार) संक्षिप्त विवरणपत्र (भाग एक ते भाग चार व अनुसूची १ ते १०**) भरलेले नाही/यथोचितरीत्या सही केलेली नाही (पाच) रुपये २०,०००*** पेक्षा अधिक रोख खर्च हा धनादेशाद्वारे केलेला नाही (सहा) बँक खात्याबाहेरील खर्च (सात) बँक खात्याच्या विवरणपत्राच्या स्वयंप्रमाणित प्रती सादर केलेल्या नाहीत आणि (आठ) बँक खाते केव्हाही उघडण्यात आलेले नाही, या प्रक्रियात्मक दोषांचा समावेश असलेले जिल्हा निवडणूक अधिकारी लेखे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३ दिवसांच्या आत, दोषांचे निवारण करण्यासाठी ३ दिवसांची वेळ उमेदवाराला देऊन नोटीस काढील. उमेदवाराच्या उत्तराची जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून तपासणी करण्यात येईल आणि तो नोटिशीची प्रत तसेच उमेदवाराचे उत्तर कोणतेही असल्यास, त्याच्या/तिच्या भाष्यांसह आयोगाकडे पाठवील.

३.३ लेख सादर करण्यास विलंब झाला असेल त्याबाबतीत, जिल्हा निवडणूक अधिकारी, विलंबाचे स्पष्टीकरण मागवण्यासाठी देय दिनांकापासून १५ दिवसांपेक्षा अधिक होणार नाही, एवढ्या कालावधीत उमेदवाराला स्वाधिकारे नोटीस काढील. उमेदवाराच्या उत्तराची तपासणी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून करण्यात येईल आणि तो नोटीशीची प्रत व उमेदवाराचे उत्तर, कोणतेही असल्यास, त्याच्या भाष्यांसह आयोगाकडे पाठविल.

**४.** जिल्हा निवडणूक अधिकारी निवडणूक निकालाची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ३७व्या दिवसापर्यंत विहित नमुन्यातील ( सारसंग्रहाचे जोडपत्र-२१ ) उमेदवारनिहाय छाननी व संक्षिप्त अहवाल अंतिम करील आणि शक्यतो ३८ व्या दिवसापर्यंत मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयाकडे अग्रेषित करील ( अनुदेशांच्या सारसंग्रहाचा परिच्छेद ११.५ ). मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने यथोचितरित्या अग्रेषित केलेले जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे अहवाल, निकाल घोषित झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत आयोगाकडे पोहोचावेत.

**५.** जेथे लेखा पुनर्मळ बैठकीनंतरही मतभेद कायम आहेत अशा प्रकरणात आणि उमेदवाराने योग्यरित्या खर्च केला आहे, याबाबीशी जिल्हा निवडणूक अधिकारी सहमत नाही, जिल्हा निवडणूक अधिकारी छाननी अहवालासह, जिल्हा खर्च संनियंत्रण समितीची/लेखा पुनर्मेळ बैठकीची कार्यवृत्ते, जारी केलेल्या सूचना, उमेदवारांकडील, प्रतिक्रीया, दस्ताक्ता, अभिरूप निरीक्षण नोंदवही, कागदपत्रांसह उमेदवाराची निवडणूक खर्च नोंदवही, यथोचितरित्या दिलेले अनुक्रमांक यांसारख्या संबंधित दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडेल.

**६.** जिल्हा निवडणूक अधिकारी, उमेदवार निहाय छाननी अहवाल अंतिम झाल्याच्या ३ दिवसांच्या कालावधीत, ईई एमएस सॉफ्टवेअरमध्ये**** माहिती नोंदवेल.

**७.** नवीन कार्यपद्धती, ही मार्गदर्शकतत्त्वे जारी झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच २ जून २०१६ पासून भविष्यात लागू होईल.

**टिपा :** *सारसंग्रह सुधारित करण्यात आला असल्यामुळे जोडपत्र-२१ करिता जोडपत्र-सी १३ पहा.

** कृपया जोडपत्र-ई-२ पहा, आता अनुसूच्यांची एकूण संख्या ११ आहे.

*** कृपया जोडपत्र-ई-११ व ई १२ पहा

**** कृपया जोडपत्र सी-१७ पहा.

**जोडपत्र-सी १३**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/इइपीएस/खंड चौदा                दिनांक : २ जून २०१६

प्रति,

सर्व राज्यांचे आणि संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य
निवडणूक अधिकारी,

**विषय :** जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालाचा फेरबदल केलेला नमुना (जोडपत्र-२१) संबंधी.

महोदय/महोदया,

मला निवडणूक खर्च लेख्यावरील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या उमेदवारनिहाय छाननी अहवालासंबंधात "निवडणूक खर्च संनियंत्रणावरील अनुदेशांचा सारसंग्रह (एप्रिल, २०१६)" याचे जोडपत्र-२१ चा संदर्भ पाहण्याचा आणि असे नमूद करण्याचा निदेश आहे की, लेखा पुनर्मेळ बैठक योजनेच्या अंमलबजावणीनंतर, अनुपालनासाठी सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी इत्यादींच्या निदर्शनास आणून देण्याच्या मागणीसह फेरबदल केलेल्या नमुन्यात याद्वारे सादर करण्यात येत आहे. हा नवीन नमुना भविष्यात लागू होईल आणि हे पत्र जारी केल्याच्या दिनांकापासून तो अंमलात येईल.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,
**अविनाश कुमार,**
सचिव.

प्रत :—

१. माननीय मुख्य निवडणूक आयुक्त/निवडणूक आयुक्त (जे)
निवडणूक आयुक्त (आर) यांचे वरिष्ठ पीपीए/पीएसओ.

२. निवडणूक उपायुक्त/महासंचालक यांचे पीपीएस.

३. सर्व वरिष्ठ प्रधान सचिव, प्रधान सचिव आणि सचिव यांचे स्वीय सहायक.

४. सर्व अवर सचिव.

५. सर्व क्षेत्रीय विभाग/संप्रेषण विभाग/सीईएमएस-१ आणि २/संगणक विभाग/पीपीईएम एस/एसडी आर.

**जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या संक्षिप्त अहवालातील उमेदवाराचा अनुक्रमांक ............**

राज्याचे नाव ...................... जिल्ह्याचे नाव ...................... निवडणूक ......................

**लोकसभा किंवा राज्य विधानसभा यासाठी निवडणूक घेण्याबाबतचा नियम, १९६१ याच्या नियम ८९ अन्वये उमेदवाराच्या निवडणूक खर्चावरील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल.**

| अ. क्र. | वर्णन | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांने भरावयाचे |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे नाव व पत्ता. | |
| २. | राजकीय पक्षाचे संलग्नीकरण, कोणतेही असल्यास. | |
| ३. | विधानसभा/लोकसभा मतदारसंघाचे नाव व क्रमांक. | |
| ४. | निर्वाचित उमेदवाराचे नाव. | |
| ५. | निकाल घोषित होण्याचा दिनांक. | |
| ६. | लेखा पुनर्मेळ बैठकीचा दिनांक. | |
| ७. | (एक) उमेदवार किंवा त्याच्या प्रतिनिधीस लेखा पुनर्मेळ बैठक दिनांकाबाबत लेखी कळविण्यात आले होते का? | (एक) होय/नाही. |
| | (दोन) उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहिला होता का? | (दोन) होय/नाही. |
| ८. | लेखा पुनर्मेळ बैठकीनंतर उमेदवाराने सर्व दोषांचा पुनर्मेळ बसवला का ? (होय/नाही). | होय/नाही. |
| | (नसल्यास, पुनर्मेळ न घालू शकलेले दोष रकाना क्रमांक १९ मध्ये दाखविण्यात यावे.) | |
| ९. | लेखा दाखल करण्याचा विहित केलेला अंतिम दिनांक. | |
| १०. | उमेदवाराने लेखे दाखल केले किंवा कसे ? | होय/नाही. |
| ११. | उमेदवाराने लेखे दाखल केले असल्यास, लेखे दाखल करण्याचा दिनांक. | |
| | (एक) मूळ लेखा. | |
| | (दोन) लेखा पुनर्मेळ बैठकीनंतरचा सुधारित लेखा. | |
| १२. | लेखे वेळेत दाखल केले आहेत किंवा कसे? | होय/नाही. |
| १२अ. | वेळेत दाखल केले नसल्यास, विलंबाचा कालावधी | .......... दिवस |
| १३. | लेखे दाखल केले नसल्यास किंवा वेळेत दाखल केले नसल्यास, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने उमेदवाराकडून स्पष्टीकरण मागितले आहे? | होय/नाही. |
| १४. | उमेदवाराने दिलेले स्पष्टीकरण, कोणतेही असल्यास. | |
| १४अ. | उमेदवाराच्या स्पष्टीकरणावर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची भाष्ये ,कोणतीही असल्यास. | |
| १५. | गोषवारा विवरणपत्राच्या भाग-दोन मध्ये उमेदवाराद्वारे कळविलेल्या सर्व निवडणूक खर्चांची एकूण बेरीज. | |
| १६. | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या मते, उमेदवाराने लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ आणि निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ द्वारे आवश्यक रीतीने निवडणूक खर्चांचे लेखे दाखल केले आहेत ? | होय/नाही. |

| अ. क्र. | वर्णन | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांने भरावयाचे |
|---|---|---|
| १७. | नसल्यास, कृपया पुढील दोष तपशिलासह नमूद करा. | |
| | (एक) दैनंदिन लेखा नोंदवही, रोख नोंदवही, बँक नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्र यांचा समावेश असलेली निवडणूक खर्च नोंदवही दाखल करण्यात आली आहे का? | होय/नाही. |
| | (दोन) उमेदवाराने यथोचितरीत्या शपथेवर केलेले शपथपत्र सादर केले आहे काय? | होय/नाही. |
| | (तीन) निवडणूक खर्चाच्या बाबींसंबंधातील आवश्यक प्रमाणके सादर केली आहेत का? | होय/नाही. |
| | (चार) निवडणुकीकरिता स्वतंत्र बँक खाते उघडले आहे का? | होय/नाही. |
| | (पाच) सर्व खर्च बँक खात्यामार्फत केला आहे का? (किरकोळ खर्च वगळून) | होय/नाही. |
| १८. | (एक) दोष दुरूस्त करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने उमेदवारास सूचना दिली होती का? | होय/नाही. |
| | (दोन) उमेदवाराने दोष दुरूस्त केले आहे का? | होय/नाही. |
| | (तीन) वरील बाबींवर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची टिप्पणी दोष दूर केले होते किंवा नाही ? | होय/नाही. |
| १९. | अभिरूप निरीक्षण नोंदवहीमध्ये आणि पुरावा संचिकेमध्ये दाखविलेल्या खर्चासह उमेदवाराने पत्रव्यवहाराद्वारे कळविलेल्या निवडणूक खर्चाच्या बाबी आहेत ?<br>नसल्यास पुढील तपशील नमूद करा : | होय/नाही. |

| | खर्चाच्या बाबी | दिनांक | अभिरूप निरीक्षण नोंदवहीचा पृष्ठ क्रमांक | अभिरूप निरीक्षण नोंदवही पुरावा संचिकेनुसार नमूद केलेली रक्कम | उमेदवाराने केलेल्या लेख्यानुसार रक्कम | उमेदवाराने सांगितल्यानुसार रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| **एक** | | | | | | |
| **दोन, तीन....** | | | | | | |
| **एकूण** | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| २०. | उमेदवाराने निवडणूक मोहीम कालावधीमध्ये ३ वेळा निरीक्षक/निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत व्यक्ती यांना तपासणीसाठी त्याची लेखांकन निवडणूक खर्चाची नोंदवही सादर केली होती का? | होय/नाही. |
| २१. | वर उल्लेखिलेल्या रकाना १९ च्या समोर नमूद केलेल्या तथ्यांशी जिल्हा निवडणूक अधिकारी सहमत नसल्यास पुढील तपशील द्यावेत. | |
| | (एक) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या निदर्शनास आलेले दोष प्रचाराच्या कालावधीत किंवा लेखा पुनर्मेळ बैठकीदरम्यान उमेदवाराच्या निदर्शनास आणून दिले होते का? | होय/नाही. |

| अ. क्र. | वर्णन | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांने भरावयाचे |
|---|---|---|
| | (दोन) असल्यास, इंग्रजी अनुवादासह विसंगतिसंबंधी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांच्या प्रती जोडा. (जर ते प्रादेशिक भाषेत असल्यास) आणि सूचनेचा दिनांक नमूद करा. | |
| | (तीन) उमेदवाराने सूचनेला कोणताही प्रतिसाद दिला आहे का ? | होय/नाही. |
| | (चार) असल्यास, कृपया अशा प्राप्त स्पष्टीकरणांच्या प्रती जोडा, (जर ते प्रादेशिक भाषेत असेल तर त्याचा इंग्रजी अनुवाद) आणि उत्तराचा दिनांक नमूद करा. | |
| | (पाच) उमेदवाराच्या स्पष्टीकरणावर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची भाष्ये/ निरीक्षणे. | |
| २२. | उमेदवाराने योग्यप्रकारे खर्च सादर केला आहे याच्याशी, मुख्य निवडणूक अधिकारी सहमत आहे? (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या संक्षिप्त अहवालाचा रकाना क्रमांक ८ सारखे असावे.) | होय/नाही. |

स्वाक्षरी

दिनांक — जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे नाव.

२३. खर्च निरीक्षक* यांनी टिप्पणी केली असल्यास,—

दिनांक : — खर्च निरीक्षकाची स्वाक्षरी.

* जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या अहवालात सामावण्यात न आलेली काही अधिक तथ्ये खर्च निरीक्षकास दिसून आल्यास, त्याने तशा आशयाची स्वतंत्र टिप्पणी जोडू शकतो.

* * निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे संकलित करण्यात येईल आणि आयोगाकडे पाठविण्यात येईल.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास अतिरिक्त टिप्पणी द्यावी वाटल्यास, तो/ती स्वतंत्रपणे टिप्पणी पाठवेल.

## उमेदवारांकडून निवडणूक खर्चाचे हिशेब दाखल करण्यासंबंधी प्रत्येक मतदारसंघासाठीचा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा संक्षिप्त अहवाल :

(क) विधानसभा/लोकसभा मतदार संघाचे नाव व क्रमांक :

(ख) निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या :

(ग) राज्य व जिल्हा :

(घ) निवडणूक /पोट निवडणूक याचा निकाल घोषित करण्याचा दिनांक :

(ङ) हिशेब दाखल करण्याचा अंतिम दिनांक :

(च) निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव :

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | | (१०) | | (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | उमेदवाराचे व संलग्न पक्षाचे नाव. | हिशेब दाखल करण्याचा नियत दिनांक. | उमेदवाराने हिशेब दाखल करण्याचा दिनांक. | हिशेब विहित नमुन्यात दाखल केले किंवा कसे (होय किंवा नाही). | कायद्यानुसार आवश्यक रितीने हिशेब दाखल केले किंवा कसे (होय किंवा नाही). | उमेदवाराने / एजंटाने केलेल्या अधिकृत खर्चाची रकमेची एकूण बेरीज (गोषवारा विवरणाच्या भाग दोन मध्ये नमूद केल्याप्रमाणे). | खर्चाच्या सर्व बाबी अनुसार उमेदवाराने दाखविलेल्या रकमेची जिल्हा निवडणूक अधिकारी सहमत आहे किंवा कसे (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या छाननी अहवालाचा मुद्दा क्र. २२ सारखाच असावा. म्हणजेच जोडपत्र-सी-३). | पक्षाने केलेला एकूण खर्च गोषवारा(विवरण भाग-तीन मध्ये कळविल्याप्रमाणे). | | गोषवारा विवरण भाग-तीन मध्ये कळविल्याप्रमाणे इतर/ वस्तूच्या स्वरुपात केलेला एकूण खर्च. | | खर्च निरीक्षकाचा शेरा. |
| | | | | | | | | प्रत्येक राजकीय पक्षाने उमेदवाराला दिलेल्या रोख रकमेतील किंवा धनादेशातील ठोक रक्कम | राजकीय पक्षाद्वारे वस्तुच्या स्वरुपातील इतर खर्चाची एकूण रक्कम. | उमेदवाराला दिलेल्या रोख रकमा किंवा धनादेश यातील ठोक रक्कम (तसेच देणगादारांची नावे नमूद करा.) | उमेदवारसाठी वस्तू स्वरुपात केलेल्या इतर खर्चाची एकूण रक्कम. | |

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

खर्च निरीक्षकाची भाष्ये, असल्यास ______________________________

दिनांक :

खर्च निरीक्षकाची स्वाक्षरी.

**जोडपत्र-सी १४**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/इसीआय/अनुदेश/एफयुएनसी/इइएम/इइपीएस/२०१७/खंड-एकोणीस दिनांक : १३ डिसेंबर, २०१७

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी
तामिळनाडू
चेन्नई

**विषय :** ११- डॉ. राधाकृष्णन नगर विधानसभा मतदारसंघ पोट निवडणूक, तामिळनाडू, २०१७-दर दरपत्रकामधून टी-शर्ट, साडी इत्यादींसारख्या बाबी वगळणे-संबंधी.

महोदय,

आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, चेन्नईच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून काढण्यात आलेल्या दर तक्त्यामध्ये साडी, धोतर, ब्लँकेट इत्यादींसारख्या काही वस्तूंचा खर्चाच्या वैध वस्तू म्हणून समावेश करण्यात आला आहे आणि अनेक उमेदवारांनी निवडणुकीतील खर्चाच्या त्यांच्या दैनंदिन लेख्यात टी-शर्ट व साडीवरील झालेला खर्च दर्शविला आहे. या संदर्भात, निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह या मधील प्रकरण घ चा परिच्छेद ५ आणि आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०११/इ इ एम, दिनांक ७ एप्रिल २०११ जोडपत्र-घ९ *) (प्रत जोडलेली आहे) नुसार निर्देश देण्याचा आणि पुन्हा सांगण्याचा की, पक्ष/ उमेदवारांना साडी, शर्ट, टी-शर्ट, धोतर इत्यादीसारख्या मुख्य पोशाखांचा पुरवठा व वितरण करण्याची परवानगी नाही, कारण ती मतदारांना दिलेली लाचखोरी आहे. दर तक्त्यामध्ये या प्रकारच्या मुख्य पोशाखांचा समावेश केल्याने असा समज झाला आहे की, निवडणूक प्राधिकरणाने पक्षांना/उमेदवारांना मतदारांना आमिष दाखवण्यासाठी या वस्तूंचे वाटप करण्याची परवानगी दिली आहे.

तद्नुसार, जिल्हा निवडणूक अधिकारी, चेन्नई यांना परिणामतः दर तक्त्यामधून या वस्तू वगळण्याचा आणि हे तात्काळ सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि निवडणूक प्राधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्याचा निदेश दिला आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,
**मुकेश कुमार,**
अवर सचिव.

*सारसंग्रह सुधारित करण्यात आल्या कृपया जोडपत्र-डी ९ करीता जोडपत्र-डी-७ पहावे.

**जोडपत्र-सी १५**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/इसीआय/अनुदेश/एफयुएनसी/इइएम/इइपीएस/२०१९/खंड-सहा    दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्राचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे निवडणूक कालावधी दरम्यान ३ वेळा उमेदवारांच्या लेख्यांच्या तपासणीकरिता दिनांक निश्चित करणे-संबंधी.

महोदय/महोदया,

मला हे सांगण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, मागील निवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांद्वारे व खर्च निरीक्षकांद्वारे उमेदवारांच्या लेख्यांची तपासणी करण्याकरिता वेगवेगळे दिनांक निश्चित केल्याची उदाहरणे घडली आहेत. यासंबंधात, मला असे पुन्हा सांगण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, "निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशाचा सारसंग्रह (फेब्रुवारी २०१९)" (प्रत जोडलेली आहे) याच्या भाग "सी" मधील "लेख्यांची तपासणी" या उपशीर्षाखालील "शीर्ष निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची भूमिका" यात घालून दिल्याप्रमाणे आयोगाच्या अनुदेशांच्या अनुसार, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, खर्च निरीक्षकाशी सल्लामसलत करून प्रत्येक उमेदवाराच्या खर्च नोंदवहीच्या तपासणीकरिता एक वेळापत्रक तयार करणे आवश्यक आहे. उमेदवारांची खर्चाची नोंदवही तपासणीकरिता तीन तारखा निश्चित करण्यात येतील, त्या अशाप्रकारे कराव्यात की, दोन तपासण्यामध्ये किमान तीन दिवस अंतर असेल आणि शेवटची तपासणी, मतदानाच्या दिवसापासून ३ दिवसांअगोदर निश्चित केलेली नसावी.

२. आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक अनुपालनाकरिता आणि आयोगाच्या अनुदेशांच्या उपरोक्त तरतुदींनुसार उमेदवारांच्या खर्च नोंदवहीच्या तपासणीसाठी तारखा निश्चित करण्यासाठी सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे आणि

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,
**राजन जैन,**
अवर सचिव.

**जोडपत्र-सी १६**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ३/४/२०१९/एस जी आर-खंड-एक दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

सर्व राज्याचे आणि संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय :** नमुना-२६ मध्ये सुधारणा (उमेदवाराने भरावयाचा शपथपत्राचा नमुना)

महोदय/महोदया,

मला उपरोक्त विषयावरील आयोगाचे पत्र क्रमांक ३/४/२०१७/एसडी आर/खंड दोन, दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ च्या संदर्भ मागविण्याचा आहेत, आणि असे सांगण्याचा निर्देश देण्यात आला आहे की निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ सोबत जोडलेल्या नमुना २६ मध्ये विधि व न्याय मंत्रालय, अधिसूचना क्रमांक एस ओ १०२३ (इ) दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ (प्रत जोडलेली आहे). द्वारे आणखी सुधारणा करण्यात आली आहे. सुधारणांचा समावेश केल्यानंतरचा एक एकत्रित नमुना-२६ यासोबत जोडलेला आहे. उमेदवारांना आता या सुधारणा केलेल्या नमुना-२६ मध्ये शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

२. हे पत्र आवश्यक कार्यवाहीसाठी राज्य/संघ राज्यक्षेत्रातील सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांना पाठविण्यात येईल. हे राज्यामधील सर्व राजकीय पक्ष म्हणजेच, मान्यताप्राप्त पक्षांचे राज्यातील घटक आणि इतर राज्याच्या मान्यताप्राप्त राज्य पक्षांना देखील आणि तुमच्या राज्य/संघ राज्यक्षेत्रामध्ये असलेल्या मुख्यालयासह सर्व नोंदणीकृत मान्यता नसलेले राजकीय पक्ष, यांनादेखील नमुना २६ मधील सुधारणा लक्षात घेऊन, अनुदेशांसह वितरित करण्यात येईल. यास पुरेशा प्रसिद्धी देखील देण्यात यावी जेणेकरून सर्व संबंधितांना नमुना २६ मधील सुधारणांची माहिती होईल.

३. कृपया पोच द्यावी आणि केलेल्या कार्यवाहीची पुष्टी द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,
**(एन. टी. भुतिया),**
सचिव.

**नमुना २६**

(नियम ४अ पहा)

अलिकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र येथे चिकटवावे.

............................................ (मतदारसंघाचे नाव) मतदारसंघातून ....................................... (सभागृहाचे नाव) निवडणुकीकरिता उमेदवाराने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमक्ष, नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र.

**भाग-अ**

मी, ..................................................., .................................................... यांचा / यांची ** मुलगा / मुलगी / पती / पत्नी, वय .................. वर्षे, राहणार ..........................................................................................................

..........................................................................................................................................................................

(टपालाचा पूर्ण पत्ता नमूद करावा.) वरील निवडणुकीसाठी उमेदवार असून याद्वारे पुढीलप्रमाणे गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो / करते व शपथेवर असे नमूद करतो / करते की :—

(१) मी, .................................................. (** राजकीय पक्षाचे नाव) पक्षाने उभा केलेला उमेदवार म्हणून / ** अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे. (** लागू नसलेला मजकूर खोडावा).

(२) माझे नाव, ........................................................................................ (मतदारसंघाचे नाव आणि राज्य) ............................ यादी भाग क्रमांक ........................... मधील अनुक्रमांक – येथे नोंदवलेले आहे.

(३) संपर्क साधण्यासाठी माझा माझे दूरध्वनी क्रमांक (क्रमांक) ........................ हा आहे / हे आहेत आणि माझा ई-मेल आयडी (कोणताही असल्यास) ........................ आहे आणि माझे समाज माध्यम खाते (खाती) (कोणतीही असल्यास) पुढीलप्रमाणे आहेत.

(एक) ..........................................................................................................................................

(दोन) ..........................................................................................................................................

(तीन) ..........................................................................................................................................

(४) स्थायी लेखा क्रमांक (पॅन) आणि आयकर विवरणपत्र भरल्याची स्थिती याबाबतचा तपशील :—

| अ. क्र. | नावे | स्थायी लेखा क्रमांक (पॅन) | ज्या वित्तीय वर्षासाठी शेवटी आयकर विवरणपत्र भरण्यात आले आहे ते वित्तीय वर्ष | मागील पाच वित्तीय वर्षांचे (३१ मार्च रोजी असल्याप्रमाणे आयकर विवरणपत्रामध्ये दर्शविलेले एकूण उत्पन्न (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | स्वतः | | | (एक) |
| २. | पती / पत्नी | | | (दोन) |
| ३. | हिंदू अविभक्त कुटुंब (जर उमेदवार कर्ता किंवा समान उत्तराधिकारी असल्यास) | | | (तीन) |

| अ. क्र. | नावे | स्थायी लेखा क्रमांक (पॅन) | ज्या वित्तीय वर्षासाठी शेवटी आयकर विवरणपत्र भरण्यात आले आहे ते वित्तीय वर्ष | मागील पाच वित्तीय वर्षांचे (३१ मार्च रोजी असल्याप्रमाणे आयकर विवरणपत्रामध्ये दर्शविलेले एकूण उत्पन्न (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| ४. | अवलंबित व्यक्ति-१ | | | (चार) |
| ५. | अवलंबित व्यक्ति-२ | | | (पाच) |
| ६. | अवलंबित व्यक्ति-३ | | | (सहा) |

**टीप.—** पॅन धारकासाठी पॅन नमूद करणे अनिवार्य आहे आणि पॅन नसल्यास, "पॅन मिळालेले नाही" असे स्पष्टपणे नमूद करावे.

**(५) प्रलंबित फौजदारी खटले**

(एक) मी असे घोषित करतो/करते की, माझ्या विरोधात कोणताही फौजदारी खटला प्रलंबित नाही. (जर उमेदवाराच्या विरोधात कोणताही खटला प्रलंबित नसेल तर, या पर्यायापुढे ✓ खूण करा आणि खालील पर्याय (दोन) च्या पुढे **लागू नाही** असे लिहा.)

**किंवा**

(दोन) माझ्या विरोधात पुढील फौजदारी खटले प्रलंबित आहेत :

[जर उमेदवाराच्या विरोधात फौजदारी खटले प्रलंबित असतील तर या पर्यायापुढे ✓ खूण करावी आणि वरील पर्याय (एक) खोडावा आणि सर्व प्रलंबित खटल्यांचा तपशील खालील तक्त्यात द्यावा]

**तक्ता**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (क) | संबंधित पोलीस ठाण्याचे नाव व पत्ता यासह प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) क्रमांक | | | |
| (ख) | न्यायालयाच्या नावासह खटला क्रमांक | | | |
| (ग) | अंतर्भूत असलेल्या संबंधित अधिनियमांची/संहितेची कलम (कलमे) (कलम क्रमांक द्यावा. उदा. भारतीय दंड संहितेचे कलम...... इत्यादी) | | | |
| (घ) | अपराधाचे संक्षिप्त वर्णन | | | |
| (ङ) | दोषारोप ठेवण्यात आले आहेत किंवा कसे (**होय** अथवा **नाही** ते नमूद करा) | | | |
| (च) | जर वरील 'ङ' चे उत्तर **होय** असेल तर ज्या दिनांकास दोषारोप ठेवण्यात आलेला आहे तो दिनांक | | | |
| (छ) | कार्यवाहीच्या विरोधात पुनरिक्षणासाठी कोणतेही अपील / अर्ज दाखल करण्यात आला आहे किंवा कसे (**होय** अथवा **नाही** ते नमूद करा.) | | | |

**(६) सिद्धापराधी ठरविलेले खटले**

(एक) मी असे घोषित करतो/करते की, कोणत्याही फौजदारी अपराधासाठी मला सिद्धदोषी ठरविण्यात आलेले नाही. (जर उमेदवारास सिद्धापराधी ठरविण्यात आलेले नसेल तर, या पर्यायापुढे ✓ खूण करावी आणि खालील पर्याय (दोन) च्या पुढे **लागू नाही** असे लिहावे.)

**किंवा**

(दोन) खाली नमूद केलेल्या अपराधांसाठी मला सिद्धदोषी ठरविण्यात आले आहे ः

(जर उमेदवारास दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल तर या पर्यायापुढे ✓ खूण करावी आणि वरील पर्याय (एक) खोडावा आणि खालील तक्त्यात तपशील द्यावा)

**तक्ता**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (क) | खटला क्रमांक | | | |
| (ख) | न्यायालयाचे नाव | | | |
| (ग) | संबंधित अधिनियमांची/संहितेची कलम (कलमे) (कलम क्रमांक द्यावा, उदा. भारतीय दंड संहितेचे कलम......, इत्यादी) | | | |
| (घ) | ज्याकरिता सिद्धदोषी ठरविण्यात आलेले आहे त्या अपराधाचे संक्षिप्त वर्णन | | | |
| (ङ) | सिद्धदोषी ठरविल्याच्या आदेशांचे दिनांक | | | |
| (च) | ठोठावलेली शिक्षा | | | |
| (छ) | सिद्धदोषी ठरविल्याच्या आदेशाविरोधात कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले आहे किंवा कसे (होय अथवा नाही ते नमूद करावे) | | | |
| (ज) | जर वरील (छ) चे उत्तर **होय** असे असल्यास, अपिलाचा तपशील व सद्यःस्थिती द्यावी. | | | |

**(६क)** परिच्छेद (५) व (६) मध्ये दिल्याप्रमाणे माझ्या विरोधात प्रलंबित असलेल्या सर्व फौजदारी खटल्यांची आणि सिद्धदोषी ठरविलेल्या सर्व खटल्यांची संपूर्ण आणि अद्यावत माहिती मी माझ्या राजकीय पक्षाला दिलेली आहे. **(ज्या उमेदवारांना, ही बाब लागू नाही त्यांनी वरील ५ (एक) व ६ (एक) मधील नोंदीबाबत लागू नाही असे स्पष्टपणे लिहावे.)**

**टीप :**

**१. माहिती स्पष्टपणे व सुवाच्यपणे ठळक अक्षरांत नोंदवावी.**

**२. प्रत्येक खटल्याकरिता वेगवेगळ्या रकान्यात प्रत्येक बाबीसमोर स्वतंत्रपणे तपशील द्यावा.**

**३. खटल्यांचा तपशील उलट क्रमाने म्हणजेच अलीकडच्या खटल्यांचा तपशील आधी द्यावा आणि अन्य खटल्यांचा तपशील त्यानंतर तारखांच्या क्रमाने द्यावा.**

**४. आवश्यकता असल्यास, अतिरिक्त कागद जोडावा.**

**५. २०११ च्या रिट विनंती अर्ज (सी) क्र. ५३६ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करण्याकरिता सर्व माहिती पुरविण्यासाठी उमेदवार जबाबदार असेल.**

(७) माझ्या स्वतःच्या, माझ्या पत्नीच्या / पतीच्या व माझ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींच्या मत्तांचा (स्थावर व जंगम इत्यादी) तपशील यात याखाली मी देत आहे :

**क. जंगम मत्तांचा तपशील :—**

टीप १ : संयुक्त मालकीची व्याप्ती दर्शविणाऱ्या संयुक्त नावावर असलेल्या मत्तांचा तपशील देखील द्यावयाच्या आहे.

टीप २ : ठेवीच्या / गुंतवणूक यांच्याबाबतीत, अनुक्रमांक, रक्कम, ठेव ठेवल्याचा दिनांक, योजना, बँकेचे / संस्थेचे नाव व शाखा यांचा समावेश असलेला तपशील द्यावयाचा आहे.

टीप ३ : सूचीबद्ध कंपनीच्या बाबतीत शेअर बाजारातील चालू बाजार मूल्यानुसार आणि सूचीबद्ध नसलेल्या कंपनीच्या बाबतीत पुस्तकानुसार बंधपत्रे / शेअर्स, ऋणपत्रे यांचे मूल्य देण्यात यावे.

टीप ४ : **'' अवलंबित व्यक्ती'' याचा अर्थ, उमेदवाराचे आईवडील, मुलगा (मुले), मुलगी (मुली) किंवा पती / पत्नी आणि ज्याच्याकडे उत्पन्नाचे स्वतंत्र साधन नाही आणि जे स्वत:च्या निर्वाहासाठी उमेदवारावर अवलंबून आहेत अशा उमेदवाराशी संबंधित असलेली इतर कोणतीही व्यक्ती, मग त्या रक्ताच्या नात्याने अथवा विवाहामुळे असो,— असा आहे.**

टीप ५ : प्रत्येक गुंतवणुकीच्या बाबतीत रकमेसह स्वतंत्रपणे तपशील द्यावयाचा आहे :

टीप ६ : तपशीलांमध्ये समुद्रपार मालमत्तेतील हितसंबंध किंवा मालकी समाविष्ट असावी.

**स्पष्टीकरण.**— या नमुन्याच्या प्रयोजनाकरिता, "समुद्रपार मालमत्ता" या शब्दप्रयोगामध्ये विदेशी बँका आणि विदेशातील इतर कोणतेही मंडळ किंवा संस्थांमधील सर्व जमा किंवा गुंतवणुकीचा तपशील आणि परदेशातील सर्व मालमत्ता व दायित्त्वाचा तपशील समाविष्ट आहे.

| अ. क्र. | वर्णन | स्वतः | पती / पत्नी | हिंदू अविभक्त कुटुंब | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (एक) | हातातील रोख रक्कम | | | | | | |
| (दोन) | बँक खात्यातील ठेवी (एफ.डी.आर. मुदत ठेवी आणि बचत खात्यासह सर्व इतर प्रकारच्या ठेवी), वित्तीय संस्था, बँकेतर वित्तीय कंपन्या आणि सहकारी संस्था यांमधील ठेवी व अशा प्रत्येक ठेवीची रक्कम यांचा तपशील. | | | | | | |
| (तीन) | बंधपत्रे, ऋणपत्रे/शेअर्स यामधील गुंतवणुकीचा आणि कंपन्या/म्युच्युअल फंड व इतर यांमधील गुंतवणुकीचा तपशील व रक्कम. | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (चार) | राष्ट्रीय बचत योजना, डाक बचती, विमापत्रे यामधील गुंतवणुकीचा आणि डाक कार्यालयातील किंवा आयुर्विमा कंपनीत कोणतेही वित्तीय संलेख यात केलेल्या गुंतवणुकांचा तपशील व रक्कम. | | | | | | | |
| (पाच) | कोणतीही व्यक्ती किंवा भागीदारी संस्था, कंपनी, न्यास, इत्यादीसह संस्था यास दिलेली वैयक्तिक कर्जे/आगाऊ रकमा आणि ऋणकोकडून इतर प्राप्त देणी आणि रक्कम. | | | | | | | |
| (सहा) | मोटार वाहने/विमाने/विहार नौका/जहाजे (बनावट नोंदणी क्रमांक, इत्यादींचा तपशील, खरेदी केल्याचे वर्ष व रक्कम). | | | | | | | |
| (सात) | जडजवाहीर, सोनेचांदी व मौल्यवान वस्तू (वजन व किंमत याबाबतचा तपशील द्यावा). | | | | | | | |
| (आठ) | अन्य कोणतीही मत्ता जसे की, हक्क मागण्या/व्याज यांचे मूल्य. | | | | | | | |
| (नऊ) | एकूण स्थूल मूल्य. | | | | | | | |

**ख. स्थावर मत्तांचा तपशील :—**

**टीप १ :** संयुक्त मालकीची व्याप्ती दर्शविणाऱ्या संयुक्त मालकीच्या मालमत्ता देखील दर्शवावयाच्या आहेत.

**टीप २ :** या नमुन्यामध्ये प्रत्येक जमीन किंवा इमारत किंवा वेश्म यांचा तपशील स्वतंत्रपणे नमूद करण्यात यावा.

**टीप ३ :** तपशीलांमध्ये समुद्रपर मालमत्तेमधील हितसंबंध किंवा मालकी समाविष्ट असावी.

| अ. क्र. | वर्णन | स्वतः | पती / पत्नी | हिंदू अविभक्त कुटुंब | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (एक) | **शेतजमीन**<br>-ठिकाण (ठिकाणे)<br>-भूमापन क्रमांक<br>(भूमापन क्रमांक) | | | | | | |
| | क्षेत्र (एकूण आकारमान एकरामध्ये) | | | | | | |
| | मालमत्ता वारसाप्राप्त आहे किंवा कसे (होय किंवा नाही.) | | | | | | |
| | स्वतः संपादन केलेल्या मालमत्तेच्या बाबतीत खरेदीचा दिनांक | | | | | | |
| | खरेदीच्या वेळी असलेली जमिनीची किंमत (खरेदी केली असल्यास). | | | | | | |
| | विकास, बांधकाम इत्यादींच्या मार्गाने जमिनीवर केलेली कोणतीही गुंतवणूक | | | | | | |

| अ. क्र. | वर्णन | स्वतः | पती / पत्नी | हिंदू अविभक्त कुटुंब | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अदमासे चालू बाजार मूल्य. | | | | | | |
| (दोन) | **बिगरशेती जमीन :**<br>ठिकाण (ठिकाणे)<br>भूमापन क्रमांक<br>(भूमापन क्रमांक) | | | | | | |
| | क्षेत्र (एकूण आकारमान चौरस फुटामध्ये). | | | | | | |
| | मालमत्ता वारसाप्राप्त आहे किंवा कसे (होय किंवा नाही). | | | | | | |
| | स्वतः संपादित मालमत्तेच्या बाबतीत खरेदीचा दिनांक | | | | | | |
| | खरेदीच्या वेळी असलेली जमिनीची किंमत (खरेदी केली असल्यास). | | | | | | |
| | विकास, बांधकाम, इत्यादीच्या मार्गाने जमिनीवर केलेली कोणतीही गुंतवणूक | | | | | | |
| | अदमासे चालू बाजार मूल्य. | | | | | | |
| (तीन) | **वाणिज्यिक इमारती**<br>(वेश्मांसह करून) ठिकाण (ठिकाणे)<br>भूमापन क्रमांक (भूमापन क्रमांक). | | | | | | |
| | क्षेत्र (चौरस फुटामध्ये एकूण आकारमान). | | | | | | |
| | बांधकाम क्षेत्र (चौरस फुटामध्ये एकूण आकारमान) | | | | | | |
| | मालमत्ता वारसाप्राप्त आहे किंवा कसे (होय किंवा नाही). | | | | | | |
| | स्वतः संपादित मालमत्तेच्या बाबतीत खरेदीचा दिनांक | | | | | | |
| | खरेदीच्या वेळी असलेले मालमत्तेचे मूल्य (खरेदी केली असल्यास). | | | | | | |
| | विकास, बांधकाम, इत्यादीच्या मार्गाने मालमत्तेमध्ये केलेली कोणतीही गुंतवणूक | | | | | | |
| | अदमासे चालू<br>बाजार मूल्य. | | | | | | |

| अ. क्र. | वर्णन | स्वतः | पती / पत्नी | हिंदू अविभक्त कुटुंब | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (चार) | **निवासी इमारती** (वेश्मांसह) ठिकाण (ठिकाणे) भूमापन क्रमांक (क्रमांक). | | | | | | |
| | क्षेत्र (एकूण आकारमान चौरस फुटामध्ये). | | | | | | |
| | बांधकाम क्षेत्र (एकूण आकारमान चौरस फुटामध्ये). | | | | | | |
| | मालमत्ता वारसाप्राप्त आहे किंवा कसे (होय किंवा नाही). | | | | | | |
| | स्वतः संपादित मालमत्तेच्या बाबतीत खरेदीचा दिनांक | | | | | | |
| | खरेदीच्या वेळी असलेले मालमत्तेचे मूल्य (खरेदी केली असल्यास). | | | | | | |
| | विकास, बांधकाम, इत्यादीच्या मार्गाने जमिनीवर केलेली कोणतीही गुंतवणूक. | | | | | | |
| | अदमासे चालू बाजार मूल्य. | | | | | | |
| (पाच) | इतर (जसे की मालमत्तेमधील हितसंबंध). | | | | | | |
| (सहा) | वरील (एक) ते (पाच) चे एकूण चालू बाजार मूल्य. | | | | | | |

**(८)** मी, यात याखाली, सार्वजनिक वित्तीय संस्थांच्या व शासनाच्या दायित्वांचा/देय रकमांचा तपशील देत आहे :—

**(टीप :** कृपया बँकेचे, संस्थेचे, परिसंस्थेचे किंवा व्यक्तीचे नाव यांचा स्वतंत्र तपशील देऊन प्रत्येक बाबीसमोर रक्कम द्यावी.)

| अ. क्र. | वर्णन | स्वतः | पती / पत्नी | हिंदू अविभक्त कुटुंब | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (एक) | **बँकेचे/वित्तीय संस्थेचे (संस्थांचे) कर्ज किंवा देय रकमा,** बँकेचे किंवा वित्तीय संस्थांचे नाव, अदत रक्कम, कर्जाचे स्वरूप. | | | | | | |
| | **वर नमूद केलेल्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचे/संस्थेचे कर्ज किंवा देय रकमा,** नाव (नावे), अदत रक्कम, कर्जाचे स्वरूप | | | | | | |
| | इतर कोणतेही दायित्व | | | | | | |
| | दायित्वांची एकूण बेरीज | | | | | | |

| अ. क्र. | वर्णन | स्वतः | पती / पत्नी | हिंदू अविभक्त कुटुंब | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (दोन) | **शासनाच्या देय रकमा :**<br>शासकीय निवासस्थानाशी संबंधित असणाऱ्या विभागांच्या देय रकमा. | (अ) अभिसाक्षीने (Deponent) विद्यमान निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी मागील दहा वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी शासनाने दिलेल्या निवासस्थानाचा ताबा घेतला होता काय ?<br>(ब) वरील (अ) चे उत्तर होय असल्यास, पुढील घोषणापत्र सादर करण्यात यावे :—<br>(एक) शासकीय निवासस्थानाचा पत्ता :<br>....................................................................<br>....................................................................<br>....................................................................<br>....................................................................<br>(दोन) वरील शासकीय निवासस्थानाच्या बाबतीत पुढील कोणतीही देणी देय नाहीत :<br>(अ) भाडे ;<br>(ब) विद्युत आकार ;<br>(क) पाणीपट्टी ; आणि<br>(ड) ................. दिनांक पर्यंतचे दूरध्वनी आकार<br>(हा दिनांक, ज्या महिन्यात निवडणूक अधिसूचित केलेली आहे त्या महिन्याच्या पूर्वीच्या तिसऱ्या महिन्याच्या शेवटची किंवा त्यानंतरची कोणताही दिनांक असावा.)<br>**टीप :** वरील शासकीय निवासस्थानासाठी भाडे, विद्युत आकार, पाणीपट्टी, दूरध्वनी आकार यांच्यासंबंधातील संबंधित एजन्सीकडून घेतलेले ' ना-देय प्रमाणपत्र ' सादर करावे. | | | | | होय/नाही(कृपया योग्य पर्यायापुढे खूण करा.) |
| (तीन) | शासकीय परिवहनाशी संबंधित असलेल्या विभागाच्या देय रकमा (विमाने व हेलिकॉप्टर यांसह). | | | | | | |

| (चार) | आयकराच्या देय रकमा | स्वतः | पती / पत्नी | अवलंबित व्यक्ती-१ | | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (पाच) | वस्तू व सेवा कराच्या देय रकमा | | | | | | |
| (सहा) | महानगरपालिका मालमत्ता कराच्या देय रकमा. | | | | | | |
| (सात) | इतर कोणत्याही देय रकमा | | | | | | |
| (आठ) | सर्व शासकीय देय रकमांची एकूण बेरीज. | | | | | | |
| (नऊ) | इतर कोणतीही दायित्वे वादग्रस्त आहेत किंवा कसे, असल्यास, त्यात अंतर्भूत असलेली रक्कम नमूद करावी आणि ज्या प्राधिकरणासमोर ती प्रलंबित आहेत त्या प्राधिकरणांचा उल्लेख करावा. | | | | | | |

**(९) व्यवसाय किंवा नोकरीचा तपशील :—**

(अ) स्वत : ..............................................................................................................

(ब) पती/पत्नी : ..............................................................................................................

**(९-अ) उत्पन्नाच्या स्त्रोताचा (स्त्रोतांचा) तपशील :—**

(अ) स्वत : ..............................................................................................................

(ब) पती/पत्नी : ..............................................................................................................

(क) अवलंबित व्यक्तीच्या (कोणत्याही असल्यास), उत्पन्नाचा स्त्रोत ..................................................

**(९-ब) समुचित शासनाशी आणि कोणत्याही सार्वजनिक कंपनीशी किंवा कंपन्यांशी केलेली कंत्राटे :—**

(अ) उमेदवाराने केलेल्या कंत्राटांचा तपशील ..................................................................

(ब) पतीने/पत्नीने केलेल्या कंत्राटांचा तपशील : ..................................................................

(क) अवलंबून असणाऱ्या व्यक्तींनी केलेल्या कंत्राटांचा तपशील : ..................................................

(ड) ज्यामध्ये उमेदवार/पती/पत्नी किंवा अवलंबून असणाऱ्या व्यक्ती हितसंबंधित आहेत अशा अविभक्त हिंदू कुटुंबाने किंवा न्यासने केलेल्या कंत्राटांचा तपशील. ..................................................................

(ई) ज्यामध्ये उमेदवार/पती/पत्नी किंवा अवलंबून असणाऱ्या व्यक्ती भागीदार आहेत अशा भागीदारी संस्थेने केलेल्या कंत्राटांचा तपशील.

(फ) ज्यामध्ये उमेदवार/पती/पत्नी किंवा अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचे शेअर्स आहेत अशा खाजगी कंपनीने केलेल्या कंत्राटांचा तपशील. ..................................................................

**(१०)** माझी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे : ..................................................................

..............................................................................................................

(प्रमाणपत्र/पदविका/पदवी पाठ्यक्रम यांचे पूर्ण नाव, शाळेचे/महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे नाव आणि ज्यावर्षी पाठ्यक्रम पूर्ण केला ते वर्ष नमूद करून उच्च शालेय शिक्षणाचा/विद्यापीठ शिक्षणाचा तपशील द्यावा.)

## भाग-ब

**(११) भाग-अ च्या (१) ते (१०) मध्ये देण्यात आलेल्या तपशिलाच गोषवारा :—**

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे नाव | श्री./श्रीमती/कुमार/कुमारी |
| २. | टपालाचा संपूर्ण पत्ता | |
| ३. | मतदार संघाचा क्रमांक व नाव आणि राज्य | |
| ४. | ज्या राजकीय पक्षाकडून उमेदवार उभा आहे त्या पक्षाचे नाव (अन्यथा अपक्ष असे लिहावे.) | |
| ५. | **प्रलंबित असणाऱ्या फौजदारी खटल्यांची एकूण संख्या** | |
| ६. | **सिद्धदोषी ठरविलेल्या खटल्यांची एकूण संख्या** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | | पॅन क्रमांक | ज्यावर्षी शेवटी आयकर विवरणपत्र दाखल करण्यात आले ते वर्ष | दर्शविलेले एकूण उत्पन्न |
| | (अ) उमेदवार | | | |
| | (ब) पती/पत्नी | | | |
| | (क) हिंदू अविभक्त कुटुंब | | | |
| | (ड) अवलंबित व्यक्ती | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | (परदेशात असलेल्या मत्ते सह) रुपयांमध्ये मत्ता व दायित्वाचा तपशील | | | | | | | |
| | | | वर्णन | स्वतः | पती/पत्नी | अवलंबित व्यक्ती-१ | अवलंबित व्यक्ती-२ | अवलंबित व्यक्ती-३ |
| | (अ) | | **जंगम मत्ता (एकूण मूल्य)** | | | | | |
| | (ब) | | स्थावर मत्ता | | | | | |
| | | (एक) | स्वसंपादित केलेल्या स्थावर मालमत्तेची खरेदी किंमत | | | | | |
| | | (दोन) | खरेदी केल्यानंतर स्थावर मालमत्तेचा विकासाचा/ बांधकामाचा खर्च (लागू असल्यास) | | | | | |
| | | (तीन) | अदमासे चालू बाजार किंमत | | | | | |
| | | | स्वयंपादित मत्ता (एकूण) मूल्य. | | | | | |
| | | | वारसाप्राप्त मत्ता (एकूण मूल्य). | | | | | |
| ९. | दायित्वे | | | | | | | |
| | | (एक) | शासकीय देणी (एकूण) | | | | | |
| | | (दोन) | बँक, वित्तीय संस्था व इतर यांच्याकडून घेतलेली कर्जे (एकूण). | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | वादग्रस्त असलेली दायित्वे | | | | | | |
| | (एक) | शासकीय देणी (एकूण) | | | | | |
| | (दोन) | बँक, वित्तीय संस्था व इतर यांच्याकडून घेतलेली कर्जे (एकूण). | | | | | |
| ११. | उच्चतम शैक्षणिक अर्हता : ................................................................................................................................ ................................................................................................................................ (प्रमाणपत्र/पदविका/पदवी पाठ्यक्रम यांचे पूर्ण नाव, शाळेचे/महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे नाव आणि ज्यावर्षी पाठ्यक्रम पूर्ण केला ते वर्ष नमूद करून उच्च शालेय शिक्षण/विद्यापीठ शिक्षणाचा तपशील द्यावा.) | | | | | | |

**सत्यापन**

मी, उपरोल्लिखित अभिसाक्षी, याद्वारे असे सत्यापित व घोषित करतो की/करते की, या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा आणि बिनचूक आहे आणि यातील कोणताही भाग खोटा नाही व त्यात कोणतीही महत्वाची गोष्ट दडवून ठेवलेली नाही. मी आणखी असेही घोषित करतो की,—

(क) वरील भाग अ व ब याच्या बाबी ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त माझ्याविरुद्ध कोणताही दोषासिद्धीचा खटला नाही किंवा कोणताही खटला प्रलंबित नाही.

(ख) मी, माझी पत्नी/माझा पती किंवा माझ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांच्याकडे वरील भाग अ च्या बाबी ७ व ८ मध्ये आणि भाग ख च्या बाबी ८, ९ व १० मध्ये नमूद केलेल्या बाबीव्यतिरिक्त कोणतीही मत्ता किंवा दायित्व नाहीत.

दिनांक : ...................................................... रोजी ........................................ येथे सत्यापित केले.

**अभिसाक्षी.**

**टीप १ :** नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी उशिरात उशिरा दुपारी ३.०० वाजेपर्यंत शपथपत्र दाखल करावे.

**टीप २ :** शपथ आयुक्त किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा लेख प्रमाणक यांच्यासमोर शपथपत्र शपथबद्ध करावे.

**टीप ३ :** सर्व रकाने भरावे आणि कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. जर कोणत्याही बाबीच्या संबंधात सादर करावयाची माहिती काहीही नसेल तर " निरंक " किंवा " लागू नाही " किंवा यथास्थिति, " ज्ञात नाही " असे नमूद करावे.

**टीप ४ :** शपथपत्र एकतर टंकलिखित किंवा सुवाच्चपणे लिहिलेले व व्यवस्थित असावे.

(विधि व न्याय मंत्रालय, अधिसूचना क्रमांक एच ११०१९ (४)/२०१८/-लेग-दोन, दिनांक १० ऑक्टोबर २०१८ आणि अधिसूचना क्रमांक एच-११०१९/१३/२०१६-लेग-दोन, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९)

**जोडपत्र-सी १७**

**भारत निवडणूक आयोग**
निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

**क्रमांक ७६/ईसीआय/अनुदेश/एफयूएनसी/**
**ईईएम/ईईपीएस/२०१९/खंड तीन**

दिनांक १९ जून २०१९

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका, २०१९ निवडणूक खर्च संनियंत्रण प्रणाली (ईईएमएस) सॉफ्टवेअरमध्ये जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल भरणेबाबत.

महोदया/महोदय,

मला वर उल्लेख केलेल्या विषयावरील दिनांक ३१ मे २०१९ च्या आयोगाच्या समक्रमांकाच्या पत्राचा संदर्भ घेण्याचे आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संदर्भातील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल ऑनलाईन भरण्यासाठी आयोगाने सुविधा* मोड्यूलचा एक भाग म्हणून एक नवीन डेटा एन्ट्री पोर्टल विकसित केले आहे, हे नमूद करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. ऑनलाईन नमुन्यात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालाचा प्रत्यक्ष स्वरूपाप्रमाणेच रकाने आहेत हे नमूद करणे प्रस्तुत आहे.

२. https://suvidha.eci.gov.in ** या लिंकला भेट देऊन डेटा एन्ट्री पोर्टलवर प्रवेश केला जाऊ शकतो (अनुसरायचे टप्पे सोबत जोडले आहेत). जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालाला अंतिम स्वरूप दिल्यानंतर तीन दिवसांच्या आत डेटा ऑनलाईन भरला जाईल याची खात्री करावी अशी तुम्हाला विनंती करण्यात येत आहे.

३. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी https://support.ecitech.in **** या युआरएल (URL) ला भेट देता येईल, जिथे तुम्हाला प्रथम नोंदणी करावी लागेल आणि नंतर संबंधित प्रश्न उपस्थित करू शकता.

४. तुम्हाला विनंती आहे की, हे उपाय निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक अधिकारी यांसह सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले जातील याची खात्री करा. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल दिनांक ३१ मे २०१९ च्या समक्रमांकाच्या पत्राच्या परिच्छेद (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्षात पाठवला जावा.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

(**राजन जैन**)
अवर सचिव.

* आता एनकोर (ईएनसीओआरई)

** आता *https://encoreieci.gov.in*

*** आता *https://support.ecitech.in/support/login*

## निवडणूक खर्च संनियंत्रण सॉफ्टवेअर–जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल भरण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना

निवडणूक खर्च संनियंत्रण सॉफ्टवेअर ही एक वेब पोर्टल प्रणाली आहे, जी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला उमेदवारनिहाय छाननी अहवाल सादर करण्यास मदत करते. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (अहवाल) भरण्याचे (इ-फायलिंग) टप्पे (जिल्हा निवडणूक अधिकारी लॉगिन) :

१. *https://encore.eci.gov.in* ही लिंक उघडा.

२. कोणती निवडणूक आहे, त्यानुसार " लोकसभा सार्वत्रिक निवडणूक " किंवा " विधानसभा सार्वत्रिक निवडणूक " असे पर्याय निवडा.

३. जिल्हा निवडणूक अधिकारी, सुविधा लॉगिन करताना वापरला जाणारा युजरनेम, पासवर्ड आणि प्रक्रियेचा वापरतील.

४. तेथे दोन पर्याय दिसतील (१) जिल्हा निवडणूक अधिकारी छाननी अहवाल भरा (२) डॅशबोर्ड.

५. " जिल्हा निवडणूक अधिकारी छाननी अहवाल भरा " वर क्लिक करा.

६. विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघाच्या सुविधा डाटावरून उमेदवारांची यादी आपोआप उचलली जाईल आणि त्या पृष्ठावर दिसू लागेल.

७. नमुना उघडण्यासाठी " स्थिती " (स्टेटस) या शीर्षाखालील (" Not started ") " नॉट स्टारटेड " वर क्लिक करा.

८. भाग ५ पर्यंतचा नमुना भरा आणि नमुन्याला अंतिम स्वरूप द्या.

९. एकदा का नमुना भरून झाला की, सॉफ्टवेअर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला खालील पर्याय देते. " जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा उमेदवारासाठीच्या छाननी अहवालात अधिक माहिती भरणे चालू ठेवा " " होय/नाही ".

   एक. " होय " दाबल्यास (सॉफ्टवेअर) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला माहिती भरण्यासाठी, सर्व उमेदवारांची नावे असणाऱ्या पहिल्या पानावर परत नेईल.

   दोन. " नाही " दाबल्यास जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला " ट्रॅकिंग मोड्यूल (नमुन्यावर) " वर (पाठपुरावा नमुन्यावर) नेले जाईल.

१०. ट्रॅकिंग मोड्युल (पाठपुरावा नमुना) भरायचे आहे.

११. भरून पूर्ण करा आणि अंतिम स्वरूप द्या.

१२. ट्रॅकिंग मोड्यूल (पाठपुरावा) नमुना भरून पूर्ण झाल्यानंतर (सॉफ्टवेअर) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला पुढील नोंदी (माहिती भरण्यासाठी) करण्यासाठी उमेदवारांची यादी असलेल्या मूळ पृष्ठावर परत घेऊन जाईल.

१३. ट्रॅकिंग मोड्यूल (पाठपुरावा) नमुना अहवालाला " अंतिम " रूप दिल्याने स्थिती (Status) " अंतिम " म्हणून दिसून येते.

१४. ट्रॅकिंग मोड्यूल नमुन्याला अंतिम रूप न देता, छाननी अहवाल भरल्यास " माहिती अद्ययावत " म्हणून स्थिती (Status) दर्शवेल.

१५. पुढील आवश्यक कार्यवाहासाठी भरून पूर्ण केलेला नमुना मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठवला जाईल.

**मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे करण्यात येणारे टप्पे :**

१. *https://encore.eci.gov.in* ही लिंक उघडा.

२. कोणती निवडणूक आहे, त्यानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक किंवा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निवडा.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सुविधा लॉगिनसाठी वापरलेले यूजरनेम आणि पासवर्ड वापरतील.

४. लॉग इन केल्यानंतर " एक्स्पेंडिचर " "(खर्च) " टॅबवर क्लिक करा.

५. तेथे दोन पर्याय आहेत (१) सूचना (२) डॅशबोर्ड.

६. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे पुढे पाठवलेले छाननी अहवाल पाहण्यासाठी " सूचना " वर क्लिक करा.

७. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने पुढे पाठविलेली उमेदवारांची यादी विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघनिहाय दिसेल.

८. नमुना उघडण्यासाठी " स्टेट्स " (स्थिती) शीर्षकाखालील " अद्ययावत माहिती " वर क्लिक करा.

९. ट्रॅकिंग मोड्यूल (पाठपुरावा नमुना) भरायचा आहे.

१०. पूर्ण करा आणि अंतिम स्वरूप द्या.

११. ट्रॅकिंग मोड्युलला (पाठपुरावा नमुन्याला) अंतिम स्वरूप दिल्यास मुख्य निवडणूक अधिकारी पुढील माहिती भरण्यासाठी उमेदवारांच्या यादीसह मूळ पृष्ठावर परत जातील.

१२. ट्रॅकिंग मोड्युल (पाठपुरावा नमुना) अहवालाला अंतिम स्वरूप दिल्याने स्थिती " अंतिम " म्हणून दिसून येते.

१३. अंतिम नमुना पुढील आवश्यक कारवाईसाठी भारत निवडणूक आयोगाकडे पाठवला जाईल.

कृपयी तुमच्या तांत्रिक अडचणी *https://support.ecitech.in/support/login* यावर कळवा.

**जोडपत्र-सी १८**

**भारत निवडणूक आयोग**
निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/ईसीआय/अनुदेश/एफयूएनसी/ईईएम/ईईपीएस/२०१९/खंड तीन — दिनांक ९ जुलै २०१९

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिशा आणि सिक्किमच्या लोकसभा, विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका आणि काही पोट-निवडणुका, २०१९–निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्याच्या बाबतीत कसूर केलेल्या उमेदवारांची यादीबाबत.

महोदया/महोदय,

आयोगाच्या दिनांक ३१ मे २०१९ आणि १९ जून २०१९ च्या समक्रमांकाच्या पत्राद्वारे (संदर्भासाठी प्रतीसोबत जोडल्या आहेत), मला हे सांगण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, जिल्हा निवडणूक अधिकारी यांना जिल्हा निवडणूक अधिकारी छाननी अहवाल [ निवडणूक खर्च संनियंत्रणावरील अनुदेशांचा “सारसंग्रह” याचे जोडपत्र-सी ३ *(फेब्रुवारी, २०१९)] निकाल जाहीर झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत अर्थात ८ जुलै, २०१९ पर्यंत, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत आयोगाकडे पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला आवश्यक वाटल्यास त्यावर स्वतंत्रपणे अतिरिक्त भाष्य केले जाऊ शकते. भूतकाळात असे निदर्शनास आले होते की, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी हे जिल्हा निवडणूक अधिकारी छाननी अहवाल खंडशः पद्धतीने पाठवत होते ज्यामुळे त्यांना अंतिमतः निकालात काढायला अवाजवी विलंब होत होता. आयोगाद्वारे लेखा प्रकरणे वेळेवर निकालात काढली जाण्यासाठी, असे ठरवण्यात आले आहे की, उमेदवारांच्या खात्यांबाबतचा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचे छाननी अहवाल मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावर वर्गीकृत केले जातील आणि ते आयोगाला, खाली दिल्याप्रमाणे, विनिर्दिष्ट नमुन्यात (सोबत जोडलेले जोडपत्र) सादर केले जातील :—

क. छाननी अहवाल सादर केलेल्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची एकूण संख्या.

ख. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या.

श्रेणी-१ : जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा छाननी अहवालात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून कोणताही दोष निदर्शनास आणण्यात आलेला नाही असे उमेदवार.

श्रेणी-२ : असे उमेदवार ज्यांनी निवडणूक खर्चाचा हिशेब दिलेला नाही.

श्रेणी-३ : असे उमेदवार ज्यांनी निवडणूक खर्चाचा हिशेब विहित कालावधीत देण्यात कसूर केली आहे (अर्थात लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७८ अंतर्गत निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत)

श्रेणी-४ : कायद्यानुसार अर्थात लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ मधील कलम ७७ व ७८ आणि निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८६ ते ९० नुसार आवश्यक असलेल्या पद्धतीने निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केलेले उमेदवार (श्रेणी २ व श्रेणी ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त)

श्रेणी-५ : असे उमेदवार, ज्यांनी विहित कालावधीत निवडणूक खर्चाचा हिशेब भरण्यात कसूर केला तसेच कायद्यानुसार अर्थात लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम ७७ व ७८ आणि निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८६-९० नुसार आवश्यक असलेल्या पद्धतीने निवडणूक खर्चाचे हिशेब सादर करण्यात कसूर केली आहे. (श्रेणी-२, ३ आणि ४ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त)

२. आपणांस विनंती करण्यात येत आहे की, हे निदेश अनुपालनासाठी सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे छाननी अहवाल, विहित नमुन्यातील योग्य वर्गीकरण केलेल्या लेखा प्रकरणांसह निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत सोबत जोडलेल्या नमुन्यात आयोगाकडे सादर करावे.

३. कृपया पोचपावती द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

( **अविनाश कुमार** )
सचिव.

२ जून २०१६ च्या आयोगाच्या परिपत्रकानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या छाननी अहवालांवर पाठपुरावा करण्याची कारवाई केल्याची विनंतीसह विभागीय विभाग/विभागीय अवर सचिव/विभागीय सचिव/विभागीय प्रधान सचिव यांच्याकडे प्रत पाठवा.

*सारसंग्रह सुधारित करण्यात आला असल्याने जोडपत्र-सी ३ साठी जोडपत्र-सी १३ कृपया पहा.

जोडपत्र

----------- वर्षाच्या सार्वत्रिक निवडणुकांचा ----------- सार्वत्रिक निवडणुकांचा ----------- राज्याकडून आलेल्या

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालाचा सारांश

**प्रवर्ग-१—जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या छाननी अहवालात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने कोणतेही दोष दाखवलेले नाहीत असे उमेदवार**

| अनुक्रमांक | जिल्हा | विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक आणि नाव | उमेदवाराचे नाव | परत केलेले किंवा परत न केलेले | पक्ष संलग्नता/अपक्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | एकूण | | | |

**प्रवर्ग-२— निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केलेले उमेदवार**

| अनुक्रमांक | जिल्हा | विधानसभा मतदारसंघ क्रमांक आणि वर्ष | उमेदवाराचे नाव | परत केलेले किंवा न परत केलेले | पक्ष संलग्नता/अपक्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | एकूण | | | |

**प्रवर्ग-३— निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत ज्यांनी हिशेब सादर करण्यात कसूर केली आहे असे उमेदवार**

| अनुक्रमांक | जिल्हा | विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक आणि नाव | उमेदवाराचे नाव | परत केलेले किंवा परत न केलेले | पक्ष संलग्नता/अपक्ष | शेरा [(एक) हिशेब सादर करण्याचा अंतिम दिनांक ; (दोन) हिशेब सादर केल्याचा दिनांक आणि विलंब झालेल्या दिवसांची संख्या ; (तीन) विलंबाने सादर केल्याची कारणे, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून मिळाली असल्यास, नमूद करावी ] |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | एकूण | | | |

**श्रेणी-४ – कायद्यानुसार आवश्यक असलेल्या पद्धतीने निवडणूक खर्चाचा हिशेब भरण्यास अयशस्वी/सादर करण्यात कसूर केलेले उमेदवार (प्रवर्ग-२ आणि ३ या व्यतिरिक्तची प्रकरणे)**

| अनुक्रमांक | जिल्हा | विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक आणि नाव | उमेदवाराचे नाव | परत केलेले किंवा न परत केलेले | पक्ष संलग्नता/अपक्ष | शेरा (आढळलेली तूट/आणि किती रक्कम कमी दाखवण्यात आली ती, कोणतीही असल्यास, नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | एकूण | | | |

**प्रवर्ग-५– ज्यांनी हिशेब वेळेत आणि योग्यरित्या सादर करण्यात कसूर केली आहे असे उमेदवार (प्रवर्ग २,३ आणि ४ व्यतिरिक्तची प्रकरणे)**

| अनुक्रमांक | जिल्हा | विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक आणि नाव | उमेदवाराचे नाव | परत केलेले किंवा न परत केलेले | पक्ष संलग्नता/अपक्ष | शेरा (एक) हिशेब सादर करण्याचा अंतिम दिनांक ; (दोन) हिशेब सादर केल्याचा दिनांक आणि विलंब झालेल्या दिवसांची संख्या ; (तीन) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून मिळाली असल्यास विलंबाचे कारण ; (चार) आढळलेली तूट आणि किती रक्कम कमी दाखवली, कोणतीही असल्यास, नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | एकूण | | | |

(मुख्य निवडणूक अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

दिनांक :

**जोडपत्र-सी १९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/ईसीआय/अनुदेश/एफयूएनसी
ईईएम/ईईपीएस/२०२०/खंड सहा

दिनांक २४ जुलै २०२०

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबाची प्रकरणे–निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८९ अन्वये विहित केलेल्या कालमर्यादेचे पालन न करणे आणि आयोगाच्या सूचनांबाबत.

महोदया/महोदय,

मला, निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८९ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांसंबंधात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याचा छाननी अहवाल तयार करण्यासाठीच्या प्रक्रियेसंबंधातील आयोगाचे पत्र क्र. ७६/अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड चौदा, दिनांक २ जून २०१६ चा संदर्भ घेण्याचे निदेश देण्यात आले आहेत. असे निदर्शनास आले आहे की, पूर्वोक्त नियमात विहित केलेल्या कालावधीचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांद्वारे अनुसरण केले जात नाही, ज्यामुळे खर्चाची प्रकरणे निकाली काढण्यात अवाजवी विलंब होतो. आपले लक्ष भारत निवडणूक आयोग, ओ.एम. क्रमांक ७६/२००४/जेएस-दोन, दिनांक ५ जुलै २००४ कडे वेधण्यात येत आहे (प्रत सोबत जोडली आहे) ज्याद्वारे आयोगाने निवडणूक खर्चाशी संबंधित सर्व प्रकरणे निकाली काढण्यासाठी एक वर्षाची अंतिम मुदत निश्चित केली आहे. हे कर्नाटक उच्च न्यायालयाच्या (गिनिज हिते पक्ष रंगावामे विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर–१९९९ ची रिट विनंती अर्ज क्रमांक ४३५७ मधील कर्नाटक उच्च न्यायालयाचा दिनांक २९ जुलै १९९९ चा न्यायनिर्णयातील निरीक्षण लक्षात घेऊन करण्यात आले आहे, ज्यात इतर गोष्टींबरोबरच असे नमूद करण्यात आले आहे की, कलम १०ए अंतर्गत आदेश पारित करण्यात अवाजवी विलंब करण्यात येऊ शकत नाही आणि तो योग्य वेळेत पारित केला गेला पाहिजे.

२. निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या संबंधित नियमांचा खालीलप्रमाणे पुनरुच्चार करण्यात येत आहे :—

नियम ८९(५) जेथे निवडणूक आयोग असे ठरविते की, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने, कायदा आणि या नियमांनुसार आवश्यक त्या वेळेत आणि योग्य पद्धतीना निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्यात कसूर केली आहे, अशा वेळी आयोग, असा कसूर केल्याबद्दल कलम १० ए अंतर्गत त्याला अपात्र का ठरवण्यात येऊ नये याची कारणे देण्याची लेखी नोटीस देऊन मागणी करेल.

नियम ८९(६) उप-नियम (५) अंतर्गत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेला कोणताही निवडणूक लढविणारा उमेदवार अशी नोटीस मिळाल्यापासून २० दिवसांच्या आत, त्यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे लेखी निवेदन सादर करू शकतो, आणि त्याचवेळी जर त्याने असा खर्चाचा हिशेब आधीच सादर केला नसेल तर त्याच्या निवडणूक खर्चाच्या संपूर्ण हिशेबास, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे त्याच्या निवेदनाची एक प्रत नियम ८९(७) जिल्हा निवडणूक अधिकारी असे निवेदन प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसांच्या आत, निवडणूक आयोगाकडे, त्या निवेदनाची प्रत आणि खर्चाचा हिशेब (कोणताही असल्यास), त्याला योग्य वाटेल अशा शेऱ्यांसह पाठवेल.

३. आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड चौदा, दिनांक २ जून २०१६ च्या परिच्छेद ४ असे नमूद करण्यात आले आहे की :

जिल्हा निवडणूक अधिकारी, उमेदवारनिहाय सारांश आणि छाननी अहवाल निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून ३७ व्या दिवसापर्यंत विहित नमुन्यात (सारसंग्रहाचे जोडपत्र-सी ३*) उमेदवारनिहाय सारांश आणि छाननी अहवाल यास अंतिम रूप देईल आणि ३८ व्या दिवसांपर्यंत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडे पाठवेल (अनुदेशांचा सारसंग्रह परिच्छेद ११.५). मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे यथोचितरीत्या पाठवलेला जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे अहवाल निकाल घोषित केल्याच्या ४५ दिवसांच्या आत आयोगाकडे पोहोचले पाहिजेत.

४. अलिकडील प्रलंबित निवडणूक खर्चाच्या हिशेबांच्या प्रकरणांच्या पुनरावलोकनात, आयोगाच्या असे गंभीरतेने निदर्शनास आले आहे की, जिल्हा निवडणूक अधिकारी छानन्नी अहवाल, पूरक अहवाल, आयोगाच्या नोटीस मिळाल्या (पोहचवल्या) बाबतच्या पोचपावत्या सादर करण्यात होणारा विलंब आणि अनेक जिल्हा निवडणूक अधिकारी प्रतिसाद देत नाहीत. निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८९ अन्वये विहित केलेल्या कालमर्यादेत तसेच आयोगाच्या सूचनांचे यथार्थतेने/खऱ्या अर्थाने पालन न केल्यास कायद्याची कठोरता कमी होईल याचा पुनरूच्चार केला जातो.

५. म्हणून, आयोगाच्या वरील सूचनांचे काटेकोर पालनासाठी सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

**अविनाश कुमार**,
सचिव.

*सारसंग्रह सुधारित करण्यात आला असल्याने कृपया जोडपत्र-सी ३ साठी जोडपत्र-सी १३ पहा.

**जोडपत्र-सी २०**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ३/ईआर/२०२०/एसडीआर/खंड तीन

दिनांक १ ऑक्टोबर २०२०

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** नामनिर्देशन अर्ज आणि शपथपत्र (निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ मध्ये जोडलेल्या नमुना २६ मधील) उमेदवाराद्वारे वैयक्तिक तपशीलाची ऑनलाईन डाटा एन्ट्रीची पर्यायी सुविधा—मार्गदर्शक तत्त्वेबाबत.

महोदया/महोदय,

मला असे सूचित करण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ३३ च्या उप-कलम (१) अन्वये उमेदवाराद्वारे आणि मतदारसंघातील मतदाराद्वारे प्रस्तावक म्हणून स्वाक्षरी केलेले विहित नमुन्यात भरलेले नामनिर्देशन कागदपत्रे, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ३१ अंतर्गत जारी केलेल्या नोटिशीमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पोहोचते केले पाहिजे.

२. डिजीटल भारताच्या प्रवासात पुढे जाण्यासाठी आणि नामनिर्देशन नमुना आणि प्रतिज्ञापत्र (नमुना २६) मधील चुकांची व्याप्ती कमी करण्यासाठी, आयोगाने उमेदवारांना नामनिर्देशन अर्जातील वैयक्तिक तपशीलांची ऑनलाईन डाटा एन्ट्री करण्यासाठी पर्यायी सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. ही सुविधा उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाच्या सुविधा पोर्टल *https://suvidha.eci.gov.in* मार्फत उपलब्ध असेल. उमेदवाराला तेथे नोंदणी करावी लागेल आणि मोबाईल क्रमांक व ओटीपीसह लॉगिन करावे लागेल. या सुविधेचा लाभ मिळवण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे येथे सोबत जोडली आहेत. (जोडपत्र-ए).

३. सध्या ही सुविधा इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषेत उपलब्ध आहे.

४. कोणत्याही तांत्रिक सहाय्यासाठी *support@ecitech.in* वर ईमेल पाठवता येईल आणि फोन क्रमांक ०११-२३०५२०५२ वर उपलब्ध असलेल्या तांत्रिक व्यक्तीशी संपर्क साधला करू शकता.

५. ही मार्गदर्शक तत्त्वे, माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी तुमच्या राज्यातील सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधित सर्व निवडणूक प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावीत.

६. कृपया पोचपावती द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

**एन. टी. भूतिया**,
सचिव.

**जोडपत्र-ए**

**नामनिर्देश अर्जामध्ये वैयक्तिक तपशीलांची माहिती ऑनलाईन नोंदविण्यासाठीच्या उमेदवारांसाठीच्या पर्यायी सुविधेसाठीची मार्गदर्शक तत्त्वे.**

भारत निवडणूक आयोगाने सुविधा पोर्टलद्वारे उदा. *suvidha.eci.gov.in*, उमेदवारांना, नामनिर्देशन अर्ज आणि शपथपत्र (नमुना २६) मध्ये त्यांच्या वैयक्तिक तपशीलाची माहिती ऑनलाईन नोंदविण्यासाठी सुविधा पुरविण्यात आली आहे. प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रमाणिकरण तपासणीमुळे उमेदवारांना योग्य स्वरूपात आणि त्रुटींशिवाय अर्ज भरण्यास मदत होईल. उमेदवाराने सुरक्षा ठेव ऑनलाईन भरण्याची सुविधासुद्धा त्याच सुविधा पोर्टलवर उपलब्ध आहे.

**१. नामनिर्देशन अर्जामध्ये माहिती ऑनलाईन नोंदविणे.**

१.१ भारत निवडणूक आयोगाच्या सुविधा पोर्टल *https://suvidha.eci.gov.in* द्वारे उमेदवारांना नामनिर्देशन अर्जामध्ये माहिती ऑनलाईन नोंदविण्याची सुविधा उपलब्ध असेल.

टप्पा १ नोंदणी.–उमेदवाराला नोंदणी करावी लागेल आणि मोबाईल क्रमांक आणि ओटीपीद्वारे लॉगीन करावे लागेल.

यशस्वीरित्या लॉगिन झाल्यानंतर, उमेदवाराने मतदार छायाचित्र ओळखपत्र क्रमांक टाकणे आवश्यक आहे आणि मतदारयादीतून संबंधित तपशील आपोआप प्राप्त केले जातील.

टप्पा २.– अर्ज आणि शपथपत्रामध्ये वैयक्तिक तपशीलाची माहिती नोंदविणे–नंतर उमेदवाराने नामनिर्देशन अर्ज आणि शपथपत्र यात ऑनलाईन त्याचा वैयक्तिक तपशीलाची माहितीची नोंद करणे आवश्यक आहे. अर्जात त्रुटीपूर्ण किंवा चुकीची नोंदच्या बाबतीत, उमेदवाराने अर्जाला अंतिम स्वरूप होईपर्यंत त्यात बदल/दुरुस्ती केली जाऊ शकते.

टप्पा ३.–अधिक पसंतीच्या तारखांची निवड–तपशीलाची संपूर्ण पडताळणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्जाला अंतिम स्वरूप द्यावे आणि प्रत्यक्ष (अर्ज) सादर करण्यासाठी दिलेल्या तारखांवर टीक करून अधिक पसंती दिलेल्या तीन तारखा निवडण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढे जावे.

टप्पा ४.–सुरक्षा ठेव-तसेच पुढे, उमेदवार, नेट बँकींगच्या मार्फत उपलब्ध पर्यायांमधून निवड करून ऑनलाईन सुरक्षा ठेव जमा करू शकतो. पर्यायाने, उमेदवार चलनाचा तपशील टाकण्याचा पर्याय निवडू शकतो किंवा रोखीने जमा करण्याचा पर्याय सूचित करू शकतो.

टप्पा ५.–ऑनलाईन भरलेल्या अर्जाची मुद्रित प्रत प्रत्यक्ष सादर करणे–हे लक्षात घ्यावे की, उमेदवाराने ज्या अर्जात ऑनलाईन माहितीची नोंद केली होती, तो प्रणालीतील क्यूआर कोडसहची मुद्रित प्रत घेऊन, त्यावर सही करून, ती प्रमाणित करून आणि, उमेदवाराने स्वतः किंवा त्याच्या प्रस्तावकाने, सकाळी ११ ते दुपारी ३ च्या मधल्या वेळेत नेमून दिलेल्या तारखेस आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी, प्रत्यक्ष हाताने (स्वहस्ते), त्याला (नि.नि.अधिकाऱ्याला) दिला तरच, त्या अर्जावर उचित कारवाई केली जाईल. ऑनलाईन नामनिर्देशन सुविधा नामनिर्देशनाच्या अंतिम दिनांकाच्या एक दिवस अगोदर बंद केली जाईल.

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची कार्ये :**

१. माहिती तंत्रज्ञान पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळाची तरतूद करणे–

(एक) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, उमेदवाराने नामनिर्देशनात दिलेल्या वैयक्तिक तपशीलांच्या ऑनलाईन माहिती नोंदण्यांची प्रत्यक्ष पडताळणीसाठी अधिसूचनेच्या दिनांकापासून नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत एक कार्यस्थळ तयार करावे.

(दोन) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कार्यस्थळावर आवश्यकतेनुसार प्रिंटर, स्कॅनर,वेबकॅम, लेखनसामग्री आणि इतर आवश्यक गोष्टींसह एक किंवा अधिक संगणकाची उपलब्धता सुनिश्चित करावी. संगणक/लॅपटॉप वेबकॅमसह आणि किमान i3 प्रोसेसर, २ जीबीआरएएम आणि किमान ५० जीबी मोकळी जागा उपलब्ध असलेला असावा. जर लॅपटॉप/डेस्कटॉप मध्ये वेबकॅम आधीपासून असेल (इनबिल्ट) तर तो किमान २ मेगापिक्सेलचा असला पाहिजे. तसेच वेबकॅमच्या बाबतीत, तो किमान ५ मेगापिक्सेलचा असावा.

(तीन) ऑपरेटींग प्रणाली आणि ब्राऊझर अद्ययावत अॅण्टी व्हायरस जावा स्क्रिप्ट आधारित अद्ययावत केलेले असावेत.

(चार) नमुना क्यूआर कोड स्कॅन करून तसेच स्कॅनिंग आणि छपाईचा दर्जा देखील पाहून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे प्रणाली आणि हार्डवेअर तपासले जाईल.

(पाच) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कर्मचाऱ्यांची ओळख पटवून त्यांना वेळेत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. क्यूआर कोड स्कॅन करणे, उमेदवाराने भरलेल्या प्रत्यक्ष आणि इलेक्ट्रॉनिक प्रतींची पडताळणी करणे, प्रणालीमध्ये पोचपावती तयार करणे व त्याची छापील प्रत घेणे.

२. ज्यात उमेदवाराने ऑनलाईन माहिती भरली आहे त्या नामनिर्देशन अर्जावर प्रक्रिया करणे आणि त्याची पडताळणी करणे–

(एक) निवडणूक निर्णय अधिकारी लॉगीन करतील आणि ज्यात ऑनलाईन माहिती नोंदविण्यात आली आहे आणि एनकोर(एनसीओआरई) पोर्टल *https://encore.eci.gov.in* द्वारे जो प्राप्त झाला आहे अशा नामनिर्देशन अर्जावर प्रक्रिया पूर्ण करतील.

(दोन) ज्यात ऑनलाईन माहिती नोंदविण्यात आली आहे अशा नामनिर्देशन अर्जाची छपाई प्रत सादर करण्याच्या दिनांकासाठी, उमेदवाराद्वारे सूचित केलेले सर्व प्राधान्ये पाहू शकतात आणि त्यानुसार भेटीची वेळ देऊ शकतात.

(तीन) सामान्य निर्देशांनुसार, सुविधा पोर्टलचा वापर करून भरलेले नामनिर्देशन अर्ज, डाऊनलोड करून, प्रिंट काढून आणि सर्व दृष्टींनी पूर्ण केल्यानंतर उमेदवाराने किंवा त्याच्या प्रस्तावकाने त्याची स्थळ प्रत (हार्ड कॉपी) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला प्रत्यक्ष देणे आवश्यक असते. अशा प्रत्येक नामनिर्देशन अर्जाची पडताळणी करण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकारी पहिल्या पानाच्या शीर्षस्थानी असलेला क्यूआर कोड तपासेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे लगेचच क्यूआर कोड स्कॅनिंग केले जाईल ज्यामुळे अर्ज प्राप्त झाल्याच्या वेळेची नोंद होईल. (कोणत्याही परिस्थितीत, जर क्यूआर कोड व वेबकॅमद्वारे वाचण्यायोग्य नसल्यास, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अर्ज यंत्रणेद्वारा निर्माण करण्यात आलेला नामनिर्देशन ओळख क्रमांक (आयडी) अर्जावर छापण्याचा आणि पडताळणीची प्रक्रिया करण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

(चार) स्कॅनिंग केल्यानंतर, प्रत्यक्ष हस्तांतरित केलेल्या अर्जाचा तपशील, ऑनलाईन सादर केलेल्या अर्जावरून तपासला आणि सत्यापित केला जाईल.

(पाच) ऑनलाईन माहिती नोंदविलेला अर्ज आणि प्रत्यक्ष सादर केलेल्या अर्जामध्ये फरक असल्यास, नामनिर्देशन अर्जाला ऑफलाईन सादर केलेला अर्ज मानले जाईल आणि प्रत्यक्ष सादर केलेल्या अर्जावर करण्याच्या प्रक्रियेचा अवलंब केला जाईल. अशा परिस्थितीत, ऑनलाईन नामनिर्देशन अर्ज फेटाळला जावा.

(सहा) निवडणूक निर्णय अधिकारी, सुरक्षा ठेवीच्या ऑनलाईन प्रदानाच्या तपशीलांची पडताळणी करेल. जर, ही रक्कम, नियुक्त केलेल्या संस्थेच्या/बँकेच्या कोषागारात/बँक खात्यात जमा झाली नसेल, तर त्याची नोंद नामनिर्देशन अर्जात केली आणि त्याची माहिती उमेदवाराला देण्यात येईल. अशा परिस्थितीत, भारताच्या निवडणूक आयोगाने विहित केलेल्या सुरक्षा ठेवी प्रत्यक्ष प्रदान करायच्या पद्धतीचे पालन केले जाईल.

(सात) वरील प्रक्रियेनुसार नामनिर्देशन अर्जाची पडताळणी केल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, प्रणालीमधील भाग (चार) भरेल आणि पोचपावती निर्मितीच्या प्रक्रियेकडे पुढे जाईल.

(आठ) निवडणूक निर्णय अधिकारी तयार केलेल्या पावतीमधील तपशीलांची पडताळणी करेल आणि नियमानुसार स्वाक्षरी केलेली प्रत उमेदवाराला सुपूर्द करेल.

(नऊ) निवडणूक निर्णय अधिकारी, आयोगाच्या सूचनांनुसार तपासणीसूची तयार करेल आणि ती सूची योग्य पोचपावती देऊन उमेदवाराला देईल.

# ड.
# निवडणूक प्रचारावरील खर्चाचे संनियंत्रण

## भाग 'डी' चा तपशील


| क्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | अभिरूप निरीक्षण नोंदवही. | १३९ |
| २ | पुराव्याची संचिका. | १३९ |
| ३ | केबल नेटवर्कसह इलेक्ट्रॉनिक/मुद्रण माध्यमांमार्फत केल्या जाणाऱ्या प्रचाराचे संनियंत्रण. | १४० |
| ४ | निवडणूक प्रचारमोहिमेत सोशल मिडियाच्या वापरासंबंधी संनियंत्रण. | १४० |
| ५ | सार्वजनिक सभा, मेळावे इत्यादींचे संनियंत्रण. | १४१ |
| ६ | हेलिकॉप्टर खर्च व इतर प्रवास खर्च यावरील संनियंत्रण. | १४२-१४५ |
| ७ | पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणाचे संनियंत्रण. | १४५-१४६ |
| ८ | निवडणूक कार्याच्या दरम्यान वाहनांच्या वापराचे संनियंत्रण. | १४६ |
| ९ | तातपुरते अडथळे (बॅरिकेडस) व व्यासपीठे, इत्यादींच्या बांधकामावरील खर्चाचे संनियंत्रण. | १४६-१४७ |
| १० | व्हिडिओ व्हॅनचे संनियंत्रण. | १४७ |
| ११ | अन्य संनियंत्रण यंत्रणा. | १४७-१४८ |
| १२ | विविध माध्यमांद्वारे भेटवस्तुंच्या रोख किंवा रकमेच्या बदल्यात कूपन वाटप केल्याची किंवा पैशाचे वाटप केल्याची तपासणी करणे. | १४९ |
| १३ | कोणत्याही शासकीय योजनेखालील मजुरीच्या वितरणासह उमेदवारांकडून / राजकीय पक्षांकडून रोख रकमेच्या वितरणाची तपासणी. | १४९ |
| १४ | निवडणुकीच्या कालावधीत दारूचे उत्पादन, साठवण व वितरण यांचे संनियंत्रण. | १४९-१५० |
| १५ | बँकांमधून काढलेल्या रोख रकमेचे संनियंत्रण. | १५० |
| १६ | राजकीय पक्षाच्या खर्चाचे संनियंत्रण. | १५१ |

निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला त्याच्या/तिच्या निवडणूक खर्चाचा लेखा सत्य व अचूक रीतीने अद्ययावत ठेवावा हे जरी अनिवार्य असले, तरीही असे निदर्शनास आले आहे की, काही उमेदवार अनवधानाने किंवा बुद्धिपुरस्सरपणाने लेखा अचूक आणि योग्य त्या रीतीने अद्ययावत ठेवत नाहीत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने प्रचाराच्या कालावधीदरम्यान ज्या दिनांकांना अधिसूचित केले असेल त्या-त्या दिनांकांना सर्व उमेदवारांनी त्यांच्या लेख्यांची तपासणी तीन वेळा करुन घेणे आवश्यक आहे. ही तपासणी, उमेदवाराला त्याने/तिने गणना केलेला त्याचा/तिचा खर्च अचूक व योग्य रीतीने आहे की नाही हे पाहण्याची संधी देते, आणि तपासणी दरम्यान निरीक्षणात आलेले दोष सुधारण्यास मदत करते. उमेदवारांनी केलेल्या खर्चाच्या उलटतपासणीकरिता, लेखांकन चमू प्रत्येक उमेदवाराकरिता अभिरूप निरीक्षण नोंदवही आणि त्यासोबत पुराव्याची संचिका ठेवेल. त्यामुळे उमेदवारांनी घेतलेले मोठे मेळावे/सभा इत्यादींवर केलेला खर्च योग्य रीतीने नोंदविला जाईल आणि तपासणी दरम्यान उमेदवारांना दाखवण्यात येईल.

**१. अभिरूप निरीक्षण नोंदवही :–**

लेखांकन चमूकडून **जोडपत्र-ब-१३** येथे जोडलेल्या नमुन्यामध्ये प्रत्येक उमेदवारासाठी अभिरूप निरीक्षण नोंदवही ठेवण्यात येईल. ही नोंदवही, छापील प्रतीसह ( अनुक्रमाने ठेवलेल्या पृष्ठ क्रमांक दिलेल्या ) हार्ड प्रतीत आणि/किंवा एक्सेल शीटमध्ये ठेवण्यात येईल आणि खर्चाचे संनियंत्रण करणाऱ्या विविध चमूने/अहवालाद्वारे एकत्रित केल्याप्रमाणे खर्च विचारात घेण्यात येईल व या नोंदवहीचे प्रयोजन, उमेदवाराने केलेल्या व कळविण्यात आलेल्या मोठ्या बाबींची उलट तपासणी करणे हे आहे.

लेखांकन चमू हे, व्हिडिओ संनिरीक्षण चमू, व्हिडिओ पाहणारे चमू, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, स्थिर संनियंत्रण चमू व भरारी पथके आणि तक्रार संनियंत्रण कक्ष यांच्याकडून दररोज माहिती मिळवतील. लेखांकन चमू, खर्च निरीक्षकाच्या व सहायक खर्च निरीक्षकाच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली काम करील.

सहायक खर्च निरीक्षक, प्रत्येक उमेदवाराच्या अभिरूप निरीक्षण नोंदवहीची दररोज तपासणी करील आणि खर्च संनियंत्रण करणाऱ्या निरनिराळ्या चमुंनी कळविलेल्या सर्व खर्चाची या नोंदवहीत नोंद घेण्यात आली असल्याची खात्री करील, कोणतीही विसंगती किंवा शिथिलता असल्यास, ती बाब तात्काळ खर्च निरीक्षकास कळविली पाहिजे.

अभिरूप निरीक्षण नोंदवही, उमेदवाराने ठेवलेल्या निवडणूक खर्चाच्या नोंदवहीची ज्या कालावधीपर्यंत तपासणी करण्यात आलेली आहे त्या कालावधीपर्यंत उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीस न जनतेच्या कोणत्याही प्रतिनिधीस दाखविण्यात येऊ शकेल आणि उक्त दिनांकाच्या लेख्यांच्या निरीक्षणापूर्वी तसे करता येणार नाही. जर, उमेदवाराने ठेवलेल्या निवडणूक खर्चाच्या नोंदवहीत दाखविण्यात आलेला खर्च , जर अभिरूप निरीक्षण नोंदवहीत नमूद केलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, तो तपासणीच्या वेळी, खर्च निरीक्षक त्याच्या नोंदवहीमध्ये स्वतःच्या सहीने लेखी स्वरूपात उमेदवाराच्या किंवा त्याच्या प्रतिनिधींच्या नजरेस आणून देईल आणि अभिरूप निरीक्षण नोंदवहीत अशी नोंद देखील करील व त्यावर उमेदवारांची त्याच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घेईल. अशा विसंगतीसाठी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून, उमेदवार किंवा त्याच्या प्रतिनिधीवर ( एजन्टवर )त्याच दिवशी लेखी नोटीस बजावण्यात येईल. नोटीशीची प्रत जनतेच्या माहितीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. जनतेतील कोणत्याही व्यक्तीस प्रतिपृष्ठ रूपये १/- इतके शुल्क प्रदान करुन नोटीशीची प्रत मिळवण्यास हकदार असेल. नोटीशीची प्रत व उमेदवाराकडून किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीकडून प्राप्त झालेले उत्तर पुराव्याच्या संचिकेत ठेवण्यात येईल व अभिरूप निरीक्षण नोंदवहीत नमूद करण्यात येईल. प्राप्त झालेली उत्तरे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. आणि यांच्या प्रती प्रतिपृष्ठास रूपये १/- इतके शुल्क प्रदान केल्यावर जनतेस देखील उपलब्ध करून देण्यात येतील. निकाल जाहिर झाल्यानंतर उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाच्या सत्यतेविषयी मत बनविण्यासाठी निर्गमित केलेल्या नोटीसांच्या व प्राप्त झालेल्या व उत्तरांच्या प्रती कोणत्याही असल्यास, खर्च निरीक्षकांसह जिल्हा खर्च संनियंत्रण समिती व जिल्हा निवडणूक अधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येतील. आयोगाच्या विद्यमान निर्देशांचे अनुपालन करण्यात येईल.

**२. पुराव्याची संचिका :–**

लेखांकन चमूकडून प्रत्येक अभिरूप निरीक्षण नोंदवहीसोबत पुराव्याची संचिका ठेवण्यात येईल. अभिरुप निरीक्षण नोंदवहीत नोंदवण्यात आलेल्या कोणत्याही खर्चानुसार गोळा करण्यात आलेले पुराव्याचे सर्व खंड या संचिकेत ठेवण्यात येतील आणि त्यांच्याशी प्रतिसंदर्भ घेण्यात येतील. सर्व पृष्ठांना क्रमांक द्यावयाचे आहेत व सहायक खर्च निरीक्षकाने त्यावर स्वाक्षऱ्या

करावयाच्या आहेत. या संचिकेमध्ये दृक व्हिडीओ किंवा श्राव्य ऑडिओ सीडीज, भित्तिपत्रके, पत्रके इत्यादींच्या प्रती, वर्तमानपत्रातील जाहिराती व **''पेड न्युजच्या''** कात्रणाच्या प्रती, देयके व प्रमाणकांच्या प्रती, खर्चासंबंधी विविध अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या अहवालांच्या प्रती, उमेदवाराने दाखल केलेल्या दस्तऐवजांच्या प्रती, खर्चासंबंधी असणाऱ्या तक्रारी व या तक्रारीवरील चौकशी अहवालांच्या प्रती, खर्च संनियंत्रणासंबंधी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवारास दिलेल्या नोटिसा व प्राप्त झालेली उत्तरे, उमेदवार इत्यादींच्या खर्चासंबंधी दाखल केलेले प्राथमिक माहिती अहवाल (एफ. आय. आर.) इत्यादींचा समावेश असेल.

एखाद्या उमेदवाराने प्रतिषिद्ध बाबींवर खर्च केलेला आहे किंवा तो खर्च प्राधिकृत केलेला आहे असे आढळून आले असेल तर, कायद्याच्या संबंधित तरतुदींन्वये उमेदवाराविरुद्ध कारवाई केली पाहिजे. उदाहरणार्थ जर उमेदवाराने मतदारांना प्रभावित करण्यासाठी पैसे किंवा वस्तुंचे वाटप केलेले आहे, असे आढळून आले असेल तर, त्याविरुद्ध त्याच दिवशी पोलिसात/सक्षम न्यायालयात, भारतीय दंड संहितेमधील लाच देण्याशी संबंधित असणाऱ्या तरतुदीन्वये, तक्रार दाखल केली पाहिजे. याशिवाय ह्या खर्चाचे तपशील, पुराव्यासह आणि दाखल केलेल्या प्राथमिक माहितीच्या अहवालाच्या तपशीलासह अभिरुप निरीक्षण नोंदवहीत देखील नोंदविले पाहिजेत आणि आयोगाचा अनुदेश क्रमांक ७६/अनुदेश/२०१३/इइपीएस/ खंड-पाच, दिनांक १८ एप्रिल २०१३ (**जोडपत्र जी - ३**) नुसार कार्यवाही केली जाईल. अशा घटनांबद्दलचा अहवाल खर्च निरीक्षकाने २४ तासांच्या आत आयोगास पाठवावयाचा आहे.

**३. केबल नेटवर्कसह इलेक्ट्रॉनिक/मुद्रण माध्यमांमार्फत केल्या जाणाऱ्या प्रचाराचे संनियंत्रण :–**

माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (एमसीएमसी), केबल नेटवर्क, रेडीओ इत्यादींसह इलेक्ट्रॉनिक/मुद्रण माध्यमांमार्फत केल्या जाणाऱ्या निवडणूक प्रचाराचे बारकाईने निरीक्षण करील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातीच्या बाबतीत पूर्व प्रमाणन केले जाईल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने राजकीय पक्ष तसेच वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर बैठक घेण्यात येईल आणि मुद्रिते माध्यमाच्या बाबतीत त्यांना स्पष्टपणे असे सांगितले पाहिजे की, त्यांच्याकडून देण्यात आलेल्या, प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व जाहिरातींची लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम १२७-क अनुसार योग्य मालकी असली पाहिजे आणि त्यांना सरोगेट जाहिरातींच्या कोणत्याही प्रथेबाबत कठोरपणे कार्यवाही करण्यात येईल. सर्वसामान्यपणे ''पेड न्यूज'' म्हणून वर्णन करण्यात असलेले '' प्रदानावर आधारित'' असलेले बातम्यांचे अहवाल (न्यूज रिपोर्ट) माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समितीमार्फत हिशेबासाठी घेण्यात येतील आणि अशा प्रथेपासून राजकीय पक्ष, उमेदवार व प्रसार माध्यमांनी दूर राहिले पाहिजे याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी हा त्यांनी दक्ष राहण्याबाबत विशेष काळजी घेईल. जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च संनियंत्रणाची नवीन यंत्रणा व त्याच्याशी संबंधित असलेल्या कायदेशीर तरतुदी देखील स्पष्ट करील. तो, राजकीय पक्षांना स्वयंनिर्बंध घालण्याची विनंती करील. व राजकीय पक्षांमार्फत त्यांच्या उमेदवारांना खर्चावर निर्बंध ठेवण्याचा सल्ला देईल. राज्य स्तरावर मुख्य निवडणूक अधिकारी हिच कृती पार पाडील.

जर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम ७७ च्या अर्थांतर्गत मुख्य प्रचारक असलेल्या नेत्याचे छायाचित्र किंवा आवाहन यासह पक्षाच्या सर्वसाधारण प्रचाराची जाहिरात, कोणत्याही उमेदवाराचा कोणताही निर्देश न करता, मुद्रण व इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये देण्यात आली असेल तर, अशा सर्वसाधारण पक्षाच्या जाहिरातीवरील खर्च, राजकीय पक्षाच्या खात्यामध्ये नोंदवण्यात येईल. जर, असा नेता, कोणत्याही मतदारसंघातील उमेदवार असेल तर, जरी त्याचे छायाचित्र, मुद्रण आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये असले तरीदेखील त्यांच्या मतदारसंघाचा कोणताही निर्देश नसल्याने अशा पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारावरील खर्च, तो पक्षाच्या सर्वसाधारण प्रचाराच्या स्वरूपात असल्याने, अशा नेत्याच्या खात्यामध्ये नोंदविण्यात येणार नाही.( आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/इइपीएस, दिनांक २० जानेवारी २०१२. (**जोडपत्र डी - १०**)

**४. निवडणूक प्रचारमोहिमेत सोशल मिडियाच्या वापरासंबंधी संनियत्रणः–**

आयोगाने दिनांक २५ ऑक्टोबर २०१३ रोजी (पत्र क्रमांक ४९/सा. मा. /२०१३/सूचना) सामाजिक माध्यमांवरील तपशीलवार मार्गदर्शकतत्त्वे निर्गमित केली आहेत. त्यामध्ये नामनिर्देश करताना दाखल केलेल्या शपथपत्रात उमेदवारांद्वारे सामाजिक माध्यम लेख्यांचा (हिशेबांचा) तपशील सादर करण्याविषयी नमूद केलेआहे. आयोगाने, सामाजिक माध्यमांच्या साईटवर निर्गमित करावयाच्या अशा राजकीय जाहिरातीदेखील पूर्व प्रमाणनाच्या कक्षेत आणल्या आहेत. आयोगाने आणखी अशा सूचना दिल्या

आहेत की, उमेदवार व राजकीय पक्षांनी खर्चाचा अचूक लेखा (हिशेब) ठेवणे व खर्चाचे विवरणपत्र सादर करणे या दोन्हींसाठी सामाजिक माध्यमावरील जाहिरातींच्या खर्चासह समावेश करावा. (**जोडपत्र डी - १४**)

गुगल, फेसबुक आणि ट्विटर, त्यांच्या मंचावर ''जाहिरात पारदर्शकता अहवाल'' प्रदर्शित करून विविध राजकीय पक्षांनी या मंचावर त्यांच्या राजकीय प्रचारासाठी दिलेली देयके पुढील दुव्यांवर प्रदर्शित करून सशुल्क राजकीय जाहिरातींमध्ये पारदर्शकता आणत आहेत :–

(एक) https://transparencyreport.google.com

(दोन) https://www.facebook.com/ads/library/report/?Source=archive-landing-page&country=IN

(तीन) https://ads.twitter.com/transparency **(जोडपत्र डी - २१)**

## ५. सार्वजनिक सभा, मेळावे इत्यादींचे संनियंत्रण:-

सार्वजनिक सभेसाठी किंवा मेळाव्यासाठी परवानगी मिळण्याकरिता अर्ज करणारा कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी, परवानगीच्या अर्जासह **जोडपत्र डी-१** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये खर्चाची योजनादेखील सादर करील.

या खर्चाच्या योजनेची प्रत परवानगीपत्राच्या प्रतीसह जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून ज्या सार्वजनिक सभेची किंवा मेळाव्याची कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कर्तव्यावर पाठविलेल्या अधिकाऱ्यास आणि घटनांच्या व्हिडीओ चित्रणासाठी आवश्यक ती व्यवस्था करण्यासाठी सहायक खर्च निरीक्षकासदेखील देण्यात येईल.

लेखांकन चमू, अधिसूचित दरांच्या आधारावर प्रत्येत सार्वजनिक सभेमध्ये व मेळाव्यामध्ये केलेल्या खर्चाचा स्वतंत्रपणे हिशेब करील आणि छायाचित्रणे, व्हिडीओचित्रणे आणि विवरणपत्रे इत्यादींच्या मार्गाने गोळा केलेल्या पुराव्याची संचिका ठेवील. नामनिर्देशन दाखल करतेवेळी आयोजित केलेल्या मेळाव्याशी किंवा मिरवणुकीशी संबंधित असलेला सर्व खर्च उमेदवाराच्या हिशेबामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

आयोगाने अनुदेश क्रमांक ७६/अनुदेश/२०११/इइएम, दिनांक ७ एप्रिल २०११ (**जोडपत्र डी - ७**) अन्वये असा अनुदेश निर्गमित केला आहे की, जेव्हा जनतेतील कोणताही व्यक्ती कोणाहीकडून कोणतीही रक्कम किंवा प्रतिपूर्ती न घेता त्याच्या स्वतः च्या वैयक्तिक वाहनाचा उपयोग करून उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) सार्वजनिक मेळाव्यास/मिरवणुकीस/सार्वजनिक सभेस, स्वेच्छेने उपस्थित राहत असेल तेव्हा, तो खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येणार नाही. तथापि, कोणत्याही उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) लाभासाठी, झेंडे किंवा बॅनर्स किंवा भित्तिपत्रके लावून प्रचाराच्या प्रयोजनासाठी मेळाव्यामध्ये किंवा सार्वजनिक सभेमध्ये वापरलेल्या वैयक्तिक वाहनांचा उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) खर्चात समाविष्ट करण्यात येईल. जर कोणत्याही उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) मेळाव्यासाठी किंवा सार्वजनिक सभेसाठी वाणिज्यिक नोंदणी क्रमांक असलेली वाणिज्यिक वाहने वापरण्यात येत असतील तर, अशा वाहनांवरील खर्च उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) हिशेबात, समाविष्ट करण्यात येईल.

प्रचाराच्या प्रयोजनासाठी उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) मालकीचे असलेले व वापरलेले एक वैयक्तिक वाहन, प्रचाराचे वाहन म्हणून मानण्यात येईल आणि बाजारदराप्रमाणे इंधन व चालकाच्या वेतनावर केलेला काल्पनिक खर्च उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) हिशेबामध्ये समाविष्ट करण्यात येईल. प्रचाराच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आलेल्या उमेदवाराची (उमेदवारांची) मालकी असलेली अन्य वाहने असतील तर, अशी वाहने भाड्याने घेण्याच्या अधिसूचित दराप्रमाणे, काल्पनिक खर्चाचा हिशेब उमेदवाराकडून(उमेदवारांकडून) करण्यात येईल.

पक्षाचे चिन्ह असलेले झेंडे, गळपट्ट्या किंवा टोप्या अशा बाबींवरील खर्च हा, संबंधित पक्षाकडून त्यांचा निवडणूक खर्च म्हणून हिशेबात घेण्यात येईल. जर उमेदवाराचे (उमेदवारांची)नाव (नावे) किंवा छायाचित्र (छायाचित्रे) धारण करीत असतील तर, ते उमेदवारांच्या खर्चात जमा करण्यात येईल. तथापि, पक्ष/उमेदवाराकडून साडी, शर्ट, टी-शर्ट, धोती इत्यादींसारख्या मुख्यतः परिधान करावयाच्या कपड्यांचा पुरवठा व वाटप ही मतदारांना दिलेली लाच असल्याने त्यास परवानगी देण्यात येणार नाही.

भारताच्या निवडणूक आयोगाने, अनुदेश क्रमांक ४६४/ आयएनएसटी / २०११/ ईपीएस, दिनांक २८ मार्च २०११ (**जोडपत्र डी-६**) द्वारे असे स्पष्ट केले आहे की, निवडणूक कार्यासाठी , जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघांना भेट देण्याच्या त्यांच्या प्रयोजनासाठी, जिल्हा पातळीवरील पक्षाचे पदाधिकारी/नेते (प्रमुख प्रचाराकांशिवाय) यांच्या वाहनावरील खर्च, उमेदवारांच्या खर्चात समाविष्ट करण्यात येणार नाही. आणखी असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, जिल्ह्याचा पदाधिकारी स्वतःच त्याच जिल्ह्यातून निवडणूक लढवणारा उमेदवार असेल आणि जेथून तो निवडणूक लढवित आहे, त्या मतदारसंघात फिरण्यासाठी असे वाहन वापरण्यात येत असेल तर, किंवा कोणत्याही विशिष्ट उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) प्रचारासाठी अशा वाहनाचा वापर करण्यात येत असेल तर, वाहनाचा भाडे आकार हा प्रचाराच्या प्रयोजनासाठी वाहन वापरणाऱ्या उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) हिशेबामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

जर, उमेदवार वैध कारणांशिवाय त्याचा हिशेब (लेखे) तपासणीसाठी दाखल करीत नसेल तर, सार्वजनिक मेळाव्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही. सार्वजनिक मेळाव्यासाठी परवानगी नाकारण्यापूर्वी,लेखे सादर न केल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस काढण्यात येईल. व बजावण्यात येईल. तथापि, जर उमेदवाराने तपासणीसाठी लेखे सादर केले असतील तर, सार्वजनिक मेळाव्यासाठी तात्काळ परवानगी देण्यात येईल. यामुळे निवडणूक लढविण्यासाठी गंभीर नसलेल्या बनावट उमेदवारांना आळा बसू शकेल.

## ६. हेलिकॉप्टर खर्च व इतर प्रवास खर्च यावरील संनियंत्रण :—

### (एक) प्रमुख प्रचारकांच्या प्रवास खर्चावरील खर्च :—

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ प्रमाणे राजकीय पक्षांच्या नेत्यांनी विमानाने किंवा अन्य कोणत्याही साधनांनी केलेल्या प्रवासावरील खर्च हा, उमेदवाराने केलेला किंवा प्राधिकृत केलेला निवडणुकीच्या संबंधातील खर्च असल्याचे मानण्यात येणार नाही. या कलमाच्या स्पष्टीकरण (२) मधील राजकीय नेते या व्याख्येत मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या ४० व्यक्तींचा व मान्यताप्राप्त राजकीय पक्षाव्यतिरीक्त अन्य पक्षांच्या म्हणजे, नोंदणीकृत बिगर मान्यताप्राप्त पक्षाच्या २० व्यक्तींचा समावेश असून त्यांची नावे, अधिसूचनेच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास व भारताच्या निवडणूक आयोगास कळविण्यात आलेली आहेत. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास व भारताच्या निवडणूक आयोगास कळविण्यात आलेल्या अशा राजकीय नेत्यांना प्रमुख प्रचारक म्हणून संबोधले जाते. मान्याताप्राप्त राजकीय पक्षाकडून मान्यताप्राप्त राजकीय पक्षाव्यतिरिक्त अन्य राजकीय पक्षाकडून प्रमुख प्रचाराकांच्या यादीच्या संबंधात विहित कालावधीत, माहिती प्राप्त झाल्यानंतर, मुख्य निवडणूक अधिकारी, ती माहिती सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना/ खर्च निरीक्षकांना उपलब्ध करून देईल व ती संकेतस्थळावर (वेबसाईटवर) टाकील.

प्रमुख प्रचारकाच्या जाहीर मेळाव्याच्या किंवा सभेच्या प्रसंगी, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी प्रमुख प्रचारक/अन्य प्रतिष्ठित व्यक्तीसमवेत व्यासपीठावर असेल तर, प्रमुख प्रचारकाच्या प्रवास खर्चाव्यतिरिक्त त्या मेळाव्यावरील संपूर्ण खर्च उमेदवाराच्या खर्चात टाकण्यात येईल. जर उमेदवार व्यासपीठावर हजर नसेल, परंतु उमेदवाराची छायाचित्रे असलेले बॅनर्स /पोस्टर्स (भित्तिपत्रके) जाहीर मेळाव्याच्या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली असतील किंवा प्रतिष्ठित व्यक्तीने/ प्रमुख प्रचारकाने उमेदवाराचे नाव नमूद केले असेल तरी देखील प्रमुख प्रचारकाच्या प्रवास खर्चाव्यतिरिक्त जाहीर मेळाव्यामधील संपूर्ण खर्च, उमेदवाराच्या, निवडणूक खर्चाच्या हिशोबामध्ये टाकण्यात येईल. जर मेळाव्यामध्ये/सभेमध्ये एकापेक्षा अधिक उमेदवार व्यासपीठावर हजर असतील किंवा त्यांच्या नावाचे बॅनर्स किंवा पोस्टर्स (भित्तीपत्रके ) प्रदर्शित केलेले असतील तर, अशा मेळाव्यावरील/ सभेवरील खर्च, अशा सर्व उमेदवारांमध्ये समप्रमाणात विभागण्यात येईल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अशा उमेदवारांच्या अभिरुप निरीक्षण नोंदवहीमध्ये आवश्यक नोंदी करण्यासाठी मेळाव्यात उपस्थित असलेल्या अन्य उमेदवाराविषयीची माहितीस संबंधित निर्णय अधिकाऱ्यांना दिला पाहिजे.

**(दोन) हेलिकॉप्टरचा किंवा विमानाचा खर्च :–**

निवडणूक खर्चाची एक प्रमुख बाब म्हणजे हेलिकॅाप्टर्स किंवा विमाने भाड्याने घेणे ही आहे. आयोगाच्या अनुदेशाप्रमाणे, जर निवडणुकीच्या अधिसूचनेपासून ७ दिवसांच्या आत राजकीय पक्षांच्या प्रमुख प्रचारकाचे नाव आयोगास व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास कळविण्यात आले असेल तर, प्रमुख प्रचारकाचा प्रवास खर्च उमेदवाराच्या खर्चात टाकण्यात येणार नाही. जर उमेदवार (उमेदवारांनी) प्रमुख प्रचारकांसोबत वाहतूक सुविधामध्ये हिस्सेदार असले/असतील तर खर्चाच्या तर, ५० टक्के खर्च व जर, एकापेक्षा अधिक उमेदवार त्या सुविधांमध्ये हिस्सेदार असतील तर, ५० टक्के प्रवास खर्च या उमेदवारांमध्ये संविभाजित करावयाचा आहे (**आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ सूचना/२०१२/इइपीएस खंड एक, दिनांक २२ जानेवारी २०१४, जोडपत्र डी – १५** ).

विमानचालन क्षेत्रामध्ये, भारतीय विमानतळ प्राधिकरणाने किंवा संबंधित विमानतळांवरील खाजगी विमानतळ चालकाने निर्धारित केलेल्या दरानुसार विमान/हेलिकॉप्टर चालकांवर विमान थांबवण्याचा (पार्क करण्याचा) आकार (दिवस/रात्र) आकारला जातो. म्हणून, उमेदवाराच्या खर्चाच्या परिगणनेसाठी अशा विमानतळांना प्रदान केलेल्या किंवा प्रदेय असलेल्या प्रत्यक्ष रकमेनुसार रक्कम आकारण्यात येईल. वाणिज्यिक विमानतळांव्यतिरिक्त इतर ठिकाणी विमान थांबवण्याचा (पार्किंग) आकार हा, चालकाने किंवा उमेदवाराने प्रदान केलेल्या प्रत्यक्ष रकमेनुसार असावा, म्हणून, कोणतेही विमान थांबवण्याच्या (पार्किंग) आकाराची परिगणना करण्यासाठी वाणिज्यिक विमानतळांचा विमान थांबविण्याचा (पार्किंग)आकार भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून किंवा खाजगी विमानतळचालकाकडून मिळविण्यात यावा. इतर ठिकाणच्या पार्किंगसाठी, विमान थांबविण्याकरिता चालकाने किंवा उमेदवाराने प्रदान केलेले प्रत्यक्ष आकार हिशेबात घेण्यात येतील. (**जोडपत्र डी – १८**).

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ च्या स्पष्टीकरण १ अनुसार हेलिपॅडचे स्थळ विकसित करण्याच्या आणि काढून टाकण्यात आलेली सामग्री हटविण्याच्या संबंधातील खर्चासह हेलिपॅडची उभारणी आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या साधारणपणे प्रमुख प्रचारक म्हणून ओळखले जाणारे प्रवाशाशी संबंधित राजकीय पक्षाकडून सोसण्यात आलेल्या हेलिकॅाप्टर थांबविण्याचा (पार्किंग) आकार यांवर केलेला खर्च, त्यांच्या सुरक्षिततेचा हक्क लक्षात न घेता संबंधित राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबामध्ये नोंदविण्यात येईल. आणि उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणूक खर्चाच्या हिशेबात नोंदवण्यात येणार नाही.

प्रमुख प्रचारक, जो उमेदवारदेखील आहे, स्वतः च्या मतदारसंघातील प्रचारासाठी हेलिकॉप्टर भाड्याने घेणे, हेलिपॅड तयार करणे इत्यादींवरील खर्चाचा हिशेब देईल. तथापि, त्याच्या स्वतः च्या मतदारसंघातून इतर मतदारसंघातील प्रचारासाठी आणि आपल्या मतदारसंघात परत येण्यासाठी झालेला प्रवास खर्च त्याच्या / तिच्या हिशेबात नोंदवला जाणार नाही **(जोडपत्र डी– २२).**

**(तीन)** जर सुरक्षा रक्षकासह वैद्यकीय परिचर यांसह कोणताही परिचर किंवा जी संबंधित मतदारसंघामध्ये उमेदवार नाही अशी पक्षाच्या कोणत्याही सदस्यासह इतर कोणतीही व्यक्ती किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक किंवा मुद्रणविषयक प्रसारमाध्यमांचा कोणताही प्रतिनिधी, राजकीय पक्षाच्या नेत्यासोबत (प्रमुख प्रचारक), त्याचे वाहन/विमान/ हेलिकॉप्टर इत्यादींमधून प्रवास करीत असेल तर परंतु, नेत्याबरोबर (प्रमुख प्रचारक), त्याचे वाहन/विमान/ हेलिकॉप्टर इत्यादींमधून प्रवास करीत असेल तर परंतु, नेत्याबरोबर (प्रमुख प्रचारकाबरोबर) प्रवास करताना, अशी व्यक्ती (अशा व्यक्ती) उमेदवारांच्या निवडणूक प्रचार मोहिमेत कोणत्याही रीतीने कोणतीही भूमिका बजावत नसेल तर, अशा नेत्याचा प्रवास खर्च पूर्णपणे राजकीय पक्षाच्या हिशेबामध्ये नोंदविण्यात येईल. तथापि, जर नेत्याबरोबर प्रवास करताना अशी कोणतीही व्यक्ती (अशा कोणत्याही व्यक्ती) उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणूक प्रचार मोहिमेत कोणत्याही रीतीने कोणतीही भूमिका बजावत असेल तर, अशा नेत्याचा ५० % प्रवास खर्च अशा उमेदवाराबरोबर (उमेदवारांबरोबर) संविभाजित करण्यात येईल.

**(चार)** लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) च्या स्पष्टीकरण २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, अशा निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत, राजकीय पक्षाने, राजकीय पक्षाच्या नेत्यांची नावे [ प्रमुख (स्टार) प्रचारक ] भारताचा निवडणूक आयोग व त्या राज्याचा मुख्य निवडणूक अधिकारी यांना कळवावयाची आहेत आणि त्याचे नाव असलेली यादी भारताच्या निवडणूक आयोगाला व संबंधित

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला प्राप्त झाली असेल त्या दिनांकापासून लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अन्वये पुरविण्यात आलेल्या लाभांसाठी, असे नेते हक्कदार असतील.

**(पाच)** जर असा नेता (प्रमुख प्रचारक) त्याच्या मतदारसंघाच्या बाहेर आयोजित करण्यात आलेल्या कोणत्याही मेळाव्यामध्ये भाग घेत असेल तर, तो लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) च्या स्पष्टीकरण १ अनुसार देण्यात आलेल्या सवलतीचा हक्कदार असेल. तथापि, असा नेता (प्रमुख प्रचारक) कोणत्याही मतदारसंघामध्ये निवडणुकादेखील लढवीत असेल तर, तो त्याच्या स्वतःच्या मतदारसंघात करण्यात आलेला प्रवास खर्च व प्रवास खर्चासह त्याच्या मतदारसंघात त्याने आयोजित केलेल्या सभेवरील किंवा मेळाव्यावरील खर्च, त्याच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये (हिशेबामध्ये) टाकण्यात येईल, यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ७७ अनुसार कोणत्याही लाभासाठी तो हक्कदार असणार नाही.

**(सहा)** जर मेळावा/सभा अशा नेत्याच्या (प्रमुख प्रचारक) मतदारसंघात आयोजित करण्यात आली असेल तर निवडणूक लढविणाऱ्या अन्य उमेदवारांसोबत असा नेता मंचावर उपस्थित असेल तर, अशा सभेचा खर्च हा त्या नेत्याच्या व अशा सर्व उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये संविभाजित करावयाचा आहे. तथापि, त्याच्या मतदारसंघाबाहेर त्याच्या पक्षाच्या निवडणूक लढविणाऱ्या अन्य उमेदवारांसोबत, मेळाव्यामध्ये/ सभेमध्ये जर तो (प्रमुख प्रचारक) भाग घेत असेल तर, अशा सभेचा खर्च हा, असा मेळावा/सभा ज्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारासाठी आयोजित करण्यात आला असेल अशा सर्व उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये संविभाजित करण्यात येईल व त्याच्या मतदार संघाबाहेर आयोजित करण्यात आलेल्या अशा मेळाव्याच्या/सभेच्या खर्चाचा कोणताही भाग हा त्या नेत्याच्या (प्रमुख प्रचारक) निवडणूक खर्चामध्ये टाकण्यात येणार नाही. **(आयोगाने पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/ इपीएस खंड एक, दिनांक २२ जानेवारी २०१४, परिशिष्ट डी – १५.**

**(सात)** अन्य राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या पक्षाशी युती असणाऱ्या पक्षाचा प्रमुख प्रचारक, मेळाव्यात उपस्थित राहत असेल व उमेदवाराच्या नावाचा उल्लेख करीत असेल किंवा उमेदवारासोबत व्यासपीठावर उपस्थित राहत असेल तर संलग्न पक्षाच्या प्रचारकाच्या मतदारसंघापर्यंतच्या प्रवास खर्चात सूट देण्यात येणार नाही आणि तो उमेदवाराच्या खर्चात टाकला पाहिजे. यासंबंधात हेलिकॉप्टरच्या वापरासंबंधीच्या आयोगाच्या अनुदेशामध्ये अंतर्भूत असलेले त्यांचे पत्र क्रमांक ४३७/६/१/२००८- सीसी आणि बीई, दिनांक २४ ऑक्टोबर २००८, **जोडपत्र डी–५** मध्ये जोडण्यात आले आहेत.

**(आठ)** जेथे प्रमुख प्रचारक कोणत्याही उमेदवारासाठी प्रचारकार्य करीत असतील अशा मतदारसंघातील प्रमुख (स्टार) प्रचारकांचा निवास/भोजनाच्या खर्चासहीत सर्व खर्च हा, त्या विशिष्ट उमेदवाराच्या खर्च खात्यामध्ये समाविष्ट करण्यात येईल. परंतु –

(क) प्रमुख प्रचारकांनी त्या उमेदवारासाठी प्रत्यक्ष प्रत्यक्ष प्रचार केला आहे आणि

(ख) अशा उमेदवाराने अशा खर्चाचे प्रदान केले आहे किंवा नाही ही वस्तुस्थिती लक्षात न घेता त्या उमेदवाराच्या निवडणूक प्रचारकार्यासाठी व्यावसायिक हॉटेल किंवा निवासव्यवस्था (लॉज) यामध्ये राहात असतानाचा अशा निवासाचा किंवा भोजनाचा खर्च अशा प्रमुख प्रचारकाने/प्रचारकांनी केला आहे.

जरी, भोजन व निवासव्यवस्था मानार्थ म्हणून पुरविण्यात आली असली तरी देखील, अशा वाणिज्यिक भोजनाच्या व राहण्याच्या व्यवस्थेचे बाजारमूल्य उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये, हिशेबात घ्यावयाचा आहे. जर, प्रमुख प्रचारक एका मतदारसंघात भोजन व राहण्याच्या व्यवस्थेचा उपभोग घेत असेल त्यावेळी दुसऱ्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अन्य मतदारसंघात प्रवास करीत असेल तर राहण्याचा व भोजनाचा खर्च त्या उमेदवारांचा खर्च म्हणून, प्रमाणबद्धरीत्या वितरित करण्यात येईल. अशा, सर्व प्रकरणांमध्ये नोटीस काढण्यात यावी व त्याप्रमाणे कारवाई केली पाहिजे. (आयोगाचे पत्र क्रमांक ४६४/एपी व एपी-एल-ए/बीइ/२०११/इ इ एम, दिनांक ३ जून २०११, **जोडपत्र डी – ८**)

**(नऊ)** 'झेड प्लस' (झेड प्लस सुरक्षा) सुरक्षा कवच पुरविलेल्या व्यक्तींना, विशिष्ट व्यक्तींसाठी राज्याच्या मालकीच्या एका बुलेट प्रुफ वाहनांचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे. अशा व्यक्तींना, मग त्या पद धारण करीत असो किंवा नसो आणि त्या उमेदवार असो किंवा नसो, आदर्श आचारसंहितेमध्ये समाविष्ट असलेल्या निवडणुकीच्या कालावधीमध्ये राज्याच्या मालकीची उक्त बुलेट प्रुफ वाहने वापरण्याची परवानगी देण्यात येईल. एकाच व्यक्तीच्या नावाने बहुविध वाहनांचा वापर करण्यास, कोणत्याही विशिष्ट प्रकरणी सुरक्षा प्राधिकरणाकडून विशेषकरून विहित केल्याशिवाय परवानगी देण्यात येऊ नये. जेव्हा ती वाहने अशा कालावधीमध्ये अशासकीय प्रयोजनासाठी वापरली असतील तेव्हा, अशा वाहनांचा वाढीव खर्च संबंधित व्यक्तीने सोसावयाचा आहे. जे 'प्रमुख प्रचारक' आहेत, अशा राजकीय पदाधिकाऱ्यांच्या भेटीच्याबाबतीतील खर्च पक्षाच्या लेख्यांमध्ये हिशोबात धरण्यात येईल. जर प्रमुख प्रचारक हा उमेदवारअसेल तर मतदारसंघातील वाहनांचा वाढीव खर्च त्याच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात धरण्यात येईल. जर सुरक्षा सुविधेचा उपयोग घेणारा पक्षाचा पदाधिकारी प्रमुख प्रचारक नसेल आणि तो उमेदवारासाठी प्रचार करीत असेल तर, अशा प्रचाराकरिता वापरलेल्या सुरक्षा वाहनाचा वाढीव खर्च उमेदवाराच्या हिशेबामध्ये जोडण्यात येईल (**जोडपत्र डी – १६**).

**(दहा)** निवडणुकीशी संबंधित असल्याचे म्हटला जाऊ शकेल असा मतदानानंतरचा व निकाल घोषित होण्यापूर्वीचा खर्च, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ नुसार उमेदवारांचा खर्च म्हणून हिशोबात घेण्यात येईल. म्हणून जो खर्च निवडणुकीशी संबंधित नाही असा मतदानाच्या तारखेनंतर प्रमुख प्रचारकाच्या किंवा उमेदवाराच्या प्रवासावरील खर्च, कोणत्याही उमेदवाराच्या हिशेबामध्ये जोडण्यात येणार नाही. जर प्रमुख प्रचारक/ उमेदवार, जेथून त्याने किंवा तिने निवडणूक लढविली असेल अशा मतदारसंघाला भेट देत असेल तर, मतमोजणीच्या तारखेपूर्वी किंवा मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी मतदारसंघातील प्रवास खर्च हा त्याच्या किंवा तिच्या हिशेबामध्ये जोडण्यात येईल. जर राजकीय पक्ष मतदानानंतर प्रमुख प्रचारकाचा मतदारसंघाबाहेरील खर्च सोसत असेल तर, उक्त खर्च आयोगाला सादर केलेल्या लेख्यांमध्ये राजकीय पक्षांद्वारे दाखविण्यात येईल (**जोडपत्र –१७**).

**७. पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणाचे संनियंत्रण :–**

जिल्हा निवडणूक अधिकारी, आयोगाने निवडणुकांची घोषणा केल्यापासून तीन दिवसांच्या आत, त्यांच्या जिल्ह्यातील सर्व मुद्रणालयांना, लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७-क चा आवश्यकता निदर्शनास आणून देणारे आणि याचे कोणतेही उल्लघंन हे राज्याच्या संबंधित कायद्यान्वये मुद्रणालयाचे लायसन रद्द करण्यासह कठोर कारवाईस निमंत्रण देणारे ठरेल. अशी माहिती देणारे पत्र लिहिल. कोणत्याही निवडणुकीची पत्रके, भित्तिपत्रके व त्यांनी मुद्रित केलेले असे अन्य साहित्य यांवर मुद्रकांची व प्रकाशकांची नावे व पत्ते मुद्रण ओळीत स्पष्टपणे दर्शविण्याची सूचना त्यांना विशेषकरून केली पाहिजे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ क (२) अन्वये, आवश्यक असल्याप्रमाणे, मुद्रित साहित्याची व प्रकाशकाच्या घोषणापत्राची प्रत मुद्रकाने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास पाठवावयाची आहे आणि जर ते राज्याच्या राजधानीत मुद्रित करण्यात आले असेल, तर, असे मुद्रण केल्यापासून प्रत मुद्रण केल्यापासून ३ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास पाठवावयाची आहे या विषयावरील तपशिलवार सूचना, आयोगाचे पत्र क्रमांक ३/९(इ एस ००८)९४, जेएस-दोन, दिनांक २ सप्टेंबर १९९४ (**जोडपत्र डी–२**) मध्ये अंतर्भूत केल्या आहेत.

जर निवडणुकांच्या कालावधीत, कोणत्याही विशिष्ट उमेदवाराच्या कोणत्याही संदर्भाशिवाय, नेत्यांचे (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१, याच्या कलम ७७ च्या अर्थानुसार प्रमुख प्रचारक, छायाचित्र किंवा आवाहनासह भित्तिपत्रके, बॅनर्स, झेंडे, स्टिकर्स इत्यादी वापरण्यात आलेले असतील तर, खर्च राजकीय पक्षाच्या हिशोबात नोंदविण्यात येईल तथापि, जर नेता कोणत्याही मतदारसंघातील उमेदवार असेल तर, त्याच्या मतदारसंघात प्रत्यक्षपणे वापरण्यात आलेल्या अशा बाबींवरील प्रमाणशीर खर्च त्याच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात घेण्यात येईल. (आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/इपीएस, दिनांक २० जानेवारी २०१२/(**जोडपत्र डी – १०**).

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास मुद्रणालयाकडून कोणतीही निवडणूक विषयक पत्रके किंवा भित्तिपत्रक, इत्यादी मिळाल्याबरोबर, तो प्रकाशकाने व मुद्रकाने कायद्याच्या अटींचे व आयोगाच्या निदेशांचे पालन केले आहे किंवा कसे याची तपासणी करील. तो एक प्रत, त्याच्या सूचना फलकावर सुद्धा लावील. जेणेकरून सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व अन्य हितसंबंधित व्यक्ती, कायद्याच्या शर्तीचे पालन करण्यात आले आहे किंवा कसे हे तपासू शकतील .

जेव्हा लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ -क च्या तरतुदींचे उल्लंघन झाले असेल तेव्हा अशा सर्व प्रकरणांत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने अपराध्यांविरुद्ध सक्षम न्यायालयात तक्रार दाखल केली पाहिजे. या प्रकरणांना व्यापक प्रसिद्धी दिली पाहिजे आणि संबंधित न्यायालयांमध्ये नेटाने पाठपुरावा केला पाहिजे. मुद्रण खर्च दर्शविणाऱ्या विवरणपत्रासह मुद्रित साहित्याच्या प्रती अभिरुप नोंदवहीत समावेश करण्यासाठी लेखांकन चमूंना देण्यात याव्यात.

८. **निवडणूक कार्याच्यादरम्यान वाहनांच्या वापराचं संनियंत्रण :—**

प्रत्येक उमेदवार, त्याच्या निवडणूक प्रचारासाठी त्याच्याकडून वापरण्याचे प्रस्तावित केलेल्या सर्व वाहनांचा तपशील, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर सादर करील. निवडणूक निर्णय अधिकारी त्याच दिवशी वापरासाठी परवाना देईल. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून मिळालेला वाहनाचा परवाना, वाहनाच्या समोरच्या बाजूस लावावयाचा आहे. या अनुदेशांच्या प्रयोजनांसाठी, दुचाकी वाहने (मोटरबाईक्स, स्कूटर्स, मोपेडस) सायकल रिक्षा इत्यादी देखील वाहने आहेत आणि अशा प्रकरणांमध्ये मागणी केल्यावर, परवाना दाखविण्यास यावा. हे तपशील अभिरूप निरीक्षण नोंदवहीत समावेश करण्यासाठी लेखांकन चमूंना द्यावेत.

जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय, वाहने प्रचारासाठी वापरल्याचे आढळून आले तर, तो उमेदवारासाठी अनधिकृत प्रचार समजण्यात येईल. आणि त्यासाठी भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ (अ) च्या दंडात्मक तरतुदी लागू होतील. म्हणून ती वाहने प्रचार मोहिमेतून तात्काळ बाहेर काढण्यात येतील. याशिवाय या वाहनांवरील खर्च, अभिरूप निरीक्षण नोंदवहीत देखील जोडण्यात येईल.

जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नोटीस दिल्यानंतरही उमेदवाराने त्याचा हिशेब निरीक्षणाकरिता सादर केला नसेल तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणुकीच्या वेळी वाहन वापरासाठी दिलेली परवानगी तात्काळ काढून घ्यावी आणि उमेदवारांकडून निरीक्षणाकरिता हिशेब सादर केले जाईपर्यंत परवानगी दिली जाणार नाही.

**जोडपत्र डी-४** येथे आयोगाचे पत्र क्रमांक ५७६/३/२००५/जेएस दोन, दिनांक २९ डिसेंबर २००५ यामध्ये दिलेल्या आयोगाच्या अनुदेशांचेही आणखी मार्गदर्शनासाठी पालन केले जाऊ शकते.

जर विशिष्ट उमेदवारासाठी परवानगी देण्यात आलेल्या वाहनाचा अन्य उमेदवाराकडून किंवा अन्य उमेदवारासाठी प्रचाराच्या प्रयोजनार्थ वापर करण्यात येत असेल तर, परवानगी काढून घ्यावयाची आहे आणि भरारी पथकाने वाहन जप्त करावयाचे आहे. जो उमेदवार प्रत्यक्षपणे या वाहनाचा वापर करीत होता त्या उमेदवाराच्या हिशेबामध्ये खर्च टाकण्यासाठी भरारी पथकाने सहायक खर्च निरीक्षकास अहवाल द्यावा.

जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून परवानगी मिळविल्यानंतर उमेदवाराचा , दोन दिवसांपेक्षा कोणत्याही अधिक कालावधीसाठी प्रचार वाहनांचा वापर करण्याचा इरादा नसेल तर तो/ती, अशा वाहनांचा परवाना काढून घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविल. जर उमेदवाराने, परवानगी मिळाल्यानंतर, अशा प्रचार वाहनांची परवानगी काढून घेण्यासाठी निवडणुक निर्णय अधिकाऱ्याला कळविले नाहीतर, उमेदवाराने प्रचार मोहिमेसाठी परवानगी दिलेल्या वाहनांचा वापर केला असल्याचे गृहीत धरणात येईल, आणि त्यानूसार, अशा वाहनांच्या वापरासंबंधी अधिसूचित दरानुसार खर्च, त्याच्या/तिच्या निवडणुकीच्या खर्चाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात येईल. परवानगी दिलेल्या अशा वाहनांचा तपशील व परवानगी काढून घेण्यासंबंधातील विनंती, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून अशा उमेदवारांच्या खर्चाचा हिशेब करण्यासाठी लेखाचमूंला (टीम) देण्यात येईल. **(आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/इपीएस/२०१५/खंड-दोन, दिनांक २९ मे २०१५ जोडपत्र डी -१९.**

९. **तात्पुरते अडथळे (बॅरिकेडस) व व्यासपीठे इत्यादीच्या बांधकामांवरील खर्चाचे संनियंत्रण :—**

जर तात्पुरते अडथळे (बॅरिकेडस) व्यासपीठे इत्यादींच्या बांधकामावरील खर्च सुरक्षेच्या दृष्टीने शासकीय अभिकरणांनी केलेला असेल तर, ज्याच्या मतदारसंघात सभा होत असेल, त्या उमेदवाराचा खर्च म्हणून तो नोंदविण्यात यावा. जेव्हा राजकीय पक्षाचा नेता अशा सभेत भाषण करीत असेल त्यावेळी जर उमेदवारांचा गट व्यासपीठावर उपस्थित असेल तर, खर्च त्यांच्यामध्ये समप्रमाणात संविभाजित करण्यात येईल. जिल्हा निवडणूक अधिकारी, घटनेपासून तीन दिवसांच्या आत, संबंधित शासकीय अभिकरणांकडून खर्चाचा तपशील प्राप्त करील आणि उमेदवारांना त्यांच्या खर्चाच्या हिश्याची माहिती देईल व अभिरूप निरीक्षण नोंदवहीत नोंद करण्यासाठी लेखांकन चमूंस त्याची प्रत पाठवील.जर व्यासपीठाच्या किंवा तात्पुरत्या अडथळ्याच्या (बॅरिकेडस)

बांधकाात खाजगी अभिकरण सहभागी असेल तर निवडणूक निर्णय अधिकारी तीन दिवसांच्या आत अशा अभिकरणाकडून खर्चाची माहिती मागविल. जर असे कोणतेही ट्रॅव्हल अभिकरण वाहतुकीच्या सुविधा पुरवण्याच्या कामात सहभागी असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, तीन दिवसांच्या आत, अशा अभिकरणांकडून खर्चाचे तपशील मागवील. जर असा कोणताही उमेदवार, अन्य जिल्ह्यातील असेल तर, ही माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास व मतदारसंघाच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास देखील कळवील, तात्पुरते अडथळे (बॅरिकेडस) व व्यासपीठ, इत्यादींच्या बांधकामावर केलेल्या खर्चासंबंधी आयोगाचे पत्र क्रमांक ७६/२००४/जेएस-दोन, दिनांक १० एप्रिल २००४ मध्ये अंतर्भूत असलेल्या त्याच्या सूचनांचे देखील पालन करण्यात येईल **(जोडपत्र डी-३)**.

**१०. व्हिडिओ व्हॅनचे संनियंत्रण :–**

(एक) कोणत्याही मतदारसंघाच्या प्रमुख प्रचारकाशिवाय कोणत्याही उमेदवार नाव उल्लेख न करता किंवा उमेदवाराच्या छायाचित्राशिवाय पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत जर राजकीय पक्षाने व्हिडिओ व्हॅनचा वापर केला असेल तर, ती पक्षाच्या लेख्यात नोंदविण्यात येईल, विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत निवडणूक पूर्ण झाल्यानंतर ७५ दिवसांच्याआत किंवा लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत ९० दिवसांच्या आत, पक्षाकडून ही बाब कळविण्यात येईल. (**जोडपत्र डी-११** मधील आयोगाचे पत्र क्रमांक ७६ /अनुदेश/२०१२/ इइ-पीएस भाग-एक, दिनांक ९ फेब्रुवारी २०१२).

(दोन) जर उमेदवाराचे (उमेदवारांची) नाव (नावे) किंवा छायाचित्र (छायाचित्रे) त्यावर प्रदर्शित करण्यात आले असेल (आले असतील) किंवा त्यावर उमेदवारांची (उमेदवारांची) कोणताही भित्तीपत्रके (पोस्टर्स) बॅनर्स प्रदर्शित करण्यात आले (आली) असतील व त्याच्या मतदारासंघात व्हॅन वापरण्यात आली असेल तर, खर्च अशा उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) हिशेबात दाखविण्यात येईल.

**११. अन्य संनियंत्रण यंत्रणा :–**

(एक) **स्वयं-सहाय्यता गट, अशासकीय संघटना, इत्यादींच्या लेख्यांचे (हिशेबाचे) संनियंत्रण** पैसे/साहित्याचे वाटप करण्यासाठी राजकीय पक्षांकडून/उमेदवापांरडून स्वंय सहाय्यता गट, अशासकीय संघटना, इत्यादींना माध्यम बनविण्यात येत आहेत व निवडणूक प्रचारासाठी त्यांचा वापर करण्यात येत आहेत, अशा त्याच्या संबंधात तक्रारी आल्या आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत फिरता निधी/आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याने पैसै/ साहित्याचे वाटप करण्यासाठी त्यांचा वापर करण्यात येत नसल्याची खात्री करण्यासाठी स्वंय सहाय्यता गटांचे बारकाईने संनियंत्रण करणं सहज शक्य व्हावे म्हणून, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या व भारतीय दंड संहितेच्या तरतुदींच्या संदर्भात, असा वापर होत असल्यास, ही बाब भ्रष्टाचाराची व निवडणूकविषयक अपराध आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान (जिल्हा निवडणूक अधिकारी) स्वयं सहाय्यता गटाच्या/अशासकीय संघटनाच्या संबंधात जिल्ह्यातील कामाचा अहवाल एक दिवस आड मागवतील.

(दोन) **मंगल कार्यालयामध्ये/समाजमंदिरामध्ये/भेटवस्तूंचे वितरण/खाद्यान्नाचे वाटप यांची तपासणी :–**

पूर्वी भेटवस्तूंचे वितरण (धोती/साडी यांसारख्या)/खाद्यान्न इत्यादीच्या वितरणासाठी मंगल कार्यालयांचा/ समाजमंदिरांचा किंवा अन्य मोठ्या सभागृहांचा वापर करण्यात येत असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त झालेल्या आहेत. निवडूक कालावधीत मंगल कार्यालये/समाजमंदिरे व तत्सम स्थळांच्या वापरावर, नोंदणीच्या प्रयोजनाच्या अनुषंगाणे जिल्हा निवडणूक यंत्रणेकडून निरीक्षण ठेवावे, त्यासाठी नोंदणीबाबतचा काही पुरावा (विवाह निमंत्रणासारखा) मिळविला पाहिजे, जेणेकरून निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी खर्च लपविता येणार नाही. जिल्हा निवडणूक अधिकारी अशा नोंदणीचा दैनंदिन अहवाल गोळा करील व मतदारांना प्रभावित करण्यासाठी बनावट पार्टी आयोजित करण्यात आलेली नाही हे पाहील. कोणत्याही संशयास्पद नोंदणीचा/कार्यक्रमाचा अहवाल जिल्हाचा प्रभारी असलेल्या सहायक /उप आयकर संचालकाकडे सुपूर्द करावा, तो आयकरच्या दृष्टीने, खर्चाची तपासणी करील. प्रार्थनास्थळाच्या बाहेर ''अन्नदानम'' च्या सबबीखाली मोठ्या प्रमाणावर जेवणावळी देणे हे निवडणुकीच्या निमित्ताने मतदारांना प्रभावित करण्यासाठी खाद्यान्न (वाटपाचा) मार्ग अवलंबिण्यास येत असल्याच्य शंकेस वाव देणारे आहे जे लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम १२३ च्या व भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ 'क' च्या तरतुदीच्या संदर्भात भ्रष्ट कृती व निवडणूकविषयक अपराध आहे. मुख्य निवडणूक अधिकारी /

जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर जेवणावळीविषयीच्या कोणत्याही संशयाच्या प्रकरणी खात्री केली पाहिजे व त्यास प्रतिबंध घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या पाहिजेत.

धार्मिक समुदायांनी, त्यांच्या धार्मिक संस्थांमध्ये रूढीगत प्रथेचा भाग म्हणून आयोजित केलेल्या सामुदायिक जेवणावळ्यामध्ये (लंगर, भोज, इत्यादी) आणि विवाह, मृत्यू, इत्यादींसारख्या धार्मिक विधी सोहळ्यांचे आचरण करण्याच्या सामाजिक प्रथेचा भाग म्हणून दिलेले भोज/मेजवानी इत्यादीमध्ये उमेदवाराच्या सहभागासंबंधी शंका घेण्यात आली आहे. आयोगाचे अनुदेश क्रमांक/७६ सूचना/२०११/३३ एक, दिनांक ५ डिसेबर २०११ (**जोडपत्र डी – ९**) नुसार, जर निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार (लढविणारे कोणतेही उमेदवार) **मतदारांना मेजवाणी देण्यासाठी** एकतर त्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने आयोजित केलेल्या सामुदायिक भोजनावळीत (कोणत्याही नावाने संबोधण्यात आलेल्या) उपस्थित राहत असेल( राहत असतील) तर सामुदायिक समारंभावरील खर्च उमेदवाराचा निवडणूक खर्च म्हणून समजण्यात येईल आणि उमेदवाराच्या (हिशेबात) जोडण्यात येईल. तथापि, धार्मिक समुदायांनी त्यांच्या धार्मिक संस्थामध्ये रूढीगत प्रथा म्हणून आयोजित केलेल्या सामुदायिक भोजनावळी / लंगर इत्यादी किंवा कोणत्याही व्यक्तीने (उमेदवाराशिवाय)विवाह, मृत्यू, इत्यादीसारखे कोणत्याही समारंभ साजरे करण्यासाठी नेहमीप्रमाणे दिलेले भोज/मेजवानी, इत्यादींना हे अनुदेश लागू होणार नाही, अशा सामुदायिक भोजनावळी/लंगर/भोज/मेजवानी, इत्यादींवर केलेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात येणार नाही परंतु, उमेदवार सर्वसामान्य पाहुणा म्हणून त्यात सहभागी होत असल्यास, सामुदायिक भोजनावळी/लंगर/भोज/मेजवानी, इत्यादींवर करण्यात आलेले खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात येणार नाहीत. आणखी अशीही खात्री करण्यात येईल की, अशा सामुदायिक भोजनावळी, इत्यादी आयोजित करण्यासाठी उमेदवार कोणतेही आर्थिक अंशदान देत नाही व अशा सामुदायिक भोजनावळी, इत्यादीमध्ये कोणत्याही रीतीने राजकीय प्रचार केलेला नाही. वर नमूद केल्याप्रमाणे, सामुदायिक भोजनावळीवरील निर्बंध मतदारसंघातील मतदान/पुर्नमतदान पूर्ण झाल्यानंतर काढून टाकण्यात येतील (**आयोगाचे अनुदेश पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०११/इएस, दिनांक ५ डिसेंबर, २०११, जोडपत्र डी –९**).

आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, केरळ, पुडुचेरी, तामिळनाडू, आणि पश्चिम बंगाल यांच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकादरम्यान आणि २०१६ मध्ये झालेल्या काही राज्यांच्या पोट-निवडणुकांदरम्यान काही उमेदवारांनी परदेशात राहणाऱ्या परदेशी मतदारांची मते मागण्याकरीता प्रचार करण्याच्या प्रयोजनार्थ भारतातून परदेशांमध्ये प्रवास केला आहे. या संदर्भात, आयोगास असे स्पष्ट करावेसे वाटते की, जरी उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधींनी किंवा पक्ष नेत्यांनी परदेशात जाऊन परदेशी मतदाराचे मत मागण्यास कायद्यान्वये मनाई केलेली नसली तरी अशा उमेदवारांनी, त्यांची प्रतिनिधीनी किंवा पक्ष नेत्यांनी त्या देशांतील प्रवास, भोजन, निवास इत्यादींवर केलेला सर्व खर्च उमेदवारांनी त्यांच्या निवडणुकीच्या संबंधात केलेला किंवा प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे समजण्यात येईल. अशा प्रकारे, अशा प्रकाराचा सर्व खर्च, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम ७७(१) च्या अर्थांतर्गत येईल आणि संबंधित उमेदवारांनी तो त्यांच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांमध्ये समानिष्ट करावयाचा असून तो खर्च निवडणूक घेण्याबाबतचे नियम,१९६१ यांच्या नियम ९० द्वारे विहित केलेल्या मर्यादेच्या अधीन आहे.

तथापि, आयोगास, आणखी असेही स्पष्ट करावेसे वाटते की, उपरोक्त निवडणुकांमध्ये मतदान करण्याच्या प्रयोजनासाठी भारतात येण्यासाठी परदेशी मतदारांना विमान तिकिटे किंवा त्यांना इतर कोणत्याही मार्गाने विमोहित करून रोख रक्कम किंवा वस्तुच्या स्वरुपात लालूच दाखविणे ही कृती लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ (१) च्या अर्थानुसार 'लाचलुचपतीची' भ्रष्ट प्रथा तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ख च्या अर्थानुसार निवडणूकविषयक 'लाचलुचपतीचा' अपराध असल्याचे समजण्यात येईल. वर नमूद केलेले निवडणूकविषयक अपराध करणे किंवा लाच देण्याची भ्रष्ट पद्धती अवलंबणे या विरुद्ध संबंधित कायद्यान्वये दंडणीय कारवाई केली जाईल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. याशिवाय अन्य कोणतीही व्यक्ती किंवा संघटना उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने परदेशी प्रवास खर्च देऊ करत असेल किंवा त्यांची मते मागण्यासाठी त्यांना असे अन्य कोणतेही विमोहन देत असेल तर, याविरुद्ध देखील दंडनीय कारवाई केली जाईल (**जोडपत्र डी– २०**).

**१२. विविध माध्यमांद्वारे भेटवस्तूच्या किंवा रोख रकमेच्या बदल्यात कूपन वाटप केल्याची किंवा पैशाचे वाटप केल्याची तपासणी करणे :**

यापूर्वी ज्यासंदर्भात तक्रारी करण्यात आलेल्या आहेत तो भ्रष्टाचाराचा अन्यप्रकार, पक्षांकडून/उमेदवारांकडून मतदारांना कूपनवाटप करण्याशी संबंधित आहे. असेही समजले आहे की, कूपन वाटप, आरती-प्रसादाच्यावेळी, किंवा सभेमध्ये/समारंभामध्ये केले जाते आणि मतदारांना लाच देण्यासाठी माध्यम म्हणून तारण व्यावसायिकांचा वापर केला जातो. गैरवापरास कोणताही वाव राहू नये याची खात्री करण्याच्या दृष्टीने, निवडणूक प्रचारासाठी किंवा सामाजिक स्नेहसंमेलनासाठी घेण्यात आलेल्या सभा/समारंभ यांसह कोणत्याही माध्यमांद्वारे केल्या जाणाऱ्या टोकन वाटपाची योग्य पुरावे गोळा करून तपासणी केली पाहिजे व पोलिसात त्याच्या तक्रारी दाखल केल्या पाहिजेत. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने अशा कार्यक्रमाविषयी योग्यवेळी, योग्य ती माहिती मिळण्यासाठी नागरिकांचे चर्चापीठ, स्वयंसेवक, नेहरू युवा केंद्र व अन्य अशासकीय संघटना यांची बैठक आयोजित करावी. जिल्हा निवडणूक अधिकारी, तारण व्यवसायींची यादीसुद्धा गोळा करील आणि आयकर अधिनियमान्वये आवश्यक ती कारवाई करण्यासाठी जिल्ह्याचा प्रभारी असलेल्या सहाय्यक/उप आयकर संचालकांना सहभागी करून त्यांना त्यांच्या निकट निरीक्षणासाठी ठेवील.

**१३. कोणत्याही शासकीय योजनेखालील मजुरीच्या वितरणासह उमेदवाराकडून/राजकीय पक्षांकडून रोख रकमेच्या वितरणाची तपासणी :**

मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी, ग्रामीण रोजगार योजना व शासनाच्या अन्य विविध योजना यांसारख्या शासकीय योजनांखाली देय असलेल्या मजुरीपेक्षा अधिक पैसे निवडणुकांच्या पूर्वसंध्येला राजकीय पक्षांकडून/उमेदवारांकडून कामगारांना देण्यात येत होते असे अभिकथन करणारी अभिवेदने, आयोगास प्राप्त झालेली होती. याची नोंद घ्यावयाची आहे की, आदर्श आचारसंहितेमुळे गरीब लोकांना हालअपेष्टा भोगाव्या लागणार नाहीत, त्याचवेळी योजनेखाली जी, मजुरी मिळण्यास कामगार हक्कदार आहेत त्याशिवाय कोणतीही अधिक रोख रक्कम राजकीय पक्षांकडून/उमेदवारांकडून वितरण करण्यास परवानगी नाही. ही भ्रष्ट कृती व निवडणूकविषयक अपराध आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी, योजनेखालील मजुरीसोबत कोणत्याही उमेदवाराकडून/राजकीय पक्षाकडून रोख रक्कम किंवा भेटवस्तू देण्यात येत नाही याची खात्री करण्यासाठी शासकीय योजनांखालील मजुरीचे वितरण व अन्य लाभांचे संनियंत्रण केले पाहिजे. याची देखील नोंद घेण्यात यावी की, मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी, निवडणुकांच्या पुर्वसंध्येला शासकीय योजनांतर्गत रोख लाभ (थकीत व अग्रिम या दोन्ही रकमा) वितरित करण्यात येतात. मतदानाच्या दिवसापासून ७२ तासांच्या आत, अशी थकबाकी किंवा अग्रिम रक्कम वितरित करण्यात येत नाही याची खात्री करण्याची जबाबदारी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची असेल.

**१४. निवडणुकीच्या कालावधीत दारुचे उत्पादन, साठवण व वितरण यांचे संनियंत्रण :**

दारुच्या संकटास पायबंद घालण्याच्या दृष्टीने, निवडणुकांच्या अधिसूचनेच्या तारखेपासून मतदानाच्या तारखेपर्यंत पुढील कारवाई सुरू करण्यात येईल :—

(एक) उत्पादन, एकूण व्यापार, लायसनप्राप्त संग्रहींकडील साठ्याची मर्यादा, आयएमएफएल/बीयर/देशी दारू यांच्या किरकोळ विक्रेत्यांची दैनंदिन जमा व एकूण व्यापार आणि दारू विक्री दुकानांची उघडण्याची व बंद होण्याची वेळ यांचे मागील वर्षातील उत्पादनाच्या आकडेवरीच्या संदर्भात निकटतेने संनियंत्रण केले पाहिजे.

(दोन) वाहनांच्या आंतर राज्य वाहतुकीवर, राज्य परिवहन कार्यालयाच्या (R.T.O.) तपासणी नाक्यांवर व उत्पादन शुल्क कर्मचाऱ्यांकडून सीमा तपासणी नाक्यावर,अधिसूचनेच्या तारखेपासून मतदान/फेरमतदान पूर्ण होईपर्यंत चोवीस तास तैनात करण्यात येणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अंतर्गत विशेष अंमलबजावणी कर्मचाऱ्यांकडून कडक पहारा ठेवला पाहिजे. योग्य परवान्याशिवाय, कोणतीही दारू वितरित करण्यात येत नाही याची खात्री करून घेण्यासाठी राज्यातील सर्व आसवन्या आणि गोदामे पोलीस रक्षकासह (२४ × ७) चोवीस तास सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या देखरेखीखाली ठेवण्यात यावीत. राज्यातील बेकायदेशीर दारूची कोणतीही बेकायदेशीरपणे साठवणूक किंवा वाहतूक करण्याच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात आली पाहिजे. आयएमएफएल, बीअर व देशी दारूच्या आंतरराज्य वाहतुकीच्या संनियंत्रणासाठी सीमेवरील राज्यांमध्ये उत्पादन शुल्क आयुक्तांमधे आंतरराज्यीय समन्वय साधला पाहिजे.

(तीन) उत्पादन शुल्क विभागाचे जिल्हास्तरावरील नोडल अधिकारी व राज्यस्तरावरील नोडल अधिकारी यांना वरील घटकांचे संनियंत्रण करण्यासाठी, बेकायदेशीर दारू जप्त करण्यासाठी धाडी टाकण्याकरिता नेमले पाहिजे.

(चार) जिल्हास्तरावरील नोडल अधिकारी, स्वतंत्र नमुन्यामध्ये आयएमएफएल, बीयर व देशी दारूसाठी या सारांशाच्या जोडपत्र बी १२ मध्ये देण्यात आलेल्या प्रपत्रानुसार राज्यस्तरावरील नोडल अधिकाऱ्यास जिल्हा निवडणूक अधिकारीआणि खर्च निरीक्षकास त्याची एक प्रत पाठवून दिवसाआड अहवाल सादर करील. उत्पादन शुल्क विभागाचा राज्यस्तरावरील नोडल अधिकारी, उलटपक्षी, त्याच प्रपत्रामध्ये आयोगास एक प्रत पाठवून संपूर्ण राज्याच्या उत्पादनशुल्क कामाबाबतचा दैनिक अहवाल, एकदिवसाआड मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास सादर करील.

(पाच) निवडणुकीदरम्यान मद्याचा साठा करण्यास आणि बेकायदेशीर मद्य वाटपास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्याबाबत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने दैनिक अहवाल सादर करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक आणि सर्व निरीक्षक यांना उद्देशून काढलेले आयोगाचे अनुदेश क्रमांक ७६/ अनुदेश/इइपीएस/२०१३ खंड-आठ, दिनांक १४ नोव्हेंबर २०१३ हे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत (जोडपत्र डी १३), जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्हा उत्पादन शुल्क अधिकारी यांनी मुख्य निवडणूक अधिकारी व मुख्य अधिकारी, उत्पादन शुल्क विभाग यांना विहित नमुन्यात दैनिक अहवाल सादर करावा.

**१५. बँकामधून काढलेल्या रोख रकमेचे संनियंत्रण :**

निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही व्यक्तिच्या बँक खात्यामधून रोख रक्कम काढल्याच्या संशयास्पद व्यवहारासंबंधी, दैनंदिन अहवाल सादर करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी सर्व बँकांना सांगेल. आयोगाने त्याचे पत्र क्रमांक ६१/सारांश. (एपीएलएस/२०१२/इइपीएस, दिनांक १९ जुलै २०१२, जोडपत्र डी-१२) अन्वये पुढील संशयास्पद व्यवहाराची माहिती बँकाकडून मागविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत.

(एक) मागील दोन महिन्यांच्या कालावधीत पैसे जमा करण्याच्या किंवा काढण्याच्या अशा कोणत्याही प्रसंगाशिवाय निवडणूक प्रक्रियेदरम्यान बँक खात्यातून रुपये १ लाखांपेक्षा अधिक असणारी रक्कम, अनियमित व संशयास्पद रीतीने बँक खात्यातून रोख रक्कम काढणे किंवा बँक खात्यात रोख जमा करणे.

(दोन) अशा हस्तांतरणाचे पूर्वी कोणतेही उदाहरण नसताना, निवडणूक प्रक्रियेदरम्यान एका बँक खात्यातून एखाद्या जिल्ह्यातील/मतदारसंघातील अनेक व्यक्तींचा खात्यामध्ये, आरटीजीएस द्वारे अनियमित रीतीने रकमेचे हस्तांतर करणे.

(तीन) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर (वेबसाइटवर) उपलब्ध असलेल्या उमेदवारांच्या शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे, उमेदवारांच्या किंवा तिच्या पतीच्या/त्याच्या पत्नीच्या किंवा त्याच्या अवलंबित व्यक्तींच्या बँक खात्यातून रुपये १ लाखापेक्षा अधिक असणारी कोणतीही रोख रक्कम जमा करणे किंवा काढणे.

(चार) निवडणूक प्रक्रियेदरम्यान, राजकीय पक्षाच्या खात्यामधून रुपये १ लाखापेक्षा अधिक असणारी कोणतीही रोख रक्कम काढणे व जमा करणे.

(पाच) मतदारांना लाचलुचपत देण्यासाठी जी वापरली जाऊ शकते अशा रोख रकमेचे कोणतेही अन्य संशयास्पद व्यवहार.

जिल्हा निवडणूक अधिकारी याबाबतची खात्री करील की, बँकांकडून अहवाल नियमितपणे प्राप्त झाले आहेत आणि ते पृथक्करणासाठी खर्च निरीक्षकांच्या सुर्पूर्द करण्यात आले आहेत. अशी रक्कम ही निवडणूक प्रक्रियेमध्ये वापरण्यात आली नाही हे एक एस किंवा आयकर अन्वेषण संचालनालय यांच्यामार्फत अन्वेषण कोणतेही असल्यास करण्यात येईल.

मोठ्या प्रमाणात रोख रक्कम काढल्याचे कोणतेही संशयास्पद स्वरुपाचे प्रकरण निदर्शनास आल्यास, आवश्यक ती कारवाई करण्यात यावी आणि रुपये १० लाखांपेक्षा अधिक असलेल्या रकमेविषयीची माहिती आयकर कायद्यान्वये आवश्यक कारवाई करण्यासाठी नोडल अधिकारी, आयकर विभाग [द्वारा महासंचालक (अन्वेषण) यांचे कार्यालय येथे] किंवा जिल्ह्याचा प्रभारी सहायक/उप आयकर संचालकास जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून देण्यात येईल.

**१६ राजकीय पक्षाच्या खर्चाचे संनियंत्रण :**

निवडणुकीची घोषणा झाल्यापासून ते निकाल जाहीर होण्याच्या तारखेपर्यंत सर्वसाधारण पक्ष प्रचारामधील राजकीय पक्षाचा खर्चावर भरारी पथकामार्फत( पथकांमार्फत ) जिल्हा प्राधिकरणाकडून लक्ष ठेवण्यात येईल. जरी सर्वसाधारण पक्ष प्रचारावरील खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येत नसला तरी निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत पुराव्यासह नोंदवलेली निरीक्षणे मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यातील **जोडपत्र क-१** मध्ये पाठवावीत.

जोडपत्र डी-१

| | |
|---|---|
| **जाहीर सभा/मेळावे इत्यादीवरील खर्चाचा तपशील** | |
| **(जाहीर सभा/मेळावा इत्यादी घेण्यासाठी परवानगी घेण्याकरिता अर्ज करतेवेळी उमेदवार/त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने द्यावयाचा)** | |
| जिल्ह्याचे नाव– | मतदारसंघाचा क्रमांक व नाव- |
| उमेदवाराचे नाव– | राजकीय पक्ष (कोणताही असल्यास)– |
| जाहीर सभा/मेळावा इ. चा दिनांक, वेळ व कालावधी– | |
| जाहीर सभा/मेळावा इत्यादीचे स्थळ (ठिकाण)– | |

| अ.क्र | खर्चाच्या बाबी | उमेदवार/त्याचा निवडणूक प्रतिनिधीने वापरावयाच्या प्रस्तावित असलेल्या | | राजकीय पक्षाने वापरावयाच्या प्रस्तावित असलेल्या | | इतर कोणत्याही संघाने वापरावयाच्या प्रस्तावित असलेल्या | | प्रभारी अधिकाऱ्याच्या अहवालानुसार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घटकांची संख्या | खर्च | घटकांची संख्या | खर्च | घटकांची संख्या | खर्च | घटकांची संख्या | खर्च |
| १ | मंडप व एका जागी घट्ट बसविलेल्या वस्तू | | | | | | | | |
| २ | अडथळे व कमानी | | | | | | | | |
| ३ | टेबल | | | | | | | | |
| ४ | खुर्च्या | | | | | | | | |
| ५ | इतर फर्निचर | | | | | | | | |
| ६ | ध्वनिक्षेपक व ध्वनिग्राहक | | | | | | | | |
| ७ | भित्तीपत्रके | | | | | | | | |
| ८ | बॅनर्स | | | | | | | | |
| ९ | कट आऊटस् | | | | | | | | |
| १० | वीजेवरील फलक | | | | | | | | |
| ११ | दिव्यांच्या माळा इत्यादी सारख्या रोषणाईच्या बाबी | | | | | | | | |
| १२ | वीज मंडळ इत्यादीला प्रदान केलेला/देय असलेला वीज जोडणी आकार | | | | | | | | |
| १३ | इतर बाबी | | | | | | | | |
| १४ | - | | | | | | | | |
| १५ | एकूण | | | | | | | | |

उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी यांची स्वाक्षरी व नाव/राजकीय पक्ष/इतर कोणत्याही संघाच्या प्रभारी अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

**जोडपत्र डी - २**

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ३/९/इएस ००८/९४ - जे. एस. एक                दिनांक २ सप्टेंबर, १९९४

### आदेश

**विषय :** पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीच्या मुद्रणावरील निर्बंध.

निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीची छपाई करणे व प्रसिद्ध करणे याचे लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ क च्या तरतुदींद्वारे नियमन केले आहे. उक्त कलम १२७ क पुढीलप्रमाणे तरतूद करत आहे :–

**''१२७ क पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध.''**

(१) कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणताही निवडणूक पत्रक किंवा भित्तिपत्रक मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही अथवा मुद्रित किंवा प्रकाशित करविता येणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीला निवडणूकपत्रक किंवा भित्तिपत्रक :–

ती स्वतःच त्याचा प्रकाशक आहे याबद्दलचे स्वतः स्वाक्षरीत केलेले आणि ज्या व्यक्ती तिला व्यक्तीशः ओळखतात अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले आधिकथन त्याने मुद्रकाला दोन प्रतींमध्ये दिल्याशिवाय ; आणि

तो दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रकाने त्या कागदाच्या एका प्रतीसह अधिकथनाची एक प्रत –

(क) तो राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मुद्रित झाला असेल तर, मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याला ;

(ख) इतर कोणत्याही बाबतीत तो ज्या जिल्ह्यामध्ये मुद्रित झाला असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हादंडाधिकाऱ्याला, पाठविल्याशिवाय मुद्रित करता येणार नाही किंवा मुद्रित करवता येणार नाही.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, –

(क) कागदपत्र हाताने नकलून काढण्याच्या प्रक्रियेहून अन्य कोणतीही अनेक प्रती काढण्याची प्रक्रिया म्हणजे मुद्रण असल्याचे समजण्यात येईल आणि मुद्रक या संज्ञेचा अर्थ तद्नूसार लावला जाईल, आणि

(ख) '' निवडणूकपत्रक किंवा भित्तिपत्रक'' याचा अर्थ, उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या एखाद्या गटाच्या निवडणुकीचे प्रचालन करण्यासाठी किंवा निवडणुकीला बाध आणण्यासाठी वाटण्यात आलेले कोणतेही मुद्रितपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किंवा निवडणुकीशी संबंधित असा घोषणाफलक किंवा भित्तिफलक, असा होतो, पण निवडणूक सभेचा दिनांक, वेळ, ठिकाण आणि इतर तपशील किंवा निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांच्यासाठी नेहमीच्या सूचना जाहिर करणारी हस्तपत्रके, घोषणाफलक किंवा भित्तिपत्रके यांचा समावेश होत नाही.

(४) जी व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मधील कोणत्याही तरतूदींचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा शिक्षास पात्र असेल.*

(क) निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीच्या छपाईवरील उपरोक्त बंधने, ही अशा दस्तऐवजांच्या प्रकाशकांची, मुद्रकांची ओळख पटवून देण्यासाठी दृष्टीने कायद्यान्वये लादण्यात आली आहेत, त्यामुळे जरी कोणताही मजकूर किंवा साहित्य यां चा समावेश असणारा कोणताही दस्तऐवज धर्म, पंथ, जात, समाज किंवा भाषा अथवा विरोधकाचे चारित्र्यहनन इत्यादी कारणांमुळे बेकायदेशीर, क्षोभ निर्माण करणारा किंवा हरकत घेण्याजोगा असल्यास, संबंधित व्यक्तीविरूद्ध आवश्यक ती शिक्षात्मक किंवा प्रतिबंधक कारवाई करता येईल, निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीच्या मुद्रण व प्रसिद्धिकरणावर राजकीय पक्षांनी, उमेदवारांनी आणि त्यांनी पाठिंबा देणाऱ्यांनी, अनधिकृत निवडणूक खर्च करण्यावरील तपासणीचे प्रयोजन ठरविण्याच्या अन्य बाबतीत देखील हे निर्बंध असतील.

(ख) निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीची छपाई व प्रसिद्धी करण्याच्या संबंधित कायद्याच्या उपरोक्त तरतूदी यांच्या अनुपालनापेक्षा त्यांचे उल्लंघनच अधिक होत आहे असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. निवडणुकींच्या वेळीस मोठ्या संख्येने असे दस्तऐवज मुद्रित प्रसिद्ध प्रसारित केले जातात आणि खाजगी व शासकीय इमारतींच्या भिंतीवर चिकटवले जातात, याच्या बाबतीत वर नमूद केल्याप्रमाणे कायद्याच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात आलेली नसते. मुद्रणालये, छपाई केलेले दस्तऐवज क्वचितच मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला किंवा, यथास्थिति संबंधित जिल्हादंडाधिकाऱ्याला कलम १२७ क (२) अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे प्रकाशकाकडून प्राप्त झालेल्या प्रतिज्ञापत्रासह पाठवतात. अनेक वेळा, कलम १२७ क (१) चे उल्लंघन करून निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीवर मुद्रक आणि/किंवा प्रकाशक यांची नावे व पत्ते टाकण्यात येत नाहीत.

(ग) आयोगाकडे आणखी अशी तक्रार केली आहे की, अपराध्यांविरुद्ध वेळीच कोणतीही कारवाई केली जात नाही त्यामुळे आक्षेपार्ह साहित्य दंडमुक्त तसेच मुक्तपणे प्रसिद्ध व प्रसारित केले जात आहे. या संबंधात **रहिम खान** विरुद्ध **खुर्शिद अहमद** व इतर ( * एआयआर १९७५ एससी २९० ) यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या खालील मतांकडे लक्ष वेधण्यात येत आहे :

**'' या टप्प्यावरही आपणास दिसून येईल की, निवडणूक कायद्यामध्ये तसे आवश्यक असले तरी वादग्रस्त हस्तपत्रकावर मुद्रक व प्रकाशक याच्या नावाचा समावेश नसतो. दुर्दैवाने असे छापील साहित्य प्रसारित होते तेव्हा, तेथे चौकशी केल्यानंतर त्यावर सक्त कारवाई करेल असे कोणतेही कायदेशीर अभिकरण नाही, याचा परिणाम निवडणुकीच्या वेळी कोणताही मुद्रक किंवा निवडणूक लढविणारा उमेदवार किंवा प्रचारक कायद्याला घाबरत नाही आणि कोणत्याही प्रकारचा पुरावा न ठेवता तो घोटाळा चालू ठेवण्यास यशस्वी होतो, त्याला माहीत असते की, निवडणुकीनंतरही त्याबाबत प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय त्यावर काही कारवाई होणार नाही. कायदे बनविण्याप्रमाणेच कायद्याचे राज्य जितके महत्त्वाचे आहे तितकेच वेळेत त्याची अमंलबजावणी होणे हे देखील महत्त्वाचे आहे.''**

५. भविष्यात, या विषयावरील वर नमूद केलेल्या कायद्याच्या तरतुदींच्या आवश्यकतांचे काटेकोर पालन अनुपालन करण्यासाठी आयोग, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये त्याच्या अधिकारांचा आणि याबाबतीत सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करून व या विषयांवरील त्याच्या सर्व पूर्वसूचनांचे अधिक्रमण करून, याद्वारे खालीलप्रमाणे निदेश देत आहेः–

५. (१) निवडणूक आयोगाकडून लोकसभा, विधानसभा किंवा विधान परिषद मतदारसंघाच्या कोणत्याही निवडणूक जाहीर केल्यानंतर जिल्हा दंडाधिकारी, निवडणूकीची अशी घोषणा केल्यानंतरच्या तीन दिवसांमध्ये, त्याच्या जिल्ह्यातील सर्व छपाई करणाऱ्या मुद्रणालयांना लेखी कळवील.

(क) वर नमूद केलेल्या कलम १२७ क च्या आवश्यकता त्यांच्या निदर्शनास आणून देणे आणि त्यांनी छपाई केलेली कोणतीही निवडणूक पत्रके किंवा भित्तिपत्रके, असे इतर साहित्य यांच्या मुद्रकांची आणि प्रकाशकांची नांवे व पत्ते प्रिंट लाईनमध्ये (छपाई प्रणालीमध्ये) स्पष्टपणे दिसून येतील अशा पद्धतीने टाकण्याची त्यांना विनिर्दिष्ट सूचना देणे :

(ख) छापलेल्या साहित्याच्या अशा छापलेल्या (प्रत्येक साहित्याच्या तीन जादा प्रतींसह) आणि अशा साहित्याची छपाई झाल्यानंतर तीन दिवसांमध्ये कलम १२७ क (२) अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे प्रकाशकाकडून मिळालेल्या प्रतिज्ञापनाच्या प्रती पाठविण्याबाबत मुद्रणालयांना सांगणे :

(ग) त्यावर अशा स्पष्ट अटी नमूद करण्यात याव्यात की, कलम १२७ क च्या तरतुदींचे आणि आयोगाच्या उपरोक्त निदेशांचे कोणतेही उल्लंघन करणे हे अतिशय गंभीर समजले जाईल आणि राज्याच्या संबंद्ध कायद्यान्वये, मुद्रणालयाचे लायसन रद्द करण्यासह कठोर कारवाई करण्यासाठी जी काही योग्य अशी प्रकरणे असतील त्यावर कठोर कारवाई केली जाईल.

५ (२) मुख्य निवडणूक अधिकारी, राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी असलेल्या मुद्रणालयाच्या बाबतीत तशीच कारवाई करील.

५(३) कोणतीही निवडणूक पत्रके किंवा भित्तिपत्रके इत्यादी छापण्याचे काम हाती घेण्यापूर्वी, मुद्रक, याबाबत आयोगाकडून जोडपत्र-क मध्ये विहित केलेल्या नमुन्यात कलम १२७ क (२) च्या अटींनुसार प्रकाशकांकडून प्रतिज्ञापत्र मिळवील. हे प्रतिज्ञापन प्रकाशकाकडून यथोचितरित्या स्वाक्षरी केलेले व ज्यांना प्रकाशक व्यक्तीशः ओळखतो अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले असेल. हे प्रतिज्ञापन जेव्हा मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला किंवा, यथास्थिती जिल्हा दंडाधिकाऱ्याला अग्रेषित करण्यात येईल तेव्हा मुद्रकाकडून ते अधिप्रमाणित देखील करावे.

५ (४) वर निदेश दिल्याप्रमाणे, मुद्रक, त्याची छपाई झाल्यापासून तीन (३) दिवसांमध्ये प्रकाशकाच्या प्रतिज्ञापनासह , छापलेल्या साहित्याच्या चार (४) प्रती सादर करील. असे छापलेले साहित्य व प्रतिज्ञापन यासोबत मुद्रक आयोगाने जोडपत्र-ख मध्ये विहित केलेल्या नमुन्यात छापलेल्या दस्तऐवजाच्या प्रतींच्या संख्येसंबंधीची आणि अशा छपाईकरणाच्या कामासाठी आकारलेल्या किंमतीची देखील माहिती देईल. मुद्रकाकडून छापलेली प्रत्येकी निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या बाबतीत एकत्र नसलेली मात्र वेगवेगळी असा प्रत्येक दस्तऐवज छापण्यात आल्यापासून तीन(३) दिवसांमध्ये त्याच्याकडून सादर केली जाईल.

५ (५) छपाई करणाऱ्या मुद्रणालयांकडून कोणतीही निवडणूक पत्रके किंवा भित्तिपत्रके इत्यादी जिल्हादंडाधिकाऱ्याला प्राप्त होताच, तो प्रकाशक आणि मुद्रक यांनी कायद्याच्या आवश्यकतांचे आणि आयोगाच्या वरील निदेशांचे अनुपालन केले आहे किंवा कसे याची तपासणी करील. तो त्याच्या कार्यालयामध्ये काही ठळक ठिकाणी त्याची एक प्रत प्रदर्शित करण्याची व्यवस्था करील, त्यामुळे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि इतर हितसंबंधीत व्यक्ती यांना अशा दस्तऐवजांसंबंधात कायद्याच्या आवश्यकतांचे यथोचितरीत्या पालन करण्यात आले किंवा कसे आणि हे तपासून पाहता येईल आणि अशी इतर निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादी प्रकरणांच्या संबंधात वरील कायद्याच्या आवश्यकतांचे उल्लंघन करण्यात आले आहे हे संबंधित प्राधिकाऱ्यांच्या लक्षात आणून देणे त्यांना शक्य होईल.

५ (६) मुख्य निवडणूक आधिकारी, त्याला मिळालेली पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीच्या बाबतीत वरील उप परिच्छेद (५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाहीचा त्याचप्रमाणे पाठपुरावा करील.

५ (७) मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी, उक्त कलम १२७ क च्या वर नमूद केलेल्या तरतुदींचे आणि/किंवा आयोगाच्या वरील निदेशांचे तशा प्रकारे उल्लघंन होत आहे हे त्याच्या लक्षात आहे असेल किंवा ते त्याच्या लक्षात आणून दिले असेल तर अशी निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या प्रसिद्धीकरणाचे कोणतेही प्रकरण असल्यास, तात्काळ तपास करण्यासाठी तत्परतेने कारवाईस सुरु करील. अशा सर्व प्रकरणांमधील अपराध्याविरुद्धचे खटले अति शीघ्रपणे सुरू केले जातील आणि ही प्रकरणे संबंधित न्यायालयात वेगाने पुढे चालू ठेवावीत.

६. आयोग, याद्वारे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व इतर संबंधित यांना इशारा देत आहे की, कायद्याचे कोणतेही उल्लघंन व उपरोक्त विषयावरील आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन ही अत्यंत चिंतेची बाब समजण्यात येईल आणि अपराध्यांविरुद्ध अत्यंत कडक कारवाई करण्यात येईल.

७. कायद्याच्या वरील तरतुदींची आणि आयोगाच्या निदेशांची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असलेला असा कोणताही अधिकारी, यासंबंधात त्यांची कर्तव्ये रीतसर पार पाडण्यात अपयशी ठरल्याचे आढळल्यास त्याने केलेल्या त्याच्या पदाच्या कर्तव्यभंगासाठी त्याच्याविरुद्ध कोणतीही शिक्षार्थ कारवाई करण्याव्यतिरिक्त तो कडक शिस्तभंगाच्या कारवाईसाठी पात्र असेल.

भारताच्या निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. के. मेंडीरट्टा,**
सचिव.

प्रति,

१. सर्व राज्य शासनांचे व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव.

२. सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

# परिशिष्ट–क

निवडणूक पत्रके , भित्तिपत्रके इत्यादींचे प्रकाशक यांच्याकडून सादर करावयाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

(लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२७-क पहा.)

मी, ........................................................................ यांचा मुलगा/मुलगी/पत्नी( नाव)

राहणार ........................................ (गाव/शहर) .......................... जिल्हा ........................................ (राज्य), याद्वारे

घोषित करतो की, मी, ................................ *(निवडणूक पत्रक, भित्तिपत्रक इत्यादीचा थोडक्यात तपशील द्यावा), याचा प्रकाशक आहे.* ........................ कडून छपाई केले जाणार आहे. *(छपाई करणाऱ्या मुद्रणालयाचे नांव)*

**(प्रकाशकाची स्वाक्षरी).**

*ठिकाण :* ....................................

*दिनांक :* ....................................

पूर्ण पत्ता : ....................................

*साक्षांकित केले (प्रकाशकाला व्यक्तिशः ओळखणारी व्यक्ती)*

यांच्याकडून प्रतिस्वाक्षरीत केले.

*स्वाक्षरी (नाव व पत्ता)*

*स्वाक्षरी (मुद्रकाचे नाव व पत्ता)*

## परिशिष्ट – ख

### निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यादीची छपाई करण्यासंबंधीचा माहिती सादर करण्यासाठी नमूना.

१. मुद्रकाचे नांव व पत्ता : ..................................................................................................................

२. प्रकाशकाचे नाव व पत्ता : ..............................................................................................................

..........................................................................................................................................

३. प्रकाशकाच्या छपाई आदेशाचा दिनांक : .......................................................................................

४. प्रकाशकाच्या प्रतिज्ञापत्राचा दिनांक : ..............................................................................

५. निवडणूक पत्रक, भित्तिपत्रक इत्यादींचा थोडक्यात तपशील : ............................................................

..........................................................................................................................................

६. वरील दस्तऐवजाच्या छापलेल्या प्रतींची संख्या : ...........................................................................

..........................................................................................................................................

७. छपाईचा दिनांक : .............................................................................................................

...

८. छपाई खर्च (कागदाच्या खर्चासह) वरील दस्तऐवजाच्या बाबतीत प्रकाशकाकडून आकारला जाणारा छपाई खर्च : ........

..........................................................................................................................................

**(मुद्रकाची स्वाक्षरी).**

**ठिकाण : .................................**

**दिनांक : ..................................**

**मुद्रकाचा शिक्का.**

**जोडपत्र डी-३**

सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ७६/२००४ जे. एस. दोन, दिनांक १० एप्रिल २००४.

**विषय :– अवरोध व व्यासपीठ इत्यादींवरील खर्च.**

१. मी, आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/ ओआर/९५/एमसीएस/११५८, दिनांक २९ मार्च १९९६ तसेच आयोगाचा आदेश क्र.४३७/६/ इएस/००२५/९४/एमसीएस, दिनांक २१ ऑक्टोंबर १९९४ (अनुदेशांचे सारसंग्रह, २००४ मधील बाब क्र. १३३ प्रमाणे पुनरुध्दृत केलेले) यांकडे निर्देश करण्याचा मला निदेश असून त्यात असे निर्धारित करण्यात आले आहे की, कोणत्याही राजकीय नेत्याने अथवा उमेदवाराने प्रचार करतेवेळी, अवरोधक/व्यासपीठ इत्यादींसारख्या सुरक्षा व्यवस्थांवर केलेला खर्च संबंधित राजकीय पक्षाद्वारे सोसण्यात येईल. व्यासनपीठ/अवरोधक यांच्या बांधकामावरील खर्च हा राजकीय पक्षाच्या किंवा वैयक्तिक उमेदवाराच्या किंवा जेथे राजकीय पक्षाचे ''नेते'' सहभागी होते अशा सभेच्या प्रसंगी उपस्थित असलेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांच्या गटाच्या खात्यामध्ये आकारला जाईल किंवा कसे, याबाबत आयोगाकडे असे आक्षेप प्राप्त झाले आहेत.

२. राजकीय पक्षाने केलेला खर्च आणि उमेदवारांनी केलेला खर्च यांमधील फरक दाखविण्यासाठी मार्गदर्शन करणारी तत्वे सर्वोच्च न्यायालयाने कुमार लाई गुप्ता विरुद्ध अमर नाथ चावला (एआयआर १९७५ एससी ३०८) यात उद्धृत केलेली असून त्यात सर्वोच्च न्यायालयाने असे विचार व्यक्त केले होते की, : ''जेव्हा राजकीय पक्षाने पुरस्कृत केलेला उमेदवार त्याच्या निवडणुकीच्या संबंधात पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारावरील खर्चामधून वेगळा दाखविल्याप्रमाणे खर्च करतो आणि उमेदवार हेतूपूर्वक त्याचा फायदा घेतो आणि कार्यक्रमात व कार्यात सहभागी होतो आणि खर्चाशी आपला संबंध नाही असे दाखविण्यास कसूर करतो किंवा त्याला संमती देतो किंवा त्यामध्ये मूकसंमती देतो तेव्हा, विशेष परिस्थितीत असे म्हणणे हे त्याने असा खर्च करण्यासाठी राजकीय पक्षाला प्राधिकृत केले होते असे अनुमान काढण्यास संयुक्तिक ठरेल आणि त्याने खर्च केलेला नाही तर त्याच्या राजकीय पक्षाने तसा खर्च केला आहे असे सांगून तो खर्चाच्या कमात मर्यादेच्या अचूकपणामधून निसटू शकणार नाही.''

३. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या सुधारणेमुळे, कलम ७७ खालील स्पष्टीकरण २ अन्वये येणारा राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या प्रवास संबंधातील खर्चालाच केवळ उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात समाविष्ट करण्यातून सूट दिली जाईल. राजकीय पक्षाने इतर संघाने, व्यक्तींनी/वैयक्तिक निकायांनी केलेले/प्राधिकृत केलेले सर्व इतर खर्च उमेदवाराच्या हिशेबात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

४. आयोगाने या बाबीचा काळजीपूर्वक विचार केला आहे आणि कायद्याच्या तरतुदी लक्षात घेऊन आयोगाने पुढीलप्रमाणे निदेश दिले आहेतः–

(एक) अवरोधक/व्याख्यानपीठ इत्यादीच्या बांधकामावरील खर्च हा पक्ष/संघटक यांच्या वतीने सुरक्षिततेचा विचार करता, जेव्हा शासकीय एजन्सींकडून प्रारंभ केला असेल तेव्हा ज्याच्या मतदारसंघात उक्त सभा घेण्यात येणार आहे, त्या उमेदवाराचा खर्च म्हणून किंवा जेव्हा राजकीय पक्षाचा नेता अशा सभेमध्ये भाषण देणार आहे त्यावेळी उपस्थित असणाऱ्या त्या उमेदवारांच्या गटाचा खर्च म्हणून नोंदवावयाचा आहे. जेव्हा "नेत्या" च्या उक्त सभेच्या वेळी उपस्थित राजकीय पक्षाचे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तेव्हा अशा प्रकरणी खर्च त्या सर्वांमध्ये समसमान वाटला जाईल आणि जिल्ह्याचा जिल्हा निवडणूक अधिकारी, जेथे अशी सभा घेण्यात येईल तेथील संबंधित शासकीय एजन्सींकडून हा कार्यक्रम झाल्यापासून तीन दिवसांच्या आत अंतिम खर्चाची माहिती प्राप्त करून घेईल आणि उमेदवारांना त्यांच्या त्यांच्या हिश्श्याची रक्कम कळवील. ही माहिती इतर उमेदवार ज्या मतदारसंघातील/जिल्ह्यातील आहेत त्या मतदारसंघाच्या/ जिल्ह्याच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला देखील कळविण्यास येईल.

(दोन) जेव्हा अवरोधक/व्याख्यानपीठ यांचे असे बांधकाम उमेदवाराकडून (उमेदवारांकडून) किंवा राजकीय पक्षाकडून किंवा संघटकाकडून त्यांच्या स्वतःच्या निधीने सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आले असेल तेव्हा, रकमा ''नेत्याच्या'' सभेत उपस्थित असलेल्या संबंधित उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या गटाच्या हिशेबात दर्शविण्यात येईल. हे हिशेब, निवडणूक निरीक्षकाकडून किंवा लेख्यांच्या छाननीसाठी नियुक्त केलेल्या पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून यथोचितरित्या पडताळण्यात येतील.

५. आयोगाने असा ही निदेश दिला आहे की, जेव्हा अवरोधक/व्याख्यानपीठ याचे बांधकाम हे शासकीय एजन्सीद्वारे केले जात आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये उमेदवार/राजकीय पक्ष/संघटक हे, अवरोधक/व्याख्यानपीठ याच्या अंदाजित खर्चाची रक्कम आगाऊ स्वरूपात जमा करतील.

६. चालू सार्वत्रिक निवडणूकांच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यासाठी काढलेल्या अधिसूचनेच्या दिनांकाच्या कालावधीत अशा

**जोडपत्र-डी-४**

बाबींवर अगोदर केलेल्या खर्चाबाबत संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी, वरील परिच्छेद ४ अनुसार तात्काळ कारवाई करतील आणि सर्व संबंधित उमेदवारांना कळवितील सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य राजकीय पक्षांना उद्देशून लिहलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ५७६/३/२००५/जे.एस.दोन, दिनांक २९ डिसेंबर २००५.

**विषय :– राजकीय पक्ष व उमेदवार यांच्याकडून निवडणूक प्रचार – उमेदवारांच्या निवडणूक खर्चासंबंधी.**

१. निवडणूक खर्चाच्या हिशेबासंबंधात लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या पोट-कलम (१) च्या तरतूदींकडे आपले लक्ष वेधण्याचे मला निदेश आहेत. उक्त पोट-कलमाखालील स्पष्टीकरणा १(क) नुसार, राजकीय पक्षाच्या प्रचार करण्याच्या कार्यक्रमासाठी विमान किंवा वाहतूकीच्या इतर कोणत्याही साधनांद्वारे प्रवास करण्याच्या संबंधात, राजकीय पक्षाच्या नेत्यांनी केलेला खर्च उक्त कलमाच्या प्रयोजनार्थ, उमेदवाराने किंवा त्याच्या एजंटाने केलेला किंवा प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे समजले जाणार नाही. येथे याची नोंद घेण्यात यावी की, उक्त स्पष्टीकरण १ (क) अन्वये तरतुद केलेला लाभ, पोट-कलम (१) खालील स्पष्टीकरण २ अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे निवडणूकीकरिता अधिसूचनेच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीमध्ये जर नेत्यांची नावे (मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षाच्या बाबतीत कमाल २० आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षासाठी ४०) आयोगाला व संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला कळविण्यात आली असतील तरच मिळेल.

२. वर नमूद केलेल्या तरतूदी यापूर्वी राजकीय पक्षांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. वर स्पष्ट केलेल्या कलम ७७(१) च्या तरतुदीची नोंद घेण्यासाठी पुन्हा राजकीय पक्षांना सल्ला देण्यात येत आहे. वर नमूद केलेल्या स्पष्टीकरण २ च्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यास कोणत्याही राजकीय पक्षाने कसूर केल्यास, स्पष्टीकरण १ अन्वये तरतूद केलेला लाभ पक्षाला मिळणार नाही आणि अशा पक्षांच्या बाबतीत सर्व नेत्यांचा प्रवास खर्च संबंधित उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात समाविष्ट करण्यास भाग पाडण्यात येईल.

३. आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/९७/पीएलएन-तीन, दिनांक १८ मार्च १९९७ मध्ये अंतर्गत असलेल्या अनुदेशांकडे देखील आपले लक्ष वेधण्यात येत आहे (प्रत संलग्न). उक्त पत्रातील अनुदेशांनुसार उमेदवाराने त्याच्या निवडणूक प्रचारासाठी वापर केल्या जाणाऱ्या सर्व वाहनांचा तपशील संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात, याची नोंद घ्यावी की, मोटारसायकल, स्कूटर, मोपेड इत्यादी सारखी दुचाकी वाहने देखील उक्त पत्रातील अनुदेशांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, आणि अशा वाहनांच्या बाबतीत, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास देखील तपशील सादर करणे आवश्यक आहे.

४. जेव्हा राजकीय पक्ष किंवा उमेदवार निवडणूक प्रचारासाठी विमानाचा/हेलिकॉप्टरचा वापर करतात तेव्हा, संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पूर्व माहिती देण्यात यावी. अशी माहिती देताना वापरल्या जाणाऱ्या विमानाची/हेलिकॉप्टर्सची संख्या आणि ज्या कंपनीकडून विमान/हेलिकॉप्टर्स भाड्याने घेतली जाणार आहेत त्या कंपनीचे नाव, स्पष्टपणे नमूद करण्यात यावे तसेच निवडणूक प्रचारासाठी कोणतेही विमान/हेलिकॉप्टर वापरण्यात येत असल्यापासून तीन दिवसांच्या आत समाविष्ट कार्यक्षेत्र अंतर्भूत असलेल्या हवाई उड्डाणांची संख्या आणि प्रदान केलेल्या/प्रदेय असलेल्या भाडे आकारासह प्रवाशांची तपशील सूची यासंबधीचा संपूर्ण तपशील मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला सादर करावा.

५. कृपया या पत्राची पोच द्यावी.

सर्व राज्यांच्या व संघराज्य क्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/९७-पीलएलएन-तीन, दिनांक १८ मार्च १९९७.

**विषयः—** लोकसभा व राज्य विधानसभा यांची सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणूक-निवडणूक कालावधीमध्ये वाहनांच्या गैरवापरावरील करण्याबाबतच्या निदेशांसंबंधी.

१. आयोगाने निवडणूक कालावधीमध्ये वाहनांच्या गैरवापराबाबत अनुसरावयाच्या व पालन करावयाच्या निर्बंधाच्या विषयावर अनुदेश दिलेले आहेत. निवडणूक प्रक्रियेची शुचिता राखण्याच्या दृष्टीने आणि त्यात लोकांच्या खऱ्याखुऱ्या निवडीचे प्रतिबिंब उमटण्याच्या दृष्टीने, आयोगाने, आता असा निदेश दिला आहे की, लोकसभा व विधानसभा मतदारसंघासाठीच्या सर्व सार्वत्रिक व पोटनिवडणुकांमध्ये खालील अनुदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. हे अनुदेश, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये दिलेले आहेत आणि याबाबतीत आयोगाला समर्थ करणारे इतर सर्व अधिकार दिलेले आहेत.

२. निवडणुकीच्या प्रयोजनार्थ, वापरल्या जाणाऱ्या मोटारी/वाहने यांना अधिसूचनेच्या दिनांकापासून कोणत्याही मतदार संघातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, कोणत्याही परिस्थितीत तीन पेक्षा अधिक वाहनांच्या ताफ्यात फिरण्यास परवानगी दिली जाणार नाही. वाहनांची मोठी संख्या असणारे सर्व ताफे जरी ते केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही मंत्र्यास घेऊन जात असले तरी वेगवेगळे करण्यात येतील. तथापि, अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत दिलेल्या कोणत्याही सुरक्षाविषयक अनुदेशांस अधीन राहून असे करता येईल. दुसऱ्या शब्दात सांगायाचे तर, वाहनांचा ताफा, कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीची तीन वाहने अधिक त्या विशिष्ट व्यक्तीची सुरक्षा श्रेणी लक्षात घेता अनुज्ञय असलेली सुरक्षा वाहने यापेक्षा अधिक असणार नाही.

३. निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून ते कोणत्याही मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत, जिल्हा प्रशासन, निवडणूक लढविणारे उमेदवार, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसोबत असणाऱ्या व्यक्ती व इतर पक्ष नेते यांच्याकडून वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर बारकाईने लक्ष ठेवील आणि आयोगाच्या अनुदेशांचा गैरवापर होत नसल्याची सुनिश्चित करील.

४. जर कोणतीही व्यक्ती, वाहनांचा ताफा वेगवेगळा केलेला असतानासुद्धा, वर विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक वाहनांच्या ताफ्यामध्ये फिरत असल्यास, अशी वाहने, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आयोगाच्या निदेशांची अवज्ञा करून वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही याची खात्री करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल.

५. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना प्रचार सुरु होण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे किंवा याबाबतीत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून विशेषरित्या प्राधिकृत करण्यात येईल. अशा इतर अधिकाऱ्याकडे (अधिकाऱ्यांकडे)निवडणूक प्रचारात ते वापरत असलेल्या सर्व वाहनांचा तपशील सादर करण्यास सांगितले पाहिजे. वाहनांचे प्रत्यक्ष उपयोजन करण्यापूर्वी पुरेशा आधी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीने तशा आशयाची सूचना दिल्यानंतरच कोणत्याही अतिरिक्त वाहनांचे आणखी उपयोजन केवळ करता येऊ शकेल. निवडणूक प्रचारासाठी उपयोजन केल्या जाणाऱ्या वाहनांचे तपशील कळवते वेळी, ज्या तहसील क्षेत्रात ( तहसील क्षेत्रांमध्ये) वाहने वापरण्यात येणार आहेत त्या क्षेत्राचा तपशील देखील कळविला पाहिजे.

६. अशा प्रकारे मिळालेला तपशील, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून निवडणूक खर्च निरीक्षकांना कळवला जाईल.

७. उमेदवारांनी किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधींनी जिल्हा प्रशासनास दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक प्रचाराच्या कामी लावलेल्या वाहनांची प्रशासनाकडून मागणी केली जाणार नाही.

८. प्रचार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे नोंदणी करण्यात न आलेले कोणतेही वाहन प्रचार करण्यासाठी वापरले जात असल्याचे आढळून आले तर, ते उमेदवारासाठी अनधिकृत प्रचार करण्याकरिता असल्याचे करण्यात येईल आणि भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ क च्या दंडविषयक तरतुदींकडे लक्ष वेधता येईल आणि ते प्रचार करण्याच्या वापरातून तात्काळ काढून घेण्यात येईल.

कृपया या पत्राची पोच द्यावी.

**जोडपत्र डी-५**

भारत सरकारचे कॅबिनेट सचिव, सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव आणि मुख्य निर्वाचन अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले. निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/१/२००८-सीसी व बीई दिनांक २४ ऑक्टोबर २००८.

**विषयः– प्रमुख प्रचारकाच्या प्रवासावरील निवडणूक खर्च–निवडणूक प्रचारासाठी हेलिकॉप्टरचा वापर इत्यादी.**

१. मला आपणास कळविण्याचा असे निदेश आहे की, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ पोट-कलम (१) अनुसार अशी तरतूद केली आहे की, "प्रत्येक उमेदवाराने" निवडणुकीमध्ये, नामनिर्देशन पत्र भरण्याचा दिनांक आणि निकाल जाहीर झाल्याचा दिनांक या दरम्यान, दोन्ही दिनांका धरून त्याने केलेला किंवा प्राधिकृत केलेला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला निवडणुकीच्या संबंधातील सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा एकतर स्वतः त्याच्याकडून किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून ठेवण्यात येईल. पोट-कलम (२) अन्वये अशी तरतूद केली आहे की, विहित केला जाईल असा सर्व तपशील या हिशोबामध्ये समाविष्ट असेल आणि पोट-कलम (३) अन्वये, उक्त खर्चाची एकूण रक्कम ही विहित केली जाईल, अशा रकमेपेक्षा जास्त असणार नाही असे निर्धारित केले आहे.

२. कलम ७७(१) च्या स्पष्टीकरण (१) मध्ये अशी तरतूद आहे की, एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी (साधारणपणे आम्ही ज्यांचा उल्लेख प्रमुख प्रचारक असा करतो) राजकीय पक्षाच्या प्रचार कार्यक्रमाकरिता त्यांनी केलेला विमान प्रवास किंवा वाहतुकीच्या अन्य कोणत्याही साधनाने केलेल्या प्रवासाचा खर्च हा, निवडणुकीच्या संबंधात त्या राजकीय पक्षाच्या उमेदवाराने केलेला किंवा प्राधिकृत केलेला खर्च असल्याने मानण्यात येणार नाही.

३. कलम ७७ (१) च्या तरतुदी व त्या खालील स्पष्टीकरण (१) यांचा अशा रीतीने मेळ घालण्यात यावा की, जेणेकरून त्यांच्यामुळे कलम ७७(१) च्या तरतुदींच्या मुळाशी असणारा मुख्य उद्देश फोल ठरणार नाही. कलम ७७(१) मध्ये स्पष्टपणे असे विनिर्दिष्ट केले आहे की, निवडणुकीच्या संबंधात उमेदवाराला किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीला आलेल्या किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या सर्व निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवावा लागेल. स्पष्टीकरण (१) हे उमेदवारांच्या निवडणुकीच्या संबंधात राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांकडून जो खर्च करण्यात येतो, अशा खर्चाचा हिशेब ठेवण्यापासून सूट मिळावी अशा स्वरुपाचे आहे, जेणेकरून त्याच्या राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून त्याच्या मतदारसंघात निवडणूक प्रचार मोहिम पार पाडण्यात येईल आणि त्यांनी त्यांच्या प्रवासावर आलेला किंवा वाहतुकीच्या कोणत्याही साधनाद्वारे केलेला कोणताही खर्च हा उमेदवाराच्या एकूण खर्चाचा भाग असणार नाही. म्हणून, असे समजण्यात यावे की, कलम ७७(१) च्या स्पष्टीकरणाच्या प्रयोजनासाठी राजकीय पक्षाचा नेता म्हणून ज्या उमेदवाराला घोषित करण्यात आले आहे, त्यास कलम ७७(१) च्या स्पष्टीकरण (१) च्या अर्थांतर्गत त्याच्या स्वतःच्या मतदार संघातील त्याच्या राजकीय पक्षाचा नेता म्हणून समजण्यात येऊ नये, मग, इतर मतदारसंघातील त्याच्या पक्षाच्या इतर उमेदवारांच्या संबंधात त्याचे स्थान काहीही असो. त्याच्या स्वतःच्या मतदारसंघात (मतदारसंघात) तो प्रथमतः उमेदवार असेल. अशाप्रकारे मतदारसंघात त्याच्या स्वतःच्या मतदारसंघात (मतदारसंघात) त्यांनी केलेला प्रवासावरील खर्च मग तो हेलिकॉप्टर / हवाईजहाजाने केलेला असो किंवा वाहतुकीच्या इतर कोणत्याही साधनाने केलेला असो तो त्याचा मतदारसंघाकरिता विहित केलेल्या खर्चाच्या कमाल मर्यादेत धरण्यात यावा. जेव्हा तो त्याचा मतदार संघाबाहेर इतर मतदार संघात एक प्रमुख प्रचारक (स्टार कॅम्पेनर) म्हणून जाईल, तेव्हा त्याच्या मतदारसंघा मधून इतर मतदार संघात त्यांनी केलेल्या प्रवासावरील खर्च हा सूट मिळालेल्या प्रवर्गात येईल आणि त्याच्या बरोबर इतर मतदारसंघामधून त्याचा स्वतःच्या मतदारसंघात परत येताना त्याने केलेल्या प्रवास खर्चास अशा प्रकारे सूट मिळेल. पण एकदा का तो त्याच्या मतदारसंघात पोहोचेल आणि त्यांनी उक्त मतदारसंघात प्रवास केला तर, त्याने त्याच्या मतदारसंघात केलेल्या अशा प्रवासावरील खर्चाचा हिशेब त्याच्याकडून घेण्यात येईल. वर नमूद केलेल्या तरतुदींची इतर कोणतीही अर्थउकल ही, कलम ७७(१) मध्ये असलेल्या त्या उद्दिष्टांना निष्फळ करू शकेल. हे पोट निवडणुकीच्या बाबतीत अधिक स्पष्टपणे दिसून येऊ शकेल, जेथे एखादा राजकीय पक्ष त्याच्या उमेदवाराचे नाव एक प्रमुख प्रचारक म्हणून समाविष्ट करू शकेल आणि त्यामुळे त्याला त्याचा मतदारसंघात दळणवळणाच्या कोणत्याही साधनाचा वापर करून प्रवास करण्याचा आणि त्यासाठी कोणताही हिशेब न देण्याचा जणू परवानाच मिळेल.

प्रत रवाना : सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्ष.

**जोडपत्र डी-६**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ४६४/अनुदेश/२०११/ईपीएस दिनांक २८ मार्च २०११

प्रति,

१. आसाम, दिसपूर,
२. पश्चिम बंगाल, कोलकाता,
३. केरळ, तिरुवनंतपुरम,
४. तामिळनाडू, चेन्नई,
५. पुडुचेरी पुडुचेरी,
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक, २०११-मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांकरिताच्या वाहन परवान्याबाबत.

महोदय/महोदया,

१. उपरोल्लिखित विषयाच्या संदर्भात आणि आयोगाच्या दिनांक २३ मार्च २०११ च्या समक्रमांकाच्या अनुदेशामध्ये आंशिक फेरबदल करून, मला असे कळविण्याचा निर्देश दिलेले आहे की, आयोगाने या प्रकरणाचा आढावा घेतलेला आहे आणि जर कोणत्याही राजकीय पक्षाच्या जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनी/नेत्यांनी ( प्रमुख प्रचारकांव्यतिरिक्त अन्य ) निवडणूक प्रचारकार्याच्या प्रयोजनार्थ जिल्ह्यामधील विविध विधानसभा मतदारसंघांना भेटी देण्याकरिता वापरावयाच्या वाहनांना परवाना मिळण्याबाबत त्या पक्षाने अर्ज केला तर, संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने त्याकरिता आवश्यक ती परवानगी दिली पाहिजे, असे आता ठरविलेले आहे अशा प्रकरणांमध्ये, परवाना व्यक्तीच्या नावे असेल आणि त्यावर वाहनाचा नोंदणी क्रमांकदेखील नमूद केलेला असेल. या वाहनावरील खर्च उमेदवारांकडून नव्हे तर त्या राजकीय पक्षाकडून करण्यात येईल, हा परवाना इतर जिल्ह्यांमधील प्रवासासाठी वापरण्यात येऊ नये.

मला आणखी असे कळविण्याचा निदेश आहे की, एखाद्या मान्यताप्राप्त पक्षाकरिता मग तो राष्ट्रीय अथवा राज्य स्तरावरील असो - एका विशिष्ट जिल्ह्यासाठी केवळ एकच परवाना देण्यात यावा, असा आयोगाने निदेश दिलेला आहे.

पुढे असेदेखील नमूद केले आहे की, ज्या परवान्यावर राजकीय नेत्याचे नाव, वाहनाचा क्रमांक असेच ज्या कालावधीकरिता परवाना देण्यात आला असेल तो कालावधीदेखील दर्शविलेला असेल असा परवाना देणे आवश्यक आहे. उमेदवारांना व प्रमुख ( स्टार ) प्रचारकांना दिल्या जाणाऱ्या परवान्यांहून वेगळ्या रंगाच्या कागदावर हा परवाना देण्यात यावा, जेणेकरून तो सहज ओळखता येईल. परवान्याची एक साक्षांकित प्रत वाहनाच्या समोरील काचेवर ठळकपणे लावण्यात येईल आणि त्याची मूळ प्रत पोलिसांना अथवा अन्य प्राधिकाऱ्यांना तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ, त्या व्यक्तीकडे ठेवून घेण्यात येईल. या प्रकरणाबाबत संनिरीक्षण पथकालादेखील माहिती देण्यात यावी.

आपला विश्वासू,

सही/-
**(सुमित मुखर्जी),**
अवर सचिव.

**जोडपत्र डी-७**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/अनुदेश/२०११/ईईएम                                                    दिनांक ७ एप्रिल २०११

प्रति,

आसाम, केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगाल
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय :** निवडणूक खर्च संनियंत्रणाबाबत सूचना-उमेदवाराच्या संबंधातील खर्च-रोख रक्कम प्रदान-यासंबंधातील

महोदय,

दिनांक ७ फेब्रुवारी २०११ रोजीच्या सम क्रमांकाच्या अनुदेशाच्या संदर्भात, राजकीय पक्षांकडून आणखी स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने सदर बाबींची तपासणी केली आहे आणि पुढील बाबी स्पष्ट करण्याचा मला आदेश आहे :

१. आयोगाचे अनुदेश क्रमांक ७६/अनुदेश/२०११/ईईएम, दिनांक ७ फेब्रुवारी २०११ यात असे नमूद करण्यात आले आहे की, उमेदवार जेथे धनादेश देणे शक्य नसेल तेथे किरकोळ खर्च वगळता, सर्व निवडणुकविषयक खर्च निवडणुकीच्या प्रयोजनाकरिता उघडलेल्या बँक खात्यातून खाते प्रदान धनादेशाद्वारे करतील. काही राजकीय पक्षांनी, अशा रोकड खर्चाची मर्यादा विनिर्दिष्ट करून, स्पष्टीकरण मागितले आहे. याद्वारे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पार पडत असताना खर्चाच्या कोणत्याही बाबींकरिता, उमेदवाराकडून/ उमेदवारांकडून कोणत्याही व्यक्तीला, संस्थेला देय असलेली रक्कम ही , जर रु. २०००० * पेक्षा अधिक नसेल तर, असा खर्च हा, निवडणुकीच्या प्रयोजनाकरिता उघडलेल्या बँक खात्यातून पैसे काढून रोख रकमेद्वारे करता येऊ शकेल. इतर सर्व प्रदाने ही, उक्त बँक खात्याच्या खाते प्रदान धनादेशाद्वारे करावयाची आहेत.

२. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अनुसार, प्रत्येक उमेदवार हा, ज्या दिनांकास त्याला नामनिर्देशित करण्यात आले आहे त्या दिनांकापासून निकाल जाहीर होण्याच्या दिनांकापर्यंत ( दोन्ही दिनांकाचा यात समावेश आहे) सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवील. याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, सर्व उमेदवार हे त्यांच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबाची नोंदवही ठेवताना **नामनिर्देशन भरल्याच्या दिनांकास** (म्हणजेच सुरुवातीचा दिवस) झालेल्या सर्व खर्चाचा आणि नामनिर्देशनाच्या कालावधीच्या पुढे जे प्रचारमोहीम साहित्य वापरले जाते अशा प्रचारमोहीम साहित्य इत्यादिवरील खर्च यांसारख्या नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी झालेल्या खर्चाचा देखील हिशेब देतील. नामनिर्देशन भरताना आयोजित केलेला मेळावा किंवा काढलेली मिरवणूक, यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व खर्चाचा उमेदवारांच्या खात्यात समावेश करण्यात येईल.

३. जेव्हा जनता ही सार्वजनिक मेळावा/मिरवणूक/उमेदवाराची/उमेदवाराची जाहीर सभा यांना कोणाकडून कोणतीही रक्कम किंवा प्रतिपूर्ती न घेता स्वतःच्या वैयक्तिक वाहनाने उपस्थित राहते तेव्हा असा खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यात येणार नाही, तथापि, वैयक्तिक वाहने ही, कोणत्याही उमेदवाराच्या/उमेदवारांच्या फायद्यासाठी त्या वाहनावर, झेंडे किंवा निशाण्या किंवा भित्तिचित्रे लावून, प्रचार मोहिमेच्या प्रयोजनाकरिता, मेळाव्यात किंवा सार्वजनिक सभेत वापरण्यात आली तर त्यावरील खर्च हा उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) खर्चात समाविष्ट करण्यात येईल. जर वाणिज्यिक नोंदणी क्रमांक असलेली वाणिज्यिक वाहने, कोणत्याही उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) मेळाव्यासाठी किंवा जाहीर सभेसाठी वापरण्यात आली तर, अशा वाहनांवरील खर्च उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) खात्यात समाविष्ट करण्यात येईल.

४. उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) मालकीचे आणि प्रचार मोहिमेसाठी वापरण्यात आलेले वाहन प्रचार मोहीम वाहन असल्याचे मानण्यात येईल आणि बाजार दरानुसार इंधन व वाहन चालकाच्या वेतनावरील काल्पनिक खर्च, उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) खात्यांत समाविष्ट करण्यात येईल. जर उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) मालकीच्या इतर वाहनांचा प्रचार मोहिमेकरिता वापर करण्यात आला तर, अशी वाहने भाड्याने घेण्याकरिता असलेल्या अधिसूचित दरानुसार असलेल्या काल्पनिक खर्चाचे उमेदवाराकडून (उमेदवारांकडून) परिगणन करण्यात येईल.

५. पक्षाचे चिन्ह असलेले झेंडे, टोप्या, मफलर यांच्या वापरासंबंधात, आदर्श आचारसंहिता यात वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या प्रश्न क्रमांक ७२ मध्ये स्पष्टीकरण देण्यात आले आहे. पक्षाचे चिन्हा असलेले असे झेंडे, मफलर किंवा टोप्या यांवरील खर्चाचा हिशेब, संबंधित पक्षाद्वारे, त्याचा निवडणूक खर्च म्हणून देण्यात येईल. जर अशा बाबींवर उमेदवाराचे (उमेदवारांची) नाव (नावे), छायाचित्र (छायाचित्रे) असेल (असतील) तर, सदर खर्च उमेदवाराच्या खात्यात जादा दाखवण्यात येईल. तथापि, पक्षाद्वारे/उमेदवाराकडून साडी, शर्ट, टी-शर्ट, धोतर इत्यादी सारख्या मुख्य पोषाखांचा पुरवठा आणि वितरण यास परवानगी नाही. कारण ते मतदारांना लाच देण्यासारखे आहे.

६. भानिआ अनुदेश क्रमांक ४६४/अनुदेश/२०११/ईपीएस, दिनांक २८ मार्च २०११ यात असे स्पष्ट केले आहे की, जिल्हा पातळीवरील पक्षाचे पदाधिकारी/नेते (प्रमुख प्रचारकाव्यतिरिक्त) हे जेव्हा निवडणूक कार्यासाठी जिल्ह्यातील विविध मतदारसंघाना भेट देण्याच्या प्रयोजनाकरिता वाहनाचा वापर करतात तेव्हा अशा वाहनांवरील खर्च याचा उमेदवाराच्या/उमेदवारांच्या हिशेबात समाविष्ट करण्यात येणार नाही. आणखी असे स्पष्ट करण्यात येते की, जर जिल्हा कार्यकर्ता हा स्वतःच त्याच जिल्ह्यातून निवडणूक लढवणारा उमेदवार असेल आणि अशा वाहनाचा, तो ज्या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे त्या मतदारसंघात ये-जा करण्यासाठी वापर करीत असेल किंवा अशा वाहनाचा कोणत्याही विशिष्ट उमेदवाराच्या/(उमेदवारांच्या) प्रचार मोहिमेकरिता वापर करीत असेल तर त्या वाहनाचा भाडे खर्च, प्रचार मोहिमेकरिता वाहनाचा वापर करणाऱ्या उमेदवाराच्या/(उमेदवारांच्या) हिशेबात समाविष्ट करण्यात येईल.

७. ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,

**(अविनाश कुमार),**

अवर सचिव.

प्रत सादर :—

(१) सर्व राष्ट्रीय राजकीय पक्ष.

(२) आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी या राज्यांतील सर्व राजकीय पक्ष.

स्वाक्षरी,

**(अविनाश कुमार),**

अवर सचिव.

***टीप :—** कृपया जोडपत्र ई-११ आणि ई-१२ पहावे.

**जोडपत्र डी-८**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ४६४/एपी-एचपी आणि एपी-एलए/बीई/२०११/ईईएम दिनांक ३ जून, २०११

प्रति,

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्र यांचे
मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय :** निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या प्रचारकांकडून होत असलेला निवासविषयक खर्च यासंबंधातील स्पष्टीकरणे.

महोदय,

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या तरतुदींचा संदर्भ देण्याचा मला आदेश आहे. उक्त कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये स्पष्टीकरण १(क) आणि स्पष्टीकरण २ अनुसार ज्या राजकीय पक्षाकडे प्रमुख प्रचारक आहेत त्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी पक्षाच्या प्रचार कार्यक्रमाकरिता प्रवासावर केलेला खर्च हा, उमेदवाराचा निवडणुकीच्या संबंधातील खर्च असल्याचे मानण्यात येणार नाही. प्रमुख प्रचारकाद्वारे किंवा त्यांच्याकरिता मतदारसंघातील हॉटेल, निवासगृहातील खोल्या आगाऊ राखून ठेवण्याशी संबंधित असलेला खर्च यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये सूट देण्यात आलेली नाही.

२. आपणास आणखी असे कळवण्याचा मला आदेश आहे की, कोणत्याही उमेदवाराकरिता प्रमुख प्रचारक, ज्या मतदारसंघात प्रचार करतात तेथील निवासगृहात राहणे/ भोजन करणे या खर्चासह सर्व खर्च त्या विशिष्ट उमेदवाराच्या खर्चाच्या लेख्यात अंतर्भूत करण्यात येईल, परंतु असे की,—

(क) प्रमुख प्रचारक/प्रचारक यांनी उमेदवारासाठी प्रत्यक्षपणे प्रचार केला असेल, आणि

(ख) प्रमुख प्रचारक/प्रचारक यांनी, उमेदवाराच्या निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनाकरिता, एखादे वाणिज्यिक हॉटेल किंवा निवासगृह यांत राहताना, त्याबाबतचे प्रदान हे अशा उमेदवाराद्वारे करण्यात आले आहे किंवा नाही किंवा कसे ही वस्तुस्थिती लक्षात न घेता, असा भोजनाचा खर्च केलेला असेल.

३. जरी भोजन व निवास यांची तशी पूरक तरतूद करण्यात आलेली असली तरी सुद्धा उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या संबंधात, अशा वाणिज्यिक भोजन व निवासाचे बाजार मूल्य परिगणित करावयाचे आहे. आणखी असे स्पष्ट करण्यात येते की, जर प्रमुख प्रचारक हा, एका मतदारसंघात भोजन व निवासाचा लाभ घेत असताना इतर उमेदवारांच्या प्रचार मोहिमेसाठी दुसऱ्या मतदारसंघात जात असेल तर, निवास व भोजनाचा खर्च, त्या उमेदवारांमध्ये समप्रमाणात विभागण्यात येईल.

४. अशा सर्व बाबतीत तात्काळ नोटीस काढण्यात यावी आणि त्यावर तद्नुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. यामुळे मुख्य निवडणूक अधिकारी, आंध्रप्रदेश, पत्र क्रमांक १७६०/निवडणूक-डी/२०११-७, दिनांक ३० एप्रिल २०११, हे प्रकरण निकालात काढले आहे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,

**(अविनाश कुमार),**

अवर सचिव.

**जोडपत्र डी-९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/अनुदेश/२०११/ईईएम

दिनांक ५ डिसेंबर, २०११

प्रति,

पंजाब, मणिपूर, गोवा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश,
यांचे मुख्य निवडणूक आयुक्त.

**विषय**ः–सामाजिक अन्नछत्रावर (लंगर, भोज, इत्यादी) झालेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात अंतर्भूत करणे ......... यासंबंधात.

महोदय,

सामाजिक अन्नछत्रावर (लंगर, भोज, इत्यादी) झालेला खर्च आणि त्याचा उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात समावेश करण्यासंबंधातील दिनांक ७ ऑक्टोबर २०११ च्या समक्रमांकाची आयोगाचा अनुदेश संदर्भित करण्याचा निदेश मला मिळाला आहे.

२. वरील अनुदेशाच्या संदर्भात, रुढीगत रिवाजाची एक बाब म्हणून, प्रादेशिक समाजाद्वारे त्यांच्या धार्मिक संस्थांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या सामाजिक अन्नदानांत (लंगर, भोज, इत्यादी) आणि विवाह, मृत्यु इत्यादींसारख्या धार्मिक विधिविषयक कार्यक्रमाचे अनुसरण करणाऱ्या सामाजिक प्रथेची एक बाब म्हणून दिल्या जाणाऱ्या उमेदवारांच्या सहभागाच्या संबंधात शंका उपस्थित करण्यात आली आहे. या संदर्भात आयोगाच्या अनुदेशात असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, सामाजिक कार्यक्रमांवरील खर्चाला उमेदवाराचा निवडणुकीचा खर्च असल्याचे मानण्यात येईल आणि "जर कोणताही निवडणूक लढवणारा उमेदवार सामाजिक अन्नछत्राच्या ठिकाणी (मग त्यांना कोणत्याही नावाने ओळखले जात असो) उपस्थित राहिला मग असे अन्नछत्र त्याच्याकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून **मतदारांचे आतिथ्य करण्यासाठी**" आयोजित करण्यात आले असेल तर अशा खर्चाची, त्याच्या खात्यात भर घालता येईल. याद्वारे पुन्हा एकदा असे स्पष्ट करण्यात येते की, वरील अनुदेश या, धार्मिक समूहाद्वारे एक रूढीप्राप्त रिवाज म्हणून त्यांच्या धार्मिक संस्थांत आयेजित करण्यात येणारे सामाजिक अन्नछत्रे / लंगर इत्यादींसारखा कोणताही समारंभ साजरा करण्याकरिता, विवाह, मृत्यूच्या प्रसंगी नित्यक्रमात कोणत्याही व्यक्तीने दिलेले (उमेदवाराव्यतिरिक्त असलेल्या) भोज / मेजवाणी यांना लागू होत नाहीत आणि अशा सामाजिक अन्नछत्र / लंगर / भोज / मेजवाणी इत्यादींवर झालेल्या खर्चाचा, उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समावेश करण्यात येणार नाही. परंतु असे की, उमेदवार हा अशा ठिकाणी, नित्यक्रमात, सर्वसाधारण अभ्यागत म्हणून सहभागी असला पाहिजे आणि असा उमेदवार अशा सामाजिक अन्नछत्र इत्यादींच्या व्यवस्थेकरिता कोणतेही आर्थिक अंशदान करीत नाही आणि अशा सामाजिक अन्नछत्र इत्यादींच्या ठिकाणी कोणत्याही पद्धतींनी कोणतीही राजकीय मोहीम आयोजित करीत नाही, याची खात्री करून घेण्यात येईल.

३. या पत्राची कृपया पोच देण्यात यावी.

आपला विश्वासू,

सही/-
**एस. के. रूडोला**,
सचिव.

**जोडपत्र डी-१०**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/ईईपीएस दिनांक २० जानेवारी २०१२

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,
पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मणिपूर आणि गोवा.

**विषय** :– लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१) च्या स्पष्टीकरण (२) अन्वये समाविष्ट असलेल्या, पक्ष नेत्यांच्या (वलयांकित प्रचारकर्त्यांच्या) निवडणूक खर्चाच्या संबंधातील स्पष्टीकरण या संबंधातील बाब.

महोदय/महोदया,

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१)याच्या स्पष्टीकरण (२) अन्वये समाविष्ट करण्यात आलेल्या वलयांकित प्रचारकर्त्यांबाबत राजकीय पक्षांकडून प्रतिवेदने प्राप्त झाली आहेत. आयोगाने प्रतिवेदनांचा विचार केल्यानंतर याद्वारे पुढील स्पष्टीकरणे दिली आहेत :–

**(१) मुद्रण/इलेक्ट्रॉनिक माध्यम यांतील जाहिरातींवरील खर्च**

जर छायाचित्रासह सर्वसाधारण पक्ष प्रचाराकरिता जाहिरात किंवा वर नमूद केलेल्या नेत्यांचे अपील हे कोणत्याही उमेदवारांचा संदर्भ न देता, मुद्रण आणि इलेक्ट्रॉनिक माध्यम यांत करण्यात आले तर, अशा सर्वसाधारण जाहिरातीवरील खर्चाची राजकीय पक्षाच्या खात्यात नोंद करण्यात येईल. जर असा नेता हा, कोणत्याही मतदारसंघातील उमेदवार जरी त्यात मुद्रण आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातील छायाचित्राचा समावेश असला तरी, अशा सर्वसाधारण पक्ष प्रचारावरील खर्चाची अशा नेत्याच्या खात्यात नोंद करण्यात येणार नाही. कारण ही बाब त्याच्या मतदारसंघाचा कोणताही संदर्भ न देता, सर्वसाधारण पक्ष प्रचाराच्या स्वरूपाची आहे.

**(२) भित्तीपत्रके, निशाण्या, झेंडे स्टीकर्स इत्यादींवरील खर्च**

जर कोणत्याही विशिष्ट उमेदवाराचा कोणताही संदर्भ न देता, नमूद केलेल्या नेत्यांच्या छायाचित्र व अपील यांसह असलेली भित्तीपत्रे, निशाण्या, झेंडे, स्टीकर्स इत्यादी यांचा निवडणुकीत वापर करण्यात आला तर, त्याच्या खर्चाची राजकीय पक्षाच्या खात्यात नोंद करण्यात येईल. तथापि, जर सदर नेता हा कोणत्याही मतदारसंघातील उमेदवार असेल तर, त्याच्या मतदारसंघात प्रत्यक्षात वापरण्यात आलेल्या अशा बाबींवरील प्रमाणानुसार खर्चाचा त्याच्या निवडणूक खर्चात हिशेब देण्यात येईल.

**(३) प्रवास खर्च**

आयोगाने आपला अनुदेश क्रमांक ७६/२००९/एसडीआर, दिनांक २० ऑगस्ट २००९ यात आणि खर्च संनियंत्रणावरील आयोगाच्या अनुदेशाच्या संबंधित परिच्छेद ५.६.३ यात फेरबदल केला आहे आणि याद्वारे असे स्पष्टीकरण दिले आहे की, जर सुरक्षा रक्षक, वैद्यकीय परिचर यांसह कोणताही परिचर किंवा संबधित मतदारसंघामध्ये उमेदवार नसलेला पक्षाचा कोणताही सदस्य किंवा अन्य कोणतीही व्यक्ती वर केलेल्या राजकीय पक्षाच्या नेत्यासोबत (वलयांकित प्रचारकर्ता) त्याचे वाहन / विमान / हेलिकॉप्टर इत्यादींतून प्रवास करीत असेल तर, अशा नेत्याचा प्रवास खर्च पूर्णपणे त्या राजकीय पक्षाच्या खात्यात नोंदविण्यात येईल. आणखी असे स्पष्ट करण्यात येते की, जर नेत्यासोबत (वलयांकित प्रचारकर्ता) प्रवास करीत असलेली व्यक्ती, उमेदवाराकरिता निवडणूक प्रचार मोहिमेत कोणतीही भूमिका बजावत नसेल तर, परिणामी राजकीय नेत्याच्या प्रवास खर्चाच्या कोणत्याही भागाची उमेदवाराच्या खात्यात नोंद होणार नाही. तथापि, जर अशा नेत्यासोबत कोणताही उमेदवार / कोणतेही उमेदवार प्रवास करीत असेल / असतील तर, प्रवास खर्चाच्या ५० टक्के इतका खर्च उमेदवारामध्ये / उमेदवारांमध्ये विभागण्यात येईल.

आपला विश्वासू,
स्वाक्षरी,
**सुमित मुखर्जी**,
सचिव.

इतर सर्व राज्य व संघ राज्यक्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना प्रत सादर.

जोडपत्र डी-११

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/ईईपीएस खंड-एक दिनांक ९ फेब्रुवारी, २०१२

प्रति,

सर्व राज्य / संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय** :– उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, मणिपूर व गोवा यांच्या विधानसभेची, सार्वत्रिक निवडणूक-२०१२ निवडणूक लढविणारा उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या निवडणुकीदरम्यान व्हिडिओ व्हॅनचा वापर करण्यावरील स्पष्टीकरण....यासंबंधात

महोदय/महोदया,

निवडणुकीदरम्यान राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी व्हिडीओ व्हॅन वापरण्यासंबधीत आयोगाचे पत्र क्र.४३७/६/अनुदेश/२००८-सीसी अँड बीई, दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पत्राचा उल्लेख (प्रत सोबत जोडली आहे.) आणि राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्या अशा प्रकारच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यासंबंधात स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे हे नमूद करण्याचा मला निदेश दिलेला आहे. या विषयवस्तूमध्ये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात आले आहे :–

(एक) राजकीय पक्षासाठी, कोणत्याही मतदारसंघाच्या कोणत्याही उमेदवाराचे नाव नमूद न करता किंवा छायाचित्र नसताना निवडणूक प्रकियेदरम्यान सर्वसाधारण / सार्वत्रिक पक्ष प्रचाराकरिता व्हिडिओ व्हॅन वापरली असल्यास त्या खर्चाची पक्षाच्या लेख्यामध्ये नोंद घेण्यात यावी, हा खर्च विधानसभेची निवडणूक असल्यास, निवडणुका पूर्ण झाल्यावर पक्षाने ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभेच्या निवडणुका असल्यास ९० दिवसांच्या आत कळविला पाहिजे.

(दोन) त्यावर उमेदवाराचे (उमेदवारांचे) नाव (नावे)किंवा छायाचित्र (छायाचित्रे) दर्शविले असतील किंवा उमेदवाराचे (उमेदवारांचे) कोणतेही भित्तिपत्रक / निशाण लावले / दर्शविले असतील आणि व्हॅन त्याच्या मतदारसंघात वापरली असेल तर या खर्चाची, अशा उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) लेख्यात नोंद घेणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,
सही /-
**अविनाश कुमार**,
अवर सचिव.

**जोडपत्र डी-१२**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ६१/तक्रारी/एपी-एलएस/२०१२/ईईपीएस दिनांक १९ जुलै, २०१२

प्रति,

सर्व राज्य / संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय** :– भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद-३२४ अन्वये निवडणूक कार्यातील संशयास्पद व्यवहारांच्या संबधात बँकाकडून माहिती एकत्रित करण्यासंबधात.

महोदय,

भारतीय बँकांच्या संघटनेने पत्र क्र. विधि / ५९४६, दिनांक ६ जून २०१२ द्वारे केलेल्या अनुदेशांच्या संदर्भात, (प्रत सोबत जोडली आहे.) आपणांस असे कळवण्याचा मला आदेश आहे की, निवडणूक प्रकियेची शुचिता राखण्यासाठी, जिल्हा निवडणूक अधिकारी हा निवडणूक प्रकिया पार पाडली जात असताना बँकामार्फत करण्यात येणाऱ्या संशयास्पद रोख व्यवहारांच्या सबंधात बँकाकडून पुढील माहिती मागवील :–

(एक) मागील दोन महिन्यात खात्यात रक्कम जमा करणे किंवा काढणे अशा प्रकारचा कोणताही दाखला नसतांना निवडणूक प्रकियेच्या कालावधीत रुपये १ लाखांपेक्षा अधिक रक्कम एखाद्या बँकेच्या खात्यातून नेहमीपेक्षा वेगळ्या रीतीने आणि संशयास्पदरित्या काढणे किंवा खात्यात जमा करणे.

(दोन) निवडणूक प्रकियेच्या कालावधीत एखाद्या जिल्ह्यातील व मतदारसंघातील अनेक व्यक्तींच्या खात्यात एका बँक खात्यातून अशा हस्तांतरणाच्या कोणत्याही पूर्व दाखल्याशिवाय आरटीजीएस द्वारे रकमेचे नेहमी पेक्षा वेगळ्या रीतीने हस्तांतरण.

(तीन) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे उमेदवारांकडून दाखल करण्यात आलेल्या शपथपत्रात नमूद केल्यानुसार, उमेदवारांच्या किंवा त्याच्या पतीच्या / पत्नीच्या किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीच्या बँक खात्यात रुपये १ लाखापेक्षा अधिक रक्कम रोखीने जमा केली किंवा बँक खात्यातून काढली जाणे.

(चार) निवडणूक प्रकियेच्या कालावधीत राजकीय पक्षाच्या खात्यातून रुपये १ लाखांपेक्षा अधिक रक्कम काढली जाणे किंवा खात्यात जमा केली जाणे.

(पाच) मतदारांना लाच दिली जाण्याकरिता वापरण्यात येईल असा कोणताही इतर संशयास्पद रोख रकमेचा व्यवहार.

२. वरील माहितीच्या बाबतीत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून कार्यवाही करण्यात येईल आणि रोख रकमेचा, मतदारांना लाच देण्यासाठी वापर करण्यात येईल असा जेव्हा जेव्हा संशय येईल तेव्हा भरारी पथकाला योग्य पडताळणी नंतर, आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी सांगण्यात येईल. तथापि जर केलेली किंवा काढण्यात आलेली रक्कम ही, रुपये १० लाखांपेक्षा अधिक असेल तर, अशी माहिती आयकर विभागाच्या केंद्रिय अधिकाऱ्यांकडे आवश्यक ती कार्यवाही करण्याकरिता पाठवण्यात यावी.

आपला विश्वासू,
सही /-
**अविनाश कुमार**,
अवर सचिव.

प्रत सादर :–

श्री. के. रामकृष्णन, मुख्य कार्यकारी, भारतीय बँक ॲसोशिएशन, जागतिक व्यापार केंद्र संकुल केंद्र १, ६ वा मजला, कफ परेड, मुंबई ४०० ००५, यांना निवडणूक प्रकियेच्या कालावधीत अनुपालनाकरिता सर्व बँकांना कळवण्याच्या विनंतीसह सादर.

सही /-
**अविनाश कुमार**,
अवर सचिव.

**जोडपत्र डी-१३**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

फाईल क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस २०१३/खंड आठ दिनांक १४ नोव्हेंबर २०१३

प्रति ,

१. मुख्य निवडणूक अधिकारी,
मध्यप्रदेश, भोपाल.
२. मुख्य निडणूक अधिकारी,
राजस्थान, जयपूर.

**विषय :-** निवडणुकांच्या कालावधीत दारू साठवणुकीस व बेकायदेशीर वितरणास प्रतिबंध करणे - दारूच्या विक्रीबाबतच्या दैनिक अहवालासंबंधात मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना अनुदेश याबाबत.

महोदय,

मला निडणुकीदरम्यान (निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणासंबंधातील अनुदेशांचा सारसंग्रह जुलै, २०१३ भाग ५,१०,६ पृष्ठ क्र. २८) दारूचे उत्पादन साठवण व वितरण यासंबंधात भारताच्या निवडणूक आयोगाच्या अनुदेशांकडे आपले लक्ष वेधण्याचा आदेश आहे. मला आणखी असे कळविण्याचा निदेश आहे की, निवडणूक कालावधीमध्ये दारूच्या बेकायदेशीर वितरणाला आळा घालणे ही, जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी व पोलीस अधीक्षक यांची एक अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाचे निवडणूक निरीक्षक यांनी देखील अशा कामावर नियंत्रण ठेवणे अपेक्षित आहे.

२. यासंबंधात वेळोवेळी सविस्तर अनुदेश देण्यात आले असून ज्या (आयएमएफएलच्या) दुकानातील विक्रीमध्ये संशयास्पद वाढ झाली होती अशा (आयएमएफएल) दुकानांची यादी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्याल आली आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना अशीही जाणीव आहे की,जिल्हाची सर्व उत्पादन शुल्क युनिटे म्हणजे दारूभट्ट्या (आसवानी), बाटल युनिट, दारुच्या बयारी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्याने संनियंत्रणाखाली आणण्यात आल्या आहेत. महत्त्वांच्या युनिटांमध्ये अधिकारी व सैन्य दलांना चोवीस तास तैनात ठेवावयाचे आहे. शिवाय, बहुतेक सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांना निवडणूक कालावधीत दारूच्या ओघावर नियंत्रण ठेवण्याची विशेष जबाबदारी द्यावयाची आहे. दारूच्या सीमापार हालचालींना आळा घालण्यासाठी सीमेवरील तपासणी नाक्यावर काही कर्मचाऱ्यांना तैनात करावे लागेल.

३. जरी या उपाययोजनांचा परिणाम, राज्यातील दारूबंदी यंत्रणा अत्यंत मजबूत करण्यात आली असली तरी, जिल्हास्तरावरील परिस्थितीमध्ये आणखी सुधारणा करण्याची गरज आहे. दारुच्या किरकोळ विक्री केंद्रे ही, दारूच्या वितरणाच्या दृष्टीने अत्यंत दुबळे होत आहेत. सर्व जिल्हांचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी यावर अधिक लक्ष केंद्रीत करून आणि पध्दतशीर मार्गाने काम करण्याची गरज आहे.

**४. आयोगाला पुढील तक्रारी प्राप्त झाल्या आहेत :-**

(क) स्थानिक झोपडपट्ट्या, झोपडपट्टी शहरातील विभाग यामध्ये (आयएमएफएल)चा सर्वात स्वस्त उत्पादन प्रकार व देशी दारू यांचा साठा करणे आणि निवडणुकीच्या आधी वितरणासाठी ती दुर्गम ग्रामीण भागात पोहचवणे, राज्य उत्पादन शुल्क अधिनियमाचे आणि लायसनच्या सर्वसाधारण विशेष शर्तींचे उल्लंघन करून, व्यक्तींना मोठ्या प्रमाणात ज्या किरकोळ दुकानांमधून दारू विकण्यात येते त्या किरकोळ दुकानाची, दारुचा साठा करून ठेवण्यास मदत होते.

(ख) काही दारूच्या दूकानांमध्ये साठा नोंदवह्या ठेवण्यात येत नाहीत असे कळविण्यास आले आहे की, दारूची काही दुकाने साठा नोंदवही ठेवत असून देखील, ती उत्पादन प्रकारानुसार (ब्रॅड)साठा नोंदवहीत ठेवीत नाहीत. त्यामुळे दारूच्या दैनिक विक्रीवर संनियंत्रण ठेवण्यामध्ये गंभीर समस्या निमाण होते आणि दुकानातील प्रत्यक्ष साठ्याची पडताळणी करणे बहुतेक अशक्य ठरते.

(ग) उमेदवारांकडून कुपन देण्यास येतात ज्याच्या बदल्यात दारूच्या दुकानात दारूच्या बाटल्या घेता येतात यामुळे रोख रकमेखेरीज कोणत्याही स्वरूपातील विक्रीला प्रतिबंध करणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क अधिनियमाच्या / नियमांच्या शर्तींचे उल्लंघन होते.

**५. वरील बाबी लक्षात घेता पुढील अनुदेशांचे पालन करण्याची आपणांस विनंती करण्यास मला आदेश आहे :-**

**(एक) दारूच्या रोजच्या विक्रीवर सनियंत्रण ठेवणे :**

प्रत्येक जिल्हांमध्ये सरासरी २५ दारूची किरकोळ दुकाने असता त्या दारूच्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात दारूची विक्री होत असते, त्या दुकानांचे रोजचे अहवाल मिळविण्याची सुनिश्चिती जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहिजे, असे करण्याचा चांगला माग हा तुमच्या दारूच्या प्रत्येक किरकोळ दुकानासाठी ऑक्टोबर, २०१३ ची सरासरी विक्री विचारात घेणे आणि ऑक्टोबरच्या सरासरी विक्रीची रोजच्या आकडेवारीशी तुलना करणे असेल. जेथे जेथे विक्रीचे आकडे ३० टक्क्यांनी किंवा त्यापेक्षा अधिक असतील तेथे तेथे दारूची मोठ्या प्रमाणात विक्री होण्याची शक्यता आहे हे लक्षात घेणे. याचे अन्वेषण करण्याची गरज असून त्या दुकानांविरूध्द कडक कार्यवाही करण्यात आली पाहिजे आणि या कार्यवाहीमध्ये लायसन रद्द करण्याचा देखील समावेश असू शकेल. याकरिता जोडपत्र -१ मध्ये प्रतिवेदनासाठीचा विहित नमुना जोडण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांनी, हा अहवाल जिल्हा उत्पादन शुल्क अधिकारी/ सहायक आयुक्त यांच्याकडून घेणे अपेक्षित आहे आणि योग्य त्या कायवाहीनंतर त्याबाबत अहवाल निवडणुक आयुक्तास निवडणूक आयूक्तास (मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास) आपल्या अभिप्रायासह **जोडपत्र – २** मध्ये विहित नमुन्यात पाठविला पाहीजे.

**(दोन) साठा नोंदवही ठेवण्याची सुनिश्चिती :**

काही दूकाने साठा नोंदवह्या मूळीच ठेवीत नाहीत किंवा पूढील विहित नमुन्याशिवाय नोंदवह्या ठेवतात असे आकस्मिक तपासणी दरम्यान आढळून आले आहे. छुप्या प्रमाणामध्ये दारूची विक्री होत असल्याची माहिती लक्षात घेता आणि साठ्याची पडताळणी फार जलद करण्याकरिता ही आकस्मिक तपासणी करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्याने, जिल्हा उत्पादन शुल्क अधिकारी सहायक आयुक्त त्यांच्या मदतीने दारूच्या सर्व दुकानांमध्ये **दारूच्या प्रकारानुसार साठा नोंदवही** योग्यपणे ठेवण्यात येते, याची सुनिश्चिती केली पाहिजे.

**(तीन) दारूच्या विक्रीसाठी टोकन किंवा कुपनचा उपयोग करणे :**

उमेदवार कुपन/ टोकन वाटतात ज्याच्या बदल्यात दारूच्या दुकानातील दारूच्या बाटल्या मिळतात असे वृत्तपत्रांमध्ये प्रतिवेदीत करण्यात आले आहे. या आधी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे हे, राज्य उत्पादन शुल्क अधिनियमाच्या सर्वसाधारण लायसन संबंधीच्या शर्तीचे उल्लंघन आहे. अशा दुकानांविरूध्द जिल्हाधिकाऱ्याने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**(चार) संवेदनशील दारूच्या दुकानांची यादी करणे व त्यांवर बारीक सनियंत्रण ठेवणे :**

पुढील निकषांवर आधारित संवेदनक्षम म्हणून तुमच्या जिल्ह्यातील दारूच्या दुकानांचे वर्गीकरण करणे :-

(क) दिनांक १ नोव्हेंबर २०१३ रोजी, दिनांक १ नोव्हेंबर २०१२ च्या दारुच्या साठ्यापेक्षा ज्या दारूच्या दुकानांचा साठा ५० टक्के किंवा त्याहून अधिक आहे अशी दुकाने अशा (आयएमएफएल) दारूच्या दुकानांची यादी याआधीच कळविण्यात आली आहे. तथापि, तुमच्या जिल्ह्यामध्ये देशी दारूच्या दुकानांसाठी ही कार्यवाही पुन्हा करण्याची गरज आहे.

(ख) झोपडपट्टी असलेली किंवा झोपडपट्टीच्या निकट सानिध्यात असलली दारूची दुकाने.

(ग) मुख्य रस्त्यांपासून दूर असलेली आणि आतील ग्रामीण भागात असलेली दारूची दुकाने.

(घ) ऑक्टोबर, २०१३ च्या रोजच्या सरासरी विक्रीच्या तुलनेत नोव्हेंबर मधील कोणत्याही दिवशीच्या विक्रीमध्ये ३० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाली आहेत अशी दुकाने.

या दुकानांवर संनियंत्रण ठेवण्यात आले पाहीजे आणि दारूच्या प्रकारानुसार रोजच्या रोज साठा नोंदवहीची तपासणी केली पाहिजे.

**(पाच) निवडणुकीत वाटप करण्यासाठीच्या दारुच्या साठ्यास अटकाव करणे :**

शहरी भागावरील झोपडपट्टी क्षेत्र, शहरातील झोपडपट्टी भाग, शिबिर (कोणतेही असल्यास) आणि ग्रामीण क्षेत्रातील दुर्गम किंवा पोचता येणे शक्य नसलेल्या वस्ता ह्यामध्ये बेकायदेशीर दारू साठविण्याची शक्यता आहे. उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकारी यांनी अशी ठिकाणे निश्चित करणे आणि वारंवार पोलीस तपासणी आयोजित करणे आणि अशा ठिकाणी धाडी टाकणे अपेक्षित आहे.

६. वरील सर्व अनुदेश लक्षात घेता, जिल्हाधिकारी आणि जिल्हानिवडणूक अधिकारी यांना, **जोडपत्र-२** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात रोजचा अहवाल देण्याचा विशेष सचिव उत्पादन शुल्क (मुख्य निवडणूक अधिकारी), राज्य शासन यांच्यामार्फत निवडणूक आयोगाला संपूर्ण राज्याचा एकत्रित अहवाल पाठविण्याची विनंती करण्याचा आदेश आहे.

७. हे अनुदेश सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक, सर्व निरिक्षक आणि उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देता येतील.

आपला विश्वासू,
सही
(**एस. के. रुडोला**),
सचिव.

आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित :—

(१) श्री. डी. आर. जोहारी, अतिरिक्त उत्पादन शुल्क आयुक्त व उत्पादन शुल्कावरील नोडल अधिकारी, सी-१००/५०, शिवाजी नगर, भोपाळ, मध्यप्रदेश (कॅम्प बॅग / स्पीड पोस्ट / ई-मेल द्वारे).

(२) श्री. जितेंदर कुमार उपाध्याय, आरएएस, अतिरिक्त उत्पादन शुल्क आयुक्त (प्रशा.) झोन, उदयपूर, राजस्थान (कॅम्प बॅग / स्पीड पोस्ट / ई-मेल द्वारे).

## जोडपत्र–१

दारुचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा उत्पादन शुल्क अधिकाऱ्याचा जिल्हाधिकाऱ्याला दैनंदिन अहवाल दिनांक·········· महिना········· वर्ष········ रोजी विक्रीतील कळवावयाच्या रोजच्या गरजेच्या सरासरीहून विक्रीतील ३० टक्के किंवा त्याहून अधिक वाढ असेल अशीच फक्त दुकाने)

जिल्ह्याचे नाव दिनांक

| अ. क्र. | दुकानाचे नाव व पत्ता | दि. ········· महिना············· वर्ष···········याची सरासरी रोजची विक्री (एकत्रित लिटरच्या स्वरूपात) | कालची विक्री (एकत्रित लिटरच्या स्वरूपात) | विक्रीतील टक्केवारी वाढ | वाढीची कारणे | केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

## जोडपत्र–२

### दारूचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला रोजचा अहवाल

**जिल्ह्याचे नांव :** **दिनांक :**

१. जिल्ह्यातील (आयएमएफएल) दुकानांची संख्या ..

२. जिल्ह्यातील देशी दारूच्या दुकानांची संख्या ..

३. सर्व दुकानांमध्ये ठेवलेल्या ब्रँड-निहाय साठ्याची नोंदवही .. (होय / नाही)

(ज्या दुकानांमध्ये भंग झाल्याचे आढळून आले असेल अशा दुकानांच्या विरोधात केलेल्या कारवाईचा उल्लेख कृपया करावा आणि म्हणून जर यथोचितरीत्या ब्रँडनिहाय साठा नोंदवह्या ठेवलेल्या असतील तर त्याचा उल्लेख करावा.)

४. जिल्ह्यातील संवेदनशील दारूच्या किरकोळ दुकानांची सूची.

(पूर्ण पत्ता व लायसनधारकाचे नाव व संवेदनशील म्हणून त्याचे वर्गीकरण करण्यासाठीचे कारण यासह कृपया सूची जोडावी)

| अ.क्र. | दुकानाचे नाव व पत्ता | लायसनधारकाचे नाव | संवेदनशील म्हणून त्याचे वर्गीकरण करण्यासाठीचे कारण | सूक्ष्म संनियंत्रण करण्यासाठी उचललेली पावले |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

५.कोणत्याही भंगासाठी कोणत्याही दारूच्या दुकानांविरोधात केलेली कारवाई :

(कारवाई व वसूल केलेली शास्ती, कोणतीही असल्यास, विनिर्दिष्ट करणे)

| अ.क्र. | दुकानाचे नाव व पत्ता | लायसनधारकाचे नाव | तपास केलेला भंग | केलेली कारवाई | भंग दुरुस्त केला किंवा नाही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

६. जिल्ह्यातील शक्य तितक्या अवैध दारू साठवणीच्या ठिकाणांची सूची :

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | मोहल्ला / गाव याचे नाव | संभाव्य साठवण क्षेत्र असण्यासाठीचे कारण | उचललेले प्रतिबंधात्मक किंवा सुधारात्मक पाऊल |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

७. दैनंदिन दारू विक्री संनियंत्रण अहवाल (दिनांक ............. महिना.......... वर्ष......... याचा सरासरी रोजच्या विक्रीशी तुलना करता विक्रीतील ३० टक्केहून अधिक वाढ असणाऱ्या दुकानांसाठी फक्त) :–

| अ.क्र. | दुकानाचे नाव व पत्ता | दि. ......... महिना............ वर्ष..........याची सरासरी रोजची विक्री (एकत्रित लिटरच्या स्वरूपात) | कालची विक्री (एकत्रित लिटरच्या स्वरूपात) | विक्रीतील टक्केवारी वाढ | वाढीची कारणे | केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

## जोडपत्र डी-१४

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ४९१/एसएम/२०१३/संसूचना | दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३

प्रति,

(१) सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्राचे
मुख्य निवडणूक अधिकारी
(२) सर्व राष्ट्रीय / राज्य मान्यताप्राप्त
राजकीय पक्षांचे अध्यक्ष / महासचिव

**विषय** :– निवडणूक मोहिमेमध्ये सामाजिक प्रसार माध्यमाचा वापर करण्याच्या बाबतीतील आयोगाचे अनुदेश.

महोदय,

निवडणूक मोहिमेकरिता सामाजिक प्रसारमाध्यमाचा केला जाणारा उपयोग तसेच सामाजिक प्रसारमाध्यमामध्ये निवडणूक कायद्यांचा होणारा एखादा भंग याकडे आयोगाचे लक्ष वेधण्यात आले होते. त्यामुळे निवडणुकीच्या क्षेत्रात पारदर्शकता व खेळामेळीचे वातावरण निर्माण करण्यासाठी विनियमितता आणणे गरजेचे आहे.

सामाजिक प्रसारमाध्यम हे जनतेशी संपर्क साधण्याचे एक साधन आहे. ज्यायोगे वास्तविक समाजात व यंत्रणेत माहिती व नवीन कल्पना निर्माण करू शकतात. त्यात एकमेकांना सहभागी आणि करून घेऊ शकतात आणि/ किंवा त्यांची देवाणघेवाण करु शकतात. दर्जा, पोचपणी, वारंवारता, उपयोगिता, निकड व स्थायित्व यांसारख्या अनेक बाजूंनी ही प्रसारमाध्यमे परंपरांगत / औद्योगिक माध्यमांहून भिन्न आहेत. वेब व सामाजिक प्रसारमाध्यम यांचा प्रभाव अनेक वर्षांपासून वाढतच आहे आणि निवडणूक कालावधीमध्ये राजकीय व सामाजिक गटांकडून अन्य माध्यमांना नियमित आले, त्याप्रमाणे सामाजिक प्रसारमाध्यम नियमित करण्याची मागणी आहे.

स्थूल मानाने पाच वेगवेगळ्या प्रकारची समाजमाध्यमे आहेतः–

(क) सहयोगी प्रकल्प (उदा. विकीपीडिया)

(ख) ब्लॉग्स व मायक्रोब्लाग् स (उदा.ट्विटर)

(ग) कॉन्टेट समूह (उदा. यू ट्यूब)

(घ)सामाजिक संसूचित यंत्रणा (सोशल नेटवर्किंग साईट्स) (उदा. फेसबुक)

(ङ)वास्तविक खेळ जगत (व्हर्च्युअल गेम वर्ल्ड) (उदा. ॲप्स)

निवडणूक मोहिमेच्या सोशल मिडियाचा वापर करणे आणि निवडणूक मोहिमेमध्ये कोणत्या अन्य प्रसारमाध्यमांचा वापर करणे या दोन्ही बाबतीत कायदेशीर तरतुदी निवडणूक सारख्याच आहेत. सोशल मीडीया हे सापेक्षतेने प्रसारमाध्यमाचे नवीन रूप असल्याने सर्व संबधितांना पुढील सूचना देणे आवश्यक आहे :–

**(क) उमेदवाराने त्यांच्या सामाजिक प्रसारमाध्यमाविषयी द्यावयाची माहिती :**

नामनिर्देशन भरतेवेळी उमेदवारांनी प्रपत्र -२६ मध्ये शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे. आयोगाचे पत्र क्र. ३/४/२०१२/ एसडीआर, दिनांक २४ ऑगस्ट, २०१२ मध्ये दिल्याप्रमाणे तपशीलवार सूचना व ज्या नमुन्यात शपथपत्रात दाखल करावयाचे तो नमुना दिला आहे. या प्रपत्राच्या परिच्छेद ३ नुसार उमेदवाराचा ई-मेल आयडी जरी कोणता असल्यास, त्याप्रमाणे आयोगास कळविणे आवश्यक आहे. उमेदवाराची अधिप्रमाणित सामाजिक प्रसारमाध्यम खात्याविषयीची माहिती आयोगाला कळविणे आवश्यक वाटते. माहिती पुढीलप्रमाणे उक्त परिच्छेद ३ मध्ये देण्यात यावी :–

माझा/माझेदूरध्वनीक्रमांक..............................ई-मेलआयडी(असल्यास)..........................................
आणि माझे सामाजिक प्रसारमाध्यम खाते (असल्यास) ..................................................................आहे.

**(ख) राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणन :**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या एसएलपी (नागरी) एन ६६७९/२००, दिनांक १३ एप्रिल २००४ च्या आदेशानुसार, आयोगाने, याचा आदेश क्र ५०९/७५/२००४/जेएस-१/४५७२, दिनांक १५ एप्रिल, २००४ मध्ये या विषयावर तपशीलवार अनुदेश दिलेले आहेत. या आदेशात, त्यांनी असे नमूद केले आहे की, प्रत्येक नोंदणीकृत / राष्ट्रीय व राज्यातील राजकीय पक्षांनी आणि प्रत्येक निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने दूरदर्शन वाहिन्यांवर किंवा केबलनेटवर्कवर कुठल्याही जाहिराती दाखविण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर सर्व राजकीय पक्षाच्या जाहिराती दाखविण्याकरिता पूर्व प्रमाणन करण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाकडे पदसिद्ध अधिकाऱ्याकडे पाठविल्या पाहिजेत. या आदेशात, आयोगाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २०१२ नुसार आणखी फेरबदल करण्यात आले व तो एकत्रित करण्यात आला. त्यामध्ये, जिल्हा व राज्यस्तरावरील प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे अशा जाहिरातींचे पूर्व प्रमाणन तसेच पेड न्यूज प्रमाणनबाबतची कार्यवाही अशा इतर कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच सामाजिक प्रसार माध्यमांची संकेतस्थळे ही व्याख्या केल्यानुसार इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमात देखील येतात. म्हणून त्यांच्या आदेश क्र. ५०९/७५/२००४/जेएस-१/४५७२, दिनांक १५ एप्रिल २००४ मध्ये आयोगाच्या या सूचना समाविष्ट केल्या असून त्या सामाजिक प्रसार माध्यम वेबसाईट प्रमाणे संकेतस्थळांना देखील योग्य त्या फेरफारांसह लागू असतील आणि पूर्व प्रमाणनाच्या अधीन असतील, म्हणून तुम्हाला अशी विनंती करण्यात येते की, कोणत्याही राजकीय जाहिराती उपरोक्त आदेशात निर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्याच प्रपत्रात प्रमाणन केल्याखेरीज राजकीय पक्षाने / उमेदवाराने सामाजिक प्रसार माध्यमाच्या संकेतस्थळासह कोणत्याही इंटरनेटवर आधारित माध्यमावर / संकेतस्थळावर दाखवू नयेत.

**(ग) सोशल मिडीयाच्या संकेतस्थळासह इंटरनेटवरील प्रचार मोहिमेचा खर्च**

लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ कलम ७७ पोट-कलम (१) अनुसार प्रत्येक उमेदवाराने, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने, त्याचे नाव नामनिर्देशित केल्याच्या दिनांकापासून ते निकाल लागेपर्यंतच्या दिनांकापर्यंतचा (दोन्ही दिनांकासह) निवडणूकीच्या संबधांत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने २००५ मध्ये सामान्य वाद विरुद्ध भारतीय संघराज्य याबाबतीत असे निर्देश दिले होते की, राजकीय पक्षांनी निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाचे विवरणपत्र भारत निवडणूक आयोगाला देखील सादर करावे आणि असे विवरणपत्र विधानसभा निवडणुकीच्या ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणुकीच्या ९० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. हे उघड आहे की, सामाजिक प्रसार माध्यमाद्वारे निवडणूक मोहिमेवर कोणत्याही जाहिरातींद्वारे झालेला सर्व खर्च हा, निवडणुकीशी संबधित खर्चाचाच एक भाग आहे.

कोणतीही संदिग्धता दूर करण्यासाठी येथे निर्देश देण्यात येत आहे की, उमेदवार आणि राजकीय पक्षांनी खर्चाचा अचूक हिशोब ठेवणे आणि खर्चाचे विवरणपत्र सादर करणे या दोन्ही गोष्टींसाठी सामाजिक प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरात देण्यावरील खर्चासह प्रचार मोहिमेवर होणाऱ्या सर्व खर्चाचा समावेश खर्चाच्या नोंदीमध्ये करावा. इतर गोष्टींबरोबरच यात जाहिरात करण्यासाठी इंटरनेट (अंतरजाल) कंपन्याना आणि संकेतस्थळांना करण्यात आलेले प्रदान आणि तसेच आशयाचा सर्जनशील विकास करण्यावरील प्रचार मोहिमेशी संबधित कार्यकारी खर्च, आपला सामाजिक प्रसारमाध्यमाचा हिशेब ठेवण्यासाठी अशा उमेदवार व राजकीय पक्षाद्वारे कामावर ठेवण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या गटाला देण्यात येणाऱ्या वेतन व मजुरीवरील कार्यकारी खर्च इ. चा समावेश असावा.

**(घ) सोशल मिडीया (इंटरनेट) वरील माहितीकरिता आचारसंहिता लागू करणे**

आयोगाकडे निवडणूकांच्या दरम्यान राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या संदर्भातील नमुना आचारसंहिता आहे. जी आयोगाद्वारे निवडणूकांची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून निवडणुका पूर्ण होईपर्यंत अंमलात असते. असे स्पष्ट करण्यात येत आहे की, आचारसंहितेतील तरतुदी आणि त्या संदर्भात आयोगाद्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेले संबंधित अनुदेश, उमेदवार आणि राजकीय पक्षाद्वारे सामाजिक प्रसार माध्यम संकेतस्थळांसह (इंटरनेट)वर देण्यात येणाऱ्या माहितीलाही लागू असतील

(ङ) उमेदवार आणि राजकीय पक्षांव्यतिरिक्त इतर व्यक्तींनी (इंटरनेटवर) दिलेल्या माहिती संदर्भांत अशा व्यक्ती, राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या निवडणूक प्रचार मोहिमेंशी संबधित असतील किंवा त्यांच्याशी संयुक्तिकपणे जोडलेल्या असल्यास, अशी प्रकरणे व्यवहारीकरीत्या कशी हाताळावीत ही बाब संसूचना व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाशी विचारविनिमयाने आयोगाच्या विचारधीन आहे.

तात्काळ आवश्यक कार्यवाहीसाठी हे अनुदेश उमेदवार, राजकीय पक्ष, प्रसारमाध्यमे आणि  निवडणूक निरीक्षकासह सर्व संबधितांच्या कृपया निदर्शनास आणून द्यावेत.

आपला विश्वासू,

सही /-

**राहुल शर्मा,**

अवर सचिव .

दूरध्वन क्र. ०११-२३०५ २०७०

ई-मेल rahulsharma.eci@gmail.com

**जोडपत्र डी-१५**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

फाईल क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/ईईपीएस/खंड एक  दिनांक २२ जानेवारी, २०१४

प्रति,

सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणुक अधिकारी,

**विषय :-** राजकीय पक्षाच्या नेत्यांनी (वलयांकित प्रचारक) केलेल्या खचाशी संबंधित स्पष्टीकरणांच्या संबंधात लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम ७७(१) च्या स्पष्टीकरण १ अन्वये-

महोदय / महोदया,

वर उदधृत केलेल्या विषयावरील आयोगाचे दिनांक १८ एप्रिल, २०१३ चे समक्रमांचे पत्र, क्रमांक ७६/ २००९/ एसडीआर, दिनांक ३१ मार्च, २००९ व दिंक २० ऑगस्ट, २००९ चे पत्र आणि क्रमांक ४३७/ ६/ सूचना/ २००८, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८, च्या पत्रातील परिच्छेद (तीन) आणि क्रमांक ७६/ सूचना/ २०१२/ ईपीएस, दिनांक २० जानेवारी, २०१२ च्या परिच्छेद ३ (प्रती सोबत जोडलेल्या आहेत) याचे अधिक्रमण करून आपणास पुढीलप्रमाणे विषद करण्याचा मला आदेश आहे की,

(क) जर कोणत्याही सुरक्षारक्षक, वैद्यकीय परिचर यांसह कोणताही परिचर किंवा पक्षाच्या कोणत्याही सदस्यासह जो संबधित मतदारसंघातील उमेदवार नसेल किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा मुद्रित माध्यमाचा कोणताही प्रतिनिधी, नाही अशी कोणतीही अन्य व्यक्ती, राजकीय पक्षाच्या नेत्याससोबत (वलयांकित प्रचारक) याच्या वाहन/ विमान/ हेलिकॉप्टर इत्यादी यामध्ये प्रवास करीत असेल तर, अशा नेत्याचा प्रवास खर्च हा राजकीय पक्षाच्या लेख्यात (हिशेबात) संपूर्णपणे जमा करण्यात येईल, पंरतु नेत्याबरोबर (वलयांकित प्रचारक) प्रवास करीत असलेला राजकीय पक्षाचा उक्त सदस्य किंवा प्रसार माध्यमाची व्यक्ती किंवा परिचर कोणत्याही रीतीने कोणत्याही उमेदवारासाठी निवडणूक प्रचार मोहिमेत कोणतीही भुमीका पार पाडणार नाही. तथापि, जर अशा नेत्याबरोबर प्रवासात सहभागी झालेली कोणतीही व्यक्ती (कोणत्याही व्यक्तींना) व कोणत्याही रीतीने उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणूक प्रचार मोहिमेत कोणतीही भुमीका पार पाडत असेल तर किंवा जर कोणत्याही उमेदवार (कोणतेही उमेदवार) अशा नेत्याबरोबर त्याचे वाहन/ विमान/ हेलिकॉप्टर यामध्ये प्रवास करीत असेल तर, अशा नेत्याच्या प्रवास खर्चातील ५० टक्के इतका खर्च अशा उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) खर्चात संविभाजित करण्यात येईल.

(ख) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) च्या स्पष्टीकरण २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे राजकीय पक्षाच्या नेत्यांची (वलयांकित प्रचारक) नावे, अशा निवडणूकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत राजकीय पक्षाचे भारताच्या निवडणूक आयोगास व राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास कळवावयाची आहेत आणि असे नेते भारताचा निवडणूक आयोग व संबधित राज्याचा मुख्य निवडणूक अधिकारी यांना त्यांच्या नावाचा समावेश असलेली यादी प्राप्त झाल्याचा दिनांकापासून लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अन्वये तरतुद करण्यात आलेल्या लाभासाठी हक्कदार असतील.

(ग) जर नेता (वलयांकित प्रचारक) हा त्याचा मतदारसंघाबाहेर आयोजित केलेल्या कोणत्याही मेळाव्यामध्ये सहभागी झाला असेल तर, तो लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) च्या स्पष्टीकरण १ अन्वये तरतुद करण्यात आलेल्या सवलतीस हक्कदार असेल, तथाप, जर असा नेता (वलयांकित प्रचारक) कोणत्याही मतदारसंघामधुन निवडणूक देखील लढवित असेल तर, त्याच्या स्वतःच्या मतदारसंघात केलेल्या प्रवासखचासाठी तो, उक्त अधिनियमाच्या कलम ७७ अन्वये कोणताही लाभ मिळण्यास हक्कदार नसेल आणि प्रवासखर्चासह त्याच्या मतदारसंघात त्याने आयोजित केलेली सभा किंवा मेळावा यावरील खर्च किंवा मेळावा यावरील खर्च हा, त्याच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यात (हिशोबात) टाकावयाचा आहे.

(घ) जर नेत्याच्या (वलयांकित प्रचारक) मतदारसंघात सभा/ मेळावा आयोजित केला असेल व त्या ठिकाणी निवडणूक लढवणाऱ्या इतर उमेदवारासोबत तो पुढारी मंचावर उपस्थि असेल तर, अशा सभेचा खच हा, अशा नेत्याच्या च सव उमेदवारांच्या

निवडणूक खचात संविभाजि करावयाचा आहे. तथापि, जर त्याने त्याच्या मतदारसंघाबाहेर त्याच्या पक्षाच्या निवडणूक लढविणाऱ्या अन्य उमेदवारांसोबत एखादा मेळावा/ सभा यामध्ये जर तो भाग घेत असेल तर, अशा सभेचा खर्च हा, ज्या उमेदवारांच्या निवडणूक प्रचारमोहिमेसाठी असा मेळावा/ सभा आयोजित करण्यात आली असेल अशा सवव उमेदवारांच्या निवडणूक खचामध्ये संविभाजित करण्यात येईल आणि त्याच्या मतदारसंघाच्या बाहेर आयोजित केलेल्या अशा मेळाव्याच्या / सभेच्या खचातील कोणताही भाग अशा नेत्याच्या ( वलयांकित प्रचारक ) निवडणूक खचात टाकण्यात येणार नाही.

ही बाब राज्यातील सव राजकीय पक्षांसह संबंधितांच्या निदशनास आणून देण्यात यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी /-
**एस. के. रुडोला,**
सचिव.

**जोडपत्र डी–१६**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११०००१.

क्रमांक ७६/अनुदेश /२०१४/इपीएस/खंड सात दिनांक : ९ एप्रिल २०१४

प्रति,
सर्व राज्यांचे / संघ राज्यक्षेत्राचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

विषय : लोकसभेकरिता सार्वत्रिक निवडणूक, २०१४ - मंत्री / उमेदवार यांच्या सुरक्षेसाठी खर्च अनुदेश बाबत.

संदर्भ :- (१) आयोगाचे पत्र क्रमांक ४३७ / ६ / ९६ पीएलएन-तीन दिनांक ९ एप्रिल १९९६ ;
(२) आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/२००७ पीएलएन-तीन दिनांक २४ ऑक्टोबर २००७ ;
(३) आयोगाचे पत्र क्रमांक ४६४ / अनुदेश / २००९ इपीएस दिनांक ८ फेब्रुवारी २००९ ;
(४) आयोगाचे पत्र क्रमांक ४३७ / अनुदेश / २००९ सीसी आणि बिई दिनांक २५ मार्च २००९.

महोदय/महोदया,

१. आयोगाने पूर्वी, जो, त्याच्या सुरक्षा हक्कानुसार मंत्री / प्रमुख प्रचारक / उमेदवार यांना द्यावयाच्या सुरक्षेवर खर्च करण्यात येईल अशा खर्चाच्या लेखांकनाबाबत वेळोवेळी विविध अनुदेश काढले होते.

२. आयोगाने, सुरक्षा वाहन आणि सुरक्षा रक्षक यांवर केलेला खर्च हा उमेदवाराकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा कसे, प्रदान केले जाईल याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी, उत्तराखंड यांच्याकडून स्पष्टीकरण मागून संदर्भ प्राप्त केले आहे. गोंधळ टाळण्यासाठी व सर्व संबंधित सोयीसाठी, व्यक्तीच्या सुरक्षेवर / सुरक्षा वाहनांवरील खर्चाशी संबंधित मुद्यावर याद्वारे पडताळणी केली आहे आणि आदर्श आचारसंहिता जेव्हा अंमलात येईल त्या दरम्यान त्याच्या अनुपालनासाठी पुनरुच्चार करण्यात येईल.

(एक) भारत सरकारच्या निदेशाखाली, व्यक्तीला पुरवलेल्या 'झेड +' (झेड प्लस) सुरक्षांमध्ये विशिष्ट व्यक्तीसाठी राज्याच्या मालकीची एक बुलेट प्रुफ वाहन वापर करण्याच्या परवानगीचा समावेश आहे, अशा व्यक्ती, ज्याने पद धारण केलेले असो किंवा त्या पदाबाहेर असो, किंवा कसे आणि तो उमेदवार असो किंवा नसो, किंवा कसे, त्यास, आदर्श आचारसंहिता लागू असेल अशा निवडणूक कालावधीदरम्यान उक्त राज्याच्या मालकीच्या बुलेट प्रुफ वाहनाचा वापर करण्यास पनवानगी असेल, काही विशिष्ट बाबीमध्ये सुरक्षा प्राधिकरणाद्वारे विनिर्दिष्ट केल्याशिवाय राखीव विविध वाहनाचा वापर करण्याची परवानगी असणार नाही. अशा वाहनाच्या परिचालनाचा खर्च, जेव्हा अशा कालावधीदरम्यान अनौपचारिक प्रयोजनासाठी त्याचा वापर करण्यात येईल, तेव्हा संबंधित व्यक्तीद्वारे करण्यात येईल.

(दोन) भेट देणाऱ्या राजकीय कार्यकर्त्याच्या बाबतीत, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या स्पष्टीकरणानुसार राजकीय पक्षाद्वारे जो " पुरस्कृत प्रमुख प्रचारक" आहे त्यासंबंधातील खर्चाचा पक्षांच्या खात्यात हिशेब ठेवण्यात येईल, जर प्रमुख प्रचारक हा उमेदवार आहे तर मतदारसंघातील वाहनाच्या परिचालनाच्या खर्चाचा हिशेब त्याच्या निवडणूक खर्चाच्या खात्यात ठेवण्यात येईल.

(तीन) जर सुरक्षा सुविधा उपभोगणारा पक्षाचा कार्यकर्ता वलयांकित प्रचारक नाही आणि तो उमेदवाराचा प्रचार करीत असेल तर अशा प्रचारासाठी वापरावयाच्या सुरक्षा वाहनाचा परिचालन खर्च उमेदवाराच्या खात्यात जमा करण्यात येईल.

(चार) पथदर्शी, संरक्षक इ. अंतर्भूत असलेल्या कारताफ्यासोबत असलेली वाहनाची संख्या सुरक्षा प्राधिकरणाद्वारे निर्धारित केलेल्या अनुदेशानुसार काटेकोर असेल आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये ती वाढविण्यात येणार नाही. सर्व असे पथदर्शी, संरक्षक वाहनाच्या परिचालनाच्या / खर्च, शासनाच्या मालकीचा असो किंवा भाड्याने दिलेल्या वाहनाचा असो किंवा कसे, राज्य शासनाकडून घेण्यात येईल, पुरविलेल्या मनुष्यबळाच्या खर्चावर वसुली करण्यात येणार नाही.

३. हे अनुदेश सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावेत,

आपला विश्वासू,

सही / -
**( एस. के. रूडोला),**
सचिव.

**जोडपत्र डी–१७**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/अनुदेश/२०१४/ईईपीएस/खंड एक — दिनांक ९ मे २०१४

प्रति,

सर्व राज्यांचे/संघ राज्यक्षेत्रांचे

मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय** : मतदानानंतर आणि निकाल घोषित करण्याच्या पूर्वी उमेदवार /वलयांकित प्रचारक यांच्याकडून केलेला प्रवास याबाबीसंबंधी.

महोदय,

राजकीय वलयांकित वलयांकित प्रचारक यासह निवडणूक लढविणारे उमेदवार अधिकृत किंवा अनधिकृत प्रयोजनासाठी मतदानाच्या दिनांकानंतर विमान/हेलिकॉप्टर चा वापर करतील आणि अशा प्रवासखर्चाच्या लेखांकनासंबंधी स्पष्टीकरण देतील, याची उदाहरणे कळविण्यात आली आहेत या विषयाच्या बाबतीत, पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्याचे निदेश देण्यात येत आहेत,—

(एक) मतदानानंतर किंवा निकाल घोषित होण्यापूर्वी उमेदवाराकडून, जो निवडणुकीच्या संबंधात केला जाऊ शकतो, अशा खर्चाचा लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ नुसार हिशोब ठेवण्यात येईल.

(दोन) म्हणून, मतदानाच्या दिनांकानंतर वलयांकित प्रचारक किंवा उमेदवाराच्या प्रवासावरील खर्च, जो निवडणुकीसंबंधात नाही, तो कोणत्याही उमेदवाराच्या खात्यात जमा करण्यात येणार नाही. जर वलयांकित प्रचारक/उमेदवार यांनी मतदारसंघात भेट दिली, जेथे तो किंवा ती निवडणूक लढविणार आहे, तेथे मतमोजणीच्या दिनांकापूर्वी किंवा त्या दिनांकास मतमोजणीच्या पाहणीसाठी मतदारसंघातील आलेला प्रवास खर्च त्याच्या किंवा तिच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

(तीन) जर राजकीय पक्षाने मतदानानंतर, त्याच्या मतदारसंघाबाहेर वलयांकित प्रचारकाचा प्रवास खर्च केला आहे, तर, उक्त खर्च विधानसभा निवडणूक पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून ७५ दिवसांच्या आत किंवा लोकसभा निवडणुकीच्या ९० दिवसांच्या आत राजकीय पक्षाद्वारे आयोगाकडे सादर करावयाच्या लेख्यामध्ये दाखविण्यात येईल.

२. या संबंधात, राज्यातील सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च निरीक्षक, उमेदवार आणि राजकीय पक्ष यांना याद्वारे कळविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

सही / -

**(अविनाश कुमार),**

अवर सचिव.

**जोडपत्र डी-१८**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ६१/ तक्रारी/२०१४/ ईईपीएस/खंड-सहा | दिनांक ९ जून २०१४

प्रति,

सर्व राज्यांचे / संघ राज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** लोकसभा २०१४ ची सार्वत्रिक निवडणूक- विमान/ हेलिकॉप्टर यांच्या वाहनतळ खर्चाबाबत.

महोदय,

निवडणूक कार्य करताना उमेदवार / पक्ष यांनी दिलेल्या वाहनतळ खर्चाच्या हिशेबासंबंधी विचारणा करणारी निवेदन आयोगास प्राप्त झाली आहेत. या विषयासंदर्भात, असे विषद करण्याचा मला आदेश आहे की, विमान / हेलिकॉप्टर यांचा वाहनतळ खर्च पुढीलप्रमाणे परिगणित करण्यात येईल :-

१. विमानचालन क्षेत्रात, विमानावरील वाहनतळ खर्च ( दिवसा / रात्री ) भारतीय विमानतळ प्राधिकरण किंवा संबंधित विमानतळावरील खाजगी विमानतळ चालकांनी निश्चित केलेल्या दरांनी विमान / हेलिकॉप्टर चालकांकडून आकारण्यात येईल, म्हणून, उमेदवाराच्या खर्चाच्या रकमेची परिगणना, अशा विमानतळांवर प्रदान केलेल्या किंवा देय असलेल्या प्रत्यक्ष खर्चाद्वारा आकारण्यात येईल, वाणिज्यिक विमानतळा खेरीज इतर ठिकाणी वाहनतळ खर्च हा वाहनचालकाने किंवा उमेदवाराने प्रत्यक्ष प्रदान केलेल्या रकमेनुसार असेल.

२. म्हणून, वाणिज्यिक विमानतळांवरील वाहनतळ खर्च, कोणत्याही विमानाच्या वाहनतळ खर्चाची परिगणना करण्यासाठी, भारतीय विमानतळ प्राधिकरण किंवा खाजगी विमानतळ प्राधिकरणाकडून प्राप्त करण्यात येईल. इतर ठिकाणच्या वाहनतळ खर्चाबाबत विमानचालकाने किंवा उमेदवाराने प्रदान केलेला प्रत्यक्ष खर्च हिशेबात घेण्यात येईल.

३. खर्चाच्या हिशेबाबाबत कोणताही विवाद उद्‌भवल्यास आयोगाच्या क्रमांक ७६ / अनुदेश / ईईपीएस / २०१३ / खंड-एक, दिनांक १४ मार्च २०१३ च्या अनुदेशानुसार त्याचे निराकरण करण्यात येईल. (सहपत्र ३ पृष्ठे).

४. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूक, २०१४ व आंध्रप्रदेश, ओरिसा, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश येथील राज्य विधानसभा निवडणूक, २०१४ आणि इतर पोटनिवडणुकांच्या वेळी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या खर्चासह सर्व खर्च आयोगाच्या निदर्शनास आणून द्यावा अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपला विश्‍वासू,

स्वाक्षरी/-
**(अविनाश कुमार),**
अवर सचिव.

**जोडपत्र डी–१९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६ / अनुदेश / ईईपीएस/२०१५/ खंड-दोन दिनांक २९ मे २०१५

प्रति,

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे

मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :** निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या वाहनांना परवानगी देणे आणि निवडणूक खर्च खात्यातून करण्याबाबत.

महोदय/ महोदया,

१. आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००७/पीएलएन-तीन / (खंड-तीन), दिनांक १६ मार्च २००७ याकडे आपले लक्ष वेधण्याचे आणि निवडणुकांदरम्यान निवडणुकीच्या प्रचारासाठी वाहनांचा वापर करण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून प्रत्येक उमेदवाराला परवानगी देण्यात आली आहे हे सांगण्याचे निदेश मला देण्यात आले आहेत, आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, निवडणूक प्रचारासाठी वाहनांचा वापर करण्यासाठी काही उमेदवार परवानगी घेतात आणि त्यांच्या निवडणूक खर्चाच्या खात्यात वाहने भाड्याने / चालवण्या वरील केलेला खर्च दाखवत नाहीत अशा वाहनांचा अनेकदा निवडणूक प्रक्रियेदरम्यान इतरांकडून वापर होतो.

२. म्हणून, मला अशी माहिती देण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून परवानगी मिळाल्यानंतर, दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी प्रचारासाठीच्या वाहनांचा वापर करू नये, अशा वाहनांसाठीची परवानगी काढून घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्याने/तिने कळवावे, जर उमेदवाराने, परवानगी मिळाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला प्रचारासाठीच्या वाहनांची परवानगी काढून घेण्याबाबत कळविले नाही तर उमेदवार प्रचाराच्या प्रयोजनासाठी परवानगी दिलेली वापरत असल्याचे मानण्यात येईल आणि अशा वाहनांचा वापरावर अधिसूचित दरांनुसार खर्च निवडणूक खर्च खाती टाकण्यात येईल, अशा उमेदवारांच्या खर्चाच्या लेखांकनासाठी निवडणूक निर्णय अधिकारी अशा सर्व वाहनांचा तपशील, परवानग्या व परवानगी काढून घेण्याची विनंती लेखांकन करणाऱ्या गटाला देईल.

३. सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि त्यांचे अभिकर्ते, संबंधित कर्मचारी व खर्च निरीक्षक यांच्या निदर्शनास हे आणण्यात येईल.

४. कृपया या पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-
**(एस. के. रुडोला),**
सचिव.

**जोडपत्र डी – २०**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/२०१६/ एसडीआर दिनांक ३० एप्रिल, २०१६

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त व नोंदणीकृत मान्यताप्राप्त

नसलेल्या राजकीय पक्षांचे अध्यक्ष/महासचिव.

**विषय** : उमेदवारांचा व राजकीय पक्षांचा निवडणूक खर्च-प्रचार करण्याच्या प्रयोजनार्थ विदेशांना भेटी देण्याचा खर्च यासंबंधी.

महोदय/ महोदया,

१. आपणास कळविण्याचा मला आदेश आहे की, लोक प्रतिनिधित्व (सुधारणा) अधिनियम, २०१० समाविष्ट केलेल्या लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम २० क अनुसार (भारताबाहेरील तातुपरते असो अथवा नसो) नोकरी, शिक्षण किंवा अन्यथा यांमुळे भारतातील यांच्या सर्वसाधारण निवासापासून अनुपस्थित राहणारे जे भारतीय नागरिक, त्याच्या पारपत्रात नमूद केल्याप्रमाणे स्थित असलेल्या भारतातील ज्या मतदारसंघामध्ये त्यांचे निवासस्थान असेल त्या मतदारसंघातील मतदार याद्यांमध्ये त्यांची नावे नोंदविण्यास हक्कदार आहेत. (मतदार नोंदणी नियम, १९६० अन्वये "समुद्रपार मतदार" म्हणून संबोधले जाणारे) अशा रीतीने मतदार म्हणून भारतात नोंदणी केलेले भारतीय नागरिक, असे समुद्रपार नागरिक म्हणून त्यांची ज्या मतदारसंघामध्ये नोंदणी करण्यात आली असेल त्या मतदारसंघातील त्यांच्या मूळ गावी मतदानाच्या दिवशी ते उपस्थित झाले असतील तर, ते त्यांच्या संबंधित मूळ मतदारसंघांमध्ये मतदान करण्यास हक्कदार असतील. कायद्याच्या वरील तरतुदींनुसार लोकसभेच्या व राज्य विधानसभेच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ, मोठ्या प्रमाणात परदेशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी त्यांची नावे, देशातील विविध भागातील मतदार याद्यांमध्ये समाविष्ट केली आहेत.

२. केरळ, पुडुचेरी, तामिळनाडू व पश्चिम बंगाल, विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या चालू फेरीच्या संबंधात आणि काही राज्यांमध्ये सध्या घेण्यात येणाऱ्या विविध पोटनिवडणुकांसंबंधात, परदेशात राहणाऱ्या त्या देशांमधील मतदारांना त्यांची मते मागण्यासाठी प्रचार करण्याच्या प्रयोजनार्थ, भारतातून समुद्रपार देशांमध्ये काही उमेदवार प्रवास करीत आहेत, ही बाब आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. या संदर्भात आयोग, स्पष्ट करू इच्छित आहे की, उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा पक्ष प्रमुखाने, समुद्रपार राहणाऱ्या मतदारांची मते मागण्यास कायद्याने प्रतिबंध नसला तरी, त्या उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा पक्ष प्रमुखांनी त्यांचा प्रवास, भोजन, निवास इत्यादींवरील त्या देशांमध्ये केलेला सर्व खर्च हा, उमेदवारांनी केलेला त्यांच्या निवडणुकीशी संबंधित किंवा प्राधिकृत खर्च असल्याचे मानण्यात येई., अशाप्रकारे, असे सर्व खर्च, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१) च्या अर्थांतगत असतील. आणि तो, निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ९० द्वारे विहित केलेल्या मर्यादेच्या अधीन राहून, तो त्यांच्या निवडणूक खर्चाच्या खात्यामध्ये संबंधित उमेदवाराकडून समाविष्ट करण्यात येईल.

३. आयोग, आणखी स्पष्ट करू इच्छित आहे की, उक्त निवडणुकांमध्ये मतदान करण्याच्या प्रयोजनार्थ, समुद्रपार (परदेशातील) मतदारांना भारतात येण्यासाठी विमानाच्या तिकीटांचे आमिष दाखविणे किंवा रोख रकमेच्या किंवा वस्तूंच्या स्वरुपातील अन्य कोणतेही प्रलोभन दाखविणे ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ख च्या अर्थांतर्गत 'लाचेचा' अपराध आहे, तसेच लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२३ (१) च्या अर्थाअंतर्गत 'लाचेची' भ्रष्ट प्रथा आहे. लाच देण्याचा अपराध आणि लाच देण्याची भ्रष्ट प्रथा यासाठी कायद्याच्या संबंधित तरतुदींन्वये त्यांच्या विरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, शिवाय, त्यांची मते मागण्यासाठी अन्य कोणतीही अशी वित्तलब्धी, उमेदवारांच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने वरील निवडणुकांमध्ये मतदान करण्यासंबंधात भारताच्या समुद्रपार (परदेशातील) मतदारांचा प्रवास खर्च देण्याचा प्रस्ताव देणारी कोणतीही अन्य व्यक्ती किंवा संघटना, यांच्याविरुद्ध अशीच दंडात्मक कारवाई करण्यात येईल हे सांगण्याची गरज नाही.

४. आपल्या पक्षाने उभे केलेल्या सर्व उमेदवरांना त्यांच्या माहितीसाठी, मार्गदर्शनासाठी व अनुपालनासाठी वरील तरतुदींची व कायद्याची माहिती कळविण्यात यावी अशी आपणास विनंती आहे.

५. आयोगाने केलेले कायद्याचे वरील स्पष्टीकरण लोकसभेच्या व राज्य विधानसभेच्या पुढील सर्व निवडणुकांच्या बाबतीत लागू राहील.

६. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

सही / -

**(के. एफ. विल्फर्ड),**

प्रधान सचिव.

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी प्रत.

राज्यांमधील / संघ राज्यक्षेत्रांमधील सर्व राजकीय पक्षांना या पत्राची प्रत देण्यात यावी.

**जोडपत्र डी - २१**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

फाईल क्रमांक ७६/अनुदेश/एफयुएनसी/ईईएम/ईईपीएस/२०१९/खंड वीस  दिनांक १८ एप्रिल, २०१९

प्रति,

सर्व राज्य/संघ राज्यक्षेत्रांचे

मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय** : आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिसा आणि सिक्किम यांच्या लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१९-जाहिरात /पारदर्शक अहवालांवरील खर्चाच्या मागोवाघेण्यासाठी समाज माध्यम मंच संबंधात.

महोदय/ महोदया,

आयोगाचे पत्र क्र. ४९१/एसएम/२०१३/पत्रव्यवहार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३. रोजीच्या पत्राचा निर्देश करण्याचा [निवडणूक खर्च संनियंत्रणावरील अनुदेशांचा सारसंग्रह (फेब्रुवारी, २०१९) मधील जोडपत्र-डी १४] आणि गुगल (Google) फेसबुक (Face book) आणि ट्विटर (Twitter) ने असे नमूद केले आहे की, राजकीय पक्षांनी त्यांच्या राजकीय प्रचारासाठी त्यांच्या मंचावर (Plat Forms) वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी केलेली प्रदाने त्यांच्या "जाहिरात पारदर्शी अहवाल" या मंचावर दिसत असून यामुळे सशुल्क राजकीय जाहिरातींमधील पारदर्शकता सुकर झाली आहे. त्याचे दुवे पुढील प्रमाणे आहेतः—

(एक) *https://transparencyreport.google.com*

(दोन) *https://www.facebook.com/ads/library/report/source=archive—landing-&country=IN*

(तीन)*https:/ads.twitter.com/transparency*

२. आपणास विनंती आहे की, आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक आणि निवडणूक खर्च निरीक्षक संनियंत्रण चमु यांना आवश्यक कार्यवाहीसाठी हे निदर्शनास आणून द्यावे.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/ -

**(राजन जैन),**

अवर सचिव.

**जोडपत्र डी – २२**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

फाईल क्रमांक ७६/अनुदेश/एफयुएनसी/ईईएम/ईईपीएस २०१९/खंड अठरा दिनांक १९ मे, २०१९

प्रति,

सर्व राज्य/संघ राज्यक्षेत्रांचे

मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय** : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक , २०१९-च्या हेलिपॅड बांधकाम आणि वाहनतळ (पार्कींग) शुल्कावर झालेल्या खर्चाचे लेखांकन स्पष्टीकरण यासंबंधात.

महोदय/ महोदया,

राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून निवडणूक प्रचारासाठी मोठ्या प्रमाणात हेलिकॉप्टरचा वापर केला जात असल्याने दिसून येत आहे. हेलिपॅडच्या बांधकामाशी संबंधित खर्चाबाबत स्पष्टीकरण मागवण्यात आले आहे. यासंदर्भात, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ च्या स्पष्टीकरण १ नुसार, राजकीय पक्षाने त्यांच्या नेत्यांच्या प्रवासाकरिता हेलिपॅड स्थळ विकास आणि नष्ट केलेले साहित्य आणि हेलिपॅड वाहनतळ आकार संदर्भातील खर्चाचा समावेश करून स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. (वलयांकित प्रचारक म्हणून ओळखले जाणारे), त्याच्या सुरक्षेचा हक्क विचारात न घेता, संबंधित राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाच्या खात्यात जमा केला जाईल आणि हा खर्च उमेदवरांच्या निवडणूक खर्चात जमा केला जाणार नाही.

२. प्रमुख प्रचारक जो स्वतःदेखील उमेदवार आहे, तो स्वतःच्या मतदारसंघात प्रचारासाठी हेलिकॉप्टर भाड्याने घेणे, हेलिपॅड तयार करणे इत्यादी खर्चाचा हिशोब देईल. तथापि, तो त्याच्या स्वतःच्या मतदार संघातून इतर मतदारसंघात प्रचारासाठी जात असेल आणि आपल्या मतदारसंघात परत येण्यासाठी झालेला प्रवास खर्च त्याच्या/तिच्या खात्यात जमा केला जाणार नाही. (निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/१/२००८-सीसी आणि बीई, दिनांक २४.१०.२००८ ची प्रत सोबत जोडली आहे.)

३. आपणास विनंती आहे की, सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक आणि इतर निवडणूक प्राधिकारी यांच्या आवश्यक अनुपालनासाठी हा अनुदेश स्पष्टपणे लक्षात आणून द्यावा.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/ -

**(राजन जैन),**

अवर सचिव.

# ई

# उमेदवारांकडून निवडणूक खर्चाच्या लेख्यांचे परिरक्षण

## भाग 'ई' मधील विषय



| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचे लेखे ठेवण्यासाठी प्रक्रिया. | १९३ |
| २ | निवडणूक खर्चासाठी प्रत्येक उमेदवाराकडून स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे. | १९३-१९४ |
| ३ | उमेदवाराकडून ठेवावयाच्या निवडणूक खर्चाची नोंदवही. | १९४ |
| ४ | निवडणूक खर्चाच्या दैनंदिन हिशेबांची नोंदवही, रोख व बँक नोंदवही भरण्याची प्रक्रिया. | १९५ |
| ५ | उमेदवाराच्या बाजुने अतिरिक्त खर्च प्रतिनिधीची नियुक्ती. | १९५-१९६ |
| ६ | उमेदवाराकडून निवडणूक खर्चाचे लेखे दाखल करण्याची प्रक्रियात्मक आवश्यकता. | १९६-१९७ |
| ७ | लेखा पुनर्मळ बैठक. | १९७-१९८ |
| ८ | निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराच्या मृत्यूमुळे स्थगित झालेल्या मतदानाच्या निवडणूक खर्चास मर्यादा | १९८ |
| ९ | मृत्यू झालेल्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७८ अन्वये सादर करावा | १९८ |

निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने, नामनिर्देशन पत्र भरण्याचा दिनांक आणि निकाल जाहीर झाल्याचा दिनांक यांदरम्यान (दोन्ही दिनांकासह ) त्याने किंवा त्याच्या (निवडणूक) प्रतिनिधीने केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या निवडणुकीच्या संबंधातील सर्व खर्चाचे स्वतंत्र व अचूक लेखे ठेवावेत. अशा प्रकारे त्याने त्याच्या निवडणूक खर्चाचे दैनंदिन लेखे निरनिराळ्या नोंदवह्यांमध्ये ठेवावेत, यासंदर्भातील सर्व देयके आणि प्रमाणके संकलित करावीत आणि त्याचवेळी निवडणूक प्राधिकाऱ्यांकडून अधिसूचित केलेल्या दिनांकास लेखे तपासून घ्यावेत. अशा प्रकारे योग्यरीत्या निवडणूक खर्चाचे लेखे ठेवणे हे अत्यंत महत्त्वपूर्ण काम असेल, जे उमेदवारास कर्तव्यपूर्णतेने पार पाडावे लागेल. अन्यथा त्याच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये विसंगती असल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १० - क अन्वये त्याच्याविरुद्ध अनर्हतेच्या कार्यवाहीच्या प्रारंभास कारणीभूत ठरेल.

**१. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाचे लेखे ठेवण्यासाठी प्रक्रिया :—**

लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ प्रमाणे निवडणूक कालावधीत, प्रत्येक उमेदवार स्वतः किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे, ज्या तारखेस तो नामनिर्देशित झालेला आहे व त्याचा निकाल जाहीर झाल्याची तारीख, दोन्ही तारखांसह या दरम्यान, त्याने किंवा त्याच्या प्रतिनिधीने केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या निवडणुकीच्या संबंधातील सर्व खर्चाचे स्वतंत्र व अचूक लेखे ठेवील.

लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७८ मध्ये अशी तरतूद आहे की, प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये ठेवण्यात आलेल्या त्याच्या निवडणूक खर्चाचे खरेखुरे लेखे, जिल्हा निवडणूक, अधिकाऱ्याकडे दाखल करावयाचे आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याचा दिनांक वगळता, या ३० दिवसांच्या कालावधी गणनेत आयोगाने, त्यांच्या पत्र क्रमांक ७६/९५/ जे. एस. दोन, दिनांक १० एप्रिल १९९५ अन्वये (जोडपत्र ई-४ येथे प्रत जोडलेली आहे) असे स्पष्ट केले आहे की, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या सोयीसाठी त्यांना, त्यांचे निवडणूक खर्च इंग्रजी, हिंदी किंवा ज्या स्थानिक भाषांमध्ये मतदार याद्या छापण्यात आलेल्या आहेत त्या भाषेत दाखल करण्याची परवानगी देण्यात येईल. यासाठी, याची खात्री करावयाची आहे की, मतदार याद्यांसाठी मान्यताप्राप्त प्रादेशिक भाषेमध्ये, त्यांच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांचे विवरण दाखल करण्यासंबंधीच्या नियमांचे नमुने / नोंदवह्या उतारे सर्व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मिळालेले आहेत आणि निवडणूक खर्चाचे विवरण दाखल करण्यासंबंधी संबंधित असणाऱ्या सांविधिक शर्तीची त्यास माहिती नाही असे कोणताही उमेदवार अशी तक्रार करणार नाही आणि तो त्याचे दैनंदिन लेखे योग्यपणे ठेवण्यास सक्षम आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या मार्गदर्शनासाठी आयोगाने वेळोवेळी दिलेल्या विविध अनुदेश **जोडपत्र ई–५ ते ई–६** मध्ये दिलेले आहेत.

**२. निवडणूक खर्चासाठी प्रत्येक उमेदवाराने स्वतंत्र बँक खाते उघडावयाचे आहे. (जोडपत्र ई–७९, अनुदेश पत्र क्रमांक ७६ / अनुदेश/ २०१३ / ईईपीएस / भाग चार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१३ ) :—**

निवडणूक खर्चाचे सुलभपणे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने, केवळ निवडणूक खर्चाच्या प्रयोजनासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे आवाश्यक आहे. ज्या तारखेस उमेदवार त्याचे नामनिर्देशनपत्रे दाखल करतो त्या तारखेपूर्वी किमान एक दिवस अगोदर कोणत्याही वेळी हे, खाते उघडण्यात येईल. या बँक खात्याचा खाते क्रमांक त्याचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी उमेदवाराकडून लेखी स्वरूपात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळविण्यात येईल. सर्व निवडणूक खर्च केवळ या बँक खात्यातूनच उमेदवाराकडून करण्यात येईल. निवडणूक कामावर खर्च करावयाचा सर्व पैसा, उमेदवाराच्या स्वतःच्या निधीसह, त्याच्या कोणत्या स्त्रोतातून उपलब्ध झाला आहे हे विचारात न घेता, या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल, निकाल जाहीर झाल्यानंतर, संक्षिप्त विवरणपत्र दाखल करतेवेळी, खर्चाच्या लेख्याच्या विवरणासह, या बँक खात्याच्या लेखा विवरणाची प्रमाणित प्रत, उमेदवाराकडून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास देण्यात येईल. जेव्हा उमेदवाराने बँक खाते उघडले नसेल किंवा बँकेचा खाते क्रमांक कळविलेला नसेल तेव्हा, निवडणूक निर्णय अधिकारी आयोगाच्या सूचनांचे पालन करण्यासाठी अशा सर्व उमेदवारांना नोटीस देईल.

निवडणूक खर्चाच्या प्रयोजनासाठी, एकतर उमेदवारांच्या नावाने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीसह संयुक्त नावाने बँक खाते उघडता येऊ शकते, बँक खाते, उमेदवाराच्या कोणत्याही कुटुंबातील सदस्याचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींच्या संयुक्त नावाने, जर तो / ती उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी नसेल तर, उघडण्यात येऊ नये,

बँक खाते राज्यामध्ये कोठेही उघडता येऊ शकते, खाते, सहकारी बँकासह विद्यामान कोणत्याही बँकेत किंवा टपाल कार्यालयांमध्ये

उघडता येऊ शकते, निवडणूक प्रयोजनासाठी त्याचे स्वतंत्र बँक खाते असल्याने, या प्रयोजनासाठी उमेदवारांचे विद्यमान बँक खाते वापरण्यात येऊ नये.

उमेदवारांना बँकेचे खाते उघडण्यासाठी तत्पर सेवा देणे सुलभ व्हावे म्हणून निवडणूक प्रयोजनासाठी बँकानी समर्पित काऊंटर्स उघडले आहेत याची खात्री करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी सर्व बँकांना किंवा टपाल कार्यालयांना योग्य त्या सूचना देईल, निवडणूक कालावधीत त्यांनी उक्त खात्यामधून प्राधान्याने पैसे काढण्यासाठी व ठेवी काढण्यासाठी देखील परवानगी दिली पाहिजे.

आयोगाने क्रमांक ७६/सूचना/ २०११/इइएम, दिनांक ७ एप्रिल २०११ (जोडपत्र ड-७) सूचना दिलेल्या आहेत की, उमेदवार, निवडणूक प्रयोजनासाठी उघडण्यात आलेल्या, बँक खात्यामधून आदात्याच्या खात्यावरच जमा होणाऱ्या रेखांकित धनादेशाद्वारे, सर्व निवडणूक खर्च करील. तथापि, संपूर्ण निवडणुकीच्या प्रक्रिये दरम्यान कोणत्याही बाबींच्या खर्चासाठी उमेदवारांकडून कोणत्याही व्यक्तीस / संस्थेस प्रदेय असलेली रक्कम रुपये १०,००० पेक्षा अधिक नसेल तर, निवडणूक प्रयोजनासाठी उघडण्यात आलेल्या बँक खात्यामधून रक्कम काढून, असा खर्च रोखीने करता येऊ शकेल. अन्य सर्व प्रदाने उक्त बँक खात्यातून आदात्याच्या खात्यावरच जमा होणाऱ्या धनादेशाद्वारे करावयाची आहेत.

उमेदवारांनी, निवडणूक खर्चासाठी असलेल्या सर्व रकमा, निवडणूक प्रयोजनासाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे आणि त्यांचे सर्व निवडणूक खर्च, उक्त खात्यामधून करावयाचे आहेत. आयोगाने असे स्पष्ट केले आहे की, नामनिर्देशन करण्यापूर्वी, जर स्वतंत्र बँक खाते उघडण्यात आलेले नसेल किंवा उक्त बँक खात्यामध्ये ती रक्कम जमा न करता खर्च करण्यात आली असेल तर, की, उमेदवाराने "विहित केलेल्या पद्धतीने" लेखा ठेवलेला नाही असे मानण्यात येईल.

आयोगाने असेही निर्देशित केले आहे की, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांच्या दृष्टीने, निवडणूक प्रक्रिये दरम्यान उमेदवार एका व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून रुपये १०,००० पेक्षा अधिक रकमेची कोणतीही देणगी किंवा रोख स्वरूपात कर्ज स्वीकारणार नाही आणि उमेदवाराकडून रुपये १०,००० पेक्षा अधिक रकमेच्या सर्व देणग्या / कर्जे आदात्याच्या खात्यातच जमा होणाऱ्या धनादेशाद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे किंवा खात्यातुन हस्तांतरण करून स्वीकरण्यात येतील आणि उमेदवार असा व्यक्ती / संस्थेचे पूर्ण नाव व पत्ते ठेवील जी दैनंदिन लेख्यांच्या संबंधित रकान्यात आणि निवडणूक खर्च गोषवारा विवरणपत्रात नमूद करण्यात येईल. **(जोडपत्र ई-८, जोडपत्र ई - ११ व ई- १२ ).**

## ३. उमेदवाराकडून ठेवावयाची निवडणूक खर्चाची नोंदवही :—

प्रत्येक उमेदवाराने, नामनिर्देशनपत्रे दाखल करतेवेळी, त्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून त्याला देण्यात आलेल्या **(जोडपत्र ई-१)** मधील नोंदवहीत त्याच्या निवडणूक खर्चाचा दैनंदिन हिशेब ठेवणे आवश्यक असेल. या नोंदवहीत तीन भागांचा समावेश असेल :-

(एक) पांढ्या पृष्ठांमधील भाग-अ मध्ये दैनंदिन लेख्यांची नोंदवही.

(दोन) गुलाबी पृष्ठांमधील भाग-ब मध्ये रोख नोंदवही आणि,

(तीन) पिवळ्या पृष्ठांमधील भाग-क मध्ये बँक नोंदवही.

उमेदवाराने उपरोक्त नोंदवह्या निवडणूक प्रचारदरम्यान, खर्च निरीक्षकास तपासणीसाठी किमान तीन वेळा सादर करावयाचा आहेत. नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठाला क्रमांक दिले पाहिजे आणि नोंदवहीतील पृष्ठांच्या एकूण संख्यांविषयी, नोंदवहीच्या पहिल्या व शेवटच्या पृष्ठावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असले पाहिजे. संपूर्ण प्रचार कालावधीसाठी नोंदवहीत पुरेशी पृष्ठसंख्या असली पाहिजे, तथापि, जर नोंदवही लवकरच भरली असेल तर, उमेदवार पुरवणी नोंदवही मागू शकतो व निवडणूक निर्णय अधिकारी त्याच प्रपत्रामध्ये त्यास पुरवणी नोंदवही देईल. उमेदवार, या नोंदवह्या मिळाल्याची पोचपावती देईल, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून अशा पावत्यांची प्रत घेतली पाहिजे.

४. **निवडणूक खर्चाच्या दैनंदिन हिशेबाची नोंदवही, रोख व बँक नोंदवही भरण्याची प्रक्रिया :–**

**(क) दैनंदिन हिशेबाची (लेख्यांची) नोंदवही :**

संपूर्ण निवडणूक खर्चासाठी असलेल्या या नोंदवहीत ९ रकाने आहेत व ती दररोज तारीख निहाय भरणे गरजेचे आहे. जेव्हा, कोणत्याही तारखेस खर्च करण्यात आलेला नसेल, त्या तारखेसमोर "निरंक" असे नमूद केले पाहिजे, सर्व रकाने अचूकपणे भरण्याबरोबरच प्रत्येक तारखेस खर्च केलेली/प्राधिकृत केलेली खर्चाची एकूण रक्कम (प्रदान केलेली व अदत्त रक्कम यासह) भरण्याची देखील काळजी घेण्यात येईल. कोणत्याही स्त्रोतातून प्राप्त झालेल्या आणि उमेदवाराच्या निवडणूक कार्यासाठी वापरण्यात आलेल्या किंवा वस्तुच्या स्वरूपातील मालाचे व सेवांचे मूल्य नमूद करण्यात येईल. वस्तुतः या नोंदवहीत, उमेदवाराने / निवडणूक प्रतिनिधीने / पक्षाने / अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेल्या/ प्राधिकृत केलेल्या संपूर्ण खर्चाचा समावेश असेल. अशा खर्चाच्या स्त्रोतासंबंधी, उमेदवाराने त्याच्या स्वतःच्या निधीतून खर्च केलेली / प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम, संबंधित रकान्यामध्ये नमूद करण्यात येईल. राजकीय पक्षाकडून मिळालेली किंवा राजकीय पक्षाने एकतर रोख स्वरूपात किंवा वस्तू स्वरूपात खर्च केलेली किंवा प्राधिकृत केलेली रक्कम, त्या प्रयोजनासाठी असलेल्या रकान्यात नोंदविण्यात येईल, राजकीय पक्षाशिवाय कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून एकतर रोख स्वरूपात किंवा वस्तुस्वरूपात प्राप्त झालेल्या कोणत्याही रकमेचा स्त्रोत, या प्रयोजनासाठी असलेल्या स्वतंत्र रकान्यात नमूद करण्यात येईल.

**(ख) रोख नोंदवही :**

उमेदवाराच्या कोणत्याही बँक खात्यातून काढलेल्या रोख रकमेसह कोणत्याही स्त्रोतामधून प्राप्त झालेल्या सर्व रकमा, नामनिर्देशनाच्या तारखेपासून ते निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपर्यंत तारीखनिहाय रोख नोंदवहीत नोंदवावयाच्या आहेत. ज्याच्याकडून रोख रक्कम प्राप्त झालेली आहे, त्या व्यक्तीचे किंवा संस्थेचे नाव व पत्ता रोख नोंदवहीच्या जमा रकान्यात नोंदविण्यात येईल. जर निवडणूक प्रयोजनासाठी उघडण्यात आलेल्या बँक खात्यातून रोख रक्कम काढली असेल तर, ती रक्कम देखील योग्य त्या वर्णनासह जमा रकान्यात दर्शविण्यात येईल. रोख केलेले सर्व खर्च, प्रदानाच्या रकान्यात नोंदविण्यात येतील. जेव्हा कोणतीही रोख रक्कम, उमेदवाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल तेव्हा ती रक्कम प्रदानांच्या रकान्यांमध्ये देखील नोंदविण्यात येईल. जेव्हा कोणतीही जमा व प्रदान करण्यात आलेले नसेल तेव्हा तारखेसमोर "निरंक" नमूद करण्यात यावे. खानहाय रोख शिल्लक, दर्शविणे आवश्यक आहे. जर कोणत्याही व्यक्तीस किंवा उमेदवाराच्या कार्यालयाच्या कोणत्याही शाखेस रोख रक्कम देण्यात आलेली असेल तर, ती स्पष्टपणे नमूद केली पाहिजे. शक्यतोवर सर्व प्रदाने धनादेशांद्वारे करण्याचा प्रयत्न करण्यात यावा व निवडणूक प्रचादरम्यान मतदारसंघामध्ये मोठी रक्कम ने-आण करण्याचे टाळण्यात यावे.

**(ग) बँक नोंदवही :**

उमेदवार त्याच्या स्वतःच्या निधीसह कोणत्याही स्त्रोतांमधून निवडणूक खर्चासाठी मिळालेली संपूर्ण रक्कम, निवडणुकीच्या प्रयोजनासाठी उघडण्यात आलेल्या बँक खात्यामध्ये जमा करील. सर्व निवडणूक खर्च, केवळ या बँक खात्यामधून देण्यात आलेल्या धनादेशाद्वारे करावयाचे आहेत. तथापि, लहान खर्चाच्या बाबत जेव्हा धनादेश देणे शक्य नसेल तेव्हा रक्कम रोख स्वरूपात काढण्यात येईल व प्रदाने योग्य प्रमाणकांसह करावयाची, आहेत. जमा पैसे काढणे व दैनंदिन शिल्लक यांचा तपशील बँक नोंदवहीच्या त्या त्या रकान्यामध्ये नोंदविण्यात येईल. जेव्हा पैसे जमा करण्यात किंवा काढण्यात आलेले नसतील तेव्हा तारखेसमोर "निरंक" असे नोंदविण्यात यावे.

५. **उमेदवाराकडून अतिरिक्त खर्च प्रतिनिधीची नियुक्ती :–**

आयोगाच्या विद्यमान सूचनेन्वये, विविध खर्चाशी संबंधित बाबींमध्ये उमेदवारास सहाय्य करणाच्या अतिरिक्त एजंटची विहित प्रपत्रामध्ये **(जोडपत्र ई-३)** नेमणूक करण्यासाठी प्रत्येक उमेदावारास परवानगी दिली आहे. जी व्यक्ती कायद्यान्वये, संसद किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून, निवडला जाण्यास व असल्यास अपात्र ठरलेली व लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ४० ( अन्वये निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्त केली जाऊ शकत नाही. अशा व्यक्तीस, असा अतिरिक्त एजंट म्हणून नेमता येणार नाही. उमेदवारासाठी कोणताही प्रतिनिधी म्हणून मंत्री / संसद सदस्य / विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य / महापौर महानगरपालिकेचा/

नगरपालिकाचा / जिल्हापरिषदेचा अध्यक्ष यांची नियुक्ती करण्यास असणारी सर्वसाधारण मनाई, अशा अतिरिक्त प्रतिनिधींसाठी देखील लागू असेल, याची नोंद घेण्यात यावी की, असा अतिरिक्त प्रतिनिधी, हा केवळ असांविधिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी असेल आणि कलम ४० अन्वये तसेच निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम १२ अन्वये नियुक्त केलेल्या निवडणूक प्रतिनिधीला उमेदवाराच्या वतीने ती कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत केले जाणार नाही.

**६. उमेदावाराकडून निवडणूक खर्चाचे लेखे दाखल करण्याची प्रक्रियात्मक आवश्यकता :-**

**(क) लेखे दाखल करण्याच्या प्रक्रियात्मक आवश्यकता :**

उमेदवाराने, दैनंदिन लेख्यांची नोंदवही, देयके व प्रमाणके आधारभूत शपथपत्रे यांसह **(जोडपत्र १५ ई-२)** संक्षिप्त विरणपत्र सादर करावयाचे आहे, संक्षिप्त विवरणपत्रामध्ये, अभिस्वीकृती नमुन्यासह भाग एक ते भाग चार व त्यांना त्याची अनुसूची १ ते ११ यांचा समावेश होतो, या अनुसूच्यांमध्ये, उमेदवाराने किंवा पक्षाने केलेल्या / प्राधिकार दिलेले निवडणूक खर्चाचे किंवा वेगवेगळ्या बाबींवरील इतर खर्चाचे तपशील, उमेदवाराच्या निधीचा स्त्रोत दाखवावयाचा आहे. सदर भाग व त्यांच्या अनुसूच्या योग्य प्रकारे भरल्या पाहिजेत आणि जेथे लागू नसेल तेथे उमेदवाराने "निरंक" किंवा 'लागू नाही' असे लिहावे,

**(ख) संक्षिप्त विवरणपत्रासह आवश्यक असलेले दस्तऐवज :**

निरीक्षकाने तपासल्याप्रमाणे, निवडणूक खर्चाच्या दैनंदिन हिशेबांची (लेख्यांची) नोंदवही, प्रमाणकांसह मूळ स्वरूपात सादर करण्यात येईल. जर कोणत्याही बाबीसाठी प्रमाणके जोडण्यात आलेली नसतील तर, आवश्यक असलेली प्रमाणके प्राप्त करणे का व्यवहार्य नव्हते, याचे स्पष्टीकरण उमेदरावाने दिले पाहिजे. सर्व देयके व प्रमाणके, एकतर उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने स्वाक्षरित केली पाहिजेत.

(एक) संक्षिप्त विवरणपत्रांचा भाग एक ते चार आणि अनुसूच्या १ ते ११ यांवर उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी केली पाहिजे.

(दोन) उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने प्रमाणित केल्याप्रमाणे बँक विवरणपत्राची प्रत देखील जोडली पाहिजे,

( तीन ) नमुन्याप्रमाणे असलेले शपथपत्र, स्वतः उमेदवाराने स्वाक्षरित केले पाहिजे आणि संक्षिप्त विवरणपत्रासह सादर केले पाहिजे,

(चार) निवडणूक खर्चाचे लेखे मिळाल्याची तारीख व वेळ दर्शविणारी, या प्रयोजनासाठी, आयोगाकडून विहित केल्याप्रमाणे पोचपावती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने प्रतिनियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून देण्यात येईल.

(पाच) नोंदवहीच्या तपासणीच्यावेळचा खर्च निरीक्षकाने किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने खर्चाच्या कोणत्याही बाबींवरील विसंगती दाखवून दिलेली असेल तर, अशा बाबींवरील विसंगतीच्या कारणासह स्पष्टीकरण स्वतंत्र्यपणे जोडले पाहिजे.

(सहा) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या नोटिशीच्या प्रती व निवडणूक खर्चासंबंधी देण्यात आलेले स्पष्टीकरण जोडले पाहिजे.

(सात) उमेदावारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस याची जाणीव करून दिली पाहिजे की, जो उमेदवार निवडणूक हरला आहे अशा उमेदवाराने देखील विनिर्दिष्ट वेळेत व विहित केलेल्या रीतीने त्याच्या निवडणूक खर्चाचे लेखे सादर करावयाचे आहेत, अन्यथा तो अपात्र ठरण्यास पात्र असेल.

**(ग) सदोष विवरणपत्रांचे परिणाम :**

जी अचूक व सत्य नाहीत अशी सदोष विवरणपत्रे सादर केल्यास, त्याच्या परिणामी आयोगाकडून कसूरीसाठी नोटीस दिली जाऊ शकते की लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम १० क अन्वये एकतर संसदेचा किंवा राज्य विधानसभेचा सदस्य असण्यासाठी आणि सदस्य म्हणून निवडला जाण्यासाठी ३ वर्षांकरिता अपात्र ठरविले जाऊ शकते.

लेखे स्वीकारण्याच्या काऊंटरवर उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्याने, उमेदावाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने सादर केलेला लेखा (हिशब) सर्व बाबतीत पूर्ण आहे व उमेदवाराकडून यथोचितरीत्या प्रमाणित केलेला आहे किंवा कसे हे तपासले पाहिजे. निवडणूक प्रतिनिधीचे प्रमाणपत्र पुरेसे नाही. लेखा विवरणपत्रासोबत सादर करणे आवश्यक असलेली नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्रे ( शपथपत्रासह भाग एक ते चार व अनुसूची १ ते ११ देयके व प्रमाणके यांसारखी सर्व कागदपत्रे लेख्यासोबत जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे याची देखील तपासणी केली पाहिजे. देयके व प्रमाणिक उमेदवाराने स्वाक्षरित केली पाहिजे. जर अपूर्ण लेखे दाखल केलेली असतील, तर पोचपावतीमध्ये दोष नमूद करण्यात यावेत आणि उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधींस त्याच ठिकाणी कायद्यान्वये विहित केलेल्या कालावधीत अचूक व पूर्ण लेखे दाखल करण्याच्या सूचनांसह निदर्शनास आणून दिले पाहिजे.

निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८७ अन्वये, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने उमेदवारांची नावे व त्या तारखेस लेखे दाखल केलेले होते ती तारीख, त्यामध्ये विनिर्दिष्ट करून उमेदवार ज्या तारखेस त्याच्या निवडणूक खर्चाचे लेखे दाखल करतो त्या तारखेपासून दोन दिवसांच्या आत नोटीस बोर्डावर नोटीस लावणे आवश्यक असेल. मतदारसंघातील उमेदवारांनी व आघाडीवर असणाऱ्या उमेदवाराने दाखल केलेल्या निवणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणपत्राची प्रत, अशाप्रकारे दाखल करण्याच्या दोन दिवसांच्या आत, जिल्हा निवडणूक अधिकाराऱ्याच्या नोटीस बोर्डावर लावली पाहिजे. लेख्यांच्या प्रती, प्रति पृष्ठास रुपये १ इतके शुल्क प्रदान केल्यावर जनतेच्या कोणत्याही सदस्यास प्राप्त करता येतील.

**७. लेखा पुनर्मेळ बैठक (जोडपत्र -सी-१०, सी-१२)**

(क) निकालाची घोषणा केल्याच्या नंतर २६ व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेल्या लेखा पुनर्मेळ बैठकीमध्ये, उमेदवारास निवडणूक खर्चासाठी नमूद केलेल्या रकमेचा कोणतीही असल्यास, पुनर्मेळ घालण्याची दुसरी संधी देण्यात यावी, जिल्हा निवडणूक अधिकारी, प्रत्येक उमेदवाराला बैठकी विषयी लेखी किंवा निकाल जाहीर झाल्याच्या दिवशी कळविले आहे. याची खात्री करून घेईल, त्यामुळे ते / त्यांचे निवडणूक प्रतिनिधी त्यांच्या निवडणूक खर्चाच्या खात्यामध्ये निवडणूक खर्चाच्या बाबी संदर्भात काही विवाद असेल तर निवडणुकीच्या कालावधीमध्ये गोळा केलेल्या पुराव्यासह मेळ घालू शकतो आणि निवडणूक निर्णय अधिकारी तशी नोटीस निर्गमित करेल.

(ख) जिल्हा निवडणूक संनियंत्रण समिती, खात्याची छाननी केल्यानंतर, प्रकरणामध्ये दिलेल्या कारणाचा तपशील आदेशामध्ये लेखी पाठवील, जेथे फरकाचा मेळ घातला जाऊ शकत नाही, त्याच दिवशी उमेदवार / प्रतिनिधीला दिला जाईल, जर उमेदवार जिल्हा निवडणूक संनियंत्रण समितीच्या आदेशाशी सहमत असेल, तर तो/ती त्याच्या अंतिम खात्यामध्ये तसाच समावेश करेल, जर उमेदवार जिल्हा निवडणूक संनियंत्रण समितीच्या आदेशाशी सहमत नसेल, तर तो/ती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या पत्रा मार्फत नमूद केलेल्या असंमतीच्या कारणासह त्यांचा अंतिम लेखा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे दाखल करू शकतो.

(ग) उमेदवाराने लेखा पुनर्मेळ बैठकीपूर्वी त्याचे लेखे अगोदरच दाखल केले असल्यास, त्यास/तिला जिल्हा खर्च संनियंत्रण समितीच्या निष्कर्षांचा समावेश करण्यासाठी, निवडणूक समातिच्या ३० दिवसांच्या सांविधिक कालावधीत लेखे सुधारित करता येतील.

(घ) निकालाच्या घोषणेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या विशिष्ट कालावधीमध्ये कोणत्याही वैध कारणाशिवाय निवडणूक खर्चाचे त्याचे विवरण उमेदवाराने दाखल न केल्यास, जिल्हा निवडणूक अधिकारी स्वाधिकारे उमेदवाराचे स्पष्टीकरण मागवेल आणि त्याचा अहवाल, उमेदवाराचे उत्तर व त्याची शिफारस यांसह आयोगाकडे पाठवेल.

(ङ) लेखा पुनर्मेळ बैठक असताना सुद्धा, उमेदवाराकडील लेखे जर अमान्य असल्यास, जिल्हा निवडणूक अधिकारी आयोगाकडे छाननी अहवाल, जिल्हा खर्च संनियंत्रण समितीचा आदेश, नोंदवहीच्या प्रमाणित प्रती, देयके व प्रमाणके आणि इतर पुरावा भाग्य यांसह, त्याच्या शिफारशीने पाठवेल.

(च) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने त्याचा छाननी अहवाल अंतिम रुप देऊन तीन दिवसांत एन्कोर सॉफ्टवेअर मध्ये समाविष्ट करावा.-**(जोडपत्र- सी-१७)**

**८. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या मृत्यूमुळे स्थगित झालेल्या मतदानाच्या निवडणूक खर्चास मर्यादा**

लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या मृत्यूमुळे मतदान स्थगित झाल्यास अगोदर निवडणूक लढविणारा उमेदवार आणि उमेदवारी दाखल केल्यानंतर आणि मतदानापूर्वी मृत्यू पावलेल्या उमेदवाराच्या जागी नवीन नामनिर्देशित उमेदवार, संबंधित राजकीय पक्षाने त्याचा /तिचा उमेदवारी अर्ज भरल्यापासून ते आयोगाने निकाल जाहिर केल्याच्या दिनांकापर्यंत निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवणे आवश्यक आहे **(ओळखत्र- ई-९)**

**९. लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७८ अन्वये मृत्यू झालेल्या उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्याची आवश्यकता**

उमेदवाराचा मृत्यू झाल्यास, निवडणूक खर्चाचा हिशेब गृहित धरून, काहीही उपयोग होत नाही आणि म्हणून अशा मृत्यू पावलेल्या उमेदवाराच्या बाबतीत, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कत्लन ७८ लागू होण्याचे बंद करण्याची आवश्यकता नाही.

**जोडपत्र- ई-१**

**(भाग-क)**

**निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या दैनंदिन हिशेबाच्या नोंदी ठेवण्याकरिता नोंदवही.**

उमेदवाराचे नाव :

राजकीय पक्षाचे नाव, कोणतेही असल्यास :

निवडणूक लढवत असलेल्या मतदारासंघाचे नाव :

निकाल जाहीर करण्याचा दिनांक :

निडणूक प्रतिनिधीचे नाव व पत्ता :

केलेला/प्राधिकृत एकूण खर्च : 1

**(नामनिर्देशनाच्या दिनांकापासून निवडणूकीचे निकाल जाहीर करण्याच्या दिनांकापर्यंत दोन्हीही दिनांक समाविष्ट आहेत.)**

| खर्चाचा प्रसंगाचा दिनांक (१) | खर्चाचे स्वरूप (२) | | | एकूण रक्कम रुपयामध्ये (दिलेली + अदत्त) (३) | पैसे घेणाऱ्याचे नाव व पत्ता (४) | देयक क्रमांक/ प्रमाणक क्रमांक व दिनांक (५) | उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने खर्च केलेली/ प्राधिकृत केलेली रक्कम (६) | राजकीय पक्षाने व राजकीय पक्षाच्या नावाने खर्च केलेली/ प्राधिकृत केलेली रक्कम (७) | इतर व्यक्ती संघ/ संस्था इतर कोणीही खर्च केलेली/ प्राधिकृत केलेली/ रक्कम (पूर्ण नाव व पत्ता नमूद करावा.) (८) | कोणतेही असल्यास शेरे (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्णन | प्रमाण | प्रती घटकांचा दर | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्याकडून / माझ्या निवडणूक प्रतिनिधीकडून लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये ठेवण्यात आलेला हिशेब हा सत्य आहे. (निकाल जाहीर केल्याच्या दिनांकानंतर हे प्रमाणपत्रे देण्यात यावे.)

उमेदवाराची स्वाक्षरी.

**टीप :–**

१. दैनिक तत्त्वावर व निवडणूक आयोगाकडून नियुक्त केलेला निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी किंवा याबाबतीतील इतर कोणत्याही प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून कोणत्याही वेळी निरीक्षणाच्या अधीन राहून नोंदवही ठेवण्यात यावी.

२. लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७८ अन्वये निवडणूक खर्चाचे विवरण म्हणून नोंदवही मूळ स्वरूपात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करण्यात यावी. तिच्यासोबत निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र (भाग एक ते चार आणि अनुसूच्या १ ते११) व विहित नमुन्यातील पुष्टीदर्शक प्रतिज्ञापत्र जोडले असावे. निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरणपत्र व प्रतिज्ञापत्राखेरीज पूर्ण केलेले खर्चाचे कोणतेही विवरण स्वीकारले जाणार नाही.

३. निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ८६ (२) मध्ये सूचीबद्ध केलेला टपालखर्च, रेल्वेने प्रवासासारख्या बाबींखेरीजची कोणतीही प्रमाणके जोडण्यात येऊ नयेत. न जोडलेल्या प्रमाणकाकरिता हा नियम पहावा. आवश्यक ती प्रमाणके मिळविणे का शक्य नाही अशा अर्थाचे स्पष्टीकरण, विहित नोंदवहीमध्ये देण्यात यावे.

४. हिशेब व संक्षिप्त विवरणपत्र जर त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने सादर केले असेल तर, उमेदवाराने त्यावर प्रतिस्वाक्षरी करावी व ठेवलेल्या हिशेबाची अचूक प्रत म्हणून उमदवाराने स्वतः ती प्रमाणित करावी.

५. उमेदवार / निवडणूक प्रतिनिधीकडून प्रत्यक्षपणे केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या खर्चाखेरीज़, राजकीय पक्ष, इतर संघटना, संस्था, व्यक्तींनी उमेदवाराच्या निवडणुकीसंबंधी केलेला किंवा प्राधिकृत केलेला सर्व खर्चही हिशेबामध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. पक्षाच्या प्रचार कार्यक्रमाकरिता राजकीय पक्षाच्या विनिर्दिष्ट नेत्यांनी केलेल्या प्रवासामुळे त्यांच्या प्रवासावरील खर्चाचा याला अपवाद राहील. ( लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ (१) चे स्पष्टीकरण १ व २ पहावे.)

६. वरील स्तंभ २ व ३ मध्ये दाखविलेल्या कोणत्याही बाबीवरील खर्च, कोणताही राजकीय पक्ष / संघटना/संस्था/ एखाद्या व्यक्तीने (उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीखेरीज ) केलेला किंवा प्राधिकृत केलेला असल्यास, ते/ त्याचे नाव व संपूर्ण पत्ता स्तंभ ७ व ८ मध्ये दाखवावा.

७. वरील तक्त्याच्या स्तंभ २ च ३ मध्ये निर्दिष्ट असलेल्या एकूण खर्चात उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने कोणत्याही स्त्रोताकडून स्वीकारलेली रोख रक्कम व सर्व वस्तूंची किंमत व वस्तुरूपाने स्वीकारलेल्या सेवांचाही समावेश असेल,

८. नोंदवहीमध्ये विहित केलेल्या नमुन्यानुसार, भाग-क म्हणून पांढऱ्या कागदातील दैनंदिन हिशेब नोंदवही भाग-ख म्हणून नमूद केलेली गुलाबी कागदातील रोकड नोंदवही व भाग-ग म्हणून पिवळ्या कागदातील नमूद केलेली बँक नोंदवही या नोंदवह्यांचा समावेश असेल.

## ( भाग -ख)

## निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा दैनंदिन हिशेब ठेवण्याकरिता रोकड नोंदवही.

उमेदवाराचे नाव :

राजकीय पक्षाचे नाव, कोणताही असल्यास :

निवडणूक लढवित असलेल्या मतदारासंघाचे नाव :

निकाल जाहीर करण्याचा दिनांक :

निडणूक प्रतिनिधीचे नाव व पत्ता :

**(नामनिर्देशनाच्या दिनांकापासून निवडणूकीचे निकाल जाहीर करण्याच्या दिनांकापर्यंत दोन्हीही दिनांक समाविष्ट आहेत.)**

| जमा | | | | देणे रक्कम | | | | शिल्लक रक्कम | कोणतेही असल्यास, शेरे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ज्याच्याकडून रक्कम मिळाली ती व्यक्ती/पक्ष/संघ/संस्था/इतर कोणीही त्याचे नाव व पत्ता | पावती क्रमांक | रक्कम | देयक क्रमांक/प्रमाणक क्रमांक व दिनांक | पैसे घेणाऱ्याचे नाव व पत्ता | खर्चाचे स्वरुप | रक्कम | असे ठिकाण जेथे किंवा व्यक्ती जिच्याकडे शिल्लक ठेवली आहे अशी ठिकाणी किंवा व्यक्ती (एकापेक्षा अधिक ठिकाण/व्यक्तीकडे रोख रक्कम ठेवलेली असल्यास नाव व उपलब्ध शिल्लक रक्कम नमूद करावी. | या तक्त्याच्या स्तंभ (७) मध्ये नमूद केलेला आहे, पण भाग-क च्या तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद न केलेल्या कोणत्याही खर्चाचे येथे स्पष्टीकरण देण्यात यावे. |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | | | | | | |

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्याकडून / माझ्या निवडणूक प्रतिनिधीकडून लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये ठेवण्यात आलेला हिशेब हा सत्य आहे. (निकाल जाहीर केल्याच्या दिनांकानंतर हे प्रमाणपत्रे देण्यात यावे.)

उमेदवाराची स्वाक्षरी.

**( भाग -ग)**

**निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा दैनंदिन हिशेब ठेवण्याकरिता बँक नोंदवही.**

उमेदवाराचे नाव :

राजकीय पक्षाचे नाव (कोणतेही असल्यास) :

निकाल जाहीर करण्याचा दिनांक :

निडणूक प्रतिनिधीचे नाव व पत्ता :

बँकेचे नाव :

शाखेचा पत्ता :

खाते क्रमांक :

**(नामनिर्देशनाच्या दिनांकापासून निवडणूकीचे निकाल जाहीर करण्याच्या दिनांकापर्यंत-दोन्हीही दिनांक समाविष्ट आहेत.)**

| ठेव | | | | प्रदान | | | | शिल्लक रक्कम | शेरे, कोणतेही असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ज्याच्याकडून रक्कम मिळाली बँकेत जमा झाली आहे अशा व्यक्ती/पक्ष/संघ/संस्था/इतर कोणीही त्याचे नाव व पत्ता | रोख रक्कम/ धनादेश क्रमांक, बँकेचे नाव व शाखा | रक्कम | धानादेश क्रमांक | पैसे घेणाऱ्याचे नाव | खर्चाचे स्वरुप | रक्कम | | या तक्त्याच्या स्तंभ (७) मध्ये नमूद केलेला परंतु भाग-क च्या तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद न केलेल्या कोणत्याही खर्चाचे येथे स्पष्टीकरण देण्यात यावे. |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | | | | | | |

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्याकडून / माझ्या निवडणूक प्रतिनिधीकडून लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये ठेवण्यात आलेला हिशेब हा सत्य आहे. (निकाल जाहीर केल्याच्या दिनांकानंतर हे प्रमाणपत्रे देण्यात यावे.)

उमेदवाराची स्वाक्षरी.

## निवडणूक खर्चाचा दैनंदिन हिशेब ठेवण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे :

उमेदवाराला त्याच्या स्वतःच्या निधीतून किंवा राजकीय पक्ष किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून, संस्था, संस्थापना किंवा कंपनीकडून मिळालेली रोख रक्कम, धनादेश किंवा धनाकर्ष किंवा प्रदानादेश निवडणूक खर्चाच्या प्रयोजनाकरिता उमेदवाराने बँकेत उघडलेल्या वेगळ्या खात्यामध्ये करण्यात यावेत.

**१. प्राप्त झालेल्या रोख रकमेकरिता : –**

**१.१ निवडणूक खर्चाकरिता वापरावयाच्या उमेदवाराच्या स्वतःच्या रकमेकरिता.–**

उमेदवाराने त्याची स्वतःची रोख रक्कम आणल्यास, निवडणूक खर्चाकरिता बँकेत उघडलेल्या वेगळ्या खात्यामध्ये त्याला / तिला ती रोख रक्कम जमा करावी लागेल. नंतर त्याची नोंद बँक नोंदवहीमध्ये करताना (दैनंदिन हिशेब नोंदवहीचा भाग-ग), स्तंभ- २ मध्ये " उमेदवाराचा स्वतःचा निधी ", स्तंभ- ३ मध्ये "रोख रक्कम" व स्तंभ-४ मध्ये रक्कम लिहावी.

**१.२ इतर कोणतीही व्यक्ती / पक्ष / संघटना / संस्था यांच्याकडून उमेदवाराला मिळालेली रोख रक्कम.–**

उमेदवाराला त्याच्या निवडणूक खर्चाच्या प्रयोजनाकरिता इतर कोणत्याही व्यक्ती / पक्षाकडून रोख रक्कम मिळाल्यास, रोकड नोंदवहीच्या (भाग-ख) जमा बाजूस स्तंभ- १ मध्ये दिनांक, रोख रक्कम कोणाकडून मिळाली त्या व्यक्ती / पक्ष इत्यादीचे नाव व पत्ता स्तंभ-२ मध्ये, पावती क्रमांक ( कोणताही असल्यास) स्तंभ- ३ मध्ये व स्तंभ-४ मध्ये ती रोख रक्कम अशी नोंद करून ती रक्कम नोदवावी. रोकड नोंदवहीमध्ये नोंद केल्यानंतर, ती रक्कम निवडणूक खर्चाकरिता उघडलेल्या बँक खात्यामध्ये जमा केली जाईल. बँक खात्यात रक्कम एकदा जमा झाल्यानंतर, रोकड नोंदवहीच्या प्रदानाच्या बाजूला स्तंभ- ५ मध्ये दिनांक, स्तंभ- ६ मध्ये रोख रक्कम ज्या बँक खात्यामध्ये जमा केली त्याचा खाते क्रमांक व स्तंभ- ७ मध्ये "जमा" व स्तंभ-८ मध्ये ती रक्कम लिहून त्या रकमेची नोंद घेण्यात येईल.

१.३ बँकेत रोख रक्कम जमा केल्यानंतर, स्तंभ- १ मध्ये दिनांक, स्तंभ- २ मध्ये " उमेदवाराची स्वतःची रोख रक्कम " , स्तंभ- ३ मध्ये " रोख रक्कम ", स्तंभ-४ मध्ये ती रक्कम लिहून बँक नोंदवही (भाग-ग) अद्ययावत करावी. असे केल्याने बँक पासबुकाशी मेळ बसविताना खात्यामधील शिल्लक लिखित स्वरूपात मिळेल.

**२. प्राप्त झालेले धनादेश/धनाकर्ष/प्रदानादेशयांकरिता :**

**२.१ एखादी व्यक्ती / पक्ष/संघटना इत्यादी किंवा उमेदवाराच्या स्वतःच्या बँक खात्यातून मिळालेले धनादेश / धनाकर्ष / प्रदानादेश.–**

उमेदवाराला त्याच्या / तिच्या निवडणूक खर्चाच्या प्रयोजनाकरिता एखादी व्यक्ती / पक्ष इत्यादीकडून किंवा त्याच्या स्वतःच्या बँक खात्यातून त्याने धनादेश / धनाकर्ष काढल्यास, त्याला तो निवडणूक खर्चाकरिता उघडलेल्या बँक खात्यामध्ये जमा करावा लागेल. बँक नोंदवहीच्या जमा बाजूला स्तंभ- १ मध्ये दिनांक नमूद करून, स्तंभ-२ मध्ये ज्याच्याकडून धनादेश मिळाला त्या व्यक्ती / पक्षाचे नाव, पत्ता, स्तंभ- ३ मध्ये धनादेश / धनाकर्ष / प्रदानादेश क्रमांक व बँकेचे नाव / शाखा, स्तंभ-४ मध्ये धनादेश / धनाकर्ष / प्रदानादेशाची रक्कम याची तो नोंद घेईल. जर त्याच्या स्वतःच्या बँक खात्याचा धनादेश असेल, तर बँक नोंदवहीच्या स्तंभ- २ मध्ये "उमेदवाराचा स्वतःचा निधी" असे नमूद करण्यात येईल.

**३. वस्तुरूपाने मिळालेल्या वस्तू व सेवांकरिता :**

**३.१ पक्ष किंवा एखादी व्यक्ती / संस्था / संघटनेकडून वाहने, भित्तिपत्रके, पत्रके, प्रसारमाध्यम जाहिरात, हेलिकॉप्टर, विमाने इत्यादींसारख्या वस्तुरूपाने वस्तू व सेवा मिळाल्या असल्यास.–**

एखादी व्यक्ती, पक्ष / संस्था / संघटनेने उमेदवाराच्या निवडणूक प्रचाराकरिता काही वस्तू किंवा सेवा वस्तुरुपाने पुरविल्यास, या बाबींकरिता दैनंदिन हिशेब नोंदवहीच्या भाग-क मध्ये स्तंभ- १ मध्ये दिनांक नमूद करून आवश्यक त्या नोंदी कराव्यात, स्तंभ- २ मध्ये वर्णन, प्रमाण, प्रत्येक नगाचा दर, सदर नोंदवहीच्या स्तंभ- ३ मध्ये खर्चाचे स्वरूप

व एकूण किंमत ( बाबींचे काल्पनिक मूल्य), अशा आवश्यक त्या नोंदी कराव्यात, आणखी असे की, राजकीय पक्षाकडून वस्तुरूपाने बाबी पुरविण्यात आल्या असल्यास, स्तंभ-७ मध्ये एकूण किंमत व राजकीय पक्षाचे नाव लिहिण्यात यावे व अशा बाबी इतर व्यक्ती / संघटना इत्यादींद्वारे देण्यात आल्या असल्यास, रक्कम व त्या व्यक्तीचे / संघटनांचे नाव, पत्ता या नोंदवहीच्या स्तंभ-८ मध्ये नमूद करण्यात जाईल.

**४. सर्व निवडणूक खर्चांकरिता :**

**४. १ सर्व निवडणूक खर्च दैनंदिन हिशेबाच्या नोंदवहीमध्ये (भाग- क) नोंदविण्यात येईल, जेव्हा जेव्हा कोणताही खर्च केला गेल्यास, जसे, टॅक्सीची मागणी केलेली असल्यास, दैनंदिन हिशेबाच्या नोंदवहीमध्ये ( भाग - क) खालीलप्रमाणे नोंदी करण्यात याव्यात.–**

स्तंभ- १ मध्ये दिनांक, स्तंभ- २ मध्ये खर्चाचे स्वरूप जसे “टॅक्सी” क्रमांक --------------------- मागणीकरिता वर्णन एकूण तास / दिवस व प्रतितास /दिवसाचा दर व स्तंभ- ३ मध्ये एकूण रक्कम, स्तंभ-४ मध्ये टॅक्सी पुरविणाऱ्याचे नाव व पत्ता, स्तंभ - ५ मध्ये देयक / प्रमाणपत्र क्रमांक, उमेदवाराकडून रक्कम चुकती केलेली असल्यास, स्तंभ-६ मध्ये रक्कम नमूद करावी. राजकीय पक्षाकडून टॅक्सी पुरविणाऱ्याला रक्कम प्रत्यक्षपणे दिलेली असल्यास, स्तंभ-७ मध्ये पक्षाचे नाव व रक्कम लिहिण्यात यावी. जर ती इतर कोणत्याही व्यक्तीकडून चुकती केली गेली असल्यास, स्तंभ-८ मध्ये रक्कम, त्या व्यक्तीचे नाव, पत्ता लिहिण्यात यावा.

**४.२ धनादेशाद्वारे केलेल्या खर्चाच्या प्रदानाकरिता.–**

खर्चासाठी केलेली सर्व प्रदाने ( संपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान एक पक्षासाठी रुपये १०,०००/- पर्यंतच्या किरकोळ खर्चा/व्यक्तिरिक्त ही केवळ खात्यावर जमा होणाऱ्या धनादेशाद्वारेच करण्यात यावीत. धनादेशाद्वारे प्रदान करण्याकरिता, बँक नोंदवही ( भाग-ग ) मध्ये खालील नोंदी घेण्यात याव्यात : स्तंभ-५ मध्ये धनादेश क्रमांक, स्तंभ-६ मध्ये ज्याला धनादेश दिला आहे त्या पैसे घेणाऱ्याचे नाव, स्तंभ- ७ मध्ये खर्चाचे स्वरूप व स्तंभ-८ मध्ये रक्कम लिहिण्यात यावी.

**४.३ रोख स्वरूपात केलेल्या किरकोळ खर्चाच्या प्रदानाकरिता.–**

किरकोळ खर्चाचे कोणतेही प्रदान रोख स्वरूपात करावयाचे असल्यास ( तेसुद्धा प्रचार मोहिमेच्या संपूर्ण कालावधीदरम्यान व्यक्तीला दिलेली एकूण रक्कम ही रुपये १०,०००/- पेक्षा अधिक असता कामा नये. ) निवडणूक खर्चाकरिता उघडलेल्या उक्त बँक खात्यातून ती रक्कम रोख स्वरूपात काढण्यात यावी. याकरिता बँक नोंदवही ( भाग-ग ) मध्ये, बँक नोंदवहीच्या स्तंभ-५ मध्ये रोख काढण्यासाठीच्या धनादेशाचा क्रमांक, स्तंभ- ६ मध्ये “स्वतः”, स्तंभ-७ मध्ये खर्चाचे स्वरूप “किरकोळ खर्चाकरिता काढले”, व स्तंभ-८ मध्ये रक्कम असे नमूद करणाऱ्या नोंदी करण्यात याव्यात. रक्कम काढल्यानंतर, रोकड नोंदवहीच्या ( भाग -ख) जमा बाजूमध्ये नोंद करून ती रोख रक्कम मांडण्यात यावी. याकरिता, स्तंभ- १ मध्ये दिनांक नमूद करावा, स्तंभ- २ मध्ये “स्वतः” स्तंभ- ३ मध्ये बँकेतून काढले व स्तंभ-४ मध्ये रक्कम नमूद करावी, जर अशी किरकोळ रक्कम किरकोळ खर्च करण्याकरिता दुसऱ्या शाखा कार्यालयाला दिलेली असल्यास किंवा प्रतिनिधीला दिलेली असल्यास, स्तंभ - ९ मध्ये रक्कम व व्यक्ती /ठिकाणाची नावे नोंदविण्यात यावीत. किरकोळ खर्चाकरिता पैसे दिल्यानंतर, असा खर्चसुद्धा दैनंदिन हिशेबामध्ये ( भाग - क) खालीलप्रमाणे नोंदवावा : स्तंभ १ मध्ये दिनांक, स्तंभ- २ मध्ये प्रदानाचे स्वरूप, स्तंभ- ३ मध्ये एकूण रक्कम, स्तंभ-४ मध्ये ज्याला पैसे दिले त्याचे नाव व पत्ता, स्तंभ-५ मध्ये देयक / प्रमाणक क्रमांक व स्तंभ- ६ मध्ये “स्वतः”.

( आयोगाचे पत्र क्रमांक ७६ / अनुदेश / २०१४ / ईईपीएस / खंड-एक, दिनांक २३ जानेवारी २०१४).

**जोडपत्र - ई-२**

| भाग-एक : निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण | | |
|---|---|---|
| एक | उमेदवाराचे नाव | श्री. /श्रीमती/कुमारी |
| दोन | मतदारसंघाचा क्रमांक व नाव | |
| तीन | राज्य / संघराज्यक्षेत्राचे नाव | |
| चार | निवडणुकीचे स्वरुप ( राज्य विधानसभेची / लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक / पोट निवडणूक,-कोणती निवडणूक आहे हे कृपया नमूद करावे.) | |
| पाच | निकाल जाहीर करण्याचा दिनांक | |
| सहा | निवडणूक प्रतिनिधीचे नाव व पत्ता | |
| सात | जर राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार असेल तर, कृपया राजकीय पक्षाचे नाव नमूद करावे. | |
| आठ | तो पक्ष मान्यताप्राप्त राजकीय पक्ष आहे किंवा कसे. | होय / नाही |

दिनांक : उमेदवाराची सही

ठिकाण : नाव :

## भाग- दोन : उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या विवरणपत्राचा गोषवारा

| अ. क्र. | तपशील | उमेदवाराने / निवडणूक प्रतिनिधीने खर्च केलेली /खर्च करण्यास परवानगी दिलेली रक्कम (रुपयांमध्ये) | राजकीय पक्षाने खर्च केलेली/ खर्च करण्यास परवानगी दिलेली रक्कम (रुपयांमध्ये) | इतरांनी खर्च केलेली/ खर्च करण्यास परवानगी दिलेली रक्कम (रुपयांमध्ये) | एकूण निवडणूक खर्च (३)+ (४)+ (५) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| एक | जाहीर सभा, मेळावे, मिरवणुका इत्यादींचा खर्च :-<br>एक-क : जाहीर सभा, मेळावे, मिरवणुका इत्यादींचा खर्च (म्हणेज राजकीय पक्षाच्या प्रमुख प्रचाराकांबरोबर केलेल्या प्रचारावरील खर्चाव्यतिरिक्त अन्य) (अनुसूची- १ अनुसार जोडावे)<br>एक-ख प्रमुख प्रचाराकाबरोबर (प्रचाराकांबरोबर) केलेल्या जाहीर सभा, मेळावे, मिरवणुका इत्यादींचा खर्च (म्हणजे पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारकार्यावरील खर्चाव्यतिरिक्त अन्य )<br>(अनुसूची- २ जोडावा). | | | | |
| दोन | उपरोक्त अनुक्रमांक एकमध्ये नमूद केलेल्या जाहीर सभा, मेळावे, मिरवणुका यामध्ये वापरण्यात आलेले असेल त्या व्यतिरिक्त अन्य प्रचार साहित्य (अनुसूची-३ अनुसार जोडावे) | | | | |
| तीन | (क) खाजगी मालकीची वृत्तपत्रे/ दूरचित्रवाणी/ आकाशवाणी वाहिन्या, इ. मधील केबल नेटवर्क, एकगठ्ठा संदेश किंवा इंटरनेट व सोशल मिडीया यासह मुद्रण आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमार्फत प्रचारकार्य<br>(अनुसूची- ४ अनुसार जोडावे)<br>(ख) उमेदवाराच्या मालकीचे किंवा उमेदवाराला पुरस्कृत करणारे राजकीय पक्षाच्या मालकीच्या वृत्तपत्रे/ दूरचित्रवाणी/आकाशवाणी वाहिन्या इ. मधील केबल नेटवर्क, एक गठ्ठा संदेश किंवा इंटरनेट व सोशल मिडिया यांसह मुद्रण व ईलेक्ट्रॉनिक माध्यमांर्फत प्राचार कार्य<br>(अनुसूची- ४ अनुसार जोडावे) | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चार | उमेदवारांनी वापरलेल्या प्रचार वाहन (वाहनांवरील) खर्च<br>(अनुसूची- ५अनुसार जोडावे) | | | | |
| पाच | प्रचार कार्यकर्ते/ प्रतिनिधी यांचा खर्च<br>(अनुसूची- ६ अनुसार जोडावे) | | | | |
| सहा | अन्य कोणताही प्रचारकार्यावरील खर्च | | | | |
| सात | फौजदारी खटले इ. संबंधित माहिती जाहिर/ प्रकाशित करण्यावर केलेला खर्च<br>(अनुसूची- १० अनुसार जोडावा). | | | | |
| आठ | आठ-आभासी प्रचार मोहिमेवर केलेला खर्च<br>(अनुसूची- ११ अनुसार जोडावे) | | | | |
| | **एकूण बेरीज** | | | | |

.

## भाग-तीन : उमेदवाराने उभारलेल्या निधीच्या स्त्रोताचा गोषवारा

| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | रक्कम (रुपायांमध्ये) (३) |
|---|---|---|
| एक | निवडणूक प्रचारासाठी वापरलेल्या स्वयं-निधीची रक्कम (अनुसूची ७ नुसार जोडावा) | |
| दोन | पक्षाकडून (पक्षांकडून) रोख किंवा धनादेश इ., च्या स्वरूपात मिळालेली ठोक रक्कम (अनुसूची ८ नुसार जोडावा). | |
| तीन | कर्ज, दान अथवा दोणगी इत्यादी च्या स्वरुपात कोणतीही व्यक्ती/ कंपनी / भागीदारी संस्था/ संघ/ व्यक्तींचा निकाय यांच्याकडून मिळालेली ठोक रक्कम (अनुसूची ९ नुसार जोडावा) | |
| | **एकूण** | |

### भाग-चार

### शपथपत्राचा नमुना

.................................... (जिल्हा, राज्य / संघराज्य क्षेत्र) च्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांसमोर करावयाचे

श्री. /श्रीमती/कुमारी ................................................................................................ यांचा (मुलगा, पत्नी, मुलगी) ................................................................................................ यांचे शपथपत्र

मी, श्री. / श्रीमती / कुमारी ............................................, ................................................ यांचा (मुलगा, पत्नी, मुलगी), वय ......... वर्षे ............... राहणार ............................................ याद्वारे गांभीर्यपूर्वक व प्रामाणिकपणे खालीलप्रमाणे नमूद व जाहीर करतो / करते की :–

(१) मी ............... लोकसभा/विधानसभेच्या .................. संसदीय/ विधासभेच्या सार्वत्रिक निवडणूक / पोट-निवडणुकीचा निवडणूक लढविणारा उमेदवार होतो/ होते ज्याचा निकाल ................................ रोजी जाहीर केला होता.

(२) मी नामनिर्देशन दिले तो दिनांक व ज्या निकाल जाहीर केल्याचा दिनांक, दोन्हीही दिवस समाविष्ट आहेत, याच्या दरम्यानच्या कालावधीतील वरील निवडणुकी संदर्भातील मी / माझ्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या / प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब मी / माझ्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवला आहे.

(३) निवडणूक अधिकाऱ्याने या प्रयोजनाकरिता पुरविलेल्या नोंदवहीमध्ये उक्त हिशेब ठेवलेला आहे व या हिशेबामध्ये उल्लेखित केलेली त्याला पुष्टी देणारी प्रमाणके/बिले याच्यासह उक्त नोंदवही सुद्धा सोबत जोडलेली आहे.

(४) मी किंवा माझ्या निवडणूक प्रतिनिधीने, मला पुरस्कृत केलेल्या राजकीय पक्षाने, मला पाठींबा देणारे इतर संघ / व्यक्तीनिकाय व इतर व्यक्ती यांनी, निवडणुकीच्या संबंधात, केलेला अथवा प्राधिकृत केलेला निवडणुकीवरील खर्चाचा हिशेब, निवडणुकीच्या खर्चाच्या सर्व बाबींसह यासोबत जोडलेला आहे, व त्यातून (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१) अन्वये स्पष्टीकरण १ व २ द्वारे समाविष्ट असलेल्या नेत्यांच्या प्रवासावरील खर्चाखेरीज) काहिही लपवून किंवा अडवून / दडपून टाकण्यात आलेले नाही.

(५) सदर हिशेबात जोडपत्र दोन म्हणून जोडलेल्या निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणात, माझ्याकडून, माझ्या प्रतिनिधीकडून मला पुरस्कृत केलेल्या राजकीय पक्ष, मला पाठींबा देणारे इतर संघ / व्यक्तीनिकाय व इतर व्यक्तींकडून निवडणुकीच्या संबंधात केलेल्या अथवा प्राधिकृत केलेल्या खर्चाचाही समावेश आहे,

(६) उपरोक्त परिच्छेद (१) ते (५) मधील विधाने माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी असून, त्यात काही चूक नाही व कोणतीही गोष्ट लपविण्यात आलेली नाही.

### अभिसाक्षी

माझ्यासमोर ..................................... यांजकडून दिनांक ..................................... २०२ या दिवशी ......................... या वेळी गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करून शपथबद्ध केले.

(साक्षांकन प्राधिकारी, म्हणजेच प्रथमवर्ग दंडाधिकारी किंवा शपथ आयोग किंवा लेख प्रमाणकाची स्वाक्षरी व मोहोर).

**अभिस्वीकृतीचा नमुना**

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी,

......................................................

......................................................

महोदय,

मला आपल्या पत्र क्र. .............................. दिनांक .............................. त्याच्या सहपत्रांसह त्यामधील इतर दस्तऐवज, निवडणूक खर्चाचा माझा हिशेब ठेवण्याकरिता असणारी नोंदवही अनुक्रमांक .............................. ही मिळाली.

२. निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवण्यासाठी व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी / निवडणूक अधिकारी यांचेकडे त्या हिशेबाची खरी प्रत सादर करण्यासाठीच्या कायद्याच्या आवश्यकतांची मी नोंद घेतली आहे.

आपला,

(उमेदवाराची दिनांकासह स्वाक्षरी)

• लागू नसलेले खोडावे.

**अभिस्वीकृती (कार्यालयाने भरावयाचे)**

(दिनांक) ............................ रोजी ज्याचा निकाल जाहीर झाला होता, त्या ................................ ( मतदारसंघ) च्या बाबतीतील निवडणूक खर्चाचा हिशेब, त्याने /त्याच्या/ त्याने वतीने ............................ यांनी (दिनांक) ............................ रोजी दाखल करण्यात आला असून, तो आज दिनांक ......................... महिना ......................... वर्ष ....................... ला मला प्राप्त झाला आहे.

जिल्हा .......................

जिल्हा निवडणूक अधिकारी,

कार्यालयाची मोहोर.

**सूची - १ ते ११ :** उमेदवाराच्या निवडणूक निधीचे व खर्चाचे तपशील

## अनुसूची-१

जाहीर सभा, मेळावा / मिरवणूक इत्यादींमधील खर्च ( म्हणजेच राजकीय पक्षांच्या प्रमुख प्रचारकांव्यतिरिक्त इतर )

| अ. क्र. | खर्चाचे स्वरूप | एकूण रक्कम (रुपयामध्ये) | खर्चाचा स्त्रोत | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उमेदवार / प्रतिनिधी यांनी खर्च केलेली रक्कम | राजकीय पक्षाच्या नावासह त्या पक्षाने खर्च केलेली रक्कम | इतरांनी खर्च केलेली रक्कम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | अभ्यागतांना नेण्या-आणण्यासाठी वाहने. | | | | |
| (२) | व्यासपीठ, मांडप व फर्निचर, जोडण्या, खांब इत्यादी उभारणे. | | | | |
| (३) | कमानी व मेढेबंदी इत्यादी. | | | | |
| (४) | फुले / हार. | | | | |
| (५) | ध्वनीक्षेपक, मायक्रोफोन, ध्वनीवर्धक (ॲम्प्लिफायर), कम्पेर अर् स (comparers) इत्यादी भाड्याने घेणे. | | | | |
| (६) | भित्तीपत्रके, हस्तपत्रके, पत्रके, निशाण्या, कट-आऊट्स, मोठे जाहिरात फलक. | | | | |
| (७) | चहा, पाणी, शीत पेय, रस यांसारखी पेये. | | | | |
| (८) | डिजिटल टिव्ही -दर्शक फलक (बोर्ड्स डिस्प्ले) प्रोजेक्टर डिस्प्ले, टिकर्स बोर्ड, ३डी डिस्प्ले. | | | | |
| (९) | सुप्रसिद्ध व्यक्तींवरील खर्च, संगीतकारांना रक्कम प्रदान करणे, इतर कलाकारांचे मानधन इत्यादी. | | | | |
| (१०) | वीज दिव्यांच्या माळा (सिरियल लाईट्स), फलक इत्यादींसारख्या रोषणाईच्या वस्तू. | | | | |
| (११) | वाहतुकीच्या, हेलिकॉप्टर / विमान / वाहने/ नौका इत्यादींच्या भााड्यावरील खर्च (स्वतःसाठी नामांकित किंवा प्रमुख इतर कोणतेही प्रचारकांच्या साठी) | | | | |
| (१२) | वीजवापर / जनरेटर आकार | | | | |
| (१३) | जागेचे भाडे | | | | |
| (१४) | रक्षक व सुरक्षारक्षक यांचा खर्च | | | | |
| (१५) | स्वतः, नामांकित व्यक्ती, पक्षाचा कार्यकर्ता किंवा प्रमुख प्रचारकासह इतर कोणतेही प्रचारक यांचा भोजन व निवासाचा खर्च. | | | | |
| (१६) | इतर खर्च | | | | |
| | **एकूण** | | | | |

## अनुसूची- २

प्रमुख (स्टार) प्रचारकासह (प्रचारकांसह)उमेदवाराला वाटून दिलेला जाहीर सभा, मेळावा, मिरवणूक इत्यादींचा खर्च (म्हणजे सर्वसाधारण पक्षाच्या प्रचार कार्याव्यतिरिक्त असलेला इतर).

| अनु-क्रमांक (१) | दिनांक व ठिकाण (२) | प्रमुख प्रचारकाचे (प्रचारकांचे) नाव व पक्षाचे नाव (३) | प्रमुख प्रचारक प्रचारकांसह उमेदवाराला वाटून दिलेला जाहीर सभा,मेळावा, मेळावा, मिरवणूक इत्यादींवरील (सर्वसाधारण पक्ष प्रचाराव्यतिरिक्त इतर ) खर्च रुपयांत | | | | शेरा कोणताही असल्यास (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उमेदवार/ प्रतिनिधीकडील रक्कम (४) | राजकीय पक्षाकडील रक्कम (५) | इतर व्यक्तीकडील रक्कम (६) | खर्चाचा स्त्रोत (७) | |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | |

## अनुसूची- ३

उमेदवारांच्या निवडणूक प्रचारकार्यासाठी हस्तपत्रके, पत्रिका, भित्तीपत्रके, जाहिरात फलक, निशाण्या, कट-आऊट्स, दरवाजे व कमानी, दृकश्राव्य कॅसेट्स, सीडीज, डिव्हीडी, ध्वनीक्षेपके ध्वनीवर्धक, डिजिटल टिव्ही / (दर्शक फलक) बोर्ड डिस्प्ले, ३ डी दर्शक इत्यादींसारख्या प्रचार सामग्रीवरील खर्चाचा (म्हणजे अनुसूची १ व २ मध्ये समाविष्ट केलेल्या खर्चाव्यतिरिक्त) तपशील :–

| अनु-क्रमांक (१) | खर्चाचे स्वरूप (२) | एकूण रक्कम (रुपयांत) (३) | खर्चाचा स्त्रोत | | | शेरे असल्यास (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उमेदवार/ प्रतिनिधीकडील रक्कम (४) | राजकीय पक्षाकडील रक्कम (५) | इतर व्यक्तीकडील रक्कम (६) | |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| **एकूण** | | | | | | |

## अनुसूची- ४

केबल जाळे, एकगठ्ठा (बल्क) संदेश किंवा आंतरजाल किंवा सामाजिक प्रसारमाध्यमे, बातम्या / दूरदर्शन / आकाशवाणी वाहिन्या इत्यादींसह मुद्रित व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे तसेच प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे किंवा उमेदवाराने स्वेच्छेने मान्य केल्याप्रमाणे पेड न्यूज यांसह केलेल्या प्रचारावरील खर्चाचा तपशील, खाजगी मालकीची वर्तमानपत्रे / दूरदर्शन / आकाशवाणी वाहिन्या इत्यादींमध्ये दिसणाऱ्या अशा प्रकारच्या सर्व बातम्यांवर करण्यात आलेला खर्चाच्या तपशीलामध्ये समावेश करण्यात यावा :–

| अनु-क्रमांक | प्रसारमाध्यमाचे स्वरूप (इलेक्ट्रॉनिक/ मुद्रित) आणि कालावधी | प्रसारमाध्यम पुरविणाऱ्यांचे नाव व पत्ता (मुद्रित इलेक्ट्रॉनिक/एस एमएस व्हाईस/ केबल टिव्ही/ सामाजिक प्रसार माध्यम इत्यादी) | ज्यांना कोणतेही वेतन/कमिशन देण्यात आले/ देय आहे असे अभिकरण, वार्ताहर, अंशकालिक पत्रकार, कंपनी किंवा कोणतीही व्यक्ती जर कोणी असल्यास, त्यांचे नाव व पत्ता | एकूण रक्कम रुपयात | खर्चाचा स्त्रोत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उमेदवाराकडील अभिकर्त्याकडील रक्कम | राजकीय पक्षाकडील रक्कम | इतर व्यक्तींकडील रक्कम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | |

## अनुसूची- ४ ए

केबल जाळे, एकगठ्ठा (बल्क) संदेश किंवा आंतरजाल किंवा सामाजिक प्रसारमाध्यमे, बातम्या / दूरदर्शन / आकाशवाणी वाहिन्या इत्यादींसह मुद्रित व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे तसेच प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने ठरविल्याप्रमाणे किंवा उमेदवाराने स्वेच्छेने मान्य केल्याप्रमाणे प्रदत्त बातम्या यांमार्फत केलेल्या प्रचारावरील खर्चाचा तपशील, उमेदवाराच्या किंवा उमेदवाराला प्रायोजित केलेल्या राजकीय पक्षाच्या मालकीची वर्तमानपत्रे / दूरदर्शन / आकाशवाणी वाहिन्या इत्यादींमध्ये दिसणाऱ्या अशा प्रकारच्या सर्व बातम्यांवर करण्यात आलेला खर्चाच्या तपशीलामध्ये समावेश करण्यात यावा :–

| अनु-क्रमांक | प्रसारमाध्यमाचे स्वरुप (इलेक्ट्रॉनिक/ मुद्रीत) आणि कालावधी | प्रसार माध्यम पुरविणाऱ्यांचे नाव व पत्ता (मुद्रित इलेक्ट्रॉनिक/एस एमएस व्हाईस/ केबल टिव्ही/ सामाजिक प्रसार माध्यम इत्यादी.) | ज्यांना कोणतेही वेतन/कमिशन देण्यात आले/ देय आहे असे अभिकरण, वार्ताहर, अंशकलिक पत्रकार, कंपनी किंवा कोणतीही व्यक्ती जर कोणी असल्यास, त्याचे नाव व पत्ता | एकूण रक्कम रुपयात | खर्चाचा स्त्रोत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उमेदवाराकडील अभिकर्त्याकडील रक्कम | राजकीय पक्षाकडील रक्कम | इतर व्यक्तींकडील रक्कम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | |

## अनुसूची-५

उमेदवाराच्या निवडणूक प्रचारकार्यासाठी लागणाऱ्या प्रचारकार्य वाहन / वाहनांवरील व वाहन / वाहनांवरील निवडणूक खर्चाचा तपशील :–

| अनु-क्रमांक | वाहनाचा नोंदणी क्रमांक व प्रकार | वाहनाचा भाडे खर्च | | | वाहन वापरल्याचे एकूण दिवस | खर्च केलेली/ प्राधिकृत केलेली एकूण रक्कम (रुपयात) | खर्चाचा स्त्रोत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वाहनाच्या भाड्याचा दर/ परीरक्षण | इंधनखर्च (भाड्यात अंतर्भूत नसल्यास) | चालकाचा खर्च (भाड्यात अंतर्भूत नसल्यास) | | | उमेदवाराकडील/ प्रतिनिधीकडील रक्कम | राजकीय पक्षाकडील रक्कम | इतर व्यक्तींकडील रक्कम |
| (१) | (२) | (३ए) | (३बी) | (३सी) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | |

## अनुसूची- ६

निवडणूक प्रचार कार्य करणारे कार्यकर्ते/प्रतिनिधीं आणि मतदार चिठ्ठ्या वाटण्यासाठीच्या मतदान केंद्रा बाहेरील उमेदवारांच्या बूथ (किऑक्स) यांच्यावरील खर्चाचा तपशील :–

| अनु-क्रमांक | दिनांक व स्थळ | निवडणूक प्रचार कार्यकर्ते यांवरील खर्च | | | अंतर्भूत प्राधिकृत एकूण रक्कम (रुपयात) | खर्चाचा स्त्रोत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खर्चाचे स्वरूप | दर | एकूण कार्यकर्ते/ प्रतिनिधींची संख्या, किऑक्सची संख्या | | उमेदवार/ प्रतिनिधीद्वारे केलेल्या खर्चाची रक्कम | मतदान पक्षाने केलेल्या खर्चाची रक्कम | इतरांनी केलेल्या खर्चाची रक्कम |
| (१) | (२) | (३अ) | (३ब) | (३क) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | | निवडणूक प्रचार कार्य करणारे कार्यकर्ते/प्रतिनिधी आणि मतदार चिठ्ठ्या वाटण्यासाठीच्या मतदान केंद्रा बाहेरील उमेदवारांच्या बूथ (किऑक्स) | | | | | | |
| २ | | प्रचार कार्यकर्त्यांचे मानधन/ वेतन इ. | | | | | | |
| ३ | | निवास | | | | | | |
| ४ | | इतर | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | |

## अनुसूची- ७

निवडणूक प्रचारकार्यासाठी स्वतःच्या निधीतून वापरलेल्या रकमेचा तपशील :–

| अ. क्र. | दिनांक | रोख | आदेशिती बँकेच्या तपशीलासह धनाकर्ष/ धनादेश क्रमांक | एकूण रक्कम (रुपयात) | शेरे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| **एकूण** | | | | | |

## अनुसूची- ८

पक्षाकडून (पक्षांकडून) रोखीने किंवा धनादेशाद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे किंवा खात्यात परस्पर हस्तांतर करून प्राप्त झालेल्या ठोक रकमेचा तपशील :–

| अ. क्र.<br>(१) | राजकीय पक्षाचे नाव<br>(२) | दिनांक<br>(३) | रोख रक्कम<br>(४) | आदेशिती बँकेच्या तपशीलासह धनाकर्ष/धनादेश यांचा क्रमांक इत्यादी<br>(५) | एकूण रक्कम (रुपयांमध्ये)<br>(६) | शेर, जर कोणतेही असल्यास<br>(७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| **एकूण** | | | | | | |

## अनुसूची- ९

कर्ज, भेट किंवा देणगी इत्यादी स्वरूपात कोणत्याही व्यक्तीकडून/कंपनीकडून / भागीदारी संस्थेकडून / संघ / व्यक्तीसंस्था इत्यादींकडून प्राप्त झालेल्या ठोक रकमेचा तपशील :-

| अ. क्र.<br>(१) | नाव व पत्ता<br>(२) | दिनांक<br>(३) | रोख रक्कम<br>(४) | आदेशिती बँकेच्या तपशीलासह धनाकर्ष/धनादेश यांचा क्रमांक इत्यादी<br>(५) | कर्ज, भेट किंवा देणगी इत्यादी कोणत्या स्वरुपात असल्यास ते नमूद करा.<br>(६) | एकूण रक्कम (रुपयांमध्ये)<br>(७) | शेर, जर कोणतेही असल्यास<br>(८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | |

## अनुसूची - १०

कोणतेही गुन्हेगारी पूर्वचरित्र असल्यास, ते वर्तमानपत्र व टीव्ही चॅनल मध्ये, प्रसिद्ध करण्यावरच्या खर्चाचे तपशील :-

| अ. क्र. | वर्तमानपत्र | | | टीव्ही/ दूरदर्शन | | प्रदानाचे माध्यम (ईलेक्ट्रॉनिक धनादेश/ धनाकर्ष/रोख) (कृपया विनिर्दिष्ट करा.) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्तमानपत्राचे नाव | प्रकाशित झाल्याचा दिनांक | करण्यात आला असेल असा खर्च | चॅनलचे नाव | समावेशन/ प्रक्षेपित झाल्याचा दिनांक व वेळ | करण्यात आला असेल आसा खर्च (रुपयांमध्ये) | –– |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## अनुसूची - ११

आभासी प्रचारावर झालेल्या निवडणूक खर्चाचा तपशील :-

| अ. क्र. | आभासी प्रचाराचे स्वरुप (समाज प्रसार माध्यम व्यासपीठ/ उपयोजके/ इतर साधने नमूद करा.) | आशय निर्मात्याचे (Content Creator) नाव | संदेश प्रसारीत करणाऱ्या माध्यमाचे नाव | एकूण रक्कम (रुपयांत) | खर्चाचे स्त्रोत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उमेदवाराकडील/ प्रतिनिधीकडील रक्कम | राजकीय पक्षाकडील रक्कम | इतर व्यक्तींकडील रक्कम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**टीप :**

१. अनुसूची ५ मध्ये, –

(क) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने ज्या वाहनांसाठी परवाना दिला आहे, अशा सर्व वाहनांची यादी असलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

(ख) जर वाहन, उमेदवार / त्याचे नातलग / प्रतिनिधी यांच्या मालकीचे असून ते निवडणुकीसाठी उपयोगात आणण्यात येत असेल तर, उमेदवाराच्या मालकीचे आणि त्यांच्या वापरात असलेले वाहन वगळता, अशा सर्व वाहनांचे काल्पनिक भाडे, अशा वाहनांच्या इंधनाचे काल्पनिक मूल्य, वाहनचालकाचे वेतन यांचा वरील तक्त्यामधील खर्चाच्या एकूण रकमेत समावेश करण्यात येईल.

२. सर्व अनुसूचींमध्ये, उमेदवाराच्या वतीने राजकीय पक्षाने किंवा कोणत्याही व्यक्तीने/कंपनीने / भागीदारी संस्थेने / संघांनी / व्यक्तीसंस्था इत्यादींनी कोणत्याही सेवा/सुविधांवर कोणताही खर्च केला असल्यास, अशा सेवा-सुविधांचे काल्पनिक बाजारमूल्य संबंधित रकान्यात नमूद करावे.

३. भाग तीन मध्ये, राजकीय पक्षाकडून किंवा इतरांकडून किंवा उमेदवारांच्या स्वतःच्या निधीमधून प्राप्त झालेल्या निधीची ठोक रक्कम दिनांकानुसार (निहाय) नमूद करावी. अशा सर्व प्रकरणांत अशी रक्कम प्रथम उमेदवाराच्या निवडणूक खर्चासाठी उघडण्यात आलेल्या बँकेच्या खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

४. संक्षिप्त विवरणपत्राच्या प्रत्येक पृष्ठावर उमेदवाराची सही असावी.

**जोडपत्र- एफ९** येथे दिलेले, आयोगाने आपल्या पत्र क्र. ७६/आभासी प्रचार/ ईईपीएस/ २०२२, दिनांक १५ जानेवारी,२०२२ द्वारे सुधारित केले आहे.

**जोडपत्र - ई-३**

**खर्चाच्या बाबींसाठी अतिरिक्त प्रतिनिधी नियुक्त करण्याकरिता प्रपत्र**

सार्वत्रिक / पोट निवडणूक, ......................... याकरिता ( वर्ष नमूद करावे)

१. राज्याचे नाव :

२. मतदारसंघाचे नाव :

३. उमेदवाराचे नाव व पत्ता :

४. पक्षाचे संलग्नीकरण, कोणतेही असल्यास :

५. अतिरिक्त प्रतिनिधीचे नाव :

६. अतिरिक्त प्रतिनिधीचा टपालाचा पूर्ण पत्ता :

७. संपर्कासाठी दूरध्वनी क्र. :

मी, .................................................................. ( उमेदवाराचे नाव नमूद करावे).

याद्वारे श्री. / श्रीमती / कुमारी ................................................ यांची वरील निवडणुकीकरिता माझा अतिरिक्त प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करीत आहे. मी याद्वारे घोषित करतो की, त्याला / तिला संसद सदस्य किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून निवड/ केली जाण्यास आणि असण्यास विधि अन्वये अपात्र ठरवण्यात आलेले नाही आणि तसेच, उक्त व्यक्ती ही, मंत्री/संसद सदस्य / विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य/महानगरपालिकेचा महापौर/नगरपालिका/जिल्हा परिषद यांचा अध्यक्ष नाही आणि जिला राज्याकडून सुरक्षा पुरविण्यात आली आहे, अशी व्यक्ती नाही.

स्थळ : उमेदवाराची सही.

दिनांक :

**जोडपत्र - ई-४**

## निवडणूक आयोगाचा आदेश क्र. ७६/९५ जे. एस. दोन, दिनांक १० एप्रिल १९९५

## आदेश

**विषय.–** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकडून निवडणूक खर्चाचे लेखे ज्या भाषेत नोंदवले जातील, ती भाषा.

१ लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७८ अन्वये निवडणूक लढवणारा उमेदवार निवडणूक खर्चाच्या लेख्याचे विवरण ज्या भाषेमध्ये दाखल करेल त्या भाषेविषयीची अडचण आयोगाकडून तपासण्यात येईल.

२. निवडणूक कायद्याखालील सर्व सांविधिक दस्तऐवज व नमुने हे मान्यताप्राप्त स्थानिक भाषांमध्ये छापले जातील व उपलब्ध केले जातील. उमेदवार व इतरांना स्थानिक भाषांमध्ये किरकोळ विनंती-अर्ज व प्रतिवेदने दाखल करण्याची मुभा असेल. हे दस्तऐवज इंग्रजी किंवा हिंदी मध्ये नाही, याकारणाने नाकारले जाणार नाही.

३. उमेदवार इंग्रजी व हिंदी या भाषांमधील चांगला जाणकार नसल्यामुळे त्याला वंचित राहिल्यासारखे वाटेल, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, उमेदवाराकडून दाखल केलेल्या निवडणूक खर्चाचे विवरण इंग्रजी किंवा हिंदीमध्ये नाही या कारणामुळे ते नाकारणे, हे अन्यायकारक ठरेल. निवडणूक खर्चाच्या विवरणांमध्ये चूक आढळल्यास, ती चूक इंग्रजी किंवा हिंदी भाषेच्या ज्ञानाच्या अभावामुळेच झाली असा त्याचा संबंध लावण्यात येईल.

४. सर्व सांविधिक दस्तऐवज व नमुने मान्यताप्राप्त स्थानिक भाषांमध्ये तयार केली जातील, या अनिवार्य तरतुदी शिवाय, आयोगाने, आपल्या विविध महत्त्वाच्या आदेश व निर्देशामध्ये, स्थानिक भाषांमधून अनुवाद करून घेण्याचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना निर्देश देईल. असे आदेश किंवा निदेश राज्यातील राजकीय पक्ष, उमेदवार व जनता यांमध्ये व्यापक प्रसिद्धी व प्रसाराकरिता असल्यास त्यांचे

५. म्हणून, लोकसभेसाठीच्या व विविध राज्यांच्या राज्य विधानसभांसाठीच्या व संघराज्यक्षेत्रासाठीच्या निवडणुकांमधील निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना न्याय्यता दर्शवून, त्यांना, मतदार याद्या इंग्रजी, हिंदी किंवा ज्या भाषेमध्ये छापलेल्या आहेत अशा स्थानिक भाषेमध्ये ( भाषांमध्ये) निवडणूक खर्चाचे विवरण दाखल करण्याची मुभा देण्यात येईल. मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांची जबाबदारी असेल की, मतदार याद्यांसाठी मान्यताप्राप्त प्रादेशिक भाषेमध्ये निवडणूक खर्चाच्या लेख्यांची विवरणे भरण्याशी संबंधित नियमांचे नमुने / नोंदवह्या / उतारे निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना मिळतात याची खात्री करून घेणे. त्यामुळे कोणताही उमेदवार निवडणूक खर्चाची विवरणे भरण्याशी संबंधित सांविधिक आवश्यकतांची माहिती अशी तक्रार करणार नाही व त्याला दररोजचे लेखे योग्य रीतीने व त्यानुसार ठेवणे शक्य होईल.

**जोडपत्र - ई-५**

**सर्व राज्यांच्या / संघ राज्यक्षेत्रांच्या सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३/१/२००४/ जेएस- दोन, दिनांक ३ एप्रिल २००४.**

**विषय - लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) च्या प्रयोजनार्थ राजकीय पक्षांच्या नेत्यांची नावे.**

मला, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ ( १ ) खालील स्पष्टीकरण - २ अन्वये असे सांगण्याचे निदेश आहेत की, राजकीय पक्षांना उक्त कलमान्वये स्पष्टीकरण १ च्या खंड (क) चा लाभ मिळण्यासाठी त्यांच्या नेत्यांची नावे राज्य / संघ राज्यक्षेत्र यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना कळविणे आवश्यक आहे.

यासंदर्भात, राजकीय पक्षांकडून मिळालेल्या प्रत्येक सूचींच्या प्रती राज्यातील सर्व निरीक्षक व सर्व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांना पुरविण्याची आपल्याला विनंती करण्यात येत आहे :—

**जोडपत्र - ई-६**

**सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना संबोधून लिहिलेले आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/ आयएनएसटी / २००८ - सीसी व बीई, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८.**

**विषय.-लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) अन्वये देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) चा लाभ घेऊन पक्षाच्या प्रचारकांद्वारे मार्ग परिवहनाचा वापराबाबत.**

(एक) आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००७ / खंड-चार - पीएलएन-तीन, दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ याद्वारे देण्यात आलेल्या सूचनांचा आणि पत्र क्रमांक ३/७/२००८ / जेएस तीन, दिनांक ७ ऑक्टोबर, २००८ याद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचा संदर्भ घेण्याचे आणि असे नमूद करण्याचे मला निर्देश आहेत की, आयोगाने ताफ्यातील वाहनांच्या वापरासाठीच्या आणि वाहनांवरील झेंडे व स्टीकर्स यांच्या वापरासाठीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आधीच फेरबदल केला आहे. परिणामतः, वर नमूद केलेल्या पूर्वीच्या सूचनेत फेरबदल झाला आहे आणि लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) अन्वये देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) चा लाभ घेतलेल्या नेत्यांनी / निवडणूक प्रचार मोहिमेच्या कालावधीत मार्गावरून मिरवणुकीने जाण्यास मुभा द्यावयाच्या वाहनांच्या संख्येच्या संबंधातील या सूचनेद्वारे उपरोक्त सूचना निष्प्रभावी ठरली आहे.

ताफ्यातील वाहनांच्या संख्येवरील निर्बंध मागे घेण्यात आले आहेत. तथापि,ताफ्यातील वाहने वर निर्दिष्ट केलेल्या नंतरच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे शर्तींना अनुसरून निश्चित केली पाहिजेत.

( दोन ) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) अन्वये देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) चा लाभ घेऊन राजकीय पक्षांना मार्ग परिवहनाच्या साधनांचा लाभ घ्यावयाचा असल्यास, त्याबाबतीत, संपूर्ण राज्यात निवडणूक मोहिमेकरिता कोणत्याही नेत्याद्वारे तेच वाहन वापरावयाचे आहे किंवा कसे, किंवा वेगवेगळ्या क्षेत्रात अशा पक्षनेत्यांव्दारे वेगवेगळ्या वाहनांचा वापर करावयाचा आहे किंवा कसे, हे लक्षात न घेता, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे केंद्रीभूत परवाना देण्यात येईल. सदर परवाना हा, संबंधित व्यक्तीच्या नावानुसार देण्यात येईल आणि अशी व्यक्ती, त्याच्याकडून / तिच्याकडून कोणत्याही क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या वाहनाच्या विंडस्क्रिनवर, असा परवाना प्रदर्शित करील. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून अशा रीतीने देण्यात आलेले परवाने हे, उमेदवारांकरिता जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून देण्यात येणाऱ्या परवान्यांपेक्षा सुस्पष्टपणे भिन्न रंगाचे असतील,

( तीन ) अशा रीतीने वरील बाब (दोन) मध्ये परवाना देण्यात आलेले वाहन जर बाब ( दोन ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नेत्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींच्या ताब्यात असेल तर, त्या बाबतीत सदर वाहनाचा ५० टक्केइतका खर्च त्या मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या संबंधित पक्षाच्या उमेदवाराच्या खर्चात नोंदविण्यात येईल.

(चार) राज्यभरात प्रचार मोहिमेकरिता राजकीय पक्षाद्वारे वापर केल्या जाणाऱ्या व्हिडीओ गाड्या इत्यादींच्या बाबतीत, प्रचार मोहिमेकरिता व्हिडीओ गाड्यांचा वापर करण्यासाठी कोणतीही परवानगी देण्यापूर्वी, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने अशी खात्री करून घ्यावी की, वाहनांचा असा वापर हा, मोटर वाहन अधिनियमानुसार आहे. यासंदर्भात, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या २००६ च्या रिट याचिका क्रमांक ३६४८ (एमबी), यावर दिनांक २३ जून २००६ आणि दिनांक १४ फेब्रुवारी २००७ रोजी देण्यात आलेल्या न्यायनिर्णयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे, त्याची एक प्रत यासोबत जोडण्यात आली आहे. संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी अशी खात्री करून घेतील की, ज्या ठिकाणी गाडीचा / वाहनाचा वापर करण्यात आला आहे, त्या क्षेत्रांतील / मतदारसंघातील पक्षाच्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या खर्चाप्रमाणात, अशा वाहनांवर झालेला खर्च हा योग्यरीत्या वितरित झाला आहे.

ही बाब सर्व राजकीय पक्षांच्या आणि निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांच्या त्वरित निदर्शनास आणण्यात यावी.

**जोडपत्र - ई-७**

फॅक्स / ई-मेल /स्पीड पोस्ट

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्र. ७६/ अनुदेश/२०१३/ ईईपीएस / खंड-चार दिनांक १५ ऑक्टोबर २०१३

प्रति,

सर्व राज्यांचे व संघराज्यक्षेत्रांचे
मुख्य निवडणूक अधिकारी,

**विषय.–** उमेदवाराच्या निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँकखाते उघडणे/याबाबीसंबंधात.

महोदय/ महोदया,

मला असे कळविण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, संसदेच्या आणि प्रत्येक राज्याच्या विधानमंडळाच्या सर्व निवडणुकांबाबतचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण हे संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये निवडणूक आयोगाकडे निहित करण्यात आले आहेत. असे अहवाल प्राप्त झाले आहेत की, उमेदवार निवडणूक प्रचारात जास्तीची रक्कम खर्च करतात ज्यामुळे प्रत्येक उमेदवाराला समान संधी या संकल्पनेचा भंग होतो आणि हे उमेदवार त्यांच्या निवडणूक खर्चाच्या, दैनंदिन लेख्यात अचूक खर्च दाखवत नाहीत , म्हणून, निवडणूक प्रक्रियेची शुचिता राखण्यासाठी, उमेदवारांना निवडणूक खर्चाचा अचूक लेखा ठेवणे सूकर व्हावे याकरिता आणि तसेच खर्चाच्या योग्य त्या संनियंत्रणासाठी, भारताचा निवडणूक आयोग, याद्वारे, पुढील सूचना जारी करीत आहे :–

(एक) निवडणूक खर्चाचे संनियंत्रण सुकर करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने केवळ निवडणूक खर्चाच्या प्रयोजनार्थ एक स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक आहे, केवळ निवडणुकीच्या प्रयोजनार्थ उमेदवार ज्या दिनांकास नामनिर्देशनपत्र दाखल करील, त्या दिनांकाआधी एक दिवस हे खाते उघडता येईल. हे खाते केव्हाही उघडले जाऊ शकते. मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला उमेदवाराकडून या बँकेचा खाते क्रमांक तो आपले नामनिर्देशनपत्र दाखल करील त्यावेळी लेखी कळविण्यात येईल. जेथे उमेदवाराने बँक खाते उघडले नसेल किंवा बँक खाते क्रमांक कळविला नसेल, तेथे निवडणूक निर्णय अधिकारी, आयोगाच्या सूचनांचे अनुपालन करावे म्हणून, प्रत्येक अशा उमेदवाराला नोटीस पाठवील.

(दोन) उमेदवाराला, निवडणूक खर्चाच्या प्रयोजनार्थ एकतर उमेदवाराच्या नावाने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीसमवेत संयुक्त नावाने खाते उघडता येईल. उक्त बँक खाते, उमेदवाराच्या कोणत्याही कुंटुंब सदस्याच्या किंवा कोणत्याही इतर व्यक्तीसोबत, जर तो / ती उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधी नसेल तर, संयुक्त नावाने उघडता येणार नाही.

(तीन) राज्यात कुठेही बँक खाते उघडता येईल. हे खाते सहकारी बँका किंवा टपाल कार्यालये यांसह कोणत्याही बँकेतदेखील उघडता येईल हे खाते, निवडणूक प्रयोजनासाठीचे स्वंतत्र बँक खाते म्हणून उघडावयाचे असल्यामुळे उमेदवाराचे विद्यमान बँक खाते या प्रयोजनार्थ वापरण्यात येऊ नये.

(चार) उमेदवाराकडून संपूर्ण निवडणूक खर्च केवळ याच बँक खात्यातून करण्यात येईल. निवडणुकीच्या कामासाठी उमेदवाराने करावयाचा हा संपूर्ण खर्च, उमेदवाराच्या स्वतःच्या निधीसह निधीकरणाचे त्याचे साधन कोणतेही असले तरी, त्याच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. उमेदवाराद्वारे या बँक खात्याच्या विवरणपत्राची स्वयंप्रमाणित प्रत, निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत दाखल करावयासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे निवडणूक खर्च्याच्या लेख्याच्या विवरणपत्रासोबत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

( पाच ) उमेदवार, त्याचा / तिचा निवडणूक खर्च निवडणुकीच्या प्रयोजनार्थ उघडल्यास आलेल्या बँक खात्यातून आदात्याच्या खात्यावर जमा करावयाच्या रेखित धनादेशाद्वारे उघडण्यात आलेल्या बँक खात्यातून आदात्याच्या खात्यात जमा करावयाच्या रेखित धनादेशाद्वारे किंवा धनाकर्ष किंवा आरटीजीएस / एनईएफटी द्वारे करील. तथापि, निवडणुकीच्या संपूर्ण प्रक्रियेत खर्चाच्या कोणत्याही बाबीसाठी कोणत्याही व्यक्तीस / संस्थेस उमेदवाराकडून (उमेदवारांकडून) चुकती करावयाची रक्कम रु. २०,००० पेक्षा अधिक नसेल तर, असा खर्च उक्त बँक खात्यामधून रोख रक्कम काढून करता येईल.

(सहा) उमेदवाराने ( उमेदवारांनी) निवडणूक खर्चासाठीची संपूर्ण रक्कम उक्त बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे आणि त्यांचा संपूर्ण निवडणूक खर्च केवळ उक्त खात्यामधूनच करावयाचा आहे.

(सात) उमेदवाराने /उमेदवारांनी, निवडणूक आयोगाविरूद्ध भाग्योदय जन परिषद आणि इतर (एसएलपी क. सी. सी.२०९०६/२०१२) य प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार, त्यांचे प्रतिनिधी आणि त्यांचे अनुयायी किंवा ते स्वतः निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदारसंघात रु.५०,००० हून अधिक रोख रक्कम बाळगत / जवळ ठेवत नाहीत, याचीदेखील खातरजमा करणे आवश्यक आहे.

(आठ) याद्वारे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जर कोणताही निवडणूक खर्च वरील परिच्छेद (पाच) मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकतर उक्त बँक खाते किंवा धनादेश किंवा धनाकर्ष किंवा आरटीजीएस / एनईएफटी या मार्गाचा अवलंब न करता, करण्यात आला तर, आयोगाने विहित केलेल्या पद्धतीनुसार उमेदवाराकडून लेखे ठेवण्यात आले नसल्याचे मानण्यात येईल.

(नऊ) जिल्हा निवडणूक अधिकारी त्यांच्या जिल्ह्यात स्थित असलेल्या सर्व बँका किंवा टपाल कार्यालय यांनी उमेदवारांना बँक खाते उघडताना तत्पर सेवा मिळणे सुलभ होण्याच्या प्रयोजनार्थ त्यांच्याकरिता खिडक्या उघडल्या आहेत याबाबत खात्री करून घेण्यासाठी संबंधित बँका टपाल कार्यालय यांना योग्य त्या सूचना येईल, निवडणूक कालावधीत प्राधान्याने उक्त लेख्यामधून रक्कम काढण्यात व जमा करण्यात व जमा करण्यास बँक अनुमती देईल.

**२. आपणांस अशी विनंती करण्यात मला आदेश आहे की, ही बाब सर्व उमेदवार, निवडणूक कर्मचारी आणि सर्व संबंधित यांच्या निदर्शनास आणून द्यावी.**

**टीप :** जोडपत्र ई.११ व ई-१२ पहावे.

आपला विश्वासू,

........................

सही

**एस. के. रुडोला,**

**सचिव.**

**जोडपत्र - ई-८**

**भारत निवडणूक आयोग**

क्रमांक ७६ / अनुदेश / ईईपीएस / २०१५ / खंड-दोन, दिनांक ९ जून २०१५.

प्रति,

सर्व राज्ये व संघराज्ये यांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय .—** प्रचाराच्या प्रयोजनासाठी निवडणुकीदरम्यान कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा राजकीय पक्ष यांच्याकडून उमेदवारांना मिळालेल्या देणग्या इत्यादीबाबत.

महोदय/ महोदया,

आयोगाचे अनुदेश क्रमांक ७६ / अनुदेश / २०१३ / ईईपीएस / खंड-चार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१३ अन्वये निर्देशानुसार, निवडणूक प्रचारासाठी प्रत्येक उमेदवाराने एक स्वतंत्र बँक खाते उघडले पाहिजे, त्यामार्फत प्रचाराचा सर्व खर्च करण्याचे विहित केले आहे. राजकीय पक्षांनी उमेदवारांना करावयाची सर्व प्रदाने रोखीने न करता त्या रकमा हस्तांतरित करून देण्याचेदेखील आयोगाने अनुदेश क्रमांक ७६ / पीपीईएमएस/ पारदर्शी / २०१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१४ काढले आहेत.

२. आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, राजकीय पक्षांव्यतिरिक्त उमेदवार निवडणुकीदरम्यान अन्य व्यक्ती किंवा संस्थांकडून निवडणूक प्रचाराच्या खर्चासाठी बऱ्याचदा मोठ्या प्रमाणात देणग्या किंवा कर्ज रोख रकमेच्या स्वरुपात स्वीकारतात, यात जेथवर राजकीय पक्ष संबंधित आहेत, तेथवर आयकर अधिनियम, १९६१ अन्वये आयकर सूट मिळण्यासाठी लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ च्या कलम २९ क च्या तरतुदींनुसार, संबंधित राजकीय पक्षांनी वीस हजारांपेक्षा अधिक स्वीकारलेल्या देणग्या निवडणूक आयोगासमोर जाहीर करणे आवश्यक आहे.

३. वरील अनुदेश लक्षात घेऊन आयोगाने पारदर्शकता आणि जबाबदारीच्या दृष्टीने याद्वारे असे निदेश दिले आहेत की, उमेदवारास (उमेदवारांना) निवडणूक प्रक्रियेदरम्यान एखादी व्यक्ती किंवा संस्थेकडून रु. २०,००० * पेक्षा अधिक रोख रकमेतील देणगी / कर्जदेखील स्वीकारता येणार नाही आणि उमेदवाराने रु. २०,००० * पेक्षा अधिक सर्व देणग्या / कर्जे थेट आदात्त्याच्या खात्यावर जमा धनादेश किंवा अधिकर्ष किंवा खात्यात हस्तांतरित करून स्वीकारता येतील आणि उमेदवाराने (उमेदवारांनी) अशा व्यक्तीचे/संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता ठेवण्याची व्यवस्था करावी आणि ते दैनंदिन लेख्यांच्या संबंधित स्तंभात आणि निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणपत्रात नमूद करण्यात येईल.

४. सर्व उमेदवार, राजकीय पक्ष, जिल्हा निवडणूक अधिकारी, खर्च निरीक्षक आणि संबंधित कर्मचारी यांच्या निदर्शनास हे आणून देण्याची आपणांस विनंती करण्यात येत आहे.

***टीप :** कृपया जोडपत्र ई.११ व ई-१२ पहावे.

आपला विश्वासू,

........................

स्वाक्षरी,
**एस. के. रुडोला,**
**सचिव.**

**जोडपत्र – ई-९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१.

क्र. ७६ / अनुदेश /एफयुएनव्ही/ईईएम/ ई ई पी एस / २०१८/ खंड-१ दिनांक १९ फेब्रुवारी २०१८.

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,
त्रिपुरा,
अगरताळा.

**विषय :–**त्रिपुरा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०१८ उमेदवाराच्या मृत्यूमुळे मतदान स्थगिती मुळे निवडणूक खर्च मर्यादेबाबत.

महोदय,

मला, आयोगाच्या वर उद्धृत केलेल्या विषयावरील दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या अधिसूचना क्र. ४९२/ टी पी एल ए/ २०१८ (प्रत सोबत जोडली आहे) याचा संदर्भ घेण्याचा आणि हे स्पष्ट करण्याचा निदेश देण्यात येत आहे की, लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ च्या अनुसार, आधीच निवडणूक लढवणारे उमेदवार आणि नव्याने नामनिर्देशित सी पी आय (एभ), च्या उमेदवारांनी १९- चारिलम आयोगाने दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ च्या उपरोक्त अधिसूचनेद्वारे अधिसूचित केकेल्या वेळापत्रकनुसार १९- चारिलम विधानसभा मतदार संघासाठी त्यांचा उमेदवारी अर्ज भरल्याच्या दिनांकापासून, १९ चरिलम विधानसभा मतदारसंघाचा निकाल जाहीर होण्याच्या दिनांकापर्यंत निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवावा लागेल. निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ९० अनुसार आधीपासूनच रिंगणात असलेल्या सर्व उमेदवारांसाठी आणि १९- चरिलम विधानसभा मतदारसंघासाठी नव्याने नामनिर्देशित सीपीआय (एम) उमेदवारासाठी निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा २० लाख रु. इतकी असेल.

२. १९- चरिलम विधानसभा मतदारसंघामध्ये यापूर्वीच निवडणूक लढवणारे उमेदवार, उमेदवारी अर्ज भरल्यापासून ज्याप्रकारे आपल्या खर्चाचा हिशेब ठेवत आहेत त्याचप्रमाणे १९- परिलम विधानसभा मतदारसंघाचा निकाल जाहीर होईपर्यंत खर्च हिशेब राखणे पुढेही सुरू ठेवतील.

३. तरी सीपीआय (एम) चे नवनिर्वाचित उमेदवार उमेदवारी अर्ज भरल्यापासून १९- चारिलम विधानसभा मतदारसंघाचा निकाल जाहीर होईपर्यंत निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवतील.

४. आपणास विनंती की ही बाब, आपण संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, इतर निवडणूक प्राधिकारी, खर्च निरीक्षक, उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निदर्शनास त्वरीत आणून द्यावी.

आपला विश्वासू,

........................

सही

**अविनाश कुमार,**
**सचिव.**

**जोडपत्र – ई-१०**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/ भानिआ / अनुदेश / एफयुएनसी / ईईएम / ईईपीएस/२०१८ / खंड - सात दिनांक २३ मार्च, २०१८

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,
त्रिपुरा,
अगरताळा.

**विषय.–** मृत्यू प्रकरणात उमेदवाराने स्वतः प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करणेबाबत स्पष्टीकरण-बाबत.

महोदय,

आपले, दिनांक १८ मार्च २०१८ चे पत्र क्र. एफ-१९ (६०) - मु.नि.अ / ईई एम / जेईएन / २०१८-१८ चा संदर्भ घेऊन, मला हे सांगण्याचे निदेश दिले आहेत की, एखाद्या उमेदवाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या खात्यांचे प्रकरण गृहीत धरण्याचा काही उपयोग नसल्याने, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७८, ची आवश्यकता खगेंद्र जामटिया, जे २०१८ च्या त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत २९-किर्शनापूर विधानसभा मतदारसंघातून (एसटी) निवडणूक लढवणारा उमेदवार होते. यांच्या प्रकरणात लागू होण्याचे बंद होईल.

आपला विश्वासू,

**राजन जैन,**
अवर सचिव.

**जोडपत्र - ई-११**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६ / अनुदेश / २०१८ / ईईपीएस, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८.

प्रति,

१. सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांचे मुख्य निवडणूक अधिकारी,

२. सर्व राजकीय पक्षांचे अध्यक्ष / प्रधान सचिव,

३. सर्व राजकीय पक्षांचे कोषाध्यक्ष.

**विषय.–** उमेदवार / राजकीय पक्षाद्वारे धनादेश, धनाकर्ष (डीडी), आरटीजीएस (RTGS) / एनईएफटी (NEFT ) किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादीद्वारे एका दिवसात रुपये १०,००० (दहा हजार) पेक्षा अधिक रोख व्यवहारामार्फत केलेला निवडणूक खर्च/देणगी च्या मर्यादेचे पुनरीक्षण-संबंधात.

महोदय/ महोदया,

मला, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये जारी केलेले आयोगाचे पत्र क्रमांक ७६ / अनुदेश / २०११ / ईईएम, दिनांक ७ एप्रिल २०११, पत्र क्रमांक ७६ / अनुदेश / २०१३ / ईईपीएस / खंड-चार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१३, पत्र क्रमांक ७६ / अनुदेश / ईईपीएस / २०१५ / खंड दोन, दिनांक ९ जून २०१५ आणि पत्र क्रमांक ७६ / पीपीईएमएस / पारदर्शकता / २०१३, दिनांक २९ ऑगस्ट / १९ नोव्हेंबर, २०१४ (प्रति सोबत जोडल्या आहेत) यांचा संदर्भ घेण्याचे निदेश आहेत, ज्यामध्ये रोख स्वरुपात खर्च करण्यासाठीची कमाल रक्कम रुपये २०,००० इतकी निर्देशित करण्यात आलेली आहे. आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम ४० क (३) मध्ये केलेल्या सुधारणेचा संदर्भ घेऊन, आयोगाद्वारे आयात त्याच्या खात्यावर जमा करावायाचा रेखित धनादेश (Crossed account payee cheque), बँक धनाकर्षाद्वारे किंवा (RTGS) / (NEFT) द्वारे निवडणूक खर्च करण्यासाठी रुपये २०,००० पर्यंतची १ एप्रिल २०१७ पासून मर्यादा सुधारित करण्यात आलेली आहे. यापुढे असे ठरविण्यात आले आहे की, वर नमूद केलेल्या पत्रांमधील सर्व परिस्थितींमध्ये असलेला उमेदवार (रां) किंवा राजकीय पक्षांद्वारे करण्यात आलेला रुपये १०,००० (दहा हजार) पेक्षा अधिक खर्च / त्यांना प्राप्त झालेली देणगी, हा व्यवहार आदीत्याच्या खात्यावर जमा करावयाचा रेखित धनादेश किंवा धनाकर्षयाद्वारे किंवा आरटीजीएस / निधी हस्तांतरण (NEFT) द्वारे किंवा निवडणूक प्रयोजनासाठी उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने उघडलेल्या बँक खात्याशी संलग्न कोणत्याही इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे करण्यात येईल.

२. त्यानुसार, आयोगाचे पत्र क्र. ७६ / अनुदेश / २०११ / ईईएम, दिनांक ७ एप्रिल २०११ च्या **परिच्छेद (१)** मध्ये, पत्र क्र. ७६ / अनुदेश / २०१३ / ईईपीएस / खंड-चार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१३ च्या **परिच्छेद (पाच)** मध्ये, पत्र क्रमांक ७६ / अनुदेश / ईईपीएस / २०१५ / खंड-दोन, दिनांक ९ जून २०१५ च्या **परिच्छेद (३)** मध्ये, पत्र क्रमांक ७६ / पीपीईएमएस / पारदर्शक / २०१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१४ च्या **परिच्छेद (चार)** मध्ये आणि पत्र क्रमांक ७६ / पीपीईएमएस / पारदर्शक / २०१३, दिनांक १९ नोव्हेंबर २०१४ च्या **परिच्छेद (५)** मध्ये संख्येत / शब्दांत नमूद केलेल्या रु २०,०००/- च्या ऐवजी **रुपये १०,००० (दहा हजार)** अक्षरी व आकड्यात घालण्यात येतील.

३. आयोगाचा अनुदेश, पत्र जारी झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल. जेथे आयोगाने निवडणुकीची घोषणा केली आहे, अशा प्रकरणांमध्ये,अनुदेश तात्काळ निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक, राजकीय पक्ष, उमेदवार आणि सर्व इतर संबंधितांच्या लक्षात आणून द्यावी.

४. यामुळे, मुख्य निवडणूक अधिकारी, राजस्थान पत्र क्रमांक पीए ३ ( १ ) ( २ ) आय / आयकर / निर्वा. / २०१८/८३४८, दिनांक २४ ऑक्टोबर २०१८ हे सुद्धा निकालात निघेल.

आपला विश्वासू,

**राजन जैन,**
अवर सचिव.

**टीप .–** कृपया जोडपत्र-डी ७, ई ७, ई ८, एफ ४ आणि एफ ६ पहावे.

**जोडपत्र - ई-१२**

**भारत निवडणूक आयोग**
निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६ / अनुदेश / २०१८ / ईईपीएस, दिनांक ३० नोव्हेंबर २०१८

प्रति,

सर्व राज्ये व संघराज्ये क्षेत्र
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय.–** उमेदवार / राजकीय पक्षाद्वारे धनादेश, डी.डी., आरटीजीएस (RTGS) / एनईएफटी (NEFT ) किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादीद्वारे एका दिवसात रु. १०,००० (दहा हजार) पेक्षा अधिक रोख व्यवहारामार्फत केलेल्या निवडणूक खर्च/देणगी च्या मर्यादेचे पुनरीक्षण-स्पष्टीकरणा-बाबत.

महोदया / महोदय,

निवडणूक प्रयोजनासाठी उमेदवाराने उघडलेल्या बँक खात्याशी, आदात्याच्या खात्यावर जमा करावयाचा रेखित धनादेश धनाकर्ष किंवा RTGS / NEFT द्वारे किंवा कोणत्याही इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे उमेदवारांनी / राजकीय पक्षांनी रुपये १०,००० (दहा हजार) पेक्षा अधिक केलेल्या निवडणूक खर्चाबाबत आयोगाच्या पत्र क्रमांक, दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ कडे आपले लक्ष वेधण्याचा मला निदेश दिला आहे. ही रक्कम उमेदवार / पक्ष एका दिवसात किंवा अधिक दिवसांत किंवा संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या काळात एका व्यक्तीकडून/संस्था किंवा अनेक व्यक्ती / संस्थाकडून खर्च केली जाऊ शकते किंवा कसे, याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

२. आयोगाच्या अगोदरच्या दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ च्या पत्रामध्ये अंशतः फेरबदल करून, याद्वारे असे नमूद करण्यात येत आहे की, निवडणुकीशी संबंधीतचा रु. १०,०००/- (दहा हजार) पेक्षा जास्त असणारा खर्च, आदाता खाते धनादेश किंवा बँकेच्या नावे काढण्यात आलेल्या धनाकर्षयांद्वारे किंवा आदाताच्या खाते बँक धनाकर्षाद्वारे किंवा आरटीजीएस/ एनईराफटी द्वारे किंवा उमेदवाराच्या बँक खात्याशी संलग्न असलेल्या कोणत्याही इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमाकडे करण्यात आलेला असल्याखेरीज, संपूर्ण निवडणूक कालावधी दरम्यान एक व्यक्ती / संस्थेशी निवडणुकीशी संबंधित करण्यात आलेला १०,०००/-(दहा हजार) पेक्षा जास्त असलेला, एक व्यवहार किंवा एका पेक्षा जास्त व्यवहारातील खर्च उमेदवार / राजकीय पक्षाद्वारे करण्यात येणार नाही,

३. पुढे असे ही नमूद करण्यात येत आह की देणगी / अंशदाने याबाबत एक संस्था/व्यक्तीकडून उमेदवाराला मिळालेल्या रोख स्वरुपातील देणग्या / अंशदानाची रक्कम रुपये १०,००० पेक्षा अधिक असता कामा नये. तथापि, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम २९क च्या विद्यमान तरतुदीनुसार राजकीय पक्षांना देणग्या / अंशदानाद्वारे मिळणाऱ्या रक्कमेवर नियंत्रण ठेवण्याचे पुढे चालू राहील.

४. तुम्हाला विनंती आहे की, वर नमूद केलेले स्पष्टीकरण निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक, राजकीय पक्ष, उमेदवार आणि सर्व इतर हितसंबंधित यांच्या लक्षात आणन द्यावी.

आपला विश्वासू,

**राजन जैन,**
अवर सचिव.

**प्रत.–** सर्व राजकीय पक्षाचे अध्यक्ष / प्रधान सचिव / कोषपाल.

**टीप.–**कृपया जोडपत्र-ई ११ पहावे.

# एफ.

# राजकीय पक्षांद्वारे निवडणूक खर्चाचे लेखे ठेवणे

राजकीय पक्ष, निवडणुकीत लोकांचे प्रतिनिधी असलेले उमेदवार उभे करत असल्याने, ते लोकशाही व्यवस्थेतील अतिशय महत्त्वाचे हितसंबंधी घटक आहेत. त्यांचे मध्यवर्ती स्थान लक्षात घेता, निवडणुकीच्या वेळी सर्वांना समान संधी राखण्याच्या तत्त्वाचे पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. पक्षाच्या प्रचारासाठी आणि उमेदवारांच्या पाठिंब्यासाठी त्यांनी केलेल्या खर्चाचा हिशेब पक्षीय पातळीवर योग्य पद्धतीने ठेवणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी देखील त्यांचे उमेदवार विहित खर्च मर्यादा पाळत असल्याची खात्री करणे आणि त्याबाबात निवडणूक प्राधिकरणांना विहित वेळेत आणि रीतीने कळविणे आवश्यक आहे.

**राजकीय पक्ष**

सर्वोच्च न्यायालयाने कंवरलाल गुप्ता वि. अमर नाथ चावला (ए.आय.आर. १९७५ एससी ३०८), दिनांक १०९४-१९७४ च्या आपल्या न्यायनिर्णयामध्ये असे मत मांडले आहे की, राजकीय पक्षाद्वारे करण्यात आलेल्या खर्च, पक्षाच्या सामान्य प्रचारावरील खर्चापेक्षा वेगळा असल्याने, प्रस्तुत उमेदवाराच्या निवडणुकीशी निगडीत असल्याचे ओळखता येत असल्याने तसेच उमेदवाराने विहितपणे केलेला असल्याने त्या उमेदवाराच्या खर्चात जोडला जाण्यास पात्र असेल. कोणत्याही निवडणुकीच्या संदर्भात राजकीय पक्षाने जाहिरातींवर केलेला खर्च खालीलप्रमाणे वर्गीकृत केला जाऊ शकतो :—

(एक) कोणत्याही विशिष्ट उमेदवाराचा किंवा उमेदवारांच्या कोणत्याही विशिष्ट वर्गाचा / गटाचा उल्लेख न करता, सर्वसामान्यपणे पक्षासाठी किंवा त्याच्या उमेदवारांसाठी पाठिंबा मिळविण्यासाठी सर्वसाधारण पक्ष प्रचारावर करण्यात आलेला खर्च.

(दोन) कोणत्याही विशिष्ट उमेदवारासाठी किंवा उमेदवारांच्या गटासाठी थेट पाठिंबा आणि / किंवा मत मागण्यासाठी, जाहिराती इत्यादींवर पक्षाने केलेला खर्च.

(तीन) कोणत्याही विशिष्ट उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या गटाच्या (विजयाच्या) संभाव्यतेचा प्रचार करण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चाशी संबंधित असू शकेल असा पक्षाने केलेला खर्च.

कंवरलाल गुप्ता यांच्या प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या प्रमाणाचा उपयोग करून, असे स्पष्ट करण्यात येत आहे की, राजकीय पक्षांच्या वरील श्रेणी (एक) नुसारच्या कोणत्याही जाहिरातींच्या बाबतीत, मग त्या मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा इतर कोणत्याही माध्यमातील असोत, ज्या कोणत्याही विशिष्ट उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या प्रस्तुत गटाच्या निवडणुकीशी संबंधित नाहीत, अशा जाहिराती वरील खर्च हा राजकीय पक्षाच्या सामान्य पक्ष प्रचारावरील खर्च मानला जाऊ शकतो. वरील (दोन) आणि (तीन) श्रेण्यांमध्ये येणाऱ्या विशिष्ट उमेदवार किंवा उमेदवारांच्या गटाशी संबंधित असलेल्या खर्चाच्या बाबतीत, हा खर्च संबंधित उमेदवाराने अधिकृत केलेला खर्च मानला जाईल आणि अशा खर्चाचा हिशेब उक्त उमेदवार किंवा उमेदवारांच्या गटाच्या निवडणूक खर्चात केला जाईल.

उमेदवाराचे नाव किंवा छायाचित्र नसलेली पक्षाची भित्तीपत्रके किंवा बॅनर्स किंवा जाहिराती यांवरील खर्च हा राजकीय पक्षाद्वारे करण्यात आलेला पक्षाचा खर्च म्हणून दाखवावयाचा आहे. भारताच्या निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची घोषणा झाल्यानंतरच्या व निवडणुकीच्या अधिसूचनेपूर्वीच्या कालावधीतील पक्षाचा खर्चदेखील राजकीय पक्षाकडून त्यांचा निवडणूक खर्च म्हणून दाखवावयाचा आहे. राजकीय पक्ष, त्यांचा निवडणूक खर्च, विधानसभेच्या मतदानापासून ७५ दिवसांच्या आत किंवा लोकसभेच्या मतदानापासून ९० दिवसांच्या आत स्कॅन केलेल्या सॉफ्ट कॉपीसह विहित नमुन्यात निवडणूक आयोगाकडे पाठवील.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम ७७ नुसार जो निवडणुकीसंबंधातील खर्च असल्याचे म्हणता येऊ शकेल फक्त असा मतदानानंतरचा व मतमोजणीच्या तारखेपूर्वीचा खर्च उमेदवाराकडून हिशेबात घेण्यात येईल. निवडणुकीनंतर, प्रमुख प्रचारक किंवा उमेदावाराचा (त्याच्या निवडणुकांशी संबंधित नसलेल्या) प्रवासावरील खर्च, कोणत्याही उमेदवाराच्या खर्चामध्ये टाकण्यात येणार नाही. जेथून उमेदवाराने निवडणूक लढवलेली आहे त्या मतदारसंघास मतमोजणीपूर्वी किंवा मतमोजणीच्या दिनांकास मतमोजणीची व्यवस्था पाहण्यासाठी प्रचारक / उमेदवाराने भेट दिल्यास अशाप्रकारे करण्यात आलेल्या प्रवासाचा खर्च उमेदवाराच्या हिशेबात टाकण्यात येईल. मतदारसंघाबाहेर केलेल्या प्रवासावरील खर्च त्याच्या हिशेबात टाकला जाणार नाही. जर राजकीय पक्ष, प्रमुख प्रचारकाचा त्याच्या मतदारसंघाबाहरील प्रवासावरील खर्च करीत असेल तर उक्त खर्च राजकीय पक्षाकडून निवडणूक पूर्ण झाल्यापासू ७५ दिवसांच्या आत, आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या हिशेबांमध्ये दर्शविण्यात येईल. (आयोगाच्या अनुदेश क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/ईईपीएस, दिनांक ९ फेब्रुवारी २०१२ जोडपत्र एफ २ ला जोडले आहे.)

आयोगाच्या पत्र क्र. ७६/इइ/२०१२-पीपीइएमएस, दिनांक २१ जानेवारी २०१३ (जोडपत्र-एफ-३) ला जोडलेल्या राजकीय पक्षाच्या अहवालाच्या नमुन्यात, आयोगाचे पत्र क्र. ७६/आभासी प्रचार/इइपीएस/२०२२, दिनांक १५ जानेवारी २०२२ **(जोडपत्र-एफ९)** द्वारे फेरबदल करण्यात आला आहे.

राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांनी निवडणूक अधिसूचना जारी झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकारी व भारत निवडणूक आयोग यांना त्यांच्या प्रमुख प्रचारकांची यादी पाठवावी. राजकीय पक्षांनी आपले निवडणूक खर्चाचे वितरण विधानसभा निवडणूका झाल्यापासून ७५ दिवसांच्या आत व लोकसभा निवडणूका झाल्यापासून ९० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चाच्या विवरणामध्ये उमेदवाराला वैयक्तिकरित्या दिलेली रोख रक्कम, प्रमुख प्रचारक आणि पक्षाचे इतर पदाधिकारी यांच्या प्रवासावरील खर्च, निशाण, भित्तीपत्रके, मंच, कट-आऊट, कमानी, जाहिरात फलक, सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी आणि उमेदवाराच्या वैयक्तिक प्रचारासाठी मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही माध्यमांमध्ये देण्यात आलेल्या जाहिराती त्यांवरील खर्चाचा तपशील यांचा समावेश असावा. या विवरणात वापरलेल्या विमानांची संख्या, निवडणूक प्रचारासाठी राज्यामध्ये निवडणुकीदरम्यान मारलेल्या फेऱ्या, विमान भाड्याने/उपलब्ध करून देणाऱ्या कंपनीचे नाव, विमानाच्या उड्डाणाचा कालावधी व प्रमाणकांच्या प्रतीसह कंपनीकडून भाड्याने घेतलेल्या विमानाच्या भाड्याची रक्कम दिलेली / देय असलेल्या रकमेची माहिती असलेल्या एकत्रित विवरणाचा सुद्धा समावेश आहे. आयोगाचे पत्र क्र. ७६/इइ/२०१२/पीपीईएमएस, दिनांक २१ जानेवारी २०१३ जोडपत्र-एफ-३ मध्ये हे अनुदेश दिले आहेत. राजकीय पक्षांनी त्यांच्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पूर्ववृत्ताच्या प्रकाशनाचा खर्च **(जोडपत्र-एफ८)** दाखवणे, आभासी प्रचारासाठीचा खर्च **(जोडपत्र-एफ९)** दाखवणे गरजेचे आहे.

राजकीय पक्षांना देखील वरीलप्रमाणे पक्षांद्वारे (विधानसभा / लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक संपल्यानंतर अनुक्रमे ७५ दिवसांच्या / ९० दिवसांच्या आत) दाखल करावयाच्या निवडणूक खर्चाच्या अंतिम विवरणाच्या जोडीला, उमेदवाराला पक्षाने केलेल्या व एकरकमी प्रदानांच्या संदर्भात, (राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या बाबतीत) भारत निवडणूक आयोगासमोर किंवा (मान्यता न मिळालेल्या पक्षांच्या बाबतीत जेथे पक्षाचे मुख्यालय आहे अश्या) राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यासमोर, विधानसभा / लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत विहित नमुन्यात आंशिक विवरण सादर करावे लागेल (परिशिष्ट-एफ ७).

मतदान मुक्त व निःपक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी रोखीचे व्यवहार टाळावेत. सर्व पक्षाच्या अधिकाऱ्यांना असा सल्ला द्यावा की, निवडणूक मोहिमे दरम्यान मतदारसंघात वावरताना जवळ मोठी रोख रक्कम बाळगू नये. पक्षांनी निवडणूक खर्चात संयम बाळगणे आणि त्यानुसार उमेदवारांना सल्ला देणे आवश्यक आहे. (जोडपत्र - एफ-१, पत्र क्र. ७६/अनुदेश/२०१०, दिनांक २० ऑक्टोबर २०१०).

पक्षांनी भारत निवडणूक आयोगासमोर संबद्ध नमुन्यात व दिलेल्या वेळेत मिळालेल्या देणग्यांची यादी सादर करावी. पक्षांनी त्यांच्या खात्यांचे लेखापरीक्षण देखील केले पाहिजे आणि पावत्या व खर्चाचा तपशील नमूद करून विहित वेळेत आपला आयकर परतावा (रिटर्न) भरला पाहिजे. आयोगाने, आपल्या पत्र क्र. ७६/पीपीइएमएस/पारदर्शकता/२०१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१४ **(जोडपत्र-एफ४)** द्वारे पक्ष निधी आणि निवडणूक खर्चातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत आणि आपल्या पत्र क्र. ७६/पीपीइएमएस/पारदर्शकता/२०१३, दिनांक १९ नोव्हेंबर २०१४ **(जोडपत्र-एफ ६)** द्वारे याबाबतचे पुढील स्पष्टीकरण दिले आहे. राजकीय पक्षांनी खर्च करताना आणि त्याचा हिशेब ठेवताना त्याचे पालन करणे आवश्यक आहे. मार्गदर्शक तत्त्वानुसार, खालील तत्त्वांचे पालन केले गेले पाहिजेः

(अ) राजकीय पक्षाचा कोषाध्यक्ष किंवा पक्षाने अधिकृत केलेल्या अशा व्यक्तीने, सर्व राज्य आणि खालच्या स्तरावरील खात्यांची देखभाल सुनिश्चित करण्याव्यतिरिक्त, उपरोक्त तरतुदीनुसार पक्षाच्या मुख्यालयात केंद्रीय एकत्रित खाती राखणे.

(ब) त्याने / तिने राखलेली खाती, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) द्वारे जारी केलेल्या राजकीय पक्षांच्या लेखा आणि लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत असणे, आणि

(क) वार्षिक खात्यांचे लेखापरीक्षण आणि प्रामाणिकरण पात्र कार्यरत लेखापरीक्षकाद्वारे केले जाणे आवश्यक आहे.

पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या क्षेत्रातील राजकीय पक्षांकडून असलेल्या अपेक्षा याबाबत भारत निवडणूक आयोगाने अनुदेश / मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत आणि त्यापैकी काही प्रमुख क्षेत्रे खालीलप्रमाणे आहेत ः—

एकसूत्रता आणण्यासाठी, सर्व राजकीय पक्ष, प्रत्येक वर्षीच्या ३१ ऑक्टोबरपूर्वी, आयोगाला किंवा जोडपत्र-एफ४ च्या परिच्छेद (सहा) मध्ये नमूद केलेल्या अशा प्राधिकाऱ्याकडे लेखापरीक्षकांच्या अहवालासह प्रत्येक आर्थिक वर्षासाठीच्या लेखापरीक्षित वार्षिक लेखांची एक प्रत सादर करतील. मान्यताप्राप्त राजकीय पक्ष भारत निवडणूक आयोगाकडे सर्व अहवाल मुख्यतः नमुना २४अ मधील अंशदान (वर्गणी) अहवाल, सनदी लेखापरीक्षकाद्वारे प्रमाणित केलेले लेखापरीक्षित वार्षिक लेखा, आणि निवडणूक खर्चाचे विवरण, सादर करतील, मान्यता नसलेले पक्ष वरील सर्व अहवाल विहित वेळेत संबंधित राज्यांच्या (म्हणजेच आयोगाच्या पत्र क्रमांक ७६/पीपीइएमएस/पारदर्शकता/२०१४, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ **(जोडपत्र-एफ ५)** च्या अनुषंगाने पक्षाचे मुख्यालय ज्या राज्यात असेल त्या राज्याच्या) मुख्य निवडणूक अदिकारी (सीईओ) यांच्याकडे सादर करेल.

राजकीय पक्ष, त्यांना देणगी देणाऱ्या अशा सर्व व्यक्ती, कंपन्या किंवा संस्थांनची नावे आणि पत्ता जतन करेल, केवळ सार्वजनिक रॅलीदरम्यान जनतेने दिलेल्या तुटपंज्या रकमा स्वीकारेल. जर एखादा पक्ष कोणताही खर्च करत असेल, तर पक्षाने हे सुनिश्चित केले पाहिजे की,

(अ) ज्या गावात किंवा शहरात बँकेद्वारे सेवा दिली जात नाही अशा ठिकाणी प्रदान केले गेले असेल; किंवा

(ब) पगार, पेन्शन किंवा पक्ष कार्यकर्त्यांच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी कोणत्याही कर्मचारी किंवा पक्षाच्या कार्यकर्त्याला प्रदान केले गेले असेल; किंवा

(क) कोणत्याही कायद्यानुसार रोख प्रदान करणे आवश्यक असेल, या कारणांव्यतिरिक्त, एका दिवसात कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी किंवा संस्था यांना १०,०००/- पेक्षा जास्त रक्कम रोख स्वरूपात दिली जाणार नाही; **(जोडपत्र इ११ आणि इ१२)**

जर पक्षाला त्याच्या उमेदवारांना त्यांच्या निवडणूक खर्चासाठी कोणतेही आर्थिक सहाय्य देण्याची इच्छा असल्यास, अशी मदत विहित मर्यादेपेक्षा जास्त नसावी. पक्षाकडून या संदर्भात करण्यात आलेले कोणतेही प्रदान, रोख स्वरूपात न करता, केवळ आदात्याच्या खात्यावर जमा करावयाच्या रेखीत धनादेशाद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे किंवा बँक खाते हस्तांतरणाद्वारे केले जाईल. मान्यताप्राप्त राजकीय पक्ष भारत निवडणूक आयोगाकडे सर्व अहवाल मुख्यतः नमुना २४अ मधील अंशदान (वर्गणी) अहवाल, **जोडपत्र-एफ ४ च्या** परिच्छेद ३(एक) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, सनदी लेखापरीक्षकाद्वारे प्रमाणित केलेला लेखापरीक्षित वार्षिक लेखा, आणि निवडणूक खर्चाचे विवरण, सादर करतील. मान्यता नसलेले पक्ष वरील सर्व अहवाल विहित वेळेत व पद्धतीने संबंधित राज्यांच्या (म्हणजेच पक्षाचे मुख्यालय ज्या राज्यात असेल त्या राज्याच्या) मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ) याच्याकडे सादर करेल.

राजकीय पक्षांकडून जाहीर सभा / रॅलींमध्ये हुंडी / वर्गणी गोळा करून (banket collection) निधी उभारण्याच्या प्रथेची आयोगाला जाणीव आहे, जेथे देणगीदारांचे नाव आणि पत्ता नोंदवणे शक्य नसते. म्हणून, आयोगाने अशा संकलनांना वरील निर्देशाच्या कक्षेतून वगळले आहे. सार्वजनिक सभेत / रॅलीत हुंडी / वर्गणी गोळा करून (banket collection) जमा केलेल्या देणग्यांव्यतिरिक्त इतर सर्व देणग्याच्या बाबतीत, ज्याप्रमाणे इतर सर्व सामाजिक / नागरी संस्था / संघटनांद्वारे केले जाते, त्याप्रमाणे राजकीय पक्षांनी प्रत्येक दानकर्त्याचे नाव व पत्ता नोंदवावा. राजकीय पक्षांनी, त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी आवश्यक असलेली रक्कम वगळता, त्यांना मिळालेली रोख रक्कम १० कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करणे आवश्यक आहे. हे स्पष्ट करण्यात आले आहे की, नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या दैनंदिन खर्चाची पूर्तता करण्याच्या हेतूने त्याच्या हातात असलेली एकूण रोख रक्कम, सामान्यतः मागील आर्थिक वर्षातील पक्षाच्या सरासरी मासिक रोख खर्चापेक्षा जास्त नसावी.

मुक्त आणि निःपक्ष निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने, सर्व पक्षांनी आयोगाने जारी केलेल्या पारदर्शकते बाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे आणि आयोगाच्या कायदेशीर निर्देशांचे उल्लंघन केल्यास, निवडणूक चिन्हे (आरक्षण आणि वाटप) आदेश, १९६८ च्या परिच्छेद १६अ अंतर्गत अनुस्यूत केल्यानुसार कारवाई केली जाऊ शकते.

राजकीय पक्षांना त्यांच्या निवडणूक खर्चाशी संबंधित, योगदान अहवाल आणि त्यांच्या लेखापरीक्षित खात्यांबाबत पुढील विवरणे सादर करावी लागतीलः

(एक) अंशदान अहवाल - दरवर्षी ३० सप्टेंबरपर्यंत किंवा आयकर परतावा भरण्यासाठी CBDT ने वाढवून दिली असेल अशी तारीख

(दोन) वार्षिक लेखापरीक्षित खाते - दरवर्षी ३१ ऑक्टोबरपर्यंत

(तीन) निवडणूक खर्चाचे विवरण—विधानसभा निवडणूक पूर्ण झाल्यानंतर ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणूक पूर्ण झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत.

(चार) राजकीय पक्षांनी उमेदवारांना वितरित केलेल्या रकमेचा तपशील देणारे अंशीत निवडणूक खर्चाचे विवरण निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दाखल केले जावे.

मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना भारत निवडणूक आयोगाकडे उपरोक्त विवरणे दाखल करावी लागतील, तर गैरमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना, ती (विवरणे) संबंधित राज्ये / संबंधित राज्ये/संघराज्ये क्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे विहित वेळेत आणि रीतीने दाखल करावी लागतील.

राजकीय पक्षांचे वार्षिक लेखा परीक्षित झालेली खाती, सादर करण्याचा नियत दिनांक हा आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत, राजकीय पक्षांच्या आयकर विवरण (आयटीआर) दाखल करण्याच्या नियत दिनांकाबरोबर जोडण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यानुसार, आयकर अधिनियमाच्या कलम १३९ अनुसार, राजकीय पक्षांनी आयकर विवरण (आयटीआर) भरण्याच्या शेवटच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, सर्व राजकीय पक्षांनी त्यांचे वार्षिक लेखा परिक्षण केलेली खाती सादर करावीत. हे वित्तीय वर्ष २०२०-२१ व त्यापासू न पुढील वार्षिक लेखा परिक्षित खाती सादर करण्यासाठी लागू होईल. (जोडपत्र-एफ १०)

**जोडपत्र-एफ १**

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

क्रमांक ७६/ सूचना / २०१०/ दिनांक २० ऑक्टोबर २०१०

प्रति,

मा. अध्यक्ष / प्रमुख कार्यवाह,

सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्याचे राजकीय पक्ष

**विषय : निवडणूक कालावधीत पैशाच्या वापरावर पायबंद घालण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत केलेल्या उपाययोजनांबाबत.**

महोदय / महोदया,

मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रीयेच्या कालावधी दरम्यान चोरट्या रीतीने पैसा, मद्य व अनेक उपयुक्त वस्तूंचा वापर केल्याच्या घटना आयोगाला कळविण्यात व प्रसार माध्यमांमध्ये सांगण्यात आले आहे. मतदारांना संतुष्ट करण्यासाठी पैसा, मद्य किंवा इतर वस्तूचे असे वितरण करणे हा लाचलुचपतीचा प्रकार असून भारतीय दंड संहितेअन्वये शिक्षा प्राप्त अपराध आहे. ही बाब लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ अन्वये भ्रष्ट आचरण देखील आहे.

२. ४ ऑक्टोबर २०१० रोजी सर्व राजकीय पक्षांसोबत झालेल्या आयोगाच्या सभेमध्ये निवडणुकीच्या कालावधीत पैशांच्या बळाच्या वापराबद्दल चर्चा झाली आणि बिहार विधानसभेच्या सार्वजनिक निवडणुकीच्या कालावधीत निवडणूक खर्चाचे संनियंत्रणासाठीच्या आयोगाच्या सूचनांचे सर्व राजकीय पक्षांकडून स्वागत करण्यात आले होते. (आयोगाच्या सूचनांच्या प्रती *www.eci.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

३. अशा अपराधाच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी आयोगाने, निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीदरम्यान मतदारसंघात पैसा, मद्य व इतर वस्तुंच्या वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी मि उक्त वस्तू जप्त करण्यासाठी भरारी पथक तयार करण्यासाठी कायदा अंमलबजावणी अभिकरण (पोलीस) यांना सूचना निर्गमित केल्या आहेत. विमानतळं, महत्त्वाची रेल्वे स्थानकं, हॉटेल, शेतघर, वित्तीय दलाल व हवाला एजंट यांद्वारे होणाऱ्या पैशाच्या व्यवहारावर लक्ष ठेवण्यासाठी आयकर विभागाच्या अन्वेषण संचालनालयाच्या सेवेचे अभिग्रहण करण्यात आलेले आहे. आयोगाने उमेदवारांना त्यांच्या निवडणुकीचा खर्च करण्यासाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्याचा आणि त्या खात्यामार्फत निवडणूकीचा सर्व खर्च करण्याच्या सूचना देखील दिलेल्या आहेत.

४. उमेदवारांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी उमेदवारांना त्यांच्या पक्षामार्पत देण्यात येणाऱ्या कोणत्याही निधीची उमेदवाराच्या निवडणुकीच्या खर्चाच्या दैनंदिन खात्यामध्ये नोंद असणे आवश्यक आहे आणि राजकीय पक्षांनीदेखील व्यवहाराचा हिशेब ठेवणे आणि निवडणुका झाल्यानंतर तो (हिशेब) आयोगासमोर सादर करणेदेखील आवश्यक आहे.

५. निवडणुकांचे पावित्र्य राखण्यासाठी व विशेषतः निवडणुकांच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी, राजकीय पक्षांनी रोख व्यवहार करणे टाळावे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी, प्रतिनिधींनी व उमेदवारांनी निवडणुकीची प्रक्रिया चालू असण्याच्या कालावधीत मोठी रक्कम बाळगता कामा नये याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहे.

६. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

सही/-

(**अनुज जयपुरीयर**),

सचिव.

प्रत रवाना :

१. आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व संबंधितांना ही सूचना लक्षात आणून देण्याच्या विनंतीसह सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना.

२. अध्यक्ष, प्रत्यक्ष कर केंद्रीय मंडळ उत्तर विभाग, नवी दिल्ली ११० ००१.

३. आवश्यक कारवाईसाठी, आयकर महासंचालक (आय.एन.व्ही.), बी.सी. पटेल मार्ग, पटना ८०० ००१.

**जोडपत्र-एफ २**

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

क्रमांक ७६/ सूचना / २०१२/ईईपीएस, दिनांक ९ फेब्रुवारी २०१२

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,

१. पंजाब,

२. उत्तर प्रदेश,

३. उत्तराखंड,

४. मणिपूर,

५. गोवा.

**विषय .— पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मणिपूर आणि गोवा यांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका, २०१२—मतदानाच्या दिनांकानंतर निवडणूक लढविणारे उमेदवार आणि वलयांकित प्रचारक यांच्या कडून विमानाने / हेलिकॉप्टरने झालेल्या प्रवासावरील अतिरिक्त खर्च—या संबंधात.**

महोदय / महोदया,

प्रसार माध्यमाद्वारे अशा घटनांबाबत माहिती देण्यात आली आहे की, वलयांकित प्रचारकासह निवडणूक लढविणारे अनेक उमेदवार, मतदानाच्या दिनांकानंतर विमाने / हेलिकॉप्टर्स यांचा वापर करतात आणि अशा प्रवासावरील खर्चाच्या संबंधात निरनिराळे राजकीय पक्षांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. सदर विषयाबाबत पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहेः—

(एक) जो निवडणुकीशी संबंधित असल्याचे मानण्यात येईल असा मतदान झाल्यानंतर आणि मतमोजणीच्या दिनांकापूर्वी झालेला खर्चच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अनुसार उमेदवारांनी केल्याचा म्हणून हिशेबात घेण्यात येईल.

(दोन) म्हणून, मतदान झाल्यानंतर, वलयांकित प्रचारकांनी किंवा एखादा उमेदवार (त्याच्या निवडणुकीशी संबंधित नसलेला) यांच्या प्रवासावरील खर्चाची कोणत्याही उमेदवाराच्या हिशेबात जोडला जाणार नाही. जर सदर वलयांकित प्रचारकर्ता/उमेदवार याने, जेथे त्याने निवडणूक लढविलेली आहे, मतमोजणीच्या दिनांकापूर्वि किंवा मतमोजमीच्या दिनांकास, मतमोजणीच्या व्यवस्थेचे अवेक्षण करण्याकरिता त्या मतदारसंघाला भेट दिली तर, मतदारसंघात असा प्रवास केल्याने झालेला खर्च त्याच्या खात्यात जोडला येईल. मतदारसंघाच्या बाहेरील प्रवास खर्च त्याच्या खात्यात जोडला जाणार नाही.

(तीन) जर राजकीय पक्ष, एखाद्या वलयांकित प्रचारकाचा त्याच्या मतदारसंघाच्या बाहेरील प्रवासाचा खर्च सोसत असेल तर, उक्त खर्च हा, निवडणूक पूर्ण झाल्यावर ७५ दिवसांच्या आत राजकीय पक्षाद्वारे आयोगाला सादर केलेल्या हिशेबात दर्शविण्यात येईल.

२. या संबंधात आपणांस याद्वारे, सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच राज्यातील सर्व राजकीय पक्षांना कळवावे, अशी विनंती करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

.......................

सही

**(अविनाश कुमार)**

अवर सचिव.

प्रत सादर : सर्व राजकीय पक्षांना माहितीकरिता प्रत सादर.

**जोडपत्र-एफ ३**

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

७६/इएफ/२०१२-पीपीइएमएस दिनांक २१ जानेवारी २०१३

प्रति,

अध्यक्ष/महासचिव

(सर्व राजकीय पक्ष)

**विषय.— विधानसभा निवडणुकांनंतर ७५ दिवसांनी / लोकसभा निवडणुकांनंतर ९० दिवसांनी, राजकीय पक्षांनी सादर करावयाचे "निवडणूक खर्च विवरण" सादर करण्यासाठीच्या नमुन्यात फेरबदल करण्यासंबंधात.**

महोदय, / महोदया

१. मला आपणांस असे कळविण्याचा निदेश आहे की, कॉमन कॉज विरुद्ध भारतीय संघराज्य आणि इतर (एआयआर १९९६ सर्वोच्च न्यायालय ३०८१) या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या निदेशांनुसार, निवडणूक आयोगाने आपल्या दिनांक २७ डिसेंबर २००१, दिनांक २२ मार्च २००४ व दिनांक १३ जानेवारी २००९ च्या आपल्या पत्रांद्वारे एक प्रपत्र विहित केले आहे, ज्यात राजकीय पक्षांनी, आयोगाच्या पडताळणीसाठी, प्रत्येक लोकसभा / विधानसभा निवडणुकीशी संबंधित त्यांच्या निवडणूक खर्चाचे वितरण सादर करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी सादर केलेले विवरण आयोगाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली आहेत.

२. मला आपणांस आणखी असे कळविण्याचा निदेश आहे की, आयोगाद्वारे संबंधित माहितीचे अधिक सुसूत्रपणे व पद्धतशीरपणे संस्करण करण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यातआले आहे. त्यामुळे, आयोगाने यासोबत जोडलेल्या उक्त प्रपत्रामध्ये फेरबदल केलेले असून तो आयोगाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. उक्त सुधारित प्रपत्रात पक्षाच्या मध्यवर्ती मुख्यालयातील खर्चाशी संबंधित माहिती भाग-अ मध्ये पक्षाचे राज्य युनिट (टे) स्तरावरील किंवा राज्यस्तरीय पक्षाद्वारे (जिल्हा / स्थानिक युनिटांसह) मिळालेली माहिती भाग "ब" मध्ये माहितीचा सारसंग्रह भाग 'क' मध्ये, आणि पडताळणी भाग 'ड' मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे. प्रपत्रानुसार अनुसूची मध्ये खर्चाचे तपळील द्यावयाचे आहेत. सुधारित प्रपत्रामध्ये अधिक सुस्पष्टतेसाठी व उत्तरदायीत्वासाठी पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी, राजकीय पक्षाला आलेला खर्च व उमेदवाराशी संबंधित खर्च देखील वेगवेगळा दर्शविला आहे.

३. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७८ अंतर्गत राजकीय पक्षांनी किंवा उमेदवारांनी सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या विवरणामध्ये, उक्त अधिनियमाच्या कलम ७७ (१) च्या स्पष्टीकरण (१) च्या अर्थांतर्गत, त्यांनी दावा केलेल्या सवलतीची तुलना, राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी स्थापित केलेल्या, त्यांच्याद्वारे करण्यात आलेल्या किंवा अधिकृत करण्यात आलेल्या खर्चाशी करून पडताळणी करणे शक्य होण्यासाठी आवश्यक माहिती मागविण्यात आली आहे.

४. सर्व राजकीय पक्ष १ जानेवारी २०१३ नंतर घेण्यात येणाऱ्या सर्व निवडणुकांसाठी या सुधारित प्रपत्रामध्ये निवडणूक खर्चाचे विवरण मूळ प्रतीत व सीडीमध्ये सादर करतील याबाबतची माहिती देण्याचे निदेशही मला देण्यात आले आहे.

५. हे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे आणि हे पत्र मिळाल्याची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

सही

**(वारींदर कुमार)**

सचिव.

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत अग्रेषित : राज्यातील सर्व राजकीय पक्ष, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे.

**लोकसभा /विधानसभा निवडणुकांमध्ये राजकीय पक्षाने केलेल्या निवडणूक खर्चाचे विवरण निवडणूक जाहीर करण्यात आल्याच्या दिनांकापासून निवडणूक पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत)**

१. राजकीय पक्षाचे नाव : ..................................................

२. लोकसभा / राज्य विधानसभेची निवडणूक : ...........................................

(विधानसभा निवडणूक असल्यास राज्याचं नाव नमूद करावे आणि संबंधित नसेल ते खोडावे)

३. निवडणूक जाहीर झाल्याचा दिनांक : .........................................................

४. निवडणूक पूर्ण झाल्याचा दिनांक : ............................................................

**भाग – क**

५. पक्षाच्या मुख्यालयात करण्यात आलेल्या / प्राधिकृत केलेल्या निवडणूक खर्चाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| ५.१ | क. पक्षाच्या मुख्यालयातील पक्षाच्या निधीची प्रारंभिक शिल्लक (निवडणूक जाहीर झाल्याचा दिनांक) | रक्कम |
| | वर्णन | रक्कम |
| | (एक) हाती असलेली रोख रक्कम | |
| | (दोन) बँकेतील शिल्लक रक्कम (कृपया बँकेचे व शाखेचे नाव नमूद करावे) | |
| | एकूण . . | |
| ५.२ | क. निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणूक पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत सर्व स्रोतांकडून पक्षाच्या मुख्यालयात जमा झालेल्या एकूण रकमा. | रक्कम |
| | वर्णन | |
| | (एक) रोख रक्कम | |
| | (दोन) धनादेश किंवा धनाकर्ष इत्यादी | |
| | (तीन) वस्तू रुपात (कोणत्याही व्यक्तीकडून / संस्थेकडून देण्यात आलेल्या पूरक वस्तू किंवा सेवा-सुविधा) (कोणत्याही व्यक्तींकडून / संस्थेकडून गौरवार्थ मिळालेल्या हेलिकॉप्टर सेवा इत्यादींसारख्या सेवा सुविधा किंवा वस्तुंचा तपशील व त्यांचे काल्पनिक मूल्य कृपया नमूद करावे.) | |
| | एकूण . . | |
| ५.३ | क. निवडणूक जाहीर करण्यात आल्यापासून ती पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी पक्षाच्या मुख्यालयाने केलेला / प्राधिकृत केलेला एकूण खर्च (यात एकापेक्षा अधिक राज्याचा अंतर्भाव असेल तर पक्षाच्या मुख्यालयाने राज्यनिहाय केलेला एकूण खर्च अनुसूची-एक मध्ये दर्शविण्यात यावा.) | |
| | पक्षाच्या मुख्यालयाने केलेल्या एकूण खर्चाचे वर्णन | रक्कम |
| | (एक) रोख रक्कम | |
| | (दोन) धनादेश किंवा धनाकर्ष इत्यादी | |
| | (तीन) निवडणूक पूर्ण होण्याच्या दिनांकास झालेला प्राधिकृत केलेला मात्र उर्वरित राहिलेला खर्च | |
| | एकूण . . | |
| | ख. पक्षाच्या मुख्यालयाने केलेला /प्राधिकृत केलेल्या वरील पक्षाच्या प्रचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची विभागणी | |
| | (एक) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ कलम ७७ याच्या स्पष्टीकरण १ मध्ये नमूद केलेल्या प्रमुख प्रचारकांचा प्रवास खर्च (अनुसूची-२ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |

| | | |
|---|---|---|
| | (दोन) प्रमुख प्रचारक वगळता नेत्यांचा प्रवास ख४च (अनुसूची-२०अ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | (तीन) पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी प्रसिद्धी माध्यमांमधून दिलेल्या जाहिरातींवर झालेला खर्च (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे, घाऊक एसएमएस (संदेश), केबल, संकेतस्थळ, दूरचित्रवाणी वाहिन्या, इत्यादी) (अनुसूची-३ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | (चार) भित्तिपत्रके, फलक, चिन्हे, स्टिकर्स, कमान, प्रवेशद्वारे, कटआऊट्स, जाहिरात फलक, झेंडे इत्यादी यांसह प्रसिद्धी सामग्रीवरील खर्च (अनुसूची-४ मध्ये दिलेल्या नमुन्यांत तपशील जोडावा.) | |
| | (पाच) पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा / मिरवणुका / मेळावे इत्यादी यावरील खर्च (अनुसूची-५ मध्ये दिलेल्या नमुन्यांत तपशील जोडावा.) | |
| | (सहा) पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी करण्यात आलेला अन्य कोणताही खर्च (अनुसूची-६ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारावरील एकूण खर्च | |
| ५.४ | क. उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी ) पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाने केलेला / प्राधिकृत केलेला एकूण खर्च | |
| | (एक) पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाने पक्षाच्या उमेदवाराला [उमेदवारांना] किंवा अन्य प्राधिकृत उमेदवाराला [उमेदवारांना], रोख रक्कम किंवा धनादेश / धनाकर्ष / डाकप्रेष (पोस्टल ऑर्डर)/ आर.टी.जी.एस. / निधी हस्तांतरण इत्यादी यासारख्या माध्यमांद्वारे प्रदान केलेली / खर्च केलेली रोख रक्कम<br>(अनुसूची -७ मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील) | |
| | (दोन) उमेदवारांच्या छायाचित्र किंवा नाव यांसह विशिष्ट उमेदवार (उमेदवारां) साठी प्रसार माध्यमांवरील जाहिरातींसाठी आलेला (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक जाहिराती, घाऊक संदेश केबल, संकेतस्थळ, दूरचित्रवाणी वरील वाहिन्यांवरील जाहिरातीसाठी आलेला खर्च) खर्च किंवा उमेदवाराचा निवडणुकीसंबंधातील म्हणून दर्शविता येईल असा एकूण खर्च (अनुसूची-८ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | (तीन) उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) छायाचित्र आणि / किंवा नावासह (भित्तिपत्रके, फलक, निवडणुकीसाठीची सामग्री इत्यादीसारख्या) प्रसिद्धी साहित्यावरील एकूण खर्च (अनुसूची-९ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | (चार) प्रमुख प्रचारक किंवा उमेदवार (उमेदवारां) सह इतर नेत्यांच्या मेळाव्याच्या ठिकाणाच्या (पक्षाचा सर्वसाधारण प्रचार वगळता) सार्वजनिक सभा / मिरवणुका इत्यादी [अडथळे (बॅरिकेडस्)/ध्वनीयंत्र इत्यादी /श्रोते/ समर्थक यांच्यासाठी भाड्याने घेतलेली वाहने] इत्यादी यांवरील एकूण खर्च (अनुसूची १० मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील सोबत जोडावा) | |
| | (पाच) उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) केलेला अन्य कोणताही खर्च (अनुसूची-११ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | (सहा) पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाद्वारे उमेदवारांची पूर्ववर्ती गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रकाशित करण्यावरील खर्च (अनुसूची २३ए मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | (सात) समाज प्रसारमाध्यमे व्यासपीठ / उपयोजके/इतर माध्यमांतून पक्षाचा केंद्रीय मुख्यालयाद्वारे आभासी प्रचारावरील खर्च (अनुसूची २४ए मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा.) | |
| | उमेदवारावरील (उमेदवारांवरील ) एकूण खर्च | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५.५ | पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाकडून राज्यातील पक्षाच्या युनिटला (टांना) (यात जिल्हे व स्थानिक युनिटांसह) किंवा अन्य पक्षाला निवडणुकीसाठीचा खर्चासाठी देण्यात आलेली एकूण रोख रक्कम (कृपया राज्यनिहाय रक्कम नमूद करावी). जर राजकीय पक्षाने एकापेक्षा अधिक प्रसंगांसाठी रकमा प्रदान केल्या असतील तर दिनांकनिहाय तपशील नमूद करावा. | | | | |
| | पक्षाच्या राज्यातील ज्या युनिटाला रक्कम प्रदान करण्यात आली आहे तिचे नाव / अन्य राजकीय पक्षाचे नाव (कोणतेही असल्यास) | रक्कम प्रदान करण्याचा/चे दिनांक | रोख रक्कम धनादेश / धनाकर्ष इत्यादी क्रमांक | रक्कम | |
| | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. इत्यादी. | | | | |
| | | | | एकूण | |
| ५.६ | क. निवडणूक पूर्ण झाल्यावर पक्षाच्या मुख्यालयातील निधीची अखेरची शिल्लक | | | | रक्कम |
| | वर्णन | | | | रक्कम |
| | (एक) हाती असलेली रक्कम | | | | |
| | (दोन) बँकेतील शिल्लक रक्कम (बँकेचे व बँकेच्या शाखेचे नाव कृपया नमूद करावे.) | | | | |
| | | | | एकूण | |

## भाग-ख

**६. राज्याकरिता सर्व जिल्हास्तर व स्थानिक युनिटे यांसह पक्षाच्या राज्य युनिटाने किंवा पक्षाच्या राज्यातील मुख्यालयाने निवडणुकीसंबंधात केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या खर्चाचा तपशील.**

एक. जर राजकीय पक्षाने एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये खर्च केला असेल/प्राधिकृत केला असेल तर या प्रपत्रानुसार स्वतंत्र नमुन्यावर प्रत्येक राज्याच्या खर्चाचा तपशील नमूद करावा.

दोन. राज्यामध्ये मुख्यालय असणाऱ्या राज्यातील राजकीय पक्षाकडे या प्रपत्रात अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| ६.१ | राज्य युनिटची प्रारंभीक शिल्लक (जिल्हा स्तरीय व स्थनिक स्तरीय युनिटांसह) (निवडणुका जाहीर करण्यात आल्याच्या दिनांकास) | रक्कम |
| | वर्णन | रक्कम |
| | (एक) हातात असलेली रोख रक्कम | |
| | (दोन) बँकेतील शिल्लक रक्कम | |
| | (बँक व बँकेच्या शाखेचे नाव कृपया नमूद करावे) | |
| | **एकूण** | |

| | | |
|---|---|---|
| ६.२ | क. (राज्यातील जिल्हा स्तरावरील युनिटे व स्थानिक युनिटे यांसह) राज्य युनिटांनी निवडणूक जाहीर होण्याच्या दिनांकापासून निवडणूक पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत सर्व स्त्रोतांकडून आलेल्या एकूण रक्कम. | |
| | वर्णन | रक्कम |
| | (एक) रोख रक्कम | |
| | (दोन) धनादेश किंवा धनाकर्ष इत्यादी | |
| | (तीन) वस्तुरुपात (कोणत्याही व्यक्तीने/संस्थेने गौरवार्थ दिलेली वस्तू किंवा सुविधा) (कृपया कोणत्याही व्यक्तीकडून/संस्थेकडून गौरवार्थ मिळालेल्या हेलिकॉप्टर सेवा इत्यादींसारख्या सेवासुविधा किंवा वस्तू यांचे काल्पनिक मूल्य कृपया नमूद करावे). | |
| | **एकूण** | |

| | | |
|---|---|---|
| ६.३ | क. (निवडणूकीचा दिनांक जाहीर झाल्यापासून निवडणूक पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) पक्षाचा सर्वसाधारण प्रचार करण्यासाठी (जिल्हा स्तरावरील युनिटे व स्थानिक युनिटे यांसह) राज्य युनिटांनी केलेला/प्राधिकृत केलेला एकूण खर्च. | |
| | राज्य युनिटाने केलेल्या एकूण खर्चाचे वर्णन | रक्कम |
| | (एक) रोख रक्कम | |
| | (दोन) धनादेश/धनाकर्ष इत्यादी | |
| | (तीन) निवडणूक पूर्ण होण्याच्या दिनांकास प्राधिकृत केलेला मात्र उर्वरित असलेला खर्च. | |
| | **एकूण** | |

| | | |
|---|---|---|
| | ख. (जिल्हा स्तरावरील युनिटे व स्थानिक युनिटे यांसह) राज्य युनिटांना पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी आलेल्या खर्चाची विभागणी | |
| | (एक) राज्य युनिटाला आलेला प्रमुख प्रचारकाचा वाहतूक खर्च (अनुसूची १२ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा) | |
| | (दोन) राज्य युनिटाला आलेला इतर नेत्यांसाठीचा वाहतूक खर्च. (अनुसूची १३ मध्ये दिलेल्या नमुन्याचा तपशील जोडावा) | |
| | (तीन) राज्य युनिटाद्वारे पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी प्रसार माध्यमांमधून जाहिरात करण्यासाठी आलेला खर्च (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक, घाऊक एसएमएस (संदेश), केबल, संकेतस्थळ, दूरचित्रवाणी वाहिन्या इत्यादी) (अनुसूची १४ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा) | |
| | (चार) राज्य युनिटाला पक्षाच्या सर्वसाधारण प्रचारासाठी भित्तीपत्रके, फलक, निशाना, स्टीकर्स, कमानी प्रवेशद्वारे, कट-आऊट्स, जाहिरात फलक, झेंडे इत्यादी यांसाठीच्या प्रसिद्धी साहित्यावर आलेला खर्च (अनुसूची-१५ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा) | |
| | (पाच) राज्य युनिटाला पक्षाचा सर्वसाधारण प्रचार करण्यासाठी सार्वजनिक सभा/मिरवणुका/मेळावे इत्यादी यांवर आलेला खर्च (अनुसूची-१६ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावा) | |
| | (सहा) राज्य युनिटाला सर्वसाधारण पक्षाचा प्रचार करण्यासाठी आलेला अन्य कोणताही खर्च. (अनुसूची १७ मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील) | |
| | **एकूण** | |

| | | |
|---|---|---|
| ६.४ | उमेदवाराचा/उमेदवारांचा संबंध लावण्यायोग्य जिल्हा स्तरीय शाखा एकूण व स्थानिक शाखांसह (सर्वसाधारण पक्षाच्या प्रचारा व्यतिरिक्त) उमेदवारासाठी उमेदवारांसाठी शाखेने केलेला किंवा राज्य शाखेने प्राधिकृत केलेला एकूण खर्च | |
| | (एक) एकतर रोख रकमेत किंवा धनादेश/दर्शनी धनाकर्ष /प्रदानादेश/आरटीजीएस/ निधी हस्तांतरण इत्यादी सारख्या संलेखांद्वारे राज्य शाखेने पक्षाच्या उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) किंवा इतर उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) प्राधिकृत केलेले किंवा केलेली एकूण ठोक रकमेचे प्रदान (प्रदाने). (अनुसूची-१८ मध्ये दिलेल्या नमुन्यात तपशील जोडावयाचा आहे.) | |
| | (दोन) राज्य शाखेने उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) छायाचित्रासह किंवा नावासह उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) साठीच्या माध्यम जाहिरातींवरील [ मुद्रित व इलेक्ट्रॉनिक्स, मोठ्या प्रमाणातील (घाऊक) संदेश, केबल, संकेतस्थळ, दूरदर्शन वाहिनी इत्यादी ] एकूण खर्च. (अनुसूची-१९ मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील.) | |
| | (तीन) राज्य शाखेने उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) छायाचित्रांसह आणि/किंवा नावासह दिलेल्या जाहिरात सामग्री वरील (उदाहरणार्थ पत्रके, पताका (बॅनर), कटआऊटस्, निवडणूक सामग्री इत्यादी) एकूण खर्च. (अनुसूची-२० मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील.) | |

| | | |
|---|---|---|
| | (चार) उमेदवारासह स्टार प्रचारकाच्या प्रचारयात्रेत श्रोते/समर्थक यांच्यासाठी अडथळे (बॅरिकेड्स)/ ध्वनियंत्रणा/भाड्याने घेतलेली वाहने यांवर राज्ययुनिटने (सर्वसाधारण पक्ष प्रचाराव्यतिरिक्त) केलेला एकूण खर्च.<br>(अनुसूची-२१ मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील.) | |
| | (पाच) राज्य शाखेने उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) केलेला इतर कोणताही खर्च (अनुसूची-२२ मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील.) | |
| | (सहा) राज्य युनिटाने उमेदवाराची (उमेदवारांची) गुन्हेगारी (पूर्ववृत्त) पार्श्वभूमी प्रकाशित करण्यावरील केलेला खर्च.<br>(अनुसूची २३ब मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील.) | |
| | (सात) राज्य युनिटाने समाज माध्यम व्यासपीठ/ॲप्स/इतर माध्यमाद्वारे वास्तविक प्रचारावरील खर्च.<br>[अनुसूची २४(ब) मध्ये दिलेल्या नमुन्यात जोडावयाचा तपशील.] | |
| | **उमेदवार/उमेदवारांवरील एकूण खर्च** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६.५ | पक्षाच्या राज्य शाखेने (जिल्हा व स्थानिक शाखांसह) निवडणूक खर्चासाठी इतर पक्षाला (पक्षांना) दिलेली एकूण ठोक रक्कम. जर राजकीय पक्षाने एकापेक्षा अधिक वेळा प्रदान (प्रदाने) केली असल्यास दिनांकनिहाय तपशील नमूद करावयाचा आहे. | | | |
| | ज्यास रक्कम प्रदान केली आहे त्या पक्षाच्या राज्य शाखेचे शाखेचे नाव/ इतर राजकीय पक्षाचे नाव (कोणताही असल्यास) | रक्कम प्रदानाचा दिनांक | रोख, धनादेश/दर्शनी धनाकर्ष इत्यादीचा क्रमांक | रक्कम |
| | १. | | | |
| | २. | | | |
| | ३. इत्यादी | | | |
| | | | **एकूण** | |

| | | |
|---|---|---|
| ६.६ | अ. निवडणूक पूर्ण झाल्यावर पक्षाच्या राज्य युनिटाची (जिल्हा व स्थानिक युनिटांसह) अखेरची शिल्लक | |
| | वर्णन | रक्कम |
| | (एक) हाती असलेली रक्कम | |
| | (दोन) बँकेतील शिल्लक | |
| | (कृपया बँकेचे नांव व शाखा नमूद करा) | |
| | **एकूण** | |

## भाग-क

**७. भाग-अ आणि ब मधील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे निवडणुकी दरम्यानच्या (निवडणुकीचा दिनांक घोषित केल्यापासून निवडणूक पूर्ण होईपर्यंत) राजकीय पक्षाला प्राप्त सर्व रकमा/ केलेला किंवा प्राधिकृत केलेला खर्च याचा सारांश**

| | | |
|---|---|---|
| अ | पक्षाचे नाव | |
| ब | निवडणुकीचा दिनांक | |
| क | ................ येथील निवडणूक (राज्याचे नाव आणि विधानसभा/लोकसभा मतदारसंघाचे नाव नमूद करणे) | |
| ड | सुरुवातीची शिल्लक (पक्षाची केंद्रीय मुख्यालये आणि समावेश असलेल्या सर्व राज्य/जिल्हा/स्थानिक स्तरांवरील/युनिटे याकरिता) | |
| | (वर्णन) | रक्कम |
| | एक. एका हाती असलेली रक्कम<br>[ निवडणुकीशी संबंधित सर्व राज्यांच्या ५.१.अ. (एक) + ६.१.अ. (एक) ] | |
| | दोन. बँकेतील शिल्लक<br>[ (निवडणुकीशी संबंधित सर्व राज्याच्या ५.१.अ (दोन) + ६.१अ (दोन) ] | |
| ई | निवडणुका घोषित करण्याच्या दिनांकापासून निवडणूक पूर्ण होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत (पक्षाचे केंद्रीय मुख्यालय आणि राज्य/जिल्हा/स्थानिक अशा दोन्ही स्तरावरील शाखा.) | |
| | वर्णन | रक्कम |
| | एक. रोख रक्कम [ सर्व राज्यांचे ५.२ अ(एक) + ६.२अ (एक) ] | |
| | दोन. धनादेश किंवा धनाकर्ष [ सर्व राज्यांचे ५.२ अ(दोन) क ६.२अ (दोन) ] | |
| | तीन. अशा प्रकारचे किंवा पूरक प्राप्त रकमा<br>[ निवडणुक संबंधित सर्व राज्यांच्या सर्व राज्यांचे ५.२.अ (तीन) + ६.२अ (तीन) ] | |
| | चार. एकूण जमा रक्कम (रकमा) | |
| फ | निवडणुकीचा दिनांक घोषित केल्यापासून निवडणूक पूर्ण झाल्याच्या दिनांकापर्यंत (पक्ष मध्यवर्ती मुख्यालय आणि राज्य/जिल्हा/स्थानिक अशा दोन्ही स्तरावरील शाखा) सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी केलेला/प्राधिकृत केलेला एकूण खर्च). | |
| | वर्णन | रक्कम |
| | एक. रोख किवा धनादेश/धनाकर्ष इ. (निवडणूक संबंधित सर्व राज्यांच्या)<br>[ सर्व राज्यांचे ५.३अ (एक) + ६.३अ (एक) ] | |
| | दोन. धनादेश/धनाकर्ष (निवडणूक संबंधित सर्व राज्यांच्या)<br>[ सर्व राज्यांचे ५.३अ (दोन) + ६.३अ (दोन) ] | |
| | तीन. प्राधिकृत केलेला परंतु निवडणूक पूर्ण झाल्याच्या दिनांकास उरणारी/उर्वरित शिल्लक रक्कम<br>[ सर्व राज्याच्या निवडणूक संबंधित ५.३अ (तीन) + ६.३अ (तीन) ] | |
| | चार. सर्वसाधारण पक्ष प्रचारावरील एकूण खर्च | |

| | | |
|---|---|---|
| छ | सर्वसाधारण पक्ष प्रचाराव्यतिरिक्त (पक्षाची केंद्रीय मध्यवर्ती मुख्यालय आणि राज्य/ जिल्हा/स्थानिक स्तरीय युनिटे दोन्हींचा) उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) केलेला प्राधिकृत केलेला राजकीय पक्षाचा एकूण खर्च | |
| | वर्णन | |
| | एक. उमेदवाराला/उमेदवारांना रोख रक्कम किंवा धनादेश/धनाकर्ष इत्यादींचे प्रदान [ ५.४अ (एक) + ६.४अ (एक) ] | |
| | दोन अशाच प्रकाराचा- | |
| | अ. प्रसारमाध्यमांना प्रदाने (निवडणूक संबंधित) [ राज्यांचे ५.४अ (दोन) + ६.४ अ (दोन) ] | |
| | ब. जाहिरात सामग्री [ निवडणूक संबंधित सर्व राज्यांचे (५.४अ (तीन) + ६.४अ (तीन) ] | |
| | क. सार्वजनिक/जाहीर सभा, मिरवणुका इत्यादी [ निवडणूक संबंधित सर्व राज्याचे ५.४अ (चार) + ६.४ अ (चार) ] | |
| | ड. इतर कोणतेही खर्च [ निवडणूक संबंधित सर्व राज्याच्या ५.४ अ (पाच) + ६.४ अ (पाच) ] | |
| इ | गुन्हेगारी पूर्ववृत्त (पार्श्वभूमी) प्रकाशित [ निवडणूक संबंधित सर्व राज्याचे ५.४ अ (सहा) + ६.४ अ (सहा) ] | |
| | तीन. समाज माध्यम व्यासपीठ (ॲप/इतर माध्यमाद्वारे वास्तविक प्रचार मोहिमेवरील खर्च [ निवडणूक संबंधित सर्व राज्याचे ५.४ अ (सात) + ६.४ अ (सात) ] | |
| | चार. उमेदवारावरील (उमेदवारांवरील) एकूण खर्च | |
| ह | सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी आणि उमेदवाराचा [ उमेदवारांसाठीचा एकूण खर्च (या तक्त्याच्या वरील फ (चार) + ग (चार) यांची बेरीज ] | |
| आय | अखेरची शिल्लक (पक्षाचे केंद्रीय मुख्यालय व राज्य/जिल्हा/स्थानिक स्तरीय शाखा दोन्हीकडील) | |
| | वर्णन | |
| | अ. हातातील रोख रक्कम [ निवडणूक संबंधित सर्व राज्याचे ५.६अ (एक) + ६.६अ (एक) ] | |
| | ब. बँकेतील शिल्लक [(निवडणूक संबंधित सर्व राज्याचे ५.६ अ (दोन) + ६.६ अ (दोन)] | |
| | क. एकूण अखेरची शिल्लक | |

## भाग-ड

### पडताळणी

मी, श्री/श्रीमती ............................................... याद्वारे असे सत्यापित आणि घोषित करतो की, निवडणूक खर्चाच्या (भाग अ, ब, क) विवरणपत्रात सादर केलेल्या निवडणूक खर्च लेख्यात ....................................... लोकसभा/राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका/पोट निवडणूकासंबंधात राजकीय पक्षांने (पक्ष मध्यवर्ती मुख्यालये/राज्य युनिट) (जिल्हास्तरीय व स्थानिक युनिटांसह) केलेल्या/प्राधिकृत केलेल्या निवडणूक खर्चाच्या सर्व बाबींचा समावेश आहे. त्यामध्ये काहीही लपवून किंवा राखून ठेवण्यात/दाबून टाकण्यात आलेले नाही, आणि

निवडणूक खर्चाचे उक्त विवरणपत्र हे माझ्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे खरे व सत्य आणि यात कोणतीही महत्वाचे तथ्य लपविण्यात आलेले नाही.

दिनांक

कोषाध्यक्ष किंवा प्राधिकृत व्यक्तीची
स्वाक्षरी व मोहोर

प्रतिस्वाक्षरित

पक्ष अध्यक्षा/महासचिव यांची स्वाक्षरी

परीक्षकाने प्रमाणित केलेले

लेखापालाची स्वाक्षरी व मोहोर.

- लागू नसेल ते खोडावे

## पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाचे खर्च

**अनुसूची -१**

निवडणुकीची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून निवडणूक समाप्त होण्याच्या दिनांकापर्यंत सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या/करण्यात आलेला एकूण खर्चाची राज्यनिहाय विभागणी.

| अ.क्र. | राज्याचे नाव | रोख रक्कम | धनादेश, इत्यादी | प्राधिकृत करण्यात आलेला खर्च, परंतु मतदान पूर्ण झाल्याच्या दिनांकास राहिलेली शिल्लक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

**अनुसूची -२**

पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेल्या स्टार (प्रचारकाचा) प्रवास खर्च.

| अ.क्र. | राज्य व ठिकाण | सभेचा दिनांक | प्रमुख प्रचारकाचे नाव | प्रवासाचे माध्यम (टॅक्सी, हेलिकॉप्टर, विमान इत्यादी) | हेलिकॉप्टर किंवा विमानाच्या बाबतीत आदात्याचे नाव | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

**अनुसूची -२ क**

पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या /करण्यात आलेल्या अन्य नेत्याचा (नेत्यांचा) केलेला प्रवास खर्च (नामनिर्देशनाची घोषणा झाल्यानंतर व नामनिर्देशनाची घोषणा होण्यापूर्वीच्या खर्चासह.).

| अ.क्र. | राज्य व ठिकाण | सभेचा दिनांक | नेत्याचे नाव | प्रवासाचे माध्यम (टॅक्सी, हेलिकॉप्टर, विमान इत्यादी) | हेलिकॉप्टर किंवा विमानाच्या बाबतीत आदात्याचे नाव | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची -३** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण पक्ष प्रचारावरील प्रसार माध्यमातील जाहिरात (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक, मोठ्या प्रमाणातील (घाऊक) संदेश, केबल, संकेतस्थळ व दूरदर्शन वाहिनी, इत्यादी) यांवरील पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या/करण्यात आलेला खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | आदात्याचे नाव | प्रसार माध्यमाचे नाव (मुद्रण/इलेक्ट्रॉनिक/संदेश/ केबल/दूरदर्शन इत्यादी) | दिनांक (मुद्रित/प्रक्षेपण/ संदेश यांचा | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची -४** | | | | |
|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी पत्रके, फलके, बिल्ले, स्टिकर्स, कमानी, प्रवेशद्वारे, कार्डबोर्ड (कट्आऊट्स), जाहिरातफलके, झेंडे, इत्यादींसह जाहिरात साहित्यावरील पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला खर्च. | | | | |
| अ.क्र. | राज्य | विधानसभा/लोकसभा मतदार संघाचा क्रमांक व नाव | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची -५** | | | | |
|---|---|---|---|---|
| सार्वजनिक सभा/मिवरणूक/प्रचार यात्रा [ मंच, ध्वनिक्षेपक, अडथळे (बॅरिकेड्स)/वाहने इत्यादी ] यांवरील पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या/करण्यात आलेला खर्च. | | | | |
| अ.क्र. | राज्य व ठिकाण | सभा/मिरवणूक/प्रचार यात्रा यांचा दिनांक | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - ६** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला इतर कोणताही खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | प्रयोजन | दिनांक | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची -७** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एकतर रोख रकमेत किंवा धनादेश/दर्शनी धनाकर्ष (डी.डी.)/प्रदानादेश (पेऑर्डर)/आरटीजीएस/निधी हस्तांतरण, इत्यादी यांसारख्या संलेखांद्वारे पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांनी पक्ष उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) किंवा अन्य उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) प्राधिकृत केलेले एकूण ठोक रकमेचे प्रदान (प्रदाने) कोणतीही असल्यास, (उमेदवारासाठी) जर राजकीय पक्षाने उमेदवाराला (उमेदवारांना) एकापेक्षा अधिक प्रसंगी प्रदान (प्रदाने) केले असेल तर, दिनांक निहाय तपशील नमूद करावयाचा आहे. | | | | | | |
| अ.क्र. | राज्याचे नाव/ विधानसभा/लोकसभा मतदार संघाचा क्रमांक व नाव | उमेदवारांचे नाव व अन्य पक्षांनी नमूद करावयाचे पक्षाचे नाव | प्रदानाचा दिनांक (प्रदानांचा दिनांक) | रोख रक्कम | धनादेश/दर्शनी धनाकर्षाचा क्रमांक इत्यादी व दिनांक | प्रदान केलेली एकूण रक्कम |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - ८** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उमेदवाराच्या किंवा कोणत्याही उमेदवाराशी (उमेदवारांशी संबंधित छायाचित्रासह किंवा नावासह विशिष्ट उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) माध्यम जाहिरातीवरील [ मुद्रित व इलेक्ट्रॉनिक, मोठ्या प्रमाणावरील (घाऊक) ], केबल, संकेतस्थळ, दूरदर्शन वाहिनी इत्यादी पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | उमेदवाराचे नाव | माध्यमाचे नाव (मुद्रित व इलेक्ट्रॉनिक, घाऊक संदेश, केबल, संकेतस्थळ व दूरदर्शन चॅनल इत्यादी) | दिनांक (मुद्रित/प्रक्षेपण/ लघुसंदेश यांचा) | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - ९** | | | | |
|---|---|---|---|---|
| उमेदवाराच्या (उमेदवारांच्या ) किंवा उमेदवाराशी (उमेदवारांशी) संबंधित फोटोसह व /किंवा नावासह प्रसिद्धी साहित्यावरील पत्रके, फलके, निवडणूक साहित्य, इत्यादी) पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला एकूण खर्च. | | | | |
| अ.क्र. | राज्य विधानसभा/लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव | उमेदवाराचे नाव | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - १०** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| जाहीर सभा/मिरवणुका इत्यादी [ स्टार प्रचारक किंवा उमेदवारासह (उमेदवारांसह) अन्य नेत्यांच्या प्रचारयात्रेत श्रोत्यांसाठी/पाठिंबा देणाऱ्यांसाठी बॅरीकेड्स/ध्वनिक्षेपक इत्यादी/भाड्याने घेतलेली वाहने) यावरील पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला (सर्वसाधारण पक्ष प्रचाराव्यतिरिक्त) एकूण खर्च. | | | | | | |
| अ.क्र. | राज्य व ठिकाण | स्टार प्रचारकांचे (प्रचारकांची)आणि इतर नेत्यांचे नाव (नावे) | उमेदवाराचे (उमेदवारांची) नाव | दिनांक | खर्चाच्या बाबी | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - ११** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांद्वारे करण्यात आलेला/करण्यात आलेला उमेदवारासाठीचा (उमेदवारांसाठीचा) कोणताही अन्य खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | विधानसभा/ लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व त्याचे नाव | उमेदवाराचे नाव | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

## निवडणूक खर्चाच्या जिल्हानिहाय तपशील

**राज्याचे नाव :-**

| **अनुसूची – १२** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शखा यांच्याकडून करण्यात आलेला/ प्राधिकृत करण्यात आलेला स्टार प्रचारकांचा प्रवास खर्च. | | | | | | |
| अ.क्र. | राज्य व ठिकाण | सभेचा दिनांक | स्टार प्रचारकाचे (प्रचारकांचे) नाव | प्रवासाचे माध्यम (टॅक्सी, हेलीकॉप्टर, विमान, इत्यादी) | हेलीकॉप्टर किंवा विमानाच्या बाबतीत आदात्याचे नाव | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची – १३** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शखा यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला इतर नेत्याचा (नेत्यांचा) प्रवास खर्च (नामनिर्देशनाची घोषणा झाल्यानंतर व नामनिर्देशनाची घोषणा होण्यापूर्वीच्या खर्चासह.) | | | | | | |
| अ.क्र. | राज्य व ठिकाण | सभेचा दिनांक | नेत्याचे (नेत्यांची) नाव | प्रवासाचे माध्यम (टॅक्सी, हेलीकॉप्टर, विमान इत्यादी) | हेलीकॉप्टर किंवा विमानाच्या बाबतीत आदात्याचे नाव | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची – १४** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला सर्वसाधारण पक्ष प्रचाराबाबतचा माध्यमाच्या जाहिरातीवरील खर्च (मुद्रित व इलेक्ट्रॉनिक , घाऊक संदेश, केबल, संकेतस्थळ आणि दूरदर्शन चॅनल, इत्यादी). | | | | | |
| अ.क्र. | ठिकाण | आदात्याचे नाव | माध्यमाची नावे (मुद्रित व इलेक्ट्रॉनिक, घाऊक लघुसंदेश, केबल, संकेतस्थळ आणि दूरदर्शन चॅनल, इत्यादी) | दिनांक (छापील/ दूरदर्शन कार्यक्रम/संदेश इत्यादीची) | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - १५** | | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यांच्याकडून साधारण पक्ष प्रचारासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या/करण्यात आलेला भित्तीपत्रके, फलके, बिल्ले, स्टीकर्स, कमानी, प्रवेशद्वारे, कार्डबोर्ड (कट आऊट) जाहिरात फलके, झेंडे इत्यादींसह प्रसिद्धी साहित्यावरील खर्च. | | | | |
| अ.क्र. | राज्य | विधानसभा/लोकसभेचा मतदारसंघ क्रमांक व नाव | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - १६** | | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या/करण्यात आलेला सार्वजनिक सभा/मिरवणूक/प्रचार यात्रा/(मंच, ध्वनीक्षेपक, बॅरीकेट्रस, वाहने इत्यादी) यांवरील खर्च. | | | | |
| अ.क्र. | राज्य आणि ठिकाण | सभा/मिरवणूक/प्रचार यात्रा दिनांक | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - १७** | | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शाखांकडून सर्वसाधारण पक्ष प्रचारासाठी प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला कोणताही अन्य खर्च. | | | | |
| अ.क्र. | राज्य | बाबींचे प्रयोजन/तपशील | खर्चाचा दिनांक | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - १८** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एकतर रोख रकमेत किंवा धनादेश/दर्शनी धनाकर्ष (डी.डी.)/प्रदानादेश (पेऑर्डर)/आरटीजीएस/निधी हस्तांतरण, इत्यादी यांसारख्या संलेखाद्वारे पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांने पक्षाच्या उमेदवारांसाठी (उमेदवारासाठी) किंवा अन्य उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) प्राधिकृत केलेले/केलेले एकूण ठोक रकमेचे प्रदान (प्रदाने) कोणतेही असल्यास, जर राजकीय पक्षाच्या उमेदवाराला (उमेदवारांना) एकापेक्षा अधिक प्रसंगी प्रदान (प्रदाने) केले असेल तर दिनांक निहाय तपशील नमूद करावयाचा आहे. | | | | | | |
| अ.क्र. | राज्याचे नाव/ विधानसभेचा/ लोकसभा मतदार संघाचा क्रमांक व नाव | उमेदवाराचे नाव व पक्षाचे नाव जर असेल त्या पक्षाचे नाव नमूद करावे | प्रदानाचा दिनांक प्रदानाचे दिनांक | रोख रक्कम | धनादेश/डी.डी. क्रमांक, इत्यादी व दिनांक | प्रदान केलेली एकूण रक्कम |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - १९** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) किंवा कोणत्याही उमेदवाराशी (उमेदवारांशी) संबंधित असलेल्यांच्या छायाचित्रासह किंवा नावासह विशिष्ट उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला, माध्यमावरील जाहिराती (मुद्रित व इलेक्ट्रॉनिक, मोठ्या प्रमाणातील लघुसंदेश, संकेतस्थळ, दूरदर्शन व चॅनल इत्यादी) यावरील एकूण खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | उमेदवाराचे नाव | माध्यमाचे नाव ((मुद्रित/ इलेक्ट्रॉनिक/ घाऊक लघुसंदेश, संकेतस्थळ/दूरदर्शन व चॅनल, इत्यादी) | दिनांक (मुद्रिताचा/ प्रक्षेपणाचा/संदेश, इत्यादीची) | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - २०** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उमेदवारांच्या किंवा कोणत्याही उमेदवाराशी (उमेदवारांशी) संबंधित असलेल्यांच्या छायाचित्रांसह व/ किंवा नावासह विशिष्ट उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेल्या प्रसिद्धी साहित्य माध्यम जाहिराती (भित्तीपत्रके, फलके, निवडणूक साहित्य इत्यादी) यावरील एकूण खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | विधानसभा/लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव | उमेदवाराचे (उमेदवारांचे नाव | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - २१** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक सभा/मिरवणुका, इत्यादी (स्टार प्रचारक किंवा अन्य नेता यांच्या प्रचारयात्रेतील सभेत श्रोते/समर्थक यांच्यासाठी बॅरिकेट्स/ध्वनिक्षेपक इत्यादी/भाड्याने घेतलेली वाहने) यांवरील राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा (सर्वसाधारण पक्ष प्रचाराव्यतिरिक्त) यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला एकूण खर्च. | | | | | | |
| अ.क्र. | राज्य व ठिकाण | दिनांक | स्टार प्रचारकांचे (प्रचारकांची), पुढाऱ्यांचे नाव (नावे) | उमेदवारांचे (उमेदवारांची) नाव (नावे) | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| | | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - २२** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा//स्थानिक शाखां यांच्याकडून उमेदवारासाठीचा उमेदवारांसाठीचा प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला कोणताही इतर खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | विधानसभा/लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव | उमेदवाराचे (उमेदवारांची) नाव (नावे) | बाबींचा तपशील | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| | | | | **एकूण ...** | |

| **अनुसूची - २३** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| केंद्रीय मुख्यालयात असलेल्या राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवाराची, गुन्हेगारी पूर्ववृत्त (पार्श्वभूमी) कोणतीही असल्यास, प्रसिद्ध करण्यासाठी करण्यात आलेला/प्राधिकृत करण्यात आलेला एकूण खर्च. | | | | | | | | |
| अ.क्र. | संकेतस्थळ | वृत्तपत्र | | | दूरदर्शन | | | प्रदानाचे माध्यम (इलेक्ट्रॉनिक/ धनादेश/धनाकर्ष/ रोख) (कृपया विनिर्दिष्ट करावे.) |
| | ज्या कालावधीत प्रदर्शित केले गेले असेल तो कालावधी | वृत्तपत्राचे नाव (नावे) | प्रसिद्धीचा दिनांक | करण्यात आलेला खर्च (रुपयामध्ये) | वाहिनीचे नाव (नावे) | निदेशन/ प्रक्षेपणाचा दिनांक व कालावधी | करण्यात आलेला खर्च (रुपयामध्ये) | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| **अनुसूची - २३ब** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यामध्ये असलेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवाराची गुन्हेगारी पूर्ववृत्ते (पार्श्वभूमी) कोणतीही असल्यास प्रसिद्ध करण्यासाठी करण्यात आलेला/प्राधिकृत करण्यात आलेला एकूण खर्च. | | | | | | | | |
| अ.क्र. | संकेतस्थळ | वृत्तपत्र | | | दूरदर्शन | | | प्रदानाचे माध्यम (इलेक्ट्रॉनिक/ धनादेश/धनाकर्ष/ रोख) (कृपया विनिर्दिष्ट करावे.) |
| | ज्या कालावधीत प्रदर्शित केले गेले | वृत्तपत्राचे नाव (नावे) | प्रसिद्धीचा दिनांक | करण्यात आलेला खर्च (रुपयामध्ये | वाहिनीचे नाव (नावे) | निदेशन/ प्रक्षेपणाचा दिनांक व कालावधी | करण्यात आलेला खर्च (रुपयामध्ये) | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| **अनुसूची - २४अ** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| समाज माध्यम व्यासपीठ/ॲप/इतर माध्यमांद्वारे आभासी प्रचारावर पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाने अधिकृत केलेल्या सर्वसाधारण पक्षाच्या प्रचारावर प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला एकूण खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | आभासी प्रचाराचे स्वरूप (समाज माध्यम व्यासपीठ/ॲप/ इतर माध्यमे सूचित करावे | आशय निर्मात्याचे नाव | प्रसारित संदेशाच्या माध्यमाचे नाव | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| **अनुसूची - २४ब** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| समाज माध्यम व्यासपीठ/ॲप/इतर माध्यमांद्वारे आभासी प्रचारावर राज्य/जिल्हा/स्थानिक शाखा यांनी अधिकृत केलेल्या सर्वसाधारण पक्षाच्या प्रचारावर प्राधिकृत करण्यात आलेला/करण्यात आलेला एकूण खर्च. | | | | | |
| अ.क्र. | राज्य | आभासी प्रचाराचे स्वरूप (समाज माध्यम व्यासपीठ/ॲप/ इतर माध्यमे सूचित करावे | आशय निर्मात्याचे नाव | प्रसारित संदेशाच्या माध्यमाचे नाव | एकूण रक्कम (शिल्लक रकमेसह) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

(आयोगाच्या पत्र क्रमांक ७६/आभासी प्रचार/इइपीएस/२०२२, दिनांक १५ जानेवारी, २०२२ द्वारे सुधारित केले, कृपया जोडपत्र-एफ ९ पहा)

**जोडपत्र-एफ ४**

कॅम्प बॅग/इ-मेलद्वारे

## भारताचा निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/पीपीईएमएस/पारदर्शकता/२०१३ दिनांक २९ ऑगस्ट २०१४

प्रति,

१. सर्व राजकीय पक्षांचे अध्यक्ष/महासचिव

२. सर्व राजकीय पक्षांचे कोषाध्यक्ष.

**विषय.**— पक्षाचे निधी आणि निवडणूक खर्च या बाबीमधील पारदर्शकता व उत्तरदायित्वविषयक मार्गदर्शक तत्त्वे-यांबाबत.

महोदय/महोदया,

संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये निवडणुका खुल्या व निःपक्षपाती वातावरणात घेण्याची जबाबदारी भारताच्या निवडणूक आयोगाच्या ठायी निहित आहे. धन शक्तीमुळे निवडणूक लढविण्याचा स्तर खालावला जात असल्याबाबत आणि तिचे पावित्र्य भंग होत असल्याबाबत विविध ठिकाणांवरून चिंता व्यक्त करण्यात येत आहेत. निवडणुकांमध्ये पैशाचा गैरवापर होण्यास आळा घालण्याच्या उद्देशाने, निवडणूक आयोगाने मागील काळात वेळोवेळी उमेदवारांना आणि राजकीय पक्षांना अनेक अनुदेश दिलेले आहेत.

२. राजकीय पक्षांनी निवडणुकांमध्ये तसेच इतर वेळेस देखील उभारलेला निधी व केलेला खर्च यांबाबत पारदर्शकता व उत्तरदायित्व राखणे इष्ट आहे. शिवाय, निवडणुका खुल्या व निःपक्षपाती वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने, राजकीय पक्षांच्या निधीच्या संदर्भात पारदर्शकता व उत्तरदायित्व राखण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे आवश्यक व इष्ट आहे.

३. मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या हेतूने, आयोगाने सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकडून अभिप्राय/सूचना/माहिती (आवश्यक माहिती) मागवली होती. यांपैकी अनेक पक्षांनी पारदर्शकतेबाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांना पाठिंबा दिला असला तरी, काही पक्षांचे याबाबतीत वेगळे मत होते. राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेता आणि निवडणूक प्रक्रिया शुद्ध रीतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोग, याद्वारे राजकीय पक्षांच्या निधीमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व राखण्याच्या हेतूने, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये पुढील मार्गदर्शक तत्त्वे घालून देत आहे :—

(एक) आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम १३क च्या तरतूद (क) मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अशी तरतूद केलेली आहे की, राजकीय पक्ष अशाप्रकारे लेखा पुस्तके व इतर दस्तऐवज ठेवील की, ज्यायोगे त्यांतून त्याच्या उत्पन्नाची नेमकी वजात कळणे शक्य होईल. त्यानुसार,—

(क) राजकीय पक्षाच्या कोषाध्यक्षाने किंवा त्या पक्षाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा व्यक्तीने सर्व राज्यस्तरीय आणि निम्नस्तरांवरील लेखे ठेवले असल्याची खात्री करण्याबरोबरच, उपरोक्त तरतुदीअन्वये आवश्यक केल्याप्रमाणे पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयांमधील एकत्रित लेखे ठेवणे ;

(ख) अशा प्रकारे त्याने/तिने ठेवलेले लेखे, भारतीय सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या, राजकीय पक्षांचे लेखांकन व लेखापरीक्षण यावरील मार्गदर्शक टिपेशी अनुरूप करणे ; आणि

(ग) वार्षिक लेखे अर्हताप्राप्त अशा सनदी लेखापाल व्यवसायींकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करून घेणे, आवश्यक आहे.

(दोन) आयोगाने नवीन राजकीय पक्षाच्या नोंदणीसाठीच्या आवश्यकतेमध्ये दिनांक ८ ऑक्टोबर २०१० पासून सुधारणा केलेली आहे, तिच्यामध्ये, इतर गोष्टींबरोबरच, त्या पक्षाने त्याच्या लेखापरीक्षित वार्षिक लेख्यांची एक प्रत सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार एकरूपता आणण्याच्या दृष्टीने, सर्व राजकीय पक्ष, आयोगाला किंवा पुढील परिच्छेद (सहा) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याला, प्रत्येक आर्थिक वर्षासाठीच्या, लेखापरीक्षकाच्या अहवालासह लेखापरीक्षित वार्षिक लेख्यांची प्रत, प्रत्येक वर्षाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर पूर्वी सादर करतील.

(तीन) आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ८०छछख आणि ८० छछग च्या तरतुदींमध्ये, इतर गोष्टींबरोबरच, एखाद्या राजकीय पक्षाला कोणत्याही व्यक्तीकडून किंवा कंपनीकडून पैशाच्या स्वरूपात देण्यात आलेल्या देणग्यांवर कोणतीही वजात दिली जाणार नाही, असे नमूद केलेले आहे. त्यानुसार, राजकीय पक्ष त्याच्या सार्वजनिक प्रचार यात्रांमध्ये केवळ जनतेने देणगी दिलेल्या, किरकोळ रकमा वगळता, ज्यांनी त्याला देणग्या दिल्या असतील अशा सर्व व्यक्तींची, कंपन्यांची किंवा संस्थांची नावे व पत्ते स्वतःकडे ठेवील. तसेच, रोख स्वरूपात मिळालेली कोणतीही रक्कम/देणगी त्या त्या लेखापुस्तकामध्ये रीतसर नोंदवण्यात येईल आणि ती मिळाल्यापासून एक आठवड्याच्या आत पक्षाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. तथापि, पक्षाच्या दैनंदिन व्यवहाराकरिता आणि रोख स्वरूपातील खर्च भागवण्याकरिता आवश्यक असलेली वाजवी रक्कम पक्ष ठेवून घेईल.

(चार) आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ४०क(३) मध्ये अशी तरतूद आहे की, कोणत्याही व्यवसाय संस्थेने एखाद्या व्यक्तीस एका दिवसाला रुपये २०,००० पेक्षा अधिक रकमेची केलेली सर्व प्रदाने ही, आयकर नियम, १९६२ च्या नियम ६घघ मध्ये तरतूद केलेला, सूट दिलेला प्रवर्ग वगळता अन्य बाबतीत, आदात्याच्या खात्यावरच जमा धनादेशाद्वारे/धनाकर्षाद्वारे करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, जर पक्ष कोणताही खर्च करीत असेल तर, (क) एखाद्या गावात किंवा नगरात, जेथे बँकेची सुविधा नाही तेथे प्रदान केलेले असेल ; किंवा (ख) पक्षाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला किंवा पदाधिकाऱ्याला वेतन, निवृत्तिवेतन यांसाठी, किंवा त्याच्या खर्चाच्या प्रतिपूर्तिसाठी प्रदान करण्यात आले असेल ; किंवा (ग) कोणत्याही परिनियमान्वये रोख प्रदान करणे गरजेचे असेल ते वगळता अन्य बाबतीत, कोणत्याही व्यक्तीला, कंपनीला किंवा संस्थेला एका दिवसाला रुपये २०,००० पेक्षा अधिक रकमेचे रोख स्वरूपात प्रदान करण्यात आलेले नाही, याची तो पक्ष सुनिश्चिती करील.

(पाच) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(३) मध्ये उमेदवाराच्या निवडणूक खर्चावरील मर्यादेची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे, जर एखाद्या पक्षाला आपल्या उमेदवारांच्या निवडणूक खर्चासाठी त्यांना कोणतेही आर्थिक सहाय्य करण्याची इच्छा असेल तर, असे सहाय्य हे विहित मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये. पक्षाने याबाबतीत करावयाचे कोणतेही प्रदान हे केवळ रेखित आदात्याच्या खात्यावरच जमा धनादेशाद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे अथवा बँक खात्यात रक्कम हस्तांतरित करूनच केले जाईल आणि रोख स्वरूपात केले जाणार नाही.

(सहा) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी नमुना २४अ मधील देणग्यांचे अहवाल, उपरोक्त परिच्छेद ३(एक) मध्ये निर्दिष्ट केलेले, सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले लेखापरीक्षित वार्षिक लेखे आणि निवडणूक खर्चाची विवरणपत्रे यांसारखे सर्व अहवाल भारताच्या निवडणूक आयोगाकडे दाखल करावयाचे असले तरी, मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांनीही हे सर्व अहवाल विहित मुदतीत व रीतीने त्या त्या राज्यांच्या (जेथे पक्षाचे मुख्यालय स्थित आहे त्या राज्याच्या) मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे दाखल करावयाचे आहेत.

४. उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वे ही, दिनांक १ ऑक्टोबर २०१४ पासून सर्व राजकीय पक्षांना लागू असतील.

आपला विश्वासू,

सही/-

**मलय मलिक,**
अवर सचिव.

प्रत रवाना :—

१. सर्व मुख्य निवडणूक अधिकारी (त्यांनी त्यांच्या संबंधित राज्याच्या सर्व राजकीय पक्षांच्या निदर्शनास आणून देण्याच्या विनंतीसह).

२. अध्यक्ष, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
(राजकीय पक्षांकरिता संबंधित नियम करण्याकरिता)

३. अध्यक्ष, भारतीय सनदी लेखापाल संस्था, आयसीएआय भवन, इंद्रप्रस्थ मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. ७१००, नवी दिल्ली ११० ०२२ (राजकीय पक्षांवरील मार्गदर्शक टिपेमध्ये मुद्दे समाविष्ट करण्याकरिता).

टीप .— * कृपया जोडपत्र-ई ११ आणि इ १२ पहावे.

** कृपया जोडपत्र-फ १० पहावे.

**जोडपत्र-एफ ५**
स्पीड-पोस्ट द्वारे

## भारताचा निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/पीपीईएमएस/पारदर्शकता/२०१४ दिनांक १४ ऑक्टोबर २०१४.

प्रति,

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे
यांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय.—** मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांनी पक्ष निधी आणि निवडणूक खर्च यांचा अहवाल सादर करताना त्यातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांबाबतच्या मार्गदर्शनपर सूचना-यासंबंधात.

महोदय/महोदया,

वर नमूद केलेल्या विषयावरील आयोगाच्या दिनांक २९ ऑगस्ट २०१४ रोजीच्या समक्रमांकाच्या पत्राकडे आपले लक्ष वेधण्याचा आणि आपणास असे सांगण्याचा मला निदेश आहे की, मान्यताप्राप्त राजकीय पक्ष, सर्व अहवाल, म्हणजे,—(अ) अंशदान अहवाल, नमुना २४(अ) मध्ये, (ब) लेखापरीक्षित वार्षिक लेखे, लेखापरीक्षकाच्या अहवालासह आणि (क) निवडणूक खर्चाचे विवरणपत्र, भारत निवडणूक आयोगाकडे दाखल करतील, आणि मान्यता नसलेले पक्ष, संबंधित राज्यांच्या (म्हणजेच पक्षाचे मुख्यालय जेथे स्थित आहे अशा राज्याच्या), मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे विहित वेळेत व रीतीने दाखल करतील. वर नमूद केलेल्या मार्गदर्शनपर सूचना सर्व राजकीय पक्षांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१४ पासून लागू असतील. (प्रत सोबत जोडली आहे.).

२. वरील बाबी लक्षात घेता, आपणांस अशी विनंती करण्याच्या मला आदेश आहे की, ही बाब अशा सर्व मान्यता नसलेल्या ज्या राजकीय पक्षांची राज्यात मुख्यालये/कार्यालये यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता आहे, त्यांनी आयोगाच्या चिन्ह आदेश अधिसूचनेनुसार राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयात आवश्यक असणारे अहवाल सादर करावेत. (आयोगाचे चिन्ह आदेश अधिसूचना दिनांक १० मार्च २०१४, सुधारित अधिसूचना दिनांक १६ सप्टेंबर २०१४ आणि पत्र क्रमांक ५६/२०१४/पीपीएस-II, दिनांक २६ सप्टेंबर २०१४ ची एकेक प्रत तात्काळ संदर्भासाठी यासोबत जोडलेली आहे.)

३. राज्यस्तरावरील मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांकडून अहवाल मिळाल्यावर, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून खालील कार्यपद्धती अनुसरण्यात येईल :—

(एक) अंशदान अहवाल, वार्षिक लेखापरीक्षित लेखे आणि निवडणूक खर्च विवरणपत्रे यांच्या क्रमवीक्षण केलेल्या प्रती, त्या त्या राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर, त्या मिळाल्यावर तीन दिवसांच्या आत, जनतेला पाहण्यासाठी टाकण्यात येतील. "राज्यस्तरीय राजकीय पक्षांचे अहवाल आणि लेखे विवरणपत्रे" या शीर्षकाखालील, "चालू घडामोडी" या दुव्याद्वारे करण्यात यावे.

(दोन) मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांकडून दाखल केलेले अहवाल/विवरणपत्रे यांची यादी संकलित करण्यात येईल आणि यासोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार (जोडपत्र-क, ख, ग) अंतिम तारखेच्या २४ तासांच्या आत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल. कोणत्याही राजकीय पक्षांकडून विवरणपत्र/अहवाल प्राप्त झाल्यानंतर ३ दिवसांच्या आत, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून यादी नियतकालाने अद्ययावत करण्यात येईल. संबंधित पक्षाच्या अहवाल/विवरणपत्राच्या क्रमवीक्षण केलेल्या प्रती सद्यस्थितीच्या अहवालासोबत जोडण्यात याव्यात.

(तीन) राजकीय पक्षांकडून अहवाल/विवरणपत्रे दाखल करण्याच्या अंतिम तारखा खालीलप्रमाणे असतील :—

१. अंशदान अहवाल.—प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबर किंवा केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाकडून आयकर परतावा दाखल करण्यासाठी वाढवून देण्यात येईल अशी तारीख,

२. वार्षिक लेखापरीक्षित लेखे.—प्रत्येक वर्षी ३० ऑक्टोबर.

३. निवडणूक खर्चाचे विवरणपत्र.—विधानसभा निवडणुकांच्या समाप्तीनंतर ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणुकांच्या समाप्तीनंतर ९० दिवसांच्या आत.

(चार) अहवाल/विवरणपत्रे दाखल करण्यात कसूर झाल्यास, संबंधित राजकीय पक्षास तशा आशयाचे पत्र लिहून, ते लक्षात आणून देण्यात यावे आणि ते पत्र मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर सुद्धा टाकावे.

(पाच) अंशदान अहवालाची एक प्रत राजकीय पक्षाकडून सादर केल्याचा दिनांक नमूद असलेला असा अहवाल संबंधित राज्याच्या प्रधान मुख्य आयकर आयुक्त, यांच्याकडे पाठवण्यात येईल. जे पक्ष अंशदान अहवाल वेळेत सादर करणार नाहीत ते लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम २९-ग अनुसार आयकर विभागाकडून कर लाभ नाकारण्याची प्रक्रिया करण्यात येईल.

(सहा) अंशदान अहवाल, विदेशी अभिदान, (विनियमन) अधिनियम, २०१०, च्या कलम २ च्या खंड (जे) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे विदेशी स्त्रोतांकडून मिळालेल्या कोणत्याही देणगीविषयी, त्या मंत्रालयाकडून छाननी व कार्यवाही करण्यासाठी, गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे सुद्धा पाठवण्यात येईल.

आपला विश्वासू,

सही/-

**मलय मल्लिक,**
अवर सचिव.

प्रत :

संचालक (आय.टी), मुख्य निवडणूक अधिकारी आणि भारत निवडणूक आयोग यांच्या संकेतस्थळातील प्रस्तावित बदल सुकर करण्यासाठी.

* कृपया जोडपत्र फ १० पहा.

# जोडपत्र-अ

...................... आर्थिक वर्षासाठी......................(त्या त्या राज्य/संघराज्यक्षेत्राचे नाव) मान्यता नसलेल्या पक्षांकडून अंशदान अहवाल दाखल केल्याची सद्यःस्थिती.

अहवाल दाखल करण्याची अंतिम तारीख ................................

यादी तयार केल्याची तारीख ................................

| अनु-क्रमांक | पक्षाचे नाव | मुख्यालयाचा/ कार्यालयाचा पत्ता | नियत तारखेला किंवा त्यानंतर दाखल केले | | नियत तारखेनंतर भरलेले | | शेरे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भरल्याची तारीख | दाखवलेली एकूण अंशदानाची रक्कम (रुपयांमध्ये) | भरल्याची तारीख | दाखवलेली एकूण निधीची रक्कम (रुपयांमध्ये) | |
| १ | २ | ३ | ४(अ) | ४(ब) | ५(अ) | ५(ब) | ६ |
| | | | | | | | |

**टीप :** राजकीय पक्षांकडून सादर केलेल्या अहवालाच्या क्रमविक्षण प्रतीस रकाना ४(अ) आणि ५(अ) मध्ये जोडण्यासाठी दिली आहे.

सही/-

दिनांक : मुख्य निवडणूक अधिकारी.

# जोडपत्र-ब

वित्तीय वर्ष २०........ या वर्षासाठी ...................... (संबंधित राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव) ......... मध्ये मुख्यालय/कार्यालयाचा पत्ता असणाऱ्या मान्यता नसलेल्या पक्षाने भरलेल्या वार्षिक लेखा परीक्षा अहवालाची स्थिती.

वार्षिक लेखा परीक्षा अहवाल भरण्याची अंतिम तारीख ................................

यादी तयार केल्याची तारीख ................................

| अनु-क्रमांक | पक्षाचे नाव | मुख्यालयाचा/ कार्यालयाचा पत्ता | नियत तारखेला किंवा त्यानंतर भरले | | | नियत तारखेनंतर भरलेले | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भरल्याची तारीख | एकूण जमा (रुपया-मध्ये) | एकूण खर्च | भर केलेल्याची तारीख | एकूण जमा (रुपया-मध्ये) | एकूण खर्च | |
| १ | २ | ३ | ४(अ) | ४(ब) | ४(क) | ५(अ) | ५(ब) | ५(क) | ६ |
| | | | | | | | | | |

**टीप :** राजकीय पक्षांकडून सादर केलेल्या अहवालाची क्रमविक्षण प्रत स्तंभ ४(अ) आणि ५(अ) ला जोडण्यासाठी दिली आहे.

स्वाक्षरी

दिनांक : मुख्य निवडणूक अधिकारी.

## जोडपत्र-क

....................... २० ....................... सार्वत्रिक निवडणुकीच्या निवडणूक खर्चाचे विवरणपत्र भरण्याची सद्यःस्थिती.

खर्चाचे विवरणपत्र भरण्याचा नियत दिनांक .................................

यादी तयार केल्याचा दिनांक .................................

| अनु-क्रमांक | पक्षाचे नाव | मुख्यालयाचा/ कार्यालयाचा पत्ता | नियत तारखेस किंवा त्यापूर्वी भरलेले | | नियत दिनांकानंतर भरलेले | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भरल्याचा दिनांक | एकूण खर्च (रुपयांत) | भरल्याचा दिनांक | एकूण खर्च (रुपयांत) | |
| १ | २ | ३ | ४(अ) | ४(ब) | ५(अ) | ५(ब) | ६ |
| | | | | | | | |

**टीप :** रकाना ४(अ) व ५(अ) मध्ये राजकीय पक्षांनी सादर केलेल्या अहवालाच्या स्कॅन प्रती जोडण्यात याव्यात.

स्वाक्षरी

दिनांक : मुख्य निवडणूक अधिकारी.

**जोडपत्र-एफ ६**

## भारताचा निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/पीपीईएमएस/पारदर्शकता/२०१३ दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४

प्रति,

१. सर्व राजकीय पक्षांचे अध्यक्ष/प्रधान सचिव
२. सर्व राजकीय पक्षांचे कोषाध्यक्ष.

**विषय :—** दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ रोजी भारताच्या निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांकरिता जारी केलेल्या पारदर्शक मार्गदर्शक सूचनांबाबतचे स्पष्टीकरण-यासंदर्भात.

महोदया/महोदय,

कृपया, आयोगाचे पत्र क्रमांक ७६/पीपीईएमएस/पारदर्शकता/२०१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१४ पहावे, त्यात संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये आयोगाने राजकीय पक्षांकरिता पारदर्शक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आयोगाच्या अधिकारांसंबंधात शंका उपस्थित करणारे आणि विवक्षित मुद्यांबाबत स्पष्टीकरण मागणारी निवेदने काही राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेली आहेत. ही निवेदने विचारात घेतल्यानंतर याद्वारे, पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :—

१. संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये, आयोगाला देशात मुक्त व निःपक्षपातीपणे निवडणुका घेण्यासाठी पूर्ण अधिकार आहेत आणि त्याचबरोबर, ते पवित्र कार्यही आहे. अलिकडेच, निवडणुकीच्या प्रचार मोहिमेत काळ्या पैशाचा वापर वाढताना दिसून येत आहे आणि त्यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण निर्माण होताना दिसत आहे. निवडणुकांमध्ये काळ्या पैशांच्या वापरामुळे निःपक्ष वातावरण बाधित होत आहे आणि निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्याला बाधा निर्माण होत आहे. म्हणून, निवडणुकीचे पावित्र्य राखण्यासाठी आणि संविधानात निहित असल्याप्रमाणे मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका घेण्यासाठी, पारदर्शक मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची गरज होती. या क्षेत्रात कायदेशीर पोकळी निर्माण झाली होती जी, मोहिंदर सिंघ गील विरुद्ध सीईसी ( एआयआर १९७८ एससी ८५१ ) यावर सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे भारताच्या निवडणूक आयोगाला भरून काढता येणे शक्य आहे.

२. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांबरोबर यथोचित विचारविनिमय करून मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत. अनुच्छेद ३२४ अन्वये आयोगाने अशाप्रकारे घालून दिलेले हे कायदेशीर अनुदेश सर्व राजकीय पक्षांना बंधनकारक आहेत आणि त्यांचे केलेले उल्लंघन हे, लोकशाहीचे मूलभूत तत्त्व असलेल्या, निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर परिणाम करेल.

३. राजकीय पक्षांनी आयोगाकडे वार्षिक लेखापरीक्षित लेखे दाखल करण्याचे अनुदेश हे, राजकीय पक्षांच्या कामकाजात पारदर्शकता राखण्यासाठी अत्यावश्यक आहेत, जे मुक्त व निःपक्ष निवडणुकांचा अत्यावश्यक भाग आहे. राजकीय पक्षांना कोणताही निधी हा, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम २९ख मध्ये घालून दिलेल्या प्रतिबंधित स्त्रोताद्वारे मिळालेला नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी, राजकीय पक्षांना, देणग्या घेताना, त्या व्यक्तीचे, कंपन्यांचे आणि संस्थांचे नाव व पत्ता लिहून ठेवण्याचे निदेश, याच उद्देशाने घालून दिलेले आहेत. तथापि, आयोगाला, राजकीय पक्ष सार्वजनिक बैठका/प्रचारयात्रामध्ये हुंडी/बकेट कलेक्शनमार्फत निधी उभारतात, ज्यात देणगीदारांचे नाव व पत्ता यांची नोंद ठेवणे शक्य होत नाही, याची आयोगाला जाणीव आहे. म्हणून, आयोगाने, वरील अनुदेशांच्या कक्षेमधून अशा रीतीने गोळा केलेल्या वर्गणीला सूट दिलेली आहे. सार्वजनिक बैठकी/प्रचारयात्रांमधून हुंडी/बकेट संकलनामार्फत उभ्या केलेल्या वर्गणीखेरीज इतर सर्व प्रकारच्या वर्गणीच्या बाबतीत, राजकीय पक्षांनी, प्रत्येक देणगीदाराचे नाव व पत्ता याची नोंद ते इतर सर्व जनता/नागरी संस्था/संघटना यांच्याकडून केलेले असल्यामुळे, ठेवायलाच हवी.

४. राजकीय पक्षांनी स्वीकारलेली रोख रक्कम, त्यांचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेली खर्चाची रक्कम वगळून, १० कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीच्या आत, त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करावी. असे स्पष्ट करण्यात येते की, नोंदणीकृत राजकीय पक्षांनी त्यांचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी हातची एकूण रोख रक्कम ही, सर्वसाधारणपणे गेल्या वित्तीय वर्षामधील पक्षाच्या सरासरी मासिक खर्चाच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

५. सर्व राजकीय पक्षांनी, भारताच्या निवडणूक आयोगासमोर, त्यांच्या निवडणूक खर्चाचे विवरणपत्र सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला अनुसरून भारताच्या निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या विधानसभेच्या निवडणुकांच्या ७५ दिवसांच्या किंवा लोकसभेच्या निवडणुकांच्या ९० दिवसांच्या आत, सादर करणे आवश्यक आहे आणि त्याचबरोबर, पक्षांनी निर्धारित केलेल्या कालावधीच्या आत, त्यांच्या निवडणूक खर्चाचे खरेखुरे व अचूक विवरणपत्रदेखील दाखल करणे आवश्यक आहे. सर्व राजकीय पक्षांकडे आणि उमेदवारांकडे बँक खाते असल्यामुळे आणि त्याबरोबर, बँका, उक्त पारदर्शक मार्गदर्शक तत्त्वांचा परिच्छेद (चार) मध्ये नमूद केलेल्या प्रदानाव्यतिरिक्त बँक खात्यातून, आदात्याच्या खात्यावर जमा करावयाच्या धनादेशाद्वारे रेखित धनादेशाद्वारे किंवा धनाकर्षाद्वारे किंवा खात्यात हस्तांतरित करून, प्रत्येक व्यक्तीस किंवा संस्थेस रुपये २०,००० पेक्षा अधिक रकमेचे प्रदान करतील, अशा विस्तारित सेवा देत आहेत. यामुळे, निवडणुकीच्या काळात पैशांच्या वाढत्या ओघाला आळा घालण्यास मदत होईल आणि पक्षांच्या निवडणूक खर्चातही पारदर्शकता येईल.

६. निवडणुकीच्या काळात सर्व राजकीय पक्षांच्या आणि उमेदवारांच्या बाबतीत सर्व समभाव ठेवण्यासाठी, आयोग आटोकाट प्रयत्न करीत आहे. निवडणुका मुक्त व निःपक्ष घेण्याच्या दृष्टीने, सर्व पक्षांनी आयोगाने घालून दिलेल्या पारदर्शी मार्गदर्शक तत्त्वांचे अनुसरण करणे आवश्यक आहे आणि आयोगाच्या कायदेशीर निदेशांचे उल्लंघन हे, निवडणूक चिन्ह (आरक्षण व नियतवाटप) आदेश, १९६८ याच्या परिच्छेद १६अ मध्ये घालून दिल्याप्रमाणे, कारवाईस पात्र ठरू शकेल.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी

**मलय मल्लिक,**
अवर सचिव.

* कृपया जोडपत्र ई ११ आणि ई १२ पहा.

**जोडपत्र-एफ ६**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड-दोन दिनांक ८ सप्टेंबर, २०१५

प्रति,

सर्व राज्ये/संघ राज्येक्षेत्रे यांचे सर्व मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय.—** निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत राजकीय पक्षांनी उमेदवारांबाबतच्या निवडणूक खर्चाचे विवरणपत्र भागशः सादर करण्याबाबत.

महोदया/महोदय,

निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्याच्या ३० दिवसांच्या आत राजकीय पक्षांनी, उमेदवारांबाबतच्या निवडणूक खर्चाचे विवरणपत्र भागशः दाखल करण्यासंबंधातील, आयुक्तांचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड-दोन, दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ याची प्रत यासोबत अग्रेषित करण्याचा मला आदेश असून ती आपल्या राज्य/संघ राज्यक्षेत्रे यांमधील सर्व राजकीय पक्षांच्या निदर्शनास आणून देण्याची आपणास विनंती आहे. पक्षाकडे या संबंधात केलेल्या पत्रव्यवहाराची एक प्रत आयोगाकडे त्यांच्या संदर्भ आणि अभिलेख्यासाठी पाठविण्यात यावी.

२. आपणांस आणखी अशी विनंती आहे की, मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांच्या उमेदवारांसंबंधीचा आणि निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर केलेला निवडणूक खर्च मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला तो प्राप्त झाल्यावर ३ दिवसांच्या आत संकेतस्थळावर टाकण्यात यावा. आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ईई/२०१२-पीपीइएमएस, दिनांक २१ जानेवारी, २०१३ आणि पत्र क्रमांक ७६/पीपी इएमएस/पारदर्शी/२०१३, दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राजकीय पक्षांनी निवडणूक खर्च दाखल करण्यासंबंधातील अनुदेश यापुढेही अंमलात राहतील याची नोंद घ्यावी.

३. कृपया पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी,

**अविनाश कुमार,**
सचिव.

प्रत रवाना :

राजकीय पक्ष निवडणूक खर्च संनियंत्रण कक्ष व एसडीआर कक्ष.

# भारत निवडणूक आयोग

## निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६ /अनुदेश/२०१५/ईईपीएस/खंड-दोन दिनांक ८ सप्टेंबर, २०१५

प्रति,

अध्यक्ष/महा सचिव,

१. सर्व राष्ट्रीय पक्ष

२. सर्व राज्य पक्ष,

३. सर्व मान्यताप्राप्त नसलेले पक्ष,

**विषय.--निवडणुकीचा निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत राजकीय पक्षांनी उमेदवारांबाबतच्या निवडणूक खर्चाचे विवरणपत्र भागशः दाखल करण्याबाबत.**

महोदया/महोदय,

मी, आयोगाचे पत्र क्र. ७६/ईई/२०१२-पीपीएमएस. दिनांक २१ जानेवारी २०१३ आणि पत्र क्र. ७६/पीपीईएमएस./पारदर्शक/२०१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१४ (प्रती जोडल्या आहेत) यांच्याकडे आपले लक्ष वेधल्याचा आणि असे सांगण्याचा मला आदेश आहे की, राजकीय पक्षांनी विधानसभा/लोकसभा यांची सार्वत्रिक निवडणुक समाप्त झाल्यापासून ७५ दिवसांच्या/९० दिवसांच्या आत आपले निवडणुक खर्चाचे विवरणपत्र (राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या बाबतीत) भारत निवडणूक आयोगाकडे किंवा (मान्यता नसलेल्या पक्षांच्या बाबतीत, जेथे पक्षाचे मुख्यालय स्थित असेल तेथे) दाखल करावे.

२. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अन्वये ठेवावयाचा आणि राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवडणुकीसंबंधात केलेला किंवा प्राधिकृत केलेला एकूण खर्च हा निवडणुका घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम ९० अन्वये विहित करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे, राजकीय पक्ष, निवडणुकीत त्याच्याकडून उभे करण्यात आलेल्या उमेदवारांना, त्यांच्या निवडणूक खर्चासाठी एकतर रोख किंवा वस्तू स्वरूपात अंशदाने/देणग्या देत असतात आणि उमेदवारांना असा खर्च त्यांच्या विवरणपत्रांमध्ये दाखवावा लागतो. राजकीय पक्षांच्या आणि उमेदवारांच्या लेख्यांच्या (हिशेबांच्या) पारदर्शकतेसाठी आणि त्यांचा मेरू घालण्यासाठी, आणि संविधानाच्या अनुछेद ३२४ अन्वये आयोगाच्या ठायी निहीत असलेल्या अधिकाऱ्यांराचा वापर करून, असे ठरविण्यात आले आहे की, राजकीय पक्षांनी उमेदवारांना प्रदान केलेल्या ठोक रकमेच्या संबंधात (विधानसभा) लोकसभा यांची सार्वत्रिक निवडणूक समाप्त झाल्यापासून ७५ दिवसांच्या ९० दिवसांच्या आत), (एक) भागशः विवरणपत्र, आणखी, (दोन) पक्षांनी वरील प्रमाणे दाखल करणे आवश्यक असलेल्या निवडणूक खर्चाचे अंतिम विवरणपत्र, विधानसभा/लोकसभा यांच्या निवडणुकीचा निकाल घोषित झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत, (राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या बाबतीत) भारत निवडणूक आयोगाकडे किंवा (मान्यता नसलेल्या पक्षांच्या बाबतीत, जेथे पक्षाचे मुख्यालय स्थित असेल तेथे) राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे दाखल करावे.

३. येथे पुन्हा असे उद्‌भूत करण्यात येते की, राजकीय पक्षांनी उमेदवारांच्याबाबतच्या निवडणूक खर्च, आयोगाचे पत्र, क्र. ७६/पीपीईएमएस/पारदर्शक/२०१३, दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ (वर नमूद केलेल्या व जोडलेल्या) यांच्या परिच्छेद ३ (एक) मध्ये उलेल्ख केल्याप्रमाणे समदी लेखापालाकडून प्रमाणिक करण्यात यावा.

४. कृपा करून या पत्राची पोच देण्यात यावी.

प्रत

आपला,

सही,

**(एस. के. रूडोला),**

सचिव,

राजकीय पक्षाच्या खर्चावर सनियंत्रण करणारी शाखा (पीपीईएमएस) आणि एसडीआर शाखा यांना प्रत.

## जोडपत्र-अ

पक्षाचे नाव :

मान्यताप्राप्त आहे किंवा कसे : ........................... (होय किंवा नाही)

निवडणुकीचे नाव :

निवडणूक घोषित केल्याच्या दिनांक :

निवडणूक समाप्त झाल्याच्या दिनांक :

धनादेश/डीडी//पीओ/आरटीजीएस/निधी हस्तांतरण, इत्यादी स्वरूपात पक्षाच्या उमेदवारांसाठी (उमेदवारांसाठी) किंवा इतर उमेदवारासाठी (उमेदवारांसाठी) पक्षाने प्राधिकृत केलेले/केलेले एकूण ठोक रकमेचे प्रदान (प्रदाने) कोणतीही असल्यास, जर राजकीय पक्षाने उमेदवाराला एकापेक्षा अधिक प्रसंगी प्रदान केले असल्यास ते दिनांकानिहाय तपशील नमूद करावा.

| अनु. क्रमांक (१) | राज्याचे नाव/विधानसभा/ किंवा लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव (२) | उमेदवारांचे नाव (३) | प्रदान केल्याचा दिनांक (४) | रोख रक्कम (५) | धनादेश/डीडी/पीओ आरटीजीएस/निधी हस्तांतरण इत्यादी (६) | एकूण (५+६) (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | | | **एकूण बेरीज** | |

दिनांक

स्वाक्षरी (राजकीय पक्षाचा कोषाध्यक्ष)

टीप.—पक्षाच्या केंद्रीय मुख्यालयाद्वारे अधिकृत किंवा शाखेद्वारे केलेले/प्राधिकृत केलेले (प्रदान) स्वतंत्र जोडपत्रात दाखल करण्यात आले.

**जोडपत्र--एफ-८**

**भारत निवडणूक आयोग**

**निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

क्रमांक ७६ /ईसीआय/अनुदेश/एफयुएनसी/ईईएम/ईईपीएस/२०१९/खंड-सतरा दिनांक ८ मे, २०१९

प्रति,

सर्व राज्ये आणि संघराज्ये क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय.—उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणापत्राची आणि राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाच्या विवरणापत्राची सुधारित नमुना संबंधित.**

महोदया/महोदय,

मला, आयोगाचे पत्र क्रमांक ३/४/२०१७/एसडीआर/खंड-दोन, दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ आणि पत्र क्रमांक ३/४/२०१९/एसडीआर, खंड-एक, दिनांक १९ मार्च २०१९ (प्रती जोडलेल्या आहेत) नुसार संदर्भ देण्याचे आणि आयोगाने उमेदवारांच्या (टिव्ही आणि वृत्तपत्रे) आणि राजकीय पक्षांच्या (वेबसाईट, टिव्ही आणि वृत्तपत्रे) गुन्हेगारी पूर्वेतिहासाच्या विनिर्दिष्ट कालावधीत तीनदा केल्या जाणाऱ्या (एफएक्यू) वारंवार विचारले जाणारे प्रश्न प्रसिद्धीवरील निवडणूक खर्चाच्या हिशेबाबद्दल जारी केले आहेत. हे सांगण्याचे निदेश दिले आहेत.

२. आयोगाने, त्याच्या पत्र क्रमांक ७६/ईसीआय/अनुदेश/कार्ये/ईईएम/इपीएस/२०१६/खंड नऊ द्वारे दिनांक १३ जानेवारी २०१७ रोजी अधिनियम, १९५१ याच्या कलम ७८ अन्वये निकाल घोषित झाल्याच्या ३० दिवसांच्या आत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने सादर करावयाच्या संक्षिप्त विवरणपत्राच्या स्वरूपा संदर्भात एक अनुदेश जारी केला होता. ["निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणावरील अनुदेशांचा सारसंग्रहाचे जोडपत्र-ई-२ (फेवारी, २०१९)"] वर नमूद केलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) लक्षात घेऊन उमेदवाराने त्याच्या गुन्हेगारी पूर्वेतिहास प्रकाशनासाठी केलेला खर्च समाविष्ट करण्यासाठी उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचा संक्षिप्त विवरणाच्या *स्वरूपात सुधारणा करण्यात आली आहे.

३. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ७६/ईई/२०१२-पीपी ईएमएस, दिनांक २१ जानेवारी २०१३ नुसार अनुक्रमे विधान सभा/लोक सभा निवडणूका पूर्ण झाल्याच्या ७५ दिवस/९० दिवसांमध्ये मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यासमोर (मान्यता नसलेले पक्ष) आणि भारत निवडणूक आयोगायाच्यासमोर देखील (मान्यता प्राप्त पक्ष) यांनी विहित नमुन्यात त्यांच्या निवडणूक खर्चाचे विवरण सादर करणे आवश्यक आहे [" निवडणूक खर्च संनियंत्रणातीवरील अनुदेशांचा सारसंग्रह याचे जोडपत्र-एफ-२) वर नमूद केलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) मधीलआयोगाद्वारे जारी केलेले निदेश लक्षात घेऊन, राजकीय पक्षांनी त्यांच्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या प्रकाशनासाठी केलेला खर्च समाविष्ट करण्याच्या नमुन्या**मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

४. आपणांस विनंती आहे की, आंध्रप्रदेश, अरूणाचल प्रदेश, ओडिशा आणि सिक्कीम या राज्यांच्या लोकसभा विधानसभांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये व पोट-निवडणुकां २०१९ मध्ये राज्ये/संघराज्य क्षेत्रातील सर्व प्रतिस्पर्धा उमेदवार आणि मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांच्या, त्यांचा निवडणूक खर्च केवळ सुधारित नमुन्यात (फॉर्ममध्ये) सादर करावा यावर भर देऊन ते, त्यांच्या निदेशानास आणून द्या हीच बाब आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक आणि इतर निवडणूक प्राधिकारी यांच्या निदर्शनास देखील आणून देण्यात यावी.

५. या संदर्भात जारी केलेल्या सूचनेची प्रत आयोगाला पृष्ठांकनासाठी पाठविण्यात येईल.

आपला विश्वासू,
स्वाक्षरी

**राजन जैन,**
अवर सचिव.

प्रत सादर :—

१. सर्व राष्ट्रीय आणि राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्ष (विशेष संदेश वाहकाद्वारे/शीघ्र डाकेने)

२. वरिष्ठ पीपीएस/पीपीएस/पीएएस/पीएसएस ते वरिष्ठ डीइसी (युएस) डीईसी (एसएस) डीईसी (एसजे) आणि डीईसी (सीबीके).

३. क्षेत्रीय वरिष्ठ पीआर. प्रधान सचिव/सचिव/अवर सचिव यांचे स्वीय सहाय्यक/स्वीय सचिव, क्षेत्रीय विभाग, सीईएमएस-दोन, पीपीईएमएस, एसडीआर, आरसीसी.

स्वाक्षरी

**राजन जैन**

अवर सचिव.

**टीप**.--*उमेदवासाठी निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण सुधारित नमुन्यात जोडपत्र इ-२ मध्ये दिले आहे.

** राजकीय पक्षांचे निवडणूक खर्चाचे विवरण सुधारित नमुन्यात जोडपत्र एफ-३ मध्ये दिले आहे.

[ राजकीय पक्ष आणि उमेदवारांद्वारे गुन्हेगारी पूर्वितिहास प्रसिद्धीसाठी भारत निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्वे भारत निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरील *www. eci.gov.in* या लिंक वर उपलब्ध आहे.

**महत्वाची सूचना**.---माननीय सर्वोच्य न्यायालयाचा दिनांक १० ऑगस्ट २०२१ रोजीचा न्याय निर्णयानुसार राजकीय पक्ष आणि उमेदवाराद्वारे गुन्हेगारी पूर्वितिहासाच्या प्रसिद्धीसाठीची अद्ययावत मार्गदर्शक तत्वे संबंधित

आणि

**https://eci.gov.in/files/file/13949-अद्यवत/मार्गदर्शक-तत्वे-वर गुन्हेगारी-पूर्वेतिहास राजकीय-पक्ष आणि-उमेदवार in-light-of-the-माननीय सर्वोच्च-न्यायालय-दिनांक १० आगस्ट २०२१-संबंधित/]**

**जोडपत्र—एफ-९**

## भारत निवडणूक आयोग

**निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.**

क्रमांक ७६ आभासी प्रचार/इपीएस/२०२२. दिनांक १५ जानेवारी २०२२

प्रति,

सर्व राज्ये आणि संघराज्ये क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय.--**उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणाचा आणि राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाचे विवरण याचा सुधारित नमुना यासंबंधित.

महोदया/महोदय,

मला, उमेदवारासाठी निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण, आणि राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाच्या विवरणायाच्या नमुन्याच्या शेवटच्या पुनरीक्षणासंबंधात आयोगाचे पत्र क्र. ७६/इसीआय/अनु./फंकशन/ईएम/ईईपीएस/ २०२९/खंड सतरा, दिनांक ८ मे, २०१९ (प्रत सोबत जोडले आहे) याचा संदर्भ देण्याचे आणि आणि निवडणुकीतील उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या अभासी प्रचारांचा वाढता कल लक्षात घेता, आयोगाने, उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण आणि राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाचे विवरण यांचे स्वरूप सुधारण्याचा निर्णय घेतला आहे असे कळविण्याचा निदेश दिला आहे.

२. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम ७८ अन्वये संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे निवडणूक निकालाच्या घोषणेच्या ३० दिवसांच्या आत लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम ७७ अन्वये उमेदवारांनी ठेवणे आवश्यक असलेल्या दैनंदिन हिशेब नोंदवही सोबत उमेदवाराने त्यांचे निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणाचा विद्यमान नमुना अनुसूची ११ मधील आणि भाग दोन मधील ओळ आठ मध्ये आभासी प्रचारातील उमेदवाराने केलेल्या खर्चाचा समावेश करण्यासाठी सुधारित करण्यात आला. उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाच्या संक्षिप्त विवरणाचा सुधारित नमुना * सोबत जोडलेला आहे.

३. राजकीय पक्षांनी देखील विधानसभा आणि लोकसभा निवडणुका पूर्ण झाल्याच्या अनुक्रमे ७५ दिवस/९० दिवसात त्यांच्या निवडणूक खर्चाचे विवरण भारताचे निवडणूक आयोग (मान्यताप्राप्त राजकीय पक्ष) आणि संबंधित मुख्य निवडणूक अधिकारी (मान्यताप्राप्त नसलेले राजकीय पक्ष) यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाच्या विवरणाचा विद्यमान नमुना अनुसूची २४ए आणि २४ बी, ओळ ५.४ (सात), ओळ ६.४ (सात) आणि ओळ ७ जी (तीन) मध्ये आभासी प्रचारात राजकीय पक्षांनी केलेला खर्च समाविष्ट करण्यासाठी सुधारित करण्यात आला. राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाच्या विवरणपत्राचा सुधारित नमुना ** सोबत जोडला आहे.

४. तुम्हाला विनंती करण्यात येते की, ही बाब कृपया सर्व प्रतिस्पर्धा उमेदवारांना आणि राजकीय पक्षांना त्यांचा निवडणूक खर्च केवळ सुधारित नमुन्यातच भरावा असे ठासून सांगण्यासाठी त्यांच्या असे निदर्शनास आणून द्या की त्यांनी ही बाब आवश्यक कार्यावाहीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, खर्च निरीक्षक आणि इतर निवडणूक प्राधिकरण यांच्या निदर्शनास देखील आणावी.

५. या संदर्भात जारी केलेल्या सूचनेची एक प्रत आयोगाला पाठविण्यात यावी.

आपला विश्वासू,

**अनुप कुमार खाखलारी,**
अवर सचिव.

**प्रत सादर :—**

१. सर्व राष्ट्रीय आणि राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्ष (विशेष संदेश वाहकाद्वारे/स्पीड पोस्टाने).

२. वरिष्ठ पीपीएस/पीपीएस/पीएसएस/पीएएस ते एसजी, वरिष्ठ डीईसीएस, वरिष्ठ पीआर. सचिव, संचालक, पीआर, सचिव, सचिव.

३. सीइएम एस-एक, दोन, तीन, चार आणि पीपीईएमएस.

**अनुप कुमार खाखलारी,**

अवर सचिव.

**टीप.**—# आयोगाचे पत्र क्रमांक ७६/इसीआय/अनुदेश/एफयुएनसी/इइएम/इइपीएस/२०१९/खंड, सतरा, दिनांक ८ मे, २०१९ हे जोडपत्र एफ-८ मध्ये दिले आहे.

* उमेदवारासाठी निवडणूक खर्चाचे संक्षिप्त विवरण सुधारित नमुन्यात जोडपत्र ई-२, मध्ये दिले आहे.

** राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चाचे विवरण सुधारित नमुन्यात जोडपत्र एफ-३ मध्ये दिले आहे.

**जोडपत्र—एफ-१०**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ५६ /एए/२०२०-२१/पीपीईएमएस दिनांक २१ जानेवारी २०२२

प्रति,

राजकीय पक्षांचे अध्यक्ष/प्रधान सचिव/कोषाध्यक्ष,

(यादी सोबत जोडली)

**विषय.—राजकीय पक्षांनी वार्षिक लेखापरिक्षीत सादर करणे संबंधित.**

महोदय/महोदया,

मला, वर नमूद केलेल्या विषयाचा संदर्भ देण्याचे आणि आयोगाने दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रा अन्वये जारी केलेल्या आयोगाची पारदर्शकता मार्गदर्शक तत्वे याकडे तुमचे लक्ष वेधण्याचा आदेश दिला आहे. ज्यामध्ये असे निर्देश दिले आहेत की, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी सनदी लेखापालाकडून त्यांचे वार्षिक लेखापरिक्षीत लेखे प्रमाणित, करून भारताच्या निवडणूक आयोगाकडे सादर करावे. तसेच ते मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांनीदेखील प्रत्येक वर्षाच्या ३१ ऑक्टोबरपूर्वी प्रत्येक वित्तीय वर्षासाठी विहित केलेल्या पद्धतीने संबंधित राज्ये आणि संघराज्य क्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे म्हणजेच जेथे राज्यातील पक्षाचे मुख्यालय स्थित असेल ते ठिकाण सादर करावे.

२. आयकर अधिनियम, १९६१ अन्वये राजकीय पक्षाने आयकर विवरण भरण्यासाठी नियत दिनांकासोबत राजकीय पक्षांनी वार्षिक लेखापरिक्षीत लेख्याचे सादरीकरण करण्याचा नियत दिनांक जोडण्याचे अंतिम आयोगाने ठरविले आहे.

३. त्यानुसार, सर्व राजकीय पक्षांनी आयकर अधिनियमाच्या कलम १३९ नुसार राजकीय पक्षांसाठी आयकर विवरण भरण्याच्या अंतिम दिनांकापासून एक महिन्यांच्या आत त्यांचे वार्षिक लेखापरिक्षीत लेखे सादर करावे. हे वित्तीय वर्ष २०२०-२१ साठी आणि त्यानंतरच्या वर्षांसाठी लेखापरिक्षीत लेख्याचे सादरीकरण करण्यासाठी लागू असेल.

आपला विश्वासू,

**कुमार राजीव,**
सचिव.

**प्रत :**

१. सर्व राज्ये आणि संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी त्यांच्या संबंधित राज्यांच्या सर्व राजकीय पक्षाच्या लक्षात आणून देण्याच्या विनंतीसह प्रत रवाना.

**कुमार राजीव,**
सचिव.

**सूचना :** कृपया जोडपत्र एफ-४ पहा.

# जी.

# भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमू, एटीएम व्हॅन, हेलिकॉप्टरची तपासणी इत्यादींसाठी आणि आयकर विभाग इत्यादीद्वारे संनियंत्रणासाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती

आयोगाचे अनुदेश एकसारखेपणाने कार्यान्वित करणे आणि योग्य कार्यपद्धतीनुसार भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमू ATM व्हॅनद्वारे रोख रकमेची वाहतूक हेलिकॉप्टर्स/विमानाची तपासणीसाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धतीचे अनुसारण केलेले आहे. आणि त्यांच्या कार्यान्वयनाच्या कामामध्ये गुंतलेला कर्मचारी वर्ग आणि अधिकाऱ्यांची सोयीसाठी बिगर वाणिज्यिक विमानतळे/ हेलिपॅड यावरील तपासणी करण्याची पद्धत तयार केलेली आहे.

**अ. भरारी पथक आणि स्थिर संनिरीक्षण चमूसाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती :**

निवडणुकांची पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाच्या पत्र क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस/२०१५/खंड दोन, दिनांक २९ मे २०१५ (**जोडपत्र जी-७**) यानुसार निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदारसंघामध्ये निवडणूक प्रचारावरील अत्याधिक खर्च, रोख, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात लाच देणे, बेकायदेशीरपणे शस्त्रास्त्रे, शस्त्रे, दारू जवळ बाळगणे किंवा समाजघातक कृत्ये यांवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली भरारी पथके, स्थिर संनिरीक्षण चमू व तपासणी नाका यांकरिता प्रमाणित कार्यचालन कार्यपध्दती तयार करण्यात आली आहे. विहित नमुन्यात (**जोडपत्र बी ८, बी ९, आणि बी १०**) भरारी पथके व स्थिर संनिरीक्षण चमू यांच्याकडून दैनिक कामकाज अहवाल सादर करण्यात यावेत. प्रत्येक भरारी पथकाच्या व स्थिर संनिरीक्षण चमूच्या सदस्यांना शक्यतो एका दिवसामध्ये ८ तासांपेक्षा अधिकच्या कालावधीसाठी कामावर नेमता येणार नाही व त्यांना मतदान/पुनर्मतदान झाल्यानंतर तात्काळ मुक्त करण्यात यावे.

**जोडपत्र जी-९** नुसार कोणत्याही स्वरूपात रोख रकमेचा साठा किंवा इतर मैल्यवान वस्तू इत्यादींच्या संबंधित तक्रारी मिळाल्यावर भरारी पथकाद्वारे कार्यवाही करण्यासाठी आयोगाने प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती निर्गमित केलेली आहे.

जप्त करण्यात आलेली रक्कम ही त्या विषयी न्यायालयात दाथल करण्यात आलेल्या प्रकरणावर अंतिमरीत्या निकाल देण्यात येईपर्यंत व हा कालावधी अभिरूप निरीक्षण नोंदवहीत दाखल करण्यात येईपर्यंत ती उमेदवारांचा निवडणूक खर्च असल्याचे समजण्यात येणार नाही. तक्रार/प्राथमिक माहिती अहवाल यांची प्रत पुराव्यांच्या संचयिकेत ठेवील (आयोगाचे निदेश क्र. ७६/निदेश/२०१३/इइपीएस/आवृत्ती पाच, दिनांक १८ एप्रिल २०१३ जोडपत्र-जी-३).

**(ब) एटीएम वाहन व इत्यादीद्वारे रोख रक्कम घेऊन जाण्यासाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती :**

वित्त मंत्रालयाद्वारे (वित्तीय सेवा विभाग) विहित केलेल्या प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धतीप्रमाणे **जोडपत्र-जी-2** नुसार प्रत जोडली आहे. याचा पुनरुच्चार करण्यात येत आहे की, बँकानी रोख रक्कम घेऊन जाण्यासाठी पुढील कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे :-

(**एक**) बँक याबाबतची खात्री करील की बँकेची रोख रक्कम घेऊन जाणारी बाह्यस्त्रोत एजन्सी/कंपन्यांच्या रोख रकमांच्या व्हॅनमधून कोणत्याही परिस्थितीत बँकांशिवाय अन्य कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या एजन्सींची/व्यक्तीगत स्वरूपाची रोख रक्कम घेऊन जाणार नाहीत. याबाबतीत, बाह्यस्त्रोत एजन्सी/कंपन्या या एटीएममध्ये रोख रक्कम भरण्यासाठी आणि इतर शाखा, बँका किंवा तिजोऱ्या येथे रोख पोहचविण्यासाठी त्यांच्याकडे बँकांनी दिलेली रोख रक्कम आणि ते घेऊन जात असलेली रोख रक्कम याबाबतचा तपशील असलेली बँकानी दिलेली पत्रे/कागदपत्रे इत्यादी सोबत ठेवील.

(**दोन**) रोख रकमेच्या व्हॅनमध्ये असलेले बाह्यस्त्रोत एजन्सीचे/कंपन्यांचे कर्मचारी, आपल्या एजन्सींनी दिलेली ओळखपत्रे सोबत ठेवतील.

(**तीन**) पूर्वोक्त कार्यपद्धतीमध्ये पुढील कारणासाठी अशी अट घालण्यात आली आहे की, निवडणुकीच्या कालावधीमध्ये जर निवडणूक आयोगाच्या प्राधिकृत कर्मचाऱ्यांनी (जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा कोणताही अन्य प्राधिकृत कर्मचारी) बाह्यस्त्रोत एजन्सीची/कंपनीची रोख रकमेची व्हॅन तपासणीसाठी मध्येच अडवली तर, अशा कंपनीने/एजन्सीने, बँकेच्या सूचनांनुसार बँकांच्या एटीएममध्ये रोख रक्कम पुन्हा भरण्याच्या किंवा बँकांच्या काही अन्य शाखामध्ये किंवा तिजोऱ्यांमध्ये रोख रक्कम पोहचविण्याच्या प्रयोजनासाठी बँकांकडून त्यांनी रोख रक्कम गोळा केली आहे, ही बाब अशी चलनी नोटांच्या संबंधातील कागदपत्रांद्वारे व प्रत्यक्ष तपासणीद्वारेदेखील स्पष्टपणे दाखवून देण्याच्या स्थितीत ती एजन्सी/कंपनी असावी.

(**चार**) पूर्वोक्त कार्यपद्धती ही, रोख रक्कम घेऊन जाण्याबाबत बँकांच्या प्रमाणित कार्यचालन नियमांचा व कार्यपद्धतीचा भाग असेल (जोडपत्र-जी-२).

निवडणुकीच्या कालावधीत संशयास्पद किंवा बेकायदेशीर रोख रक्कम, विदेशी चलन व बनावट भारतीय चलनी नोटा (एफआयसीएन) इत्यादी आढळून आल्यास त्या संबंधातील माहिती जिल्ह्यातील संबद्ध अंमलबजावणी एजन्सींना देण्यात यावी.

आयकर विभागच्या अन्वेषण संचालनालयाची निवडणुकीच्या कालावधीत, नियुक्ती करण्यात येईल आणि ते भारताचा निवडणूक आयोग पत्र क्र. ७६/सूचना/इपीएम/२०१३/खंड दोन, दिनांक १६ जानेवारी २०१३ (जोडपत्र जी-१) यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्ये पार पाडील. आयकर सहायक/उप संचालक, आयकर (अन्वेषण) यांचेकडून असा दैनंदिन कार्य अहवाल सुधारित नमुन्यानुसार (**जोडपत्र बी-११**) संबंधित महासंचालक (अन्वेषण)/उप संचालक (अन्वेषण) कार्यालयाच्या अशा नोडल अधिकाऱ्याला पाठविण्यात येईल, जो अशा अहवालांचे क्रमाक्रमाने संकलन करील व त्या अहवालांची एक प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवून एक प्रत प्रत्येकी दिवसाआड ते अहवाल निवडणूक आयोगाला पाठविल.

**क. हेलिकॉप्टर्स/खाजगी विमानांच्या तपासणीची प्रमाणित कार्यचालन पद्धती :**

नागरी विमानचालन सुरक्षा केंद्राने, अन्य सर्व निदेशांचे अधिक्रमण करून, कार्यालयीन ज्ञापन क्रमांक सीएएस-७(१५)/२०१२/विभाग-एक (निवडणूक), दिनांक ३ जुलै २०१३ व पूरकपत्र क्रमांक सीएएस-७(१५)/२०१२/विभाग-एक (निवडणूक) दिनांक ११ऑक्टोबर २०१३ **(जोडपत्र जी-४, जी-५ आणि जी-६)** याद्वारे पुढील उपाययोजनांची शिफारस करणाऱ्या सूचना दिलेल्या आहेत :

**वाणिज्यिक विमानतळांवर प्रवासास सुरूवात करण्यापूर्वीची तपासणी :**

(एक) निवडणूक प्रक्रियेच्या काळात विमातळांवर व्यक्तींची व त्यांच्या सामानाची तपासणी करण्यासंबंधातील व शस्त्रे लपविलेली आहेत का हे पाहण्यासाठी झडती घेण्यासंबंधातील सर्व नियमांचे व कार्यपद्धतीचे कोणत्याही अपवादाखेरीज काटेकोरपणे पालन करण्यात येईल. मतदान घेण्यात येणाऱ्या राज्यात कार्यचालनात असलेल्या विमानतळांमधील वाणिज्यिक/भाड्याने घेतलेल्या विमानांसह कोणत्याही विमानात/हेलिकॉप्टरमध्ये चढणाऱ्या सर्व प्रवासी (या नियमांतर्गत सूट देण्यात आली आहे असे प्रवासी वगळून) व सर्व सामान (या नियमांतर्गत सूट देण्यात आली आहे असे सामान वगळून) यांची प्रवासास सुरूवात करण्यापूर्वी सुरक्षा तपासणी केंद्रांमार्फत तपासणी करण्यात येईल.

(दोन) वाणिज्यिक विमानतळांवर भाड्याने घेतलेली (स्थिर पंख असलेल्या विमानांसह) विमाने व हेलिकॉप्टर्स उतरण्यासाठी किंवा उड्डाण करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही. वाणिज्यिक विमानतळांवरील हवाई वाहतूक नियंत्रण (ATC) कक्ष शक्य तितक्या लवकर विशेष करून अर्धा तास अगोदर भाड्याने घेतलेली विमाने किंवा हेलिकॉप्टर्सच्या प्रवासाच्या योजनेबद्दल राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास आणि ज्या ठिकाणी विमानतळ स्थित असेल त्या ठिकाणच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला कळवील.

(तीन) तथापि, निवडणूक प्रक्रियेदरम्यान, हवाई वाहतूक नियंत्रण कक्ष अशा सर्व भाड्याने घेतलेल्या विमानांचे किंवा हेलिकॉप्टर्सचे वाणिज्यिक विमानतळावरून विमान उतरणे व उड्डाण करणे, विमान उतरण्याची वेळ व उड्डाणाची वेळ व प्रवाशांची यादी व मार्गाचा नकाशा इत्यादिंची नोंद ठेवील. हवाई वाहतूक नियंत्रण कक्ष या माहितीची एक प्रत, विमान उतरल्याच्या/उड्डाण केल्याच्या दिनांकानंतर, तीन दिवसांच्या आत संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास आणि विमानतळ ज्या ठिकाणी आहे त्या जिल्ह्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास उपलब्ध करून देईल आणि मुख्य निवडणूक अधिकारी/ जिल्हा निवडणूक अधिकारी अशी माहिती, तपासणी दरम्यान आवश्यक पडताळणी करण्यासाठी खर्च निरीक्षकास उपलब्ध करून देईल. हवाई वाहतूक नियंत्रण कक्ष जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, खर्च निरीक्षकास तपासणीसाठी अभिलेख देखील उपलब्ध करून देईल.

(चार) व्यक्ती/प्रवासी (नियमांखाली सूट न मिळालेले) यांच्या हातातील बॅगेसह सर्व सामानाचे सी आय एस एफ/राज्य/संघराज्यक्षेत्र यांच्या पोलीसांकडून कोणतीही सवलत न देता, तपासणी करण्यात येईल. मात्र विमानापर्यंत जाण्यासाठी त्यांना वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

(पाच) सीआयएसएफने किंवा राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या पोलीस अधिकाऱ्यांनी मतदानाची तयारी सुरू असणाऱ्या राज्याच्या विमानतळावरून किंवा विमानतळाकडे उड्डाण करणाऱ्या विमानाच्या सामानातून रुपये १० लाखापेक्षा अधिक रोख रक्कम किंवा १ किलोग्राम किंवा त्यापेक्षा अधिक वजनाचे सोने चांदी शोधून काढल्यास ते ही बाब, तपासणी आयकर विभागास कळवील.

(सहा) माहिती मिळाल्यावर, आयकर विभाग, याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात न आल्यास, आयकर विषयक कायद्यानुसार आवश्यक ती पडताळणी करील व आवश्यक त्या उपाययोजना करील. तसेच ते अशी कोणतीही रोख रक्कम किंवा सोने चांदी सोडून देण्याअगोदर निवडणूक आयोगास, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास देखील याबाबत माहिती देईल.

(सात) सी.आय.एस.एफ., राज्य पोलीस व आयकर विभाग यासारखी कायद्याची अंमलबजावणी करणारी अभिकरणे तपासापासून जप्ती पर्यंतची किंवा मुक्ती पर्यंतची संपूर्ण कार्यवाही क्लोज सर्किट टी.व्ही./व्हीडीयो कॅमेरा याद्वारे चित्रित करता येईल अशारीतीने त्यांची अंतर्गत प्रमाण कार्यचालन पद्धती विकसित करील. या प्रयोजनार्थ सर्व वाणिज्यिक विमानतळांवर ज्या ठिकाणी रोख रक्कम/ सोने-चांदी पकडण्यात/ जप्त करण्यात आले आहे त्या ठिकाणी व आयकर विभागासह कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांच्या चौकशी कक्षात देखील सीसीटीव्ही बसविण्यात येतील. सीसीटीव्ही/व्हिडीयो कॅमेरा यातून केलेले असे चित्रिकरण 3 महिन्यासाठी विमानतळ चालक/प्राधिकाऱ्यांकडून जतन करण्यात येईल आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, निवडणूक आयोग/ मुख्य निवडणूक अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**बिगर-वाणिज्यिक विमानतळे/ हेलिपॅड यावरील तपासण्या :**

(आठ) सूदूर/अनियंत्रित विमान/हेलिपॅडस् यांवर विमानाच्या वैमानिकाशी समन्वय साधून भरारी पथके किंवा राज्याचे/ संघराज्य क्षेत्राचे पोलीस प्राधिकारी हे, (कोणत्याही प्रवाशाच्या हातातील पर्स किंवा पाकिट वगळता) विमानातून बाहेर येणाऱ्या सर्व सामानाची चित्रिप्रतिदिप्स पडयावर तपासणी / प्रत्यक्ष तपासणी करतील. निवडणूक आयुक्त विरुद्ध भाग्योदय जनपरिषद आणि इतर डब्ल्यू.पी.क्र.२३१/२०१२, दिनांक ९ नोव्हेंबर २०१२ या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी किंवा पक्षाचा पदाधिकारी यांच्याकडील कोणतीही अनधिकृत शस्त्रास्त्रे, निषिद्ध वस्तू व रु. ५०,००० पेक्षा अधिक रोख रक्कम यांची तपासणी करण्यात येईल. व ती जप्त करण्यात येईल. **तथापि, एखाद्या व्यक्तीने अनधिकृतपणे शस्त्रास्त्रे किंवा निषिद्ध वस्तू इत्यादी बाळगली असल्याची विनिर्दिष्ट माहिती मिळाल्याखेरीज अशा सूदूर अनियंत्रित विमानतळांवर/ हेलिपॅडवर उतरण्याच्या वेळी कोणत्याही प्रवाशाच्या शरीरावर शस्त्रे लपविलेली आहेत का हे पाहण्यासाठी झडती घेण्यात येणार नाही.**

(नऊ) सूदूर/अनियंत्रित विमानतळावर व हेलिपॅडस्वर विमान उतरण्यापूर्वी किमान २४ तास अगोदर एकतर उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने, प्रवासाची योजना, जिल्ह्यातील विमान उतरण्याचे ठिकाण व विमानातील/हेलिकॉप्टर्समधील प्रवासाची नावे यांचा तपशील नमूद करणारा अर्ज संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे करावयाचा आहे. जेणेकरून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास सुरक्षेची व कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाबाबत पर्याप्त व्यवस्था करता येईल. असा अर्ज प्राप्त झाल्यावर जिल्हा निवडणूक अधिकारी, प्राथम्य तत्वावर, त्याच दिवशी परवानगी देईल.

(दहा) प्रत्येक उमेदवार, विमान/हेलिकॉप्टर्स उतरविल्यानंतर पाच दिवसांच्या आत, त्याच्या मतदारसंघात विमानाची/ हेलिकॉप्टर्सची मालकी असणाऱ्या/भाडेपट्याने देणाऱ्या कंपनीस प्रदान केलेल्या/प्रदेय असलेला भाडे आकार (जर राजकीय पक्षाने भाड्याचा खर्च केलेला असेल तर) राजकीय पक्षाचे नाव आणि प्रवाशांची नांवे या विषयी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास देखील लेखी कळवील.

(अकरा) नागरी विमानचालन/भाड्याने घेतलेली/ खाजगी विमाने व राज्य शासनांच्या मालकीची किंवा त्यांनी भाड्याने घेतलेली विमाने यांमधून ने-आण करावयाचे प्रवासी, कर्मचारी व प्रवासी सामान यांची नियमित विमानांना जी नेहमीची विमानात बसण्यापूर्वीची सुरक्षा तपासणी करण्याची कार्यपद्धती लागू असेल तिच्यामार्फतच तपासणी करण्यात येईल. तसेच, विमानतळावर विमान उतरल्यानंतर नियमित मार्गाचाच त्यांच्याकडून वापर करण्यात येईल व अशा प्रवाशांच्या व प्रवासी सामानांच्या निर्गमनाला विमानतळाच्या कोणत्याही अन्य प्रवेश दारामधून परवानगी देण्यात येऊ नये. सूट दिलेल्या प्रवर्गातील प्रवाशांचे येणे-जाणे सुरळीतपणे व्हावे यासाठी त्यांच्याशी अगोदरच समन्वय साधावयाचा आहे. परंतू, त्यांच्याकडे असलेल्या सामानांची तपासणी करण्यात येईल.

(बारा) नागरी विमानचालन/भाड्याने घेतलेली/खाजगी विमाने व राज्य शासनांच्या मालकीची असलेली व त्यांनी भाड्याने घेतलेली विमाने यांच्याबाबतीत त्यांमधून उतरणाऱ्या प्रवाशांच्या, कर्मचाऱ्यांच्या सामानांची (कोणत्याही प्रवाशाच्या हातात असलेली पर्स वा पिशवी याव्यतिरिक्त) केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ)/एसएजी यांच्याकडून किंवा जेथे राज्य शासनाचे पोलीस नेमण्यात आले असतील तेथे त्यांच्याकडून प्रतिदिन पटलावर तपासणी (स्क्रिनिंग)/शारीरिक तपासणी करण्यात येईल. प्रवासी, कर्मचारी उतरल्यावर या कर्तव्यासाठी आवश्यकता असल्यास, विमानतळ कार्यचालक, सीआयएसएफ/एएसजी हे, अतिरिक्त मनुष्यबळ नेमण्याची व्यवस्था करून एक्स-बीस पुरवील.

(तेरा) वस्तू व संशयास्पद रोख रक्कम/सोनेचांदी यांची ने-आण करण्यास प्रतिबंध करण्याची जिल्हा दंडाधिकारी/पोलीस अधीक्षक यांची जबाबदारी राहील. रांगेमध्ये असलेल्या सामानांचे प्रतिदिप्त पटलावर तपासणी करण्याऱ्या यंत्रणेवर काम करत असलेले विमानतळ कार्यचालक आणि केवळ एक्स-बीआयएस मार्फत सामानाची प्रतिदिप्त पटलावर तपासणी करण्याच्या कामात गुंतलेले विमान कार्यचालक, मतदान होत असलेल्या राज्यामधील विमानतळावर नियुक्त केलेले कोणत्याही अनधिकृत शस्त्र सापडल्याचा अहवाल पोलिसांना आणि आयकर अधिकारी अधिकाऱ्यांना संशयास्पद रक्कम/सोने चांदी सापडल्यास बिनाविलंब कळवील.

(चौदा) निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदान होत असलेल्या राज्यांमधील दुर्गम/अनियंत्रित विमानतळे/हेलिपॅड येथून येथे चालविण्यात येणारी नागरी विमानचालन/भाड्याने घेतलेली/खाजगी विमाने व राज्य शासनांच्या मालकीची वा भाड्याने घेतलेली विमाने यांमधून अनधिकृत शस्त्रे, निषिद्ध.

(घ) निश्चित भाडे आकारणी पासून अनुसूचित परवाना धारक चालकांना मुक्त केले जाईल आणि अशी आकारणी डीसीसीएच्या (एन.एस.ओपी.) (जोडपत्र जी-आठ) कार्यालयाद्वारे विनियमन केले जाणार नाही, एनएसओपी यांची यादी डीजीसीएच्या *www.dgca nic in at link operators non scheduled.* या वेबसाईट वर उपलब्ध केलेली आहे.

(ड) निवडणुकी दरम्यान केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने (सीबीआयसी) केंद्रीय अप्रत्यक्ष व सीमाशुल्क अधिकार क्षेत्रातील तयार करून सीबीआयसी फिल्ड फॉरमेशनद्वारे आणि प्रतिबंधात्मक दक्षता यंत्रणा वाढविण्यासाठी आणि संशयास्पर रोकड, अवैध दारू, औषधिद्रव्य वायू (ड्रग्ज)/अंमली पदार्थ, मोफत मिळाले आणि तस्करी केलेल्या वस्तुंचा प्रवाह रोखण्यासाठी एक प्रमाणित कार्यचालन पद्धती विहित केली आहे. (**जोडपत्र-जी-१०**)

च. एम/ओ पेट्रोलियम आणि नैचरल गॅस नैसर्गिक गॅस वाफ ते मंत्रालयाने विपणन कंपन्यांचे अध्यक्ष आणि सीएमडी यांना मतदान होणारी राज्ये/संघराज्य क्षेत्रे आणि त्यांच्या शेजार राज्ये/ संघराज्य क्षेत्र यांमध्ये इंधन खरेदी करण्यासाठी कुपन्सची विक्री रोखण्यासाठी आणि त्याची तपासणी करण्यासाठी सर्व समुचित उपाययोजना करण्याचा सल्ला दिला आहे, जेणेकरून निवडणूक प्रक्रियेला बाध येणार नाही. (**जोडपत्र-जी-११**)

छ. खर्च संवेदनशील मतदार संघ (इएससीएस) आणि खर्च संवेदनशील क्षेत्रे (पॉकेटस्) (इएसपीएस) निश्चित करण्यासाठी प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती (एसओपी) (**जोडपत्र-जी-१२**)

**जोडपत्र—जी-१**

## भारत निवडणूक आयोग

**निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१**

क्रमांक ७६ /अनुदेश/इपीएस/२०२३, खंड-दोन दिनांक १६ जानेवारी २०१३.

प्रति,

अध्यक्ष,

प्रत्यक्ष कर केंद्रीय मंडळ,

वित्त मंत्रालय, नॉर्थ ब्लॉक,

नवी दिल्ली.

**विषय.—नागालँड, त्रिपुरा आणि मेघालय विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणूक २०१३-निवडणूक खर्च संनियंत्रणावरील आयोगाच्या अनुदेशांमध्ये फेरबदल संबंधित.**

महोदय,

मला, हे आयोगाने दिनांक ११ जानेवारी २०१३ रोजीच्या आपल्या वृत्तपत्रातील प्रसिद्धिपत्रकाद्वारे नागालँड, त्रिपुरा आणि मेघालय विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांचे वेळापत्रक घोषित केले आहे सांगण्याचे आणि निवडणूक कालावधीमधील निवडणूक खर्चावर बारीक लक्ष ठेवण्यासाठी वर नमूद केलेल्या राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या आयोगाच्या पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१२/इपीएस, दिनांक २७ जुलै २०१२ आणि त्यानंतरच्या दिनांक १७ डिसेंबर २०१२ आणि १५ जानेवारी २०१३ ची सुधारित पत्राकडे प्रती जोडल्या आहेत. आपले लक्ष वेधण्याचे निदेश दिले आहेत.

२. काळ्या पैशांमुळे, निवडणूक प्रक्रियेच्या शुचितेचा भंग होत असल्याने, खाली नमूद केल्याप्रमाणे, निवडणुकी दरम्यान काळ्या पैशांच्या वापरास पायबंद घालण्यासाठी आवश्यक त्या व्यवस्था करण्याचे तुम्हाला विनंती करण्यात येत आहे :—

**क. आयकर विभागाकडून संनियंत्रण :**

निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्रकट न केलेल्या रोख रकमेची ने-आण करण्यासाठी वापरण्याची शक्यता असलेली राज्यातील सर्व विमानतळ, प्रमुख रेल्वे स्थानके, हॉटेल्स, शेतघरे, हवाला प्रतिनिधी, वित्तीय दलाल, (रोकड ने-आण करणारी विशेष सुविधा) कॅश कुरिअर, तारण दलाल आणि इतर संशयास्पद अभिकरणे/व्यक्ती यांच्यावर आयकर विभागाकडून बारीक लक्ष ठेवले जाईल. या प्रयोजनासाठी, राज्याचा प्रभारी असलेल्या आयकर महासंचालक (तपासणी) यांच्या पर्यवेक्षणाखालील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा, आयोगाने अधिग्रहीत केल्या आहेत. अन्वेषण संचालनालयाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक एखाद्या राज्यातील राज्याची राजधानी किंवा आयकर विभाग ठरवील अशा संवेदनाशील ठिकाणी, राज्यातील निवडणुकांच्या अधिसूचनेनंतर तात्काळ करावयाची आहे.

**ख.** या प्रयोजनार्थ आयकर महासंचालक (अन्वे.) रात्रंदिवस सुरू असणारा (२४X७) नियंत्रण कक्ष उघडण्यासाठी आणि मतदाराना लाच देण्यासाठी वापरण्यात येणाच्या संशय असलेल्या मोठ्या रोख रकमा किंवा इतर वस्तू यांची ने-आण करण्यासंबंधात तक्रार किंवा माहिती प्राप्त करण्यासाठी टोल फ्री क्रमांक असणारा प्रामुख्याने राज्याच्या राजधानी तक्रार संनियंत्रण कक्ष उघडण्यासाठी उपाययोजना करील. आयकर अन्वेषण संचालनालय, माहिती किंवा तक्रारीच्या आधारे, कोणत्याही व्यक्तीविरूद्ध स्वतंत्र चौकशी करेल आणि जिल्हा निवडणूक अधिकारी आवश्यकती कारवाई करण्यास सक्षम करणारे सुरक्षा कर्मचारी पुरविण्यासाठी पावले उचलेला. आयकर अन्वेषण संचालनालयाने केलेल्या चौकशीच्या निकलाबाबत आयोगाला कळविल आणि त्याची एक प्रत संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अदिकाऱ्यांला दिली जाईल.

**ग.** वरील गोष्टीं व्यतिरिक्त, अन्वेषण संचालनालय आणि वित्तीय गुप्तवार्ता युनिट (एफआययू), भारत सरकार, उमेदवाराच्या मत्ता आणि दायित्वे घोषित करणाऱ्या शपथपत्राच्या प्रती भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावयात. वित्तीय

गुप्तवार्ता युनिट उमेदवारांशी संबधी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची पडताळणी करील आणि सीबीडीटीद्वारे राज्याच्या आयकर महासंचालकां (तपासणी) कडे अहवाल पाठवेल. अन्वेषण संचालनालय देखील आयकर विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीची पडताळणी करेल आणि जेथे मत्ता किंवा दायित्व किंवा प्रलंबित थकबाकी याविषयी कोणतीही माहिती दडवून ठेवली गेली आहे, असे निदर्शनास येईल तेथे असा अहवाल आयोगाला पाठवला जाईल. कोणत्याही परिस्थितीत, मालमत्तेचा तपास अन्वेषण अहवाल, मतदानाच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या नंतर पाठविला जाऊ नये.

**घ.** कोणत्याही व्यक्तीच्या उमेदवाराच्या प्रकरणासह एकतर निवडणुकीच्या प्रचारादरम्यान किंवा स्वतंत्र चौकशीच्या ओघात अन्वेषण संचालनालयाने कोणत्याही उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने निवडणूक खर्चाशी संबंधित कोणतीही माहिती गोळा केली असल्यास, एकतर, निवडणुकांपूर्वी किंवा नंतर आयोगाला अवश्य कळविण्यात यावी.

**ड.** वरील गोष्टींशिवाय, आयकर विभागाच्या अन्वेषण संचालनालयाने निवडणूक घेण्यात येणाऱ्या राज्यामध्ये सांविधिक विवरण न भरता देणग्या घेणाऱ्या आणि कर सवलतीचा आनंद घेणाऱ्या राजकीय पक्षांबद्दल आणि निवडणुकीच्या घोषणेच्या २ आठवड्यात विभागाकडून केलेल्या कारवाईबद्दल आयोगाला कळवावे.

**च. आयकर अधिकारी तैनात करणे.**

**एक.** आयकर अधिकाऱ्यांचे पथक राज्यातील गुप्तवार्ता स्वतःहून गोळा करणाऱ्या बरोबरच अशा संवेदनशील ठिकाणी स्वतःला तैनात ठेवतील की जेथे मोठ्या प्रमाणात उघड न केलेली रोख रकमेचा व्यवहार इत्यादीचा संशय असेल आणि आयकर कायद्यानुसार ते कारवाई करतील.

**दोन.** याशिवाय, आयकर विभाग, मतदान असलेल्या राज्यातील सर्व विमानतळांवर आणि (मतदान असलेल्या राज्यातील) मतदान असलेल्या राज्यात व्यावसायिक उड्डाणे घेत असलेल्या विमानतळांवर हवाई अन्वेषण युनिट उघडेल. आणि मतदान असलेल्या राज्यामध्ये उतरणाऱ्या किंवा नियत उड्डाण करणाऱ्या विमानातून (खाजगी विमानासह) रोख रकमेची ने-आण करण्यावर कडक नजर ठेवली जाईल. विमानतळावर रु. १० लाख हून अधिक रोख रक्कम सापडल्यास, आयकर विभाग आयकर कायद्यांतर्गत आवश्यक कारवाई करण्यासाठी पावले उचलेल. आयकर विभाग, आयकर कायद्यांतर्गत ती रक्कम जप्त करणे शक्य नसेल तर अशा रकमेबाबत लगेच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला माहिती देईल, जो मतदारांना लाच देण्यासाठी ती रोख रक्कम वापरल्याचा संशय असेल त्यांच्याविरूद्ध भारतीय दंड संहितेअंतर्गत पावले उचलतील, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलातील अधिकारी या संदर्भात आवश्यक माहिती देतील आणि सहकार्य करतील.

**तीन.** कोणत्याही व्यक्तीच्या बँक खात्यातून रु. १० लाखहून अधिक रोख रक्कम काढल्याची माहिती मिळाल्यास बँकेने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला कळवावे. जिल्हा निवडणूक अधिकारी ही माहिती जिल्ह्यातील प्रभारी आयकर अन्वेषण संचालनालयाच्या मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्याकडे आयकर सहायक संचालक (अन्वेषण) यांच्याकडे पाठवेल, जे आयकर कायद्यांतर्गत तात्काळ कारवाई करतील.

**३.** कार्य अहवाल सुधारित नमुन्यानुसार (**जोडपत्र-२४***) आयकर सहायक/उप संचालक (तपासणी) यांच्याद्वारे संबंधित आयकर महासंचालक (अन्वेषण) आयकर संचालक/(अन्वेषण) यांच्या कार्यालयातील मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्याकडे अग्रेषित केला जाईल तो अहवाल संकलित करून प्रत्येक दुसऱ्या दिवशी निवडणूक आयोगाला पाठवील त्याची एक प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यालाही पाठवतील. जोडपत्र २४ मधील सुधारित नमुना देखील यासोबत जोडला आहे.

आपला विश्वासू,

**एस. के. रूदोला,**

सचिव.

*** सारसंग्रह सुधारित केले असल्याने कृपया जोडपत्र-२४ साठी जोडपत्र—बी ११ पहा.**

**जोडपत्र—जी-२**

**भारत सरकार**

**वित्त मंत्रालय**

**वित्तीय सेवा विभाग**

**३ रा मजला, जीवनदीप इमारत,**

**संसद मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

एफ. क्रमांक ६०(२)/२००८-बीओ-दोन दिनांक २० फेब्रुवारी २०१३.

प्रति,

भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका मार्ग,

नवी दिल्ली.

कृपया लक्ष द्या श्री. एस. के. रुदोला सचिव.

**विषय.—निवडणूकी दरम्यान शुद्ध (निदोष) अधिकृत व स्वच्छ चलनातील रोख रकमेची ने-आण संबंधित.**

महोदय,

कृपया वरील विषया संबंधित भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ७५/इआय. इएक्स/आयटीडी/२०१२/इपीएस/६०५, दिनांक २९ मे, २०१२ आणि या विभागाने सम क्रमांकाचे दिनांक ६ नोव्हेंबर २०१२ रोजी पत्रानुसार पाठवलेले उत्तर, यांचा संदर्भ पहावा ज्यात इतर गोष्टींबरोबर, भारतीय बँका महासंघाद्वारे एक प्रमाणित कार्यान्वयन कार्यपद्धती विकसित केली जाईल असे सूचित केले आहे, आणि हा विभाग निवडणूक आयोगाला प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती प्रक्रियेबाबत माहिती देईल, जेणेकरून ती निवडणूक यंत्रणेच्या तपासणी प्रक्रियेचा एक भाग बनेल, याद्वारे निवडणुकादरम्यान बँकाद्वारे अधिकृत व स्वच्छ चलनातील रकमाची सुरळीत ने-आण करण्याची सुनिश्चिती होईल.

२. भारतीय बँक संघाने, बँकेच्या निवडक गटाची मते/टिपण्या एकत्रित केल्या आणि बँकेकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या आधारे आणि विचार विमर्शानंतर, भारतीय बँक संघाच्या व्यवस्थापकीय समितीने खालील मार्गदर्शक तत्वाना अंतिम रूप दिले आणि अंमल बजावणीसाठी बँकेच्या सर्व सदस्यांना रोख रकमेची वाहतूक करण्यासाठी ती प्रसारीत केली.

बँक याची सुनिश्चिती करेल की, त्या बँकेची रोकड वाहून नेणारी बाह्यस्त्रोत अभिकरणे/कंपन्यांच्या रोकड वाहन नेणाऱ्या व्हॅनमध्ये कोणत्याही परिस्थितीत, बँका वगळता इतर कोणतीही त्रयस्थ पक्ष अभिकरणे/एखाद्या व्यक्ती यांच्या रोख रकमेची ने-आण केली जाणार नाही. यासाठी बाह्यस्त्रोत असलेली अभिकरणे/कंपन्या/बँकांनी त्यांना दिलेल्या आणि एटीएममध्ये भरण्यासाठी आणि इतर शाखांमध्ये, बँकामध्ये किंवा चलन पेटीमध्ये रोख वितरित करण्यासाठी त्यांच्या जवळ असलेल्या रोख रकमेचा तपशील देणारी जारी केलेली पत्रे/दस्तऐवज इत्यादीं त्यांच्यासोबत ठेवावीत.

रोकड वाहून नेणाऱ्या व्हॅन सोबत असलेल्या बाह्यस्त्रोत अभिकरणे/कंपन्याच्या कर्मचाऱ्यांनी, संबंधित अभिकरणांनी दिलेले ओळखपत्र सोबत ठेवावे.

निवडणुकीच्या कालावधी दरम्यान निवडणूक आयोगाचे प्राधिकृत अधिकारी (जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा कोणतेही इतर प्राधिकृत अधिकारी) बाह्यस्त्रोत असलेली अभिकरणे/कंपनीची रोकड व्हॅन तपासणीसाठी अडवत असल्यास, अभिकरणे/कंपनी निवडणूक आयोगाला कागदपत्रे तसेच प्रत्यक्ष कागदपत्रे स्पष्टपणे दाखविण्याच्या तयारीत असावी. एटीएममध्ये रोख रक्कम भरण्याच्या

किंवा बँकेच्या सूचनांवरून बँकेच्या इतर काही शाखांमध्ये कोषागारांमध्ये रोख रक्कम पोहोचविण्याच्या प्रयोजनार्थ त्यांनी रोख रक्कम संकलित केली होती त्यासाठी चलनाच्या प्रत्यक्ष तपासणी करू देण्याच्या उपरोक्त कार्यपद्धती रोख रकमेची ने-आण करण्यासाठी बँकेच्या प्रमाणित कार्यचालन नियमांचा आणि कार्यपद्धतीचा भाग असेल.

३. भारतीय बँक संघाने सदस्य बँकांना निर्गमित केलेल्या दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ च्या परिपत्रकाची एक प्रत कृपया सोबत जोडा. आम्ही तुम्हाला विनंती करतो की, निवडणूक यंत्रणेच्या तपासणी प्रक्रियेचा भाग बनण्यासाठी या मार्गदर्शक तत्वांचा विचार करावा. त्याद्वारे निवडणूका दरम्यान बँकाकडून अधिकृत व स्वच्छ रोख रकमेची सुरळीत वाहतूक होईल याची सुनिश्चिती होईल.

आपला विश्वासू,

**डी. डी. माहेश्वरी,**

अवर सचिव, भारत सरकार.

दूरध्वनी क्रमांक ०११-२३७४८७५०

ई मेल : usb02-dfs@nic.in,boz@nic.in

*** सोबत जोडलेली जोडपत्रे वरीलप्रमाणे.**

**जोडपत्र—जी-३**

## भारत निवडणूक आयोग

**निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१**

क्रमांक ७६ /अनुदेश/२०१३/इपीएस, खंड-पाच                                                   दिनांक १८ एप्रिल २०१३.

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,

कर्नाटक,

बैंगलोर.

**विषय.—जेवण देणे, सामूहिक विवाह, जप्त केलेली रोकड आणि इतर विषयसंबंधिच्या निवडणूक खर्चावरील स्पष्टीकरण संबंधित.**

महोदय,

मला, तुमचा क्रमांक नसलेले दिनांक १३ एप्रिल २०१३ ई-मेलद्वारे प्राप्त झाले या पत्राचा निर्देश देण्याचा आणि खालीलप्रमाणे, त्याचे स्पष्टीकरण देण्याचा निदेश देण्यात आला आहे :—

**१. राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यासाठी आलेल्या लोकांना जेवण, शीतपेये, ताक देणे.—**

(क) उमेदवाराने लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ अन्वये नामनिर्देशनाच्या दिनांक व निकाल घोषित करण्याचा दिनांक या दरम्यान त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या निवडणूकीविषयक संबंधातील सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा ठेवणे आवश्यक आहे. अशा बाबींवर खर्च केलेली रक्कम ज्यांनी असा मेळावा/सभा आयोजित केली आहे अशा उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये नोंदविली जाईल, जर राजकीय पक्षाने मेळावा/सभा आयोजित केला असेल तर अशा बाबींवरील खर्च, यातील कंवरलाल गुप्ता विरूद्ध अमरनाथ चावला (एआयआर १९७५ सर्वोच्च न्यायालय ३०८, दिनांक १० एप्रिल १९७४ या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार निवडणूक खर्च संनियंत्रण मार्च, २०१३ च्या अनुदेशांचा परिच्छेद १० फेब्रुवारी मध्ये समावेश केल्याप्रमाणे विनियमित केला जाईल.

(ख) तथापि, मेळाव्यात सहभागी झालेल्या लोकांना केवळ सहज हातावून नेता येईल अशा स्वरुपात पिण्याचे पाणी किंवा ताक देणे, हे भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ख अंतर्गत लाचखोरी होऊ शकत नाही.

**२. सामूहिक विवाह :—**

अशा समारंभावर कोणतेही बंधन नाही. निवडणूक प्रचारासाठी अशा समारंभाचा वापर होत असल्याची शंका असल्यास त्यावर संनियंत्रण ठेवले पाहिजे. तथापि, उमेदवारांचा खर्च निवडणूक खर्चावर संनियंत्रण—मार्च, २०१३ च्या अनुदेशाच्या परिच्छेद ५.१०.२ आणि ५.१०.३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार विनियमित केला जाईल. निवडणूक खर्च संनियंत्रण--

**३. सुरक्षा ताफा घेऊन जाणे/दुचाकी मेळावा :—**

आयोगाने, पहा आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/अनुदेश/२०१०—सीसी आणि बीई दिनांक ५ ऑक्टोबर २०१०, जर त्या ताफ्यात राजकीय पक्ष आणि उमेदवार असतील तर, ठरवले होते की, आदर्श आचार संहितेच्या कालावधीत, जर त्या ताफ्यात किंवा रॅलीत राजकीय पक्षांचे नेते आणि उमेदवार असतील तर, तो उमेदवार व राजकीय पक्षांचे नेते इत्यादीना पुरवण्यात आलेल्या १० पेक्षा अधिक सुरक्षा वाहनांचा कोणतेही असल्यास, समावेश असणार नाही.

**४. जप्ती केलेली रोकड किंवा इतर वस्तू अभिरूप निरीक्षण नोंदवहीमध्ये नोंदविणे :—**

विद्यमान अनुदशानुसार जप्त केलेली रोकड किंवा इतर वस्तू यांचा उमेदवाराशी संबंध असल्याचे आढळून आल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून तक्रार प्रारंभिक माहिती अहवाल (एफआयआर) दाखल केल्यानंतर त्यांनी तो तक्रारीची प्रत खर्च निरीक्षक/सहायक खर्च निरीक्षक यांना पाठविल जो अभिरूप निरीक्षक नोंदवहीमध्ये तसे नमूद करील.

आयोगाचा आदेश क्रमांक ७६/अनुदेश/२०१३/इइपीएस/खंड एक, दिनांक २१ मार्च २०१३ च्या परिच्छेद ६ मध्ये आंशिक फेरबदल करताना त्यात निवडणूक खर्च संनियंत्रण, मार्च २०१३ वरील अनुदेशाचे जोडपत्र-७३ मध्ये,याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे की न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणांचा अंतिम निकाल लागेपर्यंत जप्त केलेली रक्कम, उमेदवाराचा निवडणूक खर्च म्हणून समजण्यात येणार नाही. आणि तोपर्यंत तो अभिरूप निरीक्षण नोंदविहीमध्ये नोंदवला जाणार नाही. तक्रार/प्रारंभिक माहिती अहवाल (एफआयआर) ची प्रत पुराव्याच्या संचिलेमध्ये ठेवण्यात येईल.

आपला विश्वासू,

**एस. के. रूडोला,**

सचिव.

**जोडपत्र-जी-४**

**नागरी विमानचालन सुरक्षा-७ (१५)/२०१२/विभाग-एक भारत सरकार (निवडणूक) नागरी विमानचालन सुरक्षा मंडळ (नागरी विमानचालन मंत्रालय ए-विंग, जनपथ भवन, जनपथ, नवी दिल्ली ११० ००१, दिनांक ३ जुलै २०१३.**

**कार्यालयीन ज्ञापन**

**विषय** :— निवडणूक प्रक्रियेच्या वेळी विमानतळावरून अनधिकृत शस्त्रास्त्रे निषिद्ध वस्तू आणि संशयास्पद पैसा/ सोने चांदी यांच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी सुधारित प्रमाणित कार्यचालन कार्यपद्धती यांविषयी.

**संदर्भ** :— दिनांक ८ एप्रिल २०११ व दिनांक १४ फेब्रुवारी २०१२ चे त्याच क्रमांकाचे कार्यालयीन ज्ञापन.

निवडणूक प्रक्रियेच्या वेळी अनधिकृत शस्त्रात्रे, निषिद्ध वस्तू किंवा मोठ्या प्रमाणात रोख रक्कम/सोने, चांदी यांची पुष्कळदा भाड्याने घेतलेली विमाने/ हेलिकॉप्टर्स/वाणिज्यिक विमान कंपन्याचे प्रवासी यांच्यामार्फत, मतदान होणाऱ्या राज्यांत,वाहतूक करण्यात येत असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत. निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत न्याय वातावरणाचा भंग करू शकतो अशा घटनाबाबत निवडणूक आयोगाने चिंता व्यक्त केली आहे.

२. म्हणून, भारताच्या निवडणूक आयोगाच्या विनंतीनुसार, याद्वारे असा आदेश देण्यात येत आहे की, ज्या राज्यांत मतदान होणार आहे त्या राज्यांच्या वाणिज्यिक विमानतळांवर आणि वाणिज्येत्तर धावपट्या / हेलिकॉप्टर्स यांच्यातून किंवा मतदान होणाऱ्या राज्यांत अशा विमानांत उतरणाऱ्या सामानांवर/प्रवाशांवर लक्ष ठेवताना, पुढील उपाययोजना त्वरीत हाती घ्याव्यात.

**वाणिज्यिक विमानतळांवरील प्रवासपूर्व-तपासणी**

(एक) निवडणूक प्रक्रियेच्या वेळी, व्यक्ती व त्यांचे सामान यांची झडती घेण्याशी आणि तपासणी करण्याशी संबंधित सर्व नियमांची व कार्यपद्धतींची कोणताही अपवाद न करता काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. कोणत्याही विमानात/हेलिकॉप्टरमध्ये यांत वाणिज्यिक/भाड्याने घेतलेल्या विमानांसह यात चढणारे (ज्यांना नियमांन्वये सूट देण्यात आली ते वगळता) सर्व प्रवासी आणि (ज्यासाठी नियमांन्वये सूट देण्यात आली आहे ते वगळता सर्व सामान) ज्या राज्यात मतदान होणार आहे त्या राज्याच्या चालू विमानतळांवरील विमान प्रवास पूर्व तपास यंत्रणेमार्फत सुरक्षा तपासणी होऊन बाहेर येईल.

(दोन) वाणिज्यिक विमानतळांवर विमाने (यात पंख असलेल्या विमानांचाही समावेश आहे.) आणि हेलिकॉप्टर उतरण्याकरीता किंवा तेथून उड्डाण करण्याकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नाही. वाणिज्यिक विमानतळांवरील हवाई वाहतूक नियंत्रण, भाड्याने घेतलेली विमाने किंवा हेलिकॉप्टर्स यांच्या प्रवासाचा तपशील, असे विमानतळ ज्या ज्या ठिकाणी असेल त्या राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला आणि त्या जिल्ह्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला, शक्य तितक्या लवकर, विशेषतः अर्धा तास अगोदर कळविले पाहिजे.

(तीन) तथापि, निवडणूक प्रक्रिया पार पडत असताना, हवाई वाहतूक नियंत्रण कक्ष, वाणिज्यिक विमानतळावर उतरणारी व त्या विमानतळावरून उड्डाण करणारी अशी सर्व भाड्याने घेतलेली विमाने व हेलिकॉप्टर्स, यांची विमानतळावर त्यांची उतरण्याची वेळ व विमानतळावरून उड्डाण करण्याची वेळ आणि प्रत्यक्ष प्रवाशांची यादी, प्रवासमार्गाचा तपशील इत्यादींची नोंद करील हवाई वाहतूक नियंत्रण कक्ष, विमाने विमानतळावर उतरल्याच्या/विमानतळावरून उड्डाण केल्याच्या दिनांकास ३ दिवसांच्या आत, सदर माहितीची एक प्रत असे विमानतळ ज्या ठिकाणी असेल त्या संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला व त्या जिल्ह्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला उपलब्ध करून देईल आणि मुख्य निवडणूक अधिकारी हे तपासणी करताना आवश्यक ती पडताळणी करण्यासाठी खर्च निरीक्षकाला अशी माहिती उपलब्ध करून देतील. हवाई वाहतूक, नियंत्रण, जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा निरीक्षकाला तपासणीकरीता देखील अभिलेख उपलब्ध करून देईल.

(चार) व्यक्तींच्या/प्रवाशांच्या हॅन्डबॅगांसह अशा सर्व बॅगा (नियमांन्वये सूट देण्यात आलेली नाही) पण विमानापर्यंत जाण्याकरितावाहनाच्या सुविधेचा लाभ घेण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. यांचे देखील सीआयएसएफ/राज्य/केंद्रशासित प्रदेश पोलीस यांच्याकडून कोणतीही सूट न देता (पटेक्षण) स्क्रिनिंग करण्यात येईल.

(पाच) राज्यांचे किंवा संघराज्य क्षेत्राचे केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दल किंवा पोलीस अधिकारी हे निवडणुका होणाऱ्या राज्यामध्ये किंवा राज्यामधून उड्डाण करणाऱ्या विमानांच्या सामानामध्ये रु. १० लाखांपेक्षा अधिक रोख रक्कम किंवा १ किलो किंवा त्याहून अधिक सोने चांदी सापडल्यावर तत्क्षणी आयकर विभागाला कळवतील.

(सहा) आयकर विभाग, माहिती प्राप्त झाल्यावर आयकर कायद्यानुसार आवश्यक पडताळणी करील आणि जर समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आले नाही तर, आवश्यक उपाययोजना करील. आयकर विभाग अशी कोणतीही रोख रक्कम / सोने चांदी बंधमुक्त करण्यापूर्वी, निवडणूक आयोगाला/मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला/संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला कळवतील.

(सात) सी.आय.एस.एफ, राज्य पोलीस आणि आयकर विभाग यांच्यासारखे कायद्याची अंमलबजावणी करणारी अभिकरणे हे त्यांची अंतर्गत प्रमाण कार्यचालन कार्यपद्धती अशारीतीने तयार करतील की, विमानतळावरील तपासापासून जप्तीपर्यंतचा संपूर्ण प्रसंगाचे क्लोज सर्कीट टी.व्ही./व्हीडीओ कॅमेऱ्यामधून चित्रण करण्यात येईल. या प्रयोजनाकरीता क्लोज सर्कीट टी.व्ही. हे, सर्व वाणिज्यिक विमानतळांवर जेथे रोख रक्कम/सोने चांदी यांचा तपास घेतला जातो, त्यांची मोजणी केली जाते, अशा ठिकाणी आणि आयकर विभागासह कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींच्या पूसतपास कक्षांत बसवण्यात येतील.क्लोज सर्कीट टी.व्हींचे/व्हीडीओ कॅमेऱ्याचे असे चित्रीकरण ३ महिन्यांच्या कालावधीसाठी विमानतळ चालक/प्राधिकारी यांच्याकडे जतन करण्यात येईल आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, असे चित्रीकरण निवडणूक आयोगाला / मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला उपलब्ध करून देण्यात येईल.

**वाणिज्येतर विमानतळे/हेलिपॅड येथील तपासणी :**

(आठ) दुर्गम भागातील/अनियंत्रित विमानतळावर हेलिपॅडवर राज्याचे/संघराज्य क्षेत्राचे भरारी पथक किंवा पोलीस प्राधिकारी हे, विमानाच्या वैमानिकाशी समन्वय साधून, विमानातून बाहेर येणाऱ्या सर्व सामानांची (महिलांच्या हाती असलेली पर्स वगळून) स्क्रीनिंग (पटेक्षण) / प्रत्यक्ष तपासणी पार पाडतील. कोणताही उमेदवार किंवा प्रतिनिधी किंवा पक्ष कार्यकर्ता यांच्याकडे असलेली कोणतीही शस्त्रास्त्रे, निषिध्द वस्तू, रु. ५०,००० यापेक्षा अधिक असलेली रक्कम यांची निवडणूक आयोग विरुद्ध भाग्योदय जनपरिषद व इतर, डब्ल्यूपी क्र. २३१/२०१२, दिनांक ९ नोव्हेंबर २०१२ यातील माननीय सर्वोच्च न्यायालय आदेशानुसार, तपासणी करण्यात येईल व जप्तीसाठी ती विचारात घेण्यात येईल. तथापि, असे स्पष्ट करण्यात येते की, अशी व्यक्ती ही अनधिकृत शस्त्रास्त्रे किंवा निषिद्ध वस्तू, इत्यादी घेऊन जात आहे याविषयीची विशिष्ट माहिती असल्याशिवाय अशा दुर्गम भागातील अनियंत्रित विमानतळे/हॅलीपॅड येथे विमाने/हेलिकॉप्टर विमानतळावर उतरण्याच्या वेळी, कोणत्याही प्रवाशांच्या शरीराची झडती घेण्यात येणार नाही.

(नऊ) दुर्गम भागातील/अनियंत्रित विमानतळे व हेलिपॅड येथील प्रवास मार्गाचा तपशील, विमानतळावर विमान उतरण्याचे जिल्ह्यातील ठिकाण आणि विमानतळे/हेलिकॉप्टर्स यातील प्रवाशांची नावे नमूद करून, विमान उतरण्याच्या किमान २४ तास पूर्वी संबधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला एकतर उमेदवाराद्वारे किंवा राजकीय पक्षाद्वारे अर्ज करावा लागेल. जेणेकरून, अशा जिल्हा निवडणूक अधिकारी, सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था प्रश्न यासाठी पर्याप्त व्यवस्था करू शकेल आणि अशा हेलिपॅडचा समन्वये देखिल उपलब्ध करून देऊ शकेल असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, जिल्हा निवडणूक अधिकारी, प्राथम्य तत्वावर त्याच दिवशी अशी परवानगी देईल.

(दहा) प्रत्येक उमेदवार, त्याच्या मतदार संघातील, कंपनीच्या मालकीच्या/भाड्याच्या अशा विमानाचा/हेलिकॉप्टर कंपनीला प्रदान केलेला/देय असलेला भाड्याचा खर्च, प्रवाशांची नावे व अशा राजकीय पक्षांचे नाव (जर भाड्याचा खर्च पक्ष करीत असेल) याविषयी, विमानतळावर विमान/हेलिकॉप्टर उतरल्यानंतर पाच दिवसांच्या आत लेखी स्वरूपात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला देखिल कळविल.

3. वरील निदेशांचे, काटेकोरपणे अनुपालन करण्यात येत आहे. याची खात्री करून घ्यावी व तसे या कार्यालयास कळवावे. अशी सर्व संबंधितांना विनंती करण्यात येत आहे.

**आर. एन. ढोके, (**भा.पो.से.,)
अपर आयुक्त, सुरक्षा (सी.ए.).

**वितरण :**

१. राज्याचे/संघराज्य क्षेत्रांचे सर्व मुख्य सचिव.

२. महासंचालक, सी.आय.एस.एफ. १३ सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली.

३. राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे सर्व पोलीस महासंचालक पोलीस महानिरीक्षक.

४. डीजीसीए, सफदरजंग विमानतळ, नवी दिल्ली.

५. अध्यक्ष एअेआय, सफदरजंग विमानतळ, नवी दिल्ली.

६. आर.डी.सी.ओ.एस. (सी.ए.) बीसीएएस, दिल्ली, अमृतसर, मुंबई, अहमदाबाद, चेन्नई, हैद्राबाद, कोलकत्ता आणि गुवाहाटीश : काटेकोर अनुपालनाकरिता.

**जोडपत्र - जी ५**

**भारत सरकार**

नागरी विमान चालन मंत्रालय, नागरी विमान चालन सुरक्षा ब्युरो
ए विंग-एक, दो, तीन, जनपथ भवन, जनपथ
नवी दिल्ली - ११० ००१
ऑक्टोबर २०१३

क्र. सीएएस-७(१५)/२०१२/डीआय व्ही-एक (निवडणूक)

दिनांक ४ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनासाठी पूरकपत्र

---

**विषय :** दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्य क्षेत्र, छत्तीसगड, राजस्थान, मध्य प्रदेश व मिझोराम यांच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका-२०१३ या संदर्भात.

मतदान होत असलेल्या राज्यांमध्ये निवडणूक प्रक्रियेदरम्यान आढळणाऱ्या अवैध शस्त्रांच्या तस्करीच्या आणि संशयास्पद पैसे / सोने-चांदीच्या हवाईमार्गे होणाऱ्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी सुधारित प्रमाण कार्यचालन पद्धतीच्या अंमलबजावणीच्या संदर्भातील या कार्यालयाच्या दिनांक ४ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाचा संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. त्याबरोबरच पुढील अनुदेशांचे/सुचनांचेही पालन करण्यात यावे.

(एक) सामान्य विमान / चार्टर्ड / खासगी विमाने आणि राज्य सरकारच्या मालकीची किंवा त्यांनी भाड्याने घेतलेली विमाने यांद्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना, विमान कर्मचाऱ्यांना आणि सामानास नियोजित उड्डाणांसाठी लागू असलेल्या सामान्य प्रवेशपूर्व सुरक्षा तपासणी पद्धतीद्वारे प्रवेश देण्यात येईल. तसेच, सर्वसाधारण निर्गमन पद्धतीचे पालन करण्यात येईल व अशा प्रवाशांस आणि सामानास विमानतळाच्या इतर कोणत्याही द्वारावाटे बाहेर पडता येणार नाही. सूट असलेल्या प्रवाशांच्या येण्या-जाण्यासाठी पुरेशी मोकळी जागा मिळावी यासाठी त्यांचा आगाऊ समन्वयन करण्यात येईल, पण त्यांच्याकडील सामानाची तपासणी करण्यात येईल.

(दोन) साधारण विमान / चार्टर्ड / खाजगी विमाने आणि राज्य सरकारांच्या मालकीची किंवा त्यांनी भाड्याने घेतलेली विमाने यांच्याद्वारे उतरणारे प्रवासी, विमानकर्मचारी यांचे सामान (कोणत्याही प्रवाशाची पर्स, पाकीट वगळून) तेथे तैनात असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल / विमानतळ सुरक्षा गट किंवा राज्य पोलीस याद्वारे तपासण्यात / यादृच्छिकपणे अंगझडती घेण्यात येईल. विमानतळ प्रशासनाकडून आगमनाबाबत क्ष-किरण सामान तपासणी यंत्रणा (X-BIS) पुरविण्यात येईल आणि या कामकाजासाठी आवश्यक वाटल्यास, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल / विमानतळ सुरक्षा गट अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करू शकेल.

(तीन) निवडणूका होत असलेल्या राज्यांच्या विमानतळांवर इन-लाईन बॅगेज स्क्रिनिंग सिस्टिम (IBSS) चे कामकाज पाहणाऱ्या विमानतळ व्यवस्थापनाने आणि स्वतंत्र क्ष-किरण सामान तपासणी यंत्रणेद्वारे (X-BIS) सामानाची तपासणी करण्यात कार्यरत असणाऱ्या विमानकंपनीच्या व्यवस्थापनाने अवैध शस्त्रे सापडल्यास तेथील पोलिसांना आणि संशयास्पद पैसे/सोने-चांदी सापडल्यास विनाविलंब तेथे कर्तव्यावर असणाऱ्या आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांना कळवावे ; आणि

(चार) निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक होत असलेल्या राज्यांमध्ये सुदूर क्षेत्रात / सुदूर क्षेत्राद्वारे / अनियंत्रित विमानतळे/ हेलिपॅड यांद्वारे साधारण विमान / चार्टर्ड / खाजगी विमाने आणि राज्य सरकारांच्या मालकीची किंवा त्यांनी भाड्याने घेतलेली विमाने यांच्यामाध्यमातून केल्या जाणाऱ्या अवैध शस्त्रे, निषिद्ध वस्तू आणि संशयास्पद पैसे / सोने-चांदी यांच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यास जिल्हा दंडाधिकारी/ पोलीस अधीक्षक जबाबदार असतील. मार्गदर्शकतत्वांचे काटेकोरपणे पालन केले जाईल आणि वरील सूचना राज्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया समाप्त होईपर्यंत अंमलात राहतील.

**आर. एन. ढोके, आयपीएस**
अतिरिक्त आयुक्त, सुरक्षा (सीप)

**वितरण .—**

१. सर्व राज्ये संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव.

२. महासंचालक, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, १३ सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली.

३. सर्व राज्ये / संघराज्यक्षेत्रांचे पोलीस महासंचालक / पोलीस महानिरीक्षक

४. नागर विमानन महानिदेशालय, सफदरजंग एअरपोर्टच्या समोर, नवी दिल्ली

५. अध्यक्ष, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, सफदरजंग एअरपोर्ट, नवी दिल्ली

६. आरडी सी ओ एस (सीए), बी सी ए एस, दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, अमृतसर, अहमदाबाद, हैद्राबाद आणि गुवाहाटी काटेकोर अनुपालनासाठी.

७. व्यवस्थापकीय संचालक / डी. आय. ए. एल. (DIAL), न्यु उडान भवन, टर्मिनल-३ च्या समोर, आयजीआय एअरपोर्ट, नवी दिल्ली ३७.

८. व्यवस्थापकीय संचालक, एम आय ए एल (MIAL), सी एस आय विमानतळ, पहिला मजला, टर्मिनल १ बी, सांताक्रुज (पूर्व), मुंबई ४०० ००९.

९. व्यवस्थापकीय संचालक, सी आय ए एल (CIAL) कोचीन इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड, कोचीन एअयपोर्ट, कोचीन.

१०. व्यवस्थापकीय संचालक, एच आय ए एल (HIAL), हैद्राबाद इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड, शामशाबाद ५०० ४०८

११. व्यवस्थापकीय संचालक, बी आय ए एल, बंगळुरु, इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड, ॲडमिनीस्ट्रेशन ब्लॉक, बंगळुरु इंटरनेशनल एअरपोर्ट दे वांशैल, बंगळुरु ५६० ३००

१२. व्यवस्थापकीय संचालक, मिहान इंडिया प्रायवेट लिमिटेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अंताराष्ट्रीय विमानतळ, नागपूर.

**प्रत .—**

१. भारत निवडणूक आयोग / (कृपया लक्षवेध : श्री. एस. के. रुडोला, सचिव) निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली, डल्ब्यू. आर. टी. पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१३/ईईपीएस/खंड सहा/३३० दि. ३० सप्टेंबर २०१३

२. सचिव, भारत सरकार, नागरी विमान चालन मंत्रालय, राजीव गांधी भवन, नवी दिल्ली.

३. अध्यक्ष, सीबीडीटी, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.

४. सहसंचालक, आयबी, ३५ एस पी मार्ग, नवी दिल्ली

**अंतर्गत**

१. खाजगी सचिव सी ओ एस सी ए (COSCA).

२. श्री. आर. एन. ढोके, अतिरिक्त सुरक्षा आयुक्त एसी ओ एस (सी ए), मध्यस्थ अधिकारी, दूरध्वनी क्रमांक ०११-२३३११४६७, मोबाईल नं. ९१+९०१३६२६६०५.

३. श्री. एम. टी. बेग, ए सी एस (सी ए), पर्यायी मध्यस्थ अधिकारी, दूरध्वनी क्रमांक ०११-२३७३१७२१.

४. बीसीएएस मुख्यलयातील सर्व अधिकारी.

**जोडपत्र जी ६**

**भारत सरकार**

नागरी विमानचालन मंत्रालय, नागरी विमान चालन सुरक्षा ब्युरो,
ए विंग, एक-तिसरा मजला, जनपथ भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११०००१

एफ. क्रमांक सीएएस-७ (१५) २०१२ / डीआयव्ही (निर्वाचन) दिनांक १२ नोव्हेंबर २०१३

प्रति,
महानिरीक्षक,
केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल,
(एअरपोर्ट सेक्टर), १३,
सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली

**विषय .—** दिल्ली, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, छत्तीसगड, राजस्थान, मध्य प्रदेश आणि मिझोराम यांच्या विधानसभेच्या निवडणुकां संदर्भात.

महोदय,

वरील विषयावरील भारत निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. ७३९ दि. १ नोव्हेबर २०१३ च्या पत्रास दिलेल्या प्रतिसादावरील केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचा दि. ९ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या पत्र क्र. १०६७९ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. यासंबधाने, बीसीएएस चे दि. ११ ऑक्टोबर २०१३ रोजीचे पत्र (प्रत संलग्न) इतर बाबींबरोबरच असे सांगते की, साधारण विमानचार्टर्ड / खाजगी विमाने आणि राज्य सरकारांच्या मालकीची किंवा त्यांनी भाड्याने घेतलेली विमाने याद्वारे प्रवास करणारे प्रवासी, विमान कर्मचारी आणि सामान यांना नियोजन उड्डाणांसाठी लागू असणाऱ्या साधारण प्रवेशपूर्व (प्रीइम्बार्केशन) सुरक्षा तपासणी प्रक्रिये द्वारेच विमानात प्रवेश दिला जाईल. तसेच, निर्गमनासाठीची साधारण पद्धत अनुसरण्यात येईल आणि असे प्रवासी व सामानास विमानतळाच्या इतर कोणत्याही दरवाजाद्वारे बाहेर पडण्याची अनुमती देण्यात येणार नाही. आणखी तसेच, पुढे भारत विमानपत्तन प्राधिकरणाने या कार्यालयाच्या दि. १ नोव्हेंबर २०१३ च्या समक्रमांकाच्या कार्यालयीन पत्राला प्रतिसाद म्हणून वरील अनुदेशांचा पुनरुच्चार करत आपल्या दि. ८ नोव्हेबर २०१३ रोजीच्या क्र. १५८३ पत्राद्वारे (प्रत संलग्न) विमानतळांना सूचित केले आहे. विद्यमान मनुष्यबळाची पुनर्नियुक्ती करून वरील कर्तव्ये पार पाडता येऊ शकतील.

३. वरील बाबींचा विचार करता, या कार्यालयाच्या सुचनेद्वारे उपरोक्त कार्यपद्धतीची अंमलबजावणी करण्याची आपणास विनंती करण्यात येत आहे.

**सोबत** : वरील प्रमाणे.

आपला विश्वासू,

**आर. एन. ढोके,**
अतिरिक्त सुरक्षा आयुक्त (सीए).

**प्रत :**

१. मुख्य सचिव, मध्यप्रदेश
२. पोलीस महासंचालक, मध्यप्रदेश पोलीस
३. अध्यक्ष / चेअरमेन, भारत विमानपत्तन प्राधिकरण, आर. जी. भवन, नवी दिल्ली.

**प्रत माहितीसाठी**

१. भारत निवडणूक आयोग (श्री. बी. बी. गर्ग, सहसंचालक), निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ०१.
इंटर्नल : जॉईंट सीओएससीए यांचे खाजगी सचिव, एसीओएस (एस) यांचे खाजगी सचिव, सर्व आर. डी. सी. ओ. एस. बी.सी.)

**जोडपत्र जी ७**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/निदेश/ईईपीएस/२०१५/खंड दोन दिनांक २९ मे २०१५.

प्रति,

सर्व राज्ये व संघराज्य
क्षेत्रे यांचे मुख्य निर्वाचन अधिकारी.

**विषय .—** रोख रक्कम आणि इतर बाबी जप्त करणे व सोडून देणे याबद्दलची प्रमाणित कार्यपद्धती यासंदर्भात,

महोदय / महोदया,

आयोगाच्या आदेश क्रमांक ७६/सूचना/२०१४/इपीएस/खंड एकोणीस, दिनांक ३० डिसेंबर २०१४, चे अधिक्रमण करून, भरारी पथके, स्थैतिक संनिरीक्षण पथके इत्यादी यांना तैनात करण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रियेदरम्यान रोख रक्कम व इतर बाबी जप्त करणे व सोडून देणे यांसाठी आवश्यक कार्यवाही आणि अनुपालन करणे यांकरिता सुधारित प्रमाण कार्यपद्धती यासोबत अग्रेषित करण्याचे मला निदेश आहेत (बदल इटालिकमध्ये).

२. ही बाब अनुपालनार्थ सर्व निवडणूक अधिकारी, आयकर विभाग, पोलीस विभाग आणि उत्पादन शुल्क विभाग यांच्या निदर्शनास आणून देण्याची तुम्हाला विनंती करण्यात येत आहे.

३. कृपया या पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

**एस. के. रुडोला**
सचिव.

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

फाईल क्रमांक ७६/निदेश/ईईपीएस/२०१५/खंड दोन                    दिनांक २९ मे, २०१५

## आदेश

ज्याअर्थी, संसदेच्या व प्रत्येक राज्याच्या विधानमंडळाच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण हे संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये निवडणूक आयोगाकडे निहित केले आहे ; आणि

ज्याअर्थी, निर्भय व निःपक्ष निवडणूक पार पाडण्याच्या दृष्टीने मतदारांना धाकदपटशा दाखविणे, धमकी देणे, दबाव टाकणे व लाच देणे या सर्व प्रकारांना आळा घालणे गरजेचे आहे आणि निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदारांना रोख रकमेचे वाटप, भेटवस्तू, मद्य किंवा मोफत अन्न वाटप या मार्गाने मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी किंवा धमकी किंवा धाक याद्वारे मतदारांना धाकदपटशा करण्यासाठी दबाव टाकणे, पैशाच्या बळाचा व दंडेलशाहीचा वापर करण्यात येत असल्याचे अहवाल प्राप्त झालेले आहेतश; आणि

ज्याअर्थी, मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी लाच म्हणून रोख रकमेचे किंवा कोणत्याही वस्तुचे वाटप करणे किंवा दंडेलशाहीचा वापर करणे भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ख आणि १७१ग अन्वये गुन्हा असून लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ अन्वये तो भ्रष्टाचारदेखील आहे ;

त्याअर्थी, आता, भारत निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणुकांचे पावित्र्य राखण्यासाठी याद्वारे मतदारसंघात प्रचारावर रोख रकमेत बेसुमार खर्च करणे किंवा इतर प्रकारे लाच म्हणून वस्तुंचे वाटप करणे, बेकायदेशीर हत्यारे, शस्त्रात्रे, दारूगोळा, मद्य यांची वाहतूक किंवा समाजकंटक यांवर लक्ष ठेवण्यासाठी घटित केलेल्या भरारी पथकाला पुढील प्रमाणे कार्यपद्धती घालून दिली आहे.

### भरारी पथक (FS)

१. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात/क्षेत्रखंडामध्ये तीन किंवा अधिक भरारी पथके असतील. भरारी पथकांचे कार्य, निवडणूक घोषित झाल्याच्या दिनांकापासून सुरू होईल आणि मतदान पूर्ण होईपर्यंत चालू राहील.

२. भरारी पथक (अ) आदर्श आचार संहितेची सर्व उल्लंघने व संबंधित तक्रारींवर कार्यवाही करील. (ब) धमकी, धाकदपटशा, समाजविघातक घटकाच्या हालचाली, मद्य, शस्त्रास्त्रे व दारूगोळा आणि मतदारांना लाच देण्याच्या प्रयोजनासाठी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम बाळगणे इत्यादी सर्व तक्रारींवर कार्यवाही करील; (क) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी/राजकीय पक्षाने केलेल्या किंवा प्राधिकृत निवडणूक खर्चाबाबतच्या सर्व तक्रारींवर कार्यावाही करील ; (ड) आयोगाने निवडणुकीची घोषणा केल्यानंतर ध्वनिचित्रण संनिरिक्षण पथकाच्या (VST) मदतीने राजकीय पक्षाद्वारे घेतल्या जाणाऱ्या सर्व मोठ्या प्रचार फेऱ्या (रॅली), जाहीर सभा किंवा इतर मोठ्या खर्चाचे ध्वनिचित्रण करील.

३. खर्च संवेदनशील मतदार संघात आवश्यकतेनुसार अधिक भरारी पथके असतील ; भरारी पथकांना या काळात इतर कोणतेही काम देण्यात येणार नाही. भरारी पथकाचे प्रमुख म्हणून दंडाधिकारी आणि भरारी पथकातील इतर अधिकारी यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक तक्रार संनियंत्रण कक्ष व दूरध्वनी सहायता कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्वसाधारण निरीक्षक, पोलीस निरीक्षक, खर्च निरीक्षक व सहायक खर्च निरीक्षक यांना देण्यात येईल. खर्च संवेदनशील मतदारसंघात परिस्थितीनुरुप भरारी पथकात, केंद्रीय पोलीस दल (सीपीएफ) किंवा राज्य सशस्त्र पोलीस समाविष्ट करता येतील आणि जिल्हा निवडणूक अधिकारी याबाबत आवश्यक ती पावले उचलतील. जिल्हा निवडणूक अधिकारी, सचोटी सिद्ध अधिकाऱ्यांसह भरारी पथक घटित करील.

४. ज्यावेळी, रोख रक्कम अथवा मद्य किंवा कोणत्याही स्वरूपातील लाच देत असल्याबाबत किंवा समाजविघातक घटकांच्या कारवायांबाबत किंवा शस्त्रात्रे आणि दारूगोळा बाळगल्याबाबत एखादी तक्रार प्राप्त होईल तेव्हा भरारी पथक तात्काळ घटनास्थळी दाखल होईल. कोणत्याही गुन्ह्याचा आयोगाला संशय असल्यास, भरारी पथकाचे प्रभारी पोलीस अधिकारी रोख रक्कम किंवा लाच देण्यासाठीच्या बाबी (वस्तू) किंवा अशा इतर वस्तू जप्त करील आणि व साक्षीदारांची आणि ज्या व्यक्तीकडून वस्तू जप्त केल्या आहेत त्या व्यक्तीची साक्ष नोंदवील आणि ज्या व्यक्तीकडून अशा प्रकारच्या वस्तू जप्त केलेल्या आहेत त्या व्यक्तीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदींनुसार जप्तीसाठी योग्य पंचनामा जारी करील. हे प्रकरण २४ तासाच्या आत सक्षम प्राधिकारिता असलेल्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहे, याची त्याने खात्री करावी. भरारी पथकाचा दंडाधिकारी योग्य कार्यपद्धती अनुसरलेली आहे, आणि तेथे कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची समस्या नाही, याची सुनिश्चिती करील.

५. भरारी पथकाचा दंडाधिकारी, लाच दिल्या जाणाऱ्या वस्तू किंवा रोख रक्कम जप्त केल्याबाबत जोडपत्र-अ मधील नमुन्यात (Annexure-A), जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला दैनंदिन कार्य अहवाल पाठवील आणि त्याची एकप्रत निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक व खर्च निरीक्षक यांना पाठवील तसेच, आदर्श आचार संहिता उल्लंघनाबाबतचा दैनंदिन कार्य अहवाल जोडपत्र-ब (Annexure-B) मध्ये दिलेल्या नमुन्यात निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक आणि सर्वसाधारण निरीक्षक यांना सुद्धा पाठवील. पोलीस अधीक्षक दैनंदिन कार्य अहवाल पोलीस मुख्यालयाच्या मध्यस्थ अधिकाऱ्याला पाठवील, तो जिल्ह्याचे असे सर्व अहवाल एकत्रित करून त्याचा एकत्रित अहवाल त्याच नमुन्यात (म्हणजे, जोडपत्र-अ व ब) आयोगाला फॅक्स/ई-मेल द्वारे दुसऱ्या दिवशी पाठवील आणि त्याची एक प्रत राज्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास पाठवील.

६. संपूर्ण कार्यवाहीचे ध्वनिचित्रमुद्रण करण्यात येईल. भरारी पथकाचे प्रभारी अधिकारी, तात्काळ तक्रार अहवाल दाखल करतील (एक) लाच घेणाऱ्या व देणाऱ्या व्यक्ती ; आणि (दोन) ज्यांच्याकडून निषिद्ध वस्तू जप्त करण्यात आली आहे अशी इतर कोणतीही व्यक्ती, किंवा (तीन) बेकायदेशीर कृत्यात सहभागी असणारे इतर कोणतेही समाजविघातक घटक या विरोधात अहवाल दाखल करतील, तक्रार/प्राथमिक माहिती अहवाल (FIR) ची प्रत सार्वजनिक माहितीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या सूचना फलकावर पारदर्शित करण्यात येईल आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, सर्वसाधारण निरीक्षक, खर्च निरीक्षक व पोलीस निरीक्षकाला पाठविण्यात येईल. जर ती बाब कोणत्याही उमेदवारांच्या निवडणूक खर्चाशी संलग्न असेल, तर खर्च निरीक्षक त्याची नोंद शॅडो (Shadow) निरीक्षण नोंदवहीत करील.

७. जर रोख रक्कम वाटप, भेटवस्तू, मद्य किंवा मोफत अन्न वाटप याबाबत, किंवा मतदारांना धमकी/धाकदपटशा ; किंवा शस्त्रात्रे/दारूगोळा/समाजविघातक घटक याबद्दलची तक्रार आली असेल आणि भरारी पथकाला तात्काळ तेथे पोहचणे शक्य नसेल तर ते, जवळच्या स्थैतिक संनिरीक्षण पथकाकडे किंवा त्या क्षेत्रातील पोलीस ठाणे यांच्याकडे ती माहिती पाठविण्यात येईल, ते त्या तक्रारीवर योग्य कारवाई करण्यासाठी घटनास्थळी धाव घेतील. भरारी पथकाने अग्रेषित केलेल्या तक्रारी प्राप्त झाल्यावर किंवा भरारी पथकाकडे स्वतंत्रपणे मिळालेल्या तक्रारींवरुन पोलीस अधिकाऱ्यांना केलेल्या सर्व जप्तीच्या कार्यवाहीचा अहवाल भरारी पथकाला देण्यात येईल आणि ते भरारी पथक आपल्या दैनंदिन कार्य अहवालांच्या संबंधित स्तंभात/रकान्यात अशा जप्तीचा अहवाल समाविष्ट करील.

८. प्रत्येक भरारी पथक त्याच्या वाहनामध्ये बसविण्यात आलेल्या ध्वनिक्षेपण यंत्रणेद्वारे त्याच्या अधिकारितेतील क्षेत्रांमध्ये स्थानिक भाषांमध्ये पुढील घोषणा करील : " भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ख नुसार, निवडणूक प्रक्रियेच्या काळात त्याच्या मतदानाचा हक्क वापरण्याकरिता व्यक्तीला प्रलोभन दाखवण्याच्या कोणतेही पारितोषिक रोख रक्कम किंवा या प्रकारचे देणारी किंवा स्वीकारणारी कोणतीही व्यक्ती, एक वर्षापर्यंतच्या कारावासाच्या किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल. तसेच, भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ग नुसार, जी व्यक्ती कोणत्याही उमेदवाराला किंवा मतदाराला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला धमकावील किंवा कोणत्याही स्वरूपाची इजा करील, ती एक वर्षापर्यंतच्या कारावासाच्या किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल. लाच घेणारा व देणारा या दोहोंच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यासाठी आणि मतदारांना धमकी देणाऱ्या व धाकदपटशा करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यासाठी भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. सर्व नागरिकांना कोणतीही लाच स्वीकारण्यापासून दूर राहण्यासाठी याद्वारे विनंती करण्यात येत आहे आणि जर कोणी लाच देत असेल अथवा लाच देण्याघेण्याबाबत कोणतीही माहिती असेल अथवा मतदारांना धमकी/धाकदपटशा करीत असेल तर त्याने तक्रार स्वीकारणाऱ्या जिल्ह्याच्या तक्रार संनियंत्रण कक्षातील सर्व दिवशी २४ तासात कधीही या ................ टोल मुक्त क्रमांकावर त्याची माहिती द्यावी ."

९. आयोगाचा अनुदेश क्र. २३/१/२०१५ - इआरएस, दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ अनुसार, मतदान केंद्राच्यामतदार यादीचे शोधन आणि अधिकृतता जपण्यासाठी स्थापन केलेला मतदान केंद्रस्तरीय जनजागृती गट, त्यांच्या क्षेत्रात घडणाऱ्या गैरप्रकारांची माहिती आयोगाने तयार केलेल्या मोबाईल सॉफ्टवेअरद्वारे किंवा अन्य प्रकारे गोळा करण्यासदेखील सहाय्य करतील. ज्यावेळी मतदान केंद्रस्तरीय जनजागृती गट कोणतीही माहिती देतील त्यावेळी भरारी पथक लवकरात लवकर तेथे पोहोचेल आणि आवश्यक ती कारवाई करील व परिपोषक पुरावे गोळा करील.

१०. जिल्हा निवडणूक अधिकारी वरील माहिती असलेली पत्रके इंग्रजी, हिंदी व स्थानिक भाषेत प्रसिद्ध करील आणि भरारी पथकामार्फत प्रमुख ठिकाणी ती वितरित करील. निवडणूक खर्च संनियंत्रण उपाययोजनांबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी प्रसिद्धीपत्रक देखील काढील.

११. निवडणुका घोषित झाल्यानंतर, जिल्हा निवडणूक अधिकारी वरील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लोकहितास्तव निवडणूक प्रक्रियेमधील खर्चाचे संनियंत्रण यंत्रणेबाबत लेखी स्वरूपात आणि इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांमार्फत आवाहन करील.

१२. भरारी पथकांद्वारे वापरण्यात येणाऱ्या सर्व वाहनांवर सीसीटीव्ही/वेब कॅमेरा बसविलेला असेल किंवा त्यांच्या कारवाईवर खंड पाडल्यास त्याचे चित्रण करण्यासाठी त्यांच्याकडे व्हिडिओ कॅमेरा असेल (उपलब्धता आणि आर्थिक तरतूद लक्षात घेऊन).

**स्थैतिक संनिरीक्षण पथक (एसएसटी)**

१. प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये/क्षेत्रखंडामध्ये तीन किंवा अधिक स्थैतिक संनिरीक्षण पथके असतील. प्रत्येक पथकामध्ये एक कार्यकारी दंडाधिकारी व तीन किंवा चार पोलीस कर्मचारी असतील, हा पथक तपासणी चौक्यांच्या ठिकणी कार्यरत असेल. त्या क्षेत्राच्या संवेदनशिलतेवर अवलंबून राहून, सीपीएफच्या सदस्यांना स्थैतिक संनिरीक्षण पथकामध्ये सामावून घेण्यात येईल.

२. हे पथक खर्च संवेदनशील लोकवस्त्यांमध्ये/पाड्यांमध्ये तपासणी चौक्या उभारील आणि त्यांच्या क्षेत्रात आणण्यात येणाऱ्या बेकायदेशीर दारू, लाच देण्यासाठी वस्तू, मोठ्या प्रमाणावरील रोख रकमा, बेकायदेशीर शस्त्रे किंवा दारूगोळा यांच्या वाहतुकीवर लक्ष ठेवील आणि त्याचबरोबर त्यांच्या क्षेत्रातील समाजविघातक घटकांच्या कारवायांवरही लक्ष ठेवील. तपासणीच्या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ किंवा सीसीटीव्ही चित्रण करण्यात येईल.

३. स्थैतिक संनियंत्रण पथकाचे दंडाधिकारी, दैनिक कामकाज अहवाल जोडपत्र-क मधील नमुन्यात जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठवील आणि त्याच दिवशी, त्याची एक प्रत, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक आणि खर्च निरीक्षक, सर्वसाधारण निरीक्षक, आणि पोलीस निरीक्षक यांना पाठवील. पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालयाच्या मध्यस्थ अधिकाऱ्याला अद्ययावत दैनिक कामकाज पाठवील, तो जिल्ह्यातील अशा सर्व अहवालांचे संकलन करील आणि दुसऱ्या दिवशी त्याच नमुन्यात (म्हणजेच, जोडपत्र-क) एकत्रिकृत अहवाल फॅक्स/ईमेलद्वारे आयोगाला पाठवील आणि राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला प्रत अग्रेषित करील.

४. स्थैतिक संनियंत्रण पथक, कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तपासणी करील आणि त्याचे ध्वनिचित्रमुद्रण करण्यात येईल. कार्यकारी दंडाधिकारी उपस्थित असल्याशिवाय अशी कोणतीही तपासणी करण्यात येणार नाही. दिनांक, ठिकाण व पथक क्रमांक असल्याच्या अशा विभेधक ओळख चिन्हांसह (व्हीडीओ) ध्वनिचित्रफिती सीसीटीव्ही चित्रण दुसऱ्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात येईल. तो/ते नंतर कोणत्याही वेळी आयोगाच्या पडताळणीसाठी जतन करुन ठेवील. जनतेतील कोणताही सदस्य, ३०० रुपये जमा करून ध्वनिचित्रमुद्रण/सीसीटीव्ही चित्रणाची एक प्रत मिळवू शकेल, त्याची जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला मोठ्या प्रमाणात जाहिरातही करता येईल.

५. जेव्हा जेव्हा जिल्ह्याच्या/राज्याच्या सीमांवर किंवा इतर कोणताही ठिकाणी कोणत्याही अभिकरणाद्वारे, कोणत्याही प्रयोजनासाठी, तपासणी चौक्या उभारण्यात येतील तेव्हा तेव्हा त्या क्षेत्रातील तपासणीची आणि रोख रकमा किंवा लाचेच्या वस्तू जप्त केलेल्याबद्दलचा अहवाल पाठविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तेथील जवळचे स्थैतिक चौकशी / तपासणी पथक अशा प्रथकाच्या ठिकाणी उपस्थित राहील.

६. प्रमुख मार्गावरील किंवा मुख्य रस्त्यावरील तपासणीस स्थैतिक संनिरीक्षण पथकाकडून तपासणीस निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून प्रारंभ होईल. स्थैतिक संनिरीक्षण पथकाचे नियंत्रण आम निरीक्षक व खर्च निरीक्षक यांच्याशी विचारविनियम करून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे व पोलीस अधीक्षकाद्वारे करण्यात येईल, आणि विशेषतः संवेदनशील क्षेत्रात किंवा खर्च संवेदनशील भागात मतदानापूर्वी शेवटच्या ७२ तासांमध्ये ही यंत्रणा बळकट करण्यात येईल आणि अशा कालावधीत, कोणत्याही परिस्थितीत स्थैतिक संनिरीक्षण पथक बरखास्त केलेल जाणार नाही.

७. तपासणी दरम्यान उमेदवार, त्याचा प्रतिनिधी, किंवा पक्ष कार्यकर्ता प्रवास करीत असलेल्या वाहनात बहुधा मतदारांना प्रलोभित करण्याच्या दृष्टीने वापरावयाची ५०,००० रुपयापेक्षा अधिक कोणतीही रोख रक्कम आढळल्यास किंवा वाहनात भित्तीपत्रके किंवा निवडणूक विषयक सामग्री किंवा १०,००० रुपयांपेक्षा अधिक मूल्याचे कोणतेही अंमली पदार्थ, दारू, शस्त्रे किंवा भेटवस्तू, आढळून आल्यास किंवा वाहनात कोणत्याही इतर बेकायदेशीर वस्तू आढळून आल्यास, त्या जप्त करण्यात अधीन असतील. तपासणी आणि जप्तीच्या संपूर्ण घटनेचे व्हिडीओ/सीसीटीव्हीद्वारे स्थैतिक संनिरीक्षण पथकातील चित्रण करावयाचे असून ते दरदिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करण्यात येईल.

८. कोणताही प्रमुख (स्टार) प्रचारक केवळ त्याच्या/तिच्या वैयक्तिक वापराकरिता १ लाख रुपयापर्यंतची रोख रक्कम किंवा पक्षाचा कोणताही पदाधिकारी रकमेचा आणि तिच्या वापराचा उल्लेख असणाऱ्या पक्षाच्या कोषाध्याक्षाच्या प्रमाणपत्रासह रोख रक्कम नेत असेल तेव्हा स्थैतिक संनिरीक्षण पथकातील प्राधिकारी त्या प्रमाणपत्राची प्रत ठेवून घेतील आणि रोख रक्कम जप्त करणार नाहीत. जर एखाद्या वाहनात १० लाख रुपयांहून अधिक रक्कम आढळून आली असेल ती रक्कम आणि कोणत्याही उमेदवाराशी किंवा प्रतिनिधीशी

किंवा पक्ष त्याबाबत कोणताही गुन्हा केला असल्याचा पदाधिकाऱ्याशी संबंधित असल्यास संशय येत नसेल तेव्हा स्थैतिक संनिरीक्षण पथक ती रोख रक्कम जप्त करणार नाही. आणि आयकर कायद्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी, त्याबाबतची माहिती आयकर प्राधिकाऱ्याकडे पाठवील.

९. तपासणी दरम्यान, गुन्हा घडल्याचा संशय असल्यास, रोख रकमेची किंवा कोणत्याही वस्तूची जप्ती, कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या उपस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदीनुसार स्थैतिक संनिरीक्षण पथकाच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याकडून करण्यात येईल. स्थैतिक संनिरीक्षण पथकाचा प्रभारी पोलीस अधिकारी २४ तासांच्या आत, अधिकरिता असलेल्या न्यायालयामध्ये तक्रार स्थैतिक संनिरीक्षण पथकाच्या प्रथम माहिती अहवाल दाखल करील.

१०. भरारी पथके व स्थैतिक संनिरीक्षण पथके हे, हा सामानाची किंवा वाहनांची तपासणी करताना, विनम्र, सभ्य आणि सौजन्यशील असतील. महिला अधिकारी असल्याखेरीज माहिलांकडे असलेल्या बॅगेची तपासणी करण्यात येणार नाही. भरारी पथक, त्यांच्या क्षेत्रात तपासणी करत असताना स्थैतिक संनिरीक्षण पथकाच्या कामकाजाचे आणि ते योग्य प्रकारे पार पाडत असल्याबाबतचे पर्यवेक्षण करील.

११. आयोगाच्या निदेशानुसार भरारी पथकांना व स्थैतिक संनिरीक्षण पथकांना आगाऊ प्रशिक्षण देण्यात यावे. जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक, पथके घटित करण्यात आले आहेत व त्यांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात आले आहे, याची खातरजमा करतील. पोलीस मुख्यालयातील मध्यस्थ अधिकारी, पोलीस दलाला याबाबत योग्य ते प्रशिक्षण दिले असल्याची आणि संचेतन केले असल्याची सुनिश्चिती करील.

१२. भरारी पथकाच्या किंवा स्थैतिक संनिरीक्षण पथकाच्या वर्तणुकीबाबत कोणतीही तक्रार असल्यास, एखादी व्यक्ती दुर्व्यवहार किंवा छळवणूक याबाबतच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी ज्याच्याकडे अपील करू शकेल असा प्राधिकारी, हा जिल्ह्याचा उप जिल्हा निवडणूक अधिकारी (खर्च संनियंत्रण कक्षाचा प्रभारी) असेल.

१३. जप्तीनंतर, जप्त केलेली रक्कम, न्यायालय निदेश देईल अशा रीतीने जमा करण्यात येईल आणि १० लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या जप्तीची एक प्रत, त्या प्रयोजनार्थ कार्यरत असलेल्या आयकर प्राधिकाऱ्याकडे अग्रेषित करण्यात येईल. जिल्हा निवडणूक अधिकारी, आवश्यक असल्यास, कार्यालयीन वेळेनंतर आणि सुटीच्या दिवशीसुद्धा जप्त करण्यात आलेली रक्कम घेण्यासाठी कोषागार युनिटांना आवश्यक त्या सूचना देईल.

१४. जेव्हा कधी भरारी पथकांना किंवा स्थैतिक संनिरीक्षण पथकांना किंवा पोलीस प्राधिकाऱ्यांना त्यांच्या क्षेत्रामधील मोठ्या प्रमाणातील रोख रकमेच्या वाहतुकीस, कोणत्याही संशयास्पद वस्तुंविषयी माहिती मिळेल तेव्हा ते अशा वस्तूंविषयी संबंधित कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांना कळवील.

१५. स्थैतिक संनिरीक्षण पथके व भरारी पथकाद्वारे यांच्याकडून वापरण्यात आलेल्या सर्व वाहनांना भौगेलिक स्थाननिश्चयन प्रणाली (जीपीआरएस) असलेले सुसज्ज माग शोधन युनिट बसविण्यात येईल, जेणेकरून चमूद्वारे वेळेवर केलेल्या कारवाईचे संनियंत्रण करणे शक्य होईल.

१६. **रोख रक्कम परत करणे :**

जिल्ह्याच्या तीन अधिकाऱ्यांचा समावेश असणार एक म्हणजे (एक) जनतेला व प्रामाणिक व्यक्तीची गैरसोय टाळण्यासाठी आणि तसेच त्यांच्या तक्रारींचे कोणत्याही असल्यास, निवारण करण्यासाठी, (एक) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/सीडीओ / पीडी, डीआरडीए, (दोन) जिल्हा निवडणूक कार्यालयातील खर्च संनियंत्रण अधिकारी यांचा मध्यस्थ अधिकारी (निमंत्रक) आणि, (तीन) जिल्हा कोषागार अधिकारी यांची अधिकाऱ्यांचा समावेश असणारी समिती घटित करण्यात येईल. समिती पोलीस किंवा स्थैतिक संनिरीक्षण पथक किंवा भरारी पथकांनी जप्त केलेल्या रकमांच्या प्रत्येक प्रकरणाची स्वतःहून तपासणी करील आणि अशा जप्तीबाबत कोणताही प्रथम माहिती अहवाल/तक्रार दाखल करण्यात आली नसेल असे किंवा प्रभाग कार्यपद्धतीनुसार जप्त केलेल्या रकमेचा कोणत्याही उमेदवाराशी किंवा राजकीय पक्षाशी किंवा कोणत्याही निवडणूक प्रचार, इत्यादींशी संबंध नाही, असे दिसून आल्यास, समिती, अशी रोख रक्कम ज्यांच्याकडून जप्त करण्यात आली होती अशा व्यक्तींना देण्याबाबतचे वस्तुनिष्ठ मौखिक आदेश दिल्यानंतर अशी रक्कम तात्काळ परत करण्यासाठी उपाययोजना करील. समिती सर्व प्रकरणांचा विचार करील आणि जप्तीबाबत निर्णय घेईल.

(दोन) जप्तीविरुद्ध अपील करावयाची कार्यपद्धती जप्तीबाबतच्या कागदपत्रांमध्ये नमूद करण्यात येईल आणि रोख रक्कम जप्त करतेवेळी अशा व्यक्तीलादेखील कळविण्यात येईल. या समितीच्या आमंत्रकाच्या दूरध्वनी क्रमांकासह समितीच्या कामकाजाबद्दल मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात यावी.

(तीन) मध्यस्थ अधिकारी, पकडण्यात आलेल्या/जप्त केलेल्या रोख रकमेसंबंधातील अनुक्रमे दिनांकनिहाय तपशील आणि संबंधित व्यक्तीला (व्यक्तींना) रक्कम परत देण्याचा दिनांक यांसह खर्चाचे संनियंत्रण करणाऱ्या नोंदवहीमध्ये रोख रक्कम परत देण्यासंबंधीची सर्व माहिती नोंदवून ठेवील.

(चार) परत देण्यात येणारी रोख रक्कम १० (दहा) लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यास, ती रक्कम देण्यात येण्यापूर्वी, आयकर विभागाच्या मध्यस्थ अधिकाऱ्याला सूचित करण्यात येईल.

(पाच) भरारी पथके, स्थैतिक चौकशी / तपासणी पथके किंवा पोलीस अधिकारी रोख रक्कम जप्त केलेल्याची सर्व प्रकरणे जिल्ह्यात घटित केलेल्या समितीच्या तात्काळ निदर्शनास आणून देतील आणि समिती, वर नमूद केलेल्या परिच्छेद (एक) नुसार कारवाई करील. जप्त करण्यात आलेली रोख रक्कम, जप्त करण्यात आलेल्या मौल्यवान वस्तू यांसंबंधातील कोणतेही प्रकरण, कोणत्याही परिस्थितीत, कोणताही प्रथम माहिती अहवाल/तक्रार दाखल केली असल्याखेरीज, मतदानाच्या दिनांकानंतर ७ (सात) दिवसांपेक्षा अधिक दिवसांसाठी मालखाना किंवा कोषागारात प्रलंबित ठेवता येणार नाही. अशी सर्व प्रकरणे अपील समितीसमोर ठेवण्याची आणि अपील समितीच्या आदेशानुसार रोख रक्कम/मौल्यवान वस्तू परत करण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल.

१७. आणखी असे सूचित करण्यात आले आहे की, आयोगाकडे अहवाल पाठविण्यासाठी, आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या दैनिक कामकाज अहवालासाठीच्या इइएमएस सॉफ्टवेअरचा (संगणकप्रणालीचा) वापर करण्यात यावा.

आदेशानुसार,

**एस. के. रुडोला,**
सचिव.

**टीप .–** कृपया जोडपत्र ए आणि बी साठी जोडपत्र बी८, बी ९ आणि बी १० चा संदर्भ घ्यावा.

## ज्यांच्या रोख रकमा/वस्तू जप्त केल्या आहेत त्या व्यक्तींना द्यावयाच्या पावतीचा नमुना

पुस्तक क्र. ............................

पावती क्रमांक .........................

दिनांक .................................

कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे नाव ............................................................................... (भरारी पथकाचे / स्थैतिक संनिरीक्षण पथक शीर्षक).

१. जप्त केलेली संपूर्ण रोख रक्कम/इतर वस्तू मतदारांना लालूच दाखविण्यासाठी वापरल्या जाण्याचा संशय असल्याने, श्री. ........................................ ................................................................ पत्ता ........................................ .........................भ्रमणध्वनी क्रमांक ........................... यांच्याकडून जप्त केलेली रोख रक्कम रु. .................................. ......................(अक्षरांत ................................................................... )/ जप्त केलेल्या इतर वस्तू ................ .................. ............................................................................................ च्या विधानसभा/लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या ..................................................................................................... (जेथून जप्त केलेली आहे त्या ठिकाणाचे नाव) ....................................................................... येथून दिनांक ............................................ रोजी ........................................................ (राज्य/संघ राज्यक्षेत्राचे नाव) च्या ...........................................................

जिल्हा .............................. पोलीस स्टेशन.................................................. मधील

**किंवा**

२. रोख रुपये, .............. (अक्षरात रुपये .......................................................)/(इतर वस्तूंचा तपशील)

श्री. ........................................................... (आयकर विभागाच्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम) यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली असून आयकर कायद्यान्वये आवश्यक ती कारवाई करण्यात येईल (लागू नसेल ते खोडावे).

### अपील कार्यपद्धती

तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तुम्ही सात दिवसांच्या आत ........................................ यांच्याकडे (एडीएमचे/एसडीएमचे नाव, खर्च संनियंत्रण कक्षाचे प्रमुख) अपील करू शकता किंवा तुम्ही, जर कारवाई आयकर विभागाशी संबंधित असेल तर, आवश्यक अनुतोषासाठी सहसचिव, आयकर (अन्वेषण) यांच्याकडे अपील करू शकता.

शिक्क्यासह स्वाक्षरी

(दंडाधिकाऱ्याचे नाव, पदनाम व पत्ता)

दिनांक :

**जोडपत्र जी-८**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/सूचना/ईईपीएस/२०१५/ खंड पाच दिनांक : २० जानेवारी २०१६

प्रति,
सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रे यांचे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :**– अनुसूचीतर चालक परवाना धारकांची यादी यासंबंधी.

महोदय/महोदया,

१. कृपया, महासंचालक, नागरी विमानचालन, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र क्र.ए.व्ही. १४०१५/सामान्य/२००८-एटी-आय, दिनांक ५ जानेवारी २०१६ यासोबतची आहे. अनुसूचीतर नसलेल्या चालक परवाना धारक सेवा पुरवठादाराची यादी यांची सोबत जोडलेली प्रत पहावी. महासंचालक नागरी विमानचालन यांच्या कार्यालयाने असे कळविले आहे की, अनुसूचीतर चालक परवाना धारक (सेवा पुरवठादार) यांना भाडे आकार निश्चित करण्याची मोकळीक आहे आणि असा आकार महासंचालक, नागरी विमानचालन यांच्या कार्यालयाद्वारे विनियमित केले जात नाही.

आपणांस विनंती आहे की, जे पत्र सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी आणि इतर निवडणूक प्राधिकारी यांच्या निर्दशनास आणून देण्यात यावे जेणेकरुन आवश्यकता भासेल तेव्हा तेव्हा त्यांना हेलिकॉप्टर/एअरक्राफ्ट इत्यादींचे भाडे घेण्यासंबंधीची माहिती थेट अनुसूचीतर चालकांच्या परवाना धारकाकडून प्राप्त करू शकेल.

आपला विश्वासू,

**अविनाश कुमार,**
सचिव.

**सोबत :**– वरीलप्रमाणे (३३ पृष्ठे)

प्रत रवाना.–श्री. वेद प्रकाश, संचालक, व्यवहार (नागरी विमान चालन) महासंचालक, नागरी विमानचालन, तांत्रिक केंद्र, सफदरजंग विमानतळासमोर, नवी दिल्ली यांचे कार्यालय (विशेष संदेशवाहकाद्वारे) यांना निवडणूक प्रक्रियेदरम्यान नवीनतम माहिती निवडणूक प्राधिकाऱ्यास मिळणे शक्य व्हावे यासाठी, महासंचालक, नागरी विमानचालन, यांच्या संकतेस्थळावर इच्छित माहिती व अद्ययावत यादी सुकररित्या मिळावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**अविनाश कुमार,**
सचिव.

**जोडपत्र जी-९**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

क्रमांक ७६/अनुदेश/ईईपीएस/२०१६/खंड दोन — दिनांक ४ एप्रिल २०१६

प्रति,

सर्व राज्यांचे/संघ राज्यक्षेत्रे
मुख्य निवडणूक अधिकारी.

**विषय :—** कोणत्याही जागेत रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तू इत्यादींचा साठा असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यावर भरारी पथकाने कार्यवाही करण्यासाठीची प्रमाणचालन कार्यपद्धती यासंबंधी.

महोदया/महोदय,

आयोगाचे पत्र क्रमांक ७६/अनुदेश/२०१५/ ईईपीएस/खंड दोन, दिनांक २९ मे २०१५ कडे आपले लक्ष वेधण्याचा आणि आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, निवडणूक प्रक्रियेदरम्यान रोख रक्कम, आणि इतर वस्तू, जप्त करण्यासाठी आणि ती परत करण्यासाठी, भरारी पथके, स्थैस्तिक संनिरीक्षण पथके इत्यादी, यांना, तैनात करण्याच्या संबंधात, अनुदेशांमध्ये एका व्यापक प्रमाण चालन कार्यपद्धतीची तरतूद करण्यात आली आहे.

प्रमाण कार्यपद्धतीमध्ये, मतदारांना लाच देणे, इत्यादींच्या प्रयोजनार्थ, मोठ्या प्रमाणात रोख रकमा, इत्यादी घेऊन जाण्याशी संबंधित तक्रारींच्या तपशिलांच्या समावेश असतो. तथापि, निवडणुकीच्या संबंधात, संशयास्पद असेल अशा कोणत्याही जागेत बेकायदेशीर वापरासाठी मोठ्याप्रमाणात रोख रक्कम साठवून ठेवण्याशी संबंधित तक्रारींच्या बाबतीत, तक्रार संनियंत्रण कक्ष आणि भरारी पथक यांनी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीसंबंधात स्पष्टतेचा अभाव असल्याचे दिसून आले आहे. त्यानुसार असे ठरविण्यात आले आहे की, मतदारांना लाच देण्यासाठी वापरली जाण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही जागेमध्ये मोठ्या रोख रकमा किंवा इतर मौल्यवान वस्तू ठेवण्यात आल्या आहेत अशी तक्रार प्राप्त झाल्यावर, तक्रार नियंत्रण कक्ष डीईएमसी किंवा खर्च निरीक्षक यांनी पुढील कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे.

१. अशी कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यावर, तक्रार संनियंत्रण कक्ष, खर्च निरीक्षकाला त्यासंबंधीची तात्काळ माहिती देईल.

२. खर्च निरीक्षक किंवा मध्यस्थ अधिकारी, डीईएमसी हे, प्रभारी आयकर पथकाशी समन्वय ठेवतील. आयकर मध्यस्थ अधिकाऱ्यास (अन्वेषण) आवश्यक असेल तर, समुचित कार्यवाही करण्यासाठी देखील कळविता येईल.

३. भरारी पथक सदर ठिकाणी तात्काळ जाईल. आयकर विभागाचे पथक येईपर्यंत किंवा माहिती खरी नसल्याचे चौकशीतून निष्पन्न होईपर्यंत त्या जागी सतत पाळत ठेवण्यासाठी सदर जागेपासून काही अंतरावर व्यक्तींना तैनात करील. आवश्यक असेल तर ध्वनिचित्रमुद्रण देखील करता येईल.

४. आयकर पथक येण्यापूर्वी खर्चनिरीक्षक, किंवा भरारी पथकाचा कोणताही सदस्य, सदर जागी प्रवेश करणार नाही.

५. आयकर अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार आयकर विभागाकडून झडती व जप्ती संबंधीची कोणतीही कारवाई हाती घेण्यात येईल. तथापि, जर भरारी पथकांचे सदस्य, किंवा खर्च निरीक्षक यांच्या सेवा, अधिप्रमाणन इत्यादीसह. आयकर अधिनिमांच्या तरतुदींन्वये अनिवार्यरीत्या आवश्यक असतील तर, त्यांना सदर जागी प्रवेश करता येईल.

६. आयकर पथकास झडती घेण्याकरिता, आवश्यक असलेले सहाय्य, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने/पोलीस अधीक्षकाने पुरविणे अपेक्षित आहे.

७. झडती कालावधी दरम्यान सदर जागेत प्रवेश करणाऱ्या व सदर जागेतून बाहेर येणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणण्याकरिता व चौकशी करण्याकरिता तेथे भरारी पथक हजर असले पाहिजे. अशा वाहनांत/अशा व्यक्तींकडे रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तू इत्यादी आढळून आल्या असतील तर त्या निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार भरारी पथकाद्वारे जप्त करण्यात येतील.

८. असे स्पष्ट करण्यात येत आहे की, खर्च निरीक्षक किंवा भरारी पथक स्वतःहून कोणतीही झडती घेणार नाही.

९.अनुदेशांच्या सारसंग्रहाच्या परिच्छेद ४.२.८ मध्ये अंतर्भूत असलेल्या अनुदेशाचे खर्च निरीक्षकाने काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे. त्याने अंमलबजावणी अभिकरणांसोबत समन्वय ठेवला पाहिजे आणि सर्व अभिकरणांमधील माहितीचा ओघ व देवाणघेवाण मुक्त राहील याची खात्री करील. कोणत्याही अभिकरणाकडून माहितीप्राप्त झाल्यावर, संबंधित कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणाकडून सत्वर कार्यवाही केली जाईल.

सदर बाब, अनुपालनार्थ, आयकर विभाग, पोलीस विभाग आणि सर्व निवडणूक प्राधिकारी, यांच्या कृपया निदर्शनास आणून द्यावी अशी आपणास विनंती आहे.

कृपया या पत्राची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

**सतेंद्रकुमार रूडोला,**
प्रधान सचिव.

**जोडपत्र - जी-१०**

**अनुदेश क्रमांक २२/२०३-सीमाशुल्क**

**एफ क्रमांक सीबीआयसी-२१/१२५/२०२१**
**आयएनव्ही-सीमाशुल्क-सीबीइसी**
**भारत सरकार**
वित्त मंत्रालय
महसूल विभाग
केंद्रीय अप्रत्यक्ष कर सीमाशुल्क मंडळ (सीबीआयसी)
अन्वेषक-सीमाशुल्क

१० वा मजला, मनोरा-२,
जीवन भारती इमारत, संसद मार्ग,,
नवी दिल्ली ११० ००१
इ मेल :-inv-customs@gov.in

दूरध्वनी ०११-२१४००६२५
दिनांक : ०६/०७/२०२३

प्रति,

सर्व प्रधान मुख्य आयुक्त मुख्य आयुक्त / सीमा शुल्क/सीमा शुल्क (निवारक) केंद्रीय जीएसटी प्रधान महासंचालक, जीएसटी गुप्तचर महासंचालनालय, नवी दिल्ली,
प्रधान महासंचालक, महसूल गुप्तचर संचालनालय, नवी दिल्ली,
महासंचालक, डिजीएआरएम, नवी दिल्ली.

महोदया/महोदय,

**विषय :– अधिकारिता असलेल्या सी बी आय सी क्षेत्रीय आस्थापनांद्वारे प्रतिबंधात्मक दक्षता कार्यतंत्र प्रस्थापित करणे आणि निवडणुकीच्या कालावधीत संशयास्पद रोकड, अवैद्य मद्य, अंमली पदार्थ / मादकद्रव्य भेट वस्तू आणि तस्करीचा माल यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करणे, यांबद्दलच्या प्रमाण कार्यपद्धतीबाबत...**

उमेदवारांनी आणि राजकीय पक्षांनी कायदेशीरपणे केलेल्या खर्चाचा निरंतर मागोवा घेणारी विभिन्न संनियंत्रण पथके आणि विभिन्न कायदा अंमलबजावणी अभिकरणे ही निवडणूक खर्चाचे संनिंत्रकण करणाऱ्या यंत्रणेचे दोन मुख्य क्षेत्रे असून त्यांचे समन्वयन करणे आवश्यक असल्याचे निवडणूक आयोगाने अधोरेखित केले आहे. तसेच, निवडणूक आयोगाने अशी चिंता व्यक्त केली आहे की, निवडणूक प्रकियेदरम्यान मतदारांना आकर्षित करण्यासाठी तस्करीच्या वस्तुंचा / प्रतिबंधित मालाचा आणि इतर बेकायदेशीर वस्तुंचा वापर केला जाऊ शकतो या गोष्टीस केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळासह (सी बी आय सी) कायदा अंमलबजावणी अभिकरणांनी आळा घालण्याची गरज आहे, आणखी एक दुसरी चिंतेची बाब म्हणजे, मतदारांना आकर्षित करण्यासाठी गैरआर्थिक प्रलोभने आणि रोख रकमेचा वापर केला जाऊ शकतो, त्या गोष्टीवरही अधिक लक्ष केंद्रीत करून अशा वस्तुंच्या वाटपास प्रतिबंध घालण्यासाठी त्यांचा साठा करणारी गोदामे, इत्यादींवर कडक नजर ठेवून त्या गोष्टीस आळा घालण्याची गरज आहे.

२. आणखी तसेच, निर्भय व निःपक्ष निवडणुकांची सुनिश्चिती करण्यासाठी सी बी आयसीच्या क्षेत्रीय आस्थापनांनी व इतर संबंधित अभिकरणानी एकमेकांना समुचित माहितीची देवाणघेवाण करण्यासह महत्त्वाच्या बाबींवरही समन्वय साधण्यावर व लक्षकेंद्रीत करण्यावर, भारत निवडणूक आयोगाने भर दिला आहे. या संदर्भात, निर्भय व निःपक्ष निवडणुका पार पाडण्याच्या सुनिश्चितीसाठी सी बी आय सी आस्थापनांनी अनुसरावयाची प्रमाणित कार्यपद्धती खाली नमूद केली आहे.

२.१ सीमा शुल्क, सीमा शुल्क (निवारक) आणि केंद्रीय वस्तु व सेवा कर (सी जी एस टी) क्षेत्राचे प्रधान मुख्य आयुक्त / मुख्य आयुक्त आणि महसूल गुप्तचर संचालनालय (डी आर आय) आणि वस्तु आणि सेवा कर गुप्तचर महासंचालनालय (डी जी जी एस टी आय) च्या क्षेत्रीय शाखेचे प्रधान अतिरिक्त महासंचालक (प्रधान एडीजी) अतिरिक्त महासंचालक (एडीजी) यांनी मुख्य निवडणूक आयुक्त किंवा भारत निवडणूक आयोगाच्या सदस्यांनी किंवा त्यांच्यावतीने बोलावलेल्या सर्व बैठकींना उपस्थित रहावे. त्यांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तयारीची स्थिती आणि निवडणूकीशी संबंधित विविध कामे यांसंबधीची माहिती / आधारसामग्री त्यांनी चांगल्या प्रकारे तयार ठेवावी.

२.२ संबंधित सीमा शुल्क, सीमा शुल्क (निवारक) आणि सी जी एस टी क्षेत्राचे प्रधान महासंचालक (प्रधान डी जी), डी आर आय, प्रधान डी जी, डी जी जी एस टी आय, प्रधान मुख्य आयुक्त / मुख्य आयुक्त आपआपल्या अधिकाऱ्यांना, त्यांच्या जबाबदाऱ्यांविषयी योग्य ती माहिती देतील आणि त्याची जाणीव करून देतील. तसेच, ते आयोगाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी विशेषतः मतदारांना आकर्षित करण्यासाठी गैरआर्थिक प्रलोभने देणे (साड्या, सदरे, टोपी टोप्या, उपरणी, गृहपयोगी वस्तू, मुखवटे, स्वयंपाकघरातील वस्तू, इत्यादी) आणि मतदारांना लालूच दाखविण्यासाठी रोख रकमे यांचा वापर करणे, तस्करीच्या / निषिद्ध व इतर वस्तू पकडणे, मतदारांना आकर्षित करण्याच्या कामी वाटप करावयाच्या वस्तुंचा साठा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोदामे यांचा शोध घेऊन निश्चित करणे, रोख रकमांची वाहतूक, इत्यादींच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांकडून तात्काळ उपाययोजना करतील आणि संपूर्ण निवडणुकींच्या काळात त्या उपाययोजनांचे बारकाईने संनियंत्रण आणि तसेच , ते इतर अंमलबजावणी अभिकरणांना/ विभागांना आणि त्यांच्याकडील देखील निवडक माहिती आणि त्याबाबतीत केलेल्या कारवाईची निवडक माहिती प्रसारित करतील.

२.३ सीमाशुल्क / सीमाशुल्क (निवारक) आणि सी जी टी एस क्षेत्राचे प्रधान डी जी, डी आर आय, प्रधान डी जी, डी जी जी एस टी आय, मुख्य आयुक्त अत्यंत संवेदनशील किंवा गंभीर अशी कोणतीही बाब अध्यक्ष, सी बी आय सी / सदस्य (सी एम), सी बी आय सी / आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) सी बी आय सी, यांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यास आणि त्याबाबतची एक प्रत आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) सी बी आय सी यांना अग्रेषित करण्यास जबाबदार असतील.

२.४ ज्याअर्थी, प्रशासकीय व्यवस्था केली जात आहे, तिचा ती डी आर आय, डी जी जी एस टी आय, सीमाशुल्क आणि सी जी एस टी क्षेत्रीय आस्थापनांसाठी वापर केला जातो. त्याअर्थी, आधीच असे स्पष्ट करण्यात येते की, संबंधित राज्यांमध्ये / संघ राज्यक्षेत्रांमध्ये प्रधान एडीजी / एडीजी, डी आर आय हे त्या त्या विशिष्ट राज्यातील सी बी आय सी च्या सर्व आस्थापनांचे म्हणजे डी जी जी एस टी आय, सीमा शुल्क, सीमा शुल्क (निवारक) आणि सी जी एस टी फॉर्मेशन आस्थापनांचे मार्गदर्शक असेल. हा अधिकारी त्यांच्या नियुक्त मध्यस्थ अधिकाऱ्यामार्फत, सदर अधिकारी खालील गोष्टींसाठी जबाबदार असेल.

एक. विहित अहवाल (आणि इतर अहवाल जसे की गंभीर / तीव्र स्वरूपाचा अहवाल) संकलित करणे आणि त्याची प्रत दैनिक तत्त्वावर ईसीआयला पाठविणे आणि त्याची एक प्रत आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) सी बी आय सी यांना ई मेल आय डी invecustoms@.gov.in यावर आणि आयुक्त (अन्वेषण)-जी एस टी), सी बी आय सी यांना ईमेल आय डी gstinvcbic@gov.in यावर दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजे पर्यंत पाठविणे; आणि ;

दोन. इतर अभिकरणांच्या जसे की, आयकर, इत्यादींच्या प्रयत्नांचे समन्वयन करणे.

२.५ प्रधान डी जी, डी आर आय आणि प्रधान डी जी, डी जी जी एस टी आय :–

एक. मुख्यालयात एक केंद्रीय नियंत्रण कक्ष आणि संबंधित प्रत्येक राज्य/ संघ राज्यक्षेत्रात एक नियंत्रण कक्ष स्थापन करील अशा नियंत्रण कक्षात आणि प्रत्येक राज्यात/ संघ राज्यक्षेत्रात एक मध्यस्थ अधिकारी पदनिर्देशित करील. नियंत्रण कक्ष आणि मध्यस्थ अधिकारी यांची राज्य निहाय माहिती, संपर्काच्या संपूर्ण तपशीलासह संबंधित सीमासुल्क, सीमासुल्क (निवारक) आणि सीजी एस टी क्षेत्राचे इतर व प्रधान मुख्य आयुक्त/ मुख्य आयुक्त यांना देईल. तसेच, डी आर आयचे प्रधान डीजी आणि डीजी जी एस टी आयचे प्रधान डीसी एकत्रीकृत तपशील/सूची थेट इतर अंमलबजावणी अभिकरणांना आणि ई सी आय ला पाठवतील आणि त्याची एकेक प्रत आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) सी बी आय सी आणि आयुक्त (अन्वेषण-जीएसटी) सी बी आय सी यांना अग्रेषित करतील, आणि ;

दोन. ज्यामुळे निवडणुका निष्फळ ठरू शकतील अशा अनुचित आणि अनधिकृत कृत्यांना प्रभावीपणे रोखण्यासाठी माहिती गोळा करण्याचे आणि गुप्तचर यंत्रणा विकसित करण्याचे निर्देश त्यांच्या गुप्तचर यंत्रणांना देतील.

२.६ त्याचप्रमाणे, संबंधित सीमाशुल्क, सीमाशुल्क (निवारक) आणि सी जी एस टी क्षेत्राचे प्रधान मुख्य आयुक्त/मुख्य आयुक्त :

एक. केंद्रीय नियंत्रण कक्षाची स्थापना करून तेथे मध्यस्थ अधिकारी पदनिर्देशित करतील. या मध्यस्थ अधिकाऱ्यांच्या नियंत्रण कक्षाच्या यादीचा तपशील, संपर्काच्या संपूर्ण तपशीलासह, भारत निवडणूक आयोग तसेच, प्रधान डी जी, डी आर आय/ डी जी जी एस टी आय, प्रधान डी जी, डी आर आय यांना देतील आणखी त्यांची एकेक प्रत आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) सी बी आय सी आणि आयुक्त ८अन्वेषण-जी एस टी) सी बी आय सी यांना देण्यात येईल.

दोन. बेकायदेशीर आणि निषिद्ध कारवायांना आळा घालण्यासाठी वाहनांची आवश्यकता भासेल तसतशी, रस्ते व मार्गस्थ तपासणी व गोदामे, इत्यादींची पडताळणी करण्यासाठी पुरेशा संख्येने भरारी पथके व स्थैतिक संनिरीक्षण पथके स्थापन करतील ;

तीन. मध्य, सिगारेटी, इत्यादींचे अनधिकृतपणे होणारे अपवाहन रोखण्यासठी, सीमाशुल्क व खारीमध्ये विशेष पहारे ठेवतील मालसाठ्याची पडताळणी करतील.

चार. संबंधित राज्ये/ संघ राज्यक्षेत्रामधील घोषित/ नोंदणीकृत आणि इतर वखारींची रुपरेषा तयार करतील आणि त्या ठिकाणी मतदानाची संबंधित अनुचित प्रकार घडू नये किंवा साहित्य ठेवले जावू नये याची खात्री करण्यासाठी त्यांच्यावर कडक नजर ठेवतील.

पाच. अशा कोणत्याही वस्तुंचा निवडणूक प्रचार प्रक्रियेशी किंवा निवडणुकीदरम्यान वापर केला जाण्याशी संबंध असल्याचे आढळल्यास अशा मालाची किंमत, प्रधान डी जी, डी आर आय/डी जी जी एस टी आय यांच्यासह जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवतील आणि त्याची एक प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांना अग्रेषित करतील.

२.७ राज्ये/संघ राज्यक्षेत्रांमधील केंद्रीय नियंत्रक कक्ष आणि संबंधित मध्यस्थ अधिकारी निर्भय आणि निःपक्ष निवडणूक प्रक्रियेवर परिणाम करणाऱ्या घटना आणि कार्ये यांची योग्य ती नोंद ठेवतील आणि त्वरित त्याची माहिती संबंधित राज्य/संघ राज्यक्षेत्रातील प्रधान एडीजी/ एडीजी, डी आर आय यांना देतील.

२.८ डी जी जी एस टी आय, सीमाशुल्क, सीमाशुल्क (निवारक) आणि सी जी एस टी आस्थापना यांच्या मध्यस्थ अधिकाऱ्यांनी राज्यातील इतर अभिकरणांच्या मध्यस्थ अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात राहणाऱ्या डी आर आयच्या मध्यस्थ अधिकाऱ्यारशी सतत संपर्कात रहावे. आणि त्यांच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या मतदानाशी संबंधित घडामोडींची माहिती ठेवतील. मध्यस्थ अधिकारी जेव्हा जेव्हा मागणी करण्यात येईल तेव्हा खर्च निरीक्षकांना भेटतील आणि त्यांना माहिती अवगत करतील.

२.९ निवडणुकांशी संबंधित गैरप्रकारांशी निगडित असतील अशा शोध आणि जप्ती यांना व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. अवैध चलन, दारू सोने, एफ आय सी एन, एन डी पी एस आणि इतर निषिद्ध वस्तू शोधून जप्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात यावा.

२.१० संबंधित सीमाशुल्क, सीमाशुल्क (निवारक) आणि सी जी एस टी क्षेत्र आणि डी जी जी एस टी आय क्षेत्रीय शाखा यांनी केलेल्या तपासण्या आणि साध्य केलेले निष्कर्ष, दैंनदिनरित्या त्यांच्या राज्यातील डी आर आय मुख्यालयांच्या मध्यस्थ अधिकाऱ्यांना जोडपत्र-अ म्हणून जोडलेल्या विहित नमुन्यात कळविणे आवश्यक आहे नंतर खंड २.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, संबंधित प्रधान एडीजी/ एडीजी, डी आर आय हा भारत निवडणूक आयोगाला राज्याचा एकत्रीकृत अहवाल सादर करील आणि त्याची एकेक प्रत सी बी आय सी चे आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) यांना ई मेल आयडी inv_customs@gov.in यावर आणि सी बी आय सी चे आयुक्त (अन्वेषण-जीएसटी) यांना ईमेल (आय डी) पत्ता gstinv-cbic@gov.in यावर सादर करतील.

**३.** विश्लेषिकी आणि जोखीम व्यवस्थापन महासंचालनालय (डीजी ए आर एम) वस्तुंचा (साड्या, सदरे, टोप्या, मुखवटे, उपरणी, गृहपयोगी वस्तु, स्वयंपाकघरातील वस्तु इत्यादी ज्या मतदान होत असलेल्या विधानसभा किंवा मतदार संघातील उमेदवाराशी किंवा राजकीय क्षाशी संबंधित असतील आणि उक्त राज्यांमध्ये मतांसाठी प्रलोभन म्हणून वापरल्या जावू शकतील त्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास करील. या अभ्यासात ह्या राज्यांमध्ये आणि त्याअंतर्गत झालेल्या अशा वाढीचे आणि अशा वस्तुंच्या वाहतुकीच्या पद्धतींचे आणि साठवणुकीच्या ठिकाणांचे विश्लेषण केले पाहिजे हे अहवाल क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्वरीत पुरविले जातील, ते जे अशा वस्तुंच्या हालचाली/ साठवणूक/ पुरवठ्यावर विशेष लक्ष ठेवतील.

**४.** बेहिशेबी रोकड तयार करण्यासाठी /व्यवहार करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्ञात संवेदनशील क्षेत्रांवर तसेच, गट/संघटना/ व्यक्तींचे सांख्यिकीय विश्लेषण केले जावे, तसेच आवश्यक असेल तेथे आयकर विभागाला त्याबाबतची माहिती देण्यात यावी.

**५.** प्रधान डी जी, डी जी जी एस टी आय आणि संबंधित सी जी एस टी क्षेत्राचे प्रधान मुख्य आयुक्त/ मुख्य आयुक्त पुढील बाबी करतील.

एक. मतदारांना प्रभावित करण्यासाठी उचित जी एस टी बीजकाशिवाय किंवा ई-वे देयकाशिवाय वरील वस्तुंची वाहतूक होणार नाही, याची खात्री करण्यासाठी निवडणुकीच्या काळात नाकानाक्यांवर जी एस टी पथकांद्वारे ई-वे देयकांची सखोल तपासणी करून मतदान होत असलेल्या विधानसभा किंवा मतदारसंघातील उमेदवार किंवा राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या साड्या, सदरे, टोप्या, मुखवटे. उपरणी, पक्षाचे झेंडे अशा वस्तुंच्या वाहतुकीवर लक्ष ठेवेतील. कोणत्याही संशयित ठिकाणी तपासणी करताना केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम, २०१७ च्या कलम ६७ अन्वये शोध/ तपासणीची योग्य ती कार्यपद्धती अनुसरली जावू शकेल.

दोन. उत्पादक, घाउक वितरक आणि किरकोळ विक्रेते यांच्याकडील साठा तपासणी सुनिश्चित करतील, जेणेकरून, निवडणुकीच्या प्रचारासाठी आणि मतदारांना वाटण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू शोध घेऊन निश्चित केल्या जातील.

(अ) विशेषतः शेजारच्या राज्यांतून धोतर, साड्या, टी-शर्टस्, छत्री, पगडी, आदी वस्तुंची अचानक वाढलेली वाहतूक ई-वे देयक पोर्टलद्वारे तपासता येऊ शकेल.

(ब) रोख व्यवहारांतर्गत कोणतीही बेहिशेबी वस्तू काढली जाणार नाही याची खात्री करण्यासाठी जीएसटी अधिकाऱ्यांकडून संभाव्य गोदाम आणि दुकानांच्या साठ्याची तपासणी केली जाऊ शकेल. कोणत्याही संशयीत ठिकाणी तपासणी करताना केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम ६७ अन्वये शोध/ तपासणीच्या योग्य कार्यपद्धतीचे यथायोग्य क्रियेचे पालन केले जावू शकेल.

तीन. उमेदवारांकडून आणि पक्षांकडून निवडणूक प्रक्रियेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या इंधनावर नियंत्रक ठेवतील.

(अ) प्रचारासाठी निवडणुकीच्या काळात वापरल्या जाणाऱ्या वाहनामध्ये इंधन भरणाऱ्या पेट्रोल पंपावरील इंधन विक्रीवर लक्ष ठेवणे : पेट्रोल/ डिझेल उत्पादन शुल्कपात्र वस्तू असल्याने ती बाब अप्रत्यक्ष कराखाली येते.

(ब) संभाव्य मतदानांना आकर्षित करण्यासाठी कुपन आधारित इंधनाचे वाटप : निवडणुकीच्या काळात मोफत पेट्रोल/ डिझेल/ किंवा रोख स्वरुपात वाटप करून मतदारांना आकर्षित करण्याचा हा संभाव्य स्त्रोत आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात इंधन पंप/इंधन भरण केंद्राचे यादृच्छिक लेखापरीक्ष् करता येईल. कोणत्याही संशयित ठिकाणांची तपासणी करताना, केंद्रीय वस्तु व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम ६७ अन्वये शोध/ तपासणी यथायोग्य कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

चार. परिच्छेद ५ (एक), ५ (दोन) आणि ५ (तीन) मध्ये नमूद केलेल्या अशा वस्तू प्रचार प्रकियेशी किंवा निवडणुकीदरम्यान वापरल्या जाण्याशी संबंधित असल्याचे अशा वस्तुंची किंमत त्यांच्या पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह प्रधान/डीजी, डी आर आय/ डी जी जी एस टी आय यांना कळविण्यात यावी तसेच एक प्रत भारत निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांना अग्रेषित करण्यात यावी.

पाच. उमेदवार व पक्षांनी निवडणूक प्रक्रियेदरम्यान जेवण हॉटेल, मोजवान्या, तंबूगृह, आदींवर केलेल्या खर्चाची लेखापरीक्षा/ हिशेब.

(अ) निवडणूक क्षेत्रातील उपहारगृहे/भोजनालये, मंगल कार्यालये, संमेल्लन सभागृह/ शेतघर (फार्महाऊस)/ उद्यान, शामियाना, तंबुगृह, खुर्ची व टेबल पुरवठाघर कत्तलखाना / मटण गृहे यांची जी एस टी पथकांमार्फत व्यापक तपासणी करणे. कोणत्याही संशयित ठिकाणांची तपासणी करताना केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम ६७ अन्वये शोध/ तपासणीची योग्य कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

(ब) ज्या ठिकाणी घेतलेल्या **सेवा** ह्या, प्रचार प्रक्रियेशी किंवा निवडणुकीच्या काळात वापरल्याजाण्याशी संबंधित असल्याच्या आढळून येतील, अशा **वस्तुंची** किंमत आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविण्यात यावी, तसेच त्याची एकेकप्रत निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांनाही कळवण्यात यावी.

**६.** निवडणुकीच्या काळात गैरप्रकारांसाठी वापरले जाणारे संभाव्य परकीय चलन/ सोने/ अंमली पदार्थ, आदींचा ओघ रोखण्यासाठी डी आर आयने आंतरराष्ट्रीय सीमा/विमानतळे आणि माहिती गोळा करणारी यंत्रणा यांच्या चौकशीत वाढ केली पाहिजे.

**७.** संबंधित राज्यातील सीमाशुल्क विमानतळांचे प्रभारी प्रधान आयुक्त/ सीमाशुल्क आयुक्त, **जोडपत्र-ब** मध्ये दिलेल्या नमुन्यात परकीय चलनाच्या घोषणेबाबतचा दैनंदिन अहवाल डी आर आयच्या मध्यस्थ अधिकाऱ्याला सादर करतील. हा अहवाल सीमाशुल्क विमानतळाचे प्रभारी इतर सर्व प्रधान आयुक्त/सीमाशुल्क आयुक्त हे संबंधित राज्यातील डी आर आयच्या समन्वय अधिकाऱ्याला देतील. परंतु ती बाब ज्यांचे राहण्याचे ठिकाण निवडणूक हा असलेल्या राज्यांमध्ये केवळ अशा प्रवाशां पुरती मर्यादित बाबतीत असेल.

**८.** आणखी तसेच, संबंधित सर्व अधिकारी/ कर्मचारी कोणत्याही गैरप्रकाराला आणि उपद्रवाला तत्परतेने आळा घालतील, अशी अपेक्षा आहे. वर नमूद केलेल्या उपाययोजनांचे न चुकता काटेकोरपणे पालन केले पाहिजे. कोणत्याही गैरवापराला प्रभाविपणे आणि उपद्रवाला तत्परतेने आळा घालण्यासाठी देखरेख अधिक कडक करण्याच्या सूचना, आयुक्त (अन्वेषण-सीमाशुल्क) सी बी आयसी आणि आयुक्त (अन्वेषण-जी एस टी) यांना त्वरित कळविण्यात याव्यात आणि तयारी आणि जप्तीसंदर्भात केलेली कारवाई कृपया त्याच दिवशी कळविण्यात यावी.

**९.** हिंदी आवृत्ती येणार आहे.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे

**(सुरज कुमार गुप्ता),**
अपर आयुक्त (अन्वेषण- सीमाशुल्क),
सी बी आय सी,
नवी दिल्ली.

प्रत रवाना :

एक. - प्रधान सचिव, भारत निवडणूक आयोग,

दोन. - आयुक्त - सीमाशुल्क कार्यशाखा,

तीन. - आयुक्त - जी एस टी कार्यशाखा,

चार. - आयुक्त - (अन्वेषण-जी एस टी)

पाच. - निवडणूक विषयक विभागीय अधिकाऱ्याच्या अंतर्गत आणण्याची विनंतीसह वेबमास्टर यांच्याकडे.

**जोडपत्र – अ**

## जप्तीचा तपशील

| अनु. क्रमांक | राज्य व जिल्हयाचे नाव | मतदार संघ | जप्तीचा दिनांक व कालावधी | जप्त केलेली रक्कम (लाखांत) | जप्ती (जसे मादक द्रव्य, अमली पदार्थ, सोने किंवा इतर मूल्यवान धातू, अवैध दारू/ एफ आयसी एनआणि भेटवस्तुंसह इतर किरकोळ वस्तू | | मतदारांना आकर्षित करण्यासाठी ठेवलेला बेहिशेबी साठा/ वस्तुंचा साठा | | वस्तुंचा कोणत्याही राजकीय पक्षाशी किंवा उमेदवाराशी (पक्षाचे नाव) संबंध आला किंवा कसे) आणि पक्षाची संलग्नता | जप्त केलेला वस्तुंसंदर्भात आतापर्यंत केलेली कारवाई (थोडक्यात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वस्तू आणि प्रमाण | मूल्य (लाखांत) | वस्तू आणि प्रमाण | मूल्य (लाखांत) | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

**जोडपत्र – ब**

## चलन घोषणा तपशील

| अनुक्रमांक | प्रवाशाचे नाव | पारपत्र (पासपोर्ट) | राष्ट्रीयत्व | परदेशी चलनाचे मूल्य | मुक्कामाचे/ भेट देण्याचे संभाव्य ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**जी - ११**

**एम -११०४५/७/२०२३- वितरण-पी एस.जी**

**भारत सरकार**

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय

शास्त्री भवन, नवी दिल्ली
दिनांक २ ऑगस्ट, २०२३

प्रति,

अध्यक्ष आणि सी एम डी,
आय ओ सी एल, बी पी सी एल, एच पी सी एल,
एम आर पी एल, एन आर एल, आर बी एम एल,
एन इ एल, शेल आणि आर एस आय एल.

**विषय.**—निवडणुकीच्या काळात किरकोळ विक्री केंद्रांवर इंधन खरेदीसाठी होणाऱ्या कुपन विक्रीच्या गैरवापराला आळा घालणेबाबत.

महोदय,

वर नमूद केलेल्या विषयाकडे आपले लक्ष वेधण्याचा आणि आपणास असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, लवकरच छत्तीसगड मध्य प्रदेश, मिझोरम, राजस्थान या राज्यांच्या विधानसभांच्या सावर्त्रिक निवडणुका घेण्यात येणार असल्याची आणि पुढील वर्षी २०२४ मध्ये लोकसभा आणि आणखी काही राज्यांच्या/ संघ राज्यक्षेत्रांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका येऊ घातल्या असल्याची सूचना देणारे भारत निवडणूक आयोगाकडील दिनांक १८ जुलै २०२३ रोजीचे एक पत्र मंत्रालयाला प्राप्त झाले आहे.

२. निवडणूक आयोगाने आपल्या आधीच्या दिनांक २३ मार्च २०२३ रोजीच्या पत्रात असे नमूद केले होते की, खाली वर्णन केलेल्या धन शक्तीच्या दुरुपयोगावर आणि बेसुमार निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आयोगाने एक यंत्रणा प्रस्थापित केली आहे आणखी तसेच, निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत राजकीय पक्षांनी किंवा उमेदवारांनी किंवा इतर व्यक्तींनी खर्चाची नोंद ठेवण्यापासून सुटका करून घेण्यासाठी लेखा पुस्तकांच्या माध्यमातून कोणताही हिशेब न ठेवता, इंधन आणि इतर पेट्रोलियम पदार्थ, इत्यादी खरेदी करण्यासाठी त्याच्याकडून केल्या गेलेल्या मागील कूपन विक्रिचाही आयोगाने त्यात उल्लेख केला होता. ही बाब, लाचलुचपत सदरात जमा होते आणि लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ ख अन्वये शिक्षापात्र अपराध ठरतो. या बेकायदेशीर कृत्यांमुळे निवडणुकीच्या काळात समान संधी मिळत नाही.

३. म्हणून, निवडणूक होत असलेल्या राज्यामंध्ये /संघ राज्य क्षेत्रांमध्ये आणि त्यांच्या शेजारच्या राज्यांमध्ये/संघ राज्यक्षेत्रांमध्ये इंधन विकत घेण्याच्या अशा कुपन विक्रीस प्रतिबंध व आळा घालण्यासाठी योग्य त्या सर्व उपायोजना करण्याबाबत तेल पणन कंपन्यांना ( ओ एम सी एस ) सूचित केले आहे, जेणे करून, निवडणूक प्रक्रिया विफल ठरणार नाही.

या मंत्रालयाला तेल पणन कंपन्यांकडून करण्यात आलेल्या कार्यवाही/ उपाययोजनांबाबतही अवगत करण्यात यावे.

आपला,

**(ए. के. सिन्हा),**
अवर सचिव,
भारत सरकार,
दूरध्वनी क्रमांक २३०७०३२९.

**जोडपत्र - जी १२**

**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

दिनांक ३ ऑगस्ट, २०२३

क्रमांक ७६/एसओपी/इएससी-इएसपी/ इसीआय/एसीआय/इपीएस/२०२३.

प्रति,

मुख्य निवडणूक अधिकारी,

सर्व राज्य/ संघ राज्यक्षेत्र.

**विषय.–** खर्च संवेदनशील मतदारसंघ (इ एस सी) आणि खर्च संवेदनशील लोकवस्त्या निश्चित करण्याच्या प्रमाणित कार्यपद्धतीबाबत (एस ओ पी).

महोदया/महोदय,

मला यासोबत, खर्च संवेदनशील मतदारसंघ (इ एस सी) आणि खर्च संवेदनशील लोकवस्त्या (इ एस पी) निश्चित करण्याची प्रमाणित (एसओपी)कार्यपद्धती अग्रेषित करण्याचा आदेश असून ती आवश्यक अनुपालनार्थ सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, ही विनंती.

आपला,

स्वाक्षरी,

**(अनुप कुमार खाकलारी),**

अवर सचिव.

**खर्च संवेदनशील मतदारसंघ (इएससी) आणि खर्च संवेदनशील लोकवस्त्या (इएसपी) निश्चित करण्याची प्रमाणित कार्यपद्धती.**

१. राज्याच्या/संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने, खर्च तपासणी प्रक्रियेत सहभागी असलेले जिल्हा निवडणूक अधिकारी, राज्य पोलीस विभाग आणि अंमलबजावणी अभिकरणे यांच्याशी चर्चा करून, अत्यंत खर्चप्रवण व भ्रष्टप्रथाप्रवण असलेल्या एखाद्या मतदारसंघाला, पूर्वतिहास, मतदारसंघाची रचना आणि मागील घडामोडी यांच्या आधारे, खर्च संवेदनशील मतदारसंघ (इएससी) म्हणून निश्चित करणे आवश्यक आहे.

२. राज्याचा संघ राज्यक्षेत्राचा मुख्य निवडणूक अधिकारी, राज्य/संघ राज्यक्षेत्र विधानसभेची आणि/ किंवा लोकसभेची मुदत संपण्यापूर्वी, किमान ६ महिने अगोदर विविध अंमलबजावणी अभिकरणांच्या राज्यस्तरीय मध्यस्थ अधिकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करील. जेणेकरून त्यात पुढील दोन मुख्य कारणांच्या आधारे संवेदनशीलता निश्चित केली जाईल,—

(अ) रोख रक्कम, दारू, अंमली पदार्थ, मौल्यवान वस्तू आणि भेटवस्तू.

(ब) क्षेत्रनिहाय संवेदनशीलता (जिल्हानिहाय, जिल्हा गटनिहाय, विधानसभा मतदारसंघनिहाय)

३. खाली दिलेल्या तपासणीसूचीत निर्देशक अनुभवाधिष्ठित मापदंड अंतर्भूत आहेत (हे अनुभवाधिष्ठित मापदंड यापूर्वी राज्य/ संघराज्यक्षेत्रात निवडणुका झालेल्या निवडणुकांच्या अनुभवांवरून, तसेच तांत्रिक तज्ज्ञ आणि गट चारचे सीइओ यांच्याकडील माहितीवरून पुनर्निर्धारित करण्यात आले आहेत) ही सूची केवळ निदर्शक असून त्यासोबत मुद्दा-१ मध्ये नमूद केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाच्या समन्वय अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून सीइओ कार्यालयाने निश्चित केलेली इतर विशिष्ट खर्चविषयक संवेदनशीलता विविध अंमलबजावणी अभिकरणांच्या राज्यस्तरीय संवेदनशील मतदारसंघ निश्चित करणाऱ्या मापदंडाची सूची खाली दिली आहे :—

एक. गेल्या दोन विधानसभा/लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, दारू, अंमली पदार्थ/ मांदक द्रव्य, मौल्यवान धातू/ दागिने, भेट वस्तू इत्यादी जप्त केली जाणे.

दोन. निवडणूक घोषित झाल्याच्या लगतपूर्वीच्या सहा महिन्यांत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, दारू, अंमली पदार्थ/ मादक द्रव्य, मौल्यवान वस्तू जप्त केली जाणे.

तीन. जो मतदारसंघ राज्य सीमेलगत आहे आणि त्याच्या शेजारच्या राज्यलगत/संघराज्यक्षेत्रालगत आणि/ किंवा देशालगत आंतरराष्ट्रीय सीमा लागून आहे. अशा मतदारसंघाची मागील निवडणुकांमधील जप्तीच्या किंवा इतर घटनांच्या पार्श्वभूमीच्या आधारे, खर्च संवेदनशील / मतदारसंघ म्हणून निश्चिती करणे.

चार. मतदारसंघात खर्च संवेदनशील लोकवस्त्यांची लक्षणीय संख्या असणे ;

पाच. खर्च संवेदनशील मतदारसंघाच्या निश्चितीसाठी भारती रिझर्व्ह बँकेकडून निवडणूक घोषित होण्यापूर्वीच्या सहा महिन्यांत चलनाच्या मागणीत २० टक्के किंवा त्याहून अधिक वाढ दर्शविणाऱ्या कोषागारांविषयीची माहिती घेणे.

सहा. मतदानाच्या संभाव्य तारखेपूर्वीच्या ६ महिन्यांत काही खात्यांद्वारे अनेक खात्यांमध्ये बहुतकरून काही ठराविक वर्गांकडून असामान्यपणे मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन / डीजिटल व्यवहार झाल्याचे बँकांना दिसून येणे.

४. अंमलबजावणी अभिकरणांच्या राज्य मध्यस्थ अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून सीइओ कार्यालयाद्वारे व्यापक संवेदनशीलता संकलित केल्यानंतर, जिल्हानिहाय निष्कर्ष, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला कळविण्यात येतील, जो अंमलबजावणी अभिकरणांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली एक जिल्हा गुप्तचर समिती स्थापन करून चर्चा करील आणि पुढील माहिती घेतील. काही केंद्रीय अभिकरणांच्या बाबतीत जिथे राज्यात संख्या फारच कमी आहे, जिल्हा गुप्तचर समिती संबंधित अंमलबजावणी अभिकरणाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या जागी प्रत्यक्ष राज्यस्तरीय समन्वय अधिकाऱ्याकडून माहिती मागवू शकते.

५. वर नमूद केलेली जिल्हा गुप्तचर समिती आपली माहिती सीइओ कार्यालयाला विहित मुदतीत म्हणजेच (संबंधित मागील निवडणुकांचा निवडणूक महिना वजा ५ महिने) परत देईल. सीइओ कार्यालय निरीक्षणे आणि टिपण्यांसह तपशीलवार याद्या संकलित करील आणि संबंधित मागील निवडणुकीच्या मतदानाच्या महिना वजा ४ महिने (निवडणूक महिना वजा ४ महिने) अशी कालमर्यादित आयेगाला देईल. ही यादी गोपनीय म्हणून चिन्हांकित केली जाईल आणि त्यामध्ये खर्च संवेदनशील मतदारसंघ.

विधानसभा मतदारसंघनिहाय तपशील, तसेच संवेदनशीलता आणि तयारीचे स्वरूप (काय करावे ?) आणि आव्हानांवर मात करण्याची रणनीती (कसे करावे?) यांबाबतचा तपशील समाविष्ट असेल.

६. त्या कालमर्यादेचे पालन करणे महत्त्वाचे आहे, कारण राज्य/ संघ राज्यक्षेत्राच्या/ विधानसभेची /किंवा लोकसभेची मुदत संपण्याचा महिन्यापासून चार महिने अगोदर सीइओकडून प्राप्त झालेली यादी आणि निरीक्षणे, गुणवत्ता संनियंत्रणाकरिता पुरेशी व्यवस्था करण्यासाठी विचारात घेणे आवश्यक आहे.

७. खर्च संवेदनशील मतदारसंघा (इ एस सी) साठी दोन सहायक खर्च निरीक्षक यांसह, आवश्यकता भासेल इतकी भरारी पथके, स्थौतिक संनिरीक्षण पथके, व्हिडिओ संनिरीक्षण पथके असतील. ती उर्वरित मतदारसंघामध्ये तैनात असतील.

८. खर्च संवेदनशील मतदारसंघाची यादी खालीलप्रमाणे विहित नमुन्यात सादर करावयाची आहे :

**अनुभवाधिष्ठित**

| अनुक्रमांक | खर्च संवेदनशील मतदारसंघाचे नाव | जिल्ह्याचे नाव | प्रमाण अनुभवाधिष्ठित निकषांनुसार खर्च संवेदनशील मतदारसंघ | अभिकरणाने/ अभिकरणांनी नमूद केलेले निकष | खर्च संवेदनशील मतदारसंघाच्या संवेदनशीलतेच्या स्वरूपावरुन तपशीलवार नोंद |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**खर्च संवेदनशील लोकवस्त्या (इ एस पी) निश्चित करण्यासाठीची प्रमाणित कार्यपद्धती (इएसपी) :**

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (डीइओ), पोलीस अधीक्षक (एस पी) हे, मतदारसंघात नियुक्त केलेल्या खर्च निरीक्षकाची (ई ओ) विचारविनिमय करून, त्या खर्च निरीक्षकाच्या पहिल्या भेटीदरम्यान त्या मतदारसंघातील खर्च संवेदनशील लोकवस्त्या (इ एस पी) निश्चित करतील.

२. खालील वैशिष्ट्ये असलेल्या लोकवस्त्यांची खर्च संवेदनशील लोकवस्त्या म्हणून निश्चिती करता येईल :–

(एक) खर्च संवेदनशील लोकवस्त्यांची निश्चिती करण्यासाठी जिल्हा गुप्तचर समितीकडील माहितीचा विचार करावा.

(दोन) मागील निवडणुकीत रोख रक्कम, दाJT, भेटवस्तू, आदीं वाटप केल्याच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी असलेल्या/ घटना घडलेल्या लोकवस्त्या.

३. खर्च संवेदनशील मतदारसंघाच्या (इएससी) चिन्हांकन यादीमध्ये नमूद केलेले इतर प्रमाणसिद्ध निकषसुद्धा विचारात घेण्यात यावेत.

४. खर्च संवेदनशील लोकवस्त्यांवर, विशेषतः मतदानाच्या शेवटच्या तीन दिवसात भरारी पथके (एफएस) आणि स्थौतिक संनिरीक्षण पथके (एसएसटी) याद्वारे २४ तास नजर ठेवण्यात येईल. या कालावधीत स्थौतिक संनिरीक्षण पथकामध्ये इतरांबरोबर केंद्रीय निमलष्करी दलांचा सहभाग असेल.

# एच

# निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी, उमेदवार आणि राजकीय पक्ष यांच्यासाठी तपासणी सूची.

# निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासाठी पडताळणी सूची

(ही तपासणी सूची परिपूर्ण नाही, कोणतीही शंका असल्यास कृपया अनुदेशांचा सविस्तर संदर्भ पहा.)

**अ. निवडणूक कार्यक्रमांची घोषणा होण्यापूर्वी :—**

१. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यांच्या कलम ८क आणि ११क (भ्रष्ट पद्धतीसाठी) व १०क (निवडणूक खर्चाचा लेखा विहित वेळेत आणि योग्य पद्धतीने सादर करण्यात कसूर केल्यामुळे) अन्वये ज्यांना अपात्र म्हणून ठरविले आहे, अशा सर्व अपात्र उमेदवारांची अद्ययावत यादी तुमच्याकडे असावी, ही यादी आयोगाच्या *www.eci.gov.in* या संकेतस्थळावर देखील पाहता येईल.

२. जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे खालील नमुन्यातील बाबी तयार असल्याची खात्री करून घेणे :—

(एक) उमेदवारांची निवडणूक खर्च नोंदवही (येथोचित अनुक्रमांकानुसार) ज्यात बँक नोंदवही, रोख नोंदवही, दैनंदिन खाते नोंदवही, अनुसूची १ ते ११ सह असणारे संक्षिप्त विवरणपत्र (भाग १ ते भाग ४), शपथपत्र आणि पोच पावतीचा नमुना, याचा समावेश असेल.

(दोन) अभिरुप निरीक्षण नोंदवही (शॅडो ऑब्झर्व्हेशन रजिस्टर).

(तीन) व्हिडीओ क्यू शीट.

(चार) भरारी पथक/स्थैतिक संनियंत्रण पथक यांनी माहिती कळविण्याचे नमुने.

(पाच) निवडणूक खर्च मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुदेशांचा स्थानिक भाषेतील सारसंग्रह.

(सहा) गुन्हेगारी प्रकरणे, मत्ता आणि दायित्वे यांच्याशी संबधित नमुना २६.

३. मतदारसंघातील विकासाचा स्तर, साक्षरता व मागील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या तक्रारी आणि आयोगाकडे दिलेला अहवाल, यांच्या आधारे खर्च संवेदनशील लोकवस्त्या निश्चित करणे.

४. खर्च संनिरीक्षण पथकासाठी जिल्ह्याच्या राज्य पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मुख्य प्रशिक्षक निश्चित करणे.

५. मागील निवडणुकीतील, जेथे प्रकरणाचा प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल झाला आहे अशा सर्व प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि त्यांना तर्कसंगत निष्कर्षाप्रत नेणे.

६. भरारी पथक/स्थैतिक संनिरीक्षण पथक यांच्याकरिता कार्यकारी दंडाधिकारी म्हणून अधिसूचित करण्यासाठी अधिकारी निश्चित करणे.

७. खर्च संनियंत्रण पथकामध्ये तैनात करावयाच्या सर्व मनुष्यबळाच्या प्रशिक्षणाकरिता क्रमाचे २/३ टप्प्यांमध्ये योजना तयार करणे.

८. सर्व पथके आणि त्यांच्या सामानासाठी वाहनांची व्यवस्था करणे.

९. बीएजीएस बरोबर सुसंवाद साधणे, बॅगज् आणि त्यांना नैतिक मतदान मोहिमेत त्यांच्या भूमिकेबाबत जाणीव करून देणे आणि निवडणूक काळात गैरव्यवहाराबाबतची माहिती पुरविणे.

**ब. निवडणूक कार्यक्रमाची घोषणा झाल्यानंतर :—**

१०. निवडणुकीची तारीख घोषित झाल्यानंतर, भरारीपथक (एफएस), व्हिडिओ संनिरीक्षण पथक (व्हीएसटी), व्हिडिओ पाहणारा चमू (व्हीव्हीटी), माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) व लेखांकन चमू कार्यरत आहेत याची सुनिश्चिती करून घेणे.

११. भरारी पथक (एफएस)/स्थैतिक संनिरीक्षण पथक(एसएसटी) यांच्या सर्व वाहनांवर जीपीआरएस यंत्रणा बसविण्यात आली आहे व भरारी पथक तक्रार मिळाल्यापासून अर्धा तासाच्या आत आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाची प्रकरणे आणि खर्च संबंधित प्रकरणे दोन्हींवर काम करीत आहे, यांची सुनिश्चिती करणे.

१२. निवडणुकीची घोषणा झाल्याच्या दिनांकापासून ते निवडणूक पूर्ण होईपर्यंत राजकीय पक्षांनी केलेल्या खर्चावर निरीक्षण करणे आणि निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर मुख्य निवडणूक अधिकारी यांना पक्षनिहाय माहिती कळविणे.

१३. भरारी पथक, स्थैतिक चौकशी / तपासणी पथक किंवा निवडणूक अधिकारी यांनी तपासणी केलेल्या समुचित प्रकरणांत प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करणे.

**क. निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्यानंतर :—**

१४. निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्याच्या तारखेपासून स्थैतिक संनिरीक्षण पथक (एसएसटी) कार्यरत झाल्याची खात्री करणे.

१५. निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकारी आणि भारतीय निवडणूक आयोग यांच्याद्वारे स्टार प्रचाराकांची यादी मिळालेली आहे याची नोंद घेणे.

१६. उमेदवारांनी सादर केलेली मत्ता व दायित्वांची शपथपत्रे स्कॅन करणे आणि ती मिळाल्यापासून २४ तासांच्या आत, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर अपलोड करणे.

१७. चिन्हांचे वाटप झाल्यानंतर, खर्च संनियंत्रण प्रक्रिया, निवडणूक खर्चाशी संबंधित विधिविषयक तरतुदी आणि या तरतुदींचे अनुपालन न केल्यास होणारे परिणाम स्पष्ट करून सांगण्यासाठी सर्व उमेदवार किंवा प्रतिनिधी यांची तात्काळ बैठक घेणे.

१८. विहित नमुन्यातील खर्च नोंदवही उमेदवाराला सुपुर्द करावयास तयार आहे.

१९. प्रचार मोहिमेच्या काळात खर्च निरीक्षकांकडून लेखांची तपासणी करण्यासाठी तारखा अधिसूचित करणे आणि खर्च निरीक्षकांनी निर्देशित केलेल्या कसूरदार उमेदवारास नोटीसा बजावणे.

२०. तक्रार संनियंत्रण पद्धतीचे पर्यवेक्षण करणे आणि प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारींवर ती मिळाल्यापासून २४ तासांच्या आत कार्यवाही होत आहे याची खात्री करणे.

२१. सर्व आवश्यक कागदपत्रे त्यांच्या संकेतस्थळावर टाकल्याची खात्री करणे आणि त्याच्या प्रती, जर कोणी विनंती केल्यास विहित फी प्रदान केल्यावर जनतेच्या सदस्यास, तात्काळ देणे.

२२. भरारी पथक (एफएस)/ स्थैतिक संनिरीक्षण पथक (एसएसटी) यांनी जप्ती टाकल्यानंतर, योग्य त्या प्रकरणांत तात्काळ प्रथम माहिती अहवाल, दाखल केली असल्याची खात्री करणे.

२३. खर्च निरीक्षक/सहायक खर्च निरीक्षक यांच्याशी संवाद साधणे आणि सर्व पथके योग्य पद्धतीने काम करीत असल्याची खात्री करणे.

२४. निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उमेदवाराबाबत कोणताही दोष दाखवून दिल्यावर उमेदवारास नोटीस पाठवणे आणि त्यास उमेदवार/प्रतिनिधी यांच्याकडून उत्तर प्राप्त करणे.

२५. उमेदवाराने, केलेल्या निवडणूक खर्चासंबंधी माहिती दाबून ठेवली/वगळली असल्याची माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून २४ तासांच्या आत किंवा उमेदवाराने प्रचार मोहिमेत खर्च केलेल्या त्याच्या खर्चांची लेखे अनुसूचित दिनांकास तपासणीसाठी सादर न केल्यास किंवा उमेदवाराने निवडणूक मोहिमेतील केलेला खर्च योग्यरीत्या न दाखवल्यास, उमेदवाराला नोटीस पाठवणे.

२६. उमेदवारास पाठविलेल्या नोटीशीला उमेदवाराने ४८ तासांच्या आत उत्तर दिल्याची खात्री करून घेणे.

## जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासाठी तपासणी सूची

[ही तपासणी सूची परिपूर्ण नाही. कोणतीही शंका असल्यास,कृपया अनुदेशांचा सविस्तर संदर्भ पहा.]

### अ. निवडणूक घोषित होण्यापूर्वी :

१. आयकर विभाग, सीमाशुल्क विभाग आणि केंद्रीय उत्पादन शुल्क किंवा केंद्र सरकारचे इतर लेखा विभाग किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रम (पीएसयू) किंवा राज्य वित्तीय सेवा यांमधून सहायक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यासाठी अधिकारी निश्चित करणे.

२. भरारीपथक प्रत्येक मतदारसंघानुसार ३ किंवा त्यापेक्षा अधिक स्थैतिक संनिरीक्षण पथक(प्रत्येक मतदारसंघानुसार ३ किंवा त्यापेक्षा अधिक) आणि व्हिडिओ संनिरीक्षण पथक (प्रत्येक मतदारसंघानुसार एक किंवा त्यापेक्षा अधिक) यासाठी मनुष्यबळ निश्चित करणे.

३. व्हिडिओ संनिरीक्षण पथक, भरारी पथक आणि स्थैतिक संनिरीक्षण पथक यांच्या आवश्यकतेनुसार व्हिडिओ कॅमेरे, वेब कॅम्स, जीपीआरएस यंत्रणा इत्यादी सुसज्ज ठेवणे.

४. माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) साठी टीव्ही/संगणक यांची टी.व्ही. कनेक्शनसह व्यवस्था करणे.

५. भारतीय निवडणूक आयोगाने विकासाचा स्तर, साक्षरता, विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान मिळालेल्या व भारतीय निवडणूक आयोगाला पाठविलेल्या तक्रारी, यांवर आधारित खर्च संवेदनशील लोकवस्त्या (इएसपी) व खर्च संवेदनशील मतदारसंघ निश्चित करणे.

६. खर्चाचे संनियंत्रण करण्यासाठी आणि भारतीय निवडणूक आयोगाला माहिती देण्याकरिता समन्वय अधिकारी म्हणून एडीएम दर्जाचा वरिष्ठ अधिकारी निश्चित करणे - तो, सर्व खर्च संनियंत्रण कर्मचाऱ्यांसाठी प्रमुख प्रशिक्षक असेल.

७. खर्च संनियंत्रक कार्यक्रमासाठी जिल्ह्याचे राज्य पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे समन्वय अधिकारी निश्चित करणे. ते प्रमुख प्रशिक्षक असतील.

८. मागील निवडणुकीत जेथे प्रथम माहिती अहवाल दाखल केला होता अशा सर्व प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि त्यावर तर्कसंगत निष्कर्ष काढणे.

९. भरारी पथक /स्थिर संनिरीक्षण चमू यासाठी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून असतील असे अधिकारी निश्चित करणे.

१०. खर्च संनियत्रण पथकात तैनात करावयाच्या सर्व मनुष्यबळासाठी २/३ टप्प्यात प्रशिक्षण कार्यक्रमाची योजना तयार करणे.

११. प्रसार माध्यम आणि जिल्ह्यातील राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांकरिता निवडणूक खर्च सनियंत्रणाबाबतच्या विशेष करून, प्रचारयात्रांची आवश्यकता दर अधिसूचना रोख व्यवहारातील निर्बंध आणि निवडणूक काळातील पक्षांची व प्रसार माध्यमांची भूमिका याबाबतच्या कार्यशाळेची तयारी करणे.

१२. खालील गोष्टींची छपाई करून घेणे :—

(एक) बॅक नोंदवही, रोख नोंदवही, दैनंदिन लेखा नोंदवही, अनुसूची १ ते ११ सह असणारे संक्षिप्त विवरणपत्रे (भाग एक व भाग चार), शपथपत्र व पोचपावती यांचा नमुना यांचा समावेश असणारी उमेदवारांच्या खर्चाची नोंदवही (यथोचित अनुक्रमांकासह).

(दोन) अभिरूप निरीक्षण (शॅडो) नोंदवही.

(तीन) व्हिडिओ संनिरीक्षण पथकासाठी व्हिडिओ क्यू शीट्स.

(चार) भरारीपथकांनी स्थिर/ स्थैतिक संनिरीक्षण पथकांनी माहिती देण्यासाठीचे नमुने.

(पाच) निवडणूक खर्च मार्गदर्शक तत्त्वाचे हिंदी/स्थानिक भाषेतील अनुदेश सारसंग्रह.

(सहा) गुन्हेगारी प्रकरणे आणि मत्ता व दायित्त्वे, यांच्याशी संबंधित नमुना २६.

(सात) निवडणूक निकाल घोषित झाल्यापासून ७५ दिवसांच्या आत सादर करावयाचे राजकीय पक्षांचे खर्चाचे सुधारित विवरणपत्र.

१३. बुथ स्तरावरील मतदान जागरूकता गट (बॅग्स) निश्चित करणे आणि त्यांच्या सहाय्याने, जिल्हा स्तरावर नैतिक मतदान मोहिम, प्रतिज्ञापत्रे आणि तक्रारकेंद्रांवर गैरव्यवहारांची छायाचित्रे, ऑडीओ, व्हिडीओ अपलोड करण्यासाठीची तक्रार, सॉफ्टवेअरची त्यांना माहिती करून देण्यासाठी एक जनजागृतीचा कार्यक्रम करणे.

१४. सर्व नागरिकांच्या संस्था/अशासकीय संघटना, शिक्षक, माध्यम प्रतिनिधी आणि नैतिक मतदान मोहिमेत सहभागी असणारे बौद्धिक विचारवंत यांच्या बैठकी आयोजित करणे व नैतिक मतदान मोहिमेतील त्यांची भूमिकेबद्दल माहिती करून देणे आणि लाच देण्याविरुद्धच्या कायदेविषयक तरतुदीची जाणीव करून देऊन, जनजागृती निर्माण करणे.

१५. नैतिक मतदानाबाबतचे जाहिरात साहित्य, दृकश्राव्य, चित्रकृती, घोषणा इत्यादी तयार करणे.

१६. निवडणुकीत लाच देण्याविरुद्ध आणि नैतिक मतदानासाठी शाळा आणि महाविद्यालयामध्ये वादविवाद, घोषणा, नारा, कार्टून इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे.

१७. मोठ्या प्रमाणावर नैतिक मतदान होण्यासाठी स्वाक्षरी मोहिम आणि प्रतिज्ञापत्रे किंवा नैतिक मतदानासाठीचे परिपत्रके वितरीत झाली असल्याची खात्री करून घेणे.

१८. उमेदवारांच्या (मागील विधानसभा निवडणुकीशी संबंधित) निवडणूक खर्चाच्या लेख्याशी संबंधित सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली असल्याची खात्री करून घेणे.

**ब. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर :—**

१९. बँकेबरोबर बैठक आयोजित करणे म्हणजे,

(एक) उमेदवाराने बँक खाते उघडण्यासाठी सुविधा पुरविणे व चेक बूक देणे

(दोन) १० लाख रुपयांवरील संशयास्पद व्यवहारांची माहिती अहवाल पाठविणे.

(तीन) वित्त मंत्रालयाच्या दिनांक २० फेब्रुवारी २०१३ **(जोडपत्र जी-२)** नुसार एटीएम व्हॅन बाबतच्या प्रक्रिया अनुसरण्यासाठी बैठकीचे आयोजन करणे.

२०. जिल्ह्यांमध्ये हेलिकॉप्टर उतरविण्याबाबतची परवानगी आणि सामानाची तपासणी याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे.

२१. निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर निवडणूक प्रचार मोहिमेतील निवडणूक खर्चाच्या वेगवेगळ्या बाबींच्या दरांच्या अधिसूचनेसाठी आणि त्याच्या सहीने, दरांवर मतैक्य घेण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय पक्षांबरोबर एक बैठक आयोजित करणे.

२२. निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून जिल्हास्तरीय तक्रार संनियंत्रण केंद्र, माध्यम प्रमाणे व संनियंत्रण समिती, चित्रिकरण सर्वेक्षण पथक, भरारीपथक व्हीव्हीटी आणि लेखांकन चमू यांचे कार्यान्वयन सुरू करणे. स्थैनिक संनियंत्रण चमू अधिसूचना जारी झाल्यानंतर काम सुरू करेल.

२३ विधानसभा निवडणूक झाल्यानंतर ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणुकीपासून ९० दिवसांच्या आत सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या विवरणासह पक्षाकडून केलेल्या खर्चाचा मेळ घालण्यासाठी राजकीय पक्षांकडून त्यांच्या होत असलेल्या सर्व मिरवणुकींचे व्हिडिओ चित्रण करून घेणे.

२४. निवडणूक काळात रोख रकमेच्या व्यवहाराबाबत तपासणी करण्यासाठीच्या उपाययोजना स्थानिक भाषेतून प्रसिद्ध करणे.

**क. निवडणुक अधिसूचना जारी झाल्यावर :—**

२५. सर्व मतदारसंघात स्थैतिक संनियंत्रण पथके कार्यरत आहेत व सर्व निवडणूक खर्च संनियंत्रण संघ मतदारक्षेत्र आणि जिल्हास्तरावर कार्यरत झाल्याची खात्री करणे व भरारीपथके/स्थैतिक संनियंत्रण पथक खर्चविषयक संवेदनशील असणाऱ्या मतदारक्षेत्रात असलेल्या ठिकाणी केंद्रीय पोलीसबलाबरोबर (सीपीएफ) एकत्रित स्वरूपात कार्यरत असल्याची खात्री करून घेणे.

२६. जिल्हा खर्च संनियंत्रण समिती स्थापन करणे आणि सर्व उमेदवारांना भरारीपथक/ स्थैनिक संनियंत्रण चमू, यांच्याकरिता प्रमाण कार्यान्वयन प्रक्रिया अपील करण्याच्या प्रक्रियेची माहिती करून देणे.

२७. रोख रक्कम जप्त करण्याविषयीच्या अपील प्रक्रियेची माहिती स्थानिक प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध करणे.

२८. निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर ७ दिवसांमध्ये, आयोगाकडून किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून थेट प्राप्त झालेल्या वलयांकित प्रचारकांच्या यादीची नोंद घेणे.

२९. मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवाराच्या कडून सर्व गुन्हेगारी प्रकरणे, मत्ता व दायित्वे यांची शपथपत्रे यांच्या सर्व स्कॅन प्रती ते सादर करण्यात आल्यानंतर २४ तासांच्या आत आणि इतर उमेदवारांच्या बाबतीत उक्त कागदपत्रे नामनिर्देशनाच्या छाननीच्या प्रक्रियेच्या एक दिवसानंतर, जनतेसमोर सादर करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर अपलोड करणे.

३०. मतदानाच्या ७२ तास आधी भरारीपथक, स्थैतिक संनिरीक्षण चमू, चित्रीकरण सर्वेक्षण पथक, ईएमसी, उत्पादन शुल्क संघ, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, जिल्हा खर्च संनियंत्रण समिती, लेखांकन संघ, २४ × ७ जिल्हा ईईएम नियंत्रण कक्ष इत्यादी, सारख्या यंत्रणा अधिक बळकट करण्यात येतील आणि मतदानकेंद्राच्या जवळ, तैनात केलेल्या भरारीपथक स्थैतिक चमू यांना संनिरीक्षण आवश्यकतेनुसार केंद्रीय पोलीस बल पुरविण्यात येईल.

३१. मतदानाच्या कार्यासाठी आवश्यक असणारे पोलीस म्हणून अखेरच्या ७२ तासांत स्थैतिक तैनात केलेल्या योजनेप्रमाणे पोलीस तैनात करण्यात येतील आणि कोणत्याही परिस्थितीत, अखेरच्या ७२ तासांमध्ये भरारीपथक, स्थैतिक संनियंत्रण चमू यांच्या सेवा खंडित केल्या जाणार नाहीत.

**ड. निवडणुका समाप्त झाल्यानंतर :—**

३२. निवडणूक खर्चाचे लेखे सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या अगोदर, एक आठवड्याच्या आत लेखे स्वीकारण्यासाठीच्या कामात गुंतलेल्या सर्व उमेदवार/निवडणूक प्रतिनिधी व कर्मचारीवर्गासाठी एक दिवसीय सुविधाकारी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३३. निकाल घोषणेच्या २६ व्या दिवशी "लेखा मेळा बैठकासाठी" उमेदवारांना निकाल घोषणेनंतर लगेचच पत्र पाठवणे आणि त्यांना खर्चाचा अहवालाचा मसुदा/विवरणे तयार करून घेऊन येण्याची विनंती करा आणि खर्च निरीक्षक, सहायक खर्च निरीक्षक, लेखांकन पथक सदस्य, जिल्हा निवडणूक खर्च संनियंत्रण याचे नोडल अधिकारी यांच्या बरोबर उक्त बैठकीचे आयोजन करणे.

३४. निकालाच्या घोषणेच्या ३० दिवसांच्या आत, लेखा देण्यासाठी सर्व उमेदवारांना निकाल घोषणेनंतर लगेचच पत्र पाठवा आणि त्या नोटिशीत सुविधाकारी प्रशिक्षणाचा दिनांक नमूद करा.

३५. जर उमेदवाराला निवडणूक प्रक्रियेदरम्यान बाबी कमी दाखवल्याबद्दल सूचना दिली नसल्यास, जिल्हा निवडणूक अधिकारी निकाल घोषणेच्या १५ दिवसांच्या आत उमेदवारांचे उत्तर मिळविण्यासाठी, त्याला पत्र पाठवतील. लेखा मेळ बैठकीत प्रथम ते पत्र/त्यावरील उत्तर या दोन्हीवर विचार करण्यात येईल आणि नंतर जिल्हा खर्च संनियंत्रण समिती नोंदविलेल्या मतांसह ते भारतीय निवडणूक आयोगाला कळवील.

३६. तेथे उमेदवाराच्या लेख्यामध्ये कोणताही प्रक्रियात्मक दोष असल्यास, जिल्हा निवडणूक अधिकारी लेख्यामधील दोष

सुधारण्यासाठी ३ दिवसांची मुदत देणारी नोटीस कसूरदार उमेदवारांना पाठवेल. नोटिशीच्या प्रतीसह उमेदवाराचे उत्तर, जिल्हा निवडणूक अधिकारी त्याच्या भाष्यासह, आयोगाला पाठवील.

३७. समजा लेखे भरण्याच्या नियत दिनांकापासून १५ दिवसांपेक्षा अधिक नाही, इतका विलंब होण्याच्या प्रकरणात, जिल्हा निवडणूक अधिकारी, स्वाधिकारे, विलंबाचे स्पष्टीकरण मागविण्यासाठी उमेदवाराला बोलवून नोटीस देईल. उमेदवाराच्या उत्तराची जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून तपासणी केली जाईल आणि तो नोटीशीची प्रत व उमेदवाराचे उत्तर कोणतेही, असल्यास त्याच्या भाष्यासह, आयोगाला पाठवील.

३८. जिल्हा निवडणूक अधिकारी निकालाच्या घोषणेच्या तारखेपासून ३७ व्या दिवशी सारसंग्रहाच्या विहित नमुन्यात (जोडपत्र-सी १३) उमेदवारनिहाय संक्षिप्त व छाननी अहवाल अंतिम करेल आणि ते, तसेच ३८ व्या दिवशी शक्यतो मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला पाठवेल.

३९. निवडणूक कालावधीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या सर्व नोटिशी कोणत्याही असल्यास व त्यावरील उत्तरे यांच्या प्रतींसह, सर्व उमेदवारांच्या संक्षिप्त विवरणाची (अनुसूची १ ते ११ सह भाग एक ते चार) स्कॅन प्रत, कोणतीही असल्यास आणि सर्व जनतेत माहितीच्या व्यापक प्रसारासाठी, उमेदवाराने निवडणूक खर्चाचे लेखे सादर केल्यापासून ३ दिवसांच्या आत, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर टाकण्यात यावे.

४०. प्रत्येक उमेदवाराचा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचा छाननी अहवाल जोडपत्र-सी-१७ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना छाननी अहवाल सादर केल्यानंतर ३ दिवसांच्या आत नोंदविण्यात यावा.

# मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसाठी तपासणी सूची

(ही तपासणी यादी परिपूर्ण नाही, कोणतीही शंका असल्यास कृपया सविस्तर अनुदेश पहा)

**क. निवडणुकीच्या उद्घोषणेआधी :—**

१. निवडणूक खर्च संनियंत्रण प्रशिक्षण देण्यासाठी, आयोगाला अहवाल देण्यासाठी आणि तसेच राज्य पोलीस विभाग, आयकर विभाग (गुंतवणूक), राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्याशी समन्वय साधण्यासाठी, मुख्य निवडणूक कार्यालयामध्ये नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आणि राज्यात निवडणूक उद्घोषणेपूर्वी, त्या सर्व नोडल अधिकाऱ्यांचे नाव, दूरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक, इ-मेल व पत्ता, आयोगाच्या सचिवाला पाठवणे.

२. विधानसभा मतदारसंघांमधील, खर्चविषयक संवेदनशील मतदारसंघ व खर्चाचे संवेदनशील क्षेत्र यांची यादी संकलित करणे आणि ती यादी खर्चाचे निरीक्षक व जिल्ह्याच्या नियतवाटपासाठी, विधानसभेचा कालावधी संपण्याच्या दिनांकाच्या शक्यतो सहा महिने आधी, तसेच आगाऊ आयोगाला पाठवणे.

३. निवडणूक खर्चाच्या निर्देशांचा सारसंग्रह स्थानिक भाषेत अनुवाद करून घेणे आणि त्याच्या प्रती काढणे आणि त्या प्रतींचे उमेदवार, निवडणूक खर्च संनियंत्रण कामात गुंतलेले अधिकारी, सर्व विभागाचे नोडल अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व पोलीस निरीक्षक, राजकीय पक्ष व प्रसारमाध्यमे (मिडीया) यांना वाटप करणे.

४. खर्चाच्या संनियंत्रण कामात गुंतलेल्या उमेदवार व गटांनी, अहवालासाठी आवश्यक असलेल्या सर्व नोंदवह्या व नमुने यांची छपाई करणे.

५. राज्यात निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी तैनात करावयाच्या (जिल्हा पातळीवरील जिल्हा निवडणूक अधिकारी, कार्यालय, पोलीस व उत्पादन शुल्क विभाग येथे) सर्व प्रमुख (अध्यापक) प्रशिक्षक/नोडल अधिकारी यांना प्रशिक्षणासाठी निश्चित करणे व यांची तयारी करणे.

६. सर्व जिल्ह्यांमध्ये सहायक खर्च निरीक्षक, चित्रीकरण सर्वेक्षण पथक, व्हीव्हीटी, भरारीपथक, स्थैतिक संनिरीक्षण चमू, यांचे सदस्य व लेखा गटांसाठी सर्व जिल्ह्यातील मनुष्यबळ निश्चित करावे आणि प्रत्येक गटांच्या सदस्यांसाठी दोन किंवा तीन प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि भरारीपथक, स्थैतिक संनिरीक्षण चमू, चित्रीकरण सर्वेक्षण पथक, लेखा गट/प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती जिल्हा पातळीवरील तक्रार केंद्र यांच्यासाठी मनुष्यबळ योग्यरित्या प्रशिक्षित असल्याची खात्री करून घ्यावी.

७. निवडणुकीच्या उद्घोषणेच्या तारखेपासून ते निवडणूका प्रकिया पूर्ण होण्याच्या तारखेपर्यंत सर्व जिल्ह्यामध्ये तैनात करावयाच्या भरारी पथकासाठी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून अधिसूचित करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांना आधीच निश्चित केलेले आहे, याची खात्री करणे.

८. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सर्व गटातील, भरारी पथक/स्थैतिक संनिरीक्षण चमू/व्हिडीओ संनियंत्रण चमू यांच्यासाठी व्हिडीओ कॅमेरा/वेब कॅमेरा इत्यांदींच्या वाहनांची व प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या केबल जोडणीसह दूरदर्शन संच असलेल्या वाहनांची व्यवस्था केली आहे याची खात्री करा.

९. भरारी पथक स्थैतिक संनिरीक्षण चमू यांच्या वापरासाठीच्या वाहनावर जीपीआरएस यंत्रणा आहेत याची खात्री करणे.

१०. आयोगाने दिलेल्या निवडणूक खर्च संनियंत्रण अनुदेशांसंबंधात राज्य पातळीवर राजकीय पक्षांसाठी कार्यशाळेची तयारी करावी. प्रसारमाध्यमांना निवडणूक खर्च संनियंत्रणाबाबत संवेदनक्षम बनविण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करणे.

११. राज्यासाठी/जिल्ह्यातील प्रसारमाध्यम जाहिरात दर, डीआयपीआर व डीएव्हीपी यांचे दर मिळवणे.

१२. निवडणुकीदरम्यान राज्यात किंवा राज्यामधून अनुचित दारू, औषधीद्रव्ये इत्यादींच्या अवैध पुरवठ्यावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सीमांचे उत्पादन शुल्क आयुक्त व पोलीस आयुक्त यांच्याशी संपर्क ठेवणे.

१३. राज्यात कार्यरत असणाऱ्या सर्व वाणिज्यिक विमानतळांवर आणि राज्यात कार्यरत असणारी सर्व बिगर वाणिज्यिक विमानतळ/धावपट्ट्या/हेलिपॅड निश्चित करून याची माहिती तेथे विमानतळ गुप्तवार्ता यंत्रणाना मिळवण्यासाठी राज्याचे महासंचालक, आयकर (अन्वेषण) यांच्याशी संपर्क साधणे, आणि त्यांची योग्य रीतीने तपासणी व्यवस्था केली जात आहे हे बघणे.

१४. जर राज्याची सीमा आंतरराष्ट्रीय सीमा असेल तेथे सीमा सुरक्षा बल, किंवा इंडो तिबेटीयन सीमा पोलीस (बीएसएफ, किंवा आयटीबीएफ) यांच्याशी संपर्क साधणे आणि तेथे निवडणुकी दरम्यान रोकड (पैसा), दारू किंवा औषधीद्रव्ये् यांची ने-आण करण्याबद्दल त्यास प्रतिबंध करण्यासाठी त्यांना संवेदनक्षम करणे.

१५. मागील निवडणुकीत ज्याठिकाणी प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आले होते अशा सर्व जुन्या प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि त्यांमध्ये तर्कशुद्ध निर्णय घेणे.

१६. मागील विधानसभा निवडणुकीशी संबधित उमेदवारांच्या निवडणूक खर्च लेख्यांचा संबंधातील सर्व प्रकरणे निकालात काढण्यात आली असल्याची खात्री करून घेणे.

**नैतिक मतदान :—**

१७. बुथ पातळीवर मतदान केंद्र स्तरीय जनजागृती गटाची (बॅग्ज) निर्मिती करणे व त्यांना सर्व नैतिक मतदानाचे साहित्य व गैरप्रकारांचे छायाचित्र/चित्रफित अपलोड करण्यासाठीचे सॉफ्टवेअर देऊन, सुसज्ज करणे आणि नैतिक मतदान मोहिम, प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी घेणे इत्यादींसाठी मतदान केंद्रस्तरीय जनजागृती गटासोबत बैठका घेऊन जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना त्याबाबत संवेदनक्षम केलेले आहे, याची खात्री करणे.

१८. नैतिक मतदानाचा संदेश पसरविण्यासाठी, राज्याच्या सर्व नागरी संस्था/अशासकीय संघटना, राज्याचे शिक्षणतज्ज्ञ, विद्यैकनिष्ठ, प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांच्या सोबत बैठक आयोजित करणे.

१९. नैतिक मतदानावर आधारित ऑडिओ, व्हिडिओ, दृश्य घोषणा इत्यादींसारख्या सर्व जाहिरातींचा मजकूर तयार करणे.

२०. शाळा व महाविद्यालयांमध्ये नैतिक मतदानावर आधारित वादविवाद, घोषणा, व्यंग्यचित्र स्पर्धांचे आयोजन करावे आणि नैतिक मतदान व लाचलुचपत विरोधी मोहिमेसाठी प्रतिज्ञापत्र/स्वाक्षरी मोहिम इत्यादींच प्रसार करणे.

२१. नैतिक मतदान मोहिमेसाठी प्रसार माध्यम संघटनेसोबत भागीदारी करणे आणि लाचलुचपतीसाठी दंडविषयक तरतूद करणे.

२२. नोंदणीकृत राजकीय पक्षांसंबंधातील, त्यांचा वार्षिक लेखा अहवाल, निवडणूक खर्च विवरण व देणगी अहवाल यांचा सद्यःस्थितीच्या अहवालावरील संकेतस्थळ माहिती अद्ययावत करणे.

**ख. निवडणुकीच्या उद्घोषणेनंतर :—**

२३. निवडणुक दिनांकाच्या उद्घोषणेपासून सर्व मोठ्या मेळाव्यांवरील खर्च पकडण्यासाठी आणि आदर्श आचार संहितेच्या अंमलबजावणीसंबंधी व त्यांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी जिल्हा पातळीवर तक्रार संनियंत्रण केंद्र, भरारी पथक, चित्रीकरण सर्वेक्षण पथक, व्हीव्हीटी, लेखांकन चमू यांचे कार्य सुरू करणे. उद्घोषणेनंतर चित्रीकरण सर्वेक्षण पथक व भरारी पथक यांनी पक्षाचा खर्च नोंदवावयाचा आहे आणि मुख्य निवडणूक आयोगाला प्रत्येक पक्षासाठीचा संकलित अहवाल पाठविण्यात येईल. जेणेकरून त्यांना पक्षाने दाखल केलेल्या खर्चाच्या विवरणाचा मेळ लगेचच घालता येईल.

२४. माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, उद्घोषणेच्या दिनांकापासून कार्याची सुरूवात करेल.

२५. फौजदारी खटले, मत्ता व दायित्त्वे यांच्या सर्व शपथपत्रांच्या स्कॅन प्रती जिल्हा पातळीवर लोकांना दाखविण्यासाठी नामनिर्देशनाच्या छाननीच्या दिवसानंतर २४ तासांच्या आत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्याबाबतीत आणि इतर उमेदवारांच्या बाबतीत दाखल केलेल्या एक दिवसानंतर मुख्य निवडणूक आयुक्ताच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी जिल्हा पातळीवर व्यवस्था करील.

२६. अधिसूचनेच्या दिनांकापासून कार्य सुरू करण्यासाठी स्थैतिक संनिरक्षण चमू कडे योग्य मनुष्यबळ आहे व त्यांनी काम सुरू केले आहे, याची खात्री करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना निदेश देणे. निवडणूक अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरुवात करून संबद्ध नमुन्यात गटांनी अहवाल देणे.

२७. केंद्रिय सशस्त्र पोलीस दल, खर्च संवेदनशील मतदारसंघाच्या भरारीपथक/स्थैतिक संनिरक्षण चमू यामध्ये योग्यरीत्या एकत्रित झाले आहेत याची खात्री करणे.

## ग. निवडणुकीची अधिसूचना निघाल्यानंतर :—

२८. सर्व मतदार संघामध्ये स्थैतिक संनिरक्षण चमू कार्यरत आहेत आणि निवडणूक खर्च संनियत्रणाचे सर्व गट मतदार संघ व जिल्हा पातळीवर कार्यरत आहेत आणि खर्चविषयक संवेदनाक्षम मतदारसंघातील केंद्रिय पोलीस बलासोबत भरारीपथक/स्थैतिक संनिरक्षण चमू एकत्र आहेत, याची खात्री करा.

२९. निवडणूक कालावधीत रोकड बाळगण्यावर निर्बंध, रोकडची तपासणी व जप्तीविरोधात अपिलाची प्रक्रिया या विषयीच्या निर्बंधासंबंधातील माहिती सर्व प्रसारमाध्यमांमध्ये स्थानिक भाषेत प्रसिद्ध करणे.

३०. निवडणूक अधिसूचनेच्या ७ दिवसांत, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून किंवा आयोगाकडून थेट प्राप्त झालेली प्रमुख प्रचारकांची यादी तयार करणे आणि ती जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामध्ये वितरित करणे व संकेतस्थळावर अपलोड करणे.

३१. फौजदारी प्रकरणे, मत्ता व दायित्त्वे संबंधातील शपथपत्रांच्या प्रती जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या नोटीस फलकावर लावल्या आहेत आणि स्कॅन प्रती २४ तासांत संकेतस्थळावर अपलोड केल्या आहेत याची खात्री करा.

३२. तीन लेखा खर्च निरीक्षकांच्या तपासणीच्या तारखा सर्व खर्च निरीक्षकांनी दाखवल्या आहेत याची खात्री करा.

३३. प्रत्येक तपासणीनंतर उमेदवारांच्या नोंदवह्यांच्या स्कॅन केलेल्या प्रती जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पोर्टलवर मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकसह अपलोड केल्या आहेत याची खात्री करा.

३४. राज्य पातळीवर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करा आणि पेडन्यूजची संशयित प्रकरणे/त्याच्याशी संबंधित कोणतीही गाऱ्हाणी असल्यास, त्यांचे निराकरण वेळेत होत असल्याची खात्री करा.

३५. ईएससी व खर्चविषयक संवेदनक्षम क्षेत्र खंडे यांच्यामध्ये काटेकोर संनियंत्रण केले जात आहे याची खात्री करा.

३६. भरारीपथक, स्थैतिक संनिरक्षण चमू, चित्रीकरण सर्वेक्षण पथक, व्हीव्हीटी, ईएमसी, उत्पादन शुल्क गट, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती, जिल्हा खर्च सनियंत्रण समिती, लेखा गट, २४ × ७ जिल्हा निवडणूक खर्च संनियंत्रण कक्ष इत्यादीसारखे ईईएममध्ये सहभागी गट मतदानाच्या दिवशी शेवटच्या ७२ तासांदरम्यान बळकट आहेत आणि केंद्रिय पोलीस बल, ज्यांची नियुक्ती जवळच्या मतदान केंद्रावर आहे, त्यांची आवश्यकता असेल तर तेथे भरारी पथक/स्थैतिक संनिरक्षण चमू यांना पुरवला जाईल.

३७. शेवटच्या ७२ तासांच्या दरम्यान मतदान कामासाठी पोलिसांची आवश्यक असेल म्हणुन पोलीस तैनाती योजना आणि शेवटच्या ७२ तासांच्या दरम्यान कोणत्याही परिस्थितीत प्रभारी पथके स्थितिक संनिरिक्षण चमू विसर्जित केली जाणार नाही.

३८. सर्व नोडल अधिकाऱ्यांनी वेळेत आयोगाला जप्ती अहवाल पाठविले आहेत याची खात्री करणे.

३९. तक्रारींवर अर्ध्या तासात कारवाई केली जात आहे, याची खातरजमा करणे.

४०. सर्व मोठ्या मेळाव्यांचे चित्रीकरण केले आहे, याची खातरजमा करणे.

४१. भरारी पथक/स्थैतिक संनिरिक्षण चमू/लेखा गट यांना आढळलेल्या बाबीमध्ये, प्रारंभिक माहिती अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून तात्काळ दाखल होत आहे याची खात्री करणे.

**घ. मतदानाच्या दिवशी :—**

४२. निवडणूक खर्च संनियंत्रण संकलित मुख्य निवडणूक अधिकारी यांचा अहवाल मतदानाच्या दिवसापर्यंत आणि मतदानाच्या दिवसासह सायंकाळी ५-०० वाजता आयोगास प्रसारमाध्यमांना द्यावयाच्या माहितीसाठी, दुपारी १-०० वाजेपर्यंत त्यापूर्वी **(संदर्भ जोडपत्र-सी ३)** भारत निवडणूक आयोगाला सचिव निवडणूक खर्च संनियंत्रण पाठवणे.

**ड. निवडणूक समाप्तीनंतर :—**

४३. जर प्रारंभिक माहिती अहवाल दाखल केला नाही किंवा जर आयकर विभागाला सुपूर्द केला नाही, अशी सर्व जप्त केलेली रोकड/वस्तू निवडणुकीच्या ७ दिवसांत सोडून दिल्या आहेत, याची खातरजमा करणे.

४४. उमेदवारांसाठी व उमेदवारांकडून प्राप्त निवडणूक खर्च लेख्यांसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात कामात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा पातळीवर (निकालाच्या घोषणेनंतर २३ दिवसांच्या आत) योग्य प्रशिक्षण दिल्याची खातरजमा करणे.

४५. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २६ व्या दिवशी सर्व उमेदवारांची लेखा पुनर्मेळ बैठक आयोजित केली आहे, ज्यास पुनर्मेळाकरिता त्यांच्या मसुदा लेखा विविरणपत्रांची/अहवालांची तयारी करून आला असेल याची सुनिश्चिती करणे.

४६. जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाद्वारे प्राप्त झाल्याच्या ३ दिवासांच्या आत (उमेदवारांनी दाखल केलेली, लेख्यांचे सर्व संक्षिप्त विवरणे) संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी तयार करणे.

४७. उमेदवारांनी लेखा भरण्याच्या २ दिवसांच्या आत, ज्या लेख्यांची तपासणी केली जाते, त्याचा तपशील, उमेदवारांची नावे नमूद करून लेखा दाखल केल्याचा दिनांक आणि वेळ व ठिकाण जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या नोटीस फलकावर लावले आहे याची सुनिश्चिती करणे.

४८. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून ३८ दिवसांच्या आत, छाननी अहवाल, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठविला आहे आणि तो निकाल घोषित केल्यानंतर ४५ व्या दिवशी आयोगाला पाठविला आहे याची सुनिश्चिती करणे **(जोडपत्र-सी 1३)**.

४९. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी छाननी अहवाल पुन्हा एकदा अंतिम केल्याच्या ३ दिवसांच्या आत, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या छाननी अहवाल माहिती नोंदणीसाठी योजना तयार करणे **(जोडपत्र सी-१७)**.

५०. जेथे प्रारंभिक माहिती अहवाल (एफआयआर) दाखल झाला किंवा न्यायालयीन प्रकरण दाखल झाले आणि त्याचा तार्किक निष्कर्ष त्यांनी काढला आहे, अशा लाचलुचपत संबंधीच्या निवडणुकीच्या अपराधांच्या सर्व पोलीस प्रकरणांचा पाठपुरावा करणे.

५१. संशयित असलेली प्रलंबित पेड न्यूजची प्रकरणे, कोणतीही असल्यास, ती विसर्जित करण्यापूर्वी राज्य पातळीवर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कडून निकालात काढणे आणि आयोगाला पेड न्यूजच्या प्रकरणांची यादी पाठविणे.

५२. जिल्हा निवडणूक अधिकारी यांचा छाननी व संक्षिप्त अहवाल भाष्यांसह प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आयोगाला सादर करणे. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जिल्हा निवडणूक संनियंत्रण समितीचा अहवाल तसेच सूचनां व उमेदवारांचे स्पष्टीकरण यांसह कोणतेही असल्यास, छाननी अहवाल पाठविला आहे याची मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी खातरजमा करणे.

५३. निवडणूक कालावधीत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी पुरावे (चित्रफिती, सीडी इत्यादी) जमा केले आहे आणि तक्रारीच्या बाबतीत, भविष्यात आयोगासमोर प्रक्रियेसाठी, अभिरूप निरीक्षण नोंदवही सुरक्षित अभिरक्षेत ठेवली आहे, याची खातरजमा करणे.

# उमेदवारांसाठी तपासणी सूची

(तपासणी सूची परिपूर्ण नाही, जर काही शंका असल्यास, कृपया सविस्तर सूचनांचा संदर्भ पाहणे.)

## अ. नामनिर्देशनाच्या वेळेपर्यंत

१. नामनिर्देशन दाखल करण्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर केवळ निवडणूक खर्चाच्या प्रयोजनांसाठी एक स्वतंत्र बँक खाते उघडणे.

२. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने यथोचितरित्या दिलेल्या अनुक्रमांकाची निवडणूक खर्च नोंदवहीची एक प्रत घेणे आणि रोख नोंदवहीत समाविष्ट पृष्ठसंख्येबाबत आवश्यक प्रमाणन, बँक नोंदवही आणि दैनंदिन लेखा नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्र (अनुसूची १ ते ११ सोबत भाग एक ते भाग सहा) शपथपत्र आणि पोच आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून निवडणूक खर्च संनियंत्रण यांवरील अनुदेशांचा सारसंग्रह मिळवणे.

३. निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र प्रतिनिधीचे नाव अधिसूचित करणे, कोणतेही असल्यास, आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविणे.

४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने आयोजित केलेल्या निवडणूक खर्चावरील आणि निवडणूक खर्च नोंदवहीच्या परिरक्षणावरील प्रशिक्षण कार्यक्रमाला उपस्थित राहणे किंवा खर्च प्रतिनिधी उपस्थित राहिल्याची खातरजमा करणे.

५. तुमच्या मतदार संघाच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा आणि निवडणूक खर्च संनियंत्रण संबंधित कायदे/अनुदेश यांची माहिती करून घेणे.

६. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे निवडणूक प्रचार बाबींची अधिसूचना किंवा दरपत्रकाची प्रत मिळविणे.

७. निवडणूक खर्च संनियंत्रणावरील सर्व अनुदेशांचा सखोल अभ्यास करणे आणि काही शंका असल्यास, निवडणूक खर्च संनियंत्रण मध्यस्थ अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे.

८. निवडणूक खर्च संनियंत्रण अनुदेशांवर सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

## ब. नामनिर्देशनाच्या दिनांकापासून निकाल घोषित होण्याच्या दिनांकापर्यंत :—

९. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून मिळालेल्या निवडणूक खर्च नोंदवहीमध्ये सर्व निवडणूक खर्चांचे दैनंदिन लेखे ठेवणे.

१०. निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व वाहनांच्या संबंधात परवानगी घेणे आणि अशा प्रत्येक वाहनाच्या समोरच्या काचेवर परवानगीपत्र दिसत असल्याची खातरजमा करणे.

११. जर उमेदवार कोणतेही जे वाहन वापरणार नसेल, तर ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवावे आणि परवानगी रद्द करावी. अन्यथा अशा मानीव वाहनांवर खर्च लावून गणना करण्यात येईल आणि त्या उमेदवाराच्या खर्चात भर घालण्यात येईल.

१२. सारसंग्रहाच्या जोडपत्र-डी १ मध्ये दिलेल्या खर्च योजनेसह मेळावा/मिरवणूक/सार्वजनिक सभा घेण्याकरिता परवानगी घेणे आणि अशा मेळावा/सभा घेण्याच्या दिनांकापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे.

१३. मेळाव्यासाठी भाड्याने घेतलेल्या वाणिज्यिक वाहनांच्या सर्व खर्चाचा लेख्यांमध्ये समावेश केला आहे याची खातरजमा करणे.

१४. उमेदवाराकडून उपस्थित राहिलेल्या मेळाव्यास छायाचित्र दर्शविणे/नावाची जाहिरात करणे यांवरील सर्व खर्चाची आयोगाच्या अनुदेशानुसार लेख्यांमध्ये भर घालण्यात आली आहे याची खातरजमा करणे. खर्चाचा अभिरुप निरीक्षण नोंदवहीशी मेळ घालण्यात आला असल्याची खातरजमा करणे. कोणताही कमी सांगितलेल्या/न नोंदविलेल्या निवडणूक खर्चाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येऊ शकेल.

१५. निवडणूक भित्तिपत्रके (पोस्टर्स) इत्यादीच्या मुद्रणासंबंधात आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला माहिती पाठविण्याबाबत लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२७क च्या तरतुदींची जाणीव करून देणे आणि प्रकाशक व मुद्रकाच्या बाजूने भित्तिपत्रक (पोस्टर्स) आणि पत्रके (पॅम्पलेट) मुद्रित करताना परिशिष्ट अ आणि ब मध्ये प्रकाशकाने व मुद्रकाने प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

१६. भारतीय दंड संहितेचे कलम १७१ख ते १७१झ च्या तरतुदी आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२३ ची माहिती करून देणे.

१७. नामनिर्देशन दाखल केल्याच्या दिनांकापासून दैनंदिन लेखा, रोख पुस्तक (वही) आणि बँक पुस्तक नियमितपणे ठेवणे आणि नामनिर्देशन दाखल करण्याच्या दिनांकास केलेल्या सर्व खर्चांचा समावेश करणे.

१८. सर्व भित्तिपत्रके, निशाण्या, पत्रके जरी नामनिर्देशनापूर्वी मुद्रित/प्रसिद्ध केली ही वस्तुस्थिती असली, तरी नामनिर्देशनकेल्यानंतर त्याचा ती उमेदवाराचा निवडणूक खर्च, खर्चाचे स्वरुप असेल याची माहिती करून देणे.

१९. कोणत्याही राजकीय पक्षाद्वारे मान्यताप्राप्त असलेल्या किंवा मान्यताप्राप्त नसलेल्या, पुरस्कृत उमेदवारांची जाणीव करून देणे की, पक्षाद्वारे प्रमुख प्रचारकाची यादी आयोगाकडे सादर केली आहे किंवा कसे हे तपासावे आणि निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत, पक्षाद्वारे लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ अन्वये लाभाची मागणी करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून निवडणूक निर्णय अधिकारी/खर्च निरीक्षक/ निवडणूक खर्च संनियंत्रण चमूंना देण्यात येत आहे.

२०. पक्षाकडून प्रमुख प्रचारकाच्या (हेलिकॉप्टर सारखा) प्रवास खर्चाचा तपशील मिळविणे जेणेकरून, त्याची त्याच्या लेखा विवरणपत्रात आवश्यक अचूक नोंदी घेता येतील आणि विमान/हेलिकॉप्टर मालकी/भाड्याने घेतल्याने कंपनीला प्रदान केलेले/प्रदेय भाडे आकार, प्रवाशांची नावे आणि राजकीय पक्षाचे नाव (जर भाड्याचा खर्च पक्षाने केला असल्यास) याबाबत त्याच्या मतदारसंघात विमान/हेलिकॉप्टर उतरल्यानंतर ५ दिवसांच्या आत, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवील.

२१. रुपये १०,००० पेक्षा अधिक सर्व खर्च आणि रुपये १०,००० पेक्षा अधिक रकमेच्या सर्व पावत्या, अंशदाने, कर्जे, ठेवी, अग्रीमे रोख स्वरुपात नसाव्यात आणि धनादेशाद्वारे, धनाकर्षणाद्वारे किंवा निवडणूक खर्चाच्या प्रयोजनासाठीच केवळ उघडण्यात आलेल्या बँक खात्यामार्फत बँक हस्तांतरणाद्वारे केलेल्या असाव्यात.

२२. पक्षाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या रकमा, स्वतःच्या निधीतील रकमा, देणग्या/बक्षीसे/कर्जे इत्यादी स्वरुपात इतरांकडून प्राप्त झालेल्या रकमा यासंबंधातील सर्व तपशील ठेवणे. अदत्त आणि देय रकमांचादेखील समावेश करण्यात यावा.

२३. सेवा किंवा वस्तुंच्या स्वरुपात काही प्राप्त झाले असेल तर त्या संबंधात, खातरजमा करणे, ते देणाऱ्या व्यक्तींची नावे व पत्ते खाते नोंदवहीमध्ये नमूद करावीत आणि उमेदवाराचा खर्च म्हणून देखील भर घालण्यात यावी.

२४. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निश्चित केलेले उमेदवार/प्रतिनिधी यांच्याशी विचारविनिमय करून निवडणूक प्रचारात वापरलेल्या विविध वस्तुंचे/सेवांचे दर माहित करून देणे. तसेच, लेखे ठेवण्याकरिता या दरपत्रकाचे अनुसरण केले आहे याची उमेदवाराने खातरजमा करावी.

२५. प्रमुख प्रचारकाबरोबर व्यासपीठावर सहभागी होताना, प्रमुख प्रचारकाने त्याच्या बाजुने मत देण्याचे आवाहन केले असेल, आणि त्यामुळे अशा बैठकी, इत्यादींवर केलेला खर्च हा, उमेदवाराने केलेला खर्च म्हणून व तो खर्च पक्षाने केलेला नाही असे समजण्यात येईल.

२६. प्रचार कालावधीत खर्च निरीक्षकाने करावयाच्या ३ तपासण्यांमध्ये एकतर व्यक्तिशः किंवा प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहावे आणि सर्व परिपूर्ण लेखे/नोंदवह्या सादर कराव्यात.

२७. तुमच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये विसंगती असल्याचे आढळून आल्यास त्यासंबंधी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून कळविल्याच्या किंवा प्राप्त झालेल्या नोटिशीला ४८ तासांच्या आत उत्तर देणे.

२८. पेड न्यूज बाबत माहिती करून देणे आणि उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या लेख्यामध्ये पेड न्यूजच्या प्रकरणांचा भर घालावयाची प्रक्रिया माहीत करून घेणे.

२९. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवाराच्या निदर्शनास आणून दिलेल्या पेड न्यूजच्या संशयित प्रकरणांच्या संदर्भात, माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने (जिल्हा स्तरावरील) संमत केलेल्या आदेशाला वेळेत उत्तर देणे. जर उमेदवार दिलेल्या आदेशाशी असहमत असेल तर, विनिर्दिष्ट कालावधीत राज्य स्तरीय माध्यम समितीसमोर अपील करता येईल.

३०. मतदानाच्या दिवशी मतदार चिठ्ठ्यांचे वाटप करण्यासाठी उभारलेल्या उमेदवार केंद्रांच्या परिरक्षणावर केलेल्या खर्चांचा समावेश करणे. उमेदवारांचे केंद्र (खोपटे), सुविधा केंद्र कामगार/प्रतिनिधी यांनी केलेल्या कष्टाचे पारिश्रमिक आणि अल्पोपहार, जेवण इत्यादींवरील खर्चाचा समावेश करणे (अनुसूची-६ लेख्याच्या संक्षिप्त विवरणपत्र).

३१. भारतीय दंड संहिता कलम १७१ ख किंवा लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ (१) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, पक्षाचे कोणतेही कार्यकर्ते मतदारांना लाच देण्यामध्ये किंवा पाठिंबा देण्यामध्ये गुंतलेले नाहीत याची खातरजमा करणे.

## क/सी. निकाल जाहीर झाल्यानंतर

३२. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे निकाल घोषित झाल्यानंतर २३ दिवसांच्या आत, तसेच निकाल घोषित झाल्यानंतर २६ व्या दिवशी आयोजित केलेल्या **लेखा पुनर्मेळ बैठकीमध्ये** लेखे दाखल करण्याच्या प्रक्रियेवरील प्रशिक्षणास व्यक्तिशः किंवा प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहणे.

३३. उपरोक्त बैठकीत उमेदवारांना त्याच्या कमी दाखवलेल्या रकमेचा, कोणत्याही असल्यास, पुनर्मेळ करण्याची आणखी एक संधी देण्यात येईल याची जाणीव करून देणे. म्हणून उमेदवाराने त्यांच्या अंतिम लेख्यांचा मसुदा सादर करावा जेणेकरून, विसंगती असल्यास त्याचा पुनर्मेळ घालता येईल.

३४. उमेदवारांने उपरोक्त बैठकीपूर्वीच त्याचे लेखे अगोदरच दाखल केले असल्यास, त्यास, जिल्हा खर्च संनियंत्रण समितीचे निष्कर्ष समाविष्ट करण्याच्या दृष्टीने निकाल घोषित झाल्याच्या ३० दिवसांच्या वैधानिक कालावधीत लेखे सुधारित करता येतील.

३५. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यासमोर निवडणूक खर्चाचे लेखे समावेश असलेली बँक नोंदवही, रोख नोंदवही, दैनंदिन खाते नोंदवही, संक्षिप्त विवरणपत्र (भाग एक ते भाग चार आणि अनुसूच्या १ ते ११), सर्व देयके व प्रमाणके (अनुक्रमांक दिलेले) आणि **मूळ** प्रतीतील शपथपत्र, निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत, केवळ खर्चाच्या प्रयोजनासाठी उघडण्यात आलेले बँकेच्या विवरणपत्राची सर्व बाबतीत यथोचित रीत्या भरलेली आणि स्वयंसाक्षांकित प्रती सादर करणे. जर लेखे विहित वेळेत आणि आवश्यक रीतीने सादर केले नाही तर, आयोगाकडून लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १० क अन्वये अनर्हतेची नोटीस जारी करण्यात येईल.

३६. जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात, लेखे दाखल केल्याचा दिनांक व वेळ देऊन लेखे दाखल केल्याचा पुरावा म्हणून पोच पावती मिळवणे.

३७. संक्षिप्त विवरणपत्र व शपथपत्र यांवर स्वतः स्वाक्षरी करणे आणि सर्व देयके व प्रमाणके यांवर तुम्ही किंवा तुमच्या प्रतिनिधीने स्वाक्षरी करावी.

३८. जिल्हा निवडणूक संनियंत्रण समितीने दाखविलेल्या विसंगतीच्या संबंधात नोंदवहीच्या तपासणीच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी किंवा खर्च निरीक्षक यांना, दिलेल्या उत्तराची प्रत सादर करणे.

# राजकीय पक्षांसाठी तपासणी सूची

(ही तपासणी सूची परिपूर्ण नाही. कोणतीही शंका असल्यास, कृपया तपशीलवार सूचनांचा संदर्भ पाहणे.)

## (क) निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर :

१. पक्षाच्या सर्व उमेदवारांनी, केवळ निवडणूक खर्चाच्या प्रयोजनांकरिता, नामनिर्देशन दाखल करण्यापूर्वी किमान एक दिवस आधी स्वतंत्र बँक खाते उघडल्याची आणि नामनिर्देश दाखल करतेवेळी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्या खात्याची स्वयंसाक्षांकित प्रत सादर केल्याची खात्री करणे.

२. निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणावरील अनुदेशांच्या सारसंग्रहाची स्थानिक भाषेतील प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून प्राप्त करणे.

३. राज्यस्तरावर मध्यस्थ राजकीय नेत्याला नामनिर्देशित करणे, जो मुख्य निवडणूक अधिकाऱ्याशी आणि निवडणूक खर्च संनियंत्रण आयोगाशी समन्वय साधील आणि तो पक्ष कार्यकर्ते व उमेदवारांचा निवडणूक खर्चावरील मुख्य प्रशिक्षक असेल.

४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने निवडणूक खर्चावरील व निवडणूक खर्चाची नोंदवही ठेवण्यावरील प्रशिक्षण कार्यक्रमाला मध्यस्थ अधिकारी उपस्थित असण्याची खातरजमा करणे.

५. मागील वर्षातील सर्व अंशदान अहवाल आणि वार्षिक लेखापरीक्षा अहवाल, मागील निवडणुकांच्या निवडणूक खर्चाची सर्व विवरणपत्रे वेळेत दाखल करण्यात आली आहेत याची खातरजमा करणे.

६. पुढील गोष्टींची खातरजमा करणे :—

(क) उमेदवाराला द्यावयाची रक्कम (कोणतीही असल्यास) ती केवळ धनादेश/धनाकर्ष/बँक हस्तांतरणद्वारे (रोख रकमेत नव्हे) दिली आहे.

(ख) निवडणूक जाहीर केल्याच्या दिनांकापासून निकाल जाहीर होईपर्यंत केलेल्या पक्षाच्या निवडणूक खर्चाचे अचूक विवरण तयार करण्यासाठी अनुक्रमे जमा तपशील व सर्व खर्चाचे तपशील ठेवणे.

(ग) व्यक्ती/संस्थेला दिवसाला रुपये १०,००० पेक्षा अधिक रक्कम देण्याचा केलेला खर्च केवळ धनादेश/धनाकर्ष/बँक हस्तांतरणानेच (रोख रकमेत नव्हे) केला आहे.

(घ) देय/शिल्लक असलेल्या रकमेची देखील नोंद घेण्यात यावी आणि लेखामध्ये त्याचा समावेश करण्यात यावा.

(ड) कोणत्याही प्रकाराच्या आणि/किंवा गौरव म्हणून सर्व जमा रकमांच्या काल्पनिक मूल्याचा लेख्यामध्ये समावेश करावा.

## (ख) नामनिर्देशनाच्या दिनांकापासून निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापर्यंत :—

७. निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्यापासून ७ दिवसांच्या आत, मुख्य निवडणूक अधिकारी आणि भारत निवडणूक आयोग यांच्याकडे प्रमुख प्रचारकांची यादी दिली गेली आहे याची खातरजमा करणे. अन्यथा प्रमुख प्रचारकांच्या प्रवासावर केलेला सर्व खर्च उमेदवाराच्या खात्यावर नोंदविला जाईल. आणि लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या स्पष्टीकरण (२) च्या अर्थांतर्गत त्याचा फायदा उमेदवारास मिळू शकणार नाही.

८. पक्षाच्या सार्वत्रिक प्रचाराचा खर्च पक्षाने हिशेबात घेतला असेल तेव्हा, आयोगाच्या अनुदेशानुसार, उमेदवाराचे नाव, छायाचित्र किंवा व्यासपीठांचा सामायिक वापर इत्यादींसह उमेदवाराचा (उमेदवारांचा) प्रचार करताना पक्षाच्या प्रचार खर्चाची, उमेदवारांच्या खर्चात भर घालण्यात येईल याची सुनिश्चिती करणे.

९. मेळावा/मिरवणूक/सार्वजनिक सभा घेण्यासाठी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून योग्य परवानगी घेणे.

१०. प्रकाशक व मुद्रकाच्यावतीने भित्तिपत्रके व पत्रके मुद्रित केल्यावर, प्रकाशक व मुद्रकाने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला माहिती देण्यासंबंधात व जोडपत्र क आणि ख मध्ये आवश्यक ते घोषणापत्र सादर करण्यासंबंधात, लोक प्रतिनिधित्व अधिनयम, १९५१ च्या कलम १२७क च्या तरतुदींची माहिती करून देणे.

११. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना व उमेदवारांना, भारतीय दंड संहितेची कलमे १७१ क ते १७१ झ यांच्या तरतुदींविषयी आणि विशेषतः उमेदवाराच्या प्राधिकाराशिवाय, त्याच्या निवडून येण्याच्या संभाव्यतेचा लाभ उठविणे किंवा त्यास चालना देणे यामुळे संबंधित व्यक्तींना शिक्षा होईल याविषयी माहिती करून देणे.

१२. पक्ष कार्यकर्त्यांना, भारतीय दंड संहितेची कलमे १७१ क ते १७१ झ आणि लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम १२३ यांखालील आणि विशेषतः मतदारांना लाचलुचपत दाखविण्यासंबंधात भारतीय दंड संहितेची कलम १७१ ख आणि लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम १२३(२) यांखालील दंडनीय उपाययोजना यासंबंधात शिक्षित करणे.

१३. आयोगाच्या अनुदेशांनुसार, उमेदवाराने त्याच्या/तिच्या निवडणूक मेळाव्यादरम्यान, पक्षाला हेलिकॉप्टर्स व विमानांची सेवा पुरविणाऱ्या कंपनीचे नाव व भाड्याचा आकार यांविषयी माहिती कळविणे.

**(ग) निकालाची घोषणा झाल्यानंतर :—**

१४. राजकीय पक्षांनी (एक) विवरणपत्राचा भाग (दोन) त्याबरोबर वरीलप्रमाणे राजकीय पक्षांना भरून देणे आवश्यक असलेल्या निवडणूक खर्चाचे अंतिम विवरणपत्र, दाखल करावे. (विधानसभा/लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्ण होण्याच्या ७५/९० दिवस आत.) पक्षाकडून उमेदवाराला ठोक रक्कम प्रदान करण्याच्या बाबतीत विधानसभा/लोकसभा निवडणुकांचा निकाल घोषित झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत विहित नमुन्यात, भारताचा निवडणूक आयोग (राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या बाबतीत) किंवा मुख्य निवडणूक अधिकारी (जेथे पक्ष मुख्यालय असेल अशा मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांच्या बाबतीत) यांना सादर करणे.

१५. राज्याच्या विधानसभा निवडणुका पूर्ण झाल्यानंतर ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणुका पूर्ण झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत, विहित नमुन्यात निवडणूक खर्चाचे एकत्रित विवरणपत्र सनदी लेखापालाकडून यथोचितरित्या प्रमाणित सादर करणे मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या बाबतीत, लेखे आयोगाकडे सादर करावेत आणि मान्यता नसलेल्या राजकीय पक्षाच्या बाबतीत राज्याच्या मुख्य निवडणूक आयोगाकडे दाखल करावेत.

# आय.

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

# (FAQs)

## क. उमेदवारांसाठी

**१.** **निवडणूक लढणाऱ्या उमेदवारासाठी निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा काय आहे ?**

**उत्तर.** प्रत्येक राज्य/संघराज्य क्षेत्राच्या विधानसभा/लोकसभा मतदारसंघासाठी विहित कमाल मर्यादा खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. (१) | राज्ये/संघराज्यांची नावे (२) | लोकसभा मतदार संघ (३) | विधानसभा मतदार संघ (४) |
|---|---|---|---|
| १. | आंध्रप्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओडीशा, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, दिल्ली आणि जम्मू व काश्मीर. | ९५.०० लाख | ४०.०० लाख |
| २. | मणीपूर, मेघालय, मिझोराम, नागलँड आणि त्रिपुरा. | ९५.०० लाख | २८.०० लाख |
| ३. | अरूणाचल प्रदेश, गोवा, सिक्किम, अंदमान व निकोबार बेटे, चंदिगड, दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव, लक्षद्विप, व पुदुचेरी आणि लडाख. | ७५.०० लाख | *२८.०० लाख |

* दिल्ली, पुदुचेरी आणि जम्मू व काश्मीर सोडून इतर संघ विधानसभा राज्य क्षेत्रांच्या नाहीत.

**२.** **मी विधानसभा मतदारसंघ/लोकसभा मतदारसंघाचा उमेदवार आहे. माझ्याकडून निवडणूक खर्चासंदर्भात काय अपेक्षित आहे ?**

**उत्तर.** (अ) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे सर्व उमेदवारांना निवडणूक खर्च नोंदवही पुरविण्यात येईल आणि त्या उमेदवारांनी उमेदवारीचे नामनिर्देशन भरल्याच्या दिनांकापासून निकालांच्या घोषणेच्या दिनांकापर्यंत दोन्ही दिनांक धरुन यथोचित व अचूकपणे निवडणूक खर्चाच्या लेखा ठेवणे आवश्यक आहे.

(ब) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या वेळापत्राकानुसार निवडणूक प्राधिकाऱ्यासमोर निवडणूक प्रचार कालावधीत किमान ३ वेळा निवडणूक खर्चाची लेखा तपासणी करणे आवश्यक आहे.

(क) निकाल घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यासमोर सर्व उमेदवारांनी त्यांच्या खरा निवडणूक खर्चाचा लेखा दाखल करावयाचा आहे.

**३.** **उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची नोंदवही काय आहे ? जी निकालाची घोषणा झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे ?**

**उत्तर.** प्रत्येक निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीच्या निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे खालीलप्रमाणे नोंदवह्या/विवरणपत्रे दाखल करावीत.

(एक) दैनंदिन लेखा नोंदवही (उमेदवाराने किंवा त्याच्या मतदान प्रतिनिधीने सही करून सर्व देयके व प्रमाणके कालक्रमानुसार जोडावे.)

(दोन) रोख नोंदवही.

(तीन) बँक नोंदवही (बँक विवरणपत्राच्या प्रमाणित प्रतीसह).

(चार) उमेदवाराने येथोचितरीत्या स्वाक्षरी केलेले गोषवारा विवरणपत्र (भाग-एक ते चार) व अनुसूची १ ते ११.

(पाच) उमेदवाराने यथोचित स्वाक्षरी केलेले शपथपत्र.

**४. केवळ उमेदवाराच्या निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते असणे अनिवार्य आहे का? ते कधी आणि कोठे उघडले पाहिजे?**

**उत्तर.** होय, स्वतंत्र बँक खाते असणे अनिवार्य आहे, उमेदवाराने त्याचा/तिचा नामांकन अर्ज भरण्याच्या किमान एक दिवस आधी कोणत्याही वेळी खाते उघडले पाहिजे. एकतर तो उमेदवाराच्या नावाने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीसह संयुक्त नावाने उघडू शकतो. तथापि, उमेदवाराच्या कुटुंबातील कोणतीही सदस्या किंवा अन्य कोणतीही तो/ती व्यक्ती सोबत उमेदवाराची निवडणूक प्रतिनिधी नसेल तर संयुक्त नावाने बँक खाते उघडता येणार नाही. राज्यात कुठेही सहकारी बँकेसह कोणत्याही बँकेत किंवा टपाल कार्यालयात खाते उघडता येऊ शकेल. या खात्याचा तपशील नामांकनाचा अर्ज भरण्याच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविण्यात येईल. उमेदवाराने केवळ याच खात्यातून निवडणूक खर्चासाठीची सर्व रक्कम जमा करावी आणि त्याचा/तिचा सर्व निवडणूक खर्च करावा. निवडणूक खर्चासाठीच असलेले/स्वतंत्र बँक खाते उघडण्यास अपयशी ठरल्यास, आयोगाद्वारे विहित केलेल्या रीतिने खाते चालवण्यास अपयशी ठरल्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

**५. खर्च निरीक्षक व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासमोर निवडणूक खर्च नोंदवही सोबत सर्व देयके व प्रमाणके दाखल करणे आवश्यक आहे का ? आणि उमेदवाराने इतर कागदपत्र दाखल करणे आणि स्वाक्षरित करणे आवश्यक आहे** ?

**उत्तर.** होय, निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ यामध्ये केलेल्या तरतुदीनुसार, जिथे प्रमाणके मिळणे व्यवहार्य नाही त्याबाबींना वगळून, खर्चाच्या प्रत्येक बाबींसाठी सर्व प्रमाणके मिळवावीत. उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधीद्वारे सर्व प्रमाणके प्रदान केल्याच्या दिनांकानुसार व अनुक्रमांकाप्रमाणे निवडणूक खर्चाच्या लेख्यासह दाखल करावीत आणि अशा अनुक्रमांकाची लेख्यामध्ये नोंद केलेली असली पाहिजे. उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने उर्वरित आवश्यक असलेल्या कागदपत्रांवर सही करताना स्वतः उमेदवाराने शपथपत्र व सारांश विवरणपत्रावर सही करणे आवश्यक आहे.

**६. जर, मी लेखा अजिबातच दाखल केला किंवा तो लेखा विहित वेळेत व रीतीने दाखल केला नाही तर काय होईल?**

**उत्तर.** जर उमेदवार, कायद्याने आवश्यक असलेल्या रीतीने किंवा विहित वेळेत कोणत्याही प्रकारे त्याचे/तिचे लेखे दाखल करण्यात अपयशी ठरल्यास किंवा, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १० क अन्वये सुरुवातीला त्याच्या/तिच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल आणि तो/ती आयोगाद्वारेच्यासाठी अनुसरावयाच्या पुढील योग्य त्या प्रक्रियेनेतर अपात्र ठरविण्यात येऊ शकेल आणि, उमेदवार अपात्र असल्याची घोषणा करण्यात आल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या कालावधीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांचा किंवा राज्य/संघराज्य क्षेत्राच्या विधानसभेचा किंवा विधान परिषदचा सदस्य असण्यासही तो/ती अपात्र असेल.

**७. लेखा मेळ बैठक म्हणजे काय ? उमेदवाराला बैठकीस उपस्थित रहावे लागते का ?**

**उत्तर.** उमेदवाराने ठेवलेल्या निवडणूक खर्चाच्या लेख्यात कोणत्याही विसंगती असल्यास, त्या विसंगतीचा, प्रत्येक उमेदवाराच्या बाबतीत लेखांकन पथकाकडून ठेवण्यात आलेल्या लेख्यांशी मेळ घालण्याकरिता निकाल घोषित झाल्यानंतर २६ व्या दिवशी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून लेखा मेळ बैठक बोलावण्यात येते. उमेदवाराच्या इच्छेनुसार, त्यांना ही संधी उपलब्ध करून देण्यात येते.

**८. खाते प्रदेयी धनादेशाद्वारे रुपये १०,००० पेक्षा अधिक निवडणूक खर्च करणे आवश्यक आहे का ?**

**उत्तर.** होय, आयोगाच्या विद्यमान सूचनांप्रमाणे, उमेदवाराने सर्व निवडणूक खर्च, जिथे किरकोळ खर्चासाठी धनादेश देणे शक्य नाही तिथे निवडणूक प्रयोजनासाठी उघडलेल्या बँक खात्याद्वारे खाते प्रदेयी धनादेशाद्वारे करावा. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने कोणत्याही खर्चाच्या बाबीकरिता एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला द्यावयाची रक्कम ही रुपये १०,००० पेक्षा जास्त नसेल तर, ती निवडणुकीसाठी उघडलेल्या बँकेच्या खात्यातून काढून रोख रकमेच्या स्वरूपात असे खर्च भागावले जावेत. इतर सर्व खर्च हे उपरोक्त बँकेच्या खात्यातून खाते जमा धनादेशाद्वारे केले जावा.

**९. उमेदवाराने आपले नामांकन भरण्यापूर्वी केलेल्या निवडणूक खर्चासाठीचा लेखा ठेवणे आवश्यक आहे का?**

**उत्तर.** प्रत्येक निवडणूक लढणाऱ्या उमेदवाराने नामांकनाच्या तारखेपासून ते निकाल घोषित झाल्याच्या तारखेपर्यंत केलेल्या सर्व खर्चाची लेखा विवरणपत्रात नोंद केली गेली पाहिजे. उमेदवार, प्रचार कालावधी दरम्यान वापरण्यात आलेल्या प्रचार सामग्रीवर केलेल्या खर्चाचा निवडणूक संबंधीच्या खर्चात अंतर्भाव करील.

**१०. विविध वस्तूंचे दर कसे ठरविले जातात आणि मला हे दरपत्रक कुठे मिळेल ?**

**उत्तर.** विहित केलेल्या नमुन्यामध्ये उमेदवारानी दैनिक स्वरूपात नोंदविण्यात येणाऱ्या खर्चाची उचित छाननी सुकर करण्यासाठी, आयोगाने असे निदेश दिले आहेत की, जिल्हा निवडणूक अधिकारी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत विचारविनिमय करून जिल्ह्यातील पूर्वीच्या दरपत्रकावर आधारित निवडणूक प्रचाराच्या वापरासाठी लागणाऱ्या सर्वसाधारण वस्तूंचे दरपत्रक संकलित करील. जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याची खात्री केली पाहिजे की, अशा सर्व वस्तूंच्या दराची यादी ही सर्व उमेदवारांना आणि निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवणाऱ्या समितींना उपलब्ध करून दिली जाईल.

**११. उमेदवाराने त्याच्या/तिच्या निवडणूक प्रचारा दरम्यान समाज माध्यमाचे खाते कसे ठेवले पाहिजे ?**

**उत्तर.** उमेदवार, इंटरनेट कंपन्या व जाहिरात करणारी संकेतस्थळे यांना केलेल्या प्रदानाचा आणि प्रचाराशी संबधित कलात्मक आशय निर्मितीवरील कार्यात्मक खर्च समाज माध्यमांवरील खात्यांच्या देखभाल करणाऱ्या पगारी कर्मचाऱ्यांच्या गटाला देण्यात येणाऱ्या पगार व वेतनावरील क्रियात्मक खर्च, यांचा अंतर्भाव करील.

**१२. जेव्हा "स्टार प्रचारक" माझ्यासाठी प्रचार रॅली घेतात तेव्हा मी उमेदवार म्हणून निवडणूक खर्चाचा हिशेब दिला पाहिजे का ?**

**उत्तर.** जर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी सार्वजनिक प्रचार रॅलीच्या किंवा स्टार सभेच्या कार्यक्रमांमध्ये स्टार प्रचारकासोबत मंचावर सहभागी होत असेल, तेव्हा स्टार प्रचारकाच्या प्रवास खर्चाव्यतिरिक्त त्या रॅलीवरील संपूर्ण खर्च उमेदवाराच्या लेख्यात परिगणित करण्यात येईल. जर उमेदवार मंचावर उपस्थित नसेल परंतु, नावानिशा त्या उमेदवाराचे बॅनर/पोस्टर लावले असतील किंवा सार्वजनिक रॅलीच्या स्थळी त्या उमेदवाराची छायाचित्रे प्रदर्शित केली असतील किंवा "स्टार प्रचारक" सार्वजनिक रॅली/सभे दरम्यान त्या उमेदवाराचे नाव घेऊन प्रचार करीत असेल, तर त्या रॅली/सभेसाठी उपस्थित असलेल्या "स्टार प्रचारक" प्रवास खर्चाव्यतिरिक्त सर्व खर्च त्या उमेदवाराच्या निवडणूक लेख्यात परिगणित करण्यात येईल. जर रॅली/सभेत एकापेक्षा अधिक उमेदवारांचा सहभाग त्यांच्या नावासह मंचावर बॅनर किंवा पोस्टर प्रदर्शित केले असतील तर, अशा रॅली/सभेवरील खर्चाची अशा सर्व उमेदवारांमध्ये समान विभागणी करून त्यांच्या निवडणूक लेख्यात परिगणित करावा.

**१३. प्रचारासाठी किती वाहनांचा वापर केला जाऊ शकेल आणि त्यासाठी किती वाहनांची परवानगी काढली जाऊ शकेल?**

**उत्तर.** निवडणुकीच्या प्रयोजनासाठी उमेदवाराने वापर करावयाच्या वाहनांच्या संख्येवर कोणती ही मर्यादा नाही. उमेदवाराने, निवडणूक निर्णय अधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी, यांचेकडे निवडणूक प्रचारासाठी ज्या प्रभाग क्षेत्रात वाहनांचा वापर करावयाचा आहे. त्याचा आणि अशा वाहनांचा सविस्तर तपशील दिल्यानंतर उमेदवाराला परवानगी देण्यात येईल. त्या परवानगीची मूळ प्रत वाहनाच्या पुढील दर्शनी भागाच्या काचेवर लावावी. त्यात वाहनांची क्रमांक परवानगी दिल्याचा दिनांक, उमेदवाराचे नाव आणि ज्या प्रभाग क्षेत्रात प्रचारासाठी वापर करावयाचा आहे च्या काचेवर समावेश असेल. उमेदवाराने त्याच्या दैनंदिन लेखा नोंदवहीत परवानगी मिळालेल्या वाहनांवर केलेल्या खर्चाचा हिशेब ठेवावा. जर उमेदवार प्रचार कालावधीत त्याच्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून नोटीस बजावण्यात आल्यानंतरसुद्धा तीन दिवसांच्या आत, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडील दिनांकानिशी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार निवडणूक प्राधिकाऱ्यासमोर, तपासणीसाठी अपील निवडणूक खर्च नोंदवही सादर करण्यात कसूर करील तेव्हा निवडणूक निर्णय अधिकारी वाहनांची दिलेली परवानगी काढून घेईल. जर प्राधिकृत अधिकाऱ्याकडून अधिकृत/परवानगी शिवाय प्रचारासाठी वापरले तर ते उमेदवारासाठी अनधिकृत प्रचार असल्याचे मानण्यात येईल आणि त्या बाबतीत भारतीय दंड संहितेच्या प्रकरण-नऊ क च्या दंडात्मक तरतूदी लागू होतील आणि त्यांस त्वरित प्रचार करण्यास रोखण्यात येईल.

(शा.म.मु.) वाय २६९८–४४ (७३०-३-२०२४)

## ब. राजकीय पक्षाकरिता

**१. राजकीय पक्षांनी कोणकोणती विवरणपत्रे दाखल करणे आवश्यक आहे ?**

**उत्तर.** राजकीय पक्ष पुढील विवरणपत्रे सादर करतील :—

अंशदान अहवाल.— प्रत्येक वर्षाच्या ३० सप्टेंबरपर्यंत किंवा आयकर विवरण दाखल करण्यासाठी सीबीडीटी द्वारे वाढवण्यात येईल अशा दिनांकापर्यंत.

वार्षिक लेखापरिक्षित लेखा.—प्रत्येक वर्षाच्या ३१ ऑक्टोबरपर्यंत.

निवडणूक खर्चाचे विवरणपत्र.—विधानसभेच्या निवडणुका संपल्यापासून ७५ दिवसांच्या आत आणि लोकसभा निवडणूक संपल्यापासून ९० दिवसांच्या आत.

उमेदवारांना राजकीय पक्षांनी वितरित केलेल्या रकमेचा तपशील देणारे भागशः निवडणूक खर्चाचे विवरणपत्र निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल.

मान्यताप्राप्त राजकीय पक्ष विहित वेळेत आणि रीतीने उपरोक्त विवरणपत्रे भारताच्या निवडणूक आयोगाकडे दाखल करतील तर, मान्यताप्राप्त नसलेले राजकीय पक्ष त्यात्या राज्ये/संघराज्यक्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे ती दाखल करतील.

**२. एखाद्या राजकीय पक्षाचा "स्टार प्रचारक" कोण असतो ?**

**उत्तर.** ज्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या निवडणूक प्रचारकाचे (मान्यताप्राप्त राजकीय पक्ष असल्यास ४० पेक्षा अधिक नसतील आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षाव्यतिरिक्त इतर पक्ष असल्यास, २० पेक्षा अधिक नसतील), नाव, अशा निवडणुकीची अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीच्या आत आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना कळविलेले असतात, त्याला "स्टार प्रचारक" (स्टार प्रचारक) असे संबोधले जाते. या नेत्यांनी (स्टार प्रचारक) राजकीय पक्षाच्या प्रचार कार्यक्रमासाठी केलेल्या हवाई प्रवासावर अथवा अन्य कोणत्याही साधनाने केलेल्या प्रवासाला केलेला खर्च हा निवडणुकीच्या संबंधात त्या राजकीय पक्षाच्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या उमेदवारांनी प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानले जाणार नाही.

**३. एखादी व्यक्ती/संस्था, पक्ष यांच्याकडून रोख रकमेच्या स्वरूपात स्वीकारावयाच्या देणगी च्या रकमेची मर्यादा किती आहे?**

**उत्तर.** कोणतीही व्यक्ती/संस्था किंवा राजकीय पक्ष यांच्याकडून रोख रकमेतीची देणगी स्वीकारण्याची मर्यादा रुपये १०,००० इतकी आहे, जर देणगी रुपये १०,००० पेक्षा जास्त असेल तर ती धनादेश/धनाकर्ष किंवा ई-पेमेंटच्या मार्फत करण्यात यावी.

**४. माझ्या राजकीय पक्षाने दुसऱ्या राजकीय पक्षासोबत (पक्षांसोबत) युती केलेली असेल तर, तेव्हा उमेदवाराकडून (उमेदवारांकडून) निवडणूक खर्चाचा हिशेब कसा लावण्यात येईल ?**

**उत्तर.** पक्षाच्या युती संदर्भात कायद्यामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही आणि म्हणून हा संपूर्ण खर्च उमेदवाराच्या युती असलेल्या कोणत्याही पक्षांने (पक्षांनी) अशा उमेदवाराला प्रचार केलेला असेल तेव्हा संपूर्ण खर्च त्या उमेदवाराच्या लेख्यात परिगणित केला जाण्यास पात्र असेल.

**५. निवडणूक प्रचार कालावधीमध्ये स्टार प्रचारकास रोख रक्कम जवळ बाळगता येईल का ?**

**उत्तर.** होय. स्टार प्रचारक केवळ त्याचा/तिच्या वैयक्तिक वापरासाठी किंवा पक्षाच्या कोषाध्यक्षाकडील प्रमाणपत्रासह पक्षाच्या कोणत्याही पदाधिकारी यांना रुपये १ लाखापर्यंत रोख जवळ बाळगता येईल.

**६.** **"स्टार प्रचारकाच्या" प्रचारक रॅली दरम्यानचा खर्च कसा हिशेबात धरण्यात येईल ?**

**उत्तर.** राजकीय पक्षाच्या नेत्यानी स्टार प्रचाराकांनी केलेल्या हवाई प्रवासावरील खर्च किंवा अन्य कोणत्याही साधनाने केलेल्या प्रवासावरील खर्च हा राजकीय पक्षाच्या खर्च म्हणून हिशेबात धरला जाईल. जर सुरक्षा रक्षक, वैद्यकीय सेवक यांसह कोणताही सेवक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती, तसेच संबंधित मतदार संघातील उमेदवार नसलेला पक्षाचा कोणताही सदस्य किंवा इलेक्ट्रॉनिक व मुद्रण माध्यमाचा कोणताही प्रतिनिधी, यांनी राजकीय पक्षाच्या नेत्याच्या स्टार प्रचारक वाहन/विमान/हेलिकॉप्टर इत्यादी मधून प्रवास केला तर अशा नेत्याचा प्रवास खर्च पूर्णतः राजकीय पक्षांच्या हिशेबात धरण्यात येईल. परंतु, नेत्यासोबत प्रवास करणारा राजकीय पक्षाचा उक्त सदस्य किंवा माध्यम प्रतिनिधी किंवा सेवक कोणत्याही रीतीने कोणत्याही उमेदवारासाठी निवडणूक प्रचारामधील कोणतीही भूमिका बजावणार नाहीत. तथापि, जर अशी कोणतीही (अशा) व्यक्ती नेत्यासोबत प्रवासात सहभागी होऊन कोणत्याही रीतीने उमेदवारासाठी निवडणूक प्रचारामधील कोणतीही भूमिका बजावीत असेल किंवा जर कोणत्याही उमेदवाराने अशा नेत्यासोबत त्याचे वाहन/विमान/हेलिकॉप्टर यामधून प्रवास केला असेल तर त्या नेत्याच्या प्रवास खर्चाच्या ५० टक्के इतका खर्च अशा (उमेवाराबरोबर) उमेदवारांबरोबर विभागला जाईल.

**७.** **जर एखाद्या व्यक्तीला झेड + सुरक्षा पुरविण्यात आली असेल तर त्याच्या खर्चाचा हिशेब कसा केला जाईल ?**

**उत्तर.** झेड + सुरक्षा पुरविलेल्या व्यक्तीला राज्याच्या मालकीच्या एका बुलेट प्रुफ वाहना संबंधातील प्रचालन खर्च हा, निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान अशासकीय प्रयोजनांसाठी जेव्हा त्याचा वापर केला असेल तेव्हा संबंधित व्यक्तीकडून सोशला जाईल. जे स्टार प्रचारक आहेत अशा अभ्यागत राजकीय कार्यकर्त्यांच्या बाबतीतील खर्च पक्षांच्या लेख्यामध्ये परिगणित करण्यात येईल. जर स्टार प्रचारक हा उमेदवार असेल तर मतदारसंघातील वाहनाचा प्रचालन खर्च हा, त्याच्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात धरला जाईल. जर सुरक्षा सुविधांचा लाभ घेत असलेला राजकीय कार्यकर्ता स्टार प्रचारक नसेल, आणि तो उमेदवारासाठी प्रचार करीत असेल तर अशा प्रचारासाठी वापरलेल्या सुरक्षा वाहनाचा प्रचालन खर्च उमेदवाराच्या हिशेबात परिगणित येईल.

**८.** **एखाद्या राजकीय पक्षाचा नेता स्टार प्रचारक सार्वजनिक रॅलीत/सभेत सहभागी होणार असेल तेथे बॅरिकेड व मंच उभारण्यावरील आलेले खर्च उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) लेख्यात परिगणित केला जाईल काय ?**

**उत्तर.** जर राजकीय पक्षाचा एखादा नेता स्टार प्रचारक (स्टार प्रचारक) रॅली/सभेत सहभागी होणार असेल तर सुरक्षिततेच्या कारणास्तव शासकीय अभिकरणांनी अथवा कोणत्याही खाजगी अभिकरणांनी बॅरिकड/मंच, इत्यादी उभारण्यावर केलेला खर्च हा, ज्याच्या मतदारसंघातून रॅली/सभा होत असेल त्या उमेदवाराच्या लेख्यात परिगणित करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांचा एखादा गट व्यासपीठावर उपस्थित असेल तेव्हा हा खर्च या उमेदवारांमध्ये समसमान विभागण्यात येईल.

## क. निवडणूक यंत्रणा

**१.** **जिल्हा खर्च संनियंत्रण समिती चे कोण कोण सदस्य असतात आणि जिल्हा खर्च संनियंत्रण समितीची कार्ये कोणकोणती असतात ?**

**उत्तर.** जिल्हा खर्च संनियंत्रण समितीमध्ये (एक) मतदार संघाचा प्रभारी खर्च निरीक्षक (दोन) जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ) आणि (तीन) जिल्हा उप निवडणूक अधिकारी/जिल्ह्याच्या खर्च संनियंत्रण प्रभारी अधिकारी यांचा समावेश असेल. जिल्हा खर्च संनियंत्रण समिती, उमेदवाराने केलेला निवडणूक खर्च लपविल्या प्रकरणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे त्या उमेदवारावर बजावण्यात आलेल्या नोटिशीमध्ये नमूद केलेला पुरावा आणि त्यासंबधीचे उमेदवाराचे उत्तर तपासल्यानंतर, उमेदवाराचे केलेला खर्चाचे दमन करणाऱ्या या प्रकरणाबाबत त्यावर आणि त्यासंबंधात शक्यतो उमेदवाराकडून उत्तर मिळाल्यापासून विशेषकरुन ७२ तासांच्या आत, त्या प्रकरणाचा निर्णय करील.

२. **खर्च निरीक्षक जिल्हा मुख्यालयाला केव्हा केव्हा भेट देईल आणि त्याने कोणकोणती कर्तव्य पार पाडणे आवश्यक असेल ?**

**उत्तर.** खर्च निरीक्षक त्याला नेमून दिलेल्या विधानसभा मतदारसंघ/जिल्हा मुख्यालयाला तीन भेटी देईल.

**पहिली भेट.**—खर्च निरीक्षक, निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिवशी पूर्ण ३ दिवसांच्या कालावधीसाठी मतदारसंघात पोहोचेल. या भेटीत तो, निवडणूक खर्चाचे संनियंत्रण करण्याचे संनियंत्रण करणाऱ्या सर्व पथकांना भेटील, तो जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक (एसपी) पोलीस खात्याचे समन्वय अधिकारी आयकर व राज्य उत्पादन शुल्क व इतर अंमलबजावणी अभिकरणे यांच्याशी समन्वय साधील. तो स्वतःचा संपर्क क्रमांक सुद्धा अधिसूचित करील, जेणेकरून तो निवडणुकीच्या प्रक्रियेदरम्यान कोणत्याही अनुचित घटनेची किंवा गैरव्यवहारासंबधी उमेदवार आणि लोकांकडून आलेल्या तक्रारी प्राप्त करू शकेल.

**दुसरी भेट.**—तो उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेनंतरच्या लगतच्या तारखेस तो पुन्हा दुसऱ्यांदा मतदारसंघास भेट देईल आणि संपूर्ण प्रचाराच्या कालावधीत त्या मतदारसंघात राहील आणि मतदान पूर्ण झाल्यानंतरच तो मतदारसंघ सोडील. तथापि, आयोगाने त्याला निदेश दिले असतील तर तो मतमोजणी होईपर्यंत तेथे थांबेल. या कालावधी दरम्यान तो नियतकालिक अवधीने खर्च संनियंत्रणाच्या कामात गुंतलेल्या सर्व पथकांच्या कार्याचे निरीक्षण करील आणि कोणत्याही पथकांच्या कार्यामध्ये निष्काळजीपणा किंवा अनियमितता दिसून आल्यास, तो ती बाब जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल. तो प्रचाराच्या कालावधी दरम्यान कमीत कमी तीन वेळा प्रत्येक उमेदवाराची खर्च नोंदवहीची तपासणी करील आणि त्यातील विसंगतींवर आपले भाष्य करील.

**तिसरी भेट.**—खर्च निरीक्षक निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून पंचविसाव्या दिवशी पुन्हा एकदा जिल्ह्यास भेट देईल आणि निकाल जाहीर झाल्यानंतर, उमेदवारांनी सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या लेख्यांच्या विवरणपत्रांची छाननी करण्यात, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला सहाय्य करण्यासाठी तो पूर्ण ८ दिवस जिल्ह्यात थांबेल. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने, निकाल जाहीर झाल्यापासून सव्विसाव्या दिवशी बोलावलेल्या लेखा मेळ बैठकीस तो उपस्थित असेल.

३. **कोण कोणती पथके निवडणूक खर्च संनियंत्रण यंत्रणेचे भाग बनतील ?**

**उत्तर.** निवडणूक खर्च संनियंत्रण यंत्रणेचे भाग असणारी पथके पुढीलप्रमाणे आहेत :—

- खर्च निरीक्षक (ईओ).
- सहायक खर्च निरीक्षक (एईओ).
- व्हीडियो संनिरीक्षण पथक (व्हीएसटी).
- व्हीडियो पाहणारा पथक (व्हीव्हीटी).
- लेखांकन पथक(एटी).
- तक्रार संनियंत्रण नियंत्रण कक्ष व कॉल सेंटर.
- माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (एमसीएमसी).
- भरारी पथके.
- स्थैतिक चौकशी / तपासणी पथक (एसएसटी).

४. **खर्च निरीक्षकाने एकूण किती तपासण्या करणे आवश्यक आहे ?**

**उत्तर.** खर्च निरीक्षकाने एकूण ३ तपासण्या केल्या पाहिजेत. तपासणीच्या तारखा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून सर्व उमेदवाराला तपासणीच्या आधीच कळविण्यात येतील. शेवटची तपासणी, मतदानाच्या दिवासाच्या ३ दिवस अगोदर करण्यात येणार नाही. जेणे करुन प्रचाराचा मोठा खर्च तपासणीच्या कक्षेत येईल.

**५. अभिरूप (शॅडो) निरीक्षण नोंदवही (एसओआर) म्हणजे काय आहे ?**

**उत्तर.** लेखांकन पथक प्रत्येक उमेदवाराच्याबाबतीत दिलेल्या नमुन्यात एक अभिरूप (शॅडो) निरीक्षण नोंदवही ठेवील. मोठ्या प्रचार यात्रा/मिरवणुका/सभा इत्यादींवर झालेला प्रत्यक्ष खर्चाच्या संदर्भातील बाबींची उमेदवाराने दिलेल्या माहितीशी अन्योन्य तपासणी करण्याकरिता ही नोंदवही ठेवली जाते.

**६. पुराव्याची संचिका म्हणजे काय ?**

**उत्तर.** लेखांकन पथकाकडून प्रत्येक उमेदवारासाठी अभिरूप निरीक्षण नोंदवहीसोबत एक पुराव्याची संचिका ठेवण्यात येईल. सीडी/डीव्हीडी/दस्ताऐवज इत्यादीच्या स्वरूपातील पुरावे अभिरूप निरीक्षण नोंदवहीमध्ये नोंद केलेल्या खर्चाशी प्रति संदर्भ म्हणून घेण्यात येईल.

**७. निवडणूक प्रचाराच्या संदर्भातील पत्रिका, भित्तीपत्रके इत्यादींच्या छपाईवर कोणते निर्बंध आहेत ?**

**उत्तर.** कोणतीही व्यक्तीला ज्याच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणतेही निवडणूक पत्रक किंवा जाहिरात फलके छापणार नाही किंवा प्रकाशित करणार नाही अथवा मुद्रित किंवा प्रकाशित करण्यास कारणीभूत ठरणार नाही. त्याच्या प्रकाशकाच्या ओळखीबाबत तिने स्वाक्षरित केलेले आणि तिला व्यक्तीशः ओळखत असलेल्या दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले प्रतिज्ञापत्र तिने दोन प्रतीमध्ये मुद्रकाला दिल्याशिवाय ती तसे करणार नाही. इतकेच नव्हे तर, तो दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रकाने त्या दस्तऐवजाच्या एका प्रतीसह प्रतिज्ञापत्राची एक प्रत संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला किंवा जर तो दस्तऐवज राज्याच्या राजधानीच्या मुद्रित ठिकाणी झाली असेल तर मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला पाठवावी. वर नमूद केलेल्या कोणत्याही उक्त तरतुदींचे जर एखाद्या व्यक्तीने उल्लंघन केले तर तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची आणि रुपये २,००० पर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**८. राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांनी त्यांच्या पक्षांच्या नेत्यांची (स्टार प्रचारक) यादी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला आणि भारताच्या निवडणूक आयोगाला किती दिवसात पाठवणे आवश्यक आहे ?**

**उत्तर.** निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत नेत्यांची यादी (स्टार प्रचारक) राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि निवडणूक आयोग यांना कळवावी लागेल. “स्टार प्रचारक” म्हणून, मान्यताप्राप्त राजकीय पक्ष (राष्ट्रीय/राज्य) ४० व्यक्तीची नावे पाठवू शकेल आणि नोंदणीकृत राजकीय पक्ष “स्टार प्रचारक” म्हणून २० व्यक्तींची नावे पाठवू शकेल. ह्या स्टार प्रचारकाच्या प्रवासाचा खर्च हा उमेदवाराच्या खर्चामध्ये परिगणित केला जाणार नाही.

**९. निवडणुकीच्या कालावधी दरम्यान रोख रक्कम/देणग्या बाळगण्याची मर्यादा काय आहे ?**

**उत्तर.** भरारी पथक/स्थैतिक चौकशी/ तपासणी पथकाच्या तपासणी दरम्यान उमेदवार त्याचा प्रतिनिधी किंवा पक्षाचा कार्यकर्ता प्रवास करीत असलेल्या वाहनातून जर ५०,००० पेक्षा जास्त असलेली रोख रक्कम किंवा जाहिरात फलके किंवा निवडणुकीचे साहित्य किंवा कोणतेही अंमली पदार्थ, दारू, शस्त्रे किंवा मतदारांना प्रलोभने दाखवण्यासाठी वापरले जाण्याचा संभव असेलेल्या रुपये १०,००० पेक्षा जास्त किंमतीच्या भेट वस्तू वाहनात आढळून आल्यास किंवा एखाद्या वाहनातून इतर कोणत्याही अनुचित वस्तू आढळून आल्यास त्या जप्त केल्या जाण्यास पात्र असतील.

**१०. कोणत्या परिस्थितीत रोख रकमेच्या / वस्तूंच्या जप्तीविषयीची माहिती आयकर विभागाला देता येईल ?**

**उत्तर.** जर वाहनामध्ये १० लाखांपेक्षा अधिक रक्कम आढळून आली आणि यांनी याबाबत कोणताही गुन्हा केल्याचा कोणताही संशय नसेल तर किंवा त्याचा कोणताही उमेदवार किंवा प्रतिनिधी किंवा पक्षाचा कार्यकर्ता यांच्याशी संबंध नसेल तेव्हा स्थैतिक चौकशी / तपासणी पथक ती रक्कम जप्त करणार नाही, आणि आयकर कायद्याअंतर्गत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी त्यासंदर्भातील माहिती आयकर प्राधिकरणाला दिली जाईल.

**११. निवडणुकीच्या दरम्यान जप्त केलेली रोख रक्कम इत्यादी सोडवण्यासाठी पीडित व्यक्तीने कोणत्या प्राधिकरणाकडे अपील करावे/जावे ?**

**उत्तर.** जप्त केलेल्या रोख रक्कमेवर निर्णय घेण्यासाठी जिल्हा स्तरावरील समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :---

(एक) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/सीडीओ/पी,डी,डीआरडीए

(दोन) जिल्हा निवडणूक कार्यालयातील खर्च संनियंत्रण समन्वय अधिकारी आमंत्रक ; आणि

(तीन) जिल्हा कोषागार अधिकारी

जप्तीच्या विरोधात अपील करण्याची कार्यपद्धती जप्तीच्या दस्तऐवजामध्ये नमूद केलेली आहे आणि जप्तीच्या वेळी पीडित व्यक्तीला त्याची माहिती देण्यात येते. जरी कोणताही प्रथम चौकशी अहवाल/तक्रार दाखल करण्यात आली नसेल तर, रोख रकमेच्या/जप्त केलेल्या मौल्यवान चीज वस्तूंच्या संदर्भातील प्रकरण मतदानाच्या दिनांकानंतर सात दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीपर्यंत प्रलंबित ठेवले जाणार नाही. समितीच्या कामकाजास विस्तृत स्वरूपात प्रसिद्धी द्यावी, जेणेकरून लोकांची गैरसोय होणार नाही.

**१२. लाचलुचपतीच्या घटना/ दारू/ रोख रक्कम वितरण या विषयीची तक्रार कोठे करावी ?**

**उत्तर.** प्रत्येक जिल्ह्यामध्ये तक्रार संनियंत्रण कक्ष व कॉल सेंटर असते आणि त्यांचे क्रमांक प्रसार माध्यमामध्ये प्रसिद्ध करण्यात येतात. त्या क्रमांकावर तक्रार करता येते. लाचलुचपत, इत्यादीची कोणतीही घटना ज्या ठिकाणी घडत असेल तेथे भरारी पथक तात्काळ पोहोचेल.

**१३. प्रकाशनाचा खर्च कोण सोसेल ?**

**उत्तर.** जर काही खर्च असेल तर, संबंधित प्रकरणांमध्ये तो उमेदवार आणि राजकीय पक्ष उचलतील आणि त्याबाबतच्या नोंदी त्यांच्या खर्चाच्या विवरणात करण्यात येतील.

**१४. या खात्यावरील खर्चाचा हिशेब ठेवला जाईल का ?**

**उत्तर.** होय, हा निवडणूकीशी संबंधीत खर्च, असल्याने, त्या संदर्भात खर्च केल्यास तो, निवडणुकीच्या प्रयोजनासाठी केल्याचे परिगणित केला जाईल आणि त्याबाबतच्या नोंदी केल्या जातील आणि यथास्थिति जिल्हा निवडणूक अधिकारी / मुख्य निवडणूक अधिकारी भारत निवडणूक आयोग यांना त्या बाबतचे विवरण कळविले जाईल.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**